

# आनंद

मधू शिरगांवकर

सादर करत आहे

# आनंद

कादंबरी

## मधू शिरगांवकर

# आनंद

लेखिका– सौ मधू शिरगांवकर,

(Mrs. Mrinmayee Shirgaonkar)

Plot 13, Mangaldham, Pune 411038

Email id – madhushirgaonkar@gmail.com

WhattsApp - 9822208197

मुखपृष्ठ: डॉक्टर साधना देशपांडे, मधू शिरगांवकर

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ (दंड व तुरुंगवास)शकते

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# आनंद

## प्रकाशक – ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

9869674820 (Whatsapp for free ebooks)

प्रकाशन : ८ डिसेंबर २०२२

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



## सौ मधू शिरगांवकर,
## (Mrs. Mrinmayee Shirgaonkar)

वय ५६ वर्षे.
पेशाने फार्मास्युटिकल ट्रेनर आणि कन्सल्टंट.

- प्रमाणपत्रधारक योगशिक्षिका : Yog Daily हे फेसबूक पेज चालवते. त्यावर योगविषयक माहिती, त्यातील चुकीचे समज व काही योगासनांची प्रात्यक्षिके असा विडिओ बेस्ड कार्यक्रम करते.
- टीम विजन या दृष्टी आव्हानितांसाठी कार्य करणाऱ्या संस्थेसाठी पुस्तकवाचन
- पती, सासू, व आईवडील यांच्यासह गेली २८ वर्षे पुण्यात वास्तव्य. मुले नोकरीनिमित्त बाहेरगावी असतात.
- पन्नासाव्या वर्षी लेखनास सुरवात केली. लेखन करतानाचा आनंद सर्वात महत्वाचा आणि वाचकांची दाद ही सगळयात मोठी पावती असं मानते. वाचता वाचताच लेखनाची सुरवात झाली. दोन कथासंग्रह, चार लघुकादंबऱ्या, एक ललित लेखसंग्रह इसाहित्य वर प्रकाशित केले आहेत. कॉलेजमध्ये असताना केलेला अभिनय, नेपथ्य, दिग्दर्शन यांचा लेखन करताना नकळत उपयोग होतो.
  शास्त्रीय संगीत परमेश्वराच्या किंचित का होईना जवळ घेऊन जातं असा विश्वास वाटतो.

- ईसाहित्यवर आत्तापर्यंत सात पुस्तके प्रकाशित : प्रतिबिंब, सुवर्णमती, प्रायश्चित्त, कोडं या कादंबऱ्या, रंज'क'था, कल्प'क'था,हे कथासंग्रह, हलकं फुलकं हा नर्मविनोदी लेखांचा संग्रह.
- "माझा मराठीचा बोल" दिवाळीअंकात २०१७, २०१८, २०१९, २०२०च्या आवृत्यांमध्ये कथा व लेख प्रकाशित.
- "श्री व सौ" या २०१९ च्या दिवाळीअंकात तीन लघुकथा 'कथात्रयी' या सदरात प्रकाशित.
- निनाद या २०२० मध्ये अमेरिकेतून प्रसिद्ध झालेल्या विशेष अंकात लघुकथा प्रकाशित.
- ग्रहसंकेत या मासिकामध्ये श्री रमणमहर्षींवरील लेख प्रकाशित जून २०२०
- प्रतिबिंब ही कादंबरी छापील स्वरूपात मातृभारती प्रकाशनातर्फे प्रकाशित झाली.

# मनोगत

माझे आठवे पुस्तक 'आनंद', कादंबरीच्या स्वरूपात तुमच्या हाती सुपूर्द करताना मला केवढा आनंद वाटतो आहे हे शब्दात मांडणे कठीण आहे.

माझा लेखनप्रवास जिथे सुरु झाला तो फेसबूक ग्रुप ‘माझा मराठीचा बोल’वरच प्रथम 'आनंद'चं लेखन झालं. तिथल्या अनेक सभासदांनी आनंदवर माझ्याइतकंच, किंबहुना त्याहूनही काकणभर जास्तच प्रेम केलं. ही कादंबरी जवळपास दीड ते दोन वर्ष टप्प्याटप्प्यात लिहिली गेली. लिहिताना माझ्या सांसारिक अडचणींमुळे मध्ये अनेकदा अंतर पडलं, पण तरी आनंदवरचं त्यांचं प्रेम तसूभरही कमी झालं नाही. त्याबद्दल ‘माझ्या मराठीचा बोल’च्या सर्व सभासदांना मी मनःपूर्वक धन्यवाद देते. त्यांनी वारंवार आठवण करून, पुढे लिहिण्यासाठी प्रोत्साहन दिला नसतं तर ही कादंबरी पूर्ण झालीच नसती.

सर्वांचीच नावे इथे लिहायला हवीत खरंतर, पण जागेअभावी ते शक्य नाही. पण आपटे काका जे स्वतःच्या आजारपणातदेखील आनंद वाचून खूप प्रोत्साहित करणाऱ्या प्रतिक्रिया लिहीत होते, या पुस्तकाचं प्रकाशन मला पाहायचंय ही त्यांची इच्छा ते असेपर्यंत पूर्ण होऊ शकली नाही पण आजही ते जिथे असतील त्यांना आनंदच वाटेल याची खात्री वाटते.

'आनंद' ही एका चित्रकाराची कथा. ही एका अत्यंत संवेदनशील, मनस्वी मुलाची कथा. तसं पाहिलं तर ही काही कुटुंबांचीही कथा. ही कथा लिहिताना मी

स्वतःला विसरण्याचा आणि लेखनाशी संपूर्ण समरस होण्याचा आनंद घेतला. वाचताना तुम्हालाही हा आनंद मिळेल अशी आशा वाटते.

माझे काही जवळचे मित्रमैत्रिणी जे माझ्या लेखनाचे योग्य मूल्यमापन करून मला सूचना करत असतात, त्यांच्यात प्रामुख्याने प्रिया साठे, गिरीश गोगटे, डॉक्टर विवेक देशपांडे, आणि माझी बहीण वर्षा, यांचा खास उल्लेख केल्याशिवाय हे मनोगत पूर्ण होऊ शकत नाही. मी त्यांच्या सगळ्या सूचना मानल्या असं नाही, त्यामुळे काही दोष कथाप्रवाहात तुम्हाला जाणवले तर तो संपूर्ण माझा दोष आहे.

मुखपृष्ठासाठी माझी मैत्रीण, डॉक्टर साधना देशपांडे हिने तिचे नितांत सुंदर चित्र उपलब्ध करून दिले. योगायोग असा कि ही कथा न वाचताच तिने चितारलेले हे चित्र कथेला अगदी पूरक, आणि कथेतील कथाभागाशी साधर्म्य असणारे आहे. त्यासाठी धन्यवाद न देता मी तिच्या ऋणात राहणेच पसंत करेन.

शुद्धलेखनाविषयीही आधीच तुमची माफी मागते. कारण शुद्धलेखनाच्या चुका यात राहून गेल्या असण्याची दाट शक्यता आहे.

आनंद जसा गुणदोषांसकट मला आणि माझ्या समूहाच्या वाचकांना आपलासा वाटला तसा तो तुम्हालाही वाटेल अशी आशा करते.

ई साहित्य नेहमीच माझं लेखन तुमच्यापर्यंत पोहोचवण्यात कोणतीही कसर ठेवत नाही त्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

# अर्पणपत्रिका

**ही कादंबरी मी त्या सर्व कलावंतांना अर्पण करते ज्यांच्यासाठी त्यांची कला त्यांचा श्वास असते, कला त्यांना जगवते, आणि जागवते.**

# आनंद

## कादंबरी

# भाग १

१.१

आनंदचं नारळाच्या झाडाचं चित्रं हुबेहूब जमलं होतं. तो टक लावून त्या चित्राकडे पाहत तल्लीन झालेला. जणू आत्ता वाऱ्याबरोबर त्याच्या झावळ्या डोलू लागतील असं वाटलं त्याला. पट्कन आईला ते चित्र दाखवायला तो लगबगीने उठला. तेवढ्यात आण्णा, आनंदचे मोठे काका मागून आले, हातात चित्राचा कागद आणि जमिनीवर रंगपेटी पाहून त्यांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. त्यांनी तो चित्राचा कागद हिसकाऊन टराटरा फाडला. एक खाडकन मुस्काटीत मारली आनंदच्या. "गाढवा, रंगारी का व्हायचे आहे? जरा चार बुके शिकलास तर कारकून म्हणून चिकटवता येईल असा विचार करून फिया भरतो तुमच्या शाळेत, तर हा अक्कलशून्य रंगकामात दंग! बापाच्या वळणाने जायची लक्षणं आहेत ही, भीकेला लागण्याची!"

आनंद चुरचुरणारा गाल चोळत खाली मान घालून उभा राहीला, पण डोळ्यात येणारं पाणी त्याने पापणीआडंच दडवलं.

आण्णांना ही असली थेरं पसंत नव्हतीच. शिवाय इतका मोठा कुटुंब काबिला पोसता पोसता त्यांचीही दमछाक होत असावी. आनंदचे वडील सर्वात धाकटे, आणि इतर दोन बंधू, मोठ्या भावाच्या आज्ञेत होते. आई वडील लवकर गेल्यावर या भावानेच त्यांची काळजी घेतली होती. सगळेच शेतात राबत, पण म्हणावं तसं उत्पन्नं नव्हतं. वसंत, मधला भाऊ तेवढा नोकरीत, रोकड पगार घरी आणे, त्यामुळे घरात अर्थातच त्याच्या बायकोचा वासंतीचा वट होता.

अनंत, आनंदाचे वडील मुळातच अबोल, काहीसा नाजूक प्रकृतीचा, शेतातले काम फारसे जमेना म्हणून लहानसे घरासमोरच दुकान काढून दिले अण्णांनी, पण ते ही नुकसानीत निघाले, अनंता अधिकच घुमा झालेला त्यामुळे.

अनुराधा, आनंदची आई, दिवसरात्र राबून या सगळ्याची भरपाई करण्याचा आटोकाट प्रयत्न करी. आनंदाच्या अंगचे कलागुण तिला दिसत होते. पण हे पोट भरण्यास उपयोगाचे नाहीत हे सर्वांच्या बोलण्यातून तिला समजत होतं.

तिच एक होती, जिच्या कुशीत आनंद लहान मूल होई. पण घोडा झाला तरी आईचा पदर सोडत नाही म्हणून सगळे करवादत त्याच्यावर.

हळू हळू शाळेतही याचे परिणाम दिसू लागले.

आनंदला कविता अत्यंत आवडत. पाहता पाहता पाठही होत. पण लेखनाचा कंटाळा. त्यातून त्या कवितांवर प्रश्नोत्तरे लिहा म्हटलं की त्याला चीड यायची. मग कसंतरी वहीत खरडून टाकायचा. यापेक्षा त्या कवितेतले ते रान, पक्षी, फुलं, झरे, डोंगर, नदीनाले यांची चित्र काढायला का नाही सांगत? आनंदला नेहमी प्रश्न पडे.

"बघा बघा मुलांनो, या आनंदची वही, कोंबडा शाईत पाय बुडवून नाचलाय असं वाटतं! चित्रात कलाकारी दाखवता त्यापेक्षा हस्ताक्षर सुधारा जरा!" बाईंनी वही डेस्कवर फेकली.सगळी मुलं बाईंच्या या टिप्पणीवर खदाखदा हसली.आनंद, मनातून हिरमुसला नि बाईंकडे नुसता रागाने पाहत राहिला.कुठेतरी मेंदूत कायमचा एक ओरखडा, मनात एका काळसर सावलीने घर केले.

गणितात हुशार असणारा आनंद पुढच्या गणिताच्या तासालाही खोड्या करत राहीला मग. मन लागेच ना त्याचं गणितात.हळू हळू मग गणिताचे मास्तरही रट्टे देऊ लागले. "देवाने बुद्धी वाटली तेव्हा काय झोपा काढत होतास काय रे आनंदा?"परत सगळे फिदीफिदी हसले. हळूहळू आनंद एक अत्यंत खोडकर, 'ढ' मुलगा म्हणून ओळखला जाऊ लागला. घरी आते मामे भावंडं शाळेतल्या खोड्या सांगत नी आनंदला खरपूस मार बसे.पाचवीच्या परिक्षेत दोन विषय राहीले, मराठी व गणित! घरी सगळ्या पोरांचे निकाल पेढ्यांबरोबर आणि आनंदचा निकाल फटके, सगळ्यांची वाईट साईट बोलणी खाऊन साजरा झाला.

चुलत भावंडं सगळीच आपापल्या परिने चांगल्या मार्कांनी पास झालेली. “अनंता, पोरगं काही यशाला घालत नाही तुझं,” वसंत काका म्हणाले. आम्ही राबराबून पैसे कमवायचे, आणि यांच्या शिक्षणावर घालवायचे, यांनी माती करायची सगळ्याची.

अनंता तिरमिरीत उठला, आनंदाच्या समोर जाऊन उभा राहीला, खाडकन एक मुस्काटीत बसली आनंदाच्या, आनंद मागे झेलपाटला. आज पहिल्यांदा वडिलांनी मारलं होतं. मारापेक्षा ही वेदना तीव्र होती.

आनंद, मग सरळ अडगळीच्या खोलीत जाऊन बसला. दातांवर दात घट्ट धरले गेले, मुठी घट्ट मिटल्या गेल्या. आईने हळूच भात कालवून समोर ठेवला आणून, सगळ्यांची नजर चुकवून. आनंदाने त्याला बोटही लावलं नाही. ११ वर्षांचा आनंद, आपल्या रागाला दातांखाली रगडू पाहत बसून राहीला. त्या रात्री आनंदने रागारागाने माडीवरचे पडदे खालून कात्रीने कापून टाकले वेडेवाकडे. हे मात्र घरच्यांच्या सहनशीलतेच्या बाहेरचं होतं. चक्कं सकाळी सभा भरली वाड्याच्या ओसरीत.

जो तो तोंडसुख घेऊ लागला. काका, काकू,. सगळेच. “आईच्या लाडांनी बिघडलंय पोर, हा काही धड मॅट्रीकही होईलसं वाटत नाही, चोऱ्याबिऱ्याही करत असतील चिरंजीव?, कसलं उलट्या डोक्याचं पोर हे,” नाना बाजूंनी तोफखाना सुरू होता. आनंदला शिक्षा काय द्यावी यावर हिरहीरीने मतं येऊ लागली.

“शेतावर पाठवा मजुरीला, उपाशी ठेव आठवडाभर, कसा बरोबर लाईनवर येतो बघ. केळीच्या फोकाने काढा फाकलून, जन्माची अद्दल घडेल.”

आनंदाची आई, सगळयात लहान सून, डोळयाला पदर लावून कोपऱ्यात उभी होती. नेमके आईकडचे आजोबा आजी आलेले. त्यांना लेकीचं हे रडणं, नातवाचं केविलवाणं होणं पण डोळ्यात राग भरणं, सहन होईना. पण लेकीच्या सासरी बोलावं तरी कसं? शिवाय इतकी सगळी नातेवाईक मंडळी वाग्बाण सोडत असलेली.

पण तरी जरा धीर करून म्हणाले, “एखादं वर्ष आमच्याकडे पाठवता का आनंदाला? मी स्वत: जातीने लक्ष घालून अभ्यासाचं पाहीन त्याच्या. वातावरणही बदलेल. बघू काही उपयोग होतो का?”

“पाहा तुमच्याच्याने काही होते का.” एक खाणारं तोंड कमी या विचारानेच बहुधा परवानगी मिळाली.

तिसऱ्याच दिवशी निघाले. आईच्या डोळ्यांना धार लागलेली. डोक्यावरून हात फिरवत “शाहाणा हो रे बाळा,”एवढंच म्हणाली. आनंद आईला बिलगला. तिच एक होती फक्त त्याच्यावर माया करणारी, आता ती ही दुरावली. या आजीआजोबांचा सहवास नव्हता फारसा त्याला मिळाला. मनातून भेदरला होता. शिक्षा म्हणून पाठवताहेत यांच्याबरोबर ही भावनाही होतीच मनात. म्हणून रागही होता.

१.२

बस निघाली. आनंद ओठांवर दात घट्ट दाबून बसला. तीन सीटच्या सीटवर तो खिडकीजवळ, मधे आजी, व तिच्या शेजारी आजोबा असे बसले. साधारण पाच सहा तासांचा प्रवास, आनंदच्या आईने दशम्या दिल्या होत्या बांधून. गाडी सुरू झाल्यावर हळूहळू वारं येऊ लागलं खिडकीतून. आनंदचे डोळे मिटू लागले. रात्रभर त्याला झोप लागलीच नव्हती. मान पुढे कलंडू लागली. आजीने मांडीवर आडवे केले त्याला, तसा तट्कन उठला, अधिकच कोपऱ्यात सरकून बसला. डोळे ताणून बसला मग. आजोबा आजींनी एकमेकांकडे पाहिलं. आजोबांनी डोळयांनी खूण केली तशी आजी काही म्हणणार होती ती गप्पं झाली. पण दोघांच्याही मनात अस्वस्थता दाटून आली. घेतलेली जबाबदारी सोपी नव्हतीच पण निभावू शकू ना अशी आता शंका मनी दाटून आली. मधल्या स्टेशनवर गाडी थांबली तेव्हा आजीने दशम्या सोडल्या. कागदावर एक दशमी चटणी घालून दिली आनंदला. नको म्हणाला. आजी काही बोलणार तेवढ्यात आजोबा म्हणाले, “खा आनंदा, तुझ्या आईने पहाटे उठून केल्या आहेत.” मग त्याने कागद घेतला आजीकडून. दशमी खाता खाता आईच्या आठवणीने मन, डोळे भरून आले. आनंद एकदम आजीकडे पाठ व खिडकीकडे तोंड करून बसला. आजीच्या कपाळावर बारीक आठी उमटली. आजोबा सर्व पाहत होते. पाठीमागूनही आनंदाच्या डोळयात तरळलेलं पाणी त्यांना दिसत होतं.

गाडी परत धाऊ लागली. आनंदाचे डोळे नकळत मिटले. आजीने तसाच झोपू दिला जवळ न घेता. न जाणो परत पापड मोडायचा, शेवटी बोलून चालून जावयाचं पोर! गाडी स्टॅंडवर पोहोचली तेव्हा ऊन मी म्हणत होतं. सामान फार नव्हतंच. एक जूनीशी दिसणारी बॅग आजोबांची, आईने दिलेल्या दोन हाफ पॅंटी, आणि दोन थोरल्या भावंडांपैकी कोणाचे तरी जूने शर्ट त्यातच भरले आजोबांनी. पाटी दप्तर तेवढं घेतलं आनंदने बरोबर. भावांनी दिलेली त्यांची पुस्तकं, आईने मोठ्यांच्या वह्यातून राहीलेल्या पाठकोऱ्या, कोऱ्या कागदांच्या शिवून दिलेल्या वह्या, एक शाई गळणारं पेन. बस, तेवढंच. हळूच त्याने काही कोरे कागद व रंगपेटी मात्र घातली होती त्यातच. तिघे निघाले घराकडे. आजीने पदर घेतला डोईवर. आजोबांनी बॅगच ठेवली डोक्यावर. आनंदाला सांगावे म्हणून पाहीले तर तो आधीच दप्तर डोक्यावर घेऊन पाय ओढत येत होता मागून.

उन्हाने घसा कोरडा पडला होता. अंतरही कमी नव्हतं. चांगलं अर्धा तास चालल्यावर घर आलं. आनंदाला मुळीच आवडलं नाही गाव. रखरखाट सगळा. सगळीकडे धुळीचं साम्राज्य! त्याच्या गावचा हिरवेगारपणा नव्हताच कुठे दिसत. बिनपाण्याची वाढणारी बोरी बाभळीची रानं माजलेली. तीही नुसती काटारून राखट झालेली. नाही म्हणायला पोफळीसारखी उंच वाढलेली झाडं दिसत होती, बुंध्यापासून फुटलेल्या बारीक काड्यां त्यांना लाल केशरी बारीक फळं लगडलेली. नकळत

आनंदाचं लक्ष वेधून घेतलं त्यांनी. मान वर करून चालता चालता पाहू लागला.

“शिंदीची झाडं ही. शिंदोळ्या लागल्यात बघ किती.” आजोबांनी माहिती पुरवली.“ती मडकी का लटकवलीयत वर? “ आनंदाने विचारले. “त्यात शिंदीचा रस गोळा करतात. त्यापासून दारू बनवतात. पण ती शरीराला फार अपायकारक.” आजोबांनी परत माहिती दिली. आजीच्या कपाळावर आठी पडली, लहान ‘मुलाला दारूविषयी का सांगतात?’ पण आजोबांच्या मनात वेगळेच विचार होते. सकाळपासून प्रथमच पोराने तोंडातून शब्द काढला होता. आजोबांना काही झालं तरी संवादाची ही कडी तुटू द्यायची नव्हती. आनंदाला शिंदीच्या फळांचा रंग फार आवडला. तिथेच बसून त्यांचं चित्र काढावं असं वाटलं त्याला. पण तसं करता येणार नाही हे लक्षात येऊन तो हिरमुसला. निघताना आण्णांनी निक्षून सांगितलेलं आजोबांना, “तुम्ही काय करयचे ते प्रयत्न करा, त्यासं रंगकाम करू देऊ नका! ते वेड डुबवेल त्याला आयुष्यात.” आजोबांनी हात जोडून मान हलवली होती. आनंदाचा दात परत ओठांवर घट्ट दाबला गेला.

आजोबांचं घर तसं जुनं, पण तिघांना मोठं होतं. आजोबा सेवानिवृत्त झालेले. काही पेंशन मिळे. दोन घरी शिकवण्या करत. आजीआजोबांची श्रीमंती नसली तरी दोन वेळा खायची भ्रांत नव्हती. आजीही बारीक सारीक उद्योग करत राही. पापड, कुरडया, सांडगे, करून देई. बायकाही मग ‘अनुसुयाबाईंसारखे नाही हो जमत आम्हाला’ म्हणत तिच्याकडूनच घेत.

आता तिसरा खाणारा सदस्य वाढला होता. पण तो या दोघांबरोबर खपून जाणार होता. त्याची एवढी काळजी नव्हती. काळजी होती ती घेतलेल्या जबाबदारीची. लेक उचलून चार पैसे मागती तर अनुसुयाबाईंनी लगेच देऊ केले असते. पण हे नसतं लचांड कशाला घेतलं गळयात असा विचार राहून राहून त्यांच्या मनात येत होता. “जिथे ती एवढी कडक माणसं याला सांभाळू शकत नाहीत तिथे तुम्ही तर पडलात गरीब स्वभावाचे. कसं काय वठणीवर आणाल या नाठाळ पोराला?” त्यांनी रात्री आनंद झोपला असे पाहून आजोबांना विचारलेच. आजोबा म्हणाले, “अहो, आईच्या पोटातून का कोणी नाठाळ जन्माला येतो? परिस्थिती,घडणाऱ्या घटना, यातून मुळचा स्वभाव आकार घेत जातो. या पोराच्या आत धगधगणारं स्फुल्लींग आहे, अनुसुये, त्याला योग्य हवा मिळाली तर असा चमकून उठेल बघ!”

“मला तरी हा निखाराच वाटतो पदरी आलेला, या उतारवयात मान खाली घालायला लावू नये म्हणजे मिळवलं!”

“तुम्ही प्रेमाने चार घास घाला खायला त्याला. बाकीचं मी घेईन पाहून. तुम्हाला काळजी करायची गरज नाही”

“बघा बाई, मनात आलं ते सांगितलं. तुम्ही तरी मला कुठे विचारलत म्हणा, की घेऊया का जबाबदारी? निर्णय परस्पर घेऊन मोकळे झालात.”

“अगं, तिथे पाहत तर होतीस तू सगळंच! पुरता काटेरी बनला असता पोर काही वर्षात. आपल्याच लेकीचं पोर. परका का आहे कोणी?”

“पण वागतोय परक्यासारखाच!”

“अगं, या लहान पोराच्या वागण्याचा का न्यायनिवाडा करणार आहेस आता? त्याला आपण तसे परकेच नाही का? आपल्याला स्वाभाविक माया वाटते. त्याला ती दिसू देत वागण्यातून, मग कसा फुलून येईल पाहा.”

“तुमची ही थेरं, ना मला कधी जमली ना कळली. हातांनी कष्ट करायला सांगा, वाटेल तेवढे करीन.”

“बरं बरं, पुरे हा विषय! झोपा आता. दमणूक झालीय प्रवासाने.”

आनंदला जाग आली तेव्हा चांगलंच उजाडलं होतं. “आई!” त्याने सवयीने हाक मारली. ओ आली नाही. ‘गेली वाटतं विहीरीवर पाणी भरायला.’ तो सवयीनेच उठून बाहेरच्या परसदारी आईला शोधायला निघाला आणि एकदम खोलीत नजर जाऊन आपण वेगळेच कुठेतरी आहोत हे त्याच्या लक्षात आलं. मग हळू हळू सगळं आठवून तो खाली बसला. ‘आता आई इथे नाही’ या विचाराने हादरून गेला. गळयातून अचानक हुंदका फुटला. तो हमसून हमसून रडला. आसपास कोणी नव्हतं. आजोबा सकाळीच बाहेर पडले होते. आजी स्वैपाकघरात होती. दोन वेळा पाहून गेली होती. त्याला शांत झोपलेला पाहून तिला हायसं वाटलं होतं. तिने तिच्या परिने त्याच्यावर बारीक लक्ष ठेवायचं ठरवलं होतं. न जाणो, भलतेच उपद्व्याप करून ठेवायचा.

हळू हळू आनंद शांत झाला. जेव्हा आपल्या आवाक्याच्या बाहेरची परिस्थिती असते तेव्हा तिचा स्विकार हा न घेतलेला, पण घडलेला निर्णय असतो. हा स्विकार करण्याची वृत्ती उपजत असतेच. पण जेव्हा तिच परिस्थिती किंचितशी का होईना आवाक्यात आल्यासारखी वाटते तेव्हा दुप्पट शक्ती लावून माणूस त्यात हवा तसा बदल घडवून आणू पाहतो. तसंच आताही झालं. कितीही मनाविरुद्ध असलं तरी आपल्याला इथेच राहायचंय हे त्या अकरा वर्षांच्या मुलाला कळून चुकलं. त्यादिवशी त्या खोलीतून बाहेर पडणारा आनंद कालच्या मानाने बराच मोठा होऊन बाहेर पडला.

आनंद बाहेरच्या खोलीत आला. तिथे कोणीच नव्हतं. मग तो स्वैपाकघराकडे वळला. तिथे आजी पापड लाटत बसली होती. याला पाहून म्हणाली “दात घासून ये चहा गरम देते करून”.

“आलो घासून.”

“घे पाट, बस.”

“तिने चहाचा बिनकानाचा कप समोर ठेवला. सोबत कालची अर्धी पोळी.”आनंदला बरं वाटलं. आनंदची आईही द्यायची त्याला चहाबरोबर अर्धी पोळी.

आनंद खाली मान घालून खात राहिला. मग त्याने उठून कप ताटली मोरीत नेऊन विसळून आणली.

“कुठे ठेऊ?”

“त्या घमेल्यात घाल पालथी” आणि “जा आंघोळ करून घे.”

आनंद आंघोळ करून आला.

“पुजा करून घे. आजोबांना वेळ झालाय यायला. येते का करता तुला?”

“हो.”

“बाहेर काही चार फुलं मिळतात का बघ.”

आनंद बाहेर आला. जास्वंद, कर्णचाफा करता करता मिळाली सताठ फुलं. मग देवघरात पाय धुवून आला. आजीने छोटी घागरभर पाणी, ताम्हण -पळी, चंदन उगाळून, उदबत्तीच्या घरात उदबत्ती खोचून ठेवली होती. वाटीत थोडं गुळ खोबरं प्रसादाला. सगळी जय्यत तयारी, आईसारखीच. घरी आण्णा करायचे पुजा, पण आई तयारी करून ठेवायची अगदी अशीच. पाहिलं होतं त्याने. आजोबांकडे देव मात्र बरेच होते. अन्नपुर्णा, बाळकृष्ण, गणपती, देवीचा टाक हे चांदीचे होते. जून्या जड मूर्ती. त्याशिवाय गंगेतला पिंगट रंगाचा गोटा बुधलीत पाणी भरून त्यात अर्धा बुडेल असा उभा ठेवलेला, चंदनाने त्यावर आडवी तीन बोटे ओढलेली, देव्हाऱ्याच्या बाजूला एक शिवलींग मोठं ओट्यावर रोवलेलं. अनेक तसबिरी.

देव्हाराही मोठा होता. दोन पितळी जड कमळाच्या आकाराची आसनं, त्यावर छोट्या आसनांवर सुबकतेने मांडलेले देव.

आनंदने आधी सर्व देवांच्या मुर्तींना ताम्हणात ठेवले. मग एक एक मुर्तीवर पळीने पाणी घालून स्वच्छ केले. मग चंदन माखून परत आसनावर ठेवले. मधेच त्याला आठवले, मग तोंडाने त्याने पाठ केलेले श्लोक, स्तोत्र म्हणायला सुरवात केली. सगळ्या मुर्ती ठेवून झाल्या.

बाळकृष्णाला वर ठेवताना अचानक आई आठवली. 'माझा बाळकृष्ण' म्हणते ती मला. त्याची गोष्ट ऐकल्याशिवाय कितीतरी वर्ष झोपत नव्हतो मी. किती खोडकर बाळकृष्ण! पण तो देव, त्याला सगळं माफ. मला मात्र शिक्षा! कितीतरी वेळ मग आनंद आपल्याच नादात बाळकृष्णाची चांदीची मुर्ती हातात घेऊन जणू आईला आठवत बसला. आजी मधेच डोकावली तेव्हा तिला त्याच्या हातात ती मूर्ती दिसली. ती दचकलीच, "अरे, काय, करतो काय आहेस ती चांदीची मूर्ती हातात घेऊन? चल पटकन ठेव ती देव्हाऱ्यात." तिचा स्वर भलताच तिखट होता. आनंद इतका विचारात गढला होता की तो चांगलाच दचकला. हे ही आजीने पाहीले. तिच्या मनाने सरळ गणित केले.

आजी नंतर बोलली काहीच नाही पण पुजा करून आनंद देवघराबाहेर पडेपर्यंत ती तिथेच थांबली. तो बाहेर पडताच तिने देवघर घट्ट बंद केलं. त्याला तो छोटासा गुळखोबऱ्याचा प्रसाद पण नाही दिला. मनातून तो जरा खट्टू झाला. पण काही म्हणाला नाही. आजीच्या मनात मात्र कोलाहल माजला होता. 'आपण समजतोय त्यापेक्षा भलतंच दिसतंय हे प्रकरण? कसं

समजवावं यांना? नाही ते लचांड गळ्यात घेऊन आलेत.लेकीचं असलं तरी जावयाचं ही आहेच की हे पोर! गुण काय एकाचेच उतरतात का अपत्यात?

परवा कोणी म्हणतही होतं, चोऱ्यामाऱ्याही करतो म्हणून!' ती मनाशीच पुटपुटत होती स्वैपाक करता करता. आनंद लांबूनच पाहत होता. तिची बदललेली नजर त्या संवेदनशील मनाने बरोबर टिपली. सकाळची आजी आणि आताची, किती वेगळी? तो अंग चोरून आजोबांची वाट पाहत बाहेरच्या ओट्यावर बसून राहिला.

१.३

आण्णा पूजा करत होते. अनुराधेने बाकी तयारी करून ठेवलीच होती. ती नैवेद्याचं ताट वाढून घेऊन आली. आण्णांच्या शेजारी ठेवून जाऊ लागली. आण्णांनी थांबण्याची खूण केली. ती बसली मग मागे हात जोडून. पूजा करून आण्णा उठले. ती ही उभी राहिली. “अनुराधे, तुझे दु:ख आम्हास दिसते. नवरा हा असा बिनकामाचा, एकुलता एक पोर दूर झालाय. पण मी ही आता थकत चाललो. वसंताच्या पगारावर मदार सगळी. परिस्थिती दिसतेच आहे तुला. आनंदावर माझा राग नाही, पण पोरगं वाया जाऊ नये म्हणून कठोर वागतो प्रसंगी! तू राबराब राबतेस घरासाठी. दिसतं मला. तुला या घरात सुख लाभले नाही हेच खरे!

तुझ्या वडीलांना यश येऊ दे अशी रोज प्रार्थना करतो मी देवाजवळ!”

“आण्णा, तुम्ही मनाला लावून घेऊ नये. बाबा काढतील मार्ग, मला खात्री आहे. मला काही विचारायचे आहे तुम्हाला.”

“बोल अनुराधे, संकोच करू नकोस. नात्याने दीर असलो तरी वयाने तुझ्या वडीलांसारखाच. नि:संकोचपणे बोल.”

“आण्णा, माझी आई तिकडे गावी पापड, कुरडया सांडगे असे उन्हाळी वाळवणाचे पदार्थ करून विकते. लग्नाआधी मीही तिला मदत करत असे. घरच्यासाठी करतेच इथे. पण मोठ्या प्रमाणातही करू शकेन. चार तालेवारांच्या बायकांना विचारून, घेत असतील तर करून पाहू का? ह्यांना

जड काम झेपत नाही, पण कष्टांचा कंटाळा नाही करीत ते. आम्ही दोघे मिळून करावं असं वाटतं, तुम्ही परवानगी दिलीत तर.”

“अनुराधे, विचार चांगला आहे. पण सुरवातीला तरी काही भांडवल हवे. आता वसंताकडे अजून काही मागावे असे वाटत नाही.”

“नाही अण्णा, त्यांना नकोच अधिकची तोशीस! मी माझ्या बांगड्या देते, त्या गहाण ठेवून पैसे घेऊ, सुरवात लहानच करू. हळू हळू जमेल तसे वाढवू!”

“ते तुझे उरलेले शेवटचे स्त्रीधन!”

“अशा अडचणीत कामी यावे म्हणूनच असते ते आण्णा!”

“बरं, तुझ्या मनासारखे कर! देव यशास घालो.”

अनुराधेने मग तिथेच देवाला नमस्कार केला, हातातील उरल्या सुरल्या दोन बांगड्या काढून आण्णांच्या हाती ठेवल्या व त्यांनाही वाकून नमस्कार केला.

आण्णांचे डोळे अचानक भरून आले. एक तपापुर्वी पाटल्या बांगड्या तोड्यांनी भरलेले हात आज फक्त चार काचेच्या बांगड्यांनी नमस्कार करत होते. त्यांना एकदम पराभूत झाल्यासारखे वाटले. आधीच वाकलेले खांदे अधिकच झुकले. ते तसेच बाहेर पडले व सावकाराच्या पेढीकडे चालू लागले.

अनुराधेला आज कित्येक दिवसांनी हुरूप आला. आनंद तिकडे गेल्यापासून ती पार विझून गेली होती.

‘आपल्याला हे आधीच का नाही सुचले? चार पैसे हाती असते तर कदाचित आनंदाला इतकी वाईट वागणूक ना मिळती या घरात! आई आहे स्वभावाने कडक, पण बाबा सांभाळतील माझ्या बाळाला.’

------

आजोबांनी लांबूनच आनंदला पाहिलं.हात करून बोलावलं. आनंद उठून उभा राहिला. मग हळू हळू चालत त्यांच्याकडे गेला. ‘अजून पोर माणसात आला नाही. फार भराभर घडतंय सगळंच. एवढ्याशा त्या मेंदूत काय काय चाललं असेल देवच जाणो. फार हळूवार हाताळावं लागणार आहे सर्वच.’

आजोबा घामेघूम होऊन आले होते. नकळत आनंदाने पिशवी घ्यायला हात पुढे केला. आजोबांनी पिशवी त्याच्या हातात दिली. “जा बाळ, आजीकडे दे, आणि मला गुळ पाणी आण.”

आनंद पिशवी घेऊन आत गेला. आजीसमोर पिशवी ठेवून म्हणाला, “आजोबा आलेत, गुळ पाणी हवय त्यांना.” आजीने वाटीत गुळ आणि लोटीभर थंडगार पाणी दिलं ते घेऊन बाहेर आला.

‘आपण फार नाही ते संशय घेतोय का या पोरावर?’ त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहताना आजीच्या मनात विचार आला.

आनंदने आजोबांना पाणी दिलं. गुळाचा एक खडा तोंडात टाकून आजोबांनी लोटा तोंडाला लावला.

“हं! मग आनंदा, कधी उठलास? चहा नाश्ता केलास का?”

“हो आजोबा.”

“आंघोळ?”

“केली.”

“हं, मला मात्र परत करावी लागणार!”

“का?”

“अरे सकाळी गडबडीत पूजा करायला वेळ नाही ना मिळाला, आता परत आंघोळ, मग पूजा! उशीर झाला तर आजी रागवेल ना!”

“आजोबा, मी पूजा केलीय!”

“काय सांगतोस काय? अरे वा वा! हे छानच आहे! हा छोटा मुलगा अगदी कामाचा आहे म्हणा की!”

आजोबांनी आनंदाच्या केसातून हात फिरवला!

आनंदच्या पाठीतल्या सगळ्या आक्रसलेल्या नसा एकदम मोकळ्या झाल्या. त्याच्या चेहऱ्यावर कित्येक दिवसांनी हसू फुटलं! आनंदाला अगदी अनुसारखी खळी पडते गालावर! आजोबांच्या प्रथमच लक्षात आलं.

मग दोघं अगदी हातात हात घेऊन स्वैपाकघरात आले. आजीचं लक्ष गेलं. पोरगं निरागस हसत होतं. तिला परत एकदा अपराधी भावनेनं घेरलं.

“चला अनुसुयाबाई, मला तरी मदतनीस मिळालाय. तुमचा स्वैपाक झाला असेल तर जेवणं उरकुयात का?”

“हो, या हातपाय धुऊन, मांडते पानं.”

“आजी मी घेतो पाट पानं, आईने शिकवलय मला.”

“अरे वा, हो का? घ्या बरं मग, बघू कशी मांडतोस?”

आनंदने पाटपाणी घेतली, आजीने ताटं वाढली. आजीने साधासाच केलेला बेत पण चव अगदी आईच्या हातची. आनंद मनापासून जेवला.

“वावा, अनुसयाबाई, तुमचं नाव अन्नपूर्णाबाईच ठेवायला हवं होतं असं रोज पानावर बसलं की वाटतं हो आम्हाला!”

“इश्श्य! काहीतरीच तुमचं आपलं! “

आनंदला आजीच्या “इश्श्यचं”खूप हसू आलं.

आजोबा आनंदाच्या हसऱ्या चेहऱ्याकडे पाहत राहीले! ‘या वयात असाच हवा मुलांचा चेहरा हसरा! देवा, माझ्या या नातवाला सतत हसतमुख ठेव! ‘त्यांनी मनातल्या मनात हात जोडले.

“हं!, आनंदराव जेवण झालं ना छान, आता जरा वामकुक्षी घेऊ, आणि मग तुझ्या आईला पत्र लिहू, काय?

“वामकुक्षी घ्यायची? म्हणजे?”

“अरे जेवण झाल्यावर, दुपारचे बरं का, डाव्या कुशीवर थोडावेळ आडवे व्हावे असं शास्त्र सांगते. त्यामुळे अन्न पचनास मदत होते.”

आनंद आजोबांचे बोलणे लक्ष देऊन ऐकू लागला.

“अहो, मी जरा देशमुखांकडे जाऊन येते. यावर्षी काय काय हवंय विचारते. मोठी असते त्यांची मागणी.”

“उन्हाच्या निघालात अगदी!”

“अहो बायका मोकळ्या भेटायची हीच वेळ.”

“बरं, छत्री देऊ काय?”

“इश्श्य!, मडमेसारखी एकटीच रस्त्याने छत्री घेऊन मिरवत जाऊ की काय? काहीतरी आपलं तुमचं! पदर आहे घेतलेला डोक्यावर!”

“बरं, या जाऊन! आम्ही आता आईला पत्र लिहीणार आहोत आनंदाच्या!” आनंदला आजी आजोबांचे संवाद ऐकायला मजा वाटत होती. नकळत तो मनाने मोकळा होऊ लागला होता. एकमेकांशी चिडचिड न करता, टोमणे न मारता, साध्या हसतखेळत संवादातून बोलता येऊ शकतं हेच नवं होतं त्याला.

“हं, हे अंतर्देशीय पत्र. आधी पत्ता लिही. सांग बरं तुमचा पत्ता.

“अं, लवाटे गल्ली, अं, जोशीवाडा, रामनगर, आमराई जवळ,”.

“आनंदा, पत्ता का लिहायचा सांग!”

“पोस्टमनला पत्र आईकडे देता यावं म्हणून!”

“अगदी बरोबर. पण तू तर पत्त्यात आईचं नावच सांगितलं नाहीस.” आनंदचे डोळे मोठे झाले.

“हो की!”

“अनुराधा अनंत इगतपुरे”

“हं!, सौ. अनुराधा अनंत इगतपुरे, सौ. म्हणजे सौभाग्यवती! काय?”

“हो आजोबा!”

“तुला माहिती आहे तू पत्र पोस्टाच्या पेटीत टाकल्यावर काय होतं त्याचं?”

“हो, आम्हाला पोस्टात नेलं होतं चौथीत असताना. पोस्टमन सगळी पत्र गावांच्या नावाप्रमाणे लावतात. मग पोत्यात भरून एस्टीने त्या गावी पाठवतात. मग तिकडचे पोस्टमन ती पत्त्यांप्रमाणे आपापसात वाटून घेतात आणि सगळीकडे नेऊन देतात.”

“अगदी बरोबर.”

“मग आता तू सांगितलंस त्यात गावाचं नाव कुठय?”

“रामनगर”

“हो पण ते जर मधेच आत्ता सांगितल्यासारखं लिहीलंस तर पोस्टमनला त्रास होईल कळायला की बुवा गावाचं नाव कुठय!”

“अं, सौ अनुराधा अनंत इगतपुरे घर क्रं ५, जोशीवाडा, लवाटे गल्ली, आमराईजवळ, रामनगर”

“शाब्बास! आत्ता बरोबर सांगितलास पत्ता आनंद!”

“पुढे पिन कोड, म्हणजे त्या गावासाठी व त्या भागासाठी दिलेला खास नंबर, लिहायचा, मग पत्ता पूर्ण झाला.आता आधी वहीत आणि मग पत्रावर लिहा पत्ता!”

आनंद वहीत लिहू लागला. लिहीताना त्याने वही काहीशी झाकून घेतली. काही वेळाने आजोबांनी वहीसाठी हात पुढे केला व आनंद दचकून खाली वाकला मार चुकवायला वाकल्यासारखा. आजोबा काहीच बोलले नाहीत. त्यांनी वही हातात घेतली. अक्षर फारच खराब होतं आनंदाचं. एक अक्षर मोठं, एक लहान, एक तिरकं. काना मात्रा असून नसल्यासारख्या!

आजोबांनी एक रेघी वहीला दुरेघी केलं व म्हणाले, “आता लिही. सगळ्या अक्षरांचे काने दोन्ही रेघांना स्पर्श करू देत. शब्द लिहून झाल्यावर वर रेघ मारतोस ती सरळ व एका जाडीची येऊ देत. हे दोनच नियम पाळलेस तरी तुझं अक्षर इतकं वाईट नाही दिसणार. मुळात जे लिहीलय ते नीट वाचता येईल.”

प्रथमच आज लेखन करताना मारझोड, आरडा ओरडा झाला नव्हता. किती खराब केलंस हे न सांगता चांगलं कसं करता येईल हे कोणीतरी सांगत होतं.

आनंद मग लक्ष देऊन आजोबांनी सांगितल्याप्रमाणे लिहू लागला. तेवढ्या वेळात आजोबांनी पत्रावर दुरेघी रेषा आखून ठेवल्या. यथावकाश पत्र लिहून झालं. नियम पाळून लिहील्याने वाचता येत होतं. शुद्धलेखनाची वाट लागलेली होती. पण ते नंतर करता येईल. आजोबांनी मनाशी ठरवलं!

लिहीताना आनंदचे डोळे भरून येत होते. आजोबांनी त्याला डोक्यावर थोपटले तसा आनंद आजोबांना बिलगला. त्यांनीही या आईवेगळया, आईवेड्या पोराला पोटाशी घेतला.

आजी देशमुखांकडून आली तेव्हा तिने हे पाहिले. आपला पती जादुगारच आहे असं वाटलं तिला. कालपर्यंत तोंड फिरवणारं, हात झटकणारं पोर आज बिलगलं होतं. ‘की हे त्याचं नवं नाटक?’ तिने तो विचार झटकला.

माणूस जेव्हा स्वत:मधे संपूर्ण असतो, इतरांच्या वागणुकीतून तो स्वत:ला पूर्ण करू पाहत नाही तेव्हा तो इतरांच्या भावभावनांचा योग्य तो स्विकार करून प्रसंगी त्या भावभावनांना सकारात्मक वळणही देऊ शकतो. फार कमी लोकांना हे कसब जमतं. आजोबा हे त्यातलेच एक!

आजीला आनंद च्या तुटक वागण्याने राग आला होता मनात! कारण तिची ‘आजी’ ही भुमिका मग अपुरी ठरत होती. शिवाय जबाबदारीची टांगती तलवार तिला या वयात नको वाटत होती.

तिला देशमुखांकडे झालेला संवाद अचानक आठवला.

“काय अनुसुयाबाई, नवा लहान पाहुणा कोण घेऊन आलात म्हणे घरी?”

“अहो नातू आमचा! द्वाडपणा करतो. अभ्यासात लक्ष नाही, मग यांना आला पुळका, आले लगेच घेऊन.”

त्याच्या मनातली मळमळ एकदम अशी बाहेर पडली.

“हो का?“कितवीत आहे?”

“पाचवीत होता. दोन विषय उडाले. आता बघायचं परत पाचवीतच बसवतात का वेगळी परीक्षा घेऊन सहावीत घालतात ते.”

“घेऊन यायचात त्यालाही.”

“छे हो, मलाच खात्री नाही त्याची. उगाच दुसऱ्याच्या घरी कशाला व्याप.”

“कसली खात्री?”

“अहो काय सांगायचं? आज पूजा करायला म्हणून गेला देवघरात, सगळे देव ठेवले देव्हाऱ्यात आणि चांदीचा बाळकृष्ण ठेवला हातातच! काय होतं मनात देवच जाणे.”

“अगोबाई? काय सांगताय काय अनुसूयाबाई? कठीणच की हो, हे असलं मूल सांभाळणं! जपा हो वस्तूंना! तुम्ही अशा कष्टाने जमवणार!”

आजीच्या डोळ्यांसमोरून ते देव्हाऱ्यातील दृष्य काही हलत नव्हतं. त्याचं ते दचकणं आठवून मन शंकाकूल होत होतं.

पण दारात हे दृश्य पाहून मन परत दोलायमान झालं. देशमुखांकडचं बोलणं आठवून आजी हवालदिल झाली. चुकलंच जरा आपलं आज. परक्याकडे आपल्याच नातवाबद्दल नको होतं असं बोलायला.

पण यांच्याकडे विषयही नसता काढता आला. कोणाशीतरी बोलल्याशिवाय चैन पडलंच नसतं त्यांना!

आनंदाचा पहिला दिवस असा कडूगोड गोष्टींमधे पार पडला. रात्री मात्र काही केल्या झोप येईना. आईची आठवण अनावर झाली. मग ते लहान कोकरू आवाज न करता अश्रूंना वाट मोकळी करून देत गेलं उशी भिजत राहिली.

१.४

अनुराधेने आधीच चार मोठ्या घरांतून पापड कुरडयांचे सुतोवाच करून ठेवले होते. आता आण्णांनीही परवानगी दिली होती. प्रश्न होता अनंताचा! परिस्थिती व अपयशाने काहीसा आधीच घुम्मा झालेला अनंता परवाच्या आनंदाच्या जाण्यापासून अधिकच निराश दिसत होता. अनुराधेला त्याची तगमग दिसत होती. पण याला बाहेर कसे काढावे कळत नव्हते. त्या रात्री तिने सगळी झोपल्यावर हळूच विषय काढला.

“हे बघा, आनंदा आपल्यापासून लांब गेला असला तरी परक्यांकडे नाही. माझे आईवडील मुलाप्रमाणे सांभाळ करतील त्याचा. आता आपण आधी आपला संसार बळकट करू. तुम्ही कष्टाला कधी कमी करत नाही माहित आहे मला. एका दुकानात यश नाही मिळाले म्हणून नेहमीच अपयश येईल असे नाही. आपण दोघं मिळून काही जोडधंदे सुरू करावेत असं मनात आहे. पण तुम्ही मनावर घेतल्याशिवाय जमणार नाही.”

“काय आहे तुझ्या मनात?”

“मी काही मोठ्यांच्या घरी कुरडया, पापड, लोणची अशा उन्हाळी साठवणूकीच्या पदार्थांविषयी बोलून ठेवलंय. अण्णांनाही विचारलय. करा म्हणालेत. तुम्ही माल पोहोचवण्यात मदत करा. शिवाय शहरातल्या हॉटेलात काही नमुने देऊन यावेत असं वाटतं. आवडली तर कायमची मोठी ऑर्डर मिळेल. पलिकडच्या शेतातला गावठी आंबा, पण कैरी करकरीत आहे. शेकड्याने फळ धरतं पण चव आंबट! वाया जातं सगळंच! लोणची

उत्तम होतील पण! यावर्षी लोणचं घालते जमेल तेवढ्या कैऱ्यांचं! पण तुम्ही फळ अलगद उतरवून दिलंत तरच शक्य आहे. घरोघरी ही देऊ नमुन्याला, आवडलं तर घेतीलही. मग हळूहळू, शेवया, खारवलेली कैरी, गोड कैरी असे अनेक पदार्थ आहेत मनात. पण हे कसं होतं ते पाहून जाऊ पुढे."

"मसाल्यांना, बरण्यांना पैसे?"

"आहेत थोडे. जमेल तेवढ्यात."

मग अनंताने परत एकदा अनुराधेकडे पाहिले. "माझ्याशी लग्न करून फसलीस तू!"

"अहो असं का बोलता?"

"कसलीच हौस पूर्ण करू शकलो नाही तुझी!"

"असा आपला दोघांचा व्यवसाय असावा हीच माझी हौस आहे. ती भागवा!"

"भागवली! उद्यापासूनच सुरवात करू!"

मग कितीतरी दिवसांनी अनंता हसला! अनुराधाही! हळूच मग अनंताच्या दंडावर डोकं ठेवून ती लवंडली!

---

दिवस हळू हळू पुढे सरके. आजोबांबरोबरचा वेळ आनंदला नित्यनवे काही शिकवत असे. आई करून देई तशी जुन्या पानांची सुबक वही आजोबांनी आनंदाला करायला शिकवली. शिकवणीला जात त्या मुलांच्या

जुन्या अर्ध्या कोऱ्या वह्या आजोबा घरी घेऊन आले. त्या मुलांची आई त्या तशाच न्या म्हणत असतानाही त्यांनी ती रद्दी म्हणून विकत घेतली होती. चांगल्या दहा वह्या झाल्या. मोठ्या दाबणाने जोर देऊन इजा न होऊ देता कसे शिवायचे, वही नीट उघडता यावी म्हणून काय काळजी घ्यायची, जुनेच पुठ्ठे पण नीट आकारात कापून कसे बाईंडींग करायचे, वगैरे! आनंदाच्या हातात आईकडून आलेला सुबकपणाचा गुण होताच. लगेच जमले त्याला हे करायला.

"अनुसूयाबाई, आमचे ट्रेनिंग झाले हो, आता तुम्ही खळ करायला शिकवलीत की आमचा बालवीर स्वकमाई करायला तयार!"

वह्यांकडे अनुसूयाबाईही पाहतच राहिल्या. वयाचा विचार करता अत्यंत सुबक वह्या बनवल्या होत्या आनंदाने. त्यांनी हसून आनंदाकडे पाहिले तसा आनंदाचा चेहरा हसरा झाला. आत एक धागा हळूच उलगडला गेला.

"आनंदा, तू माझ्या शेजारी बसून बघ. पण एकदम एकट्याने कधी करायला जाऊ नकोस खळ. चुलीत ज्वाळा एकदम वर येतात. भाजेल एखादे वेळी. सवड झाली की तुझ्यासाठी लहानशी शेगडी बनवून लिंपून ठेवेन. मग जमेल तुला."

"आजी तुला शेगडी येते करता? आईपण करते, पण नेहमी मी उठायच्या आतच पूर्ण होते तिची. मला करायची होती पण कधीच दिवसा नाही करायची ती."

“अरे, आईच्या मागे व्याप किती तुझ्या! तिला खेळत बसायला वेळ कुठे मिळणार रे! आपण दुपारी करू. तू कर मला मदत. काय?”

“हो आजी!” कळी खुललीच त्यादिवशी आनंदाची.

“आजोबा, स्वकमाई म्हणजे काय?”

“अं, आज संध्याकाळी आपण तळ्याकाठी जाऊ, पाणी नाहीय फारसं तळ्यात पण बाकी खुप साऱ्या गोष्टी पाहायला मिळतील तुला.”

“स्वकमाई?”

“अरे हो, तेव्हाच सांगेन तुला अर्थ, काय?”

“बरं!”

मग आनंदाला संध्याकाळचे वेध लागले.संध्याकाळी आजोबा आणि आनंद निघाले. आजीने थोडे चुरमुरे दाणे आणि तेलात बुडवलेल्या पापडाच्या लाट्या एका डब्यात दिल्या.

दोघं चालत चालत तळ्याकाठी पोहोचले. तळं बरंच आटलं होतं. फक्त मधोमध पाणी होतं. तळ्याच्या काठाने बरीच झाडं होती. पाण्यावर झुकलेल्या फांद्यांवर सुगरणीची घरटी होती. काही सुगरणी घरटं दुरूस्त करत होत्या. उंच झाडांवर काही इतर पक्षांची घरटी होती. संध्याकाळची वेळ असल्याने पक्षी घरट्यांकडे परतत होते.जवळच जुन्या वृक्षांजवळ काही नवी रोपं उन्हाळ्यातही तग धरून उभी होती.आल्या आल्या आनंद माकडा सारखा या झाडावरून त्या झाडावर चढू उतरू लागला. पक्षांची काही लहान

पिल्लं पाणवठ्याजवळच्या चिखलात किडे शोधण्यात मग्न होती ती दचकून उडाली व खालच्याच फांद्यांवर बसली. त्यांची उडण्याची कुवत तेवढीच होती. थोड्या वेळाने त्यांची भीड चेपली व ती परत पाणवठ्याकडे झेपावली. अचानक आनंदाला काहीतरी आठवलं. तो झाडावरून सरसर उतरून आजोबांकडे आला. “आजोबा, तुम्ही मला स्वकमाई करायला शिकवणार होता ना?”

“हो. ते नंतर. आता आधी डोळे झाका बरं!”

“आजोबा आपण लपाछपी खेळायची? तुम्ही खेळणार माझ्याबरोबर?” अवाक होत आनंदाने विचारलं!

आजोबांना मनापासून हसू आलं. त्याच वेळी या मुलाला त्याच्या वयाच्या सवंगड्यांची किती गरज आहे हे ही जाणवलं!

“नाही रे आनंदा! एक वेगळीच गंमत आहे! झाका बरं डोळे!”

मग आनंद डोळे बंद करून बसला.

आजोबांनी पांढरे कागद, पेन्सिली, रंगपेटी, ब्रश, खडू सगळं समोर मांडलं आणि म्हणाले “हं, आनंदशेट उघडा बरं डोळे!”

आनंदने डोळे उघडले व तो क्षणभर पाहतच बसला. मग त्याने आजोबांकडे पाहिले. अजूनही समोर दिसत असलेल्या गोष्टींवर त्याचा विश्वास बसत नव्हता.

“हे बघ आनंदा, तुझ्या आण्णाकाकांनी मला बजावून सांगितले होते की तुला रंगकाम करू देऊ नये. याचं कारण तुला माहीत आहे?”

आनंद हिरमुसला होऊन खाली मान घालून बसला.

“वर बघ आनंदा! सांग का सांगितलं?”

आनंद गप्पच बसला.

“मी सांगू?”

आनंदाने आजोबांकडे पाहिले.

“कारण त्यांना वाटतं तू सगळा वेळ रंगकामात घालवलास म्हणून नापास झालास. तुला काय वाटतं?”

आनंद गप्पच बसून राहिला.

“हे बघ बाळा, अपयश आलं म्हणजे यश मिळणारच नाही असं नाही. पण ते अपयश का आलं हे कळलं नाही, त्या कारणाचा विचारच केला नाही तर मात्र यश मिळवणं कठीण! ती पक्षांची पिल्लं बघ. आधी काहीच फुट उंच उडतात. धडपडतात. परत उडतात. प्रयत्न करत राहतात, सतत. मग हळू हळू व्यवस्थित उडू शकतात. पण त्यांना उडता येत नाही तरी त्यांचे आईबाबा त्यांना आता घास भरवत नाहीत कारण त्यांच्या पोटातली भूकच त्यांना उडायला भाग पाडते. आयतं मिळालं तर ते उडण्याचा प्रयत्नच करणार नाहीत व त्यांच्या पंखात कधीच ताकद येणार नाही. ही स्वकमाईच त्यांना ताकद मिळवून देते आणि आत्मविश्वासही. पण वर बघ त्या पिलांचे

आईबाप सतत वरून त्यांच्यावर लक्ष ठेवून असतात. काही धोका वाटला तर ते लगेच खाली झेप घेतात. आपणही जमेल तितकं स्वयंसंपूर्ण व्हावं. तीच स्वकमाई! घर हे प्रत्येकाच्या स्वकमाईने चालतं. यात पैसेच मिळवले पाहिजेत असं नाही. कष्ट करून विकत आणायच्या वस्तू कमी खर्चात घरी बनवल्या तरी ती स्वकमाईच. जशा आज तू वह्या बनवल्यास. आता हे साहित्य घे आणि सुंदर रंगीत चित्र काढ या कागदांवर. मग आपण ती वह्यांच्या पुठ्ठ्यांवर चिकटवू! वर्गात सर्वात सुंदर वही तुझीच असेल मग!"

आनंदाचे डोळे चमकले. आजोबा हे सर्व साहित्य आपल्याला या तळ्यात फेकून द्यायला लावणार असा एक भयंकर विचार त्याच्या लहानशा डोक्यात तरळून गेला होता. तो लगेच सरसावून बसला. कितीतरी दिवसांनी त्याच्या हाती त्याची सर्वात प्रिय वस्तू आली होती. रंगपेटी आणि ब्रश!

त्याच्या आनंदाला पारावार उरला नाही. भराभर वह्यांची कव्हर्स तयार होऊ लागली. त्यावर ती फुटभर उडणारी पक्षांची पिल्लं, घरटं शाकारणारी सुगरण, तलावावर झुकलेली फांदी, हुबेहूब चितारली गेली.

मनसोक्त चित्र काढून झाली. मधेच त्याला गावात पहिल्या दिवशी दिसलेली शिंदीची उंचच उंच झाडं व त्यावरची लाल केशरी फळं आठवली, मग ती ही उमटली एका कव्हरवर!

सांज दाटून आली तशी आजोबांनी थोडा खाऊ दिला आनंदाला. त्याने काही दाणे पक्षांनाही दिले खायला.

मग दोघे निघाले. आजोबा म्हणाले, “आनंदा, जेव्हा कोणी आपल्याला काही बोलतं, बरं असो वा वाईट असो, प्रथम शब्दांकडे न पाहता त्यामागच्या हेतूकडे पाहावं. तो नीट ओळखता आला तर आयुष्यात निर्णय घेताना कधीच गल्लत होणार नाही.”

“म्हणजे?”

“म्हणजे त्या दिवशी तुझ्या बाबांनी कधी नव्हे तो तुला फटका मारला. तुला खूप राग आला. आण्णा किंवा वसंतकाकांनी मारला असता तर नसता आला इतका राग. पण बाबांनी मारला म्हणून तू प्रचंड दुखावला गेलास. पण तुला कारण कळलं? अनंतरावांना त्यांच्या मुलाला एवढे सगळे जण घालून पाडून बोलत होते ते सहन झालं नाही. पण वयाने, शरीराने पडले लहान. मोठ्यांना सांगणार कोणत्या तोंडाने की नका बोलू माझ्या मुलाला असं! मग तुझ्यावरच राग निघाला. पण होता प्रेमापोटीच! तू छान गुण मिळवून पास झालास ना तर सर्वात जास्त आनंद तुझ्या बाबांना होणार आहे बरं बाळा! तुझ्या आईपेक्षाही जास्त!”

पुढचा रस्ता दोघांनीही मौनात पार केला. त्या एवढ्याशा मेंदूला आजोबांनी चांगलाच कामाला लावला होता.

ते ही पुढे काही बोलले नाहीत. त्या मौनाची गरज आणि किंमत ते ओळखून होते!

१.५

त्या रात्री आनंद गप्पं गप्पंच होता. आजीने आजोबांकडे पाहीले. त्यांनी ठीक आहे अशी खूण केली.

जेवणं झाली. आनंद आता रोज आजीला पानं घेण्यात, मागचं आवरण्यात न चुकता मदत करत असे. इथे आल्यापासून बाळकृष्णाचा प्रसंग सोडल्यास या मुलावर सगळ्यांनी इतकं चिडावं असं काहीच तो करत नाही असं आजीच्या लक्षात आलं. सुरवातीला असलेला त्याच्यातला तुटकपणा, डोळ्यातून जाणवणारी चीड निवळू लागली आहे असंही तिला जाणवलं. पण मग आज असा गप्पं गप्पं का? रोज जेवताना आजोबा नातवाच्या छान गप्पा चालत अलिकडे. आजोबा बाहेर शतपावली करू लागले तशी आजी म्हणाली, “आनंदा, पाहिलंस का तळं? आणि खाऊ खाल्लास का दिलेला?”

आनंदाने नुसतीच मान हलवली.

“काय केलंत इतका वेळ?”

आनंदने आजीकडे पाहिलं. “वहीवर चिकटवायला चित्र काढली.” पाहता पाहता आजीचा चेहरा बदलला. आनंदच्या ते लगेच लक्षात आलं. पण त्याच्या लक्षात आलेलं आजीच्या लक्षात नाही आलं. “यांचं काय डोकं बिकं फिरलंय की काय? अरे त्या रंगकामानेच ना वाटोळं केलं मागच्या परीक्षेत? परत कशाला ती दळभद्री लक्षणं?” आजी अंमळ जोरातच

ओरडली. आनंद एकदम कावरा बावरा झाला. काहीसा चिडला. मग आजोबांचे शब्द आठवले त्याला. ‘आजी का चिडली? तिलाही आण्णांसारखंच वाटतं का? खरंच असेल का तसं? चित्र काढून आपण नापास झालो का? पण तसं असतं तर आजोबांनी मला चित्र काढायला कशी सांगितली असती? मग का झालो मी नापास?’ तो उठून बाहेर आला. “आजोबा, मी आता परत ५ वी च्या वर्गात बसायचं?”

“ते या एक दोन दिवसात कळेल. एकतर ते तुझी मराठी व गणिताची परत परीक्षा घेतील. त्यात उत्तीर्ण झालास तर सहावीत बसवतील. किंवा कदाचित परत पाचवीतच बसवतील.”

“मला तुम्ही शिकवाल? नाहीतर मी परत नापासच होईन.” आनंदाचा खालचा ओठ थरथरू लागला.

“हे बघ आनंदा, तुला हवी ती मदत करता यावी म्हणूनच इथे आणलय मी तुला. तू सहावीत गेलास काय किंवा पाचवीत, विषय तुला नीट समजायलाच हवा. आणि यासाठी आपण उद्यापासूनच अभ्यासाला सुरवात करणार आहोत, काय?”

आनंदाने मान डोलावली. आजोबांनी मनाची मशागत पूर्ण झाल्याच्या समाधानाने मान हलवली.

———-

“आला रे आला, ढढ्ढोपंत आला, आला रे आला रंगारी आला, आंद्या काय म्हणाल्या रे बाई आज तुला? कोंबडा शाईत पाय बुडवून तुझ्या वहीवर नाचला, हाहाहा! कोंबडा नाचला? कुकूच्चकू! हाहाहाहाहाहाहा!”

“आंद्या, गणितात आज पण भोपळा ना? काकू भोपळ्याचे घारगे कर गं! आंद्याला भरपूर भोपळे मिळालेत आज वहीत. हाहा हाहा हाहा!” सगळी भावंडं माडीवर आनंदाला टपल्या मारत चिडवत होती. आनंदाचा पारा चढत होता. त्याने टपल्या मारणाऱ्या हाताला पिरगाळला! “आई.......गं...... आई.......” रडत रडत वरूण आईला, वासंतीकाकूला हाका मारू लागला. वासंती धावत माडीवर आली.

वरूणचा लाल झालेला हात पाहून प्रचंड चिडली. “कोणी पिरगाळला वरूणचा हात?”

“आंद्याने गं काकू!” पुष्पा ने लगेच माहिती पुरवली.

वासंती काकू तावातावाने आनंदा जवळ आली. “काय रे? शाळेत दिवे लावतोस ते कमी आहेत का? पोरांचे हात मोडायला निघालास?”

“काकू, तो मारत होता मला. आणि चिडवतही होता.” आनंदही फुटणाऱ्या चिरक्या आवाजात ओरडला.

“व्वा! व्वा! मोठ्यांच्या अंगावरही ओरडायला शिकलास! छान! नाव काढणार हा घराण्याचं! चल, तुला आता कायमची अद्दल घडवते.” तिने आनंदाचा कान पकडला व ओढतच ती ओसरीवर घेऊन आली. अनुराधा

आवाज ऐकून धावत बाहेर आली. “जाऊबाई, काय झालं?“ “काय झालं? अगं काय पाप केलंस म्हणून ही असली अवलाद जन्माला आलीय तुझ्या पोटी?”

“जाऊबाई, काहीतरीच काय बोलताय अहो?”

“काहीतरीच? हा तुझा कार्टा घरातल्या पोरांच्या जीवावर उठलाय, आणि मीच बोलतेय काहीतरी! सगळी कष्टाची मिळकत यांच्यावर उधळायची, आणि वर माझ्या पोराने मार ही खायचा? व्वा! काय न्याय आहे या घराचा!”

“पण काकू, वरूण खूप चिडवत आणि मारत होता आंद्याला.” चंदू, दोन नंबरच्या भाऊकाकांचा मुलगा म्हणाला. “चंद्या, तू गप्पं बस. तुझी नकोय मध्यस्थी इथे. करून सवरून नामा निराळा!” वासंती ओरडली.

आण्णा काका बाहेरून तापूनच आले होते. सगळा प्रकार पाहून ते अधिकच तापले. “अनुराधे, आज आनंदाला कोठीच्या खोलीत झोपू देत. आणि आज त्याचं खाणं जेवण बंद!” अनुराधा काही बोलणार तेवढ्यात आण्णा आतल्या खोलीत निघून गेले. वासंतीने हाताला धरून आनंदाला कोठीच्या खोलीत ढकलले व दार बाहेरून बंद केले. हळू हळू रात्र होऊ लागली. त्या अंधाऱ्या जागेत किड्यांचे सरपटण्याचे आवाज येऊ लागले. पाली चुकचूकू लागल्या. आनंदा एका कोपऱ्यात जीव मुठीत घेऊन बसून राहिला. अचानक पायांवरून काहीतरी सरपटत गेल्याची जाणीव होऊन आनंदा दचकून किंचाळला, व बराच वेळ किंचाळत राहिला.

“आनंदा, आनंदा, अरे डोळे उघड, काय झालं? काय झालं बाळा?” आजोबा व आजी आनंदाला हलवून जागे करण्याचा प्रयत्न करत होते. शेवटी तो या पुर्वी प्रत्यक्षात घडून गेलेल्या प्रसंगाच्या दु:स्वप्नातून जागा झाला.

घामाने सगळं अंग भिजलं होतं त्याचं. आजीने पाण्याचा पेला तोंडाला लावला. पाणी पिऊन आनंदा काहीसा जागा झाला. आपल्याला स्वप्न पडलं हे लक्षात येऊन तो हमसून हमसून रडू लागला.आजीने मायेने जवळ घेतले. आजोबा जवळ बसून राहिले. ‘काय काय मनात खोल दडलय या पोराच्या? कसं समजावं आपल्याला?’ हळू हळू शांत होत आनंदा झोपला. आजी जवळच त्याच्या अंगावर हात ठेवून झोपली. काही वेळाने तो ही तिला बिलगून झोपी गेला.

---

अलिकडे अनुराधेला हे असे जुने प्रसंग आठवून डोळे भरून येत. त्या रात्रीही ना ती जेवली होती ना झोपली होती. पण सगळयांच्या विरोधात जाऊन आनंदाला त्या अंधाऱ्या खोलीतून बाहेर काढण्याचं धारिष्ठ्य तिच्यात नव्हतं. आणि ही बाब तिला डाचत होती. चूक आणि शिक्षा यांचं विषम प्रमाण तिला पटत नव्हतं. यातूनच मुलं चुकीचं शिकतात असं तिला नेहमी वाटे.

याचसाठी तिला आर्थिक दृष्ट्या काही प्रमाणात का होईना स्वतंत्र व्हायचं होतं. तिच्या मनात काही आराखडे तयार होत होते. ते तिला अनंता व आण्णांना सांगायचे होते.

आण्णांनी या मुलांना वाढवण्याच्या नादात लग्न केलेच नाही. मोठ्या शेतावर, भाऊ, मोठ्या वहिनी राहत. त्यांचा मुलगा चंदू व पुष्पा शेतातून शाळा फार लांब पडे म्हणून या घरी राहत. ते शेत फार उत्पन्न नाही तरी घरापुरतं धान्य पिकवे!

पलिकडचं शेत असं म्हणत असले तरी घराजवळची जमीन खरेतर अनंताने पाहावी असा आण्णांचा विचार! पण शेतातले कष्ट त्याच्याच्याने होईनात म्हणून मग किरकोळ भाजीपालाच निघे तिथून. तिथे बांधलेलं घरही बंदच होतं. कितीही अडचणी आल्या तरी काळी आई विकायची नाही हा वडिलांचा आदेश आण्णांनी पाळला होता. पण आपण किती दिवस ती जमीन टिकवू शकू याविषयी त्यांच्या मनात शंका होती.

सकाळीच घरी येऊन पडलेल्या उडदाच्या डाळींची पोती, बरण्या, वगैरे वरून वासंतीने भरपूर तोंडसुख घेतले होते.

“हा पसारा आता कुठे ठेवायचा? आणि काय नवं नाटक आहे हे अनंतभावोजींचं? आजतागायत यशाला घातलंय का त्यांनी कधी? आणि

पैसे कुठून आले एवढे? आमच्याच कमाईतून! घरखर्चाला दिलेल्या पैशातून बाजूला काढले असणार, दुसरं काय?"

यावर मात्र आण्णाच बोलले, "अनुराधेने घरगुती व्यवसाय करायचा ठरवलाय वासंती, तिच्या बांगड्या गहाण ठेवून भांडवल उभं केलय. अनंता व ती मिळून करणार आहेत हे सगळं!"

"व्वा, म्हणजे आता पापड लोणचाच्या वासाने डोकी उठणार सगळ्यांची! आणि घरातलं कोण करणार? मला नाही हो जमायचं सगळं करायला एवढ्या खटल्याचं!" यावर कोणीच काही बोलले नाहीत.

पण अनुराधेच्या मनात तेव्हापासूनच विचारांनी फेर धरला होता व तिला सुचलेला मार्ग बरोबर ठरेल असा विश्वास तिला वाटत होता. अनुराधेने रात्री अनंताजवळ विषय काढला.

"आपण पलिकडच्या शेतात जाऊन राहूया का? तिथेच राहीलो तर जरा भरपूर शेतमाल हाती येईल. शिवाय अघळ पघळ भरपूर जागा मिळेल वाळवणांना वगैरे. आण्णा, चंदू, व पुष्पालाही बरोबर नेऊ. शाळा काही लांब नाही तिथून. त्यांचे फी चे पैसे तेवढे वसंत भावोजींना भरू देत. बाकी शेतातल्या धान्यावर आणि भाजीपाल्यावर भागेल आपलं सगळ्यांचं."

"आण्णा?"

"आपण बोलून तर बघू!"

“चालेल. मला तर आवडतच तिथे राहायला. त्या दुकानाच्या पायी इथे येऊन राहीलो झालं!”

“उद्याच विषय काढू मग,”अनुराधा उत्साहाने म्हणाली.

“सगळ्यांनी मला असा नाकर्ता ठरवलाय ते ही खोटं ठरवायचय मला अनु!”

“तुम्ही नाहीच आहात नाकर्ते वगैरे काही. आपली दुकानाची जागा चुकली. या आडभागात वाट वाकडी करून येणार कोण होतं वस्तू विकत घ्यायला. दुकान हमरस्त्याला नाही अगदी, तरी येण्याजाण्याच्या रस्त्यावर तरी हवं ना!”

“हो, मलाही तसंच वाटलं. पण बोलायची हिम्मत नव्हती गं!”

“गरजवंताला मत नसतच अहो! पण आता आपापल्या हिमतीवर करतोय ना, मग करू नीट विचार करून.”

“वसंतदादाचं दुकानात झालेलं नुकसान तू पाटल्या देऊन केलंस वळतं! मी त्यादिवशी पुरता हरलो असं वाटलं मला.”

“त्या आठवणी मागे सोडू. नव्या गोष्टी करताना परत त्याच चुका होऊ नयेत एवढं भान ठेऊ म्हणजे झालं.”

एका वेगळ्याच उमेदीने दोघं विचार करत करत झोपून गेली

अनुराधा पहाटेच उठली. तिने घरकामं भराभर उरकत आणली. दुपारी तिला बरीच कामं उरकायची होती आणि तत्पुर्वी आण्णांशीही बोलायचं

होतं. आज निदान पलिकडच्या शेतावर जाऊन तरी यावंच, असा विचार तिने केला. आण्णांशी बोलायची उत्तम वेळ म्हणजे पूजेनंतरची! तिने मनाशी ठरवले! पूजा आटोपून आण्णा जसे बैठकीत आले तसे नेहमीप्रमाणे दोघे भाऊ नाश्त्यासाठी बसले. सुटी असल्याने तिन्ही मुलंही तिथेच होती.सर्वांना नाश्ता देऊन दोघी जावा तिथेच उभ्या होत्या. अनुराधेला का कोण जाणे पण हा विषय सर्वांसमक्षच व्हावा असे वाटले. अनंता सकाळीच उठून कोठे गेला होता. पण ते एकाअर्थी बरेच झाले असे अनुराधेला वाटले. काही बोलाचाली झालीच तर उगाच मनाला लावून घेतील ‘हे’ असं वाटलं तिला.“आण्णा, वसंत भावोजी, जाऊबाई, काही गोष्टी बोलायच्या होत्या.” सगळेच अनुराधेकडे पाहू लागले. अचानक सर्वांचे लक्ष वेधून घेतल्याने तिला थोडे गांगरल्यासारखे झाले, पण तरी धीर एकवटून ती बोलू लागली.

“आम्ही दोघे मिळून मसाले, पापड, कुरडया, लोणची, वगैरे साठवणुकीच्या गोष्टींचा घरगुती व्यवसाय करायचा ठरवलाय ते माहीतच आहे तुम्हा सर्वांना! यापुर्वी आम्हाला यश नाही मिळालेलं कशातच हे ही जाणून आहोत आम्ही दोघे! आण्णा, वसंत भावोजी, जाऊबाई, तुम्ही नसता तर कठीणच होतं जगणं!

आताही, परत उभारी धरलीय खरी, पण मन साशंक आहेच. तरी निकराने प्रयत्न करणार आहोत. सगळया गोष्टींचा विचार करता आम्ही पलिकडच्या शेतात जाऊन राहावे असे वाटते. वाळवणांसाठी जागाही आहे

तिथे भरपूर, साठवणुकीलाही! शिवाय प्रत्यक्ष राहीलो की भाजीपाला, इतर जोडपिकं, ही देखिल जरा जास्त पिकवता येतील असं वाटतं."

"दोघे राजाराणी मजा करणार म्हणजे आता तिथे जाऊन! उत्तम चाललंय सगळं!" वासंती फणकाऱ्याने बोलली.

"नाही जाऊबाई! माझ्या मनात होतं, आण्णा, चंदू, पुष्पा ही राहतील आमच्याबरोबर! शाळा काही लांब नाही तिथूनही. घरचं धान्य, भाजीपाला यावर भागेल. फक्तं,,..."

"फक्तं काय? लागेल तो पैसा ओता असंच ना?"

"नाही, रोकड पैसा नाही लागायचा बहुतेक करून. पण या दोन मुलांची शाळेची फी तेवढी,..."

"हरकत नाही अनुराधे! चांगला विचार आहे. तू स्वत: शेतावर असलीस तर नक्की उत्पन्नं काढशील, खात्री आहे मला. आणि मुलांची फी भरेन मी. घरातही तेल मीठाला देईन चार पैसे. घर एकच आहे आपलं. तू ही खर्च हात राखून करणारी आहेस, पाहिलंय मी." वसंता जरा मोठ्यानेच बोलला. तेव्हा वासंतीने त्याच्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकला पण ती गप्पं राहिली.

"काकू, मी पण येणार गं तिकडेच राहायला. मी एकटा नाही राहाणार इथे." वरूण रडक्या आवाजात म्हणाला. मुलांची उपस्थिती अचानक सर्वांच्या लक्षात आली. "हो काकू, वरूणला पण येऊ दे ना

आपल्याबरोबर," पुष्पा आणि चंदू म्हणाले. अनुराधेच्या लक्षात आपली चूक आली. नकळत तिने वरूण इथेच राहणार असे सांगितले होते व मुलांच्या ते बरोबर लक्षात आले होते. ती मनोमन खजील झाली. "हो हो, वरूण येईलच की आपल्या बरोबर. मगाशी विसरले वाटतं त्याचं नाव घ्यायला!"

"काही नकोय! माझं पोर राहील माझ्याच बरोबर!" "ए, असं काय गं आई! मी एकटा काय करू इथे राहून? मला कंटाळा येईल!" "येऊ द्या ना जाऊबाई! हे पोहायला शिकवतील सगळ्यां मुलांना विहीरीवर! आणि आंब्याची आढी घालेन, एक जरा गोडीला बरा आहे. खातील मुलं मनसोक्त आंबे! आण्णा, तुम्ही काहीच नाही बोलत! तुमचं मत अंतीम!"

काळी आई जपता येईल, वडिलांची शेवटची इच्छा पूर्ण होईल! आण्णा मगापासून हाच विचार करत होते.

अनुराधेने सरळंच विचारलं तेव्हा आण्णांनी काहीसा भरून आलेला घसा खाकरला. वय वाढायला लागलं की अगदी कठोर माणूसही काहीसा हळवा बनू लागतो. तसंच काहीसं त्यांचं होत असावं.

आण्णांच्या बोलण्याची वाट न पाहताच आपण मत देऊन मोकळे झालो हे लक्षात येऊन वसंता काहीसा खजील झाला.

"हो आण्णा, मी आपला विचार बोलून दाखवला. तुझा निर्णय अंतीम!"

“हरकत नाही हे करून पाहायला! जमिनीकडे जेवढं लक्ष देऊ, तेवढी ती यशाला घालते. जाऊ आपण तिकडे. वरूण, सुटी असेपर्यंत चल तूही. पण याचा अर्थ एकाची दोन घरे झाली असे नव्हे!”

सगळ्यांनीच माना डोलावल्या! बाकी काही असले तरी आता आपण दोघेच राजाराणी या घरात असू हा फायदा चाणाक्ष वासंतीच्या लगेचच लक्षात आला होता. त्यामुळे मग तिचा होता नव्हता विरोधही मावळला.

१. ६

आनंदला सकाळी जाग आली तेव्हा त्याला रात्रीचं स्वप्नं लख्खं आठवलं. मग आपण तिथे नाहीच आहोत या विचाराने हायसं वाटलं. काल आजी आपल्याला जवळ घेऊन झोपली होती आणि आपल्याला आईच्याच कुशीत असल्यासारखे वाटलं ते ही आठवलं आणि खुपसं काहीतरी आतून छान वाटलं त्याला मग.

मग त्याला आज आपण अभ्यास सुरू करूया असं आजोबा म्हणाले होते ते ही आठवलं. याविचारासरशी फारसं छान नाही वाटलं पण खडबडून जागा झाला पूर्ण! मग चहा पोळी खाऊन तो बाहेर आजोबा बसले होते त्यांच्याचवळ जाऊन बसला. आजोबा पेपर वाचत होते. तो त्यांनी आनंदाच्या हातात दिला. सुटीमुळे मुलांचे पान आले होते. आजोबा म्हणाले “ते पान काढ, हं!, आता वाच बरं मोठ्याने गोष्टं!”

“आजोबा, अभ्यास करायचा होता ना?”

“हो, करू की. आधी गोष्ट वाचूया.”

“ऑ?”

आजोबा हसले. “हं, वाच बरं मोठ्याने ती गोष्ट!”

एका मुलाचीच गोष्ट आली होती छापून. तो जंगलात कसा हरवतो, मग त्याला एक एक प्राणी कसा भेटत जातो, आणि त्याच्याशी गप्पा मारता मारताच तो प्राणी कसा एक एक धडा देतो त्या मुलाला वगैरे!

आनंदने न अडखळता गोष्ट छान वाचली. मग आजोबांनी त्याला काही प्रश्न विचारले त्या गोष्टीवर, पण ते ही गप्पांच्या ओघात. की तुला कोणता प्राणी सर्वात जास्त आवडला? का आवडला, त्यांना कोणता आवडला वगैरे!

मग म्हणाले “तुला सगळी गोष्ट न बघता सांगता येईल?”

“हो.....” आनंद उत्साहाने म्हणाला.

सांग बरं!

आनंदने बरीच गोष्ट बरोबर सांगितली. पण काही विशिष्ट शब्द आठवेनात त्याला. आणि तो गोष्टीचा भागही सांगता येईना.

अपरिहार्य

विजीगिषू वृत्ती

अश्राप,

मग आजोबांनी ते शब्द, त्यांचे अर्थ आणि गोष्टीत आलेले संदर्भ सगळं समजावून सांगितलं.

मग म्हणाले हे शब्द तुझ्या वहीत लिही बरं.

मग मात्र आनंदाची तारांबळ उडाली. अपरिहार्यची तर रफाराची जागा बदलून अनेक शब्द लिहीले त्याने.

आजोबाही मुळीच ओरडले नाहीत. चुकीचा शब्द लिहीला की म्हणत “वाच.”

‘अपरिर्हाय,’

‘अपर्रीहाय’

‘अर्परिहाय ‘.

प्रत्येक वेळी वाचताना आनंदाला कळे की चुकलंय. मग त्याचं त्यालाच हसू येऊ लागलं! एव्हाना काही झालं तरी आजोबांचा हात मारासाठी कधीच वर जात नाही एवढी खात्री पटली होती.

मग आजोबा म्हणाले, पेपरमधे बघ परत. आणि एक एक अक्षर वाच. कुठे आला रचा उच्चार?

“अ प री हा र् य”

“बरोबर!”

आता असंच लिही जसं वाचलंस.

आनंदने तसंच लिहीलं,

“हं आता हा ‘र’ लपून बसतो पुढच्या अक्षराच्या डोक्यावरच्या तुऱ्यात!लपव बरं! “

मग बरोबर लिहीलं त्याने!

अपरिहार्य!

“कुठे लपला र?”

“पुढच्या अक्षराच्या डोक्यावरच्या तुऱ्यात!हंहं!”

“बरोब्बर!”

“आता रफारवाले शब्द सांग बरं!

ऊर्जा

सर्जा

अर्पण

चर्वण

सर्प

दर्प

सर्पण

नाही, हा शब्द रफारवाला नाही. तिथे पुर्ण र आहे. सरपण असा. हसत खेळत आनंदा लिहू वाचू लागला. आपण अभ्यास करतोय हे त्याच्या लक्षातही आले नाही. ही तर मज्जाच होती.

मग अशीच हसत खेळत तोंडी गणितं झाली.

जसजसा अभ्यास पुढे जात होता, आजोबांची उमेद वाढत होती. मुलाचा बुद्ध्यांक उत्तम होता. बस मेंदुला आणि हाताला योग्य वळण लावण्याची खोटी, पोर उत्तम गुण आणेल परीक्षेत. हाडाच्या शिक्षकाने निदान केले.

आजोबा मग काही कामासाठी बाहेर पडले. आनंदा न सांगता आंघोळ करून आला. “आजी, मी पूजा करू? “ त्याने उत्साहाने विचारले.

आजीच्या मनात परत शंकेची पाल चुकचुकली.

“नको, हेच करतील आल्यावर. तू मला वाळवणं राखायला मदत कर. पक्षांना हाकल. कुत्र्या मांजरांनाही दूर ठेव. नाहीतर सगळं तुडवतील आणि तोंड घालून नासवतील.”

“हो करतो मी राखण! पण अजून व्हायचेत ना तुझे पापड लाटून? मग तेवढ्यात पूजाही होईल.”

“बरं कर मग”

नाईलाजाने आजी म्हणाली. पण आज मी तयारी नाही केलेली.

मी घेतो करून.

बरं कर!

मग आनंदा कळशी घेऊन विहीरीवर गेला. पूजेसाठी ताजे पाणी घेऊन आला. फुले आणली, चंदन उगाळले, उदबत्ती खोचली. आजीने नैवेद्य दिला. “आज आधी सगळा देव्हारा स्वच्छ करून घे. मग पूजा करून देव ठेव.”

“हो आजी!”

आनंदाने मग सगळा देव्हारा रिकामा केला. आधी देव दोन्ही ताम्हणात काढून घेतले. मग ती मोठी धातूची आसनंही खाली काढली. कपड्याने देव्हारा पुसू लागला तर हाताला काही लागले. पाहतो तर चांदीचा रुपया व

काही नोटा. त्याने नीट निरखून पाहिले. “आजी, ए आजी”, दाराबाहेरच लपून पाहत असलेली आजी एकदम दचकली. आनंदा स्वैपाकघरात आजीला ऐकू जावी एवढ्या मोठ्याने हाक मारत होता. मग आजी पुढे आली. “काय रे आनंदा?”

“अगं हे बघ, आसनाखाली ह्या पैशांच्या नोटा आणि हे बघ काय आहे? ह्यांची पण पूजा करायची?”

“नाही. ठेव बाजूला काढून. लक्ष्मीपुजनादिवशी ठेवलेल्या तशाच राहिल्या असतील.”

“कुठे ठेवू?”

“आज देव्हाऱ्यातच ठेव बाळा. थोडं हळद कुंकू वाहा. उद्या तुझे आजोबा ठेवतील काढून.”

आजीचा आवाज नकळत कातर झाला. आपण परीक्षा घेतली आज या निष्पाप पोराची! तिला एकीकडे वाईटही वाटत होतं आणि एकीकडे हायसंही वाटत होतं.

आनंद कळशी घेऊन विहीरीवर गेल्यावर तिनेच त्या नोटा व रुपया आसनाखाली हलकेच ठेवल्या होत्या.

ती स्वैपाकघरात निश्चिंत मनाने परतली.

१.७

“या सर”

मुख्याध्यापकांनी आजोबांचे आदराने स्वागत केले.

“आपण आज परीक्षा घेऊ तुमच्या नातवाची. खरंतर रीतसर लेखी, तोंडी परीक्षा होऊनच मग कोणत्या वर्गात बसवायचे हा निर्णय होऊ शकतो. पण तुम्ही आमचे आदर्श आहात. तुमचा शब्द चुकीचा ठरणार नाहीच. आज आपण त्याची विषयज्ञानाची तोंडी परीक्षा घेऊ. गणिते मात्र सोडवावीच लागतील. यात उत्तीर्ण झाला तर सहावीत बसवू अन्यथा पाचवीत. सहावीत बसवला तरी पहिल्या घटक चाचणी नंतरच निर्णय कायम होईल.”

“धन्यवाद! माझा शब्द खाली पडू दिला नाहीत. मी तुमच्या निर्णयाचा संपूर्ण आदर करेन. तुम्ही परीक्षेनंतर ठरवाल तसेच होईल. पुन्हा एकदा धन्यवाद!”

मग काही शिक्षक व आनंदा एका वर्गात गेले. शिक्षकांनी आनंदाला सर्व विषयांवर अनेक प्रश्न विचारले. स्मरणशक्तीच्या जोरावर त्याने बऱ्यापैकी उत्तरे दिली. कविता त्याला पाठच होत्या. वाचन ही अचूक केले.

मग गणिताच्या शिक्षकांनी १० गणिते सोडवायला दिली. त्यातली चार गणिते त्याने बरोबर सोडवली. काही गणितांच्या बऱ्याच पायऱ्या त्याने बरोबर लिहील्या व मधेच लेखनातल्या चुकीमुळे शेवटच्या पायरीला गणित

चुकले होते. दोन गणिते त्याला अजिबात आली नाहीत. एकंदर सर्वच विषयात तो काठावर का होईना उत्तीर्ण होत होता तोंडी परिक्षेत. मग जरी फक्त तोंडी परीक्षाच घ्यायची ठरली असली तरी मराठीच्या शिक्षकांनी त्याला एका कवितेबद्दल काय वाटतं ते त्याच्या शब्दात लिहायला सांगितले.

ती एक निसर्ग कविता होती. पाऊस, गडगडणारे ढग, त्यात भिजलेला हिरवागार डोंगर, वरून पडणारे धबधबे, असं सगळं पावसाळ्यातील वर्णन होतं.

आनंदाने आधी एकरेघी कागदाला दुरेघी केले.मग तो लिहू लागला.

‘मला त्या डेंगरवर जाव वाटत. त्या धबधब्याखाल चींब भीजू वाटत. भाजलेल कणीस खाव, व चाहा प्याव.

तो डेंगर रंगवायचाय. माझ्या रंगपेटीत पोपटी रंग संपला. पोपटासारख हिरव करायला मला काळया हिरव्यात पिवळ रंग मिसळ लागेल. पावसाळ्यात गडगडत तेवा भिती वाटली. आईकडे जाउन बसाव वाटत.’

मराठीच्या शिक्षकांनी ते वाचलं. नकळत त्यांनी आनंदाकडे पाहीलं. ते हलकेच हसले. त्यांनी खाली लिहीलं, ‘मडकं वेडंवाकडं कच्चं असलं तरी माती अस्सल आहे! पुढील वर्गात बसवावे!’

आजोबांनी घरी आल्याबरोबर आजीला सांगितले, “पहिली लढाई जिंकली हो तुमच्या नातवाने. सहावीत बसवायला तयार झाले.”

"चला, आठवडाभराची तुम्हा दोघांची मेहनत कामी आली म्हणायची! आनंदा, जा, मी खोबऱ्याची वडी करून ठेवलीय तिचा देवासमोर नैवेद्य दाखव, मग आजोबांना दे व तू ही खा." आनंदा उड्या मारत आत गेला. पोराचं बाल्य असं परतताना पाहून आजीआजोबांना आनंद झाला.त्याच दुपारी आनंदाने आईला पोस्टकार्ड लिहून टाकले.

आता मात्र आनंदाच्या लेखनावर बरंच काम करावं लागणार होतं. आजोबा म्हणाले, "मी उद्यापासून दिवाणांच्या मुलांची शिकवणी सुरू करतोय. त्यांचा प्रदीप सहावीतच आहे. त्याच्याबरोबरच आनंदालाही शिकवेन. मग लेखनावर काम करायला घरी वेळ मिळेल."

"तुमच्या कष्टांना यश मिळो व पोर मार्गी लागो! अनुराधेला हे एवढे तरी सुख मिळो!"

त्यादिवशी आनंदाला चित्र काढायची हुक्की आली. त्याने त्या कवितेचेच चित्र काढले. काळ्या हिरव्यात पिवळा मिसळून!अजून एका वहीच्या कव्हरवर ते जाऊन बसले.

---

अनुराधा, अनंता, आण्णा, चंदू पुष्पा व वरूण शेतावर राहायला गेले. चंदूची आईही तिथेच राहायला आली.

"अनु, तुला फार कामं आहेत, मी स्वैपाकघर सांभाळेन काही दिवस. पावसाळ्यापर्यंत सध्या शेतावर काही काम नाही. तेवढीच तुला मदत."

या जावेचा अनूवर जीव होताच पहिल्यापासून. अनंतावरही, वासंतीशी फारसं जमत नसल्याने त्या फारशा त्या घरी येत नसत. पण आता इथे सगळे आल्यावर त्या आवर्जून अनुच्या मदतीला आल्या होत्या.

“वहिनी, कामाचं काही नाही हो, मी आवरेन पटापट. तुम्ही लक्ष मात्र ठेवा. मला फार आधार वाटला तुम्ही आलात ते.”

“वहिनी, तुझ्या हातची नाचणीची भाकरी करच एकदा पण. फार दिवस झाले खाऊन.” अनंताने मात्र वहिनीकडे लगेच फर्माईश केली.

“हो, करेन हो भाऊजी, माझं पहिलं लेकरू तुम्हीच. तुम्हाला मात्र वहिनीची आठवण येत नाही कधी. आज मी आले म्हणून. तुम्ही कधी येत नाही शेताकडे!”

‘खरंच आपण स्वत:च्याच अपयशात इतके, गुंगून गेलो की मदतीला सोडा, साधी विचारपूस करायलाही गेलो नाही भाऊवहिनीची.’त्याला एकदम अपराधी वाटलं.

“हो, चुकलंच माझं. मी माझ्याच दु:खांना कुरवाळत बसलो.”तो उघडपणे म्हणाला.

“हं, आता असं तोंड बारीक करू नका. चला, बघू, इथं कोणता भाजीपाला अजून पिकवता येईल?”

“चला जाऊया वहिनी, आम्ही येतो गं जाऊन!”

एकदंर घर मोकळं ढाकळं होत असलेलं बाहेर बसलेल्या आण्णांना जाणवलं. त्याचे झुकलेले खांदे काहीसे वर आले.

पोरांचा दंगाही त्यांना आज बरा वाटला. ‘आनंदा काय करत असेल तिकडे?’ मनात विचार येऊन ते काहीसे अस्वस्थ झाले.

तेवढ्यात, “आण्णा, हे घ्या, नातवाने पत्र धाडलंय.” असं म्हणत पोस्टमन पडवीजवळ आला. अनुराधा धावत बाहेर आली. पोस्टमनची सायकल तिला अलिकडे लांबूनच ऐकू यायची. ती, पत्र घ्यायला पुढे होणार तेवढ्यात तिला आण्णा दिसले. ती दाराआडच थांबली. आण्णांनी चष्मा पुसून डोळ्यांवर चढवला.

“ति. आईस,

आनंदाचा सांनं.

आज मी परिक्षा पास झालो. मला आता सहावी मिळणार.

मी अभास करतो. तुझी आठवण येते.

आण्णाना, बाबाना सांग मी पाचवी झालो.

आजोबा म्हणले आण्णांना वाटत मी चीत्र काढली म्हणून नापास झालो. मग ते रागवले. बाबांना त्यांच्या मुलाला बोलले सगळे म्हणून वाईट वाटले, मग त्यांनी फटका दिला.

आजोबा म्हणतात कारण बघ. मी बघतो आता.

आजीने खोबऱ्याच्या वडी केली मला सहावी मिळाली म्हणून. तू करते तशीच अगदी.

तुझा आ. आनंद”

आण्णांनी चष्मा काढून डोळे पुसले! काही वेळाने त्यांनी हाक मारली. ”अनुराधे..... लेक शहाणा होतोय गं तुझा.” ती दाराआडच होती. पट्‌कन पुढे झाली. “सहावीत बसवताहेत म्हणे. परत परीक्षा घेतली त्यात पास झाला म्हणतो.” पत्र अनुराधेकडे देत ते म्हणाले. पत्र वाचून तिचे डोळे पाझरू लागले.

“तुझ्या वडिलांचा अजून एक उपकार घेतला आज मी! तुझ्यासारखी गुणी पोर आमच्या घरी देऊन एक उपकार केलाच होता. आज त्यांच्या नातवाबरोबर या त्याच्या मूढ काकालाही थोडी शिकवण दिली त्यांनी. मला मनं समजून घेणं कधीच जमलं नाही. पण माझं मन बरोबर ओळखलं त्यांनी. आणि नातवालाही शिकवत आहेत बघं माणसं, मनं, वाचायला. मी साशंक होतो आनंदला तिकडे पाठवण्याबाबत. पण आता शंका फिटली. अनंताला हे पत्र जरूर दे वाचायला.”

---

दिवाणांचं घर बरंच मोठं होतं. मुलांची वेगळी खोली होती. तिला लागूनच्या गॅलरीत शिकवणी चाले गोल टेबलवर.

दिवाणांना दोन मुलं. मोठा प्रदीप सहावीत आणि धाकटी प्रज्ञा चौथीत. मुलं हुशार होती. आजोबांच्या शिकवणीमुळे उत्तम गुणांनी पास होत होती. दिवाण पतीपत्नीही खुश होते आजोबांच्या शिकवणीवर. दिवाणबाई चहापाणी केल्याशिवाय जाऊ देत नसत. शिक्षकांबद्दल आदर असणारं घर होतं.

आजोबांनी आनंदाला बरोबर आणण्याविषयी आधीच परवानगी विचारून घेतली होती. दिवाणांनीही ती आनंदाने दिली होती.

आज जेव्हा दोघे पोहोचले तेव्हा दिवाण घरीच होते. त्यांनी आनंदाला नाव गांव विचारले ते त्याने व्यवस्थित सांगितले. कितवीत आहेस यावर तो क्षणभर गोंधळला. मग म्हणाला “रामनगरमधे पाचवीत दोन विषयात नापास झालो. इथे काल परत परीक्षा घेतली आणि घटक चाचणीपर्यंत सहावीत बस असं सांगितलं. घटक चाचणीत पास झालो तर सहावीत, नाहीतर परत पाचवीत.”

दिवाण पतीपत्नींनी एकमेकांकडे पाहिलं. मग दीवाण म्हणाले “अभ्यास केलास की होशील पास.”

आजोबांचा जीव भांड्यात पडला.

“हो, आता करणारच आहे मी अभ्यास.”

“अरे वा, छानच की मग!”

मग शिकवणी सुरू झाली. प्रदीप, प्रज्ञाचे छान कपडे, नवी नवी पुस्तकं वह्या, नवं दप्तर, आनंदा मोठमोठ्या डोळ्यांनी सगळं न्याहाळत होता. प्रज्ञा, प्रदीपही, याच्या जून्या कपड्यांकडे, जुन्या पुस्तकांकडे नवलाने पाहत होते. त्यांच्या वर्गातही गरीब मुले असंत, पण यांचा फारसा संबंध येत नसे त्यांच्याशी!

चला, मुलांनो, मराठीचं वहीपुस्तक काढा! प्रज्ञा तू १ते १५ पाढे लिही.

मग प्रदीप व प्रज्ञाचं लक्ष आनंदच्या वहीकडे गेलं. "आई गं! कसलं मस्त चित्र आहे!" प्रज्ञा चित्कारलीच!

"कुठे मिळाली ही वही तुला? कोणत्या दुकानात?" प्रदीपने आश्चर्याने विचारले.

"दुकानात नाही काही. घरीच केलीय तयार. जुन्या कागदांची."

"आणि चित्र?"

"ते रंगवून चिकटवलय वरून पुठ्ठ्याला!"

"आईशप्पत! कोणी तू?"

"हो!"

"काय सॉलिड भारी आहे रे चित्रकला तुझी!"

"ए मला देशील काढून? माझ्या वहीवर लावायला? प्रज्ञाने उताविळपणे विचारलं!

"हो! दीन की! त्यात काय?"

“हं! चला तिसरा धडा काढा मुलांनो!”

“प्रदीप तू वाच! आनंदा, लक्ष देऊन ऐक! प्रज्ञा, चल पाढे लिही.”

अभ्यासाला सुरवात झाली. दिवाणबाई खोलीतून पाहत, ऐकत होत्या. प्रदीपला धडा वाचायला सांगितल्यावर त्या निघून गेल्या त्यांच्या कामाला. नंतर चकित होण्याची वेळ आनंदावर आली. प्रदीपचं मोत्यासारखं टपोरं सुंदर हस्ताक्षर पाहून तो अवाक झाला. शिकवणी हसत खेळत दोन तास चालली. आजोबांनी सांगितलेले अवघड शब्दार्थ लिहीताना आनंदच्या असंख्य चुका पाहून प्रदीप सहजतेने म्हणाला, “आनंद तू पुस्तकात पाहून लिही आणि मग न बघता लिही. वाचताना एक एक अक्षर नीट वाचलं की कसं लिहायचं ते लक्षात राहतं.” आनंदला नकळत एक नवा धडा मिळाला. शिकवणी संपतेवेळी दीवाणबाईंनी चहा बिस्कीटं पाठवली सगळ्यांसाठीच, आणि चिवडा. पाठोपाठ त्याही आल्या.

“रोज रोज नका चहापाणी करत जाऊ तुम्ही. आम्ही नाश्ता करूनच आलो.” आजोबा संकोचाने म्हणाले.

“अहो आज आनंद प्रथमच येतोय ना आमच्याकडे!”

“आई, आनंदच्या वह्या बघ. त्याने घरी तयार केल्यात. आणि मस्त चित्र रंगवून चिकटवलीत. मलापण देणाराय तो चित्र काढून! हो ना रे आनंद?” प्रज्ञा उत्साहाने सांगू लागली.

आनंदने मान हलवली.

“हो का? पाहू बरं आनंद! मला दाखव तरी. दिवाणबाईही पाहत राहिल्या! “सर, नातवाचा हात अस्सल कलाकाराचा आहे.”

मग त्यांनी वही उलट सुलट करून पाहिली. आतून उघडून पाहिली. “ही तू केलीस घरी?”

“हो! आजोबांनी शिकवली शिवायला.”

“तुमच्याकडून जुन्या वह्या नेल्या, त्यातलेच कोरे कागद काढून केल्या.” आजोबा म्हणाले.

“अरे वा! किती सुबक केल्यात आणि. फारच छान!”

आनंदाला अंगावर मूठभर मांस चढल्यासारखं वाटलं. दिवसागणिक आनंद नवं काही शिकत होता. अभ्यासातलंही आणि आयुष्याविषयीही.

त्यादिवशी परत येताना आनंदच्या पावलांत एक उत्साह होता. दुडक्या उड्या मारत तो आजोबांबरोबर चालत होता. तोंडाने चिवचिव चालू होती. कित्येक दिवसांनी आनंदला समवयस्क मुलांबरोबर वेळ मिळाला होता. कोणीतरी ‘तू चांगला आहेस, तुझ्यात गुण आहेत’ हे त्याला आवर्जून सांगितलं होतं. आपण चांगले आहोत. आपण दुसऱ्या कोणाला आवडत आहोत ही भावना माणसाला आतून फुलवत नेते.

आजोबांना पोराचा आनंदी चेहरा दिसत होता. त्यामागचं कारणही कळत होतं. पण पूर्ण खात्री झाल्याशिवाय ते एकट्याला इतर मुलांबरोबर सोडायला धजावत नव्हते.

प्रदीप व प्रज्ञा तशी समंजस मुलं होती. शांत स्वभावाची. शिवाय आपण बरोबर असताना काही प्रश्न नव्हता.

पण आनंदाला येणारा राग आजोबांनी पाहिला होता. त्याचं डोळ्यातून बेभान होणं अनुभवलं होतं. पडदे कापून टाकण्याची कृती काही झालं तरी विसरून चालणार नव्हती. दुर्लक्ष नव्हतंच चालणार कोणत्याच बाबतीत. त्यामुळे सध्या आपल्या नजरेसमोरच हे मन फुलवत नेणं गरजेचं आहे, आजोबांनी निष्कर्ष काढला.

शाळा सुरू झाली की इतर मुलांत मिसळणारच होता आनंदा, अपरिहार्य होतं ते. ‘प्रदीप बरोबर राहीला तर टवाळ मुलांपासून दूर राहील.’ आजोबांचे विचार थांबत नव्हते.दोघं घरी आले. आनंदा उत्साहाने आजीला सगळं सांगू लागला. ती ही कौतुकाने ऐकत होती. “आजी, अगं त्यांचं घर इतकं मस्त आहे. आणि त्या काकूपण. मला चिवडा आणि बिस्कीटं दिली खायला. आणि प्रदीपचं अक्षर इतकं मस्त, छापल्यासारखंच दिसतं अगं! आजोबा, कसं काढतो तो इतकं छान अक्षर?”

“हं!, सुंदर आहे की नाही प्रदीपचं हस्ताक्षर? मोत्याचे दाणेच! तू प्रयत्न केलास तर तुझंही सुधारेल आनंदा हस्ताक्षर! प्रत्येकाच्या हस्ताक्षराला आपलं म्हणून एक वळण असतं. ते शक्यतो बदलंत नाही. त्यातून त्या माणसाचं व्यक्तीमत्व दिसतं असं म्हणतात.पण मूळ वळणाला सुबक, सुवाच्च्य नक्की बनवता येतं! प्रयत्नपूर्वक ते करता येतं.”

“मला शिकवाल का?”

“हो नक्कीच. आपण एक कित्ताच बनवू तुझ्यासाठी.”

“कित्ता?”

“हं! दाखवतो दुपारी तुला.”

“हो, आजोबा.”

“चला मी आंघोळ करून पूजा करतो बरं का हो!”

“आजोबा मी करतो. तुम्ही पेपर वाचा!”

आजोबांनी प्रेमाने हात फिरवला मग त्याच्या डोक्यावरून! या उतारवयात थोडी विश्रांती हवीशी वाटतच होती.

“आनंदा हे सरबत पी जरा, उन्हातून आलात दोघे! मग जा आंघोळीला.” आजीने पेला दिला त्याला. “घटा घट पिऊ नकोस, बसून पी.”

मग आनंदा सरबत पिऊन आंघोळीला गेला. “अहो, उद्या दिवाणांकडे जाताना थोड्या पापड कुरडया देते, त्या न्या! त्या एवढं चहापाणी करतात रोज, तसंच घेऊ नये. ती मोठी माणसं, आपल्या घरी काही येणं व्हायचं नाही. मग असंच काही थोडं का होईना देत जाईन अधून मधून.”

आजोबा तिथेच लवंडले होते, त्यांनी मान हलवली! आजी पाहत राहिली. ‘हा देह ही आता थकत चालला. किती दिवस होईल यांच्या हातून सगळं? पेंन्शन आणि माझं काम मिळून भागतं दोघांचं. नाही असं नाही. पण या पोराला नीट मार्गी लावेपर्यंत शक्ती राहू दे रे रामराया!’ दुपारची जेवणं

झाली. आनंदा अगदी मन लावून जेवला.आजीच्या हातचं जेवण जेवताना त्याला हमखास आई आठवायची. अगदी तीच चव!

जरा परत आडवे झाले आजोबा, आजी. आनंदा माडीवर जाऊन प्रज्ञासाठी चित्र रंगवू लागला.

१.८

अनंताने ते पत्र अनेकदा वाचले. दर वेळेस घशात आवंढा अडकला. पुरूष म्हणून रडला नाही. पण आनंदाने लिहीलेले शब्द वाचून तो बराच वेळ विचार करत राहिला. बाकी कोणासाठी नाही तर या पोरासाठी मला यशस्वी व्हावंच लागेल यावेळेस. तो मनोमन म्हणाला. अनूला सर्वतोपरी साहाय्य करण्याचा व व्यवहाराने वागण्याचा त्याने पक्का निश्चय केला. कुठूनतरी आतून एक मोकळा श्वास छातीभर फुलला. जवळजवळ १७ वर्षांनी त्याने माळयावर टाकलेली बासरी शोधून काढली. दुपारची वेळ होती. तो आवाज न करता शेताकडे गेला. अगदी नकळत आंब्याच्या खालच्या सावलीत मुळांवर पूर्वीसारखाच जाऊन बसला. एका मांडीवर दुसरा पाय सवयीने आडवा टाकत बासरी ओठांना लावली व जशी मधली वर्ष नव्हतीच अशा प्रकारे भावनेत चिंब भिजलेल्या स्वरांनी आसमंत भरून गेला. अनुराधा ओट्यावर वाळवणं पसरत होती. तिला हे स्वर लांबून ऐकू येऊ लागले. तिने तसाच पदर लपेटून घेतला, व आवाजाच्या दिशेने तिची पावले भराभर पडू लागली.

जसजशी जवळ जात गेली तसतशी त्या स्वरांच्या आर्ततेने तिला खेचून घ्यायला सुरवात केली.

पाठमोरा कोणी ताठ पाठीने आंब्याखाली मुळांवर बसलेला दिसला. कोण बरं असावा? विचार करण्याची संधी त्या स्वरांनी दिलीच नाही. ती सरळ त्याच्या मागे पोहोचली. पाठमोऱ्या अनंताला ओळखून आश्चर्य,

वेदना, अशा अवाक करणाऱ्या भावनांनी थिजून त्या स्वरधारांमधे भिजत ती तिथेच थबकून राहिली. शेवटी ते स्वर तिची छळवणूक करत थांबले. अनंताने अवघडलेले हात सरळ केले. सगळं आकाश मोकळं मोकळं झाल्यासारखा छातीभरून श्वास घेतला, व तो उठून घराकडे जाण्यासाठी वळला तेव्हा अचंबित, स्तब्ध ओल्या नजरेने त्याच्याचकडे पाहत असलेली अनू त्याला दिसली. एकंदर फार अवघडले दोघेही. अनंताचा चेहरा फार अपराधी झाला. त्याच्या हातून बासरी गळून पडली. खांदे झुकले एकदम.

अनू भांबावली. तिला अनंताच्या चेहऱ्यातला बदल जाणवला पण समजला नाही.

अनंताने हात जोडले. ती अधिकच गडबडली. "अहो?"

"माफ कर मला अनुराधे! या बासरीने माझा कायम घात केला. मी बरीच कामं हिच्यापायी अर्धवट सोडली. अपयशी झालो. शिक्षण अर्धवट राहिलं. नोकरी हातची गेली. शेवटी संतापून आण्णांनी माझ्याच बासरीने मला बडवले ऐन विशीत. एक बासरी तुटली. दुसरी माळ्यावर भिरकावली त्यांनी. तेव्हापासून हातात नव्हती धरली. पण आज आनंदाचे पत्र वाचले, आणि खेचला गेलो हिच्याकडे."

अनंताने मान खाली घातली. पडलेल्या आवाजात म्हणाला, "टाक ती परत माळ्यावर. तुझ्या कामात कोणतीच दिरंगाई नाही करायचीय मला. यावेळेस तुझ्यासाठी आणि आनंदासाठी यशस्वी व्हायचय. परत हात नाही लावायचा मी हिला. वचन देतो. एक आजची वेळ माफ कर."

"अहो...., "अनुराधेला हुंदका फुटला. अचानक ती स्फुंदून रडू लागली. चट्कन तशीच रडत तिने खाली पडलेली बासरी उचलली. अनंताने तिला चट्कन पुढे होत जवळ घेतली. "रडू नकोस अनू, नाही व्यत्यय येणार तुझ्या कामात. वचन दिलंय तुला. नाही हा नाद तुझ्या कामाची नासाडी करणार. तुला काळजी वाटणं, जीव घाबरा होणं, स्वाभाविक आहे. नेहमी पदरी निखारेच घातले मी तुझ्या. पण यावेळेस तुझ्या शेवटच्या स्त्रीधनाचा मान राखेन मी. नाही वाटोळं करणार. विश्वास ठेव माझ्यावर. फक्त एकदाच, शेवटचा."

"अहो, ऐका माझं." तिने पदराने नाक डोळे पुसले. "ही अशी जीवंत कला तुमच्या श्वासात भरलेली असताना तिला गुदमरवून मारत राहिलात, कसं यश मिळणार? ती कलाकाराची बोटं अशी मोडत राहिलात, सुखांनी आपल्याकडे पाठ फिरवली तर काय चुकलं त्यांचं?"

"अनू, अगं!"

"नाही, बोलू दे मला. हिला माळावर फेकलीत, ती सरस्वती रागवणारच ना! हे बघा, आपण आपला व्यवसाय करणारच आहोत, तुम्हीच तो वाढवणार आहात. भरपूर कष्टही करणार आहोत आपण दोघे मिळून. पण या बासरीचा मान तिला मिळालाच पाहिजे. आपल्या व्यवसायाला नाव काय द्यायचं हा प्रश्न घोळत होता मनात. बाहेर हॉटेलमध्ये वगैरे माल द्यायचा तर नाव लागतं म्हणे. आपल्या व्यवसायाचं नाव 'कान्हासरी'! कान्ह्याची

बासरी. "कान्हासरी घरगुती उत्पादने" आणि मला रोज ऐकायचीय तुमची बासरी. अगदी रोज. आता एकही दिवस खंड नको."

अनंता पाहतच राहिला. 'ही आपली बायको, एवढी वर्ष झाली लग्नाला, पण अजून धड कळलीच नाही आपल्याला.' त्याने तिला आवेगाने मिठीत घेतले. ती ही अत्यंत भावूक स्थितीत त्याच्या मिठीत विसावली. बराच वेळ ते असे उभे होते. सर्व जगाला विसरून. मग दुरून मुलांचे आवाज आले, आणि दोघे दूर झाले. घराकडे निघाले. अनुच्या हातात बासरी होतीच. दोघं घरी पोचले तेव्हा आण्णा, वहिनी, ओसरीवरच होते. अनुच्या हातातली बासरी पाहून आण्णांनी मान फिरवली.अनू सरळ त्यांच्यासमोरच जाऊन उभी राहिली. "आण्णा, रागवू नका. यांची बासरी आज प्रथम ऐकली. जीव गुंगून गेला माझा. हा आनंद नका हिरावून घेऊ आमच्याकडून. राहीला प्रश्न कामं होण्याचा, त्यात कसलीही कसर राहणार नाही, याची हमी मी देते."

"अनुराधे, तुमचा पोटचा आनंद दूर धाडलाच आहे. आता अधिक दु:ख नाही द्यायचय तुम्हाला. तुमची काळजी वाटते एवढंच!"

"आण्णा, मी शब्द देतो, यावेळेस कामात कुचराई नाही होणार!" अनंता गंभीरपणे म्हणाला.

"काकू, ए काकू, आढीतले आंबे पिकले गं!" पोरांनी एकदम येऊन गलबला केला.

“पिकले का? चला काढूया थोडे.”

अनुराधा, अनंता, पोरं, आंबे निवडायला गेले. आण्णांनी वहिनींकडे पाहिलं.

“भावोजी, एक सांगू? अनंता भावजी आता समजदार झालेत. आयुष्याने त्याना कठोर धडे शिकवलेत. करतील आता नीट! मनाने फार चांगले आहेत. आपली अनू फार समजुतीची. दोघं मिळून करताहेत सगळं. आपण जमेल तशी मदत करू. होईल सर्व ठीक. माझं मन ग्वाही देतय.”आण्णांनी फक्त दोन्ही हात उंचावून “तथास्तु“ म्हटलं.

---

दुपारी आजोबांनी स्वहस्ताक्षरात आनंदाला कित्ता बनवून दिला. “रोज एक ओळ गिरवायची, आणि तसंच खालच्या ओळीत लिहायचा प्रयत्न करायचा.आणि आता ते आजच्या धड्यातले शब्द आधी बघून, मग न बघता लिही.

“हो आजोबा!”

आनंदने पुस्तक उघडले. मग त्याला प्रदीपचे शब्द आठवले. “एक एक शब्द नीट वाच.”

त्याने नव्या समजाने वाचन करायला सुरवात केली. काना, मात्रा, आकार, उकार सगळंच डोक्यात पिंगा घालू लागले. उच्चाराबरोबर हे सगळं ध्यानी येऊ लागलं.

त्याने अर्धं पान वाचून पुस्तक बंद केलं व डोळे मिटले. त्याच्या बंद नजरेसमोर पुस्तकातला मजकूर तरळू लागला. त्याने वहीत लिहायला सुरवात केली, जसा आठवेल तसा.

लिहून झाल्यावर आजोबांनी मागितली वही. आठवून लिहीण्याच्या नादात अक्षराची वाट लागली होती. पण लेखनातली अशुद्धता बरीच कमी झालेली दिसत होती.

“हं, आता परत हेच जरा अक्षराकडे लक्ष देऊन लिही बरं. बघून लिही वाटल्यास.”

“नको, न बघताच लिहीतो.”

मग त्याने न बघता, पण अक्षर प्रयत्नपूर्वक वळणदार काढण्याचा प्रयत्न करत लिहीलं. पहिल्यापेक्षा बरीच सुधारणा दिसत होती. “शाब्बास! अजून खूप हवी सुधारणा व्हायला. पण आधीपेक्षा बरंच चांगलं झालय लेखन.”

“आजोबा, प्रदीपसारखं अक्षर काढायला किती दिवस लागतील?”

"रोज प्रयत्न केलास तर तुझ्या वळणाचं पण सुंदर अक्षर यायला महीना दीड महीना तरी हवा. हाताला वळण सवयीने लागतं, व सवय साधारण दीड महीन्यात लागते रोज केलं तर!"

"दीड महीना?"

"हो. सांग बरं मे महिन्यात किती दिवस असतात?"

आनंदने मूठ वळून त्या उंचवट्यांवर मोजायला सुरवात केली. "मे ३१ दिवस."

"शाब्बास. आज तारीख २०. म्हणजे 'मे' चे किती दिवस उरले?"

"११ दिवस."

"बरोबर."

"शाळा सुरू होणार जूनच्या १३ तारखेला. म्हणजे जूनचे सुटीचे उरले?"

"१२ दिवस."

"म्हणजे सुटीचे एकूण दिवस उरले....?"

"तेवीस."

"हं, मग या तेवीस दिवसांत समज तू दिवसांतून दोन वेळा लेखनसराव केलास तर किती वेळा झाला?"

आनंदने हातांची बोटे मोजत बेरीज केली "४६ वेळा."

"बरोबर. म्हणजे दीड महिन्यात तू जेवढं लिहीशील तेवढ्या वेळा."

"ऑ! म्हणजे शाळा सुरू व्हायच्या आत प्रदीपसारखं अक्षर काढू शकेन?"

"हो, प्रदीप सारखं नाही पण सुंदर हस्ताक्षर काढू शकशील."

"मग बाई माझी वही फेकणार नाहीत ना खाली. आणि मुलंही कोंबडा नाचला असं चिडवणार नाहीत?"

"नाही चिडवणार!"

"मी रोज लिहीणार आजोबा! रोज! ४६ वेळा लिहीलं की अक्षर होणार ना सुंदर?"

"हो, नीट लक्ष देऊन लिहीलंस तर!"

"हो, नीट लिहीणार मी."

आनंदाच्या चेहऱ्यावर अनेक भाव दिसले आजोबांना.सगळ्यांनी केलेल्या उपेक्षेची वेदना, त्यातून आलेला संताप, त्यावर मात करण्याचा दिसलेला मार्ग, आणि तो चोखाळण्याची दुर्दम्य इच्छा! हस्ताक्षर ही एक साधी गोष्ट होती. पण आनंदाच्या चेहऱ्यावरचे ते भाव आजोबांना फार मोठी उभारी देऊन गेले! 'याच्या स्फुल्लींगाची ठिणगी अशी योग्य कारणांसाठी पेटती ठेवायला हवी. पोरगं जग जिंकेल.'

## १.९

पाहता पाहता सुट्टी संपत आली. उत्तम स्मरणशक्ती, सकारात्मक वातावरण, शाळेत कोणी रागावू नये ही काळजी, आणि चित्र काढण्याशिवाय करायला काही नाही, या सगळयाचा परिपाक म्हणजे, आनंदचा बराच वेळ कित्ता गिरवणे, शुद्धलेखन, वाचन, चित्र काढणे यात जाऊ लागला. दिवाणांच्या मुलांबरोबर शिकवणीत झालेल्या अभ्यासाची उजळणी, प्रदीपच्या अभ्यासू वृत्तीचा नकळत झालेला परिणाम, त्याच्याबरोबरीने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतानाची चुरस, यामुळे आनंदाचा सर्व विषयांचा अभ्यास बऱ्यापैकी तयार होत होता.

कवितांवर विचारलेल्या प्रश्नांचा प्रदीपलाही राग व कंटाळा येतो पण परीक्षा म्हटलं की लिहावंच लागतं, हे सत्य कळल्यापासून प्रदीप त्याला फार जवळचा मित्र वाटू लागला. कोणीतरी आपल्याला समजू शकतो ही भावनाच मोठी मुक्त करणारी असते. आनंदचेही तसेच झाले.

प्रज्ञाच्या रुपाने एक अगदी त्याच्यासारखीच खोडकर मैत्रीण त्याला मिळाली होती. प्रदीप अत्यंत गंभीर प्रवृत्तीचा व वयाच्या मानाने चांगली समज असणारा मित्र तर प्रज्ञाच्या रुपात त्याच्यासारख्याच बारीक बारीक कुरापती करणारी मैत्रीण मिळाल्यामुळेही आनंद नकळत मनाने फुलू लागला होता.

शिकवणीनंतर काही वेळ तिघांना खेळायला द्यावा असं एकदा दिवाण बाईंनीच सुचवल्यामुळे तो पायंडाच पडला होता.

एव्हाना प्रदीपच्या खेळण्यातल्या गाड्या, या दोघांनी पूर्ण उघडून, त्या परत जोडून पाहून झाल्या होत्या. प्रज्ञाच्या नाजूक बाहुल्यांना कधी मावळे, कधी टारझन तर कधी माकडंही बनवून झालं होतं. अशा वेळेस प्रज्ञा व आनंदची सर्जनशीलता पराकोटीची तल्लख व्हायची.

आनंद एकदा शाळेतला गुरूजी झाला.बाहुल्या झाल्या विद्यार्थी. प्रज्ञा बाई! प्रदीप मुख्याध्यापक झाला.

खेळातले वर्ग सुरू झाले. प्रज्ञा पाढे शिकवू लागली. मुख्याध्यापक राऊंड घेऊ लागले.

आनंदने एका बाहुली समोरची वही उचलली! “काय कोबडं शाईत पाय बुडवून नाचलं काय गं तुझ्या वहीवर?”असं म्हणून त्याने वही फेकली आणि खाड्कन बाहुलीच्या मुस्काडीत लगावली.

प्रज्ञा पळतच आली. ती एकदम कावरी बावरी झाली होती. तिने खाली पडलेल्या बाहुलीला उचलून एकदम जवळ घेतलं. प्रदीप पण पाहतच राहिला. वातावरण एकदम बदललं. तिघंच मुलं वरच्या खोलीत खेळत होती. प्रज्ञा तर मुसमुसायलाच लागली. आनंदही मग बावरून गेला.

“आमच्या बाई माझी वही अशीच फेकायच्या आणि गणिताचे सर मुस्काडीत मारायचे.” तो काहीसा उसळून म्हणाला.

“इथल्या शाळेत नाही शक्यतो मारत. खूप काहीतरी वाईट वागलं तरच मारतात.” प्रदीप म्हणाला.

“तुझ्याशी कट्टी आहे माझी. मी नाही खेळणार तुझ्याशी कधीच! माझी बाहुली पण नाही खेळणार तुझ्याशी!” प्रज्ञा मुसमुसत म्हणाली. आनंद मान खाली घालून उभा राहिला.

इकडे आल्यापासून पहिल्यांदाच असं काही घडत होतं. पहिल्यांदाच त्याच्यावर कोणी ओरडत होतं. आणि पहिल्यांदाच आनंदाला आपल्या वागण्याचं वाईट वाटत होतं. त्याच्या डोळ्यात राग नव्हता, तर कुठेतरी अपराधी वाटत होतं. नक्की आपलं काय चुकलं कळत नव्हतं पण आपलं चुकलं काहीतरी एवढं नक्की वाटत होतं.

“प्रज्ञा, तो त्याच्या आधीच्या सरांसारखं बाईंसारखं शिकवत होता. तिथे मारतात मुलांना. आपल्या शाळेत नाही मारत ना?”

प्रज्ञा मग आनंदजवळ आली. “तुलापण मारायचे तुमचे सर आणि बाई?”

आनंदने मान खाली घातली.

“आधी सॉरी म्हण माझ्या छकुलीला. मग बट्टी करेन!”

आनंदने बाहुलीच्या गालावरून हात फिरवला. त्याचं असं सॉरी म्हणणं मग प्रज्ञाला मान्य झालं.परत खेळ सुरू झाला. पण आनंदाला नकळत धडा शिकवून गेला.

दिवस भराभर पुढे सरकत होते. सुट्टीचे दोनच दिवस उरले.आजीने त्याच्यासाठी आणलेला नवा गणवेश नीट धुवून, घडी घालून गादीखाली

ठेवला. ते करताना तिने आनंदला बरोबर घेतले. “पुढच्या आठवड्याच्या सुटीच्या दिवशी हे तुझं तू करायचं बरं का आनंदा! विद्यार्थ्याने स्वावलंबी असावं.”

“अं? पण मग माझ्यासाठी जेवण तू का करतेस? मीच करायला हवं ना?”

“आनंदा, आपण स्वयंपाकघरात करतो त्याला स्वयंपाक करणे किंवा रांधणे म्हणतात. आणि जेवणाच्या खोलीत ताटावर बसून जेवतो त्याला जेवण करणे म्हणतात.”

“हं! माझा स्वयंपाक मी करायला हवा ना?”

“हो खरं तर करायला हवास. पण आपण जेव्हा एकत्र राहतो तेव्हा आपण कामं वाटून घेतो जी सर्वांसाठी एकत्र करायची असतात. जसं आजोबा सामान, भाजी आणतात. मी रांधते, तू पाट पाणी घेतोस, घासून आणलेली भांडी पालथी घालतोस, हो, पण उद्यापासून तू तुझी ताटवाटी घासून विसळून ठेवायची बरं का! म्हणजे होशील पूर्ण स्वावलंबी विद्यार्थी!”

“हो? चालेल! मी स्वावलंबी होणार उद्यापासून,” आजीच्या मागे मागे उड्या मारत फिरत आनंद गुणगुणू लागला. त्याला मस्त मज्जा वाटत होती. नवा गणवेश म्हणजे तर पर्वणीच होती. इतकी वर्ष चंदुचाच गणवेश लहान करून घातला होता त्याने.

दुपारी त्याने आईला पत्र लिहायचे ठरवले.

---

“अनुराधे, अगं बाहेर ये लवकर.”

“काय हो भाऊजी?” आज भाऊवहिनी सकाळचेच आले होते. आमरसपुरीचा बेत होता. वसंत वासंतीही आले होते.

“अगं वाट ना पाहत होतीस पत्राची? हे घ्या, लेकाचं पत्र!आणि आजोबांनी जादूच केली. अक्षर बघ पत्त्यावरचं!”

सुबक अक्षरात लिहीलेला पत्ता पाहूनच हरखली अनू! तिने परत पाहिलं, नक्की आनंदानेच लिहीलाय ना पत्ता? हो वळण तर त्याचंच!

मग ती कार्ड उलट करून वाचू लागली. नवीन मैत्री, दिवाणांचं घर, नवा गणवेश, कित्ता, स्वावलंबन, किती नी काय लिहू असं झालं होतं आनंदाला. “रमलं माझं पोर!” अनू मनात म्हणाली.

“चंदू, पुष्पा, वरूण हवे होते इथे! इथे शाळेत गुरूजी आणि बाई मारत नाहीत मुलांना. आम्ही मज्जा केली असती. तुझी खूप आठवण येते!” शेवटच्या वाक्यावर न राहवून अनूला भरून आलंच!

तिने ते पत्र आवर्जून घरात सर्वांना दाखवलं. आपल्या मुलाचं कौतुक करण्यात आईला केवढा आनंद असतो! काही कामाने आलेली वासंतीही म्हणाली, “फारच सुधारणा आहे आनंदाच्या हस्ताक्षरात आणि लेखनातही. तुझ्या आईवडिलांनी बोलल्याप्रमाणे करून दाखवायला सुरवात केलेली दिसते. आता आनंदाने यशाला घातलं म्हणजे झालं.”

---

शाळेचा पहिला दिवस उजाडला. आजोबा आनंदाला शाळेत पोहोचवायला गेले. मुख्याध्यापकांनी सांगताच शिपाई आनंदाला वर्गात घेऊन गेला. तुकडी ‘ड’ असा बोर्ड लिहीलेला होता.

वर्गात बरीच मुलं होती. पहिल्या दिवसाचा उत्साह, बऱ्याच दिवसांनी भेटलेले वर्गमित्र, नवी दप्तरं, नव्या वह्या. वर्गातली मुलं जरा मोठी दिसत होती. प्रदीप कुठेच दिसत नव्हता. कसा दिसणार? तो तुकडी अ चा विद्यार्थी!

आनंदा तोंडी परिक्षेत पास झाला असला तरी ‘अ’ तुकडीत त्याला नव्हताच प्रवेश मिळणार!

आजोबांनी प्रयत्न केला होता. पण मुख्याध्यापकांनाही काही नियम पाळावेच लागणार होते. ते म्हणाले पहिल्या घटक चाचणीचे गुण पाहून मग ठरवू! आजोबांना हो म्हणण्याशिवाय पर्याय नव्हता.

आनंद बराच वेळ दाराशी थांबला. शिपाई केव्हाच निघून गेलेला. मग हळू हळू वर्गात शिरला. दोन दांडगट मुलं एकमेकांना टपल्या मारून पळापळी करत होती वर्गात. एकाचा धक्का लागला आनंदला. दप्तर खाली पडलं. त्या मुलांचं लक्ष गेलं याच्याकडे.

“ए, कोण रे तू? नवा काय शाळेत? का ‘क’ तुकडीत नापास म्हणून आलास इकडं?”

“ए, ह्ये बेणं, लय ल्हान दिसतंय राव. कितवीचा रं? चौथीत काय? चुकून आला काय हितं? “ दुसरा जरा गावठी भाषेत बोलत होता.

“अरे थांबा रे!” मागून एक दणकट हात आनंदाच्या खांद्यावर आला. “आनंद ना रे तू? आपल्या वर्गात नवा आलाय. गुरूजींचा नातू!” हेडसरांनी सांगितलं आत्ता.

“मी रमेश. ये इकडे माझ्या शेजारी बस.”

रमेश उंच असल्याने शेवटून दुसऱ्या बाकावर बसला होता. सगळे मग या नव्या आलेल्या मुलाभोवती जमा झाले. काही कुतुहलाने, काही चेष्टेच्या नजरेने पाहू लागले. या वर्गात फक्त मुलेच होती.

“कुठून आलास?”

“रामनगर”

“रामनगरके शोले! हाहाहा!”

“कुठय हे?”

“तिकडे लांब”

“हां काय?

“दप्तर किती फाटलय रे तुझं?”

आनंदने पट्कन छिद्र पडलं होतं तिथे हात ठेवला.

“आरं, फाडून टाक तिथंच अजून. बाप नवं घिऊन दिल.”

"ए, गप रे शंकऱ्या!"रमेशने दटावलं तसा शंकर गप्पं झाला.

वर्गशिक्षक आले. हातात जाडजूड रूळ! एक लांब वेताची काठीही कोपऱ्यात होती. "गुरूजी मारतात का?" आनंदने हळूच रमेशला विचारले. रमेशने गप्पं बस अशी खूण केली. बाकी मुलं आपापल्या जागेवर चिडीचूप जाऊन बसली होती एव्हाना. हजेरी सुरू झाली. आनंदचे नाव पटावर अजून आलेले नव्हते. सगळयांची नावं घेऊन झाल्यावर वर्गशिक्षकांनी त्याला उभे केले. नाव, गाव विचारले. त्याच्या परीक्षेबद्दल त्यांनी इतर शिक्षकांकडून ऐकले होते. फारशी अभ्यासात गती नसलेला मुलगा अशीच त्याच्याविषयीची त्यांची कल्पना झाली होती.

मग अभ्यासाला सुरवात झाली. हे शिक्षक गणित विषय शिकवणारे होते. पाढ्यांनीच सुरवात झाली.

मुलांना २० ते ३० हे पाढे लिहायला सांगण्यात आले. आनंद चक्कं मन लावून कोरून आकडे लिहीत पाढे लिहू लागला. आपल्याला येत असेल तर ते काम करायला मजा येते. पुर्वीच्या शाळेत पाढे लिहायला सांगितले की तो जाम कंटाळायचा आणि मग त्याच्या टिवल्या बावल्या सुरू व्हायच्या. त्याला तेही आठवले. काही मुलांचे इथे तेच सुरू होते. तेवढ्यात आनंद मोठ्याने ओरडून पटकन बेंचवर उठून उभा राहिला. सगळा वर्ग त्याच्याकडे पाहू लागला. मागची मुले खो खो हसू लागली. शिक्षक संतापाने पाहू लागले. "काय रे काय झालं?" आनंद आसपास पायात शोधू लागला.

“काय झालं? बेंचखाली काय आहे? ओरडलास कशाला?” सरांचा पारा चढू लागला होता.

“गुरूजी, इथे काहीतरी होतं!”

“गुरूजी....... गुरूजी.... “मुलं अधिकच जोरजोरात हसू लागली.

“ए, गप बसा सगळे एकदम!” गुरूजींनी वळ उचलला.

आनंदला पुढे काय होणार पाठ होतं. “वही आण तुझी इकडे.”

तो वही घेऊन घाबरतच टेबलजवळ गेला. शिक्षकांनी वही पाहिली. पाहता पाहता त्यांचा चेहरा बदलला. २७ पर्यंतचे पाढे अत्यंत सुबकपणे रेघा वगैरे आखून लिहून झाले होते. २८वा अर्धवट होता. त्यांनी एकदा आनंदकडे पाहिलं.पहिल्या बेंचवर त्यांच्यासमोर कोणीच नव्हतं बसलेलं. तू इथे बस, माझ्यासमोर. लिही पुढचे पाढे. मग ते मागे गेले जिथे आधी आनंद बसला होता. ते रमेश शेजारी बसले. रमेशने आनंदच्या वहीत पाहून २६ पर्यंतचे पाढे लिहीले होते. २७ वर अर्थातच अडला होता. त्याने वही किंचित दुमडून घेतली. मग शिक्षकांना पायात काहीतरी जाणवलं. पाहतात तर एक लहान बेडूक. मागच्या बेंचवर खूसफुस सुरू होती. त्यांनी त्या दोन्ही मुलांना पुढे बोर्डजवळ बोलवलं. मग तो बेडूक उचलला व त्या मुलांजवळ घेऊन आले.

“कोणी आणला?” जरबेने त्यांनी विचारले. दोघेही गप्पं. बेडकाला खिडकीतून बाहेर सोडत त्यांनी रूळ उचलला मग!

“इथल्या शाळेत मारत नाहीत, पण खूप वाईट वागलं तर रुळाने भरपूर मारतात.” आनंदाच्या मनात संदर्भ नव्याने लिहीला गेला. त्यादिवशी आनंदला पाढे अचूक लिहील्याबद्दल शिक्षकांची शाबासकी मिळाली आणि त्याचबरोबर दोन रुळ आणि खार खाऊन असलेले दोन टगे! खाऊ की गिळू अशा नजरेने ते पाहत होते त्याच्याकडे. पुढचे तास तसे फारसं काही न घडता गेले. पहिला दिवस म्हणून अर्ध्या दिवसानंतर शाळा सोडून दिली गेली. शाळा सुटल्यावर आनंद घरी जायला निघाला. अर्ध्या रस्त्यात ती दोन मुलं वाटेत उभी दिसली. आनंद जवळ आला तसा म्हणाली “का रे ए” “लय शाणा झाला का?”

आनंद काही बोलला नाही. “गप बसायला काय झालतं तुला? एका बेडकीला घाबरला का? पेद्र्या?”

“मला कळलं नाही ना बेडकी आहे! माहीत असतं तर नसतं ओरडलो.”

“खरं सांगतो काय?”

“हो, बेडकीला काय घाबरायचं!”

“हात कर पुढे.” आनंदने केला. मग त्यातल्या एकाने बेडूक काढला खिशातून. आणि पटकन त्याच्या हातावर ठेवला. यावेळेस तो ना ओरडला ना घाबरला. त्याने तळव्यावर ठेवलेल्या बेडकीच्या पिलाच्या मऊ पाठीवरून हात फिरवला.

“मी नेऊ याला घरी?”

“ऑ? कशाला? पाळतो काय?” अवाकच झाली ती दोघं.

“हो मी रामनगरला पाळली होती चार पाच पिलं.”

“ऑ?”

“ती वेगवेगळया आवाजात ओरडतात मोठे होताना.”

‘हे पोरगं येगळंच हाय.’ त्या दोघांनी अंदाज बांधला.

“तुझ्यामुळे मार बसला ना लेका आम्हाला!”

“हो, खूप जोरात लागतो का रे तो रुळ?”

“ह्ये बग, वळ उटले! जोरात लागतो का काय इचारतोस?”

“मी ओरडायला नको होतं रे!” त्यांच्या पायांवर उमटलेल्या वळांकडे पाहत आनंद म्हणाला. त्याच्या आवाजातला प्रामाणिकपणा त्या टग्या पोरांपर्यंत पोहोचला. “आम्ही तुजं दप्तर फाडून टाकणार होतो.” त्यातला शंकऱ्या म्हणाला.

“ए, नको नको, माझ्या आजोबांना आणखी काम करावं लागेल.” आनंद दप्तर मागे लपवत म्हणाला.“मी, मी, तुमच्यासाठी चित्र रंगवून आणेन उद्या!”

“हां काय? भारी काडतो का तू चित्र?”

आनंदने मान हलवली.

" बर, चालतंय! बेडकी खरंच न्यायला काय तू?"

"नेऊ?"

"न्ये न्ये! आता दोस्त बरका तू आपला. उद्या भेटू!" पोरं गेली.

आनंदने मग दप्तरात भरलेले दगड ओतून टाकले. कंपास दप्तरात रिकामा केला. त्यात तो छोटा बेडूक ठेवला. मग तो घरी निघाला.

प्रज्ञाला तो बेडूक कधी एकदा दाखवतो असं झालं होतं त्याला.रस्त्यात ओतून टाकलेले दगड आनंदची दुसरी बाजू ठळकपणे मांडत होते.

---

त्यादिवशी स्टाफरुममधे शिक्षकांच्यात आनंद बद्दल चर्चा झालीच. सगळ्यांचंच अनुकुल मत मिळालं मुख्याध्यापकांना आनंदविषयी.

आनंदने कंपासमधे ठेवलेला बेडूक दाखवताच प्रज्ञाने किंचाळून घर डोक्यावर घेतलं. पण प्रदीपने तिला वेळीच शांत केलं आणि आनंदने बेडकाला सोडून दिलं बागेत.

"अगं बेडूक काही चावत नाहीत आपल्याला."

"शी, पण किती घाण असतात ते लिबलिबित! पाळायचा तर पोपट पाळ, मासे पाळ, कुत्रा, मांजर पाळ! बेडूक काय?" तिने चेहरा कसानुसा करत म्हटलं. तिच्या त्या चेहऱ्याकडे पाहून मग दोन्ही मुलांना जाम हसायला आलं.पण तिला चिडवलं तर ही बातमी मोठ्यांपर्यंत जाईल आणि मग आपली खैर नाही हे ओळखून दोघंही गप्पं बसली.

पाहता पाहता आनंद शाळेत रुळला. ‘ड’ तुकडी मिळाल्याचा एका अर्थी त्याला फायदाच झाला. यावर्गात तो हुशार विद्यार्थी म्हणून गणला गेला. वर्गशिक्षकांनी त्याला पहिल्या बेंचवर बसायला सांगितले. रमेश उंच असूनही त्यालाही याच्या शेजारी पहिल्या बेंचवर बसायला सांगितले. रमेश फार बुद्धीमान नसला तरी मेहनती होता. शांत होता स्वभावाने. आनंदची चित्रं वर्गभर फिरू लागली. चित्रकलेचे शिक्षक तर हीरा गवसल्यासारखे खूश झाले. आनंद बरोबर अगदी बरोबरीने ते चित्रांवर चर्चा करत. कोणता रंग कसा बनवायचा,त्या निळया छटेला रंगांच्या भाषेत काय म्हणतात, चित्रात खोली दर्शवण्यासाठी कोणते टेकनिक वापरतात. असे अनेक विषय आनंदाच्या चित्रकलेतील कक्षा रुंदावत होते.

सगळंच वातावरण पोषक मिळू लागलं आनंदला अभ्यास करायला. त्याचा योग्य तो परिणाम घटक चाचणीत दिसला. अपेक्षेपेक्षा बऱ्याच चांगल्या गुणांनी आनंद उत्तीर्ण झाला. मुख्याध्यापकांनी आजोबांना बोलावून सांगितले की आता त्याला ‘अ’ तुकडीत घालता येईल. पण काही विचार करून आजोबा म्हणाले, “नको, एवढं वर्ष ‘ड’ मधेच राहू दे. आधीच फार बदलांतून गेलय हे पोर या काही महिन्यात. आता इथे रुळलाय, परत वर्ग बदलणार. इथे शिक्षकही जातीने लक्ष देताहेत. शिकेल व्यवस्थित.” मुख्याध्यापकांनाही ते पटले.

रामनगरला आनंदचा निकाल कळल्यावर आण्णांनी स्वत: पेढे आणून देवापुढे ठेवले. सर्वांना आनंदचे यश कौतुकाने सांगत राहिले. अनंता, अनू मनोमन सुखावले. चंदू, पुष्पा व वरूण ने मिळून आनंदला पत्र लिहीले.पोरास दिवाळीच्या सुटीत बोलावून घे अनुराधे! आण्णांनी आवर्जून सांगितले.

---

घडी छान बसली होती आता. सकाळी लवकर दिवाणांकडची शिकवणी. मग घरी येऊन जेवून शाळा. संध्याकाळी आजीच्या ऑर्डरी काही पोहोचवायच्या असल्या तर ते काम आनंद मजेने करू लागला. आजी आजोबांनाही मदत होई तेवढीच. घरीही तो आजीच्या मागे मागे फिरत बऱ्याच गोष्टी शिकत होता.

जास्त प्रमाणावर मसाले, चटण्या करायच्या असल्या तर लागणाऱ्या वाणसामानाचे गणित ती आनंदलाच करायला सांगे अलिकडे. शिवाय जड दळणाचे डबे, सामान आनंद सहज उचलून आणू लागला होता. उंची वाढत होती.

“आजी, आता चिंचगुळ, मसाला घालायचा ना?” स्वयंपाकघरात आजीजवळ बसून आनंदा शाळेचा अभ्यास करत होता रात्री, आजीने डाळीला फोडणी दिली तेव्हा अचानक त्याने विचारले.

“हं, बरोबर, कोथिंबीरही घालायची. आज खोबरंही घालणाराय. तुला आवडतं ना?”

“आजी, या रविवारी मी करू सगळा स्वयंपाक?”

“तू? सगळा? बरं कर. मी भाकऱ्या करेन फक्त.”

“प्रदीप प्रज्ञाला पण बोलवुया का?”

“बोलाव की. येतील का पण ती मुलं?”

“आजोबांना विचारतो.”

“हो, चालेल. झाला का तुझा अभ्यास? म्हणजे मग जेवायला बसू.”

“हो, शेवटचाच प्रश्न लिहीतोय. आमटीचा काय मस्तं वास सुटलाय. कावळे ओरडायला लागले पोटात.”

“हं, करा मग त्या कावळ्यांना शांत. घ्या पाटपाणी.”

१.१०

त्यादिवशी देशमुखांकडे मोठ्या लेकीच्या मंगळागौरीचा कार्यक्रम होता. बरेच लोक जेवायला येणार होते.

देशमुख बाईंनी आजीला मदतीला बोलावले होते. आजी आनंदालाही मदतीला घेऊन गेली. आनंद आजीच्या हाताखाली चांगलाच तयार झाला होता.

देशमुखांची मुलं आनंदच्या पुढे मागेच होती वयाने. त्याला भराभर आजीला कामात मदत करताना पाहून जमलेल्या बायकांनी आनंदचे कौतुक केले. मग मुख्य स्वयपांक सुरू झाल्यावर आजी म्हणाली, "आनंदा मागे ओसरीत केळीची पानं धुवून ठेवलीत ती पुसून ठेव. मग बस तिथेच झोक्यावर. काही लागलं मला तर हाक मारते."

"हो आजी."

"भूक लागलीय का?"

"नाही. खाल्लय ना भरपूर, देशमुख काकूंनी परत वाढली खिचडी."

"हं, जा मग." आनंद पुसायचे कापड घेऊन मागची ओसरी शोधत निघाला. पण चुकून तो मोठ्या ताईच्या खोलीत शिरला.

ताई आंघोळीला गेली होती. खोलीत कोणीच नव्हतं. तेवढ्यात त्याचं लक्ष भिंतीवरच्या चित्राकडे गेलं. तो गुंगूनच गेला ते चित्र पाहण्यात. बराच वेळ टक लावून तो चित्र पाहत होता. तेवढ्यात बाथरूमचा दरवाजा

उघडल्याचा आवाज आला आणि दचकून आनंद भानावर आला. घाईघाईने तो दरवाजाबाहेर पडला.

मागची ओसरी सापडली मग. पानं पुसून झाली. तेवढ्यात देशमुखांची मुलं कुठूनशी आली. प्रज्ञा, प्रदीपही आले. खेळ रंगला मग सगळ्यांचा.

“आई, ए आई, कुठे आहेस तू?” मोठी ताई, मोकळे सोडलेले केस घेऊन घाईघाईने स्वयंपाकघरात शिरली.

“कुसूम, अगं हे काय? अजून तयार नाही झालीस? गुरूजी येतील एवढ्यात.”

“माझ्या हिऱ्याच्या कुड्या सापडत नाहीत. आंघोळीला जाताना काढून ठेवल्या, येऊन पाहते तर गायब!”

“अगं, काहीही काय? ठेवल्या असशील बघ तूच दुसरीकडे.”

“नाही गं, शोधल्या मी.तो लहान मुलगा कुठय? तो आला होता माझ्या खोलीत.”

“कोण लहान मुलगा? ओह आनंद?”

अचानक देशमुखबाईंना आजीचं बोलणं आठवलं. त्यांनी भेदकपणे अनसूयाबाईंकडे पाहिलं.

“कुठय हो नातू तुमचा?”

आजी थरथरली. “नाही हो देशमुख वहिनी, तो नाही असं काही करणार!”

"मग माझ्या खोलीत काय करत होता? बोलवा त्याला."

"आनंद," आजीने नाईलाजाने हाक दिली. तिचा आवाज फुटेना.

"थांबा मीच आणते बोलावून."

ती तरातरा गेली. आनंदाच्या दंडाला धरून भराभरा आत घेऊन आली. सगळीच पोरं भांबावली. सगळीच पाठोपाठ आत आली. बाहेर बसलेली घरची पुरूष मंडळीही आत डोकावली.

"काय रे, माझ्या खोलीतून कुड्या उचलल्यास ना? आण दे मुकाट्याने इकडे."

"अं?"

आनंद प्रचंड भांबावला. त्याला काहीच कळेना. त्याने आजीकडे पाहिलं.

ती पुढे होऊन म्हणाली "नाही हो, माझा नातू असं काही करणार नाही. विश्वास ठेवा."

"विश्वास? तुमचा तरी आहे का तुमच्या नातवावर विश्वास? चांदीची मुर्ती चोरली त्याने देव्हाऱ्यातून असं तुम्हीच नाही का सांगितलंत." आनंदने झटकन मान उचलून आजीकडे पाहिलं. ती खाली मान घालून उभी होती.

"का नातवाला हाताशी धरून तुम्हीच सुरू केलेत हे धंदे?"

"कुसूम, जरा दमाने घे!" देशमुखबाईंनी तिला दटावलं तसा तिने आपला होरा परत आनंदकडे वळवला.

“काय रे, तू काय करत होतास माझ्या खोलीत? कशाला आला होतास?”

आनंदाच्या डोळ्यात निखारे फुलले होते एव्हाना. ‘आजी, माझी आजीच सांगते लोकांना की मी चोर आहे?’

त्याने कुसूमच्या हाताला एक हिसडा दिला व तो तीरासारखा बाहेरच्या दरवाजातून पळत सुटला.

अरे धरा त्याला. पटकन बाहेरच कोणीतरी पकडलं त्याला. मग रितसर झडती घेतली गेली आनंदची. काहीच सापडले नाही तेव्हा कोणी म्हणाले “ कपडे काढून बघा, असेलच कुठेतरी लपवलेले जोड. पळून चालला होता म्हणजे नक्कीच चोरलेत जोड त्याने.”

त्याला घेऊन मग सगळे कुसुमच्या खोलीत आले. “बोल कुठून उचललेस? कुठे ठेवलेस?”

आनंद ओठांवर दात घट्ट रोवून उभा होता. आजीच्या विनवण्या कोणी ऐकतही नव्हते. तेवढ्यात देशमुखांच्या पायाला काही टोचले, खोलीत अगदी आत ते उभे होते. त्यांनी वाकून पाहिले निरखून तर एक कुडी होती, जरा निरखून पाहिल्यावर दुसरीही सापडली.

“गप्पं राहा सगळे.” ते कडाडले. सगळा गलका शांत झाला. “कुसुम, कुठे ठेवल्या होत्यास तू कुड्या?”

“या इथे ड्रेसींग टेबलवर.”

"हं! मग वाऱ्याने पडदा हलला, आणि त्या खाली पडल्या, या बघ!" कुसुम अवाक होऊन पाहत राहिली.

"कोणावरही असा संशय व्यक्त करण्यापुर्वी दहादा विचार करावा."

"अहो पण बाबा, हा मुलगा माझ्या खोलीत काय करीत होता?"

"मागच्या ओसरीवर जाण्याऐवजी चुकून आला होता. म्हणाला मला मगाशी, की चुकून दुसऱ्याच खोलीत शिरलो आणि तिथे एक खूप छान चित्र लावलय म्हणून." प्रदीपने पटकन सांगितलं.

"कळलं?" देशमुख संतापाने बोलले. "हिला एक पोच नाही, तुम्ही तरी...."

"अहो मागे अनसूयाबाईच म्हणाल्या होत्या की त्यांना याच्यावर संशय आहे व तो देव्हाऱ्यातली मूर्ती चोरणार होता. त्यामुळे मला वाटलं..."

आनंदने फक्त एकदा आजीकडे पाहिले. आणि तो दरवाजाकडे वळला.

"हं, चला मिळाल्या कुड्या बरं झालं. चला गुरूजी आलेत बाहेर, आता हा विषय नको. अनसूयाबाई मनावर नका घेऊ. गोंधळ झाला सगळाच." घरातल्या एका ज्येष्ठ बाईने सारवा सारव केली. सगळे तिथून निघाले. आजीची अपराधी नजर आनंदाला शोधत होती पण तो दिसला नाही. ती फार अस्वस्थ झाली.

देशमुखबाईंना म्हणाली, "मी आनंदाला घरी सोडून येते."

“छे छे! आता कसं जाता येईल? सगळा स्वैपाक व्हायचाय अजून. हे वाईटच झालं जे काही झालं ते. पण तुम्हीच कारणीभूत आहात याला. तुम्ही तसं म्हणाला नसता त्या दिवशी तर मी चुकूनही शंका घेतली नसती तुमच्या नातवावर. पण आता असे मधेच सोडून जाऊ नका. हे काही आजपुरतं नव्हे, आपली सगळी कामं, ऑर्डरी वर्षभर असतात, विसरू नका.” आजी, खालमानेने काम करत राहिली मग.

आनंदा तिथून कसा बाहेर पडला, कुठे जात होता, त्याचं त्यालाही भान उरलं नाही.

“आजी मला चोर म्हणाली” हा एकच विचार त्याच्या मनात घोंगावत होता. बराच वेळ तो नुसता चालत राहिला. वाट दिसेल तिथे. त्या एका वाक्याने नुसती आग लावली होती तनामनात. डोळ्यातले निखारे शमत नव्हते. दातांनी ओठांवर रुतून रक्त काढलं होतं.

सगळं जगंच उलटं पालटं होऊन गेलं होतं त्याचं. चालत चालत तो हमरस्त्याला लागला. बराच वेळ चालल्यावर एका झाडाखाली बसला. शारिरीक व मानसिक श्रम इतके जास्त झाले होते की पाहता पाहता तो तिथेच झोपून गेला.

आजीने कसाबसा स्वैपाक करून दिला व ती जायला निघाली. देशमुखबाईंनीही मग तिला अडवले नाही. ती जवळ जवळ धावतच घरी पोहोचली. आजोबा ओसरीतच बसले होते. “काय अनसूयाबाई, लवकर कशा आलात? मला वाटलं संध्याकाळपर्यंत तुम्ही येणार नाही दोघं.”

“आनंदा कुठाय?”आजींनी धास्तावून विचारलं.

“कुठाय म्हणजे? तुमच्याबरोबर नाही का नेलंत त्याला?”

“घरी नाही आला?”

“काय झालं अनुसूये?”

अनुसूयाबाईंनी सर्व वृतांत सांगितला आणि आजोबांच्या चेहऱ्यावरचे भाव भराभर बदलत गेले.

ते झटकन पायात चपला सरकवून निघाले.

“अहो, तुम्ही कुठे निघालात?”

“तू घरीच थांब. कुठेही जाऊ नकोस. मी बघून येतो आनंदास.” एवढेच बोलून ते बाहेर पडले.

आजी मट्कन ओट्यावर बसली! “काय होऊन बसलं हे! देवा माझ्या नातवाला सुखरुप परत पाठव!”

आजोबा प्रथम शाळेत गेले, आनंदा शाळेत नव्हताच, तिथे ते प्रदीपला भेटले. त्याने तो पळत देशमुखांच्या घरातून बाहेर पडला, मी पाठलाग केला पण तोपर्यंत तो दिसेनासाच झाला होता असे सांगितले. मग ते तळ्याकाठी गेले, ती एक जागा होती जी आनंदला फार आवडे. तळे भरलेलेही होते आता पाण्याने. तिथेही तो नव्हताच.

‘कुठे शोधावे याला?’

त्यांनी संपूर्ण गाव पालथा घातला. आज आभाळही स्वच्छ होतं, त्यामुळे उन बऱ्यापैकी होतं. पोटात बऱ्याच वेळापासून अन्नं नाही, म्हाताऱ्या जीवाला कलकलल्यासारखं झालं. पण मन गप्पं बसू देईना. तिथेच पाणपोईवर थोडं पाणी पिऊन निघाले. बस स्टॅंडवरही पाहून झालं. कुठेच आनंदाचा पत्ता नव्हता.

त्यांचा जीव घाबरा झाला. 'कुठे असेल हा?'

'पोलीसात तक्रार करावी काय?'

विचार करत घराकडे परत निघाले तेवढ्यात दिवाण पतीपत्नी देशमुखांकडूनच परतताना भेटले.

"सर, कुठे निघालात उन्हाचे? बसा गाडीत, सोडतो तुम्हाला."

आजोबा क्षणभर विचारात पडले. पण मग त्यांनी सगळा वृतांत दिवाणांना सांगितला. मुलं परस्पर देशमुखांकडूनच शाळेत गेल्याने यांना काहीच माहीत नव्हते.

"बसा बसा गाडीत, हिला घरी सोडू, आणि मग शोधू!"

आजोबांना फार मोठा आधार मिळाल्यासारखं वाटलं. दिवाण बाई घरी पोहोचल्यावर म्हणाल्या, थांबा जरा दोन मिनिटे, मग आतून थोडी फळे, पाणी घेऊन आल्या."सर तुमचं जेवण नसेल झालं, खाऊन घ्या गाडीतच.शक्ती पुरायला हवी."मग दिवाण व आजोबा गावातून बरेच फिरले.

गावाबाहेर टेकडीवरचे मंदिर, वगैरे सर्व पाहून झाले. कुठेही पत्ता नव्हता आनंदाचा.

“सर, पोलिसांची मदत घ्यावी लागेलसं दिसतं. फोटो आहे का एखादा आनंदाचा?”

आजोबांना जमीन खचल्यासारखी वाटली.

‘व्याहांचं पोर शेवटी,कळवावं तर लागणारच. काय उत्तर द्यायचं? कुठे असेल आनंदा? मनस्वी आहे पोर, रागाचं भान नाही राहत!’

मग दिवाणांनी गाडी पोलीस स्टेशनकडे वळवली. पोलिस म्हणाले ‘२४ तासांनी पक्की नोंद होईल. पण आम्ही इतर जवळपासच्या गावात कळवून ठेवतो. काही कळलं तर कळवतो. फोटो द्या त्याचा.’आजोबा म्हणाले आणून देतो. आत्ता बरोबर नाही. दिवाण म्हणाले हमरस्त्यावर जरा पुढेपर्यंत पाहून येऊ या!

——

आनंदाला जाग आली तेव्हा संध्याकाळ होत आली होती. तो ऊठून बसला. त्याला काही कळेना आपण कुठे आहोत. आसपास नजर टाकली तेव्हा दूरदूरपर्यंत सडकेशिवाय काहीच दिसत नव्हतं.

आभाळ ढगांनी गच्चं भरून आलेलं. कोणत्याही क्षणी पाऊस कोसळू लागणार होता.

अचानक त्याला सगळं आठवलं. “आजी मला चोर म्हणाली! रक्त सळसळत मेंदूत शिरलं. त्याचवेळी पोटातल्या भुकेने उसळी मारली. आनंद उठून उभा राहिला व मट्कन खाली बसला. “आई....!” दुपारच्या उन्हात डांबरी सडकेवर चालून त्याच्या तळपायांना टरटरून फोड आले होते. त्याचे डोळे आणि आभाळ एकदमच कोसळू लागले. ढगांच्या गडगडाटाबरोबर त्याचं हुंदक्यांनी गदगदणारं शरीर पाहायला तिथे कोणीही नव्हतं. थोड्याच वेळात फांद्यांच्या छत्रीतूनही पाऊस खाली गळून आनंदाला चिंब भिजवू लागला. आनंदा उठून झाडाच्या खोडाला घट्ट धरून उभा राहिला. बाहेरच्या आणि आतल्या घोंगावणाऱ्या वादळात जणू तो एकमेव आधार होता. रस्त्यावरून एखादं वाहन जात होतं.पण तो झाडाचा आधार सोडून जाणं आनंदाला जमेना. तो तिथेच बराच वेळ तसाच उभा राहिला. हळू हळू अंधार पडत गेला. रात्रीचा काळा रंग, संपूर्ण काळा, निळ्याची जराही छटा नसलेला, आसमंतात व्यापून उरला. संताप, दु:ख, वेदना,भूक,भय, सगळेच काळ्या रंगात रंगून डोळ्यात घुसून राहिले. रातकिड्यांची किर्रर्र, घुबडांचे घुत्कार, आसपास सरपटणाऱ्या सरड्यांची सरसर, आणि वाऱ्याबरोबर होणारी पानांची गूढ सळसळ! एवढीच काय ती जीवंतपणाची खूण!

बाकी सगळं अंधाराने गीळून टाकलेलं. नखशिखांत भिजलेलं थरथरतं शरीर आणि आता केवळ भयाने भरून उरलेलं मन घेऊन आनंदा झाडाच्या खोडाला घट्ट मिठी मारून, रात्रीच्या तीन प्रहरांपर्यंत उभा होता. मग हळू हळू ग्लानी येत गेली, तो खाली कोसळला. त्याची शुद्ध हरपली. पण ती ओली,

काळी, भयाने ओतप्रोत रात्र आनंदाच्या भावजीवनात एका नव्या अध्यायाची नांदी करून गेली. आपण संपूर्णपणे एकटे आहोत, आपण, फक्त आपण, स्वत:साठी जबाबदार आहोत, काय करू, काय नको, हे सांगायलाही कोणी नाही विचारायलाही कोणी नाही! आई, बाबा, आजोबा, आजी, आण्णा, प्रदीप, प्रज्ञा कोणीच इथे नाहीत! ही जाणीव त्या लहानग्या मनात हळूहळू भिनत गेली. शुद्ध हरपता, हरपता, एका नव्या जाणीवेचा, नव्या व्यक्तीमत्वाचा आनंदा, समजाचे बरेच अंतर काही क्षणात पार करत खाली कोसळला!

सकाळ झाली तेव्हा सडकेवरून एक ट्रक आला. त्यातून दोन जोडपी, एक माणसांचे, एक माकडांचे, एक मुलगा, एक मुलगी, एक पोपटाचा पिंजरा, काही बांबू, चाकं, दोरखंडाचं भेंडोळं, वळकट्या, ट्रंका असा अख्खा डोंबाऱ्याचा संसार खाली उतरला. पावसाळ्यात कुठंतरी आसरा घ्यायचा म्हणून ही मंडळी इथे उतरून त्यांच्या मूळ गावात जाणार होती. रस्त्यावरून सगळा पसारा घेऊन ते झाडाखाली आले.

“आये, ह्ये बग, कोन पोरगं झोपलय हितं!”

“आगं बया, आवो धनी, ह्यो बगा वो पोरगा, तापानं जळायलाय! आत्ता वो?”

शंकऱ्या जवळ आला, ते माकडाचं जोडपं पण जवळ आलं. सगळयांनी आनंदाच्या डोक्याला हात लाऊन पाहिला.

“रकमे, चूल कर. ह्येला चा,गी कायतरी पाजू. तरतरी यील मंग बगू कोनाचं पोर हाय!”

रखमानं भराभरा तीन दगडाची चूल पेटवली. आसपास सगळंच ओलं होतं. बाटलीतलं रॉकेल सामानातल्या सूक्या ढलप्यांवर टाकून तिने चहाचं आधण ठेवलं. पोरांनी ट्रंकेतले फुटके कप, पेले, काढले. रात्री घेतलेला पाव तिने सगळयांना चा संगं दिला.शंकरने आनंदाचे कपडे बदलून त्याच्या अंगावर पोराचे, राम्याचे कपडे चढवले होते. वाकळावर त्याला झोपवून तेच वरून पांघरले. रखमाने शंकऱ्याला चा पाव दिला आणि आनंदाला उठवून तिने गरम चहात पाव बुडवून भरवला. ग्लानीतच त्याने तो खाल्ला. मग कप तोंडाशी धरल्यावर त्याने चहा प्याला.

हळू हळू डोळे उघडून त्याने पाहिले. रखमाकडे पाहून त्याच्या तोंडून “आई” असे शब्द बाहेर पडले.

“आता गं बया, प्वार आय म्हनलं वं मला” असं म्हणून तिने त्याच्या कानशिलांवरून मायेने हात फिरवून आपल्या कानांच्यावर बोटं मोडली.

“ये पोरा, कोनाचा तू? हितं का झोपला? आंगात ताप हाय की रं!” शंकऱ्या विचारू लागला.

आनंदा ग्लानीतच होता.

“आवो, तुमी काय गाडीगिडी मिळती काय बगा. पोराला तापात काय कळंना झालय! ह्येला नीऊ आपल्या संगं! बरा जाला जरा की सांगल कोनच्च्या गावचा त्ये. मंग बगू, कसा निऊन सोडायचा ते.”

मग शंकऱ्या काही वाहनाची सोय होते का पाहायला गेला. पोरं, माकडं, पोपट, आणि आनंद सगळेच झोपले. रखमा सामान आणि कुटुंब राखत बसली.

काही वेळाने त्यांच्या गावात जाणारा टेंपो मिळाला. त्यात बरंच सामान होतं, त्यातच या सगळ्या लटांबराला बसवून टेंपोवाला निघाला. शंकऱ्या पुढे डायवर संगं बसला.

काल रात्री अगदी एकट्या असणाऱ्या आनंदाबरोबर आज एक भुकेकंगाल पण मनाने आणि संख्येनेही फार मोठं कुटुंब होतं.

---

आजोबा विखुरल्या मनाने घरी आले. फोटो घेऊन पोलिसांना देऊन आले.

अनसूया बाईंनी देव पाण्यात ठेवले होते. आजोबांना पाहून त्या धावत बाहेर आल्या. आजोबा ओसरीत बसले हरून बसल्यासारखे. त्या क्षणभर पाहतच राहिल्या. मग पुढे होऊन पाय धरले त्यांनी आजोबांचे!

“अहो, काय करताय? माझे पाय धरून काय उपयोग? आता व्याहांना काय उत्तर द्यायचं? त्यांचे पाय धरूनही माफी मिळायची नाही. ते अजाण पोर

कुठे असेल? काय करत असेल? विचार करकरून डोकं फुटायची वेळ आली माझी.”

“चुकले हो मी! सुरवातीला संशय होता माझ्या मनात, पण नंतर तो फिटला! मी देशमुखबाईंना माझा संशय बोलून दाखवायला नको होता. पण तुमच्यासमोर बोलायची शामत नव्हती आणि मनातला संशय गप्पं बसू देत नव्हता.”

“आता परमेश्वराचाच काय तो आधार!”

आजोबा परत चपला अडकवून निघाले. “शोधतो जाऊन परत.”

“मी पण येते.”

“नको नको, आता २४ तास घर उघडं राहायला हवं. आनंदा परत येईल तेव्हा घर उघडं हवं!”

आजोबा परत निघाले. ते तडक तळ्याकाठी आले. त्यांच्या मनात आता नाना शंका येऊ लागल्या होत्या. ‘आनंदाने काही जीवाचं बरंवाईट?”

नितळ तळ्याचं पाणी पाहून त्यांना बरं वाटलं. सगळं ठीक होईल असं आतून वाटलं! पण कसं? पोर नजरेला पडेपर्यंत काही खरं नव्हतं.

ते तसेच उठले व पोस्ट ऑफिसमधे गेले. त्यांनी रामनगरला तार केली. “आनंद हरवला आहे, शोध घेत आहोत, पोलिसांत कळवले आहे.”

तार मिळताच घरी हाहा:कार उडाला.

अनंता व अनुराधा तातडीने निघाले.

१.११

टेंपो एकदाचा गावात शिरला. शंकऱ्याचं मातीचं घर होतं बांधलेलं. त्यानं आणि त्याच्या बा नं बांधलेलं.

आता पार पडायला झालेलं. पण पावसाळ्यात त्याचा मोठा आधार होता.

सामान आणि लटांबर उतरवून टेंपोवाला गेला.

शंकरने आनंदाला उचलूनच घरात आणले. दाराशीच वाकळावर झोपवले.

रखमा भराभर कामाला लागली. तिने घर झाडून स्वच्छ केले. मग रखमा व शंकरने बरोबर आणलेले प्लास्टीक छपरावर पसरले. शंकरने ते छतावर चढून नीट बांधून काढले. आता एवढा पावसाळा तरी आत पावसापासून संरक्षण मिळणार होते.

मग रखमाने जुनीच चूल लिंपून घेतली. आजचा दिवस वाळायला हवी.

परत तीन दगडांच्या चुलीवर डाळ चढवली आणि ती भाकऱ्या थापायला लागली.

जेवणं करून पोरं, माकड जोडपं, शंकऱ्या सगळेच जागा करून पसरले. रखमेनं आनंदाला उठवला. ताप बराच कमी होता आता. घामही आलेला. त्याला डाळ भाकरीचा पहिला घास भरवला आणि त्या तिखट

जाळ पाण्याने त्याला ठसका लागला. पटकन तिने पाण्याचा ग्लास त्याच्या तोंडाला लावला.

मग तिने नुसतीच भाकरी भरवली थोडी.

जेवून आनंदा परत झोपला. रखमाही मग आडवी झाली.

जरा वेळाने आनंदाला जाग आली. तो उठून बसला पण त्याला काही कळेचना. मग कोपऱ्यात माकडं दिसली झोपलेली. हळू हळू नजर फिरली.

कोण आहेत ही माणसं? आपण इथे कसे? काही आठवेचना! तो परत वाकळावर आडवा झाला.

संध्याकाळ उलटून रात्र झाली. परत आनंदाला जाग आली. तेव्हाही सगळे झोपलेलेच दिसले.

सकाळी सगळे उठले तेव्हा आनंदा जागाच होता. ताप नव्हता. पोटात भूकेचा डोंब उसळला होता. चहा, कालची उरलेली भाकरी सर्वांनी खाल्ली. आनंदलाही एक तुकडा मिळाला. शंकर म्हणाला, कोनाचा रे तू? गाव कोनचं?

आनंदा ओठावर दात दाबून गप्प!

“आरं बोल की कायतर! काय मुका बिका हायस काय?”

तरी आनंदा काही बोलला नाही. “खायाला तोंड उचकटतय न्हवं मंग बोलाया काय धाड भरली म्हंतो म्या?”

“आवो,आता राव द्या! आदी लाकूड फाट्याचं बगू! खेळ बी करू.”

डोंबाऱ्याचं कुटुंब बाहेर पडून लाकूड फाटा गोळा करू लागलं. आनंदा बसून राहिला. मग हळू हळू मागून निघाला. तसं तर सगळंच ओलं होतं आता. पण कुठे पडक्या घराचे वासे, काटक्या, तुटलेल्या फांद्या, मिळेल ते गोळा करत सुटले. प्लास्टीक वगैरेही गोळा करत होती पोरं.

मग सरळ चौघे माकडांना घेऊन गावात शिरले हातातला डमरू वाजवत शंकऱ्याने खेळ सुरू केला. आनंदा रखमाजवळ येऊन बसला. आवाजाने पोरं सोरं जमा होऊ लागले. काही बाप्ये, नदीवरून, शेतावरून परतणाऱ्या बाया, सगळेच गोळा झाले.

"ए लच्छमी, मुजरा दिखायेगी क्या? लच्छमी ने मस्त मुरका मारला व ती रुसून बसली? जमूरे, काय जालं? लच्छमी क्यों खंफा रे?" राम्या पुढं आला ॲक्शन करत म्हणाला, "तिला नवी चोळी हवी म्हनं!"

"आता पैका कुटय रं चोळीला? मुजरा दिखायेगी तो टोपीवाला पावना खूश होंगा,पैका देंगा,देशीला का न्हाय पावनं?" लच्छमी मान वेळावून पाव्हण्याकडं पाहू लागली. पोरं सोरं आणि तो पाव्हणा सगळेच हसू लागले.

पाहता पाहता खेळ रंगात आला. पोरगी चंदा आता चाकावर फिरू लागली. राम्या व शंकऱ्याने तीन तीन बांबू रोवून दोरखंड आवळला. रखमा त्यावर चढून चालू लागली.आनंदा धास्तावून पाहू लागला.

सगळा खेळ संपल्यावर सगळ्यांनी थाळी टोपी फिरवली. निम्मी गर्दी लगेचच काढता पाय घेत पांगली. काही जणानी नाणी टाकली एखादा चुकार रुपाया, एखादी हिरवी पाचाची नोट!

तासभर जीवावर उदार झाल्यावर जेमतेम पंधरा रुपये जमले. पण तेवढे तर तेवढे! पावसाने ओढ दिलीय म्हणून, नाहीतर ह्ये बी नसते गावले!

मग सगळे बसले तिथंच चा च्या टपरीवर.

रखमा आल्यासरशी गावात “गोधडी शिवायची काय गोधडी” अशी हाळी दोन चार गल्ल्यातून देऊन आली.

आनंदा तिच्या पाठोपाठ गेला. चक्कं एका घरातून बोलावणंही आलं.

“देती का माय साडी कापडं? म्या घरून आनत्ये शिवून?”

“इथं बसून शिवत असलीस तर देते. घरबीर कुठलं? जाशील पळून मग?”

“बर, बर, उंद्या सकाळी येत्ये मंग! मलाच द्या बरंका शिवायला. दुसऱ्या कोनाला दिऊ नगा बगा!” रखमाने

फार प्रेमाने सांगितले विनवून त्या बाईला. ती परत आली. आल्याबरोबर तिने पाहिलं तर तो पोरगा नाय! “आवो कुटं ग्येलं त्ये पोर?”

“तुज्या मागंच ग्येलं न्हवं काय?”

ऑ? ती परत मागे वळून जाऊ लागली!

“अगं जाऊ द्ये! पीडा ग्येली. ते तोंड कुटं भागवनार हुतीस? आदीच हाता तोंडाची गाट पडन्याची जालीय मुश्किली!”

रखमा चीडून काहीतरी बोलणार होती तेवढ्यात आनंदा पाय ओढत येताना दिसला तिला.

“दोन चा दे रं बाबा, आनि योक पाव पन दे. तिकडं पल्याड बसतु जरा तितं दे,” तिने गपचूप शंकऱ्याकडे बोट दाखवून चहावाल्याला खूण केली. मग अशीच जरा लांब जाऊन बसली. आनंदा तिच्याजवळ बसला. तिने लपवून पाव दिला त्याला. “खा बाबा, आजारातून उटलास बरं वाटंल जीवाला. आनि नाव गांव सांग काई!”आनंदा नुसता पाहत राहिला.मग ती काहीच बोलली नाही. चहा पिऊन झाल्यावर म्हणाली, “शंकऱ्या गप हाय तोवर बोल बाबा, डोस्कंफिरलं मंग लाता घालाया बी कमी न्हाय करायचा.”

मुर्दाड मनाने आनंदा ऐकत राहिला. जणू शब्द पोहोचतच नव्हते त्याच्यापर्यंत.

सगळे घरी आले. मग जेवणं झाल्यावर शंकऱ्याने माकडांना नवे खेळ शिकवायला सुरवात केली. चंदा चक्रावर फिरू लागली. रखमाने भांडी घासायला घेतली, आनंदाने न बोलता तिला ओढ्यातून पाणी आणून दिले. मग तो भांडी विसळू लागला.

नंतर त्याने मगाशी आणून टाकलेला लाकूड फाटा, काटक्या, प्लास्टीक सगळं वेगवेगळं करून रचून ठेवलं.

शंकर मग बाहेर पडला. राम्या व चंदा बाहेर खेळत होती. आनंदा त्यांच्याजवळ जाऊन बसला.

“नाव काय रं तुजं? माजं राम्या न् ही चंदी.”

“आनंद”

“आणंद! लय झ्याक नाव.”

“चंदा, तू चाकावरून पडत नाहीस?”

“हाहां, पडती कशाला रं? तुला शिकवू काय?”आनंदने मान हलवली. तिने सायकलच्या चाकाचा सांगाडा आणला व त्यावर एक पाय वर एक खाली ठेवून तिने वरच्या पायावर जोर देत चक्राला गती दिली.दोन्ही पायांच्या मदतीने ती चक्र चालवू लागली व हातांनी जमतील तशा नाचाच्या ॲक्शन करू लागली. वयाने ती आनंदाएवढीच असावी, राम लहान होता.मग तिने आनंदला चाक दिले, पाय कुठे ठेवायचे, कसा जोर द्यायचा, बॅलन्स कसा ठेवायचा हे जमेल तसं तिने समजावलं. आनंद चाकावर चढला व दुसऱ्याच क्षणी आपटला खाली. पोरं हसली तशी माकडंही टाळ्या पिटून हसली, मग पोपटही पिंजऱ्यातून ओरडला. जमिनीवरून उठत आनंदा परत जास्त रागाने चाकावर चढला आणि दुप्पट जोरात आपटला. यावेळी उठताना त्याचा हात नकळत कुल्ल्यांवर गेला. नर माकडाने त्याची हुबेहूब नक्कल केली. ती पाहून सगळयांबरोबर आनंदालाही हसू फुटलं. स्वत:च्या दोषांवर हसण्याचा नवा धडा आज तो माकडाकडून शिकला.

रात्र पडेपर्यंत आनंदाला चाकावर काहीवेळ स्थीर उभा राहायला जमलं. माकडासकट सर्वांनी टाळ्या पिटल्या.

मग अचानक पोपट जोरात पिंजऱ्यात चिरकला आणि माकड व पोरं पाहता पाहता नाहिशी झाली. आनंदला काहीच कळलं नाही. तो चाक हातात धरून तसाच गोंधळून उभा राहिला.

अचानक समोरून शंकऱ्या हेलपाटत येताना त्याला दिसला. काही कळायच्या आत मागून कोणीतरी त्याला खेचले व ओढत लाकडांच्या मागे नेले. पाहतो तर नर माकडाने ओढले होते त्याला.

“रखमे....” शंकऱ्या भेसूर आवाजात ओरडला. “भाकर बिकर काय देती का आता? का घालू एक लात?” आनंदा परत उठायला गेला पण माकडाने त्याला घट्ट पकडून ठेवले होते.

रखमाने ताट वाढून समोर ठेवले. संपेल तसं ती वाढत राहिली. शंकऱ्या खात राहिला. मग तशाच खरकट्या हातांने त्याने रखमाला जवळ खेचली.

“आवं, पोरं हाईत की जागी...”

पण त्याला कशाचीच शुद्ध नव्हती. एक भूक भागली होती, दुसरी चेतली होती. ती ही भूक भागवून तो तिथंच घोरत पडला.

रखमाने उठून साडी चोळी आवरली. शंकरच्या अर्ध्या उघड्या आंगावर वाकळ टाकून ती आत गेली. काही वेळाने माकडाने पोरांना मोकळे सोडले. चंदा, राम व माकडे आवाज न करता रखमाकडे गेली. आनंदा बाहेर

येऊन शंकऱ्याकडे पाहू लागला. त्याला नीटसे कळले नसले तरी अगदीच काही कळले नाही असेही नव्हते.

मग तो आत गेला. सगळयांबरोबर ताट घेऊन बसला. रखमाने परत पीठ मळून भाकऱ्या थापायला सुरवात केली होती. पोरांची पोटं भरत होती.

---

दुसरे दिवशी सकाळीच रखमाने भाकऱ्या बडवून ठेवल्या व ती चंदाला घेऊन निघाली. तिने जाड दोरे, कात्री, दाभण असं सगळं साहित्य घेतलं. ती निघाली तशी आनंदही मागोमाग निघाला. ती काहीच बोलली नाही. कालच्या घरासमोर येऊन तिने हाळी दिली. “माय आली बग, द्ये कापडं गिपडं, द्येते गोधडी शिवून बिगी बिगी.”

कालची बाई वाटच पाहत असावी. तिने लुगडी, जून्या चादरी, पलंगपोस आणून टाकले समोर. रखमा कामाला लागली. तिने मऊ लुगड्याला पसरलं, त्यावर चादर, वरून लुगड्याची दुसरा पदर. मग तिने दाभणात दोरा ओवला, एक दाभण चंदाच्या हातात दिला, “घे शिवून माजी बाय ते बाजूनी.”

“ए आय, म्या न्हाय शिवायची. दाभण घुसतय बोटात माज्या!”

“आता गं, राजाची रानी! शीव गुमान सांगत्ये तुला.” असं म्हणून ती या पोरांकडे पाठ करून बसली व दुसरी बाजू धावदोरा घालून शिवू लागली. आनंदने चंदाने टाकलेला दाभण उचलला. अरे यानेच तर आपण वह्या

शिवलेल्या. अचानक आजोबा आठवले. डोळे भरून आले. पाठोपाठ आजी आठवली. नजर क्रुद्ध झाली. मग त्याने त्वेषाने शिवायला सुरवात केली. अंगभूत सुबकपणा कामी आला. पाहता पाहता चारी बाजू दोघांनी मिळून शिवल्या. चंदा पाहत होती. 'बरं जालं ह्ये पोरगं आलं संगं, नायतर मलाच त्यो दाभण घिऊन बसायची येळ हुती!'

रखमा त्याचा सुबक हात पाहून चकित झाली. पण काही बोलली नाही. पाहता पाहता तासाभरात दोन गोधड्या शिवून झाल्या. काही तुकडे उरले. मगाशी त्या बाईच्या कडेवर एक बाळ होतं. आनंदाला काही सुचलं. त्याने ते तुकडे एक एक मांडून ठेवले. मग जवळ पडलेल्या कोळशाने त्यावर मासे, पक्षी रेखाटले. कात्रीने आकार कापून मग त्या पलंगपोसाच्या उरलेल्या तुकड्यावर ठेवले. रखमा पाहत होतीच. तिने भराभर मग ते जोडायला सुरवात केली. छोटी चित्रवाली गोधडी पाहता पाहता तयार झाली. ती बाई बेहद्द खुश झाली ते पाहून. पैसे देताना रुपया वर दिला. मग पोरांना घरातलं उरलं सुरलंही दिलं. आनंदाचा घास खाली उतरेना. त्याने गरिबी पाहिली होती पण लाचारीशी ओळख प्रथमच होत होती. त्याने सगळं खायचं चंदापुढे केलं. ती आश्चर्यचकित होऊन 'काय येडा आहे' असं पाहू लागली त्याच्याकडे.

तेवढ्यात घरचा धनी कुठूनसा आला. या सर्वांना पाहून त्याचं माथं भडकलं. "ए, चला फुटा इथून!" त्याने हाकललंच!

“काय अक्कल बिक्कल आहे का नाही? ही जातच असली! दिवसा कामाच्या निमित्त्याने येऊन घरदार पाहून जायचं नि रात्री टाकायचे दरोडे! ए, निघताय का देऊ पोलिसात? काय रे डोळे वटारून कोणाला दाखवतो? आं! घालू काय चार लाथा तुला? चला निघा ताबडतोब!” रखमाने आनंदाला मागे ओढले व ती दोन्ही पोरांना घेऊन निघाली.

आनंदाच्या अंगाची लाही लाही होत होती. “तुला राग येत नाही? ते तुला दरोडेखोर म्हणाले?”

तो ओरडून रखमेला म्हणाला. रखमा क्षणभर पाहत राहिली! तिने त्याच्या डोक्यावरून हात फिरवला. “आरं पोरा, तू का कावलास येवडा? ह्ये बग, येकतर त्यो बाप्या म्हनला म्हनून काय

आपन दरोडेखूर जालो काय? न्हाय न्हवं? आनी तेची बी काय चुकी न्हाय रं, हाईत आमच्या डोंबाऱ्यात आसली मानसं! बातम पोचिवतात, रास्ता सांगत्यात, घरात मानसं किती समदी बातम कळवत्यात!

पन आपन मनावर घीऊ न्हाय! गरीब मानसानं रुबाब क्येला तर मौतच मिळती रं! आपन आपल्या मनाला कोयंडा कुंडी लावूनशान ठिवावी बग! काय बी पोचू दिवू न्हाय वंगाळ तेच्यापोत्तर! धेनात ठीव लेकरा! धेनात ठीव!” आनंदाला या नव्या आयनं नवा धडा दिला! आपल्याच विचारांत मग्न आनंदा या दोघींच्या पाठोपाठ निघाला. “कोणी काही बोललं तर शब्द लक्षात घेऊ नकोस, त्यामागचं कारण शोध!” आजोबांचे शब्द व त्यापाठोपाठ आजोबांची अतोनात आठवण आनंदाला बेचैन करू लागली.

घरी आले तेव्हा अंगणात शंकऱ्या माकडांना आणि राम्याला खेळ शिकवत होता.

यांना पाहिल्यावर त्याने आनंदाला जवळ येण्याची खूण केली. रखमेच्या पोटात गोळा आला.आनंद शंकरसमोर जाऊन उभा राहिला.

“नाव काय तुजं?

“आनंद”

गाव?

“.........”

शंकऱ्या उठला मग जागेवरून!

“सांगतो का आता? हितं फुकट भाकर या जनावरास्नी बी न्हाय घालत म्या!”

“फुकट नाही खाणार!”

“मंग काय करनार? मोटा हापिसात अफसर करनार काय तुला?”

“मेहनत करणार तुमच्या बरोबर!”

“तुला काय येतय रं? म्हेनत करनार म्हनं!”

“बा, आज तेनं लय झाक गोधडी शिवली! ती बाय लय खूश झालती.” चंदा पट्कन पुढे होत बोलली.

“मला चित्र पण येतात काढायला. बोर्ड रंगवायची कामं करू आपण! आत्ता रस्त्यात दोघं रंगवत होते. त्यांच्यापेक्षा चांगले रंगवीन मी.” आईला मदत करेन घरात!” शंकऱ्याचे डोळे बारीक झाले! “काय रं, कुटं काय चोरीमारी करून तर नाय पळून आलास न्हवं?” आनंदाचा चेहरा लालबूंद झाला! रखमा पुढे आली. “आवो का वंगाळ बोलायलाय? तापानं तळमळत हुता आपल्याला गावला तवा!”

“मंग घरी जायाला न्हाय का म्हनतोय?” रखमालाही हे कोडं उलगडत नव्हतंच! ती जवळ आली. आनंदाच्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाली, “थोऱ्या मोट्यांचा वाण दिसतू तुज्यात! का आमा भणंगांबरूबर आयुक्ष वाया घालवायलास? तुज्या गावाचं, बाचं नाव सांग, आमी निऊन सोडू तुला. तुजी माय बी तितं रडून ऱ्हायली आसंल लेकरा!” आनंदाचा चेहरा अचानक बदलला. डोळे डबडबून गेले. ‘आई...... काय वाटलं असेल तिला?’ तो फार फार अस्वस्थ झाला. पण काहीच बोलला नाही.मग शंकऱ्याही पुढे काही बोलला नाही.

दिवस असाच गेला. आनंदा रखमाला मदत करत राह्यला. तिने घरातल्या गोधड्या शिवायला घेतल्या त्याही तिच्या बरोबरीने शिवल्या त्याने. संध्याकाळी शंकऱ्या कुठूनसा पत्रा घेऊन आला. त्याने लाकडांवर खिळे ठोकून साधारणसा बोर्ड बनवला. रंग ही काढले पिशवीतून. मग म्हणाला “आपल्या खेळाचा बनीव बोर्ड!”

आनंदाने आधी कोळशाने चित्र काढली खालच्या भागात. माकड माकडीण, पोपट, सायकल चालवणारी चंदा, उंच टोपितला शंकऱ्या आणि राम्या, मग तीन तीन बांबू त्यांना बांधलेली दोरी, आणि त्यावर चालणारी रखमा! मस्त जमली चित्र.

नाव काय तुमच्या खेळाचं?

“ऑ? नाव आसतं व्हय? नाव? लिव “डोंबाऱ्याचा खेळ””

“चांगलं काहीतरी सांगा नाव!”

“चांगलं? तुच सांग की.”

“शंकर रखमा डोंबारी पार्टी!”आनंदाने असाच काहीसा बोर्ड वाचल्याचं आठवलं त्याला.

“हां, ह्ये बेश हाय बग! शंकर रकमा डोंबारी पार्टी! हां, लय भारी!” जाम खुश झाला शंकर!

मग आनंदने चार रेघा आखून नाव लिहून रंगवलं लाल अक्षरांत!

मग खालची चित्रही रंगवून झाली. आमाला बी बगू द्या की, म्हणून दोन्ही पोरं कालवा करून ऱ्हायली तशी आनंदा बोर्ड समोरून बाजूला झाला. मस्तच दिसत होता बोर्ड रंगीबेरंगी चित्रांनी सजलेला. पोरांनी टाळ्या पिटल्या. रखमानं बोटं मोडली. माकडं जवळ जाऊ लागली तशी आनंद म्हणाला “वाळायला हवा, हात लावू नका.” लगेच मागे झाली. पण टकमक पाहत राहिली. स्वत:ची चित्र त्यांनाही आवडून गेली. त्या दिवशी शंकर

बाजारातून इमरती घेऊन आला. गोडाचं जेवण, पोरं तुटून पडली. आनंदाचा घास मात्र आज घशाखाली उतरेना! 'आजोबा काय करत असतील? आपल्यावर रागावले असतील.'कसंबसं भाकरी खाऊन तो उठला. रात्री पोरं झोपल्यावर शंकर रखमाला म्हणाला, "ऱ्हात आसल तर ऱ्हाव दे संगं तेला. पोरगं कामाचं हाय!"

"माझा नातू नाही हो असं काही करणार! विश्वास ठेवा माझ्यावर! पदर पसरते, नका मारू त्याला."

आजी रडत रडत विनवणी करत होती.

"पण तुमचा तरी आहे का विश्वास तुमच्या नातवावर? चांदीची मूर्ती चोरताना तुम्हीच पाहिलात ना?"

"नाही हो! नाही चोरली त्याने. माझाच गैरसमज झाला होता."

"उगाच आता सारवा सारव करू नका नातवाला वाचवायला."

"नाही हो खरंच सांगतेय. सोडा त्याला. कृपा करा माझ्यावर."

आनंदा दचकून जागा झाला. घामाने थबथबलं होतं शरीर. त्याने एक जोरात हिसडा दिला. त्याला अजूनही कोणीतरी धरून ठेवल्याची भावना होती. मग हळू हळू त्याला पूर्ण जाग आली. त्यादिवशी बधीर झालेल्या मेंदूने ज्याची फक्त नोंद केली होती ती घटना स्वप्नात रिप्ले झाली होती.मग हळू हळू मन मेळ घालू लागलं. विचार शृंखला सुरू झाली मनात. देवपूजा

आठवली. आजीचं अचानक ओरडणं, त्याचं दचकणं, देव्हाऱ्यात सापडलेले पैसे, आजीचं बदललेलं वागणं...... त्या लहानग्या मनात हलकल्लोळ माजला. धड सुसुत्रता नव्हती विचारात पण त्यादिवशीच्या घटनेतलं सुटून गेलेलं काहीतरी जास्तीचं स्वप्नाने समोर आणलं होतं.

आनंदा मग विचारात गुरफटून गेला. पार रामनगरपासूनचे दिवस आठवू लागले त्याला.

शाळेतली अवहेलना, घरातल्यांनी केलेली उपेक्षा,आईचं सतत डोळ्याला पदर लावणं, त्याचं कोडगं होत जाणं, बाबांनी दिलेला मार, फाडलेले पडदे, आजी आजोबांबरोबर चिंचवडीत येणं. हळू हळू होत गेलेले चांगले बदल. मिळालेले मित्र, शाळेत झालेलं कौतुक. आजीचं प्रेमाने जेवू घालणं! ‘आजीने पुर्वी कधी बोललेले शब्द त्यादिवशी अचानक समोर आले. त्या लोकांनी चोर म्हणून झडती घेतली. मी ताईच्या खोलीत गेलोच नसतो तर हा प्रश्नच आला नसता. चुकून का होईना आपलं जाणंच कारणीभूत ठरलं ना सगळ्याला.

आजोबांची शिकवण विसरलो आपण. शब्द नाही कारण बघ. आजीला आपण ती मुर्ती देव्हाऱ्यात न ठेवता खिशात ठेवून लंपास करणार असं वाटलं का? मग ते सापडलेले पैसे आपण परत केले तेव्हा विश्वास वाढला. मग तिचं वागणं बदललं आपल्याशी. अलिकडे आजोबांपेक्षा तिच लाड करायची आपले.’

एक एक विचार आनंदाला अस्वस्थ करत गेला. ‘सकाळी उठल्यावर सांगू यांना, मग नेऊन सोडतील. घरी परत पहिल्यासारखे सगळे रागवू लागतील, मारू लागतील. परत रामनगरला घेऊन जातील. आई निराश झाली असेल का? प्रदीप, प्रज्ञा खेळणार नाहीत आपल्याशी. बोलणारही नाहीत. त्यांची आई सांगेल आणू नका या पळून गेलेल्या मुलाला आमच्या घरी.’ आनंदाच्या डोक्यात वादळ उठलं. मोहोळ उठावं तसं. नकारात्मक विचार परत परत डोकं वर काढू लागले. सकारात्मक विचार आपला जोर लावू पाहत तेवढ्यात नकारात्मक विचार भिववू लागत.

‘नको ती परत उपेक्षा, बोलणी, रागावणी.’

‘आज शंकऱ्याही मारेल असं वाटत होतं. पण नाही मारलं.’ डोकं भणभणून गेलं. आनंद उठला. बाहेर आला. रंग, ब्रश दिसले. त्याने भराभरा ते उचलले. कागद नव्हते. मग समोरची भिंतच दिसली. झुंजू मुंजू प्रकाशात त्याने रंगवायला सुरवात केली. पाहता पाहता स्वत:चाच आयुष्यपट तयार झाला समोर.

लहान मुलाचा हात, पण हातातली कला जाणकाराला स्पष्ट जाणवली असती.

सकाळी शंकऱ्याने लाकडाने मारला आनंदाला.

“रंग काय तुज्या बापाने पाटवले काय रे भो....!” “पैशे काय झाडावर लागत्यात काय? मर मर मरून आमी पैशे जमवतू, आन् तू कर असा खुर्दा!

रकमे, खबरदार आज याला काय खायाला दिशील तर! चल माज्यासंगं! हमाली कर धा दिस, मंग फिटत्याल ह्ये रंगाचे पैशे! समजला काय?"

आनंदा रडत होता, पण तोंडातून ब्र काढला नाही. एकेक फटका वर्मी बसत होता.

मारणाऱ्याला मारण्याचा आनंद तेव्हा खऱ्या अर्थाने मिळतो जेव्हा समोरचा विव्हळतो, ओरडतो.

आनंदने तो आनंद शंकऱ्याला मुळीच मिळू दिला नाही.

शेवटी कंटाळून त्याने लाकूड फेकले. रखमेलाही फटके बसले जेव्हा ती मधे आली.

"तुला सांगतू रकमे, ह्ये पोरगं तुला मला घिऊन बुडनार! ह्यो दिसतो तसा सादा न्हाय! लय तयारीचा हाय! कुटतरी मुडदा बी पाडून आला आसंल! हाकल त्येला घरातून न्हायतर पस्तावा व्हनार सांगून ठीवतो!"

"जाणारच आहे मी! पण तुमचे पैसे फेडून! किती रुपयांचा होता रंग?" परत शंकर आंगावर धावून गेला तेव्हा आनंदाने लाकूड घेतले हातात!

"पैशासाठी मारायचं नाही. पैसे देऊनच जाईन मी!" शंकर अविश्वासाने पाहत राहिला.

आनंदा उठला, त्याने ते रंग, ब्रश, घेतले, घरात जाऊन दोन जुनी फडकी घेतली आणि तो निघाला. त्याला अडवण्याची कोणालाच हिम्मत झाली नाही.

आनंदाचं बाल्य संपलं! पैसे कसे मिळवावे या विचाराने त्याला ग्रासलं. या जगात फुकट काहीच मिळत नाही ही जाणीव मूळ धरून आली. तो, काल जिथे दोघं बोर्ड रंगवत उभे होते, तिथे पोहोचला. याच्या हातात रंगाच साहित्य पाहून ते धावून आले अंगावर. आधीच लहान गावात काम कितीसं मिळणार? आणि त्यात हा वाटेकरी. आनंदाचं बखोटं धरलं एकाने. "ए, कोन रं तू? हितं यायाचं न्हाय कामाला."

"तुम्हाला मदत करेन. नवं काम नाही घेणार."

"येतं काय तुला?"

"करून घेऊन बघा."

"बर, पैका किती घेणार?"

"तुम्ही काम तर बघा."

"बर, लितावाचता येतं काय?" आनंदाने मान हलवली.

रंगाऱ्याने मजकुराचा कागद हातात दिला, एक साडीतल्या बाईचं चित्र. साडीच्या दुकानाचीच जाहिरात होती.

"बोर्ड खराब न्हाय करायचा हां!"

आनंदा कामाला लागला. बेस कलर लावून झालाच होता. कच्ची चित्र, अक्षरं, लिहून मग त्याने रंगकाम करायला सुरवात केली. नकळत पाहता पाहता साडीतली बाई, आई सारखी दिसू लागली. दुपार ढळता ढळता बोर्ड रंगवून पूर्ण झाला. सुबक अक्षरं पाहून रंगारी खूश झाला.

त्याने दहा रुपये काढले मग परत अजून एक दहाची नोट काढून वीस रुपये हातावर ठेवले.

चल चा पिऊ म्हणाला.

आनंदाने त्याच्याकडे पाहिले, “या रंगांची किंमत किती असेल?”

“तुला म्हाईत न्हाय व्हय? चोरून बिरून आनलेस का काय?”

“नाही उधारीवर आणलेत.”

रंगाऱ्याने त्याचे डबे पाहिले. “तरी आसल दोनशे रुपये सगळे मिळून.” मग रंगाऱ्याने डबे पाहिले, जवळपास रिकामे झालेले.

“आरं, लय रंग वापरतूस तू, पातळ हात देयाचा.”

“बर, ह्ये घे तुला पन्नास दितो, कला हाय तुज्याकडं. पन, याच्यावर योक बी रुपया न्हाय हां! चा तुजा तू पी.” आनंदाने मान हलवली. चहा पाव खाऊन रंगारी निघाला बोर्ड बसवायला खांबावर.

आनंद म्हणाला “उद्या?”

रंगारी म्हणाला “सकाळच्याला ये आजच्यावानी. मंग बघू!”

आनंदा, रंगारी ज्या वाटेने गेला त्या वाटेकडे काही काळ पाहत उभा राहिला. मग वळला. समोर ‘ए१सलून’ होतं. मोठा आरसा होता दरवाज्याकडे तोंड करून. आनंदाला आरशात एक मुलगा दिसला. क्षणभराने लक्षात आलं, आपलंच प्रतिबिंब. पिंजारलेले बिनतेलाचे केस, गालफडं आत गेलेली, कपडे मळके, रंग रापलेला. चार सहा दिवसात ही

गत! तो पाहतच राहिला.मग सावकाश वळला.तिथेच पारावर बसला. मन,शरीर, दोन्ही थिजून गेली स्वत:चा अवतार बघून! परतीचा मार्ग उरलाच नाही असं मनाने घेतलं. 'आपणच ओळखू शकत नाही, आजोबा कसे ओळखणार?समजा आलेच शोधत तरी.' बराच वेळ गेला. मग निघाला तिथून. शंकऱ्याच्या खोपटाकडे आला. शंकऱ्या तारेत होता. हा आल्या आल्या याच्या आंगावर धावून गेला. आनंदने एका हातात जवळच पडलेलं लाकूड उचललं. हातातील सामान खाली ठेवलं आणि ३० रुपये शंकरच्या हाती ठेवले. तो हेलपाटत होता, पण तरीही ना पैशाची किंमत विसरला होता, ना अर्धवट वयातल्या मुलाच्या हातातल्या लाकडाची ताकद!

"रकमे भाकर दे बये, खाऊन पसरतो म्या पथारी" असं मऊ आवाजात म्हणत आत गेला.

आनंदाने लाकूड फेकले. तो आंघोळ करून आला मागच्या ओढ्यावर. कपडे परत तेच चढवले. रखमाने शंकऱ्याचं जेवण झाल्यावर पोरांना वाढलं.

मगाशी जे घडलं ते माकडं, पोरं, रखमा सर्वांनीच पाहिलं होतं. त्याचा अर्थ मात्र निरनिराळा उमटला सर्वांच्याच मनात. बोललं नाही कोणीच काही.

मग उरलेले १७ रुपये त्याने रखमेसमोर धरले. तिला काय करावं कळेना. 'शंकऱ्याला कळलं तर जित्ती न्हाय ठिवायचा!' मनात विचार

चमकला. पोरं, माकडं नजरेतून पैसे घेण्यास सांगत होते. मग तिने बारा घेतले. 'पाच ठीव तुला चापाव खा कामावर जासील तवा' म्हणाली.

आनंदने ते खिशात ठेवले मग.

"स्वावलंबन, स्वकमाई," खिशावर हात ठेवून तो म्हणाला, थेट आजोबा म्हणत तसे.

१.१२

अनंत व अनुराधा तार मिळाल्या बरोबर येऊन पोहोचले होते. आजी आजोबा दोघेही नजरेला नजर देईनात त्यांच्या. घडला वृतांत कसाबसा आजोबांनी सांगितला. आजीने लेक जावयासमोर हात जोडले.

"झालं ते झालं, आता शोध कसा घ्यायचा ते पाहूया." एवढं बोलून अनंता उठला.

आजीला अधिकच कानकोंडेपण आलं. लेक जावई चार जळजळीत शब्द बोलले असते तर उलट तिच्या मनाची आग थोडी कमी झाली असती.

परत पोलीस चौकीची फेरी झाली. अनंता म्हणाला, "तुम्हीच आम्हाला सांगा, आम्ही आमच्या परीने कसा शोध घ्यावा? नुसतं रोज येऊन तपासाची चौकशी करण्यापेक्षा आम्हीही शोध घेऊ."

सबइनस्पेक्टर म्हणाले "सगळया नातेवाईकांना, मित्र मंडळींना, कल्पना द्या. लपवून ठेवायचं नाही.

तो कुठे जाण्याची शक्यता आहे असं वाटत असेल तर ती ठिकाणं आम्हाला कळू देत.

पोरगा रागवून गेलाय, म्हणजे त्याचं तो गेलाय, पळवून नेला नसावा कोणी. पण आम्ही त्याही दृष्टीने चौकशा करतोच.”

अनुराधेचे डोळे भरून येत होते. ‘काय योजलं आणि काय घडून बसलं! येवढंसं पोर, काय खात असेल? कुठे झोपत असेल? रात्री ढग गडगडले, वीजा कडकडल्या तरी आपल्या कुशीत शिरायचा. आता छप्पर तरी असेल का डोक्यावर? कुठे आहेस बाळा? परत ये रे माझ्या सोन्या!’ हुंदका घशात अडकला.

दोन दिवस आजोबा व अनंता गावभर, आसपासच्या पंचक्रोशित, फिरत होते. कोणी काहीच सांगू शकत नव्हते. ‘कुठे गेला असावा? नाहीसाच झाला.’

आजोबांची मती कुंठीत झाली. पेपरमधे फोटो आणि निवेदन दिलं. तीन दिवस असेच गेले. अनुराधा म्हणाली “आम्ही जातो परत.” रयाच गेली होती बिचारीची रडून रडून.

“घरी जाते, एखादे वेळी तिथे आला तर? पत्र लिहील कदाचित.” तिच्या मनात आशा पालवली या विचाराने. मनाने उचल खाल्ली. निघालीच मग. आजी आजोबा तरी थांब कोणत्या तोंडाने म्हणणार?

अनुराधा व अनंता निघाले. आजीला नमस्कार करायला वाकले दोघे तेव्हा अपराधी भावनेने तिचे मन पोखरून काढले.

‘काय होऊन बसले सगळे! कायमचा डाग लागला यांच्या नावाला. ही जीभच हासडून काढावी आता. तिनेच घात केला.’

नवा सुरू केलेला धंदा, होतं नव्हतं ते गुंतवलेलं, वाळवणीच्या पदार्थांना चांगली मागणी होती. पावसाळी कामांसाठी भाऊ वहिनींनाही शेतावर भातलावणीच्या वेळी मदत लागणार होती. ‘मन कामात गुंतवायला हवं. शोधही घ्यायचाच. मिळेल परत मला माझं पोर. नक्की मिळेल.’ती स्वत:लाच धीर देत होती रस्ताभर.

---

आजोबा तळ्याकाठी येऊन बसलें. अलिकडे हा चाळाच लागला होता त्यांना. मन अती अस्वस्थ झालं की उठत आणि तळ्याकाठी येत. आनंदा घरातून गेल्यापासून मनाला स्वस्थता कशी ती नव्हतीच. सतत रुखरुख, काळजी, जरतरचे विचार याने मन पोखरून निघे. काय आणि कसा मार्ग काढावा? कुठे शोधावं? कसं शोधावं? विचार करकरून मेंदू थकून जायचा आणि हतबलता अधिकाधिक कह्यात घ्यायची मनाला. दिवाणांकडची शिकवणी सुरू होती. ती दोन मुलंही या सर्व प्रकारापासून काहिशी गप्पगप्पच असत.

दिवाण पतीपत्नींनी देशमुखांना त्यांच्या घरी जाऊन बरंच सुनावलं एके दिवशी. तुमच्यामुळे एक कोवळं मुल नाहीसं झालं घरातून, हे लक्षात ठेवा म्हणाले. देशमुखांच्या घरीही आनंदा आपल्या संशय घेण्याने गेला हा विचार सर्वांनाच लागून राहिला होता. देशमुख म्हणजे बडं प्रस्थ! पोलिस खात्यातही यांचा दबदबा. त्यांनी मुंबईला फोन लावला. मुंबईहून चौकित फोन आला.

"कुठेपर्यंत आला तपास?"

सबइन्स्पेक्टरनी आढावा दिला. "अजून काय तपास लागत नाही साहेब, मोठ्या शहरात गेला असावा, तिथेही फोटो व माहिती कळवली" शेवटी सरकारी यंत्रणा! त्यांना काय एकच काम असेल? बरं मुलगा स्वत:हून निघून गेला, म्हणजे वैयक्तिक कारण!" महत्वाची व्यक्ती आहे. तपास नीट करा. देशमुख येतील. गाड्या माणसं वापरा त्यांची. पण पोर सापडायला हवा." देशमुख आपली काही खास माणसं बरोबर घेतली व पोलीस चौकीवर गेले. देशमुख म्हणाले, "माझ्या गाड्या, आणि माणसं देतो. तुम्ही तुमचा एक माणूस द्या. वर्दी बघितली की इतर चौक्या मदत करतील." मग आपल्या लोकांकडे वळून म्हणाले, "आधी आसपासची, जास्त करून हाय वे, तसंच जवळची सर्व गावं पिंजून काढा. रोज ये जा करणारे ट्रक, टेंपो, यांच्या ड्रायव्हर्सकडे तपास करा. नवा कोण लहान पोर गावात पाहिलाय का चौकशी करा." सबइन्स्पेक्टरला म्हणाले, "शोधलं तर तुम्हा पोलिसांना ब्रह्मदेवही सापडेल, एवढी कुवत तुमची. वापरा ती जरा. खर्च माझा. तुम्ही तुमचा एक खमक्या माणूस द्या बरोबर, मग माझी माणसं पाहतील पुढचं!"

'आजपर्यंत तो थकलेला म्हातारा येत होता. हात जोडून जात होता. हे काय नवं निघालं आता?' सबइन्स्पेक्टर वैतागलेच जरा. 'आधीच माणसं कमी. सतराशे साठ केसेस. पोलीस म्हणजे काय अंतर्ज्ञानी वाटले काय यांना? पण सांगतो कोणाला? वरून आदेश आला तो पाळावाच लागणार!'

"कदम, तुम्ही जा यांच्या माणसांबरोबर. लेटर न्या, प्रत्येक गावच्या पोलिसांना इन्व्हॉल्व्ह करा.

बघू काय होतं देशमुख साहेब! आम्ही संपूर्ण सहकार्य करू! आम्हालाही सुटलेल्या केसेस दाखवायला हव्यातच की!" दुसऱ्या दिवशीपासून पोलिस व देशमुखांची खास माणसं यांनी शोध घ्यायला सुरवात केली.

---

अनुराधा परत आली खरी, पण जीवात जीव नव्हता. सवयीने हात काम करीत होते.

ही दोघे आली म्हटल्यावर सगळे घरी जमा झाले. अनंताने साधारण वृतांत सांगितला.

आण्णा म्हणाले, "असा कसा सरळ आळ घेतला त्या माणसांनी?" वासंती म्हणाली "धूर निघतो तेव्हा जाळ असतोच. हिऱ्याच्या कुड्या नसतील घेतल्या आनंदाने, पण दुसरं काही चोरताना पाहिलं असेल त्या लोकांनी."

अनंता काही बोलणार तेवढ्यात वरूण म्हणाला, “आंद्या चोरी करणं शक्यच नाही. आम्ही शेजारच्यांच्या परड्यात जांभळीला दगड मारला तरी तो भडकायचा” चर्चा कितीही केल्या तरी पोर परत मिळत नव्हतं तोपर्यंत कोणालाच चैन पडणार नव्हतं.अनुराधा, अनंता तर रात्रभर जागेच असत. चुकून अतीश्रमाने डोळा लागला तर तास दोन तास झोप मिळे. त्यातही स्वप्न पडत ती आनंदचीच.

आण्णा वयोमानानुसार अधिकतर जागेच असत. आता हा नव्याने जीवाला घोर लागलेला.

दिवस कोणासाठी थांबत नाही. तो उगवतो, मावळतो, आपलं माप पदरात टाकून जातो.

अनुराधेच्या पदार्थांना मागणी वाढली होती. सुरवातीला अनंताने गावोगावी, जिल्ह्याच्या ठिकाणी वगैरे जी सॅम्पल्स पाठवली होती, त्यावरून आठवड्यातून एकदोन तरी नव्याने ऑर्डर येत होत्या.

दोघांना हा व्याप कसाबसा आवरत होता. पण पुढे वाढवायचं काम तर माणूसबळ लागणार होतं. सगळं ठीक असतं, तर ही आनंद मानण्याचीच गोष्ट होती. पण आनंदाच्या नाहीसा होण्याने सगळ्याच गोष्टी यंत्रवत केल्या जात होत्या. अनंताच्या मनात परत परत आपणच पुन्हा जाऊन आसपासच्या गावात आनंदाला शोधावं असं येत होतं.

देशमुखांची माणसं मग पद्धतशीर शोध घेऊ लागली. हाय वे वरची प्रत्येक टपरी, रोजची वाहतूक करणारे टेंम्पो, रिक्शा, प्रत्येकाला थांबवून, फोटो दाखवून, कसून चौकशी होऊ लागली. पोलीस खात्याचा माणूस दिसला की गाड्या थांबून निदान फोटो पाहत तरी.आसपासच्या गावांमधील पोलीस स्टेशनला प्रायॉरीटी केस म्हणून फोन करून सांगण्यात आल. सूत्र भराभर हलू लागली.

---

आनंद रोज रंगाऱ्यांबरोबर नवनवे बोर्ड रंगवत होता. कधी त्यांच्याबरोबर आसपासच्या गावी जायचा. कधी गावातच काही इतर रंगकामाची कामे मिळत. पैसे मिळत होते. शंकऱ्याला थोडे दिले की तो खुश असे.

रखमाला रोजच्या भाकरीची चिंता पडेना. पावसाळा अर्धपोटी काढणाऱ्या मुलांना पोटभर अन्नं मिळत होतं. पण तिचं मन तिला खात होतं.

एके रात्री सगळे झोपल्यावर ती आनंदाच्या उशाशी जाऊन बसली. त्याच्या डोक्यावरून हात फिरवू लागली. गाढ झोपलेला आनंद झोपेत ‘आई आई’ म्हणू लागला, मग जाग आली त्याला.

“काय झालं?” तो एकदम उठून बसत म्हणाला.

“तूच बोल बाबा, आसं काय जालं म्हनून घर दार सोडून आलाईस आसा? आयुक्षं आसं दाव्यावर लावून बसलाहीस? काय तरी सांग. ल्हान

हाईस आजून. पर आमी तर मोटं हाय ना. आमी आसं तुज्या समद्या आयुक्षाचा ख्येळ उगड्या डोळयानी कसं पाहवा बाबा? तुज्या घरचे तुज्या वाटंकडं डोळं लावून बसल्ये आसत्याल. तुजी माय, तिचा जीव गोळा जाला आसंल लेकरा डोळ्यात तुजी वाट पाताना! मला वाटायलय तुला आसं उचलून आनलं त्ये चुकलंच आमचं! तितंच कुटतरी दवखान्यापाशी सोडला आसता तर ग्येला आसतास घरला. शंकऱ्या म्हनत्यो तू काय चोरी मारी करून आला आसशील, पर मला इश्वास वाटतू तुजा. नदर साफ हाय तुजी. काय जालय, या मायला तर सांग लेकरा. आनंदाला काही कळण्यापुर्वीच तो ओक्साबोक्शी रडू लागला. रखमाच्या मांडीवर डोकं ठेवून तो कितीतरी वेळ रडत होता. पोटातून शहाणी, अडाणी रखमा त्याच्या पाठीवरून हात फिरवत राहिली. त्याला मोकळं रडू देणं किती गरजेचं आहे हे तिला माहित होतं.

बऱ्याच वेळाने आनंदा शांत झाला. मग भरती आल्यासारखं भडाभडा बोलत गेला. जसं आठवलं, जे आठवलं, जे सगळ्यात जास्त खुपलेलं ते सगळं बाहेर आलं. आजोबांची शिकवण, आजीचा संशय, तिचं बदललेलं वागणं, पण नंतर आजीने ठेवलेला विश्वास, देशमुखांनी घेतलेला संशय, परत सगळे मारणार, रागवणार, परत सगळं पहिल्यासारखं क्लेशकारक होणार ही धास्ती. सगळंच धो धो सांडत राहिलं. रखमा ऐकत राहिली. त्याची घुसमट, त्याचा उद्रेक समजून घेत राहिली. तिला आजोबांच्या गावाचं नाव माहित होतं. जवळंच होतं. तीने मनाशी काही निर्धार केला. पण आनंदाला काहीच नाही बोलली.

आनंदाला ती बराच वेळ थोपटत राहिली. कधीतरी त्याला झोप लागून गेली. बऱ्याच दिवसांनी शांत झोपला तो. पूर्वीसारखा!

दुसरे दिवशी आनंद नेहमीसारखा रंगकामाचं साहित्य घेऊन बाहेर पडला. रखमाने भाकरी बेसन दिलं बांधून. शंकऱ्या कुठेतरी गेला होता सकाळचाच. आनंदा नेहमीच्या अड्ड्यावर आला. आज अजून कोणताच रंगारी नव्हता आलेला. मग तो तिथेच थोडा वेळ बसला. तरीही कोणी येईना. 'आज काही काम मिळणार नाही बहुतेक,'त्याला वाटलं. चालत चालत चहाच्या टपऱ्यांजवळ गेला. तिथल्या पारावर बसला काही वेळ. 'घरी जावं का परत? 'तेवढ्यात त्याची नजर सलून च्या दारावरच्या अमिताभ सदृश्य चित्रावर गेली. फारच मळकं झालं होतं चित्र. तो वर चढून सलूनमधे गेला.

"दारावरचं चित्र फार जूनं झालंय. नवं देऊ का रंगवून?"

"आबिताब बच्चन येतू का तुला रंगविता?"

"हो येईल की."

"किती पैशे घेशील?"

"रंगाचे १०० रुपये होतात. वर द्या तुम्हाला द्यायचे ते." हे तर फारच स्वस्तात होत होतं काम.

"खराब नाय ना करायचास दरवाजा?"

"नाही. चांगलं करेन."

“रंगीव मंग!”

आनंदने दुसऱ्या दरवाजाचा अर्धा पत्रा बेस कलरने रंगवून घेतला. “वाळू दे जरा, हात लावू नका” म्हणाला. मग तो चहाच्या टपरीवर गेला. तिथे बसून भाकर बेसन खाऊ लागला. तेवढ्यात शंकऱ्या आला तिथे. “का रं? हितं काय करायलास? काम न्हाय गावलं व्हय?”

“मिळालंय. रंग वाळतोय अजून”

“आसं व्हय? भाकर खायलास व्हय? चा पिऊया काय?” आनंदाने मान हलवली.

“दोन पेशल चा द्या की मालक” शंकऱ्या ने आर्डर दिली.

“का रं, ह्यो तुज्यासंग कोन?” चहावाल्यानं आनंदालाच विचारलं! “तू त्या रंगाऱ्याचा पोर न्हवं?”

आनंदा काही बोलणार तेवढ्यात शंकऱ्याच म्हणाला, “आवो माजा पोरगा हाय तो. रंगाऱ्या संगट काम करायलाय सद्या!” चहावाला जरा निरखून पाहू लागला. तेवढ्यात पोऱ्यानं चहा आणला. शंकऱ्यानं एकदा आनंदाकडे पाहिलं, पण मग खिशातून काढून पैसे दिले. चहा पिऊन आनंदा सलूनकडे गेला. रंग वाळत आलाच होता. पावसानं दडीच मारलेली तशीही. हवा प्रचंड गरम होती. त्यात गरम चहा पिऊन आनंदा घामेजला होता. त्याने शर्टाच्या बाहीला तोंड पुसलं. चहावाला पाहतच होता आळीपाळीने दोघांकडे. “तुजा सोत्ताचा व्हय रं ह्यो पोर? का कोनाचा सांबाळाय

घेतलास?" शंकऱ्या जरा गडबडला. पण मग जरा जोरानंच म्हणाला, "न्हाय वो, काय बी काय बोलायलाय मालक? माजाच पोर हाय!" मग निघालाच तो. जाता जाता ओरडून सांगितलं आनंदाला, "जातू रं पोरा, काम जाल्यावर सरळ घरला ये."

रखमाने पैसे मोजले ते ६० रुपये भरले. दोघांना गाडीखर्च, वर थोडे म्हटलं तरी २०० रुपये हवेत, आपल्याला परत यायला पण हवेत. तिने ठरवलं आता आनंदा देईल ते पैसे खर्च नाही करायचे, साठवायचे, आणि पोराला त्याच्या आजाच्या घरी सोडून यायचं. तिला या विचाराने जरा शांत वाटलं. आठवड्याभरात जमतील, "परत एकदा गोधड्या शिवायला मिळतात काय बगू. शेतात तर काय काम नाय गावायचं, पावसानं ओढ दिलेली." ती बाहेर येऊन लाकडाच्या ढलप्या फोडत बसली.

आनंदा काम संपवून आला. आज सलूनचं दार रंगवून झाल्यावर सलूनवाला म्हणाला दुसऱ्या दाराला नुसता रंग लाव. ते झाल्यावर चहाच्या टपरीवाल्यानेही टपरीचा दर्शनी पत्रा रंगवून घेतला. टपरीवाला त्यानिमित्त्याने आनंदाशी बोलण्याचा प्रयत्न करत होता. पण आनंदा गप्पंच राहिला.

असं करत करत ३०० रुपये मिळाले. वाटलं त्यापेक्षा बरेच मिळाले. त्याने घरी जाण्यापुर्वीच दोन भाग केले.

मग तो भराभर चालत निघाला. घराच्या बाजूला वळला आणि थिजून तिथेच थांबला. मग पट्‌कन झाडाआड दडला. पोलीसांची गाडी, इतर गाड्या, बरीच माणसं उभी होती. अंगणातून आरडा ओरडा ऐकू येत होता.

“ओ मारू नगा वो सायेब!” शंकऱ्याचा कळवळून ओरडण्याचा आवाज ऐकू आला. “आमी नाय पळवला त्येला. रस्त्यावर बेसूद गावला. इचरा हीला, पोरास्नी इचरा.” “आय आय आय गं! मारू नगा सायेब!” परत शंकऱ्या ओरडला. आनंदा, भेदरून उभा राहिला. काय करावं कळेना त्याला. एका क्षणात त्याचं कुमारमन धास्तावून हजार विचारांच्या कोलाहलात हरवलं आणि त्याच अवस्थेत तो उलटा फिरून पळत सुटला. त्या घरापासून जितकं दूर जाता येईल तितकं दूर पळून जायचं होतं त्याला.

---

# आनंद:

# भाग २

२. १

आज त्याचं पहिलं मोठं चित्रप्रदर्शन होतं. चित्रकलेच्या प्रांतात हळू हळू त्याचं नाव होत होतं. ॲबस्ट्रॅक्टची लाट थोपवून, परत निसर्गचित्र, प्राणीचित्र, व्यक्तीचित्रांकडे कलासक्तांना वळवण्याची ताकद या मुलात आहे असं सर्व जाणकारांना वाटत होतं.

आनंद वरून शांत होता. नेहमी असायचा तसाच. एका नावाजलेल्या आर्ट गॅलरीतर्फे त्याचं एवढं मोठं प्रदर्शन भरवलं जात होतं. मोठमोठे चित्रकार, धनाढ्य रसिक, या आर्ट गॅलरीच्या प्रदर्शनांना आवर्जून हजेरी लावत. आनंदाच्या कलामहाविद्यालयातील मित्र मैत्रिणीच जास्त उत्साहात होते त्याच्यापेक्षा. सगळे नटून थटून आलेले. हा मात्र नेहमीच्याच कपड्यात. रोजचीच फेडेड जीन्स आणि वर खादीचा झब्बा. आनंदचं चित्रकलेतलं निर्विवाद कौशल्य, त्याचा मितभाषी स्वभाव, मित्रमैत्रीणींना लागेल ती मदत करण्याची तयारी, पण स्वत:विषयी कधीच बोलायला उत्सुक नसणारा,

काहीसा अलिप्त राहणारा, तगडा, देखणा आनंद मित्रमैत्रीणींमधे अत्यंत प्रिय पण एखाद्या कोड्यासारखा होता.

विशितल्या मुलांना वाटणारी कोणतीच आकर्षणं त्याला भुरळ घालत नव्हती. ना बाईक्स, ना ड्रींक्स, ना गॅजेटस्, ना मुली. जणू ही बाकीची मुलं त्याच्यापुढे बच्चे वाटत त्याला. खेळ, आर्ट, हे मात्र याचे व त्यांचे कॉमन इंटरेस्ट होते.

प्रत्येक जण आपापले प्रॉब्लेम्स घेऊन आनंदकडे येई आणि खात्रीशीर उपाय मिळवून परते. याचमुळे आपल्या या मित्राला मिळालेलं यश इर्षेचं कारण न बनता, कौतुकाचाच विषय होता.

आनंद सगळी चित्रं परत नजरेखालून घालत होता. रचना, क्रम यांचा विचार करत होता. पण काळजी, ताण कुठेच त्याच्या वागण्यात दिसत नव्हता.

आर्ट गॅलरीची एक मुलगी त्याचा बायोडेटा मागायला आली. तो प्रिंट केलाच नव्हता कधी त्याने. त्याने कागद मागितला. त्यावर आपले नाव, शिक्षण, चित्रकलेविषयीचे आपले विचार, त्यासाठी मिळणाऱ्या प्रेरणा, चित्रकलेतून मिळणारा आत्मिक आनंद असं सगळं भरभर सुवाच्च्य अक्षरात उत्तम इंग्जीमधून लिहून दिलं.

ती साशंकतेने त्या कागदाकडे पाहत राहिली. “काळजी करू नकोस. तितकं पुरेल.” तो तिला म्हणाला. ती तो कागद घेऊन गेली.

एका चित्रावर प्रकाशयोजना जरा निराळी हवी असं त्याला वाटलं. त्याने पट्कन जवळचं स्टूल ओढलं. पायातल्या चपला काढून तो वर चढला. त्याने चित्राचा अँगल बदलून, वरच्या दिव्याचाही अँगल बदलून पाहिला. मग जरा मागे झुकून तो त्याच्या मनातली प्रकाशयोजना जमलीय का ते पाहू लागला.

“अजून थोडा १५ डिग्री डावीकडून वर, मग परफेक्ट येईल लाईट!” मागून नाजूक पण स्पष्ट आवाज किणकिणला. मागे झुकलेला आनंद नकळत वळला आणि त्याचा तोल गेला, पडता पडता वाचला. जरा धडपडलाच!

“चित्रातल्या खिडकीतून प्रकाशाची तिरीप आत येतेय त्याच्याशी मॅच करायचाय ना?” असं म्हणत तिने स्टूलवर सहजतेने चढत चित्र किंचित हलवलं आणि परफेक्ट अँगल मिळाला आनंदला हवा होता तसा. तो पाहतच राहिला. ते चित्राकडे किती आणि तिच्याकडे किती हे तो कधीच ठरवू शकला नसता.

त्याची मैत्रीण, कृपा, हे सगळं पाहत होती, ती मात्र गालातल्या गालात हसली.

मागून मगाचची ती गॅलरीची एम्प्लॉयी मुलगी येऊन आनंदाला म्हणाली, “झालं ना सगळं? चला, हॉलमधे बोलावलय तुम्हाला सरांनी! गेस्ट पोहोचतीलच एवढ्यात.”

तिच्याशी बोलायला आनंद वळला, “येतो” म्हणून परत चित्राकडे वळला तेवढ्यात ती मुलगी नाहीशी झाली होती. त्याची सरकन नजर चित्रदालनाला स्कॅन करून आली, पण ती कुठेच दिसली नाही. त्याला प्रचंड चुटपूट लागली. आणि तत्क्षणी त्याला स्वत:चाच खूप राग आला. पण आत्ता तो विचार करायला वेळच नव्हता.

तो अनिच्छेनेच वळून हॉलमधे जायला बाहेर पडला.

हळू हळू प्रदर्शनाच्या उद्घाटनाची वेळ जवळ येऊ लागली.

अत्यंत प्रतिथयश चित्रकार शंकर यांच्या हस्ते उद्घाटन व्हायचं होतं. सर्वजण त्यांचीच वाट पाहत होते. बाकीचे मोठे पाहुणेही मोठ्या संख्येने उपस्थित होते. बाहेर त्यांच्यासाठी वेगळी चहापानाची सोय होती.

उर्मी आपल्या ‘दां’बरोबर आली होती. कलादालनाच्या गेटमधे त्यांची भली मोठी गाडी थांबली तेव्हाच बऱ्याच नजरा तिकडे वळल्या होत्या. आणि जेव्हा उर्मी भरजरी सलवार कुडता, व त्यावर बारीक जरीच्या कशिद्याची ओढणी, अशा पारंपारिक पण अत्यंत उंची पेहेरावात त्या गाडीतून उतरली, तेव्हा तिच्या खानदानी सौंदर्याने भल्याभल्यांचे डोळे दिपले. क्षणभर मंडळी प्रमुख पाहुण्यांची वाट पाहणेही विसरली. तिला या अटेन्शनची चांगलीच सवय होती. ती स्वत: चित्रकलेची भोक्ती होती. ‘दां’नी जेव्हा सांगितलं या कार्यक्रमाविषयी, तेव्हा इतर वेळी पार्ट्यांना जाण्यासाठी फारशी उत्सुक नसणारी उर्मी लगेच तयार झाली होती. चित्रकार

शंकर यांच्या पेंटींग्जची ती चाहती होती. तिने नकळत हॉलमधे नजर फिरवली त्यांना शोधण्यासाठी.

तिचे ‘दां’, मि. भागवत कित्येक मोठ्या उद्योगांचे मालक, पण ह्या आईविना आपल्या मुलीविषयी अत्यंत हळवे होते. उर्मीनेही त्यांचा प्रत्येक शब्द मानला होता. ‘दां’ तिच्यासाठी जगातला सर्वोत्तम माणूस होता. आनंद हॉलमधे पोहोचताच संयोजक त्याला मि. भागवतांकडेच घेऊन गेले.

“मि. भागवत, मीट आनंद, आपला अनोखा चित्रकार!”

‘दां’ नी हातात हात घेऊन आनंदचे अभिनंदन केले.

“मीट माय डॉटर उर्मी, तिलाही चित्रकलेची आवड आणि जाण आहे.”

आनंदने हात जोडून अभिवादन केले. उर्मी आनंदकडे पाहतच होती. तिनेही हात जोडले. “तू कलामहाविद्यालयात शिकतोस?” दां नी विचारले. “वयाने लहान आहेस म्हणून एकेरीतच बोलतो तुझ्याशी.” दोन्हीवर आनंदने फक्त हसून मान हलवली.

“उद्घाटन झालं की तूच उर्मीला दाखव तुझी चित्र! तिला भरपूर प्रश्न असणार आहेत.” असं म्हणून ‘दा’ हसले जोरात.“मी पडलो रूक्ष माणूस! मला फारसं काही कळत नाही चित्रांमधलं. पण उर्मी ज्या चित्राकडे बोट दाखवेल ते चित्र आमच्या घरी येईल. सो यंग मॅन, काँग्रॅट्स, अँड ऑल द

बेस्ट! सावजींनी तुझी चित्र त्यांच्या गॅलरीत एक्झीबीट केली यातच तुझ्या चित्रांचा दर्जा कळतो. यू विल गो प्लेसेस, ॲम शुअर!"

"थॅंक यू सर!" आनंद दां ना म्हणाला, त्याने किंचित मान झुकवून उर्मीला अभिवादन केलं व तो पुढे गेला. सावजी त्याची ओळख निरनिराळ्या क्षेत्रातल्या दिग्गजांशी करून देत राहिले. उर्मीची नजर त्याला फॉलो करत राहिली.

उद्घाटन झालं. चित्रकार शंकर आनंदच्या चित्रांविषयी थोडक्यात पण फार चांगलं बोलले. "जातीवंत कलावंत व कष्टाने मिळवलेलं कौशल्य यांचा सुंदर मिलाफ या तरूण मुलाच्या चित्रात दिसतो. हातात कला असणारे अनेक असतात. तिला आंतरीक आत्मिक ओढीने जोपासणारा विरळाच! मला या मुलात ती ओढ दिसते." "कधीही काहीही लागलं तर विनासंकोच ये" असंही चित्रकार शंकरनी आनंदला जवळ बोलावून सांगितलं.

नंतर जमलेल्या प्रतिष्ठित व्यक्तींनी आनंदची प्रदर्शित चित्रे पाहिली. काहींना चित्रकलेत बरीच गती होती तर काही अगदीच अनभीज्ञ होते. सर्वच जण त्याचे कौतुक मात्र करत होते.

उर्मी बराच वेळ त्या मगाच्याच चित्रासमोर उभी होती. पूर्णपणे गुंगून ती त्या चित्राकडे पाहत होती. भागवत मागून आलेलेही तिला कळले नाही. "काय उर्मी? हेच चित्र सजणार का आपल्या भिंतीवर?"ती त्यांच्याकडे पाहून हसली. भागवतांनी आनंदला हाक मारली. सावजी व आनंद एकत्रच होते. "आनंद, हे चित्र आम्ही घेतलं." असं म्हणून त्यांनी चेकबूक काढलं.

“माफ करा सर, पण हे चित्र विक्रीसाठी नाही. आपण इतर कोणतंही चित्र घेऊ शकता.” आनंद म्हणाला. सावजी व भागवत दोघेही आश्चर्याने आनंदकडे पाहू लागले. उर्मीनेही चमकून त्याच्याकडे पाहिले. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून ती चकित झाली. पण मग तीच म्हणाली, “दां, हे चित्र आहे फारच सुंदर, मला घ्यावसंही वाटतंय, पण याला योग्य अशी प्रकाशयोजना आपल्या हॉलच्या भिंतीवर नाही होऊ शकत! तो पाहिलात, चित्रात खिडकीतून येणाऱ्या तिरिपेला पोषक असा प्रकाश बरोबर ॲडजस्ट केलाय इथे, त्यामुळे जो परिणाम साधलाय तो आपल्या हॉलच्या प्रकाशयोजनेत नाही होऊ शकत. त्यामुळे या चित्राला ही गॅलरीच योग्य! आपण दुसरं एखादं चित्र पाहू आवडतंय का?”आता चकित होण्याची पाळी आनंदची होती.

“थॅंक्यू” तो एवढंच म्हणाला. उर्मी समजून उमजून हसली. तिनेच असे म्हटल्यावर भागवत व सावजी पुढे काही बोलले नाहीत.

कार्यक्रम संपल्यावर सगळ्या मित्रमैत्रिणींनी आनंदला गराडा घातला. त्याला आज ते सगळे एकटा सोडणारंच नव्हते. मग सगळी पलटण बियर बार मधे पोहोचली. दंगा करत खाण्यापिण्यात सगळे मश्गुल झाले. इतर वेळी आनंदाने काढता पाय घेतला असता, पण आज मात्र या मुलांची मनं मोडवली नाहीत त्याला. तो ही मग हातात बियर घेऊन त्यांची भंकस ऐकत बसला. कृपा हळूच त्याच्या शेजारी येऊन बसली. “मग, कोणासाठी जपून

ठेवलंय ते चित्रं?" कोपराने त्याला ढोसत ती बोलली. "बऱ्या बोलाने सांग नाहीतर त्या अनामिकेबद्दल सगळयांना सांगेन हं मी!"

आनंदने फक्त एकदा तिच्याकडे पाहिले. मग तो गालातल्या गालात हसला. "त्या अनामिकेचा पत्ता लाव मग सांगतो!"

"ओहो बच्चमजी! आप तो काफी फास्ट निकले. ठीक आहे. दोन दिवस! ही कृपा सगळी खडा न् खडा माहिती हजर करेल बघ!" एकदम स्टाईल मधे कृपा म्हणाली. त्याने तिच्या डोक्यावर एक टपली मारली. "काढ तरी इन्फो! मग बघू!"

"एह, कृपा नाम है मेरा, कृपा जोशी! तुम देखते जाओ आनंद बाबू!"

मग ती जोरजोरात हसली. क्षणभर आनंदला तिच्या या बचपन्याचाही हेवा वाटला. 'आपण नाही असे दिलखुलास हसू शकत.' त्याचं मन पट्कन म्हणालं. मग तो जायला उठला. सगळयांनी त्याला बेअर हग्ज दिले. तिथून बाहेर पडताना आनंदची नजर त्याच्याही नकळत ओली झाली होती.

'साला, का इतकं प्रेम करतात ही पोरं आपल्यावर! असं काय केलंय मी यांच्यासाठी? पण जीव टाकतात. असे किती मिळाले आपल्याला जीव टाकणारे! प्रदीप, प्रज्ञा, चंदू, रखमा, राम्या, त्याच्या पद्धतीने शंकऱ्याही. आजोबा, आजी, आणि आई बाबा, त्यांचं तर शब्दांच्या पलिकडचंच! नंतरच्या आयुष्यात येत गेलेले मित्र मैत्रिणी, शिक्षक. पीरबाबा… आपण

मात्र या प्रवाही प्रेमाच्या झऱ्यापासून अलिप्त होत गेलो, ठरवून कोरडे राहिलो.'

नकळत आनंदा विचारमालिका पार करत त्या दिवसाच्या घटनांपर्यंत पोहोचला ज्यादिवशी आधीचा आनंद या नव्या आनंदाने पूर्णपणे आपल्या मनात बंदीस्त केला होता.

२. २

त्या रात्री आनंदाला झोप येणं शक्यच नव्हतं. तो वरवर कितीही शांत दिसला, वागला तरी या चित्रप्रदर्शनाविषयी प्रचंड आतुरता होती मनात. कलासक्तांच्या प्रशंसेने, चित्रकार शंकर यांच्या शब्दांनी, नाही म्हटलं तरी मन सुखावलं त्याचं!

आज आईबाबा, आजोबा इथे हवे होते असं प्रकर्षाने वाटलं. पण त्याने स्वत:भोवती बांधून घेतलेले गडकिल्ले त्याला नेहमीप्रमाणेच थोपवत होते. मन दोन्ही बाजूंनी आलटून पालटून जोर लावी. पण त्या दिवशी, नव्याने जन्मलेला आनंद नेहमीच बाजी मारून जाई! उस्फुर्त आनंदला खेचून आत नेई आणि पहारा अधिकच कडक होई! जुन्या, हसऱ्या, बडबड्या, आनंदला फक्त एक जागा होती मुक्तपणे विहरण्यासाठी. ती म्हणजे स्टुडीओतील कॅनव्हास! तिथे मात्र हा नवा आनंद जणू नाहीसाच होई! सर्व कड्या कुलुपे, साखळदंड गळून पडत. आतला आनंदोत्सव सुरू होई.

आत्ताही त्याचे हात शिवशिवले. तो तट्कन उठला. अंगातला झब्बा त्याने काढून टाकला आणि ब्रश उचलला.

या खोलीच्या एका कोपऱ्यात त्याचं राज्य असे. तिथे नव्या आनंदचे काही चालत नसे. मग हळू हळू त्याचे हात लिलया कॅनव्हासवर फिरू लागले. कधी ब्रशने, कधी बोटांनी, कधी पंजाच्या बेसने लयीत नृत्य करायला सुरवात केली आणि पाहता पाहता कॅनव्हासवर चित्र आकाराला

येऊ लागलं. त्याच्या सर्व आक्रसलेल्या नसा सैलावत गेल्या. सगळा ताण नाहीसा झाला. तो संपूर्ण पणे मोकळा होत गेला.

रात्रीचे तीन प्रहर उलटून गेल्यावर, श्रांत पण समाधानी आनंदने बेडवर अंग टाकून दिले. क्षणार्धात तो झोपी गेला.

सकाळी सवयीने लवकर जाग आलीच. तो तसाच उठून कॅनव्हास समोर जाऊन उभा राहिला. कालच्या प्रदर्शनातलं ते चित्र, त्यासमोर उभी पाठमोरी ती, प्रकाशाचा उत्तम साधलेला कोन! त्याने तिची छबी या चित्रात बंदीस्त केली होती काल रात्री! आता तो मोकळा श्वास घेऊ शकणार होता.

त्याने स्वत:चं आवरून मग भराभर कालचा पसारा आवरला. चहाचा कप घेऊन तो गॅलरीत उभा राहिला. मुंबईसारख्या ठिकाणी, भरवस्तीत, रस्त्यालगत, अशी रुम मिळायला भाग्यच लागतं. त्याचे एक सर, रिटायर झाल्यावर, मुलाकडे अमेरिकेला गेले, त्यांचा हा बंगला. त्यांच्या रिटायरमेंटच्या दिवशी आनंदने त्यांना त्यांचेच एक पोर्ट्रेट बनवून दिले. त्यावर जाम खुश होऊन सरांनी त्याला ही सेल्फकंटेन्ड गेस्टरूम वापरायला दिली.

माळी, सफाईची बाई, यांच्यावर काही प्रमाणात लक्ष ठेवणे, सर भारतात येणार असतील तेव्हा बंगला वास्तव्यास योग्य करून ठेवणे ही जबाबदारी आनंदने स्वत:हूनच स्विकारली. हा मितभाषी तरूण, सर आणि त्यांच्या कुटुंबियांना भरवशाचा वाटला. आनंदानेही त्यांना निराश केले नाही. बागबगीचा हिरवागार राहिला. घर कायम स्वच्छ!

गेली दोन वर्ष तो इथे राहत होता. अर्थातच मित्रमैत्रिणींना याचा थांगपत्ता नव्हता, कृपा सोडून. ती कशी काय कोण जाणे सगळे गडकोट तोडून आत शिरकांव करू शकली होती. स्पष्ट कधीच दोघेही काही बोलले नसले तरी कृपाचं स्थान सगळ्या मित्रमैत्रिणींपेक्षा निराळं आहे हे दोघांना व काही प्रमाणात बाकीच्या मुलामुलींनाही माहीत होतं. तिला त्याच्या आतल्या, खऱ्या आनंदाची झलक बेसावध क्षणी लागली होती. हा स्पष्ट बोलण्याचा विषय नाही हेही तिला कळत होतं.

ही अवखळ मुलगी प्रसंगी किती समजुतदार होते, हे त्याला माहित होतं. नात्याची सीमारेषा ठरवणं हिच्याकडून शिकावं असं वाटायचं आनंदला. नकळत तो मोकळेपणाने वागायचा बोलायचा तिच्याबरोबर. तिचा अवखळपणा त्याला प्रज्ञाची आठवण करून द्यायचा तर समंजसपणा प्रदीपची.

हळूच मन मागे गेलं.

प्रज्ञा प्रदीपबरोबरचे गच्चीतले खेळ आठवलें. त्यांच्याबरोबर खाल्लेला दिवाण काकूंच्या हातचा खाऊ आठवला. एक स्मितरेषा फुलली नकळत ओठांवर! कुठे असतील दोघे आता? काय करत असतील? प्रदीप नक्कीच भरपूर शिकला असेल. कदाचित आपणही शिकलो असतो, डॉक्टर किंवा इंजिनीयर झालो असतो, जर तिथेच आजोबांजवळ राहिलो असतो. त्याने हलकेच मानेला झटका दिला. जणू त्या आठवणीच झटकून

टाकायच्या होत्या त्याला. आज परत सावजींच्या आर्ट गॅलरीत जायचं होतं. मग तिथून कॉलेज!

सावजी काहीसे नाराज दिसले. पण बोलले नाहीत काहीच. आनंदाची तीन चित्रं काल विकली गेली होती. पण ज्या चित्राने उर्मीला वेड लावले तेच इतरही काही जणांनी मागितले होते. आणि हा मनस्वी तरूण ते चित्र देण्यास नकार देत होता. त्यांनी आनंदला कालच्या विक्री झालेल्या चित्रांचा त्याच्या हिश्श्याचा चेक दिला. आनंदची चित्र, गॅलरीमधे एक आठवडा डिस्प्ले होणार होती. सावजी निघताना एवढंच म्हणाले, “नवकलाकाराने आपल्या फार अटी ठेऊ नयेत.” आनंद काहीच बोलला नाही. तो मान हलवून निघाला. सावजी पाठमोऱ्या आनंदाकडे पाहत राहिले. त्यांना त्यांचा उमेदीचा काळ आठवला.

———

“आय आय आय गं! मारू नगा सायेब!” परत शंकऱ्या ओरडला.

आनंदा, भेदरून उभा राहिला. काय करावं कळेना त्याला. एका क्षणात त्याचं कुमारमन धास्तावून, हजार विचारांच्या कोलाहलात हरवलं आणि त्याच अवस्थेत तो उलटा फिरून पळत सुटला. त्या घरापासून जितकं दूर जाता येईल तितकं दूर पळून जायचं होतं त्याला.

पाठोपाठ रखमाचा ओरडण्याचा आवाज आला! “आवं, सोडा आमाला. आमी नाय पळीवला त्येला. यील येवड्यात! थांबा वाईच हितच. म्याच फुडं घालून घीऊन येनार हुते त्येला, पर पैशे न्हवते ना सायीब! आवो मारू नगा त्येंना!”

रखमेच्या आवाजासरशी ब्रेक लागल्यासारखा तो थांबला. तिला असे आक्रोशताना ऐकणे त्याला सहन होईना. नकळत तो मागे वळला. आत्ता आपण पळून गेलो तर या सर्वांना पोलीस खूप मारतील या विचाराने तो थबकलाच! दोन मनांचे द्वंद्व सुरू झाले. ‘परत गेलास तर परत तेच चक्र, अवहेलना, अपमान, मारझोड, बंधनं! नाही गेलास तर या सगळयांना मरेस्तोवर मार देतील पोलीस! आत्ता स्वतंत्र आहेस. विचार कर!’ शेवटच्या क्षणी आतल्या आनंदाने मात केली. परत उलटा पळत त्यांच्या पडक्या घराजवळ पोहोचला. उलट पडणाऱ्या प्रत्येक पावलांबरोबर मात्र, उरला सुरला व्रात्य, अवखळ, बालीश, बडबड्या, प्रेमळ, आनंद या नव्या जबाबदार, कोरड्या, व्यवहारी, मितभाषी आनंदाच्या कवचात बंदीस्त होत गेला.

आनंदा सरळ आत गेला आणि त्याने शंकऱ्यावर उगारलेल्या दंडुकावाल्या पोलिसासमोर उभा राहिला. जोर करून बोलला, “थांबा!, मारू नका त्यांना. मी आजारी होतो. हे उचलून घेऊन आले म्हणून वाचलो. त्यांचा काहीच दोष नाही.”

काही क्षण सगळेच एकदम शांत झाले.

‘समोर उभा, फाटक्या कपड्यातला, अस्ताव्यस्त केसांचा, रापलेल्या रंगाचा, यांच्यातलाच एक भिकारी वाटणारा मुलगा... याच्यासाठी आपल्याला पळापळ करायला लावली देशमुखांनी? पण भाषा शुद्ध आहे पोराची.’

“नाव काय रे तुझं?”

“आनंद!”

“पूर्ण नाव? पत्ता, आजोबांचं नाव गाव पत्ता,” सगळी चौकशी झाल्यावर मंडळी निघाली.

रखमाने पुढे होऊन त्याच्या तोंडावरून हात फिरवला. डोळयात पाणी भरत, “चांगला ऱ्हाय पोरा, पून्न्यांदा आसा जाव नगं कुटं! सरळ मायकडे जा आपल्या!”

राम्याने, चंदाने हात धरला. दोन्ही माकडं, जी इतका वेळ लपून बसली होती, अचानक पुढे झाली, दोघांनी चक्कं त्याला मिठी मारली. आनंदा मग शंकऱ्याकडे गेला. खिशातून आज मिळालेले सर्व पैसे त्याने शंकऱ्याच्या हाती ठेवले. शंकऱ्याही गदगदला. “ऱ्हाऊ दे तुलाच पोरा,” म्हणाला. आनंदने मान हलवली, “रंगांचे आहेत. आता पूर्ण दिले.”

मग तो पाठ फिरवून निघाला. आतला आनंद रडत होता, त्याला रखमाच्या कुशीत शिरायचे होते, माकडांना गोंजारायचे होते, राम्या चंदाला शेवटचे कडकडून भेटायचे होते. पण या नव्या आनंदाचा पहारा कडक होता. तो वळला, व एकदाही मागे वळून न पाहता पोलिसांच्या गाडीत जाऊन बसला.

गाड्या निघाल्या. प्रथम पोलीस चौकीत आल्या. आजोबांना निरोप गेला. ते अक्षरश: धावत आले. याला पाहताच क्षणभर अवाक होऊन पाहत

राहिले. नंतर मात्र पुढे धावत येऊन त्यांनी आनंदास कवेत घेतले व लहान मुलासारखे रडू लागले. शेवटी पोलिसाने येऊन त्यांना सावरले.

देशमुखही आले. दिवाणही आले. याची परिस्थिती पाहून सगळेच हैराण झाले. पण हे केवळ बाह्य रूप होते. आतून झालेले बदल लक्षात येणं कठीण होतं. आजोबांनी मग त्याला आपल्यासमोर घेऊन त्याच्या डोळयांत पाहिलं आणि त्यांचं मन चरकलं. काहीतरी बदललं होतं. काय ते सांगणं अवघड, पण बदललं होतं हे खासच! त्या म्हाताऱ्या अनुभवी नजरेने जे पाहिलं त्याने त्यांचं मन धास्तावलं.

सर्व कागदपत्र, सोपस्कार, पूर्ण झाल्यावर दिवाणांनी दोघांना घरी सोडलं. आजीने याला पाहून टाहो फोडला. त्याच्यासमोर लोटांगण घातले तिने चक्कं. तोंडाने माफी मागत राहिली. आनंदाने तिला फक्त उठवले. मग तो कळशी व कपडे घेऊन सरळ विहीरीवर गेला. भराभर कळशा काढून अंगावर घेत त्याने आंघोळ केली. साबण कित्येक दिवसांचा मळ धुवून काढत राहिला. केसाला तेलपाणी, स्वच्छ कपडे याने बराचसा पूर्ववत दिसू लागला.

आरशात पाहताना अचानक त्याला सलूनच्या आरशातलं आपलं रूप आठवलं. बाह्यदर्शनाने किती फरक पडतो याची तीव्र जाणीव कायमची कोरली गेली.

आजीने रांधलाच होता स्वैपाक, तिघे गप्पं जेवले. आजी आजोबा अधून मधून एकमेकांकडे पाहत होते. बोलले नाहीत काही.

जेवणे झाल्यावर आनंदाने ताटे उचलली, सगळी खरकटी भांडी घेऊन तो विहीरीवर निघाला.

“अरे, राहू देत रे बाळा, मी करते.”आजी म्हणालीं.

."करेन मी" एवढंच बोलून तो विहिरीकडे वळला. तार मिळताच घरात आनंदी आनंद झाला. आता गाडीची वेळ टळून गेलेली. अनंता आणि अनुराधेने रात्र जागून काढली. दुसऱ्या दिवशी सकाळीच निघाले. दुपारी पोहोचले. अनुराधेने मिठीत घेत पटापट मुके घेतले आनंदाचे. अनंतानेही कुरवाळले.

“बाबा आम्ही सध्या याला घेऊन जातो.” अनंता म्हणाला. क्षणभर कोणीच काही बोललं नाही. मग आजोबानी फक्त मान हलवली. आजीने पदर लावला डोळयांना. आजोबांची नजर खंतावली. खरंतर सगळयांनी त्याला रागावतील, ओरडतील, ही आनंदाची अपेक्षा, पण तसं काहीच घडलं नाही.

प्रदीप, प्रज्ञा, आपणहूनच भेटायला आले. त्याने चित्रांनी भरलेली वही त्यांना दिली.

निघताना त्याने आजी आजोबाना नमस्कार केला, आणि मागे वळूनही न पाहता तो निघाला. आजी आजोबांच्या डोळयात आसवं मावेनात. इकडे आनंदाचे डोळेही चुरचुरले. पण त्याने ओठांवर ओठ दाबून धरले घट्ट. तिघे परतीच्या प्रवासाला लागले.

२-३

रामनगरला पोहोचेपर्यंत सायंकाळ उलटून गेली होती. जवळपास चार महिन्यांनी आनंदा गावात येत होता. या चार महिन्यात या मुलात आमुलाग्र बदल झाला होता. गेलेला आनंद आणि परतलेला आनंद यात दिसण्याशिवाय काहीच साम्य नव्हते. याची चाहूल त्या रात्रीच अनुराधेला लागली. रात्री जेवायला बोलावले तिने सर्वांना. तसा आनंदा भराभर आत आला. त्याने काही न बोलता भराभर ताट पाट, मांडले. पाणी पेले, सगळी जय्यत तयारी केली. "तू भाकऱ्या कर, मी वाढतो" म्हणाला. पण हे करताना तिच्याकडून कोणत्याही कौतुकाची अपेक्षा त्याच्या चेहऱ्यावर नव्हती. सर्वसाधारणपणे लहान मुले जशी एखादे नवे काम शिकली असतील तर मोठ्यांना ते उत्साहाने करून दाखवतात, तो उत्साह, ते हसू कुठेच चेहऱ्यावर नव्हतं. निर्विकारपणे तो हे करत होता आणि अनुराधेने ते नेमकं हेरलं.

आण्णांना तिने आनंदाला आणायला जातानाच विनवलं होतं, "तुम्ही रागावलेले आहात त्याच्या या अशा वागण्याने. पण काही दिवस तरी इकडे घेऊन यावं असं वाटतय. तुम्ही काही बोलू नका फक्त त्याला. पोर गमावून बसू आपण."

आण्णा त्यामुळे अगदी गप्पं होते. अण्णा, चंदू, पुष्पा, अनंता सर्व बसले. आनंदने वाढले सर्वांना. 'आजीच्या हाताखाली चांगलाच तयार झालाय पोरगा.'आण्णांच्या मनात विचार आला. "आता रोज रात्री तुम्ही मुलं आलटून पालटून करा वाढण्याचं काम". आण्णा म्हणाले. चंदू व पुष्पाने

मान हलवली. मग आनंदा व अनुराधा बसले जेवायला. मागचं सगळं आवरूनच बसले. अनुराधेने पहिला घास भरवला आनंदाला. त्याने तो घेतला व निमुटपणे आपल्या ताटातले जेवू लागला. तो आपल्याला बिलगेल, निदान जवळ येईल ही अनुराधेची आशा धुळीस मिळाली. पण तिने काही बोलणे टाळले.

रात्रीही एकटाच वेगळा झोपला पडवीत. अनुराधेची कुस मात्र आसुसून आली लेकाला जवळ घेण्यासाठी. तिच्या या कुशीला पुढे बरीच वाट पाहायला लागणार होती याची मात्र तिला तेव्हा कल्पना नव्हती.

तिला राहवले नाही. ती रात्री त्याच्या जवळ बसून डोक्यावरून हात फिरवू लागली. आनंद उठून बसला तट्‌कन. अनुराधेने जवळ घेऊ पाहिला. “आई, मी ठीक आहे. तुला काळजी वाटते, मी परत असे काही करेन म्हणून! तुला शब्द देतो असं परत होणार नाही. तू झोप निश्चिंत!”

बस! एवढंच! तो परत तोंडावरून पांघरूण घेऊन झोपून गेला.

अनुराधेने मग फक्त एकदा थोपटले व ती आत गेली. ‘पोर मोठं होतय!’ मनात म्हणाली. अनुराधेच्या पायांचा आवाज दूर गेल्यावर मात्र अडवून ठेवलेला हुंदका आनंदाच्या तोंडातून बाहेर पडला.

आनंद वयाने मोठा होतंच होता, पण आतलं बाल्य संपूर्ण संपलं नव्हतं. गेल्या चार महिन्यात आजोबांकडून त्याने अनेक चांगले धडे घेतले होते, पण त्याहीपेक्षा जास्त गेल्या आठ दहा दिवसातले दाहक धडे त्याला

नको इतकं कोरडं करून गेले होते. शंकऱ्याचं वागणं त्याला माणूस म्हणून नव्याने घडवत होतं. या जगात कमकुवतपणा, मग तो मनाचा असो की शरीराचा, काही कामाचा नाही. हे त्याच्या मनातून झिरपत रक्तात उतरलं होतं जणू. 'प्रेम, जिव्हाळा, हे सगळं आत लपवून ठेवायला हवं. बाहेर ते कुचकामी ठरतं. बाहेर चालतो आणि मानला जातो तो कडकपणा! बस्स! घरचे असोत किंवा दारचे, कोणी फुकट का म्हणून आपल्यासाठी काही करावं? त्याची परतफेड व्हायलाच हवी. कोणी विनाकारण काठी मारली तर मी दंडूक्याने बडवेन.' हे आणि असे अनेक विचार त्याचा मेंदू करत राही.

आजोबांनी दिलेली शिकवण मात्र पुसली गेली नव्हती. सारासार विचारांची त्यांनी लावलेली सवय कायम होती. आयुष्यात पुढे अनेकदा या सवयीने आनंदाला आततायी कृत्यांपासून वाचवले. त्या दिवसापासून आनंदाचे जुन्याच लोकांबरोबर नवे आयुष्य सुरू झाले. ज्या अवहेलनेला, टोमण्यांना, मारझोडीला आठवून तो घरी परतण्याचे टाळत होता तिचा सामना करण्यासाठी तो सज्ज झाला होता.

तो बदलला होता. पण आसपासच्या लोकांचं मत बदलणार नव्हतंच लगेच. दुसऱ्याच दिवसापासून याचा प्रत्यय येऊ लागला. वसंता, वासंती वरूणला घेऊन सकाळीच शेतातल्या घरी आलें. "काय आनंदा? काय काय दिवे लावलेत? आम्हाला सुखाने जगू दिलं नाहीसच. तिकडे आजी आजोबांच्याही जीवाला घोर लावून ठेवलास."

"जाऊबाई!" अनुराधेने वासंतीला रोखण्याचा प्रयत्न केला.

“अनुराधे, तुम्ही बोलत नाही ना, म्हणूनच थेरं आहेत ही सगळी. आता परत भरा याच्या फिया म्हणून सांगशील. पैसे झाडाला उगवतात असं वाटतं या पोराला. उठून आजोळी गेला काय, चोऱ्यामाऱ्या काय केल्यान, मग काही मार्गच उरला नाही तेव्हा पळूनच गेला घरातून. खायचे जेवायचे वांदे झाले तेव्हा अक्कल आली. मग आला परत घरी. आता वर आणि याला बोलू नका!”

“जाऊबाई! पाया पडते मी तुमच्या!”

“नको आई, तू नको अडवूस काकूला. बोलू दे तिला.”

“काकू, मी घरातून पळून गेलो ही चूकच होती माझी. पण चोरी मारी काही केली नाही. खायचे वांदे झाले म्हणून परत आलो असंही नाही. आता शिक्षण घेईन ते स्वत: फी भरूनच.”

“वा! अकलेचे तारे तोडा आणखी वर! तू स्वत: फी कुठून रे भरणार? चोऱ्या करणार?”

“काकू!” अचानक आनंदाचा स्वर टीपेला गेला. कपाळाशेजारची नस तडतड उडू लागली. सगळेच दचकून त्याच्याकडे पाहू लागले. परत स्वर खाली आणत, पण ठामपणे तो म्हणाला, “मी चोरी कधीच केलेली नाही. करणारही नाही. अंगमेहनतीने कमवेन मी पैसे. पळून गेलो त्या आठ दिवसांनी मला हे शिकवलं. पैसा कमावता येतो.”

मग तो तिथे थांबला नाही. मगाशीच लाकडाच्या ढलप्या चुलीसाठी हव्यात असं आई म्हणत होती बाबांना. तो त्या काढायला कोयती घेऊन निघाला.

सगळे नुसते अवाक होऊन पाहत राहिले त्याच्याकडे. वासंती फणफणत निघून गेली. अनुराधा अधिकच अस्वस्थ झाली. अनंताला स्वतःचंच पण सुधारित रूप दिसलं आनंदामधे. तोही दुसरी कोयती घेऊन परड्यात गेला.

२.४

आनंदची दिनचर्या हळूहळू पूर्ववत होऊ लागली. शाळेत नाव घातलं. तिकडच्या शाळेचा दाखला व प्रशस्तीपत्रक पाहून, आणि परत एक परीक्षा घेऊन, सहावीत प्रवेश मिळाला.

त्याचं बदललेलं अक्षर पाहून मराठीच्या बाई चकित झाल्या. हळूहळू गणिताच्या गुरूजींनाही याची गणितातली प्रगती दिसायला लागली. त्यांच्या शाबासक्यांनी जी खुशी दिसायला हवी होती ती मात्र आनंदाच्या चेहऱ्यावर कोणालाच दिसली नाही.

गणपती जवळ आलेच होते. बऱ्याच ठिकाणाहून मोदकाच्या ऑर्डरी होत्या. तळणीच्या मोदकांच्या, मावा मोदकांच्या पॅकेटसनाही जिल्ह्याच्या ठिकाणाहून चांगली मागणी होती. गणपतीच्या आधी चार दिवसांपासून पुरवठा सुरू करायचा होता. अनुराधेची एकच धांदल उडाली होती. तांदुळपिठीचे तांदूळ धुवून सुकवून,गहू, दळणासाठी तयार होते. नारळ उतरवून ठेवले होते ते सोलायचे होते. अनंताचीही सततची कामं सुरूच होती. आनंदा सर्व पाहत होता. जमेल ती कामं करायला न सांगता पुढे होत होता. अचानक आधी न जमणारी कामं आपल्याला जमायला लागली आहेत, पूर्वी जिथे हात पोहोचत नव्हते तिथे पोहोचू लागलेत असं त्याच्या लक्षात आलं होतं आणि याचा मात्र त्याला आनंद झाला होता.

एका धनिकाघरी गणपतीनिमित्त बरीच पाहुणेमंडळी यायची होती. त्यांनी सरळ दिवाळीसारखा फराळच मागितला होता. आज अनुराधेला तो

पोहोचवायचा होता. तिने डबे भरून ठेवले. अनंताची वाट पाहत होती तेवढ्यात मुलं आली शाळेतून.

“हे आले की आम्ही हे फराळाचं पोहोचवून येतो रे, झाकून ठेवलाय खाऊ तो तुम्ही खाऊन घ्या.” अनुराधा नारळ खवत बसली होती तिने सांगितलं.

“आई मी येऊ का? बाबा गिरणीत दिसले. बरीच गर्दी होती.”

“बरं, खाऊन घे आधी, मग जाऊ!” चकली, चिवडा, लाडू मुलांची आज चंगळ झाली.

मग दोघं निघाली. आनंदाने पिशव्या लिलया उचलल्या.

“अरे सगळं नको, थोडं दे माझ्या हातात.” अनुराधेने दोन पिशव्या घेतल्याच काढून. त्यांच्या घरी गणपतीच्या आराशीची तयारी चाललेली. अनुराधा सामान घेऊन आत गेली. आनंदा बाहेरच थांबला बघत.

पुठ्ठे, कलाबूत, रंगीत कागद, डींक, चमकी, दोरे, मणी, मोती. त्याचे हात शिवशिवायला लागले. “मोर आणि रथ, करा ना मस्त.” तो नकळत बोलून गेला.

सगळे वळून पाहू लागले.

“तुला येतो मोर करायला?” काकांनी विचारलं.

“हो, सोपा आहे.” असं म्हणत आनंदाने भराभर समोरच्या पाठकोऱ्या कागदावर मोराची मान, पिसारा, असं वेगवेगळं रेखाटलं. मग कापून ते जोडून दाखवलं.

“असं पुठ्ठ्यावर कापून करायचं. मग रंगवायचा. आणि मधे रथ जोडायचा.”तो छोटासा कागदी मोर पाहून सगळे हरखलेच.

“तू देशील करून?”

“हो देईन की. गणपती कशावर बसवणार? तो पाट चौरंग काय ते दाखवा. म्हणजे माप बरोबर होईल.” आनंदा उत्साहाने म्हणाला.

अनुराधा बाहेर आली तेव्हा आनंदा मापं घेण्यात आणि बाकीचे त्याच्या भोवती कोंडाळं करून ते पाहण्यात गुंगले होते.

“आनंदा!”

त्याने वर पाहिले. कित्येक दिवसांनी ती पूर्वीची चमक तिला त्या डोळ्यांमधे दिसली.

“आरास करताय का? करा करा. अंधार व्हायच्या आत ये बरं आनंदा घरी.”

“होय आई!”

“तासाभरात पाठवतो मी.” ते काका म्हणाले.

बघता बघता मापं घेणे, ड्रॉईंग काढणे, वगैरे सोपस्कार झाले. तास कधी गेला कळलंच नाही. मग काकाच म्हणाले, “आनंदा, उद्या येशील परत करायला? आता अंधार पडेल. तुझी आई वाट पाहत असेल.”

आनंदाने कापलेले पुठ्ठे, बाकीचे सामान, भराभर व्यवस्थित भरून, बांधून ठेवले. ‘उद्या शाळेतून सरळ इकडेच येतो’ असं सांगून निघाला. काका या गुणी मुलाकडे पाहत राहिले. घरी परत जाताना त्याच्या पावलांमधे ती दुडकी उड्यांची चाल परतली आज. घरी पोहोचला तर अंगणात आण्णा बसलेले.

“काय रे कुठून येतो आहेस तिन्हीसांजेचा?”

“गणपतीची आरास करायला थांबलो.”

अण्णांनी एक नकारार्थी मान हलवली. पण बोलले नाहीत काहीच. पण त्या एका मानेच्या झटक्याने आनंदा थेट जमिनीवर आला. तो आत जाऊन हातपाय धुऊन, चंदू पुष्पासह शुभंकरोती म्हणायला बसला. जेवणं झाली. आज पुष्पाचा वार होता पाटपाण्याचा. आनंदा जेवण झाल्यावर सरळ बाबांच्या खोलीत गेला.

“बाबा!”

“अरे आनंदा! ये रे. बोल बाळा.”

“बाबा, माझी फी किती आहे शाळेची?”

“आनंदा!” त्याने पटकन आनंदाला जवळ घेतले. “बाळा तू नको काळजी करूस त्याची. तुझी आई आणि मी मिळून जे काम सुरू केलंय ना त्यातून तुझी फी नक्की भरू आम्ही. चांगले मिळतात पैसे त्यात.”

“हो माहित आहे मला. आजीला सगळा हिशोब मीच द्यायचो करून.”

“हो का? अरे वा. तू, चांगला अभ्यास कर. मोठा कोणीतरी बन.”

“हो बाबा.”

तो खालमानेने बाहेर पडला. दुसऱ्या दिवशी शाळेत गेल्याबरोबर तो ऑफिस मधे पोहोचला.

“सर, सातवीची किती फी आहे?” क्लार्क सरांनी चष्म्याच्या वरून पाहिले.

“तुला कशाला रे?”

“आईने विचारून यायला सांगितलय.”

“हं! एकूण सगळी मिळून सात हजार तीनशे.”

“बाप रे!” तो मनात म्हणाला. त्याने मान हलवली.

‘कसे मिळवणार आपण एवढे पैसे?’डोक्यात चक्र फिरू लागली.

‘शंकऱ्याला आपण एकूण सहाशे रुपये दिले. आईला दिले दीडशे.’

‘म्हणजे तेव्हा साडेसातशे रुपये मिळाले की आपल्याला.’

'रंगकाम केलं तर मिळतील पैसे. पण आण्णा? मारतीलच ते. काय करावं?'

संध्याकाळी त्याच विचारात आरास करायला पोहोचला. काकूंनी खाऊ दिला. आईनेच केलेला. खाऊन भराभर कामाला लागला. आकार कापून, जोडून पाहिले. नुसता सांगाडाही सुबक दिसत होता. मग कागद चिकटवून ठेवले. रथाचीही कात्रणं करून कागद चिकटवून झाला. एक एक गोष्ट आकार घेऊ लागली तसा मोठ्यांचाही उत्साह वाढला. सगळेच आळीपाळीने येऊन पाहून जाऊ लागले. मग परत सगळं आवरून ठेवून आनंदा निघाला.

"किती गुणी मुलगा आहे अनुराधेचा." काका पत्नीला म्हणाले. "त्याला छानसं बक्षीस देणाराय मी आरास केल्याबद्दल. किती एकाग्रतेने करतो काम. हात कलावान. पाहत राहावसं वाटतं तो काम करतो तेव्हा."

सगळी आरास पूर्ण झाली तेव्हा फार सुंदर दिसत होते रंगवलेले मोर, त्यांना जोडलेला रथ. सगळंच. "काका, मी जागेवर लावूनच जातो सगळं. मग गणपती आणाल तेव्हा तयारच मिळेल. लाईटच्या माळा लावल्या तर रथाची चमकी मस्त चमकेल."

"हो, लावूया की. दर्शनाला ये रे नक्की."

"हो." म्हणून तो निघाला.

काका म्हणाले, "आनंदा तुला काय बक्षीस देऊ?"

“नको काहीच.”

“मला द्यायचय.”

“मी हे राहिलेले पुठ्ठे, थोडे कागद नेऊ?”

“अरे ने की. ते तर नेच. पण बक्षीस काय देऊ?”

“बस एवढंच द्या.”

मग काका काही बोलले नाहीत. त्यांनी मोठ्या पिशवीत ते सर्व भरलं सामान, आणि दिली पिशवी आनंदाला. आनंदाच्या चेहऱ्यावर हसू फुललं.

तो भराभर घरी आला. त्याने लहान लहान चक्र, महिरपी, फुलं, असं बरंच काही बनवलं रात्री बसून त्या सामानातून.

दुसरे दिवशी अनंता माल पोहोचवायला जिल्ह्याच्या गावी निघाला तेव्हा आनंदाने ते सामान त्याला दाखवले.

“बाबा हे पण दाखवा त्या दुकानदारांना. विक्रीसाठी ठेवत असतील तर बघा.”

“अरे, कधी केलंस हे सगळं? किती छान केलं आहेस. आईला दाखवलंस?”

“नाही. जिथे फराळ पोहोचवायला गेलो त्यांची आरास करून दिली. मग त्यांनी हे सामान दिलं. तुम्ही आधी विचारा तरी दुकानदारांना.”

“बरं, ठेव ती पिशवी. सांभाळून न्यायला हवी.”

संध्याकाळी अनंता आल्या आल्या अनंताने आनंदाला हाक मारली.

"आनंदा, हे घे, अजून सामान. आज दुकानात खाद्यपदार्थ घ्यायला आलेल्यांनी सगळं घेतलं. वर अजून उद्यासाठी मागवलय. ही बघ लीस्ट."

आनंदा पाहत राहिला. कट्ट्यावर बसलेले आण्णाही.

"बाबा, माझ्या फीमधले किती जमतील पैसे?"

अनंताने त्याच्या डोक्यावरून हात फिरवला. "वर्षभरात तू तुझा शाळेचा सगळा खर्च भरून काढशील. दुकानदार म्हणाले आता दिवाळीच्या आधी १५ दिवस आकाशकंदील आणा बनवून. पण, पैसा मिळवण्याच्या नादात अभ्यासाकडे दूर्लक्ष नको बरं बाळा!"

"हो बाबा! अभ्यास करूनच करेन सगळं."

मग अनंताने दोन नोटांचे गठ्ठे एक मोठा, एक अगदी छोटा, आण्णांच्या हाती ठेवले. "हे पदार्थांचे, हे आनंदाच्या वस्तुंचे."

आण्णा उठले. त्यांनी दोन्ही गठ्ठे देवासमोर ठेवले. हात जोडले. मुलं हातपाय धुवून शुभंकरोती म्हणायला बसली.

२.५

आनंदचा वरवर पाहता दिनक्रम नेहमीसारखाच होता. म्हणजे चंदू, पुष्पाबरोबर तो शाळेत जात होता. बरे मार्क मिळतील इतपत अभ्यास करत होता. मुलांबरोबर खेळतही होता. पण एक मुख्य बदल त्याच्यात झाला होता जो आंतरीक होता. सर्वसाधारणत: या वयातील मुलं, सांगितलेलं ऐकतात किंवा सांगितलेल्याचा विरोध करतात. समोरचा जे सांगेल, बोलेल, करेल, त्यावर प्रतिक्रिया देण्यापूरता विचार सुरू झालेला असतो. पण आपणहून म्हणून वेगळा विचार, जो या प्रतिक्रियांच्या पलिकडचा असतो, तो फारसा सुरू झालेला नसतो. निदान प्रकटपणे सुरू झालेला नसतो. काहींच्या बाबतीत तर कायम प्रतिक्रियेच्या रुपातच तो आयुष्यभर राहतो. आनंदच्या बाबतीत मात्र, हा असा मूळ विचार, बराच लहान वयात सुरू झाला. या स्वयंप्रेरित विचारशक्तीमुळे त्याच्या प्रतिक्रियाही बऱ्याच संयत होऊ लागल्या. समोरचा काहीही म्हणाला तरी ती गोष्ट स्वत:च्या विचारांच्या दगडावर घासून पाहण्याच्या सवयीचा उगम याच काळात झाला. पण यामुळे उस्फूर्त प्रतिक्रिया त्याच्याकडून येईनाशा झाल्या. सगळेच जण काहीसे जपून वागू लागले. त्याचं न संतापणं सूप्त ज्वालामुखी आहे असं काहींना वाटलं.

अनुराधेचं मन, आपल्या बाळाचं बाल्य असं अकाली खुडलं गेल्याचं पाहून, विद्ध झालं. तिला आपल्या बाळाने पहिल्यासारखं उस्फूर्त वागावं असं वाटे. हसावं खळखळून, बोलावं भरभरून, कुठूनही येऊन गळ्यात

पडावं. हट्ट करावा, रात्री बिलगून झोपावं आपल्या कुशीत. मूल मोठं होताना प्रत्येक आई काही प्रमाणात या भावनांना सामोरी जातेच. पण अनुराधेच्या बाबतीत ते जरा जास्तच लवकर आणि अचानक घडत होतं. आनंदामधले बदल वाईट होते असं नव्हतंच. किंबहुना आजपर्यंत सगळे जे कर म्हणत होते, ते सगळं तो करत होता, आणि तरी सगळे अस्वस्थ होते.

एकटा अनंता त्याला समजू शकत होता. जे आपलं चुकतंच गेलं ते आपला मुलगा बरोबर करतोय असं त्याला वाटत होतं. आनंदाची मन:स्थिती तो समजू शकत होता. ‘बाबाना कळतंय’ हे आनंदालाही कुठेतरी जाणवत असावं. तो जास्त करून कधी वाटलंच तर अनंताला जाऊन सांगे. एखादं केलेलं काम, मनात सुचलेली कल्पना.

बऱ्याचदा आनंदा एकटाच पायी फिरायला जाई. कधी डोंगरमाथे, कधी खळाळत्या ओढ्याकिनारी, कधी आमराईत तर कधी दूरच्या पडीक शिव मंदिरात. कधी तासंतास भटकंती चाले. कधी नुसताच बसून राही तर कधी झरझर चित्रं काढली जात. याकाळात अनेक पक्षी, अनेक रानफुलं त्याचे मित्र झाले. निरीक्षण वाढलं. ते चित्रांतून उतरू लागलं.

एकदा असाच त्या पडक्या शिव मंदिराच्या वरच्या डोंगरावर फिरत फिरत गेला. एक छोटीशी पायवाट, अगदी घनदाट झाडी. वरच्या झाडीच्या जाळीतून गाळून आलेल्या सूर्यप्रकाशाची नक्षीही जेमतेम दिसत होती. हातात काठी होतीच. हवेत ओल्या झाडीचा, रानफुलांचा, शेवाळ्याचा, बुरशीचाही, एक मिश्र वास. चांगलाही नाही आणि वाईटही नाही.

आनंदा आपल्या तंद्रीत निघालेला. पायवाट दिसेनाशी झाली. वर दाट झाडी, खाली फुटभर गवत, सतत लक्ष पायात ठेवूनच चालायचं. काठी समोर आपटूनच पुढे जायचं. पण ते सगळं सवयीने. त्यासाठी मन गुंतवायची गरज नव्हती. तंद्रीत बराच आत शिरला. वरच्या गर्द झाडीच्या जाळीने वेळेचंही भान सुटलं असावं.

अचानक धप्पं उडी मारून तो सामोरा ठाकला. तंद्रीत चाललेला आनंदा दचकून दोन पावलं मागे धडपडला. अंगात अत्यंत मलीन कफनी, केस, दाढी, नखं वाढलेली, डोळे तारवटलेले, त्यांच्यात एक क्रुद्ध भाव. त्याच्या कपड्यांची दुर्गंधी लांबूनही जाणवत होती नाकाला. आनंदा आणखी दोन पावलं मागे सरकला. काही वेळ दोघंही नुसते एकमेकांकडे पाहत राहिले. एक तिरसटलेल्या तारवटलेल्या क्रुद्ध नजरेने, दुसरा अत्यंत भेदरलेल्या नजरेने.

हळूहळू ती क्रुद्ध नजर मवाळ झाली. त्याने हात पुढे केला. आनंदाने नकळत काठीवाला हात पुढे केला. कफनीवाला मागे सरकला. मग काहीसं लक्षात येऊन आनंदाने खिशात हात घातला. शेंगदाणे होते कागदात बांधलेले, त्याने पुडी समोर धरली. कफनीवाल्याने ती हिसकाऊन घेतली. सरसर वर चढला. आनंदाने वर पाहिले तर मचाण बांधलेलं दिसलं त्याला. कफनीवाला रंगीत हातांनी शेंगदाणे खात होता. पायही रंगांनी भरलेले.

‘रंग!’

“मी येऊ वर?” आनंदाने विचारले.

कफनीवाल्याने जोरजोरात हाकलल्यासारखे हात हलवले. आनंदा तरीही थांबला काही वेळ. कफनीवाल्याने मोठ्ठा धोंडा उगारून दाखवला. नकळत आनंदा पळत सुटला मागे. तडक पायथ्याशी येऊन थांबला. धडधडत होतं छातीत. एकदा डोंगराकडे नजर टाकून परत फिरला. आभाळ भरून आलेलं. झाकोळून. 'पावसाच्या आधी घर गाठायला हवं!'

'घर!'

'तो कफनीवाला? त्याचं घर? ते मचाण! कसली मजा! आणि त्यात रंग!'

ते रंग काही आपली पकड सोडेनात.

'त्याने मारला असता तो धोंडा आपल्या डोक्यावर? मारायचा असता तर आधीच मारला असता. भीती दाखवत असावा. भूक लागलेली त्याला. किती अधाशासारखे खाल्ले त्याने दाणे.' विचारांनी गर्दी केली. पाय भराभर निघालेले घराकडे.

दुसऱ्या दिवशी घरातून निघताना त्याने पोळी भाजी बांधून घेतली कागदात. आईने विचारलं तर शिव मंदिरात जातो म्हणाला. सरळ डोंगरावरून चालत पुढे पुढे जात राहिला. पण ते मचाण कुठेच दिसेना. 'पायवाट संपल्यावर दिशा चुकली वाटतं आपली. काल काहीतरी खूण ठेवायला हवी होती.'

बराच फिरला. दमणूक झाली, पण वेडा पीर, त्याचं मचाण काही दिसेना. हिरमुसून परत निघाला. म्हणजे अंदाजानेच. रस्ता असा नव्हताच. पायवाट दिसेपर्यंत चालणं भागच होतं. बालमन घाबरलं, पण त्याहीपेक्षा पीरबाबा भेटेना म्हणून हिरमुसलं. कागदाची पूडी तिथेच झाडाला अडकवून निघाला. कसाबसा पायवाटेपर्यंत पोहोचला. पायांना बरंच खरचटलं होतं. रबरी स्लीपर, कितीसं संरक्षण करणार? पण त्याचं भानच कुठे होतं? मन मात्र पार खट्टू झालं. 'कुठे असेल नेमकं ते मचाण? कसा विसरलो रस्ता?' काहीच कळेना.

पुढचा एक आठवडा पीरबाबा आणि त्याचं मचाण हुलकावण्या देत राहिलं. रोज खायला घेऊन आनंदा डोंगरावर जाई. सगळी झाडी पिंजून काढली. पीरबाबा मात्र छू मंतर झालेला.

गणपतीची सुटी संपली. आनंदाच्या आराशीच्या वस्तू भरपूर खपल्या. आईबाबांचा व्यवसायही चांगला झाला. उद्याचा रवीवार झाला की शाळा परत सुरू.

पुढचा पितृपंधरवडा. पहिल्या दिवशी पक्ष होते घरी. वेगळाच स्वैपाक रांधलेला नेहमीपेक्षा. सगळी जणंच आलेली. जेवणं बरीच उशीरा झाली. मग सगळेच लवंडले. आनंदा एका डब्यात खीर आणि कागदात वडे बांधून निघाला. आज तरी सापडायलाच हवा हा.

भराभर निघाला. पार आत झाडीत घुसला. याच्या पायांबरोबर आणखी कोणाच्या चालण्याचा आवाज येई. हा थांबला की आवाज बंद! चालत राहिला. अधून मधून वर पाही, मचाण नव्हतंच कुठे.

अचानक मागून पीरबाबा आला आणि हात पुढे करून उभा. आनंदा दचकलाच आधी. मग सावरला.

“कुठे गेलेलात? किती शोधलं मी तुम्हाला. रोज येत होतो. जेवण पण आणलेलं. पीरबाबाने पसरलेले हात ‘दे लवकर’ असे हलवले. आनंदाने पुडीवाला हात मागे नेला.

“मला आधी मचाण दाखवा तुमचं!.”

पीरबाबा भडकला. आकांडतांडव केल्यासारखा याच्या समोर फिरू लागला. तरी आनंदा तसाच उभा. हात मागे ठेऊन. प्रचंड वैतागला पीरबाबा. उचकल्यासारखं चल म्हणून हात केला व पुढे चालू लागला. आनंदा मागून चालता चालता खुद्कन हसला.पीरबाबा सरसर चढला वर. मागून आनंदा. खालून दिसत होतं त्यापेक्षा ते मचाण बरंच मोठं होतं. त्यावर चक्कं एका बाजूला एक मोडकळीला आलेली कॉट, एका बाजूला चक्कं इझल. त्यावर काहीतरी अनाकलनीय रंगवलेलं अर्धवट चित्रं. तो समोर जाऊन उभा राहिला. प्रथम काहीच कळेना. कसलं चित्र हे. ना आकार ना उकार. रंगांचे फटकारे नुसते, ते पण निराळेच!

पण रंगवण्याचं कसब अचाट अफाट खेचक! आनंद पाहातच राहिला संमोहित झाल्यासारखा. ‘ते रंग असे चक्कं एकातून दुसऱ्यात वाहताहेत जणू! चक्कं रंगांना आपलं असं एक व्यक्तीत्व मिळालं असावं. ते जणू त्यांची एक कहाणी सांगत असावेत, आपणहूनच!’

असं काही तो जन्मात प्रथमच पाहत होता. वेडावल्यासारखा. रोमांचांच्या सरीवर सरी त्या लहानग्या कलाकाराच्या मनात आणि मनातून शरीरभर पसरत होत्या. काहीतरी प्रचंड सुंदर, पण अनाकलनीय असं काहीसं घडत होतं. आणि त्यात कलेवर जीवापाड प्रेम करणारा तो लहानगा जीव वाहत चालला होता. एकाच वेळी प्रचंड वेगाने आणि प्रचंड आवेगानेही.

आणि तो प्रतिभावान, पण दुर्दैवी कलाकार, खाली बसून खीर पोळी अधाशासारखा ओरपत होता. आत्ता नाही तर कधीच मिळणार नाही अशा भावनेने. अत्यंत विरोधाभासी चित्र होतं ते. पीरबाबाला दुसरा कोणी तसे ते उकिडवे बसून अधाशासारखे अन्नं तोंडात कोंबताना पाहता तर घृणेशिवाय कोणत्याच भावनेला थारा न मिळता. पण आनंदला ते दिसतंच नव्हतं. त्याला दिसत होती ती आभाळाएवढी अफाट कला.

खाऊन झाल्यावर पीरबाबा उठला. त्याने एका फडक्याला आपले हात, तोंड पुसले. मग तो त्या चित्रमय, रंगमय झालेल्या पोराकडे, टक लावून पाहू लागला. कसली तरी खूण पटत चालली. ‘हेच ते वेड. आयुष्यातून उठवणारं आणि बाकी कोणत्याच ‘आयुष्य’ नावाच्या गोष्टीची गरज वाटू नये असं वेड. सगळ्या आपल्यांना तोडणारं, ते तुटले तर आपण संपून जाऊ, हा

केवळ आभास होता, हे वारंवार पटवून देणारं वेड. श्वासाइतकंच अत्यावश्यक असणारं, प्रत्यक्षात रात्रंदिवस तळमळायला लावणारं, गुदमरवणारं, घुसमटवणारं आणि जेव्हा अविष्काराची वेळ येई तेव्हा सर्वोच्च आनंदाचे क्षण बहाल करणारं वेड! झपाटलं याही पोराला. आता सुटका नाही. आता सुटका नाही. जगासाठी निकामी होण्याआधी ताळ्यावर ये पोरा! आवर त्या वेडाला. आवळ मुसक्या त्याच्या. हावी झालं की खेळ खल्लास!'

प्रत्यक्षात तो मुका पीरबाबा नुसता वेड्यासारखे हातवारे करत राहिला.

अत्यंत भीतीदायक दिसत होता तो. पण आनंदाला तो दिसतच कुठे होता? त्याला दिसत होतं अनाकलनीय, पण नितांतसुंदर, अर्धवट ठेवलेलं पण तरीही बरंच बरंच काही सांगणारं ते चित्रं!

किती वेळ तो त्या चित्रासमोर उभा होता कोण जाणे. ना वेळकाळाचं भान, ना स्थळकाळाचं! अचानक अंधारून आलं, चित्रं अंधूक दिसू लागलं तसा भानावर आला.

'घरी सगळे वाट पाहत असतील. डबा घेतला, मचाणावरून खाली उतरला सर्र्कन. खरचटलं, पण बघायला वेळ नव्हता. पूर्ण अंधार पडायच्या आत खाली उतरून जायला हवं. घरी वाट पाहत असतील. रागावतील. ओरडतील!' पळत सुटला वेड्यासारखा आणि अचानक लक्षात आलं, रस्ता चुकलाय. आता?

आनंदा थांबला. घाईत काठी मचाणाखालीच राहिली. क्षणाक्षणाला अंधार वाढत चाललेला. घाबरला, भेदरला, रडकुंडीला आला, पण थांबून चालणार नव्हतं. इथे कोणी नव्हतंच मदतीला. परत निघाला उताराच्या दिशेने. पाऊस सुरू झाला. गवत संपून पायवाट लागली. 'चला दिशा तर बरोबर आहे.' पण पाऊलवाटेवर पाय सटकायला लागले. चिखलात पाय रुतायलाही लागले. मगाशी कोरडी होती. पाऊस कोसळून गेला असावा.

धडपडत उतरला खाली. घरी गेला. चिखलाने माखला होता. बऱ्याच पाहुण्यांमुळे सुदैवाने याची अनुपस्थिती फारशी जाणवली नसावी. तसाच परसदारी जाऊन आंघोळ करून आला.

डोकं, मन, हृदय, सगळे त्या चित्रात गुंतलेले. कसलंच भान नाही. कसाबसा जेवला. शरीर प्रचंड दमलेलं पण झोपेला त्या चित्राने, त्या रंगांनी गिळलं. आता कुठली झोप? उठला, माळ्यावर गेला. रंगात बोटे बुडवली आणि कागदावर रंग पसरत गेले. एकात एक, एकातून दुसऱ्यात, तिसऱ्यात पसरत पसरत आनंदाच्या मनात हृदयात डोळ्यात. तिथेच दमलं भागलं शरीर पसरलं. सगळ्या रंगात न्हाऊन निघालं, स्वप्नांनाही त्या रंगांनीच रंगवलं.

२.६

‘ध्यास! एखाद्या गोष्टीचा ध्यास लागला की माणूस आपोआप त्या दिशेने खेचला जातोच. अपार कष्ट करण्याची उमेद त्या ध्यासातूनच मिळते. जेवढा ध्यास उत्तम तेवढी आकाशाला गवसणी घालतो माणूस!’

आजोबांचे शब्द आनंदाला आजही आठवत. किंबहुना जेव्हा जेव्हा कोणतीही घटना आवाक्याबाहेरची वाटे तेव्हा आजोबा काय म्हणाले असते असा विचार तो करे. लहानपणापासून लागलेली सवय होती ती. अनेकदा ही सवय उत्तरेही देऊन जाई.

आजही असंच झालं. सावजींच्या कलादालनात स्वत:ची चित्रे परत आणायला गेला असता तिथे एका परदेशी चित्रकाराचे प्रदर्शन भरवले होते. अर्थातच तो चित्रे पाहण्यास आत शिरला आणि थबकलाच.

पीरबाबाचीच वाटावीत अशी सर्व चित्रे. जीवंत रंग. जीवंत कुंचल्याने सजीव केलेले रंग. क्षणभर त्याने पिरबाबालाही शोधले आणि मग एकदम भानावर आला. पीरबाबा तर!

मग तो एक एक चित्र तन्मयतेने पाहू लागला. अशी अचानक आनंदाची खाण सापडेल हे त्याला काय माहित. गेला हरवत एकेका चित्रात. आणि मग एका कलाकृतीपुढे थबकलीच पावले त्याची. हे तर हुबेहूब पीरबाबानीच काढलेलं चित्र. काय कमाल आहे. पीरबाबाचं चित्र तो झोपेतून उठूनही ओळखू शकला असता. मग असं कसं? त्याने वाकून खाली

चित्रकाराचं नाव वाचायचा प्रयत्न केला. नव्हतंच ते लिहीलेलं. कसं असणार? तसंही, पीरबाबाचं खरं नाव काय होतं? कोण जाणे.

“हेल्लो यंग मॅन!” मागून गंभीर आवाजात कोणीतरी बोललं. आनंदाने मागे वळून पाहिलं. एक साधारण पस्तीस, चाळीशीचा अत्यंत देखणा, उंचापुरा माणूस उभा होता. रंग लाल गोरा. नाकेला. डोळे पिंगट. दाढी सुबक वाढवलेली. अंगात सुरवार, लांब कुरता, जॅकेट.

“मी अरमान, या चित्रांचा चित्रकार.” अस्खलीत इंग्रजीत तो म्हणाला.

“ओह, फार फार आनंद वाटला आपल्याला भेटून.” आनंदा अत्यंत अदबीने हात मिळवत म्हणाला.

“फार संमोहित करणारी आहे आपली कला. मी हरवूनच गेलो.”

“हो, ते पाहिलं मी आणि म्हणूनच आलो खास तुला भेटायला. जितकी कला महत्वाची तितकीच कलाग्राहकता. माझी पेंटिंग्ज विकत घेणारे घेतील, त्यांची दालने सजवतील, पण खरा चित्र पाहणारा विरळाच असतो. तो सहजासहजी सापडत नाही. चित्रकार सतत त्याच्याही शोधात असतो. जितका अविष्कारासाठी तो झुरतो तितकाच अशा दर्दी गुणग्राहकासाठीही झुरतो. पण मला सांग तू इतर चित्रेही निरखून पाहत होतास. पण या चित्रासमोर तू आलास आणि किती वेळ स्तब्धच झालास. काय वेगळं आहे या चित्रात?”

“माफ करा. माझा प्रश्न ऐकून कदाचित तुम्हाला राग येईल. पण हे चित्र तुम्हीच काढलंय?”

पाहता पाहता त्या माणसाचा चेहरा बदलला. त्यावरील भाव न ओळखण्यासारखे होते.

“तू असं का विचारतोस? तुला अशी शंका येण्याचं कारण?”

“प्रश्न आधी मी विचारला!”

“माझ्या प्रश्नांमधे तुला तुझ्या प्रश्नांचं उत्तर नाही मिळालं?”

“नाही. मी खात्रीने सांगू शकतो, हे चित्र वेगळं आहे.”

तो चित्रकार एकाच वेळी अस्वस्थ आणि उत्तेजीत होत होता.

“मी तुला चित्रकलेचा जाणकार समजलो. पण तू तर अगदीच अपरिपक्व दिसतोस.”

मग मात्र आनंदा पुढे काहीच बोलला नाही. सावजींना भेटून तो निघाला. ते चित्र काही मनातून जाईना. आज दिवसभर बरीच कामं करायची होती त्याला. गावाहून येणारा माल गोडाऊनमधे उतरवून घ्यायचा होता. जमेल तेवढ्या डिलीव्हरीज, वसुली, एक नवं मशीन पाहायला जायचं होतं.

फ्रोझन पोळयांचे पॅक्स मार्केटमधे आणायचा विचार झाला होता. शहरात बरीच मागणी होती. सध्या मिळत, पण टिकत नसत फार. शिवाय वातड. मऊसूत पोळी फक्त बाहेर काढून तव्यावर टाकायची व टम्मं फुगलेली पानात. अनुराधेचा फॉर्मुला तयार होता. कान्हासरी उत्पादने शहरा शहरांतून

सर्वांना माहित होती. अनंताला सूर गवसला होता व्यवसायाचा. अनुराधेची जिद्द, आणि चिकाटी कामी आली होती. आनंदा अगदी कुमारवयापासूनच लक्ष घालू लागला होता. तो इथे शहरात आल्यावर तर इथली सर्व कामे तोच पाहत होता. अनंताचा बराच भार त्याने हलका केला होता.

चित्रदालनात अपेक्षेपेक्षा जास्त वेळ गेला होता. मशीन पाहायला उद्या जावं लागणार. आज कॉलेजातही चक्कर नाही झाली. अख्खा दिवस व्यावहारीक कामं होत राहिली. घरी पोहोचला तेव्हा संध्याकाळ होत आली होती. आणि मनात त्या चित्राचा ध्यास!

‘ध्यास!’ परत आजोबांची अनेक वाक्यं आठवली. ‘आईबाबांनी कान्हासरीचा ध्यास घेतला. यश मिळालं त्यांना. पीरबाबाला ध्यास कशाचा होता? नव्हताच का कशाचाच? रंगाचा होताच. आपल्यासारखाच अगदी.’

चहाचा कप घेऊन सवयीने आनंदा गॅलरीत आला. गेटमधे तो चित्रकार उभा. माळी काम करत होता. त्याच्याशी बोलू लागला. माळ्याने दाराची दिशा दाखवली.

जसजसा तो चित्रकार पुढे चालत येऊ लागला, आनंदाला एका विचित्र भावनेने घेरले. नक्की काय ते त्यालाही कळलं नाही. पुढे आल्यावर चित्रकाराची नजर त्याच्यावर पडली. आनंदाने हात करून दिशा दाखवली व खोलीचे दार उघडले. काही क्षण अवघडून दोघे दारातच थांबले. मग आनंदने त्याला आत येण्यास सुचवले. वातावरणातला विचित्र ताण दोघांनाही जाणवत होता.

“चहा?”

“चालेल.”

आनंदने दुसरा कप भरला. त्याच्या हातात दिला. दोघं गॅलरीत येऊन वेतांच्या खुर्च्यांवर बसले.

“तुला कसं कळलं ते चित्र माझं नाही?” चित्रकाराने काही प्रस्तावना न करता सरळ मुद्द्यालाच हात घातला. आनंद पाहत राहिला त्याच्याकडे. मग तो उठला. आत गेला. कपाटातून अनेक भेंडोळयांमधून बरोबर एक गुंडाळी जिला फार जपून ठेवली होती ती घेऊन बाहेर आला. चित्रकारासमोर येऊन त्याने ती भेंडोळी उलगडली. आंतरराष्ट्रीय किर्तीचा चित्रकार अरमान, खाडकन उभा राहिला!

“हे कसं शक्य आहे?”

त्याचा श्वासोच्छवास उत्तेजीत झाला. “हे कसं शक्य आहे?” तो परत किंचाळला “कुठे मिळालं तुला हे? कोणी दिलं? खरं सांग!”

आनंदची त्याने चक्कं कॉलर धरली! मग आपली चूक लक्षात येऊन पट्कन सोडूनही दिली. मग गदगदलेल्या स्वरात तो म्हणाला, “यंग मॅन, मला कृपा करून लवकर सांग हे चित्र तुला कुठे मिळालं? म्हणशील तेवढे पैसे देईन मी तुला.”

“हे पीरबाबांनी काढलंय चित्र!”

“पीरबाबा? कोण पीरबाबा?”

“माझे गुरू. चित्रकलेचे.”

“कसं शक्य आहे हे? काहीतरी सांगू नकोस. साफ खोटं बोलतो आहेस तू.”

आनंदा शांतपणे त्याच्याकडे पाहत राहिला.

“कुठे भेटला हा तुला?”

“माझ्या गावी, रामनगरला.”

“केव्हा भेटला हा माणूस तुला?”

“मी १०-११ वर्षांचा होतो तेव्हा.”

“आणि त्याने सांगितलं तुला, की हे चित्र त्याने काढलंय?”

“त्यांनी हे चित्र माझ्यासमोर काढलंय. अनेकदा. नेहमी असंच अर्धंच रंगवून सोडून द्यायचे.”

चित्रकार अवाक होऊन पाहत राहिला. सगळं समजण्याच्या पलिकडचं होतं.

“अरे, काय बोलतो आहेस तू? हे केवळ अशक्य आहे. केवळ अशक्य!” अत्यंत उद्वीगतेने तो म्हणाला.

“पीरबाबा, हे एक दुनियेने टाकून दिलेले कलाकार होते अरमानजी. दुनियेच्या दृष्टीने ते म्हणजे एक वेडा, मुका, पीर! सर्वसामान्य लोकांत मिसळण्यास अयोग्य! चरसी! माझी त्यांची भेट, हा एक अजब योगायोग होता. मी त्यांना समजू शकत होतो कारण नुकताच मीही दुनियेने बाद

ठरवण्याचा अनुभव घेतला होता. ही दुनिया त्यांचे मळके कपडे, वाढलेली दाढी, नखे, त्यांचं चरसी असणं एवढंच पाहत होती. या समाजाचं काहीसं असंच असतं. एक दुर्गुण बाकी हजार गुणांना खाऊन टाकतो. पीरबाबांचं चरसचं व्यसन त्यांना माणसातून उठवून गेलं असावं.''

———-

त्यादिवशी आनंदा जो झपाटून घरी गेला तो परत त्या रंगांमधून परत कधीच बाहेर न पडण्यासाठी. सकाळी जाग आल्यावर त्याने रंगलेले कपडे, हातपाय, धुवून टाकले. पण मनावर चढलेला रंग कधीच पुसला गेला नाही. यानंतर आनंदाचं आयुष्य पूर्णपणे बदललं. दुसऱ्या दिवशी तो रात्रीची जेवणं होण्याची वाट पाहू लागला. जेवणं करून सगळे जरा विसावले तेव्हा हा आधीच भरून ठेवलेले डबे, रंगकामाचं साहित्य, जाड काठी, बॅटरी असं घेऊन हळूच बाहेर पडला. या वेळी ना त्याला पायवाट सोडून जंगलात शिरायची भीती वाटली, ना पीरबाबाचं मचाण सापडायला त्रास झाला. तो सरळ पोहोचला. सरसर वर गेला चढून. पाहतो तर पीरबाबा नाहीच. हिरमुसला आधी. मग बॅटरी लावून पाहू लागला आसपास. कसल्या कसल्या बीया, पानं, कोळसा, फळांच्या साली, बरंच काय काय पडलेलं. पण सगळं अस्त्याव्यस्त. एक कंदीलही होता. आनंदाने तो लावला.

नकळत सवयीने त्याचे हात भराभर चालू लागले. पाहता पाहता, एकेका वस्तुचा ढीग वेगवेगळा झाला. पसरलेले ब्रश, कागद, डबे, एक

कातडी वळकटी सापडली. उघडली तर आत अनेक ब्रश. वेडावूनच गेला त्याचा जीव. त्याने खाली पडलेले स्वच्छ ब्रश त्या पोतडीत लावले. रंगाने भरलेले ब्रश बाजूला केले. मग एक पडलेलं फडकं घेऊन जागा स्वच्छ केली. खाद्यपदार्थांचे कण, तुकडे, फाटलेले कागद, पुडकी, अक्षरश: उकिरडा होता तिथे. सगळं स्वच्छ केलं.

एका पत्र्याच्या डब्यात पाणी होतं, ते जरा शिंपडून कापड ओलं केलं, आणि पुसून घेतली जागा. पीरबाबाने मेणकापड घातलं असावं कधी काळी मचाणावर. त्याचा मुळचा हिरवा रंग दिसू लागला. मचाण एवढ्या पावसात गळत मात्र नव्हतं. वर जे बांबू, काठ्यांचं छत होतं त्यावरही मेणकापड अंथरलं होतं. आणि ते अजूनही धड असावं. की पत्रा होता? अंधारात काही धड दिसत नव्हतं.

परवाचा इझल, त्यावरचं चित्र काहीच नव्हतं तिथे! "अरे गेले कुठे पीरबाबा?"

मग त्याने आपलं रंगकामाचं साहित्य काढलं. पाहता पाहता पीरबाबाचं चित्र रंगवून झालं. पण चित्रातल्या पीरबाबाची कफनी स्वच्छ होती विटकरी रंगाची. दाढी अगदी नीट कातरलेली. केसांची जुल्फं विंचरलेली. हातपाय स्वच्छ. डोळयात सुरमा, जसा खऱ्या पीरबाबाच्या होता. चेहरा सौम्य हसरा.

वाट पाहता पाहता आनंदा तिथेच लवंडला. दिवसभराच्या कामाने दमला होताच, परत इथे येऊनही काम झालं होतं. पहाटे गार हवा पडली तशी डोळा लागला त्याचा.

सकाळी उजाडताना जाग आली. कोणाचा तरी हात अंगावर, नाकाला दुर्गंधी जाणवली. उठून बसला. कळेना एकदम कुठे आहे. मग आठवलं अचानक. पाहतो तर पीरबाबाने दोन्ही डबे फस्त केलेले. पीरबाबाच्या अंगावरची वाकळ आनंदाच्या अंगावर पांघरलेली. दुर्गंध त्याचाच असावा. आनंदा उठला, त्याने आपले रंगकामाचे सामान सोडून बाकी सगळे सामान घेतले, वाकळ घेतली घडी करून. पीरबाबाचे चित्र तिथे एका बाजूला दिसेल असे ठेवले व तो निघाला.

घराजवळ येताच त्याने सावधतेने सरळ गडग्यावरून उडी मारून मागचे परस गाठले. वाकळ घरामागच्या खळाळत्या ओढ्याच्या काठी भीजत ठेवली. तिथून हळूहळू मागील दारी जाऊन मग सरळ उंबरावर चढला. उंबराची फांदी धरून खिडकीतून माळावर उतरला. तिथे सगळं सामान ठेवलं. व नुकताच उठल्यासारखा खाली उतरून दात घासू लागला.

“आनंदा, उठलास? ये, चहा ठेवतेच आहे मी,” आई म्हणाली. आनंदाने निश्वास सोडला. कोणाच्या लक्षात आलं नाही आपण नव्हतो म्हणून.

आनंदा, आज मला स्वैपाकासाठी जायचंय. बाबांना दिवाळीच्या ऑर्डरींसाठी शहरात. मी स्वैपाक करून ठेवतेय. तुम्ही मुलं जेवा नीट. उरलेलं झाकून ठेवा. आण्णा भाऊकाकांकडे जाणारेत शेतावर.

“आई, मी येऊ मदतीला? मी आजीबरोबर....” तो गप्पं झाला एकदम. अनुराधेच्या ते लक्षात आलं.

“अरे वा, बरंच झालं मग. माणसं थोडी जास्तच आहेत त्यांच्याकडे जेवायची. तू आलास तर तारांबळ नाही व्हायची माझी. पण अभ्यास झालाय ना शाळेचा?”

“हो सगळा झालाय.”

“अरे वा, छान. चल मग, आंघोळ घे करून. डबा भरून घे, दप्तर घे. तिथूनच शाळेला जा.”

“चंदू, पुष्पा उठा रे. दात घासून या. मी आंघोळीला जातेय. चहा घ्या या.”

दोघं आली. तिने चहा चपाती दिली व ती गेली.

“काय रे आंद्या काल रात्री कुठे होतास?” पुष्पाने कसा पकडला असं बघत विचारलं.

“माळावर चित्र काढत होतो.”

“आण्णांना सांगू का नाव?”

“सांग, मग तुझ्या पांघरुणात पाल नाहीतर उंदीर आलाच म्हणून समज.” आनंदा तिच्याकडे रोखून पाहत म्हणाला.

“ई..... आंद्या!” पुष्पा, जणू आत्ताच आंगावर पाल पडल्यासारखी चित्कारली.

“कसलं चित्र काढलंस? दाखव ना मलाही.” चंदू म्हणाला “पुष्पे चोमडेपणा करायचा नाही हां. तू नाव सांगून आंद्याला मार बसला ना, मग बघ कसा बुकलून काढतो तुला.”

“मग त्याने मला एक मस्त चित्र काढून द्यायला हवं. मग नाही सांगणार.”

“बरं, देईन!” तह झाला.

आनंदा मग बाहेर येऊन सरळ ओढ्यावर गेला. त्याने भिजत ठेवलेली वाकळ तिथल्या दगडावर आपटून चोळून घासून त्याच्या परीने धुवून काढली. वासंती काकूच्या भाषेत, ‘गणपती होईल एवढा मळ’ त्या वाकळीतून निघाला. तीन चारदा बरंच मळाचं पाणी निघाल्यावर त्याने दोन झाडांच्या मधे फांद्यांना ती बांधून लटकवली. घरी परत येऊन भराभर आवरून, डबा घेऊन, हळूच पीरबाबासाठीही डबा घेऊन आईबरोबर निघाला. आजीकडच्या सवयीने त्याने आईचं काम बरंच हलकं केलं. निम्मा अधिक स्वैपाकही उरकला अनुराधेने आनंदा शाळेत जाण्यापूर्वीच. फार कौतुक वाटलं तिला आपल्या मुलाचं. आनंदा शाळेतून सरळ पीरबाबाच्या

मचाणावर गेला. त्याला पीरबाबाला गाठायचाच होता आज. चढून वर गेला तर पीरबाबा परत गायब.

“श्या! आजपण कुठे गेले हे!” तो तोंड बारीक करून वाट पाहत बसला. तेवढ्यात त्याचं लक्ष गेलं तर इझलवर चित्र! त्याने काढलेलं, पण त्याच्याबरोबर दुसरं पीरबाबाने त्याचं काढलेलं, कोळशाने! आनंदाचा ब्लॅक अँड व्हाईट फोटोच जणू!

आनंदा हरखलाच ते पाहून! कळी खुललीच त्याची. पीरबाबाने त्याचे चित्र काढलं! तो निरखून पाहू लागला. एक एक रेष, एक एक फटकारा! मधेच बोटाने पुसून केलेलं शेडींग!

नवनव्या गोष्टी आनंदापुढे येत होत्या. त्याने कोळसा घेतला, कागदावर चित्र काढलं, आणि पीरबाबाने वापरलेले नुस्के तो आजमाऊन पाहू लागला. पण जमेचना तसं. सगळं काळं झालं. हिरमुसला जरा. परत पीरबाबाने काढलेलं चित्र पाहू लागला. तेवढ्यात मागून पीरबाबाने त्याचं बोट धरलं आणि कागदावरून गर्कन फिरवलं, एकदा, दोनदा. मग त्याचंच दुसरं स्वच्छ बोट धरून वेगवेगळ्या पद्धतीने कागदांवर कमी अधिक दाब देत फिरवलं. वेगवेगळे परिणाम उमटले कागदावर. आनंदा विस्फारलेल्या नजरेने पाहत होता. ‘कसलं मस्त आहे हे. कधी आले हे? कळलंच नाही.’ त्याने त्याच आश्चर्यानंदाने भरलेल्या नजरेने पीरबाबाकडे पाहिलं. पीरबाबाच्या नजरेत हलकसं हसू होतं. ओळख होती. पीरबाबातला माणूस आज परत जागा होत

होता. त्याने हात पुढे केला. आनंदाने डबा त्याच्याकडे दिला. पीरबाबाने उघडून तो आनंदासमोर धरला.

"मी खाल्लय, तुम्ही खा," आनंदा म्हणाला. पीरबाबाने एकदा त्याच्याकडे पाहिलं. मग तो चवीने डबा खाऊ लागला.

२. ७

पुढे हा दिनक्रमच झाला. दैनंदिन ठरलेली कामं, शाळा, अभ्यास, सगळं पूर्ण करेपर्यंत संध्याकाळ व्हायची. त्यानंतर हा मुलगा डबे भरून ठेवायचा. रात्रीची जेवणं आटोपून जरा शांतता झाली की घराबाहेर पडायचा. रात्री कधी पीरबाबा भेटला की नवनवीन चित्रकलेतले बारकावे प्रात्यक्षिकातून शिकायला मिळायचे. कधी पानं, फुलं, बीया, यांच्यापासून नैसर्गिक रंग बनवण्याचं प्रात्यक्षिक, तर कधी अनाकलनीय रंगसंगती करता करता फक्त एक फटकारा आणि त्यातून एक अचानक सुंदर अर्थपूर्ण चित्राची कलाकृती. बोटांच्या ठशांचा वापर, तळव्याचा, नखांचाही, साळींदराच्या काट्याचा वापर, हजार गोष्टी शिकल्या जात होत्या.

क्वचित कधी आनंदाचा हात हातात धरूनही चित्र काढायचा. आनंदाला फार आवडायचा पीरबाबा तेव्हा.

तो नसला तरी आनंदा मचाणाची स्वच्छता करायचा. आधी शिकलेल्या गोष्टी करून पाहायचा. मग तिथेच झोपून जायचा. पहाटे कधीतरी पीरबाबा येऊन डबा खाऊन झोपून जाई.

दिवस भराभर सरत होते. आनंदा नववीत गेला होता. वयाच्या मानाने बराच परीपक्व झाला होता. अनंता त्याच्याबरोबर मित्रासारखाच वागे. अनुराधेनेही त्याचे मोठे होणे स्विकारले होते.

आण्णा त्याला काही बोलत नसत. आता त्याची गरज नाही, मुलगा लाईनीला लागला असे त्यांना वाटू लागले होते.

एखाद दिवशी अनंताला हुक्की आली तर तो आनंदाला घेऊन शिवालयात जाई. बराच वेळ बासरीवादन चाले त्याचं. आनंदा पीरबाबाला रस्त्यातच गाठून डबा देई मग. पीरबाबाही कधी बाहेर ओट्यावर बसून बासरी ऐकायचा. मधेच उठून निघून जायचा. अनंताबरोबर घरी परतून मग परत आनंदा मचाणावर पोहोचे. हमखास काहीतरी नवं छान अशा वेळेस पाहायला मिळे इझलवर. ते बनताना पाहता न आल्याची हळहळ वाटे आनंदाला.

कान्हासरीच्या कामात आई वडील व्यस्त, यानेही आपणहून कामं अंगावर घेतलेली. आई वडिलांना मदत तर करायचाच, पण खास त्याची अशी काही उत्पादने होती ज्यांना बरीच मागणी होती. रांगोळ्यांचे कट आऊटस, गणपतीची आरास, दिवाळीत आकाश कंदिल, पणत्या, वॉल हॅगींग. दरवर्षी नवी डिझाईन्स. आनंदाने घरी इतर कामांना येणाऱ्या दोन बायकांनाच हे काम शिकवलं होतं. कान्हासरीचं काम नसेल तेव्हा त्यांनी हे करावं असंही ठरवून दिलं होतं. बरा पैसा मिळायचा यातूनही. अनंता तो पैसा वेगळा ठेवायचा.

शाळेत मार्क मिळवणे हे ही एक कामंच, मग जरा मोकळा वेळ मिळाला की गृहपाठ संपवून टाकायचा आनंदा! इतर मुलं वैतागायची!

काय आंद्या, मोठा स्कॉलर, चल लेका खेळायला. उगाच बसतो पुस्तकात डोकं खुपसून. आनंदा फक्त हसायचा. पोरं नाद सोडून द्यायची.

दिवसेंदिवस तो जास्तच अबोल होत गेला. कामापुरतं बोलण्याची सवय लागली. भावना दाखवण्यासाठी नसतात अशाच मताचा झाला होताच.

या सर्व काळात आजोबांना तो पत्र मात्र पाठवायचा. पत्र त्रोटक असंत पण सर्व गोषवारा असे. कान्हासरीची भरभराट, घरातील सर्वांची खुशाली, त्याची अभ्यासातील प्रगती. क्वचित कधी पत्रातून एखादे वाक्य असे लिही की आजोबा परत त्या जुन्या आनंदाला शोधत. पत्रात आजीला नमस्कार आवर्जून लिही.

एकदा त्याने असाच सगळा वृतांत लिहीला. मग सोबत त्या दोघांचे कोळशाने चितारलेले सुंदर चित्र जोडले. आजीच्या कपाळावर लाल कुंकू चितारले व डोक्यात आंबाड्यावर खऱ्या सुकवलेल्या पण अजून रंग टिकून असलेल्या गुलाबी पाकळ्या चिकटवून वेणी केली.

‘मला तुम्ही दोघे असे आठवता.’ त्याने लिहीले.

त्यादिवशी आजी ढसढसा रडली. जणू आज तिला खरी माफी मिळाल्यासारखे वाटले. आजोबांचे डोळेही पाणावले.

याकाळात चंदू सतत आनंदाच्या बरोबर असे. एक पीरबाबा सोडल्यास, आनंदाच्या प्रत्येक कामात चंदू सामील असे. फारसं ना

बोलणारा, पण मनाने निर्मळ चंदू जणू आनंदाचा पाठीराखा होता. आनंदाची एकटे राहण्याची गरजही त्याने समजून घेतली होती. अनुराधेविषयी तर त्याला फार प्रेम वाटे. जणू ती त्याची आईच असावी असे नाते होते त्याचे तिच्याशी.

पीरबाबाचे व्यसन वाढतच चालले होते. कधीकधी २४ तास नशेत राही. जेवण आनंदा आणेल तेच. कधीकधी ते ही खाण्याची शुद्ध नसे. शुद्धीत असला की मात्र ओशाळा होई.

काढलेली चित्रे जवळच्या शहरात नेऊन विकणारा एक दलाल भेटला होता याला. याच्या कलेवर त्याने बंगला उठवला, गाडी घेतली.

पीरबाबाला किती पैसे द्यायचा हे ते दोघेच जाणोत. पण पीरबाबाचं व्यसन पूरं होत असावं. कदाचित नको इतकी जास्त चरस विकत घेता येऊ लागली असावी. चित्रकलेचे सामान व चरसेखेरीज पीरबाबा बाकी काही विकत घेतच नसे. या काळात कफन्याही आनंदाने शिवून दिल्या त्याला. विकलेल्या चित्रात पीरबाबाची आणि आनंदची दोघांची चित्रे असत. आनंदाने त्याबद्दल चुकूनही काही विचारले नाही. विचारावेसे वाटलेही नाही.

आनंदा दहावीत गेला. अख्ख्या दहावीच्या वर्गाला सततचे अभ्यासाचे डोस, येईल जाईल तो, पाजू लागला. आनंदाचा अभ्यास नेहमीप्रमाणे सुरू राहिला. कामंही. रोज मचाणावर जाणंही.

मुळात काटक, त्यात सतत श्रमाने शरीर कमावलं जात होतं. मैलोगणती दिवसाकाठी चालणं व्हायचं. मोठमोठी ओझी वाहून न्यायचं काम असलं की अनंताला झेपत नसे. आनंदाच्या ही गोष्ट लक्षात आली होती. अशा वेळेस न बोलावताच तो हजर असे. आपल्या उंच,गोटीबंद, शरीराच्या मिसरूड फुटलेल्या, मुलाकडे पाहताना अनुराधेचा उर अभिमानाने भरून येई अशा वेळेस. या माझ्या मुलाला पार वाळीत टाकलं होतं घरीदारी! आज तोच हाताशी आला. मनोमन ती नजर उतरवून टाके त्याची.

अभ्यासात व्यवस्थित प्रगती होती, कामात उरक, त्याची मनस्वी भटकंती आधीपासूनच माहित असल्याने कधी वेळी अवेळी घरी परतताना दिसला तरी वाकडा विचार आलाच नाही तिच्या मनात. त्यानेही कधीच काही चुकीचे वागणे केले नाही.

पीरबाबा दिवसेंदिवस खंगत होता. अधिकतर झोपलेलाच असे. तल्लफ आल्यावर कसाबसा उतरून खाली गावात येई. एकदोन वेळा एका माणसाबरोबर बोलताना, चित्रं देता घेताना आनंदाला दिसला होता. पण बाहेर तो आनंदाला मुळीच ओळख दाखवत नसे. त्यामुळे आनंदाही ओळख दाखवत नसे.

मध्यंतरी शाळेत सारख्याच परीक्षा होऊ लागल्या. मग आनंदा पीरबाबाला रस्त्यातच डबा द्यायचा. पीरबाबाचा चेहरा उतरतो अशा वेळी असं त्याच्या लक्षात आलं होतं. पण इलाज नव्हता. आठवड्यातून एक दोन

वेळा जाऊन तो मचाण साफ करणे, ताजे पाणी भरून ठेवणे, जमल्यास एखाद दुसरे चित्र रंगवून परत यायचा.

मग दुसऱ्या दिवशी पीरबाबाची चरस यायची. पीरबाबाचे हात थरथरतात हल्ली असंही आनंदाच्या लक्षात आलं होतं. चरस फुंकून सततचा खोकला यायचा त्याला. नजरही अधू झाली असावी. पूर्वी रंगांचा बादशहा असणारा पीरबाबा रंगातही गल्लत करू लागला होता. आनंदाच्या हे लक्षात येत होते.

पूर्वपरीक्षा झाल्यावर जरा सुटी मिळाली तसा आनंदा जेवणाचा डबा घेऊन सकाळचाच मचाणावर पोहोचला. पीरबाबा झोपला होता. आनंदा आल्यावर त्याने डबा उघडून दिला. पीरबाबाने तो खाल्ला. मग त्याने इझलकडे हात दाखवला. तिथे कोरा कागद होता. आनंदा दोन क्षण पाहत राहिला. मग लक्षात येऊन त्याने ब्रश हातात घेतला.

जवळपास दीड दोन तास तो रंगवत होता. पीरबाबा या पाठमोऱ्या मुलाकडे टक लावून पाहत होता. त्याची ओली नजर आनंदाला निरखत होती.

आनंदा आज दिवसाचाच आला असल्याने त्याने अजून दोन निसर्गचित्रे रंगवली. थोडावेळ तो तिथेच बसून राहिला. पीरबाबासाठीचा कोरडा खाऊ त्याने दिला व तो निघाला. उद्या येईन परत!

दुसरे दिवशी सकाळचाच तो आला. पीरबाबाला जरा धाप लागली होती. आणलेला चहा त्याने पीरबाबाला पाजला कारण थरथरत्या हाताने पीरबाबाला पेला धरता येईना.

मग पीरबाबाने एका कागदाच्या तुकड्यावर उर्दूमधे काही लिहीले. घडी घातली. वर दुकानाचे नाव लिहीले. खुणेने आनंदाला ती कालची रंगवलेली चित्रे आणायला सांगितली. गुंडाळी करून ती त्याच्याकडे दिली व दुकानाच्या इंग्रजीत लिहीलेल्या नावाकडे बोट केले. पीरबाबाचे इंग्रजी अक्षर सुंदर होते. आनंदा नव्या नजरेने त्याच्याकडे पाहू लागला. पीरबाबाने जा अशी खूण केली. तेव्हा तो निघाला.

चित्रं घेऊन दुकानात गेला. तोच माणूस होता दुकानात ज्याच्याबरोबर पीरबाबा बोलताना दिसला होता.

त्याने चिठी वाचली. त्याच्या कपाळावर आठी उमटली. त्याने चित्रे पाहिली. मग आत जाऊन एक लहानसा लिफाफा एका पिशवीत घातला. ‘‘पीरसे कहो ये आखरी बार. फिर कभी तुम्हे ना भेजे. आना हो तो खुद आये.’’

‘‘त्यांना बरं नाही.’’आनंदा म्हणाला.

‘‘ठीक होनेपर आये. लेकिन तुम मत आओ.’’ आनंदाने मान हलवली.

तो घरी गेला. त्याने पीरबाबासाठी डबा घेतला आणि पीरबाबाकडे गेला. पिशवी दिली. पीरबाबाने ती उघडून पाहिली. त्याची नजर बदलली.

मग त्याने आनंदाला ती कातडी पोतडी, आणि काही चित्रं दिली. काढूनच ठेवली होती त्याने. मग जा अशी खूण केली. आनंदाला आश्चर्य वाटलं. “डबा?” पीरबाबाने मग तो खाल्ला. परत जा अशी खूण केली. आनंदा निघाला मग. पहिल्या वेळेनंतर पीरबाबाने कधीच त्याला जायला सांगितले नव्हते. तो वेळ झाली की निघायचा. आज काहीतरी वेगळे घडत होते.

आनंदा घरी आला. अभ्यासाला बसला. रात्री मात्र त्याला राहावले नाही. तो खायला घेऊन परत मचाणावर आला.

पीरबाबाला धाप लागली होती. श्वासोच्छवास कसाबसा सुरू होता. डोळे विस्फारलेले होते. आनंदा पटकन खाली बसला. त्याची छाती चोळू लागला. पीरबाबाने त्याचा हात गच्चं पकडला. आनंदा घाबरला. “काय होतंय तुम्हाला? डॉक्टरांकडे जाऊया आपण.”

पीरबाबाने मान हलवली. आनंदाला शेजारी बसवले. पाणी दे अशी खूण केली. आनंदाने पाणी पाजले. पीरबाबाने आनंदाच्या चेहऱ्यावरून हलकेच हात फिरवला. आनंदाच्या मांडीवर डोके ठेवले. काही वेळात तो शांत झाला. आनंदाला वाटले झोप लागली. तो तसाच बसून राहिला. बऱ्याच वेळाने त्याच्या लक्षात आले पीरबाबाचा श्वासोच्छवासही बंद आहे. त्याने मांडीवर झोपलेल्या पीरबाबाच्या छातीवर कान ठेवून पाहिला. तिथेही सगळं शांतच होतं. त्याने जोरजोरात हाका मारत पीरबाबाला गदगदा

हलवायला सुरवात केली. मग पीरबाबा उरला नाही हे लक्षात येऊन तो ढसढसा रडू लागला.

बऱ्याच वेळाने तो रडून शांत झाला.

दुसऱ्या दिवशी आनंदा, अनंता, चंदू व तो दुकानदार यांनी मिळून पीरबाबाला दफन केलं.

आनंदाच्या आयुष्यातलं एक महत्वाचं चित्र पुसलं गेलं.

२.८

“तुझ्याकडे ते चित्र आहे?”

अरमानने अचानक विचारलं? “पीरबाबाचं तू काढलेलं?”

आनंदा क्षणभर पाहत राहिला. त्याने परत कपाटातून अगदी आतून चित्रे काढली. एक पीरबाबाचं हसरं चित्र, आणि आनंदाचं कोळशाने काढलेलं. हात किंचित कापत होते त्याचे. भावनांमधे वाहून जायचं नसेल तर आठवणींना समोर येऊच द्यायचं नाही हे ठामपणे ठरवलेलं असल्याने त्याने या सगळया आठवणी जागवणाऱ्या गोष्टी पार तळात ठेवलेल्या होत्या. कपाटाच्याही आणि मनाच्याही.

अरमानने ते चित्र तितक्याच कापऱ्या हातांनी हातात घेतले. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव पाहता पाहता झरझर बदलले. तो जागेवरून उठला. अस्वस्थपणे तो फेऱ्या मारू लागला. मग अचानक तो ते चित्र घेऊनच बाहेर पडला. झपझप जाऊ लागला. आनंदा तीरासारखा धावला. त्याने अरमानला अडवले. “चित्र” त्याने हात पुढे करत म्हटलं. अरमान क्षणभर अवाक झाला.

“माझ्याकडे एवढं एकच चित्र आहे त्यांचं. मीच काढलंय, पण तरी परत काढायला गेलो तर इतकं हुबेहूब जमेलच असं नाही.” आनंदाच्या चेहऱ्यावरची कोवळी वेदना अरमानला स्पर्शून गेली. त्याने ते पीरबाबाचं चित्र त्याच्या हाती दिलं.

“तुम्ही ओळखत होता का पीरबाबांना?” आनंदाने विचारले.

अरमान पाहत राहिला. ‘काय सांगू या तरूण मुलाला?’

त्याने फक्त एकदा पाठीवर थोपटले व तो झटक्यात वळून चालू लागला.

आनंदा त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत राहिला. जड पावलांनी तो परत आला. आठवणींचं मोहोळ उठलं होतं. आता स्वस्थता लाभणं कठीणच होतं. आज परत आईच्या मांडीवर डोकं ठेवून झोपण्याची उर्मी आली होती. तिचा नेहमी वाट पाहणारा चेहरा डोळ्यांसमोरून हलत नव्हता. ‘तिला कशाची शीक्षा देत होतो मी? पण कोणाचीही गरज वाटणे हा मनाचा कमकुवतपणा. तो भावनिक बनवतो. नको ते निर्णय घ्यायला भाग पाडतो. नाही, ते सगळे दरवाजे बंदच ठेवायचे आनंदा! कायमचे. कमकुवत मनाची कवाडं नाहीच उघडायची. लक्षात ठेव.’

पीरबाबा गेला त्या रात्री आनंदा खूप रडला. अनंताने त्याला रडू दिले पोटभर! आनंदाच्या नकळत तो लक्ष ठेवून होता आनंदावर त्यानंतर. वयात येणाऱ्या मुलाशी कसं वागू नये हे त्याला फार चांगलं माहित होतं.

एक दोन दिवसांत आनंदा बराच सावरला. मग मात्र तो दहावीच्या अभ्यासाला लागला. सगळं बाजूला ठेवलं त्याने त्या शेवटच्या महिन्यात. चित्र, भटकंती, कान्हासरीचं कामंही. चंदूने अबोल साथ दिली त्याला या काळात.

परीक्षा झाली आणि लगेचच तो अनंताबरोबर मुंबईला आला. कलामहाविद्यालयाचा माग काढला. ॲडमिशनसाठीची पात्रता विचारली. फी विचारली. मग परत आला.

त्यानंतरची काही वर्ष आनंदाने अपार कष्ट केले. अनंता जवळपासच्या शहरांमधे जाई. आनंदा आणखी लांबच्या शहरांतही जाऊ लागला. त्याने तीन तीन महिन्यात चित्रकलेच्या परीक्षा दिल्या. गणपती, दिवाळीत ढोरमेहनत केली. विक्री दुपटीने वाढली.

शेवटी मुंबईतील कलामहाविद्यालयात प्रवेश, राहण्यासाठी हॉस्टेल यांना पुरतील एवढे पैसे जमले. अनंताने आनंदाची सर्व कमाई त्याच्यासाठीच राखून ठेवली होती.

आण्णा फारसे आनंदी नव्हते, पण त्यांचे कलेविषयीचे सगळे गैरसमज बापलेकांनी चूकीचे ठरवून दाखवले होते.

आनंदाला काल घडल्याप्रमाणे सगळं आठवत होतं. तो जायला निघाला त्या रात्री आईचे डोळे सतत भरून येत होते. ती लपवत होती. पण त्याच्या लक्षात आलंच. त्याचेही डोळे पाणावले. मग तो ही बाहेर बाहेरच कामं करत राहिला.

चंदू पुष्पाही अबोलसे झाले त्यादिवशी. अनंताने काही न बोलंता त्याची बॅग भरली. आण्णांनी शंकराची पिंडी आणि गणपतीची मूर्ती डब्यात

घालून दिली. त्याने नमस्कार केला निघताना तेव्हा त्यांचेही डोळे पाणावलेच.

“तुम्ही काळजी करू नका. मुंबईतली सगळी बाबांची कामं मी पाहीन. बाबांना इथल्या कामावर लक्ष देता येईल जास्त.” त्याने आण्णांना सांगितलं.

त्यांनी पाणावल्या डोळयांनी डोक्यावर हात ठेवला. आईने जवळ घेतलं आधी. मग लक्षात येऊन तिने डोक्यावरून हात फिरवला. आजही तिचा तो चेहरा त्याला आठवत होता. तिच्या मायेच्या स्पर्शाला आसुसला तो.

——

अरमान कसा त्याच्या हॉटेल रूममध्ये पोहोचला हे त्यालाही आठवलं नसतं नंतर. डोक्यात काहूर माजलेलं. ‘काय खरं काय खोटं?’ जन्मभराचे विश्वास असे क्षणात होत्याचे नव्हते होताना मनाची जी घालमेल होईल तीच होत होती त्याच्या मनाची.

तो डोकं गच्चं धरून बसला किती वेळ. मग हळू हळू मन घटनांची सांगड घालू लागलं.

त्याच्या प्रायमरी स्कूलचा शेवटचा दिवस. तो सतत गेटवर नजर ठेवून होता. सगळयांचे आईवडील त्यांना घरी न्यायला आलेले.

पण शेवटी एकटी अम्मीच आली. अब्बू नाहीच आले. त्यारात्री परत घरी आल्यावर अम्मी अब्बूचं जोरदार भांडण झालं. त्याला आठवणारं पहिलं भांडण.

पण अब्बू त्याच्यावर फार प्रेम करत. त्याला त्यांच्या रंगात हात घालायला फार आवडायचं. ते ही त्याला कधीच रागवायचे नाहीत त्याविषयी. हवं तितकं रंगात खेळू देत. त्याच्या हाताला धरून चित्र रंगवत. अब्बूंच्या इत्तरचा वास त्याला फार आवडायचा.

अम्मीला मात्र त्याने रंगांच्या जवळही गेलेलं आवडायचं नाही. “मुफलिसी असार है ये सब! ले डुबेंगे.” ती सुनवायची अब्बूना.

मग ती ऑफिसला जायला बाहेर पडली की अब्बू बोलावत त्याला जवळ. रंगात रंगून जायचे दोघे. अम्मी परत यायच्या आधी साफसुधरा होऊन बसायचा अरमान. हा त्या दोघांचा ‘राज’ अम्मीला कळू दिला नाही कधीच त्या दोघांनी.

अम्मी फार चिडचिडलेली असायची त्या दिवसांत.

मग एखाद दिवशी अब्बू त्यांची चित्रं घेऊन गायब होत. अरमानला फार आठवण येई त्यांची. मग तो त्यांच्या स्टुडीओत जाऊन रंग काढून बसे. अब्बूनी शिकवलेलं रंगवत बसे.

अब्बू कधी महिन्याने कधी दोन तीन महिन्यांनी परत येत. अम्मीला पैसे देत. मग काही दिवस बरे जायचे. मग तिघे बाहेर जेवायला जात. आईसक्रीम खायला जात.

परत मधेच काहीतरी बिनसायचं आणि अम्मी अब्बूचं भांडण व्हायचं. अरमान गुमसुम राहायचा मग त्या दिवसांत. अब्बू सतत स्टुडीओत स्वत:ला बंद करून घेत. अम्मी सतत रडत तरी राही किंवा ओरडत तरी. हे असे कडूगोड दिवस हेच अरमानचं बालपण!

मग एक दिवस अम्मीचा दूरचा रिश्तेदार परदेशातून आला. त्याने अम्मीला बरेच पैसे दिले. अम्मी जाम खुशीत होती. पण अब्बू खुशीत नव्हते. त्यानंतर तो येतच राहिला. अब्बू गप्पं होत गेले.

अरमानशी मात्र ते अधिकच प्रेमाने वागू लागले. याच काळात त्याच्या अब्बूंकडून त्याने चित्रकलेचे अनेक धडे घेतले. चित्रकलेतला आत्मा त्याला याच काळात गवसला. रंगांशी संवाद साधण्याची कला अवगत झाली. रंग आणि कागदाची सफेदी यांचं खरं नातं याच काळात उमगलं. रंग जेवढे बोलतात त्याहून कितीतरी जास्त किंचितशी कणभर कुठेतरी मागे उरवलेली ही सफेदी बोलते हे अब्बूंनी याच काळात अरमानला न बोलताच शिकवलं.

या चित्रांमधूनच त्याचे अब्बू त्याला कळले. एक अतूट नातं जुळलं. ते फक्त बापलेकाचं नव्हतं. ते रंगांनी बांधलेलं, काही प्रमाणात उस्ताद चेल्याचं, तर काही प्रमाणात रुहरंगींचं होतं.

मग एक दिवस परत अम्मी अब्बूचा झगडा झाला. अख्ख्या मोहल्ल्यात लोक बोलू लागले. अम्मीचा रिश्तेदार अचानक एक दिवस आला. कसलीशी कागदपत्रं अम्मीला देऊन गेला. अरमान तेव्हा अगदीच न कळण्याच्या वयात नव्हता. त्याला या रिश्तेदाराचं येणं फारसं आवडायचं नाहीच. अम्मी खुश असते एवढंच! त्यानेही अरमानकडे फारसं लक्ष पुरवलं नाही.

काहीच दिवसांत अब्बू परत आले. अम्मीने त्यांना तलाक मागितला. अब्बूंचा त्यावेळचा चेहरा अरमानला अजूनही आठवायचा.

एखाद्या भल्यामोठ्या खडकाला आतून अचानक तडा जाताना समोर दिसला तर कसं वाटेल तसं अरमानला वाटलं होतं तेव्हा.

त्यारात्री अब्बूना मानसीक अतीताणाचा ॲटॅक आला. ते छताकडे डोळे लावून बसले. अम्मीने त्यांना हॉस्पिटलमधे दाखल केले. एकदोनदा अरमानला त्यांना भेटायला घेऊन गेली. अरमान नुकताच नववीत गेला होता. त्याने अब्बूंशी बोलायचा प्रयत्न केला पण अब्बू बोलण्याच्या परिस्थितीत दिसले नाहीत. ते औषधांच्या अमलाखाली होते.

अम्मीने दहावित अरमानला परगावी हॉस्टेलला ठेवले. जाण्यापूर्वी तो अब्बूना भेटायला गेला. ते हॉस्पिटलच्याच सुधारगृहात दाखल होते.

अरमान त्यांच्यासाठी चित्रकलेचं साहित्य घेऊन गेला त्याच्या पॉकेट्मनीमधून. त्यांचे डोळे चमकले. पण तरीही त्यांच्या डोळयात फारशी

ओळख नव्हतीच. ते एका झाडाखाली बसले होते आवारातल्या. पण कसल्यातरी अमलाखालीच दिसले. जाताना त्याने अब्बूना घट्ट मिठी मारली. पण त्याचे अब्बू हरवलेच होते कुठेतरी,.. कायमचे. हे नंतर कळलं त्याला.

होस्टेलला जाण्याच्या आदल्या रात्री अरमान अब्बूंच्या रुममधे गेला. इथेतरी त्याचे अब्बू त्याला भेटतील अशी आशा होती त्याला. त्याने त्यांचं बरंच सामान ढुंढाळलं. बरीच चित्रांची रेखाटनं होती, काहींवर पहिला ब्रश फिरलेला.

एक चित्रं म्हटलं तर अपूर्ण, पण बरंच काही सांगणारं! हे माझे अब्बू! अरमानने ते बरोबर घेतलं.

काहीच दिवसांत अम्मी होस्टेलला आली. ती अरमानच्या जवळ बसली. त्याचा हात हातात घेऊन म्हणाली, "अरमान, बेटा, तेरे अब्बू नहीं रहें! अब हम चाचा के साथ परदेस जाएंगे!"

अरमान नुसता ऐकत राहिला. त्याचे अब्बू कधीचेच 'न रहे' झाले होते त्याच्यासाठी! मातम करून झाला होता त्याचा तेव्हाच. आता अब्बूंच्या आठवणी नितळ रंगात होत्या त्याच्याबरोबर.

काहीच दिवसांत अरमानची परीक्षा संपल्याबरोबर ते तिघे लंडनला रवाना झाले.

अरमान एका हॉस्टेलमधून दुसऱ्या, शिक्षणाच्या निमित्त्याने फिरत राहिला. चित्रकला रक्तात मुरत गेली. जन्माची साथीदारीण झाली.

पाहता पाहता त्याचं परदेशात बरंच नाव झालं. अम्मीकडे अधून मधून तो जाई. तिने त्या रिश्तेदाराबरोबर निकाह केला असावा. दोघे एकत्रच राहत.

अरमानने कधी अम्मीला काही विचारले नाही. तो आपल्या कलेतच मग्न झाला.

अलिकडेच त्या रिश्तेदाराचं निधन झाल्याचं फोनवर अम्मीने सांगितलं. तिचंही वय झालंच होतं आता.

आणि आज अचानक हा तरूण पोरगा, ‘हे तुम्ही काढलेलं चित्र नाही वाटत’ असं म्हणता म्हणता, त्याची दुनिया उथलपुथल करून गेला होता.

‘अब्बू जिंदा होते? मग अम्मीने असं का,...? ‘

त्याने फोन उचलला, अम्मीचा नंबर,.. मग परत फोन ठेवून दिला.

‘काय विचारणार आपण तिला? का नाही सोडलंस मलाही त्यांच्याबरोबर? आज आपण जे काही आहोत ते तसं पाहिलं तर तिच्यामुळेच! चांगलं शिक्षण तिच्यामुळेच मिळालं. कला अब्बूंनी दिली. रक्तातूनही आणि शिकवूनही. पण तरी अब्बू नाहीच होऊ शकलो आपण! त्या मुलाने बरोबर पकडलंच की!’

‘आणि अब्बूंना कलेने काय दिलं?’ तो पोरगा दिला. अब्बूंचा अब्बू होऊन त्यांना सांभाळणारा! अब्बूंना परत माणसात आणणारा. अब्बूंना

शेवटची मूठमाती देणारा. अब्बूंच्या आठवणीने व्याकूळ होणारा. त्यांची चित्रकला आपल्या कुंचल्याने टिपणारा! अब्बूंचा वारसा चालवणारा!'

'त्याची मूर्त कला अब्बूंच्या अमूर्त कलेहून एकदम निराळी आणि तरीही मूळ कलेचा वारसा चालवणारी.'

'अब्बूना दुर्दैवी म्हणावं का? काहीच झालं नाही त्यांच्या कलेचं नाव! ना त्यांचं! एक अनाम मौत आली वाट्याला आणि एक व्यसन!'

'की आपण जास्त दुर्दैवी? अब्बूंसारखा उस्ताद मिळूनही त्यांची कला पूर्णपणे नाहीच का उतरली आपल्यात?'

'त्या तरूण पोराचा शुक्रिया कसा अदा करावा? त्याच्यामुळे अब्बूना अन्नं मिळत राहिलं. ते माणसात आले. त्यांना मूठमाती मिळाली. बेवारस मौत नाही आली त्यांना.'

अरमानने आज परत अब्बूच्या मौतचा मातम केला. लहान मुलासारखा गळा काढून एकटाच रडत राहिला.

२.९

आनंदा सकाळचा तयार होऊन बाहेर पडायच्या तयारीतच होता. तेवढ्यात कृपा धावतपळत झंझावातासारखी आत शिरली. आली आणि सरळ जमिनीवर फतकल मारून बसली. धापा टाकतच आली होती.

“थँक गॉड! म्हटलं नाहीच भेटायचास आजही. सारखा गुंगारा देतो आहेस कालपासून. हुश्श्य!”

तिने परत एक दीर्घ श्वास घेतला.

मग सावकाश टीपॉयवर एक एक वस्तू काढून ठेवू लागली. आधी एक प्लास्टीक सूरी रिबीन लावलेली, मग पेस्ट्रीचा छोटा बॉक्स, मग एक अगदी छोटा तीन गुलाबांचा गुच्छ, एक लहानसं पॅक, गिफ्ट पॅक केलेलं.

आनंदा पाहत होता. ‘आता हे काय आणि?’असे भाव चेहेऱ्यावर. तिने वर पाहिल्यावर त्याने एका भुवईनेच ‘हे काय’ असं विचारलं. तिनेही भुवई हलवून ‘इकडे ये’ अशी खूण केली. तिच्या या बालीश कृतीवर आनंदाला मनापासून हसू आलं. मान हलवतच तो टीपॉयपाशी येऊन बसला. मग तिने वेळ घेत सावकाश केकचा बॉक्स उघडला. त्यावर मेणबत्ती खोचली. ती पेटवली. मग बुके आणि गिफ्ट आनंदाच्या हातात दिला. मग पुढे झुकत तिने मेणबत्ती फुंकून विझवली आणि सुरीने केक कापायला सुरवात केली. आनंदने तिच्या डोक्यावर थोपटले. तिने वर पाहिले तेव्हा तिची नजर

डबडबलेली होती. आनंदने केकचा एक तुकडा तिला भरवला. मग तो गुच्छ तिच्या हातात दिला. गिफ्ट मात्र तसंच हातात ठेवलं.

तिने ‘ते ही दे’ अशी खूण केली, तेव्हा तो कपाटाकडे गेला. त्यातून त्याने एक फ्रेम केलेलं लहानसं पोर्ट्रेट काढलं जे वर्तमानपत्राच्या कागदात पॅक केलेलं होतं. ती गिफ्ट त्या पोर्ट्रेटवर ठेवून दोन्ही तिच्या समोर धरलं. तिच्या चेहऱ्यावर आनंद, आश्चर्य असे अनेक भाव रंगपंचमी खेळून गेले. पण मग उत्सुकतेने सर्वांवरच मात केली. तिने भराभर तो कागद काढून पोर्ट्रेट पाहिलं आणि या कानापासून त्या कानापर्यंत हसू तिच्या चेहऱ्यावर पसरलं. “तुझ्या लक्षात होतं? कधी काढलंस हे? मला सांगितलं सुद्धा नाहीस.” लहान मुलासारखी कृपा ते स्वत:चंच पोर्ट्रेट हातात धरून लहान मुलासारखी नाचली. मग तिने जवळ येऊन आनंदला एक घट्ट मिठी मारली. “थॅंक यू, थॅंक यू, थॅंक यू!”

“सगळयांचे फोन आले. ममाने पण यू एस हून फोन केला चक्कं, रात्री. तुझाच नाही आला. मला वाटलं विसरलास.”

“पण तू नव्हतास ना विसरलास!” ती परत मनापासून खुश होत बोलली. आनंदा विस्मयाने पाहत राहिला तिच्याकडे. मग अचानक कोडं सुटलं. ‘आपल्याला हिच्यात लहान आनंदा दिसतो. असाच तर होतो मी. छोट्याशा गोष्टींनी हिरमुसणारा, छोट्याशा गोष्टींनी खुश होणारा! निरागस, हळवा. म्हणून ही पोरगी एवढी जवळची वाटते. सगळ्या भिंती नकळत कोसळतात मनातल्या, मोकळा श्वास घेता येतो हिच्या सहवासात.’

'तुझी निरागसता हरपू देऊ नकोस कृपा!' तो मनोमन म्हणाला.

"चहा करतो, मग नीघूया, मला पोहोचायचय एके ठिकाणी." आनंदा म्हणाला. तिने लहान मुलीसारखी मान हलवली.

"संध्याकाळी पार्टी करायला येणार नाहीस ना तू?" तिने नाटकीपणाने तोंड बारीक करत विचारतलं. "बघ म्हणजे, माझे काही नवे मित्र मैत्रिणी पण यायचेत आज पार्टीत. विचार कर अजून."

आनंदा काही न बोलता चहा करायला गेला. चहा पिऊन दोघे बाहेर पडले. कृपाने त्याला, तो नको नको म्हणत असताना हट्टाने स्टेशनजवळ सोडले व तिने कार वळवली दुसऱ्या दिशेने.

आनंद मग त्या कंपनीत पोहोचला जिथे त्याला ती नवी इक्विपमेंटस पाहायची होती. सेल्सचा ज्युनियर माणूस त्याला समजावून सांगू लागला. पण थोड्याच वेळात याला आपल्याहून बरंच माहित आहे याबद्दल, आणि याच्या प्रश्नांची उत्तरं आपण देऊ शकत नाही हे लक्षात आल्यावर, त्याने वरच्या बॉसला बोलावले. त्याने बरीच माहिती सांगितली. एकदम दोन इक्विपमेंटस घ्यायची होती त्याला. मोठा ब्लेंडर आणि व्हॅक्यूम जॅकेटेड व्हेसल. या तरूण मुलाकडे पाहून उगाचच चौकशा करतोय ही प्रथमदर्शनी झालेली कल्पना नंतरच्या त्याच्या प्रश्नांनी बाजूला सारली गेली.'कान्हासरीने' याआधी एक छोटा ब्लेंडर घेतला होताच. मग डेमो झाला. काही शंका होत्या व काही थोडे बदल आनंदला करून हवे होते. ते त्याने सांगितले.

“हे तर सरांशी बोलावं लागेल,” मॅनेजर म्हणाला.

“हरकत नाही, बोलून कळवा मला. पण लवकर सांगा. मला लोन प्रोसीजर करायला पुढे वेळ जाईल.”

“हो, सर, साहेब आले की बोलून घेतो मी त्यांच्याशीं. तुम्ही चहा, कॉफी काय घेणार?”

“नाही, काही नको. हा माझा नंबर. सकाळी फोनवर कळवा मला.”

“हो हो, नक्की कळवतो सर.”

आनंदा त्याच्या केबीन मधून बाहेर पडला आणि उर्मीवर धडकता धडकता वाचला. ती अगदी त्याचक्षणी शेजारच्या मोठ्या केबीनमधून बाहेर पडत होती.

“ओह, कसे आहात? आणि इथे कसे?” तिने अत्यंत प्रसन्नपणे विचारले!

आनंदाला क्षणभर वेळ लागला आठवायला. ते चाणाक्ष उर्मीच्या नजरेतून सुटलं नाही.

“आपण तुमच्या चित्रप्रदर्शनात भेटलो होतो सावजींच्या गॅलरी मधे!”

“ओह! माफ करा हं! मला पटकन आठवलं नाही.”

“ते साहाजिकच आहे.”

“नाही तसं नव्हे..!”

त्याचं ते गोंधळणं पाहून उर्मीला एकीकडे गंमत वाटली तर एकीकडे त्याच्या सरळ सरळ 'विसरलो' असं कबूल करण्याचं कौतुकही!

आसपास सतत, शाब्दिक कौतुकांचा वर्षाव करणारे, गोंडे घोळणारे, तिच्या सौंदर्यावर आणि तिच्या श्रीमंतीवर फिदा तरूणांच्या भाऊगर्दीत हा तरूण चित्रकार तिला एकदम वेगळा वाटला तर त्यात नवल नव्हतं.

"तुम्ही कलाकार, या लोखंडी नीरस मशीन्सच्या दुनियेत काय करताय?"

"जिथे तुमच्यासारख्या बुद्धीमान सौंदर्यवतीला आकर्षित करणारं काही आहे तिथे माझ्यासारख्या साध्या चित्रकाराला यायला लावणारं असेलंच ना काहीतरी!"

'अच्छा! बच्चमजी अगदीच कच्चा खेळाडू नाहीय म्हणजे!'

"मी 'दां'ना भेटायला आले होते. तुम्ही भेटलात त्यांना त्यादिवशी!"

पण माहिती लपवण्यात व काढून घेण्यात हा वाकबगार आहे, हे काही क्षण उशीरानेच लक्षात आलं तिच्या आणि हा खेळाडू रंगत आणणारा आहे खेळात असंही वाटलं.

आनंदाचे मग लक्ष गेले पाटीवर. भागवतांच्या नावाची पाटी होती तिथे.

'ओह, म्हणजे ही त्यांचीच कंपनी, अंहं, अनेक कंपन्यांपैकी एक कंपनी.पण पूर्वी तर नंदकानी होते मालक.' आनंदाच्या चेहऱ्यावरून त्याच्या

मनातल्या विचारांचा फारसा अंदाज येत नसला तरी तो विचारात पडलाय हे उर्मीला लगेच कळलं.

“दां नी, अलिकडेच टेक ओव्हर केली ही कंपनी.”

“अच्छा!” पुढे काय बोलावं दोघांनाही कळेना.

“चला, निघतो मग!” तो म्हणाला. ‘नाईस मीटींग यू’ चे शिष्टाचार माहित असूनही आनंदाला ते फारसे जमलेच नाहीत कधी. उर्मीला त्याचीही गंमत वाटली. तिनेच हसून मग ‘नाईस मीटींग यू’ म्हटलं. आनंदाला आता मात्र अवघडल्यासारखं वाटलं. तो मान झुकवून अभिवादन करत बाहेर पडला. सरळ चालत स्टेशनकडे निघाला.

“सोडू का तुम्हाला कुठे?”

कारची खिडकी खाली करत शेजारी येऊन थांबलेल्या शोफर ड्रीव्हन कारमधून उर्मीने विचारलं.

“नाही नाही, नको, मी इथेच स्टेशनवर जाऊन लोकल घेईन.”

“स्टेशनपर्यंत सोडते बसा.” असं म्हणत तिने कारचं दार उघडलं आणि मग आनंदाला बसण्यावाचून गत्यंतरच उरलं नाही.

“तुम्ही कंपनीत का आला होता? सांगितलं नाहीत.”

“ओह! हं! मी एक दोन इक्विपमेंटस पाहायला आलो होतो!”

“मग?”

“मला हवी तशी आहेत. पण थोडे बदल करून हवेत. मॅनेजर, साहेबांना विचारून सांगतो म्हणाले.”

“आय सी!”

“चित्रकारांनाही आमच्या किचन इक्विपमेंटसची गरज पडते हे नव्हतं माहित मला.”

तिच्या बोलण्यातली मिश्किल किनार लक्षात येऊन आनंदलाही हसू आलं! हसताना त्याच्या गालावरची खळी पाहून उर्मीसारखी मुलगीही क्षणभर श्वास घ्यायला विसरली.

“माझ्या आई वडिलांचा खाद्यपदार्थांचा व्यवसाय आहे. रामनगरमधून चालवतात. घरगुती स्वरुपात सुरू केला होता त्यांनी १० १२ वर्षांपूर्वी. पण आता मागणी खूप वाढलीय. म्हणून काही कामं इक्विपमेंटस वापरून करावी असं मला वाटतं.”

“अरे वा! ‘दां’ ना कळेल तेव्हा खुश होतील. व्यावसायिकांचं, आणि असा शुन्यातून व्यवसाय उभा करणाऱ्यांचं त्यांना भारी कौतुक आहे.”

“छे हो, व्यवसाय अगदीच घरगुती आहे आमचा.”

उर्मी फक्त हलकंसं हसली यावर. स्टेशनजवळ गाडी थांबली तसे आभार मानून आनंदा उतरला. त्याने वयस्क ड्रायव्हरचेही आभार मानले. व तो हात हलवून स्टेशनच्या दिशेने चालू लागला. गाडी पुढे निघाली. उर्मीची नजर मात्र बराच वेळ पाठमोऱ्या दूर जाणाऱ्या आनंदाला न्याहाळत राहिली.

एक दोन ठिकाणांहून मालाचे चेक मिळायचे होते ते घेऊन, बॅंकेत भरून, बाकी काही ठिकाणी पहिल्यांदा भेटायचे होते तिथे जाऊन, एक दोन जुन्याच ग्राहकांकडे ऑर्डरसाठी जाऊन तो घराकडे परत फिरला.

अर्ध्या रस्त्यातच त्याला कृपाचा बर्थडे पार्टीच्या व्हेन्यूच्या ॲड्रेसचा मेसेज आला. "आलास तर बरंच आहे नाही आलास तर लॉस तुझाच होईल. मला तर माझं गिफ्ट मिळालंय" असंही तिने लिहीलं.

आणि चक्कं आनंद घरी येऊन आंघोळ करून, कपडे बदलून निघाला. गेटमधून बाहेर पडून त्याने रिक्षाला हात केला. इकडे त्याची रिक्षा निघाली आणि तेव्हाच एक कार त्या घराच्या आवारात शिरली.

आनंद पार्टीच्या ठिकाणी पोहोचला तेव्हा नुसती धमाल सुरू होती. बरेचसे कॉलेजकंपूमधले होते त्यांनी आनंदाला घेरलंच गेल्या गेल्या. बर्थ डे गर्ल मस्त नटली होती आज. नेहमी जीन्स टी शर्टस मधली टॉमबॉय कृपा आज लांब पायघोळ शिफॉनच्या झग्यात वेगळीच दिसत होती. केसंही नेहमीसारखे वर घट्ट पोनीटेल मधे न बांधता तिने मोकळे सोडले होते. हातात ब्रेसलेट, पायात नेहमीच्या स्पोर्टशूज ऐवजी पेन्सीलपॉइंट हाय हील्स!

आनंद आलेला आणि मित्रांच्या गराड्यात हरवलेला तिने पाहिला होता. पण तिथूनही त्याची भेदक नजर तिला जाणवली आणि तिने पटकन वळून पाहिले. मग अत्यंत दिमाखदार पावलं टाकत ती त्याच्याजवळ पोहोचली.

“जरा जास्तच झालंय ना सगळं? आय नो! पण आता कोणीतरी पटायला हवं ना मलाही. तुझ्यासारखं थोडंच आहे, जीन्सवर झब्बा आणि खांद्याला झोळी या गणवेशातही तू पोरींना हॉट नी कूल नि काय काय वाटतोस.”आनंदने यावर अती सहनशीलता दाखवल्याचा आव आणत मान हलवली.

“छान दिसतेस. सुरवंटाचं फुलपाखरू झालं बुवा!”

असं त्याने म्हटल्यावर तिने त्याच्याकडे पाहिलं पटकन, चेष्टा करतोय की काय म्हणून. पण त्याच्या बोलण्यात किंवा चेहेऱ्यावर कुठेच चेष्टेखोरपणा दिसला नाही तशी ती सुखावली.

“विश मी लक! मला कोणीतरी भेटो छानसा असं. तू विश केलंस की नक्की होईल तसंच!”

“तथास्तु!” तो म्हणाला. ती मनापासून हसली मग.

“तुलाही भेटेल कदाचित,” असं म्हणून खट्याळ हसत ती दुसऱ्या कोंडाळ्यात सामील झाली.

मग बरेच मित्र मैत्रिणी येत राहिल्या. गप्पा खाणं पिणं, थट्टा मस्करी होत राहिली.

बऱ्याच वेळाने आनंद जायला निघाला. त्याने परत एकदा, खरंतर तसं पहिल्यांदाच कृपाला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि तो दरवाजाकडे वळला. त्याने जायला दरवाजा उघडला आणि ती आत आली. हो, बरोबर,

तीच. त्यादिवशी त्याच्या चित्राचा कोन बरोब्बर हलवून प्रकाशयोजना परफेक्ट ॲडजस्ट करून गेलेली ती. अनामिका!

एक वीज सळसळत त्याच्या अंगातून गेली. ती मात्र ‘थॅंक यू’ म्हणून कृपाला शोधत आत गेली. बहुतेक ती बाकी कोणालाच ओळखत नसावी. कारण एकेका कोंडाळ्यात डोकावून ती पुढे जात होती. ती कुठूनतरी कामं संपवून सरळ इकडे आली असावी कारण तिचे कपडे पार्टीला जाण्यासाठी परिधान करतात तसे नक्कीच नव्हते. किंबहूना दिवसभर ती याच कपड्यात वावरून सरळ इथे आली असावी असं दिसत होतं.

आनंदा एकदम भानावर आला. तो दरवाजा धरून तसाच किती वेळ तिला न्याहाळत व तिचा विचार करत उभा होता. तो जायला वळणार तेवढ्यात ती परत दरवाजाकडे येताना दिसली. मग त्याला वळणं जमलंच नाही. आत्ता तिला त्याचा चेहरा दिसला. तिच्या चेहऱ्यावर ओळख होती आता. ती गर्दीतून वाट काढत त्याच्यापर्यंत पोहोचली. तो मात्र संमोहित झाल्यासारखा नुसता पाहत राहिला.

“चित्रकार आनंद! बरोबर ना? कृपा भेटली का तुला? की बर्थडे गर्लच गायब आहे आज?”

“अं? काय? हो हो, म्हणजे नाही!”

त्याच्या चेहऱ्यावरच्या गोंधळलेल्या चेहऱ्याकडे पाहताना आणि त्याची ही अशी उत्तरं ऐकून जाम हसू आलं तिला.मग तो सावरला जरा.

“हो मी आनंद. कृपा मला भेटली का? हो भेटली. बर्थ डे गर्ल गायब आहे का? नाही. ती इथेच आहे.”

“हं! कळलं बरं का, मी एका दमात अनेक प्रश्न विचारले ते.”

दोघंही जरा जोरातच बोलत होते कारण सगळयांचा मिळून आवाज, त्यात संगीत वाजत असलेलं.

“तू निघाला होतास का परत? थांब ना जरा वेळ. कृपा भेटेपर्यंत तरी. माझी कोणाशीच ओळख नाही इथे. आणि तिला विश केल्याशिवाय जाणं बरं नाही ना? खूप आग्रहाने बोलावलं तिने मला इथे.”

“तुझी कृपाशी कशी ओळख?”

“अलिकडेच झाली. असंच एक आर्ट एक्झीबिशन कव्हर करायला गेले होते, तिथे आली होती ती. मग तिनेच ओळख दिली मला की आनंदच्या पेंटींगच्या प्रदर्शनात भेटलो होतो. मग छान गट्टी जमली आमची. आज बर्थ डे पार्टीला आवर्जून बोलावलं तिने, म्हणून आले. मला फारशा लाऊड पार्टीज नाही झेपत. फारच जवळची मित्रमैत्रिणी असतील तर ठीक. तू तो दरवाजा कुठेतरी पळून जाणार असल्यासारखा धरून का उभा आहेस? आत ये. कृपा भेटेपर्यंत तुझी सुटका नाहीच आहे. तर चल, माझ्यासाठी काहीतरी सॉफ्ट ड्रींक किंवा ज्यूस मागव ना. म्हणजे मी ही मागवू शकेन पण,..”

आनंदने मग तिला बारजवळ नेलं. तिच्या चॉईसचं मॉकटेल मागवलं.

“तू ही घे ना काहीतरी.”

“नको. बरंच खाणं पिणं झालय. तसा लवकरच आलो होतो मी.कोणत्या ग्रुपसाठी काम करतेस?”

“कोणत्या एका ग्रुपसाठी असं नाही. फ्री लान्स, माझी मी स्वतंत्र समीक्षा करते, स्टोरी बनवते, कोणाला आवडेल तो छापतो. कोणाच्या मताने लिहीणं, मग त्यात लागेबांधे असतात, याच्याविषयी चांगलंच लिही, त्याच्या आर्टबद्दल आग लाव, अमक्या तमक्याला गाडायचय....

जमत नाही तसलं! पण माझा असा वाचकवर्ग आहे, ज्यांना पटतात माझी मतं, निदान त्यात भेसळ नाही हे पटतं, ते वाचतात. माझ्या मीच फुगवलेल्या फुग्यात मी आनंदात जगते, उडते.”

आनंदा ऐकत होता, पाहत होता. जणू कळसूत्री भावला झाला होता त्याचा. त्याला ते कळतही होतं आणि नव्हतंही. पण काही न पिताच नशा झाला त्याला.

‘हे असंही होतं?’तेवढ्यात कुठूनशी कृपा आली. एकीकडे तो हिरमुसला आणि एकीकडे त्याने मोकळा श्वास घेतला. तो नशा अनावर होण्याआधीच बाहेर पडणं गरजेचं होतं.

“हाय गाईज! हे हाय पी!”

“हाय के!”

मग दोघी गळ्यात पडल्या. प्रॉपर विश वगैरे झालं. कृपाने तिला मिठी मारता मारता आनंदला डोळा मारला. तो जाम कावरा बावरा झाला.

आपल्या या गंभीर मित्राची ही अशी अवस्था झालेली पाहून तिला फार हसू आलं. पण ती काही बोलली नाही. “अरे, तू गेला नाहीस अजून? मला तर केव्हाचाच विश करून गेलास, मला वाटलं पोहोचला असशील घरी एव्हाना.”कृपा खट्याळपणे म्हणाली.

आनंदाचा चेहरा पाहण्यासारखा झाला. मग ती ‘पी’च म्हणाली, “मीच थांबवलं गं त्याला. तू दिसेनास, बाकी कोणी ओळखीचं नाही. याला म्हटलं थांब!”

“हं! अच्छा!”

चल मी तुझी सगळ्यांशी ओळख करून देते.

“गाईज, मीट द ग्रेट फ्री लान्स आर्ट क्रिटीक अॅंड माय फ्रेंड,....”

आनंदा मग थांबला नाही. निघालाच. तो संमोहित करणारा नशा त्याला थोपवायलाच हवा होता.

सरळ टॅक्सी करून घरी आला. पाहतो तर रुमचे लाईट सुरूच!

‘अरे, बाबा आले की काय? त्यांच्याकडेच असते एक किल्ली.’ तो भराभर जिने चढून वर आला. आणि स्तंभित होऊन दारातच थांबला. अरमान जमिनीवर बसला होता. त्याने स्वत:ची आणि आनंदची चित्रे जमिनीवर मांडली होती आणि तो त्यांच्याकडे टक लावून पाहत होता. आनंदा आलेलाही त्याला कळले नव्हते.

२.१०

आनंदा काही क्षण पाहात राहिला. मग जरा भानावर आला. अरमानने चक्क रुमचे कुलूप तोडले होते. ‘अरमानजी’आनंदने हलकेच हाक मारली. ‘सर’मग एकदम जागा झाल्याप्रमाणे अरमानने वर पाहिले. आनंदाला दारात उभा पाहून त्याला एकदम आपण कुठे आहोत याची जाणीव झाली असावी. तो एकदम उठून उभा राहिला.

“माफ कर मित्रा! मला भान राहिलं नाही.”

“तुम्ही कधी आलात?”आनंदा जमिनीवरच्या चित्रांकडे पाहत म्हणाला. अरमानचा चेहरा एकदम अपराधी, चोरी पकडल्यासारखा झाला.

“मी, मी संध्याकाळीच आलो. तू नव्हतास. पण मला तुला भेटायचंच होतं. तुझी चित्रं पाहायची होती. बराच वेळ वाट पाहिली तुझी. मग राहवलं नाही. तोडलं कुलुप. मला.. माफ कर मला. मी.. मी तुझ्या चित्रांना मुळीच धक्का नाही लावला. फक्त पाहत होतो रे.”

अरमानच्या चेहऱ्यावर वेदना होती. काल रात्रभर तो रडत होता. तशीच मधेच त्याला कधीतरी थोडी झोप लागली. शरिराला जरा विश्रांती मिळाल्याबरोबर मनाने बांग दिली. परत विचारांनी सवाल करायला सुरवात केली. शेवटी ताण असह्य झाल्यावर तो उठला व आनंदाकडे आला. त्याच्या सवालांचे जवाब त्याला इथेच मिळतील असं वाटत होतं.

“तुमची तब्येत ठीक आहे ना? चेहरा कसा झालाय तुमचा!”

अरमान कसनुसा हसला.

"तुम्ही जेवलात?"

"ते राहू देत. तू इकडे ये. हे बघ. ही माझी चित्र! अमूर्त! अगदी अब्बूंचीच स्टाईल."

आनंदाने चमकून पाहिले. मग खूण पटली. 'आपल्या आधीच लक्षात यायला हवं होतं. हेच तर परवा गेटमधून येताना यांना पाहिलं तेव्हा जाणवलं होतं आपल्याला. चालण्याची लकब अगदी पीरबाबांसारखी. पीरबाबाही असेच देखणे असतील कदाचित!'

"आणि ही तुझी चित्रं! मूर्त!" अरमान पुढे बोलत राहिला. "तरीही तुझ्या चित्रात अब्बू दिसतात. तुझी चित्र परिपूर्ण वाटतात. माझी अपूर्ण वाटतात, समथींग मिसिंग! असं का?"

आनंदा अवाक होऊन पाहत राहिला. त्याला परवा यांची चित्र पाहताना हेच जाणवलं होतं, पण त्याला तेच बलस्थान वाटलं होतं अरमानच्या चित्रांचं! आस वाढवणारी! कधीच समाधान वाटू न देणारी. पाहणाऱ्याला खेचून स्वत:मधे हरवून टाकणारी. पाहणाऱ्याबरोबर पूर्ण होणारी!

आनंदा प्रचंड अस्वस्थ झाला. स्वत:ची भळभळती जखम हा आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव असलेला कलाकार अशी उघडी करून दाखवत होता. 'एवढा विश्वास? का वाटला असेल त्याला?'

“तुम्ही बसा बरं आधी. मी आलोच. असं म्हणत आनंदा आत गेला. चहा, आणि सकाळच्या ब्रेडचे टोस्ट करून घेऊन आला.

हं! आधी खा तुम्ही. चहा घ्या. मग बोलूया!”

‘पण काय उत्तर देणार याच्या प्रश्नाचं? पीरबाबा काय म्हणाले असते? पीरबाबा कुठे काय म्हणत कधी? त्यांना तर बोलताही नव्हतं येत. पण तरी आपलं कधीच अडलं नाही. त्यांना काय म्हणायचंय बरोबर कळायचं मला. काय म्हणाले असते पीरबाबा? खरंच काय म्हणाले असते?’

अरमानने टोस्ट खाल्ला. चहा प्यायला. तरतरी आली त्याला नाही म्हटलं तरी. पण सल कायम होता. “मला शिकवशील तुझी कला? अब्बूंची कला?” अचानक आनंदाचे हात हातात घेत अरमान म्हणाला. आनंदाने काही वेळ ते हात तसेच हातात धरले.

“अरमानजी, सावरा स्वत:ला. तुमच्या सारख्या प्रसिद्ध माणसाने असा धीर सोडू नये. पीरबाबांविषयी ऐकून तुम्हाला धक्का बसलाय. सावरा स्वत:ला. कोणी असं इथे पाहिलं, बोलणं ऐकलं तुमचं तर? फार वाईट परिणाम होतील तुमच्या इमेजवर. बसा तुम्ही या इथे खुर्चीवर.” अरमान पाहत राहिला. असंच अब्बूना सांभाळलं असेल यानं.

तुझे पीरबाबा माझे अब्बू! असं म्हणून अरमानने त्याची सगळी कहाणी आनंदाला सांगितली. ती सांगताना आणि ऐकताना, दोघांनाही भरून येत

होतं, मधूनच डोळे वाहत होते. कायमचं हरवलेल्या पित्याचं, गुरूचं आठव दोघांनाही हळवं करत होतं.

आपल्या अम्मीने केलेल्या खोटेपणाबद्दल सांगताना अरमानचा चेहरा शरमिंदा झाला. आणि तरीही आपण तिला काहीही बोलू शकलो नाही या वैषम्याने त्याने मान खाली घातली. मधल्या घटनांच्या कड्या कोणालाच कळणार नव्हत्या कदाचित. फक्त स्विकाराव्या लागणार होत्या. तो दुकानदार त्यादिवशी अनंताला म्हणाला होता ते आनंदाला आठवलं! "चरस ने खतम किया पीरको. आपके बच्चेने अंततक साथ निभाया. हम ब्यापारी है जनाब! पैसा मिले तो कुछभी बेचते! तस्वीरे अच्छा दाम लाती पीरकी! पर सारा चरसमेंही जाता! मेरे पास पहली बार चरस मांगनेही आया! पागल समझकर मै निकालबाहर किया. फिर तस्वीरें लेकर आया." बस! एवढंच माहित होतं त्यालाही. बराच वेळ दोघे तसेच बसून राहिले. मग आनंदाने भराभर सगळी चित्रे नीट रचून ठेवली. कॉटवरची चादर नीट घातली. उशी पांघरूण ठेवलं. अरमानला म्हणाला झोपा तुम्ही वर. स्वत: खाली चटईवर पडला. काही वेळातच पीरबाबाच्या, अब्बूंच्या विचारातच दोघांनाही झोप लागली. सकाळी अरमान बराच उशीरा उठला. इतकी शांत झोप हॉटेलरुममधे कधीच लागत नाही, कितीही सुखसोयी असूनही. आता तो बराच सावरला होता. तो उठण्याची आनंदा वाटच पाहत होता. उठल्याबरोबर त्याने चहा दिला.

"मी जरा नवं कुलुप घेऊन येतों." तो म्हणाला.

“ओह! मला माफ कर! फारच विचित्र वागलो मी काल.”आनंदा काहीच बोलला नाही यावर.

“तुम्ही थांबाल थोडा वेळ? दार उघडं ठेवून जाता नाही यायचं.” मग त्यालाच हसू आलं. “म्हणजे कोणीही कुलुप तोडून येऊ शकतोच म्हणा. पण तरीही.”

अरमानही हसला. “तू थांब. मी तोडलंय, मीच आणून देतो. आणि एक किल्ली माझ्याकडेच ठेवतो. मला यावं लागेल बऱ्याचदा.” तो हसत हसत म्हणाला. आनंदही हसला मग.

दोन संपूर्ण भिन्न व्यक्ती... वयात अंतर, सामाजिक, आर्थिक स्थितीत तर महदंतर, पण कलेच्या घट्ट धाग्याने, आणि पीरबाबाच्या प्रेमाच्या नाजूक बंधनाने बांधलेले हे दोघे, नकळत मनाने जवळ आले त्यात नवल ते काय?

२. ११

“हॅलो!”

“आई, बोल गं! आवाज का बारीक येतोय तुझा?”

“काही नाही गं! जरा धाप लागते हल्ली.”

“किती वर्ष सांगतेय की इकडे या आता. एकटं राहणं बास झालं!”

“हो हो, तेच सांगायला फोन केलाय. सवडीने ठरवून या. आम्ही येऊ तिकडेच, इथलं सगळं गुंडाळून.”

“अगंबाई! वावा! लवकरात लवकर येतो गं! बरं झालं बाई ठरवलंत एकदाचं! तुमच्या काळजीने झोप नव्हती लागत मला!”

“हो, आता येतोय ना? नको करूस काळजी. ठेवू फोन?”

“हो, ठेव. मी लगेच यांना सांगतेच.”

“अहो,!”

अनुराधेने लगेच अनंताला सगळं सांगितलं. तो म्हणाला “सवड काढून जाऊच लगेच, हो म्हणत आहेत तोवर. पण आनंदाच्या कानावर घालूया! पोर मोठा झालाय आता.”अनुराधा कावरीबावरी झाली. ‘आनंदाला आवडेल ना? अजून अढी असेल का मनात त्याच्या? तिथून आल्यानंतर पोरगा बदलला कायमचाच.’

———————-

“हॅलो!”

“हां, बोल गं आई!”

“अरे, कामात आहेस का फार?”

“नाही गं! बोल ना!”

“अरे, आजीची तब्येत नरम असते हल्ली. आजोबांनाही झेपत नाही. मी बरीच वर्ष म्हणतेय की इकडे या. पण ऐकत नव्हते. आता तयार झालेत.”

काही सेकंद शांततेत गेले.

“तुझ्याशी बोलायला हवं होतं आधी. पण विषयच झाला नाही.”

“अगं, नाही, मी कॅलेंडर पाहत होतो, की कधी सलग चार दिवस मोकळे मिळताहेत... म्हणजे मी जाऊनच घेऊन येईन.” पलिकडून एक मोकळा श्वास ऐकू आला त्याला.

“आई, तुला काहीही मला विचारून करण्याची गरज नाही. तू सांगशील तसं होईल. मी जरा सवड बघतो, मग कळवतो तुला.”

“हो बाळा! बरा आहेस ना?”

आईच्या स्वरातला ओलावा आनंदाला नेहमीच जाणवायचा पण आज स्पर्शून गेला. ‘कधी बदललं आपलं नातं? जेव्हा आपण बदललो. ती तर तशीच आहे. अजूनही. आज अरमानला वडलांच्या आठवणीत हळवं होताना पाहिलं तेव्हा तिचाच मायेचा हात आठवला.’

“हो गं!, मी बरा आहे. यावेळेस दोन चार दिवस ठेवूनच येईन.”‘तुझ्या हातच्या आमटीची रोज आठवण येते. आणि डोक्याला तेल लावून मालीश पण करून दे आलो की.’ हे सगळं बोलावसं वाटलं त्याला, पण बोलला नाही.

“लवकर ठरव रे यायचं.” आईच्या स्वरातला हुंदका प्रकर्षाने जाणवला त्याला. नकळत नजर धूसर झाली मग त्याची. लगेचच त्याने कॅलेंडर पाहिलं. आठवड्याच्या अखेरीला जायचं ठरवलं. तोपर्यंत मशीनबाबतही निर्णय झाला असता.

---

“हॅलो?”

“गुड इव्हिनींग सर!”

“मी यू के इंडस्ट्रीज मधून बोलतोय.”

“हं! बोला ना!”

“तुम्हाला हवे तसे बदल करून देता येतील असं म्हणाले सर.”

“ओह! गुड! उद्या सकाळी दहाला येतो.”

‘चला. हे ही काम झालं तर मशीनच्या इन्स्टॉलेशनच्या वेळी आपण रामनगरीत असू. बाबांवर, चंदूवर ताण नाही पडायचा.’

---

“हे! हाय हॅंडसम!”

“कृपा, लवकर बोल.”

“येवढं काय? काल तर कसा गोरा मोरा चित्रकार पाहिला आम्ही!”

“झालं?”

“हाहाहा!”

“काम असेल काही तर सांग! गडबडीत आहे मी.”

“हो हो! असायचेच आता चित्रकार गडबडीत! मुलाखत घ्यायला कोणी फ्रि लान्सर यायचीय का?”

“कृपा......!”

“ओके ओके! काल परत भेटल्यावर भेजात बेल वाजली ना त्यादिवशीसारखी?”

“मी फोन ठेवतोय!”

“छे! तू मुळीच फोन ठेवत नाहीस आता!”

“__________“

“__________-“

“म्हणजे परत बेल वाजली! तुझी चुप्पीच सांगतेय सगळं!”

“कसली भयंकर भाषा गं तुझी!”

“तिची आहे बरं का शुद्ध!”

“हं!”

“बरं चल ठेवते!”

“अगं!”

“संध्याकाळी मस्त काहीतरी खायला कर! मी येणारे! बाय.......!”

“हॅलो, हॅलो कृपा, अगं संध्याकाळी.. हॅलो!”

‘मॅड पोरगी आहे एक नंबरची!’ चडफडत आनंदने फोन बंद केला.

‘बेल वाजली का म्हणे!’ त्याला ती आठवली. ‘काय नाव तिचं? कुठे सांगितलं तिने? आपणही नाही विचारलं! नंबरही नाही घेतला! छे! चुकलंच हे!’ आता कृपाला मागायचा म्हणजे डोकं फिरवेल ही!’

—————-

“हॅलो!”

“उर्मी, उद्या सकाळी दहाला एक महत्वाची डील आहे. तू वेळेत ऑफिसला ये!”

“दा! मी?”

“हो! आता तू थोडं थोडं लक्ष घालावंस!”

“बरं येते दा! तुम्ही म्हणताय तर येते!”

“गुड गर्ल!”

‘हे काय नवीन? मला कशाला बोलवताहेत? आणि सुरवात करायची तर लहान कामांपासून करावी ना? एकदम महत्वाच्या डीलच्या मीटींगमधे का बोलवायचं? दाचं वागणं कधी कधी कळतंच नाही मला.’

______________

“हॅलो?”

“क्या बात है अरमान? सब खैरियत? कई दिनसे फोन नहीं किया?”

“आप जानती थी अब्बू जिंदा है!”

“______________

________________”

“आपने झूठ क्यों कहा?”

“____________________”

“तुमसे किसने कहा?”

“_____________________”

“उस वक्त कोई और चारा नही था मेरे बच्चे! उस चरसी को तुम्हारी जिंदगी से न हटाती तो तुम्हारी तबाही पक्की थी! क्या तुम मिले उनसे?”

“वो नहीं रहे अम्मी! वो अब सच में नही रहें! अब्बू अस्पताल जाने से पहले तो नशा नहीं करते थे!”

“अब तुम मुझसे सवाल करोगे? ये तो मानते हो ना के यहां आकर तरक्की हुई! या उससे भी इन्कार है? जो भी किया तुम्हारे भलाई के लिये किया! बस्स! मुझे और बहस नही करनी!”

अरमान किती तरी वेळ फोन हातात घेऊन तसाच बसून राहिला. ‘अम्मीने ग़लत किया। मेरी तरक़्क़ी झूठ से जुड़ गयी अम्मी। सुकून कैसे मिलता? मला माझी कला अधूरी वाटते यात काहीच नवल नाही. एक अशी गलती पदरी घातलीस जिला सुधारणं शक्य नाही. जन्मभरासाठी आता ना मी अब्बूकडे माफ़ी मागू शकतो ना तुला माफ़ करू शकतो!’

त्याचा जीव घुसमटू लागला. आज अगदी एकटा झाला तो. हुंदके आतून दाटत होते पण बाहेर येत नव्हते. पोकळपणा वाकुल्या दाखवू लागला! ‘ये तरक्की, ये नाम, मेरे अंदरकी कला सब खोखले है! ना इनका कोई मतलब, ना मेरा कोई वजूद!’

पोकळी घेरून आली चारी बाजूंनी! अफाट अमाप असीम पोकळी. ना कसला आधार, ना काही ठोस दिशा. वाहत चालला अरमान त्या पोकळीत. तडफडत, घुसमटत, धडपडत! वावटळीत सापडलेल्या वाळक्या पानासारखं त्याचं मन एका आठवणीवरून दुसऱ्या आठवणीवर आपटत, चोट खात घरंगळू लागलं! दिशाहीन झालं. या अशा लटपटत्या मनोवस्थेत कधी अरमान रुममधून उठून खाली हॉटेलच्या बारमधे आला आणि कधी ग्लासच्या ग्लास रिचवले त्याचं त्यालाही कळलं नाही. आगीने आग विझवण्याच्या प्रयत्नात तो मात्र पूर्णपणे आतून खाक झाला.

बार बंद करायची वेळ झाली तसं वेटर्सनी जवळ जवळ उचलून रूममधे आणून टाकलं. अब्बूची याद तरीही जागीच राहिली. झोपेतही मग कितीतरी वेळ अरमान अब्बू अब्बू करत राहिला.

---

आनंद दहाच्या थोडं आधीच यू के इंडस्ट्रीजच्या ऑफिसमध्ये पोहोचला. दारातच उर्मी भेटली.

“गूड मॉर्निंग!”

“वेरी गूड मॉर्निंग!”

“तुम्ही रोज येता का ऑफिसला?”

“नाही! आज काही महत्वाचं काम आहे म्हणाले दा! म्हणून आले.”

“ओह! आय सी!”

“तुम्ही?”

“मला हवी ती मॉडीफिकेशन्स करून देताहेत तुमचे अधिकारी.”

“अरे वा!”

पुढे काय बोलावं दोघांनाही कळेना.

“ओके, मी भेटतो मॅनेजरना. हॅव अ गूड डे!

“ओह, ओके, यू टू!”

इतक्या पटकन संभाषण संपल्याची चूटपूट उर्मीच्या शब्दांतून आणि आवाजातून स्पष्ट जाणवली. खरंतर उर्मी अत्यंत समतोल वागणारी, बोलणारी. पण या मुलाबरोबर सगळं वेगळंच घडायचं दर वेळी.

विचारांना झटकून उर्मी 'दां'च्या ऑफिसमधे शिरली. आनंद आधीच रिसेप्शनीस्टकडे वळला होता. उर्मी मॅडमच्या ओळखीचा दिसल्यावर रिसेप्शनीस्टनेही उभं राहून अदबीने उत्तरं दिली. आनंदाला बसायला सांगून तो मॅनेजरच्या केबिनचा फोन फिरवू लागला.

तेवढ्यात मि. भागवत आले. त्यांना पाहताच सगळेच बसलेले उभे राहिले. मानेनेच सर्वांचे अभिवादन स्विकारून ते केबिनकडे जाऊ लागले तेवढ्यात त्यांचे लक्ष आनंदाकडे गेले!

क्षणभर विचारात पडल्यासारखे झाले, मग काहीसं आठवून ते सरळ त्याच्याकडे आले.

"हेल्लो यंग मॅन! आपण याआधीही भेटलोय, जर माझी स्मरणशक्ती दगा देत नसेल तर!"

"हो सर!"

"कुड यू जस्ट हेल्प मी? कुठे भेटलो होतो आपण?" "सावजींच्या गॅलरी मधे!"

"ओह येस येस! नाव दॅट यू मेन्शन्ड, आय.... पण त्याआधी आपण इथे भेटलो होतो?"

"भेटलो नव्हतो. बट यू पास्ड बाय, जेव्हा मी ब्लेंडर निवडायला आलो होतो." चकित होण्याची आनंदची पाळी होतीं.

"ब्लेंडर! तुला ब्लेंडरची काय गरज?"

"सर माझे आईवडिल रामनगरी मधे फुड प्रॉडक्टसचा व्यवसाय करतात. घरगुती स्वरुपात सुरू केलेला व्यवसाय वाढत चाललाय. काही बेसिक इक्विपमेंटस घेतली आहेत तुमच्या कंपनीची. परवा अजून एक पाहून गेलो, त्यात मला काही बदल हवे आहेत करून, त्यासंदर्भातच आलो आहे आजही!"

"ओह! दॅटस सिम्पली ग्रेट!"

"उर्मी येईलच एवढ्यात! शी इज फॅन ऑफ युवर पेंटिंग्ज."

"आल्या आहेत त्या. झाली आमची भेट!"

"ओह रियली? कॉफी झालीच असेल मग तुमची! आय लॉस्ट द चान्स!"

"आत्ता एक महत्वाची मिटींग आहे. तू तुझं काम उरक. मग आपण भेटू, ओके!"

"येस, शुअर सर!"

"सी यू देन यंग मॅन!"

आनंदची मॅनेजरबरोबरची बोलणी चांगली झाली. जे बदल हवे होते ते बाहेरून ॲटॅचमेंटस देऊन होण्यासारखे होते. दोन दिवसांत बदल करून ट्रायल घेऊ म्हणाले.

---

बाहेर येऊन फोन पाहिला तर अरमानचे सात आठ मिस्ड कॉल्स!

त्याने लगेच कॉलबॅक केलं.

अरमानचा आवाज जड होता. तो अजूनही पीतच असावा.

“हे आनंद, कहॉं हो मेरे भाय?”

“अं, सॉरी सर, मी एका ऑफिस मधे होतो. फोन घेता नाही आला तुमचा.”

“तुम इतने सुलझे क्यूं हो?”

“जी? मै कुछ समझा नही!”

“हांहांहांहां! अरमान हसत होता पण रडण्यापेक्षाही ते भयंकर होतं.

“आप ठीक हो ना?”आनंदाच्या स्वरात काळजी होती.

“अब कैसे ठीक रहुंगा मेरे भाय? अब कैसे?”

अचानक एक हुंदका अरमानच्या घशातून निसटला.

“कुठे आहात तुम्ही? हॅलो, हॅलो,??”

फोन बंद झाला होता पलिकडून.

आनंदाला काय करावं कळेना. चार वाजले होते. कुठे असतील अरमान?

तो तडक रुमवर आला. अपेक्षेप्रमाणे दरवाजा उघडा दिसला. तो आत आला तर अरमान जमिनीवरच झोपला होता. शेजारी काही आनंदाची, काही पीरबाबांची चित्रं पडली होती. कालपासून तो या अशा बेहोश अवस्थेतच असावा. आनंदा अस्वस्थ झाला.

‘कसं समजावू या माणसाला? भारतात असले की सर अग्नीहोत्र करतात रोज याघरात. दारू पिऊन असं पडणं कधीच चालायचं नाही त्यांना. मी गावी गेल्यावर हा इथे येऊन दारू प्यायला तर? कसं थांबवणार मी? पीरबाबाच्या असण्याची व आता नसण्याची बातमी कळल्यापासून सैरभैर झालाय बिचारा. कसं सावरायचं?’

मग आनंदाला काही सुचलं! त्याने अरमानला जागं केलं! पाणी दिलं. कॉफी दिली. अरमान जरा तरतरीत झाला.

“कधी आलात?”

“सकाळीच! माफ कर मित्रा. इथे आल्यावर जो सुकून मिळतो तो हॉटेलरुमच्या मऊ गादीवर नाही. तिथे रुम, त्यातील वस्तू अंगावर आल्यासारख्या वाटतात.” आनंदा फक्त ऐकत राहिला. बराच वेळ अरमान

बोलत राहिला. अम्मीशी झालेलं संभाषण, त्याला पुरून उरलेली, गुदमरवणारी पोकळी! अब्बूं बरोबरच्या आठवणी.

अरमान जरा शांत झाल्यावर आनंद म्हणाला, “तुम्हाला पीरबाबांची कबर पाहायचीय? माझ्याबरोबर चला. कबरीसमोर बसून मनातलं सगळं बोला. ऐकतील तुमचे अब्बू! तुमच्या मनावरचा ताण हलका होईल.”

अरमानचे डोळे चमकले! “नेशील तू मला? खरंच?”

“हो! पण तिथे कोणतंही व्यसन करायचं नाही. माझे आजीआजोबा वयोवृद्ध आहेत. आधी त्यांच्या गावी जाऊन, त्यांना घेऊन मग रामनगरीला जाणार मी. तिथे पोहोचलो की फोन करेन, मग या तुम्ही.”

अरमानचा चेहरा काहीसा काळवंडला. “आधी रामनगरीला नाही का जाता येणार?”

“नाही. मला आजीआजोबांना घेऊन यायचे आहे.”

“बरं! ठीक आहे. कधी निघुया?”

“तुम्ही?”

“हो मी तुझ्याबरोबरच येईन! हो हो, तू सांगशील ते सगळे नियम पाळेन. जंटलमन बनून येईन. बस?”

“बरं! ठरलं की सांगतो.”

“म्हणजे अजून ठरलंच नाही?”लहान मुलासारखं उताविळ होत अरमान म्हणाला.

“नाही. पण जाऊ लवकरच. आणि तुमचं एक्झिबिशन तरी संपायला हवं ना?”

“बरं! सांग मला मग कधी जायचं!”अब्बूच्या कबरीवर फुलं वाहता येतील या कल्पनेनेच अरमान बराच सावरला. आनंदाने त्याला टॅक्सी आणून दिली. “आता जेवण करून झोपा.”तो म्हणाला. अरमानला तो काय सुचवतोय बरोबर कळलं. “नाही पिणार आता.” तो नरमाईने म्हणाला.

२. १२

आठवड्यात आनंदाने बरीच कामं मार्गी लावली. कृपाचा दोनदा आलेला फोन त्याने घेतलाच नव्हता. भडकून पोरगी कधीही हजर होऊ शकते ही शक्यता त्याने गृहित धरली होती. झालंही तसंच. एक दिवस सकाळी सातलाच दार वाजलं. कधीही बेल वाजवायची नाही. दाराची कडी खट खट खट अशी तीनदा वाजवायची ही तिची खास सवय. आनंदाने चहा वाढवला आणि मग दार उघडलं.

दोन्ही हात कमरेवर ठेवून कृपा डोळे वटारून उभी होती. “गरज सरो वैद्य मरो, कामापुरता मामा”

आनंदा शांतपणे ऐकत होता. तो वळून आत गेला. “ओ महाशय, तुमच्याशी बोलतेय मी.”

त्याने चहाचा कप पुढे केला. सोबत कान्हासरीचे गरम मेथी पराठे, वर बटर! बाईसाहेब विसरूनच गेल्या आपण रुसलोय ते. पटकन प्लेट घेऊन खायला सुरवात. आनंद हसतोय हे पाहून, “टाईमप्लीज आहे. भांडण विल कंटीन्यू आफ्टर चायपराठा ब्रेक!” असं म्हणून तिने परत खायला सुरवात केली.

“मस्त करतात रे काकू पराठे! मला पार्टनर बनव, आपण एक्स्पोर्ट करू ही प्रॉडक्टस.”

तो काही बोलेना तेव्हा, “अरे गंमत नाही, खरंच म्हणतेय मी.मग भेटली का फ्री लान्सर पी? झाला का इंटरव्ह्यू?”

“__________”

“आज काय मौनव्रत आहे का तुझं? मीच बडबडतेय नुसती.बोला चित्रकार?” आनंदा म्हणाला, “माझा आठवडा फार गडबडीत गेला. भेटतोय कसला कोणाला? आणि तुझ्या संमती शिवाय ते ही?”“ॲहाहा! जसं काही सगळं माझ्या परमिशननेच करतोस की नाही!” कृपा फुरंगटून म्हणाली. “बाय द वे, नाव काय तिचं?”

“कोणाचं?”

“तिचंच गं”

“माय गॉड! तू तिला नावही विचारलं नाहीस?”

“कधी विचारणार?”

“हं!”

“काय आहे नाव?”

“नाव अं, नाव, काय बरं नाव?”

आनंदने तिच्यासमोरची प्लेट उचलली.

“सांगते सांगते. प्रज्ञा आहे तिचं नाव.”

"प्रज्ञा!" लहानपणीची मैत्रीण प्रज्ञा आठवली त्याला एकदम! प्रदीपही! आजोबांकडे गेल्यावर दिवाणांकडे जाऊनच यायचं असं पक्कं ठरवलं त्याने मनोमन!

"नंबर देऊ?"

"नको!"

"का रे"

आनंद फक्त हसला!

"फार वियर्ड वागतोस बरं का तू कधी कधी!

बरं, चल, मी निघते. आज रात्री ममाकडे जातेय यू. एस. ला. तिथून केलेले फोन तरी उचला, प्लीज!" नाटकीपणाने हात जोडत म्हणाली आणि सॅक अडकवून निघाली.

"मी पण इथे नसेन. गावी जातोय."

"ओह! ग्रेट! काकूंना माझा स्पे थॅंक यू सांग! पार्टनरशिपचंही सांग! ॲम नॉट जोकिंग! ओके!"

मग ती धाड धाड जिना उतरून गेली. आनंद पाठमोऱ्या कृपाच्या लांब जाणाऱ्या आकृतीकडे पाहत राहिला.

---

कामं जशी उरकत आली तसं आनंदने जाण्याची तारीख पक्की केली. त्या संध्याकाळी अरमानचा फोन आलाच. “माझं एक्झिबिशन संपलं आज. आता सांग कधी निघायचं.”

“परवा निघूया का?”

“चालेल. मी सकाळी येतो तुझ्याकडे, मग निघू!”

“सकाळी नाही, दुपारी आहे बस. एकच जाते ती थेट.”

“मी कार घेतो. त्यानिमित्त्याने मला परिसर पाहता येईल.”

आनंद गप्प झाला एकदम.

“रिलॅक्स माय फ्रेंड. मी चांगला ड्रायव्हर आहे.”

“तसं नव्हे, पण,,.”

“पण बीण काही नाही. ठरलं तर मग. मी येतोय परवा सकाळी. बी रेडी!”

अरमानने आनंदला बोलूच दिलं नाही पुढे.

आनंदा मग काही आठवून विचारात पडला. अरमान मुस्लीम! आजी आजोबांना चालेल? आजोबांना सांगता येईल, पण आजी? हे लक्षातच नव्हतं आलं आपल्या.

माझे पीरबाबांबरोबरचे संबंध बाबांनाच फक्त माहीत होते. आणि बाबांची गोष्टच निराळी. त्या लहानशा गावात अजूनही हॉटेल्स नाहीत. काळजीतच पडला तो. मग त्याने बाबांना फोन लावला.

“हां, बोल आनंद!”

“बाबा, बोलायचं होतं थोडं.”

“बोल ना.”

“तुम्ही आमराईत जाल तेव्हा करा. जरा सविस्तर बोलायचय.”

“बोल, मी आमराईतच आहे.”हे जणू दोघांत अलिखित ठरलं होतं की खास विषय आमराईतच बोलायचे.

मग आनंदने अरमानविषयी सगळं अनंताला सांगितलं. मनातली काळजीही बोलून दाखवली. आण्णांना चालेल का, ही काळजी होतीच. अरमानबद्दल ऐकल्यावर अनंतालाही आश्चर्य वाटलं.

“तू आजोबांच्या कानावर घाल. ते काय म्हणतात बघ. आण्णांचा काहीच प्रश्न नाही. त्यांना मी समजावतो.

आजीही काही नाही म्हणणार नाही. खूप बदललाय त्यांचा स्वभाव.”

मग इतर बऱ्याच गोष्टी बोलले दोघे. मशीन, ते कुठे बसवायचं वगैरे. अरमानची भेट हा एक निराळाच योगायोग असं अनंता म्हणाला. या सर्व वर्षात फार मित्रत्वाचं नातं निर्माण झालं होतं दोघात. नाजूक वयातल्या आनंदाला तितक्याच हळूवारपणे समजून घेतलं होतं अनंताने, मित्रासारखं! हे आताचं बापलेकातलं अहंताविरहित नातं हे त्याचंच फळ होतं. जो अनंता एक निष्क्रिय, अपयशी मुलगा म्हणून हिणवला गेला होता तोच आज एक

यशस्वी बाप बनला होता. पण याचं श्रेय मनातल्या मनात तो अनुराधेला देई. तिने आत्मविश्वास जागवला आपल्यात. बोलणं संपवून तो परतला.

मग आनंदाने आजोबांना फोन लावला. किती तरी दिवसांनी, नव्हे, महिन्यांनी प्रत्यक्ष बोलत होता तो आजोबांशी. त्रोटक पत्रं नियमित पाठवायचा. पण फोन क्वचितच.

“आनंदा!” आजोबांना झालेला आनंद आवाजातून झिरपला. वृद्धत्वाच्या खुणा आवाजातही जाणवत होत्या. आजोबांचा हात धरून तळ्यावर गेल्याचं, तिथे आजोबांनी डोळे मिटायला सांगून चित्रकलेचं साहित्य समोर ठेवल्याचं, त्यांनी चित्र काढ असं सांगितल्यावर झालेला अतोनात आनंद, आनंदाला स्पष्ट आठवला. एक सरसरती शिरशिरी अंगभर फुलली त्या आनंदी आठवणीने!

‘तेव्हा आजोबा घेऊन गेले नसते तर? फार वेगळे घडलो असतो आपण!’

जर आणि तर!

‘आजीबरोबर देशमुखांकडे तो प्रसंग घडला नसता तर! आपण आततायीपणाने घर सोडलं नसतं तर! शंकर रखमा भेटले नसते तर!’

“आनंदा!” परत तोच, किंचित थरथरणारा, प्रेमळ, वृद्ध आवाज ऐकला आणि आनंदा भानावर आला.

“आजोबा! कसे आहात? आजी कशीय? मी येतोय परवा तुम्हाला न्यायला.” एका दमात तो बोलला.

“अरे वा! तू येतो आहेस का? बरं झालं.”

“आजोबा, माझ्याबरोबर माझे एक मित्र येत आहेत.”

“हो का? अरे वा.”

“पण आजोबा!,.”

“पण काय बाळा?”

“आजोबा, ते मुस्लीम आहेत.”

“बरं मग?”

“आजीला चालेल?”

“हं! शंका रास्त आहे तुझी. पण आजी खूप बदलली आहे बरं तुझी. प्रामुख्याने तुला डोंबाऱी कुटुंबाने आधार दिला, त्यांच्यामुळे तुझा जीव वाचला हे कळल्यापासून तिची विचारसरणी बदलली.”

आनंदा गप्प झाला. ‘ही माणसं आयुष्यभर माझं निघून जाणं विसरू शकणार नाहीत. जिव्हारी लागलंय त्या दोघांच्या! हे बदलायलाच हवं!’

आनंदाला प्रकर्षाने जाणवलं हे.

---

‘अब्बू, मैं आ रहा हू! बस कुछ और दिन!’ अरमान मनोमन म्हणाला.

अम्मीचा अनेकदा फोन येऊन गेला होता. त्याने घेतलाच नव्हता. परत वाजला. त्याने तसाच वाजू दिला. शमाचाही फोन येऊन गेला होता. टॉप फायनान्शीयल कन्सल्टंटस् मधे गणली जाणारी शमा आणि चित्रकार अरमान यांची घनीष्ट मैत्री सर्वांनाच बुचकळ्यात पाडणारी होती. ऑपॉझीट्स ॲट्रॅक्ट हा नियम तंतोतंत लागू पडत होता त्यांच्या नात्याला.

पण कित्येक वर्ष ही मैत्री टिकून होती. तिथल्या लोकल मिडीयामधे अधून मधून हे दोघे आणि यांचे नाते चर्चेत येई. कधी शमा कोणाबरोबर पार्टीत दिसली, कधी अरमान कोणत्या बोटीवर कोणाबरोबर पार्टी करत होता, वगैरे चर्चांना उत येई. पण या दोघांचं नातंच इतकं पारदर्शक होतं की या चर्चांचा परिणाम कधीच झाला नाही.

अब्बूंविषयी कळल्यापासून मात्र अरमान इतका सैरभैर झाला होता की शमाशीही तो नीट बोलत नव्हता. तिला समजत होतं बिनसलंय काहीतरी. पण काय ते कळत नव्हतं. अरमानचे कार्यक्रम नेहमीच व्यवस्थीत आखलेले असत. तीन महिने आधीपासूनच सगळं ठरायचं. पण यावेळेस भारतातून परत यायच्या काही दिवस आधी त्याने पुढचे बरेच कार्यक्रम रद्द केले. काहींना कार्यक्रम रद्द केल्याने नुकसानभरपाईही द्यावी लागली. पण अरमानने तिला मी नंतर सविस्तर सांगेन एवढाच मेसेज पाठवला होता. तिने भारतातले आपले कॉन्टॅक्टस चाचपून पाहिले तेव्हा अरमान हॉटेल बारमधे मध्यरात्र उलटून जाईपर्यंत दारू पीत होता, अधून मधून तो एका उपनगरातील बंगल्यात जातो, एक्झिबिशनच्या ठिकाणी बऱ्याचदा तो उपस्थित नसतो,

अशी माहिती तिला मिळाली, तेव्हा ती ही काळजीत पडली. तिने एवढ्या वर्षात कधीही मर्यादा ओलांडताना अरमानला पाहिले नव्हते. किंबहुना एक अत्यंत शिस्तबद्ध कलाकार असाच त्याचा लौकिक होता. तिने पुढील आठवड्यातील आपले सर्व कार्यक्रम रद्द करून मुंबईचे तिकिट काढले.

२. १३

अरमान पहाटेच उठला. रात्रभर त्याला झोप अशी आलीच नाही. कधी एकदा रामनगरीला जाऊन पोहोचतो असे त्याला झाले. उजाडताच तो आनंदाला घेऊन पुढे निघाला. अरमान गुणगुणत मस्त मजेत गाडी चालवत होता. आजचा त्याचा नूर काही निराळाच होता. आनंदा अरमानला पहिल्यांदाच इतक्या आनंदात पाहत होता.

“मला रामनगरीला पोहोचल्यावर लगेच अब्बूंच्या कबरीजवळ नेशील?” आनंदाने होकारार्थी मान हलवली.

“सुस्थितीत आहे ना? की?”

“बाबा अगरबत्तीफुलाचे पैसे देतात एकाला. तो करतो सगळं. मी गेलो की जाऊन येतोच.” अरमानने वळून आनंदाकडे पाहिले. त्याच्या नजरेत कृतज्ञता होती.

“मला ते राहत असत ती जागाही पाहायचीय., दाखवशील ना?” आनंदाने मान हलवली.

“मला पहिल्यापासून नीट सांग, तू कसा भेटलास अब्बूना? ते काय काय बोलायचे तुझ्याशी? चित्रकलेचे कोणकोणते धडे शिकलास तू त्यांच्याकडून?”

आनंदा पहिला दिवस आठवू लागला. पीरबाबाने त्याला घाबरवून पिटाळून लावले होते. धोंडा उचलला होता मारायला. ‘इतकं समाजाने गांजलं होतं का त्यांना? काय सांगायचं या त्यांच्या मुलाला?’

“मला समज थोडी जरी जास्त असती तरी मी त्यांचं व्यसन सोडवण्याचा प्रयत्न केला असता. तसं झालं असतं तर आज तुमचे अब्बू तुम्हाला जीवंत भेटले असते. पण मी खूप लहान होतो. समाजाकडून, घराकडून योग्य अयोग्य रित्या कोसला गेलो होतो. माझी रंगांची, चित्राची, आस कोरडीच राहत होती. पीरबाबा भेटले आणि तहानलेल्याला जसा सदावाही निर्झर मिळाला. आम्ही सोबत असताना रंगांत रंगून जायचो. आमच्यात सर्व स्तरांवर भेद होता. धार्मिक, सामाजिक, वयातील फरक. पण आम्हाला तो कधीच जाणवला नाही. चित्रकलेच्या वेळी ते गुरू असत. पण इतर वेळी ते लहान आणि मी मोठा असे. आम्ही आमच्या भुमिका सहज बदलायचो, आमच्याही नकळत. ते मुके होते. म्हणजे नंतर झाले असावेत. का? कसे? हे मात्र कधीच कळलं नाही. किंबहुना मी विचारलंही नाही. आमच्यातला संवाद मूकच होता कायम. आम्हाला बोलायची गरजच पडली नाही कधी. त्यांच्या गरजा मला माहित होत्या आणि त्या फार किमान होत्या. माझी एकच गरज होती, चित्रकला,रंग! आंधळा मागतो एक डोळा आणि,.. अशीच माझी अवस्था होती. मचाणावर पोहोचलो की मी जीवंत होत असे. बाकी आयुष्य फक्त आजमधून उद्यामधे बदलत होतं.”

आनंदा, प्रथमच इतकं त्या दिवसांमधलं, कोणाशी तरी बोलत होता. पाहता पाहता तो त्या भावनेत विरघळत गेला. त्याच्या आवाजातून ती भावनाच झिरपत चालली. ऐकता ऐकता अरमानने गाडी थांबवली. तो त्या भावनाविवश मुलाकडे पाहू लागला. त्याला त्या तरूण मुलात लहान अरमान दिसू लागला. अब्बूं आपला हात हातात घेऊन चित्र रंगवत असल्याची भावना दोघांनाही आठवली. या एकाच भावनिक पातळीवर ही अत्यंत वेगळ्या स्तरांवरची माणसं हात हातात धरून किती तरी वेळ बसून राहिली. दोघंही आपल्या गुरूला आठवत राहिले. बऱ्याच वेळानंतर दोघे भानावर आले. “चलो आनंद, अब निकलना चाहिये. आपके नानाजी राह देख रहे होंगे!”

---

“आण्णा, आई बाबा येणार म्हणून पलिकडची खोली साफ करून ठेवलीय. तुम्ही मनापासून त्यांना इथे यायला होकार दिला आहात ना?”

“अनुराधे, अगं, असं का विचारतेस? तुझी घालमेल का मला दिसत नाही? आणि यातही स्वार्थच बरं माझा. उद्या काही जास्तच त्यांच्या तब्येतीला बरं वाटेना झालं, आणि तुला जावं लागलं तिकडे, तर मला कोण पाहील पोरी? वासंतीचा स्वभाव माहितीच आहे तुला, आणि मोठ्या भाऊची पत्नी गुडघ्यांनी हैराण!”

“आण्णा, अजून एक बोलायचं होतं. रागवायचं नाही पण तुम्ही.”

“बरं बाई, नाही रागवत. सांग काय ते.”

“आनंदाचा एक मित्र येतोय त्याच्या सोबत मुंबईहून.”

“बरं! येऊ दे की मग!”

“मुस्लीम धर्माचा आहे म्हणे.”

“__________”

“आण्णा, आनंदा म्हणालाय तो बाहेर हॉटेलमधे सोय करेल त्याची. पण आई बाबांना त्याच्याच गाडीतून आणतोय, तर आल्यावर पहिल्यांदा घरी तरी आणेलच!”

“__________”

अनुराधा बराच वेळ वाट पाहत थांबली.

“नको म्हणून सांगते मग त्याला.”

“थांब अनुराधे, या तुझ्या पोराने आयुष्यात अनेकदा माझे ठाम समज चुकीचे ठरवले. धर्मांविषयीच्या माझ्या कल्पनाही बदलतील कदाचित. जो माणूस आपली गाडी तुझ्या आईवडिलांना देतो, त्याला घरीही न बोलावणे माणुसकीला सोडून व कृतघ्नतेचे ठरेल. येऊ देत त्याला.”

अनुराधेने सुटकेचा निश्वास टाकत मान हलवली.

“काकू कधी यायचाय आंद्या?”

“परवा निघतील म्हणाला तिथून.”

चंदू शेताकडूनच येत होता. “बाबांनी हुरडा, बोरं, आवळे, उस पाठवलाय. आई येईन म्हणालीय रात्री पुष्पीबरोबर. बाबा येतील परवा आंद्या आल्यावर.” घरदार आनंदाची वाट पाहत होतं.

“वसंतकाका, काकू, आंद्या आल्यावर त्याला पाठव म्हणाले गं,” चंदू पुढे म्हणाला. “वरूण मात्र येईल. आईनं सांगितलय तू तोंडीलावणी करून ठेव, ती बसून गरम भाकऱ्या करेल. आंद्याला आवडते म्हणाली माझ्या हातची!”

“होहो, वहिनी आल्या की त्यांना आनंदासाठी काय करू नि काय नको होईल.”

“काका कुठंय आणि?”

“सकाळीच गेलेत बघ बाहेर. येतील आता. बस, खायला करते तुला. १५ दिवसात फिरकलाच नाहीस.”

“होय गं, खतं आणायला शहरात गेलो ना? मग इकडची कामं.”

“पुष्पाला बघून गेले त्यांचा काही निरोप?”

“होकार आलाय, पण या बाईसाहेबच हो नाही करताहेत.”

“अगोबाई! का म्हणे?”

“विचार तिलाच आली की.”

जसजसं गाव जवळ येत चाललं, आनंदा गप्पं होत गेला. अरमानच्या ते लक्षात आलं.पण तो शांत राहिला. मग प्रवासभर ते चार महिने, आजोबांमुळे होत गेलेले व टिकून राहिलेले सकारात्मक बदल, त्या चार महिन्यात घडलेल्या चित्रविचित्र घटना, त्यांचे दुरोगामी परिणाम, बारीक सारीक संदर्भांसह आनंदाच्या मनात आठवणींचं वारूळ फुटलं.

जे कधी अनंताबरोबरही बोलला नव्हता, रखमा शंकऱ्याबरोबर घालवलेल्या दिवसांबाबत, त्यावेळी नकळत बदलत गेलेल्या मानसिकतेबाबत, ठाम होत गेलेल्या मतांबाबत, नकळत होत गेलेला अबोल स्वभाव, अचानक आलेलं मोठेपण, काहीशी रुक्षता, तटस्थता, सगळं सगळं भरून आलेल्या ढगांसारखं दाटून आलं. आनंद जणू त्या कोवळ्या वयातल्या बदलत्या आनंदला, स्वत:च नव्याने पाहून आला. अचानक तो म्हणाला अरमानजी, “जरा थांबवता गाडी?” अरमानने गाडी बाजूला घेतली.

‘हीच असावी ती जागा, जिथे आपण ती काळरात्र घालवली. ज्या रात्रीने आपण जगात किती एकटे होऊ शकतो, आणि तरीही जगू शकतो हे शिकवलं. प्रचंड धास्ती, पूर्णपणे हादरवून टाकणाऱ्या धास्तीचा अनुभव कसा असतो, हे सांगणारी रात्र. इथेच शंकर रखमाला आपण सापडलो असू.’ त्याला आठवत होतं ते टेंम्पोच्या मागच्या बाजूला बसून केलेला खडबडीत रस्त्यावरून केलेला प्रवास. ते तुटक्या छपराचं घर, ती चित्र रंगवलेली भींत, पाट्या, सलूनचं दार. राम, चंदी, आणि माकडं.

'कुठे असेल ते गांव? दहा बारा वर्षांपूर्वीचा काळ. तिथे राहत असतील आता ही माणसं?' रखमा.. तिचा आपण पोलीस व्हॅनमधे जाऊन बसण्यापूर्वीचा चेहरा आठवायचा त्याला. कितीतरी वेळ तो जागा न्याहाळत उभा होता. अरमान उतरून जवळ येऊन उभा राहिला तरी त्याला भान नव्हते. मग अरमानने पाठीवर हात ठेवला आणि "निघायचं?"असं विचारलं तेव्हा मात्र तो भानावर आला.

"लगता है यांदोंका मौसम आया है मनमें, आनंद!"

आनंदा नुसताच हसला. निघाले मग दोघे. घरी पोहोचेपर्यंत सायंकाळ झाली असती.

---

आजोबांच्या येरझाऱ्या सुरू होत्या सतत.

"अहो, किती फेऱ्या माराल? फोन तरी बघा करून."

"प्रवासात असतील. उगाच आपण फोन करून घाई करू नये."

"मग बसा तरी एका जागी! मला बघूनच घेरी यायला लागली."

"अरे, माझे पाय, मी मारीन हव्या तेवढ्या फेऱ्या, तुला काय त्रास?" कधी नव्हे ते आजोबा करवादले.

आजी हसली. "कळतंय हो, लाडका नातू यायचा म्हणून उताविळ झालाय तुम्ही. दुसरं काय."

"हो, तू नाही का झालीस? मागचा आठवडा झोपून होतीस. तो यायचाय कळल्यावर आजार पळाला तुझा. आनंदाला हे आवडतं, ते आवडतं करत काय काय करत बसलीस." आजीही हसली मग.

---

गाडी मुख्य हमरस्त्यावरून गावाकडे वळली तेव्हा परत आनंदाची नजर ओळखीच्या खूणा शोधू लागली. बरंच बदललं होतं गांव. काही कॉंक्रीटच्या बिल्डींग्जही उठल्या होत्या.

पाहता पाहता घर आलं. आनंदा पट्कन उतरला. आजी आजोबा कट्ट्यावरच वाट पाहत बसलेले पाहून भरूनच आले डोळे, स्वत:ला सावरत पुढे झाला तो. वाकून दोघांनाही नमस्कार केला. आजोबांनी थरथरत्या हाताने डोक्यावर हात ठेवला. आजीने मायेने चेहऱ्यावरून हात फिरवला. भेट होऊनही चार पाच वर्ष उलटली होती.

मग अरमान आठवला. आनंदाने परत जाऊन हाताला धरून त्याला आत आणले. दोघांनीही त्याचे हसून स्वागत केले.

"आनंदा हात दे रे जरा, चहा करते." आजी म्हणाली.

"मी करेन आजी, तू नको."

"अरे, बाकीचं हळूहळू ठेवलंय मी करून. फक्त चहाच करायचाय. करेन मी. तुम्ही हातपाय धुऊन या. दमला असाल प्रवासाने."

“तू यायचा आहेस म्हटल्यावर आजीला हत्तीचं बळ मिळालंय तुझ्या.”

“तुमचं आपलं काहीतरीच.”

आपण ही प्रेमळ नोकझोक फार मिस केली हे आनंदाला जाणवलंच एकदम. तो ही हसला मग.

२. १४

चला या आत. आजी म्हणाली. त्याने आजोबांकडे पाहिले. त्यांनी आश्वासक हात केला. त्याने मग अरमानला खोलीत नेले. बाथरूम दाखवली. “घर जूनं आहे. गावात हॉटेलपण नाही. जरा गैरसोय होईल तुमची.” तो म्हणाला.

“आनंद, मी ही अशाच घरात वाढलोय. आता परदेशात गेल्यावर हॉटेल्स वगैरे सुरू झालं. माझी काही काळजी करू नको.”

मग आनंदा सरळ विहीरीवर गेला. पाणी भरपूर होतं विहिरीला. त्याने रहाट सोडला आत आणि दोरी हलवून पाणी स्वच्छ करून मग कळशी भरून रहाट ओढला. भराभर कळशा डोक्यावर ओतून घेतल्यावर ताजंतवानं वाटलं त्याला.

छान शीळ घालत तो घरात शिरला. आजीने ताटल्या चमचे, चहासाठी कप सगळी तयारी करून ठेवली होती. तो लहानपणीसारखा स्वैपाकघरात शिरला. “मस्त वास येतोय गं आजी. काय केलंयस खायला?”

“पोहे केलेत. तुला आवडतात ना भरपूर खोबरंवाले, तेच. आणि साटोऱ्या. ये बस. मित्र कुठाय तुझा?”

“वर आहे. त्याला बाहेरच्या टेबलवर देतो. खाली बसून खायची सवय नसेल त्याला. मग येतो तुझ्याजवळ बसायला.”

“बरं बरं, त्याला सोबत कर रे. नवा आहे इथे.”

“आलोच. का तू ही येतेस बाहेर?”

“नको रे, मी जरा रात्रीच्या स्वैपाकाचं पाहते.”

“छे छे, आज आपण दोघांनी मिळून करूया गं स्वैपाक.”

“चल वेड्या, अरे, दमला नाहीस का?”

“छे, दमतोय कशाला? चांगला चार चाकीत बसून आलोय म्हटलं. चल बाहेर.”

मग खाण्यापिण्याचे सगळे सामान घेऊन आनंद बाहेर गेला. आजीही मागून आली हळूहळू. अरमानने अगदी चवीने खाल्ले सगळे पदार्थ, ते पाहून आजीला समाधान वाटले. आनंदाही मन लावून खातोय हे पाहून खूप बरं वाटलं तिला.

“वाह! बहुत अच्छे!”

आनंद अरमानकडे पाहत होता आणि अचानक त्याला पीरबाबा आठवले. असंच चवीने खायचे. किती साम्य आहे या बापलेकांत.

“उद्या तुम्हाला इथलं तळं दाखवतो. सकाळी पॅकिंग उरकतो. मग दुपारी जाऊ. फार रमणीय जागा आहे. परवा सकाळी रामनगरास जाऊ.”

रामनगराचे नाव ऐकताच एक ठोका चुकलाच अरमानचा. बस उद्याचा एक दिवस. मग अब्बूंची एका तऱ्हेने भेटच होणार होती.

“आजोबा आजी तुम्हीही चला तळ्यावर”

“नको रे बाबा. जरा धड हातपायी जाते लेकीकडे. परवाचा प्रवास आहे लांबचा. यांना जा घेऊन. माझ्यामुळे अडकून पडतात हे. तुम्ही जा, मी आपला खाऊ देईन.”आनंद आणि आजोबां एकदमच हसू लागले. आनंदला सगळं ते जूनं आठवलं.

आजोबांबरोबर तळ्यावर जाणं, तिथे रंगवलेली चित्र, तिथली ती झाडं. घरटी, त्यातली ती पक्षांची पिल्लं, आजोबांनी निसर्गाच्या माध्यमातून शिकवलेले आयुष्याचे धडे!

त्याचे डोळे चमकले. तो पटकन उठला आणि आलोच म्हणत बाहेर गेला.

“अरे कुठे निघालास तिन्हीसांजेला?”आजीने विचारलं. पण उत्तर द्यायच्या आधीच आनंद बाहेर पडला होता.बऱ्याच वेळाने तो परत आला.

“अरे कुठे गेला होतास?”

“अगं जरा चक्कर टाकून आलो. फारसा बदल नाही गावात. काही कॉंक्रीटच्या बिल्डींग्ज झाल्यात तेवढ्याच. आजोबा दिवाणांच्या घराला कुलूप होतं. बाहेर गवतही वाढलंय गुडघाभर. आता राहत नाहीत का ते इथे?”

“अरे बदली झाली त्यांची. सध्या पुण्यामुंबईकडे असतात असं कळलं. फार सज्जन जोडपं ते. प्रदीप इंजिनीयर होऊन अमेरिकेला गेला पुढील शिक्षणासाठी असं ऐकलं.”

“ओह! ग्रेट! आणि प्रज्ञा?”

“ती शिकत होती काहीतरी. काय बरं? विसरलो बघ! आपल्या बालमित्रमैत्रीणीला भेटायला आवडलं असतं आनंदला.

त्याने आजीला समोर बसवून फक्कडशी खिचडी कढी केली. पापड मिरची तळली. कोशिंबीर केली. सगळे जेवायला बसले. जेवणं झाल्यावर, अरमान त्याचे फोनकॉल्स करायला गेला. आनंदा, आजी, आजोबा, तिघेच उरले. “आनंदा, पोरा मोठा झालास रे. शहाणा झालास.!” आजी म्हणाली. “माझ्यामुळे तुला कायमचे गमावतो अशी भीती वाटत होती. नंतर तू सापडलास, पण तू वायाच गेला आहेस असं वासंती काकू वगैरे मंडळी बोलत तेव्हा धास्तावलो आम्ही. ही मधली वर्षं अपराधीपण सतत खात राहिलं. मला शक्य असेल तर माफ कर बेटा. त्यानंतर ज्या भेटी झाल्या तेव्हा तू ही बोलण्याच्या मन:स्थितीत नव्हतास आणि मी ही बोलण्याची हिम्मत करू शकले नाही.”

आनंदा उठून आजीकडे आला. त्याने तिचा हात हातात घेतला. तिच्या व आजोबांच्या पायाशी बसला. “आजी, बरं वाईट जे काही घडत गेलं त्यात तुझी चूक नव्हती. घटना घडत गेल्या. मी तेव्हा लहान होतो, तुझ्यावर प्रचंड रागावलो होतो. संतापलो होतो. देशमुखांनी माझ्यावर चोरीचा आळ घेतला त्याचं मला काही वाटलं नाही. पण तूच त्यांना हे सांगितलंस हे कळल्यावर मी पिसाटलो गं. डोक्यात आगीचा डोंब उसळला. काय करतोय, बरोबर, चूक, काहीही कळण्याचं वयही नव्हतं. तुम्हा सर्वांचे

आशीर्वाद पाठीशी होते त्यामुळे गरीब पण माणूसकी न विसरलेलं एक कुटुंब मिळालं. पोटातली आग काय असते, फुकट या दुनियेत काहीच मिळत नाही, आपण एकटेही जगू शकतो, भावना कुचकामी असतात, पैशाइतकी ताकद कशातच नसते, असे अनेक योग्य अयोग्य धडे त्या काही दिवसांनी मला शिकवले. मुख्य म्हणजे संपूर्ण स्वावलंबी बनलो. पोलीस शोधत आले तेव्हा परत पळून निघालो होतो. मग रखमाई, माझी त्या काळातली आई, तिचा आक्रोश ऐकला आणि परत वळलो. परत माणसात येण्याच्या रस्त्यावर तिच्या त्या आर्त स्वराने आणून सोडले. तेव्हा परतलो नसतो तर काय,कसा,घडलो असतो हे सांगणं कठीण आहे. जसजसा मोठा होत गेलो, परिस्थिती कशी रंग बदलते, आणि माणसांना आपल्या बोटांवर कशी नाचवते याचे अनेक अनुभव घेतले. आपलेच अनेक ठाम समज गैरसमज होते याची जाणीव होत गेली. त्या तीन चार महिन्यात आजोबांनी जे जे शिकवलं ते मात्र अंतर्मनाने असं काही आत्मसात केलं की पावलोपावली ती शिकवण, मार्ग दाखवत राहिली. नकळत योग्य अयोग्यचा निर्णय करत राहिली. अजूनही ती शिदोरी आहेच माझ्याबरोबर सतत.” आजीने डोळ्याला पदर लावला. आजोबांचे डोळेही पाणावले. नकळत त्यांचा हात त्याच्या डोक्यावर विसावला. कित्येक वर्षात वाटलं नव्हतं तेवढं शांत वाटलं आनंदाला त्या आश्वासक हाताच्या स्पर्शाने. कुठेतरी, परत लहानपण हळूच स्पर्शून गेलं त्याला.

दुसरे दिवशी आनंदाने, आजी आजोबांनी बरोबर घ्यायच्या ठरवलेल्या वस्तू, कपडे, औषधे, काही पोथ्या, सगळं नीट पॅक केलं.

“आजोबा, उद्या पहाटे उठून साग्रसंगीत पूजा करून, मग अक्षता टाकून देव हलवू.”

“हं!”

“आजोबा, तुम्ही मनापासून हो म्हणाला आहात ना रामनगरला यायला?”

“आनंदा, माझ्या वयात निर्णय सरळ मनाजोगा, किंवा मनाविरूद्ध नसतो बरं बाळा. प्रत्येक निर्णयात एक मनाविरूद्ध बाजू असतेच.”

“म्हणजे?”

“आता असं पाहा, मी जन्मभर या गावात राहिलो. वाढलो, मोठा होऊन मास्तर म्हणून नाव कमावलं. आता ऐन मावळतीला, नव्या गावात, नव्या जागेत, नव्या माणसांबरोबर, नव्याने रुजणे जमेल का? ही शंका एकीकडे सतावते, तर दुसरीकडे, या वयात कोणीतरी जबाबदारीने सांभाळणारं आहे, आपुलकीने या म्हणतंय याचा आनंदही वाटतोय. आता अशी वेळ येऊ घातलीच आहे की आमचे आम्ही दोघे नाही राहू शकणार. काही दिवस हा मनाचा तळ्यात मळ्यात खेळ चालेल. मग काळ समजावेल. तिथे बस्तान बसलं नीट तर निर्णय बरोबरच होता हा आनंद वाटेल. पण तोवर मन रुसणे फुगणे सुरूच ठेवेल. काय?”

आनंदा ऐकत होता. आजोबांचं म्हातारं होणं आज अचानक असं समोर आलं.

“आजोबा, तुम्ही काही काळजी करू नका. माझ्या शिक्षणाचं हे शेवटचं वर्ष, मग मी ही असेन तिथे.” तेवढ्यात अरमान आला. त्याने ते वाक्य ऐकलं.

“अरे, तुझी जागा परदेशी आहे आनंदा! डोक्यावर घेऊन नाचतील बघ.”

वातावरणातला हळवेपणा अरमानला समजला नव्हता.आनंदाने चमकून आजोबांकडे पाहिले. “मग विषय न वाढवता तो म्हणाला, आजोबा, झोपूया आता. उद्या कामं बरीच आहेत.”

२. १५

“आज चालत जाऊ. आमचं गाव दाखवतो फिरून तुम्हाला.”

“अगर सब पॅकिंग हुआ हो तो निकलते है ना, रामनगरके लिये?”

“आपको कुछ खास दिखाना है!”

“ओह! ठीक है! चल मग पटकन बघून येऊ.” अधिकच उतावळा होत अरमान म्हणाला. आनंद गालातल्या गालात हसला. मग निघाले दोघे. गावातून चालतचालत तो अरमानला तळ्याकाठी घेऊन आला. मग म्हणाला “तुम्ही जरा पाण्याशी गप्पा मारा, मी आलोच.”

“अरे कुठे निघालास आता? पण आनंदा रानात नाहीसाच झाला.”

अरमान आसमंत निरखू लागला. सुरवातीला त्या निरव शांततेने तो दचकलाच काहीसा. परदेशांतील वास्तव्यात त्याने शांत निसर्गरम्य जागा कित्येक पाहिल्या होत्या. पण इथल्या शांततेची काही निराळीच बात होती! हळू हळू ती शांतता त्याच्या पेशींमधून झिरपू लागली. एक निराळीच आनंद स्थिती, ज्यात आनंदाचं काही खास कारण नव्हतं. बस त्याचं फक्त अस्तित्व होतं. पहिल्यांदाच बऱ्याच दिवसांनी, तिथे पूर्ण एकटा असूनही इतके दिवस जाणवणारं ते एकटेपण बोचेना त्याला. निसर्ग मूक साथ देता झाला. ते नितळ पाणी, ते धीरगंभीर वृक्ष, त्या रानवेली, लांबून येणारा पक्षांचा क्वचित आवाज, एखादा शांत निर्भय सरडाही, सगळे कसे एकमेकांचं अस्तीत्व मान्य करून आपापल्या अंतरी शांत होते. शांतता अलगद उतरली अंतरात.

नकळत स्थीर झाला तो. ना शारिरीक हालचाल ना मनाचं धावणं! रामनगरचाही विसर पडला काही क्षण. तो ही जणू त्या स्थीरनिसर्गचित्राचा एक अविभाज्य भाग बनून राहिला.

आणि मग त्याला आनंदा दिसला. हातात कॅनव्हास, इझल, रंग, ब्रश असं बरंच काही घेऊन येताना. बरचसं सामान अरमानचंच होतं, त्याने डिकीत भरून आणलेलं.

काही न बोलता त्याने सगळं नीट रचलं, आणि अरमानला खूण केली.

संमोहित झाल्यासारखा अरमानही उठून आला आणि त्याने रंग मिसळायला सुरवात केली. दुसरीकडे आनंद कागद व कोळसा घेऊन बसला. किती तरी तास दोघांची समाधी लागली. रंग जणू थेट संवाद साधू लागले. एकीकडे सप्तरंग, एकीकडे फक्त काळा पांढरा करडा.नकळत दोघेही न ठरवता अब्बू व पीरबाबाला स्मरू लागले. त्यांचा हात आपल्या रंगवणाऱ्या हातावर आहे हा आभास सतत राहिला. मधेच दोघे थांबले, अरमानने खूण केली, दोघांनी जागा बदलल्या. किती वेळ दोघे एकमेकांच्या चित्रांसमोर मंत्रमुग्ध होऊन उभे राहिले. आणि पाहता पाहता दोघांनी ती अर्धी चित्रे आपापल्या रंगांनी रंगवायला सुरवात केली. सप्तरंगात काळे पांढरे करडे स्ट्रोक्स त्या अमूर्त स्वप्नाला वास्तव बनवू लागले तर काळया पांढऱ्या करड्या मूर्त आकृतीबंधातून शिताफीने सप्तरंग बेमालूमपणे मिसळत त्या वास्तवाला स्वप्नवत बनवून गेले.

चित्र पूर्ण झाली तरी चित्रकार त्यातून बाहेर पडेनात. निसर्गही इतका वेळ स्तब्ध राहून हा रंगोत्सव पाहत होता,तो आधी भानावर आला. त्याने पक्षांच्या रुपात दूत पाठवले. आसमंत कूजनाने जागा झाला तसेच हे दोघेही. मग डोळेभरून दोघांनी दोन्ही कलाकृती निरखल्या. मूर्त अमूर्त, स्वप्नवास्तव यांची अशी सांगड! अद्भूत होतं हे सगळंच! नकळत दोघांनीही एकमेकांना आलींगन दिले. अब्बू व पीरबाबांची उपस्थिती आहे आत्ता इथे, व ते खुश आहेत असा भाव दोघांच्याही मनी जागला.

———————

शमा एअरपोर्टवर पोहोचली तरी कामं तिची पाठ सोडत नव्हती. बॅगेज काऊंटरवरही तिचा फोनकॉल सुरूच होता. आपल्या सेक्रेटरीला ती शेवटच्या काही सूचना देत होती. तो ही भराभर चक्कं एकीकडे त्या लिहून घेत होता. मॅडमनी सांगितलेल्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टीला किती महत्व असतं, आणि तसं घडलं नाही तर किती नुकसान होतं हे तो अनुभवातून शिकला होता. नुकसान करूनही मॅडमनी त्याला अजून एक संधी दिली होती. त्याला ती गमवायची नव्हती. फोनकॉल संपवून ती बोर्डींगची वाट पाहत होती तेवढ्यात तिने तिच्या असिस्टंटसना पुढील आठवड्यातील प्लॅन्सचे मेल पाठवले.

नुकतेच तिने एका क्लायंटचे पैसे मिडीयम स्केल कंपनीत गुंतवले होते, तिची अटकळ बरोबर येती तर क्लायंट रातोरात करोडपती होणार होता. पण नसती बरोबर आली तर कायमचा क्लायंटही गेला असता, वर नाव खराब

झालं असतं. ‘नाव कमवायला अनेक वर्ष जातात, पण गमवायला एक मिनिट पुरतं, हे ती पुरतं जाणून होती,’आणि तरीही अशी वेलथॉट रिस्क तिला घ्यावीशी वाटायची कारण त्यात कोणत्याही मादकद्रव्यापेक्षाही जबरदस्त अशी किक असायची.

मिळमिळित आयुष्याचा अनुभव तिला पहिल्या लग्नात भरपूर मिळाला होता. सबकुछ नापतौलके, जपून जपून करण्यात तिच्या आधीच्या नवऱ्याला इतिकर्तव्यता वाटायची, आणि याचीच तिला शेवटी शिसारी आली. ती त्या लग्नातून बाहेर पडली. त्यानंतर नव्याने स्वत:ला आजमावत, शिकत, पडत, धडपडत ती या यशाच्या शिखरावर विराजमान झाली होती. पण तिथेच बसून राहण्याचा व तसे करण्यासाठी जपून जपून पावले टाकण्याचा तिचा स्वभावच नव्हता. ‘खेळ संपूर्ण समजून घ्यावा, पण खेळी डेरींगबाजच हवी’ असा तिचा हट्ट असे. आजही प्रवासात तिची रात्र त्या कंपनीच्या होऊ घातलेल्या डीलचे डिटेल्स तपासून पाहण्यात जाणार होती. कुठे काही सुटले तर नाही आपल्या नजरेतून याची तिला खातरजमा करून घ्यायची होती.

अरमान तीन दिवस हॉटेलवर आलेलाच नाही हे कळल्यापासून ती अस्वस्थ होती. शेवटचा प्रयत्न म्हणून तिने त्याचा नंबर फिरवला. एका रिंगमधेच त्याने उचलला.

“अरमान........ कहॉं हो यार? क्या कर रहे हो? सब खैरियत तो है? ना फोन उठाते हो, ना रिप्लाय करते हो? क्या हो क्या गया है तुम्हे?”विमानापेक्षाही सुपरफास्ट गतीने ती बोलू लागली.

अरमानला तिचा आवाज ऐकून एकाच वेळी आनंदही झाला आणि अपराधीपणाची भावनाही प्रबळ झाली.

“आय ॲम सो सो सॉरी डियर! अगं फार विमनस्कतेत गेले मागचे काही दिवस. लंबी कहानी है! मिलके बताऊंगा! पण आता मी एकदम ठीक आहे. मळभ हटलय सगळं. एक खास इन्सानसे मिलाना है तुम्हे. लवकर घेऊनच येईन त्याला. तिथल्या आर्टसर्कलमधे त्याला लॉंच करण्याची आणि त्याचे आर्थिक व्यवहार सांभाळण्याची संपूर्ण जबाबदारी तुझी. काही दिवसातच येईन मी. डोन्ट वरी. ओके?”

“ओके! “एवढं बोलूनच ती थांबली. आपण येत असल्याचं काही तिने सांगितलं नाही.”तुम हो कहॉं?”

“रामनगरला चाललोय.”

“ओह आय सी!”

शमा, विचारात पडली. तिने मॅपवर रामनगर शोधायला सुरवात केली.

उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र अनेक राज्यात अनेक रामनगर सापडली तिला.

ओह माय गॉड! हं! मजा येणार आता अरमान, तुला शोधताना! एक रिलॅक्स्ड हलकं स्मित तिच्या ओठांवर आलं.

---

“अहो, झाली ना हुरड्याची सगळी तयारी? किती वर्षांनी आनंदाला हुरडा खायला मिळेल.”

“हो गं बाई! सगळं तयार ठेवलंय. चंदूने शेतावरच्या दोघांना हुरडा भाजून द्यायलाही बोलावलय.”

“वहिनी येतील आज. त्यांचं गुडघ्याचं तेल आणून ठेवा. जरा मसाज देईन करून.”

“ठेवलंय!”

अनुराधा हसली मग.

“केव्हा गं यायचीत मंडळी?”

“येतील संध्याकाळपर्यंत.”

“बरं, छान. झाली ना सगळी तयारी?”

“हो आण्णा!”

---

“हं, राजकुमार येणार म्हणून राजवाडा सजला असेल!”

“काय हे वासंती? का आनंदावर एवढा राग? तरी बरं, गरजेला त्यालाच मागतेस पैसे. आणि तो ही देतो सढळ हाताने.”

“मग काय करू? तुम्ही रिटायर होऊन बसलात हातावर हात ठेऊन. आणि चिरंजीव, त्यांचं तर काही बूड स्थीर होतच नाही एका नोकरीत. आणि उपकार नाही करत देतो ते, पूर्वी आपण काय कमी खर्च केलेत त्यांचे?”

“अगं, पण मग राग राग का करतेस?”

“हं! जळफळाट होतो माझा नुसता. हे सर्वांनी ओवाळून टाकलेलं पोरगं, इतका पैसा मिळवतंय, आणि इतका हुशार वरूण, पण एक धड नोकरी मिळेना त्याला.”

“आई, तुझी ही वृत्तीच नडलीय बघ मला. कोणात धड मिसळू दिलं नाहीस. भावंडात नेहमी फूट पाडत आलीस. आता सगळे जेवढ्याला तेवढे वागतात माझ्याशी. चंदू, आंद्यात कसलं मस्त नातं आहे, आंद्या अबोल असला तरी मैत्री चांगली निभावतो.”

“हो का? मग सांग त्याला, दे बाबा एक चांगलीशी नोकरी मला. बघू काय उजेड पाडतो.”

“हो बोलणारच आहे त्याच्याशी. आणि तू नकोच येऊस. सगळं सुरळीत चाललेलं असताना मीठाचा खडा टाकतेस बरोबर.”

“जा जा, सगळे जा हो आरत्या ओवाळायला.”

वसंता आणि वरूण ने फक्त माना हलवल्या व गप्पं झाले.

---

२. १६

दुपार कलताकलता गाडी रामनगरात शिरली. आनंदाने नकळत आपल्या गावची हवा छातीभरून घेतली. ‘काय असतं असं खास त्या हवेत? पण जाणवतं दर वेळी काहीतरी एवढं खरं!’

अरमान त्या लहानशा गावाला निरखू लागला. इथेच, याच रस्त्यांवरून अब्बू फिरले असतील. एक वेगळीच लहर त्याच्या मनशरीरात फिरली. जणू सतर्क होऊन त्याची पेशी न् पेशी त्या गावची आबोहवा, जिच्यात एके काळच्या अब्बूंच्या अस्तीत्वाच्या खुणा होत्या, त्या शोधू लागली.

“उजवीकडे वळून सरळ गेलं की घरीच पोहोचू!”

गाडी घरासमोर आली तेव्हा सगळेच त्यांची वाट पाहत पडवीत जमले होते. चंदू, वरूण, सामान घ्यायला पुढे झाले. अनंताने आजोबांना आधार देऊन उतरवले तर आनंदाने आजीला.

अनंताने अरमानला आत बोलावले. आनंदाने आण्णा व बाकी सर्वांना नमस्कार केला. अनुराधेने चहा, गरम गरम भाजणीचे वडे खायला दिले. अरमानला हा पदार्थ फार आवडला. बाकी सगळयांनीही ताव मारला.

“आनंदा, मोठ्या काकूने खास केलेत हो तुला आवडतात म्हणून.”

“काकू आहे कुठे पण?”

“अरे गुडघे दुखतात ना, आतबाहेर करवत नाही सारखं वहिनींना.”

“काकू... “असं म्हणत आनंदा थेट आतच गेला. “काकू, नमस्कार करतो गं” म्हणत त्याने तिच्या पायांना हात लावून नमस्कार केला.

“आलास आनंदा? बरय ना पोर माझं?”

“कसा दिसतोय सांग!”

“दृष्ट काढते थांब. माझीच लागायची.” आनंदा जोरजोरात हसला मग.

संध्याकाळ होताहोता दारातच शेकोटी पेटवली शेतावरून आलेल्या माणसाने. मग गरम गरम हुरडा, भाजलेली वांगी, बटाटे, कांदे, सोबत चटण्या, गूळ, मस्त बेत जमला.आयुष्य मुंबई व परदेशात घालवलेल्या अरमानला ही तर पर्वणीच होती.

मग मात्र त्याने आनंदाला गाठले. “अब्बूचा ठिकाणा दाखव आत्ता चल” असं काकुळतीला येऊन म्हणाला.

---

शमा मुंबईला उतरली तेव्हा हजारो कडू,गोड, आठवणींना, पंख फुटले जणू. लग्न होऊन नवीनवेली दुल्हन मेंदीभरल्या हातांनी, इथूनच रवाना झाली होती शफिक कडे. पहिली दोन वर्ष भूर्रकन उडून गेली. मग सॅम उर्फ समशेर जन्मला. इथूनच हळूहळू दरी वाढत गेली. तिने मान झटकली. नको त्या आठवणी, नकोच होत्या. तिने अरमानच्या हॉटेलमधेच रूम बूक केली होती. हॉटेलची कार पिकअप ला आलेली होतीच. रुमवर जाऊन फ्रेश होऊन तिने भराभर फोन फिरवायला सुरवात केली.

---

आनंदा अरमानला घेऊन मंदिराच्या दिशेने निघाला. दोघंही एकदम गप्प होते. आपापल्या विचारांमधे, आठवणींमधे गर्क होते. मन उचंबळून येत होतं. टेकडीचा रस्ता सुरू झाला तसं अरमानच्या अंगावर रोमांच उभे राहिले. भराभर दोघे टेकडी चढून वर गेले. दाट रान समोर दिसू लागलं. आनंदाने दोन पडलेल्या मोठ्या काठ्या उचलल्या. एक अरमानच्या हातात दिली. जमिनीवर काठी आपटतच तो पुढे जाऊ लागला. मागोमाग अरमान.

सराईतपणे आनंदा जात होता. किती तरी वर्षे हा रोजचा पायाखालचा रस्ता होता त्याच्या. अरमान मात्र अचंबित होऊन कसाबसा त्याच्यामागून निघाला होता. ‘अब्बू अशा रानात राहत होते?’आनंदाने त्याला जेव्हा सांगितले होते अब्बूंबद्दल, तेव्हा तो कल्पनाच करू शकला नव्हता धड, असं लक्षात आलं त्याच्या.

आनंदा अचानक एका जागी थांबला. त्याने मान वर करून पाहिले. एक वेगळीच चमक त्याच्या डोळयात दिसली अरमानला. अरमानने वर पाहिले. झाडावर चक्क एक झोपडी होती. “हेच ते मचाण,”आनंदाने सांगितलेलं. आनंदाने शर्टच्या बाह्या दुमडल्या. तो जवळच्या झाडावर चढला सरसर. मग वर जाऊन त्याने पाहिलं, तिथे नवी दोरी होती बांधलेली. पीरबाबांच्या काही वस्तूही. हे नक्की बाबांचं काम. अरमानला पित्यास भेटल्याचा थोडातरी आनंद मिळावा ही इच्छा!

त्याला आपल्या बाबांच्या संवेदनशीलतेचं कौतुक वाटलं. मग भानावर येत त्याने दोरी खाली सोडली. दोरीला शिडी होती. आनंदा परत खाली आला. त्याने दोरीची शिडी धरली. मग अरमान वर चढला. पाठोपाठ आनंदाही वर आला. अरमान वाकून आत आला. आनंदाही.

'अब्बू! इथे, असे राहत होते? एका माणसाने दोन आयुष्य जगल्यासारखं होतं हे तर. संपूर्ण निराळी. जशी दोन निराळी माणसंच!'

'अब्बू! इस बच्चेमें आपने कभी मुझे देखा? मेरी याद आयी थी कभी आपको? मेरी याद थी आपके जहन में?'प्रश्न....प्रश्न नुसते प्रश्न!

'हे असं का झालं? कोणी बनवलं अब्बूंना चरसी? अम्मीने? की तिच्या रिश्तेदाराने? इथे कसे पोहोचले? मुके कसे झाले? कधीच नाही मिळणार का यांची उत्तरं?'

अरमान उभा होता तो मटकन गुडघ्यांवर बसला. लहान मुलासारखं रडू फुटलं त्याला. आनंदाला काय करावं सूचेना. तो फक्त जवळ बसून राहिला. अब्बू आणि अरमानच्या मधे जावं असं वाटेना त्याला. काही वेळाने अरमान काहीसा सावरला.

बसल्या बसल्या आनंदालाही पीरबाबा आठवत राहिले. पहिल्या दिवशी घाबरवून टाकणारे, दगड उगारणारे, डबा दिला नाही तेव्हा गरागरा फिरून आकांडतांडव करणारे, मग चिडून त्याला मचाणावर येऊ देणारे, डबा खाऊन तसेच बसल्या जागी लहान मुलासारखे झोपी जाणारे, हात धरून

चित्र काढायला शिकवणारे, दहावीत नुसता डबा देऊन निघाल्यावर लहान तोंड करणारे, शेवटच्च्या घडीला चेहऱ्यावरून हात फिरवणारे..... किती निरनिराळी रुपं! 'पहिल्यांदा त्यांना हवं तसं चित्र काढल्यावर ओळख दिसली त्यांच्या डोळ्यात, हसूही! आमचं दोघांचं एक निराळंच जग होतं. नि:शब्द जग! रंगांचं जग! नजरेची भाषा!

ते गेले तेव्हा बाबांनी सावरलं. तसंच नि:शब्द! समजून घेतलं!'

'आज अरमानलाही तीच गरज आहे, समजून घेण्याची. त्याचे अब्बू गेले तेव्हा नव्हतं कोणीच, त्याला समजून घ्यायला. आणि मग हे कटू सत्य! अब्बू जिंदा असून मारलं त्यांना अम्मीने, न्याय मागणार तरी कोणाला?'आनंदा बसून राहिला जवळ. पाठीवर हाताचा स्पर्शही कदाचित नकोसा झाला असता. म्हणून नुसता बसून राहिला जवळ. नि:शब्द!

---

त्यामानाने कबरीवर माथा टेकताना शांत होता अरमान. अब्बू आता खऱ्या अर्थाने गेले होते. त्याच्या मनाने ते स्वीकारले होते.

---

"ये तो फिल्मोंसेभी हैरतअंगेज कहानी है अरमान. तुला खात्री आहे, हा मुलगा ज्या व्यक्तीबद्दल बोलतोय, ते तुझे अब्बूच होते? अम्मीसे बात की तुमने? मै तो सोच भी नहीं सकती, तुमपर क्या बीती होगी!"

शमाचे विचार जसेच्या तसे फोनवर बोलताना बाहेर पडत होते.

अरमानबरोबर बोलताना विचारांना परदा करावा लागत नाही ही तिच्या दृष्टीने फार सुखाची बाब होती. अरमानने फोनवर तिला लेखाजोखा दिला गेल्या काही दिवसातला. तिचं मन भरून आलं अरमानसाठी. अब्बूंना तो खूप मिस करायचा. तिच्याशी बोलतानाही नकळत अब्बूंच्या आठवणी सांगत राहायचा. तेच अब्बू, गेले नव्हतेच, जीवंत होते, कितीतरी वर्षे, आणि तरी यांची भेट नाही होऊ शकली! किती दुर्दैवी हे!

'मी येतेय अरमान!'ती मनातल्या मनात म्हणाली.

---

रात्री अरमानला वरची खोली दिली. सगळी भावंडं, भाऊ काका, वहिनी, अनंता, अनुराधा, वसंता, वासंती सगळे पडवीत बसले. वासंती नाही नाही म्हणत शेवटी संध्याकाळी वसंताबरोबर आली होती. आण्णा, आजी आजोबा, झोपायला गेले होते केव्हाच. अनुराधा, वहिनींच्या गुडघ्यांना औषधी तेलाचं मालीश करत होती.

"काय मग आनंदा? मुंबैत पैसे ढीगाने मिळवतोस म्हणे!" वासंतीचा जळफळाट असा बाहेर आला.

आनंदा गालातल्या गालात हसला. "काकू, अगं मुंबईत मी काहीच नाही करत खरं तर, आई, बाबा, चंदू इथे भरपूर कष्ट घेतात. मी फक्त ग्राहक मिळवतो. माल पोहोचवतो."

“अरे मग वरूणला का नाही घेत तुझ्याबरोबर? त्याला मात्र वाळीत टाकलंत!”

“आई, काहीतरी बोलू नकोस.” वरूण ओरडलाच.

“वरूण तुला आवडेल असं काम करायला? मला वाटलं तुला नोकरी आवडतेय करायला. धंद्यात काय, घरची जेवढी माणसं मिळतील तेवढं चांगलंच आहे. हवीच आहेत. खरंतर काकांना पण मी विचारणार होतो, जरा पैशाअडक्याचं सांभाळाल का म्हणून? बाबांना एकट्याला खूप होतं सगळं. पूर्वी आण्णा पाहायचे. मग आई. पण आईला आता तीन वयस्क व्यक्तींना सांभाळायचं म्हणजे वेळ होणार नाही. चंदूवर आधीच नव्या मशीनची जबाबदारी अधिकची पडलीय. आर्थिक व्यवहार पाहायला घरचं अनुभवी माणूसच हवं. वरूण तुझी इच्छा असेल तर पैसा भरपूर आहे या धंद्यात, पण कष्ट आणि पडेल ते काम करण्याची तयारी हवी.” आनंद शांतपणे बोलत होता.

“आंद्या, आवडेल मला या धंद्यात यायला. मलाही पूर्वी नोकरी मानाची वाटायची.पण मग लक्षात आलं, दुसऱ्याची चाकरी करण्यापेक्षा स्वत:चं घरचं काम केव्हाही चांगलं. लाज न बाळगता करेन मी हे काम. काय करायचं ते मात्र शिकवावं लागेल मला तुम्ही सगळ्यांनी मिळून.” वरूणचा मोकळेपणा सगळ्यांनाच भावला. अरे, तू तर आमच्या सगळ्यात हुशार, माझे सगळ्या विषयातले मार्क एकत्र केले तरी तुझ्या एका विषयाइतके व्हायचे नाहीत, आठवतंय? आनंदा हसून म्हणाला.

“आंद्या, लेका उद्या शाळेत चक्कर टाकू!”चंदू उत्साहाने बोलला.

“कसले वेडे होतो ना आपण? ते गुरूजी आणि बाई वह्या बघून भडकायचे माझ्या. आठवतय वहीच फाडून टाकलेली माझी एकदा.” तेव्हा टोचलेल्या, बोचलेल्या आठवणी आज या भावंडांना हसवत होत्या. रिझवत होत्या. आनंदा तर केव्हाच त्या टोचण्या विसरून गेला होता.

अनुराधा ऐकत होती. पाहत होती आपल्या गुणी मुलाकडे. त्याच्या डोक्यावरून हात फिरवावा अशी उत्कट ईच्छा झाली तिला. पण तिने ती तशीच मनी मुरवली. न जाणो, तरूण पोर, पापड मोडायला वेळ नाही लागायचा.

वासंती साशंकतेने ऐकत होती. ‘खिजवतोय का वरूणला आंद्या?’पण मग तिने विचार बाजूला सारला. सध्या वरूणचं बस्तान बसणं जरूरीचं होतं.

“आनंदा, बघेन रे मी बॅंकांची कामं. हिशेबाच्या वह्याही बघेन. माझं रोजचंच तर काम ते नोकरीत असेपर्यंत.” वसंता आपुलकीने बोलला.

अनंता कौतुकाने निरखत होता आनंदाला. ‘किती सहजतेने आपलसं केलन् सर्वांना. आपण वसंताला सांगण्याचा नुसता विचारच करत बसलो किती दिवस. त्याला आवडेल का ही भीती होती मनात.’

---

२.१७

अंथरुणावर पडला तरी अरमान तळमळत होता. काश, अम्मी खोटं ना बोलती, असं खोटं जे आयुष्यभरासाठी एक वाहती जखम कायमचं देऊन गेलं. द ग्रेट, जागतिक किर्तीचा पेंटर, अरमान.... काय उपयोग त्या किर्तीचा! डोळयांतून आसवं गळत राहिली.

अरमानने, इझलवर कॅनव्हास चढवला. सगळे हवे ते रंग हाताशी घेतले, अद्ययावत ब्रशेसचा नवा पॅक काढला. मग त्याने भराभर चित्र रंगवायला सुरूवात केली. आभाळाच्या निळाईतून ह्रदयाची आग आधी केशरी लाल होत अचानक राखाडी राख बनत संपूर्ण चित्रावर भूरभूरली. काळया सावल्यांचा माग घेऊ लागली. ज्वाळा विझून किरमीजी होत काळा ठिक्कर कोळसा झाल्या. चित्रविचित्र फटकाऱ्यातून एक वाहती वेदना पाझरू लागली. मधूनच एखादा विझत आलेला निखारा परत एकदा फुंकर मारल्यावर चेतावा तशी एखादीच भडक लाल केशरी रेघ चमकते न चमकते तोवर विझलेली राख जमा होऊ लागली. ब्रश रंगात बुडत होते आणि कागदावर भळभळती जखम ठिबकत होती. अरमानच्या बोटांपर्यंत ती वेदनेची कळ पोहोचत होती.

त्याने अचानक हात झटकला आणि ब्रशवरचा लाल भडक रंग,अख्खा कॅनव्हास रक्तरंजीत करून गेला. आधीचे सारे रंग, त्या भावभावना, केविलवाणेपणाने आपल्याच अंगावर पसरलेल्या लाल शिंतोड्यांकडे पाहताहेत असा भास त्याला झाला. त्याने आपले अंग

मचाणावर झोकून दिले. बऱ्याच वेळाने त्याला जाग आली ती कोणाच्यातरी स्पर्शाने! हळूवारपणे अब्बू त्याच्या लहानग्या चेहऱ्यावरून हात फिरवत होते. "बेटा अरमान, मी तुला आनंदी, हसरे रंग देण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण तू उचलताना हा अधूरा कुंचला उचललास. खैर, कोई बात नहीं बेटे, तेरे इस अधूरेपनके भी चाहनेवाले मिलेंगे. उस अधूरेपनमें खुदको खोजेंगे वो!"

"अब्बू, आपने उस बच्चेको कौनसे रंग दिये?"

"अरमान, मैने उसे कुछ देने का सवालही पैदा न हुआ! वो आता,खुशी आती. हम एकही हो जाते, इन रंगोंकी तरह मिल जाते एकदुसरेमें! खुद रंग बन जाते!"

"जलन हो रही है अब्बू!"

"जल जाओगे तुम, उसे तो पताभी नही चलेगा! वो जलन की एहसास से भी बेखबर है मेरे बच्चे!"

"मै वैसेभी जल रहा हूं अब्बू! उस बच्चेसे नहीं! अपनी अधूरी कला की वजहसे!"

"इस आग को जलाए रख! इसे थंडी पडने मत देना! तेरी कला अधूरेपनमेंही रंग लायेगी!" मग अब्बूंनी ब्रश उचलला, त्यांचा मॅजिकल स्ट्रोक कॅनव्हासवर उतरला. अरमान पाहतच राहिला, किती परीपूर्ण झालं ते चित्र! तेवढ्यात अब्बू सरळ चित्रात उतरले व नाहीसे झाले. अब्बू.......

अरमान दचकून उठला. क्षणभर त्याला काही कळेचना. मचाण.. चित्र, अब्बू... तो आनंदच्या घरी पलंगावर होता.

नंतर मात्र त्याला झोप येणंच शक्य नव्हतं. ‘अब्बू काय म्हणाले? इस आग को जलाए रख!’

‘शायद कलाकार की असलियत यही है! वो खुद जलता है तब उसकी कला रंग लाती है! कलाप्रेमींच्या हृदयात स्थान मिळवते.’त्याला वाचलेल्या पुस्तकातलं वाक्य आठवलं. ‘कलाकाराचं दु:ख जेवढं मोठं, तेवढी त्याची कला अस्सल उतरते.’

---

आनंदा आज सकाळीच फॅक्टरीत गेला. पूर्वी घरून बनणारे पदार्थ आता वेगळी जागा घेऊन, सरकारी लायसन्स वगैरे सर्व व्यवस्थीत घेऊन, तिथे बनवले जात.. चंदू पूर्णवेळ ते काम पाही. अनंता अजूनही ऑर्डर्स मिळवण्यासाठी फिरायचा. त्याने हाताखाली दोन मुले ठेवली होती.

आनंदा आल्यावर सर्व जुन्या कामगार बायकांनी गराडा घातला त्याला. “कसायस लेकरा?” एक जूनी, शेवया करणारी आजी चेहऱ्यावरून बोटं मोडत म्हणाली.

“मी मजेत. तू कशी आहेस आजी? तुझ्या खाऱ्या शेंगा खाऊन किती दिवस झाले.”

“अगे बाय माझो, माझा बाबा, तुला आठवण हाय? उद्या आनते रे पोरा करून ताज्या!”

असंच प्रत्येकीशी बोलत तो पुढे निघाला. शोभेच्या वस्तू बनविणाऱ्या बायकांनी तर कल्लाच केला त्याला पाहून. “आनंदभाऊ, नवं शिकवा काहीतरी, तेच तेच करून कंटाळा आलाय.”

“हो, नवं काढूच काहीतरी. मलाही तेच ते बघून कंटाळा आलाय. येतो दुपारी तिकडे मांगरात.”

मग तो सरळ फॅक्टरीच्या आत जाण्याच्या मार्गाने निघाला. छोटीशीच जागा, पण नियमाप्रमाणे, गाळून शुद्ध केलेली हवा, आत प्रत्येकाला युनिफॉर्म, टोप्या, तोंडावर मास्क, सर्व व्यवस्थीत करून दिलं होतं त्याने. तो ही सर्व रितसर युनिफॉर्म वगैरे घालूनच आत गेला.

छोटी छोटी मशीन्स, त्यांना बाहेर जोडलेले कनव्हेयर बेल्टस, सगळं कसं शिस्तीत सुरू होतं.

तेवढ्यात “कुंदा” असा जोरात पुकारा आला. “खाली बसून कोणतंही काम करायचं नाही! का करायचं नाही हे ही शिकवलंय तुम्हा सर्वांना. मग का बसलीस खाली जमिनीवर?”

“पाय लय वळून आले ताई!”

“कितवा महिना?”

“सातवा.”

“हं!तू चेकींगला बस, जा! आता तिथेच कर काम डिलीव्हरीपर्यंत. मग सुटीवरून आल्यावर पाहूया. रुक्मिणीला पाठव. तिला येतं हे मशीन.”

“होय ताई!”

रुक्मिणी आली. “मी आधीच सांगत होते. पण ऐकेल तर ना.”

“बरं बरं, चला लागा कामाला.”

ठाम आवाजाची धनीण भराभर चालत दुसऱ्या मशीनकडे निघून गेली.

आनंदा, तिच्यामागोमाग चालत निघाला नकळत. ही नवी सुपरवायझर दिसते. चंदू सांगत होता ती हीच असावी. चंदू फार कौतुक करत होता. पण ती वयाने एवढी लहान असल्याचं सांगितलं नाही त्याने. जम चांगला बसवला हिने थोड्या अवधीत.

तेवढ्यात तिचं लक्ष गेलं याच्याकडे. भराभर चालत आली. “एक्सक्यूज मी? कोण आपण? इथे कसे आलात? चंद्रशेखर सर आलेत का तुमच्याबरोबर? अशी परवानगी नाही सरळ आत यायला. “मग तिने त्याच्या शूजकडे पाहिलं. शूजकव्हरही आहेत म्हटल्यावर जरा रिलॅक्स झाली.

“मी आनंद!”

“ओह! आनंदसर! सॉरी, मी पहिल्यांदाच पाहिलं ना?”

“नवं मशीन येईल उद्या परवा. कुठे ठेवायचं काही जागा वगैरे ठरली?”

“हो सर! या दाखवते.”

“सर पण आपल्याला इथे हवेवर नियंत्रणासाठी वेगळी यंत्रणा लागेल. फ्रोझन माल आहे ना?”

“हो, ते ही तज्ञ येतील.”

मग ती बरेच फॅक्टरीतले इश्श्यूज, तिची त्यावरची सोल्यूशन्स, आहे त्या मशीन्सचा अधिकाधिक वापर असं बरंच सांगत राहिली. अधून मधून तिची नजर काम सुरू असलेल्या विभागांवरून काचेच्या खिडकीतून फिरत होती. आनंदा तिचं निरीक्षण करत होता.

मग काही वेळाने चंदू आला. त्या दोघांत त्या दिवसांच्या जाणाऱ्या ऑर्डर्स विषयी चर्चा झाली.

चंदू म्हणाला, “तुमची झाली ना ओळख? ही सुकन्या. कस्तुरे आजींची नात. सहा महिन्यांपूर्वी जॉईन झालीय. मी बोललो तुला.”

“हो. छान पिक अप केलं आहेस सुकन्या. या नव्या मशीनसाठी नवे कामगार घ्यायला लागतील ना?”

“माणसं जास्त लागणार आहेत. पण नवी माणसं पॅकिंगला घ्यावीत आणि आपल्या अनुभवी बायका इथे आणाव्यात असं वाटतय. त्या उत्सुकही आहेत. जबाबदारीने आपले समजून काम करणाऱ्या आहेत. आपापसात रॅपोही चांगला आहे त्यांचा.”

आनंदा, आश्चर्याने त्या लहानशा दिसणाऱ्या मुलीकडे पाहू लागला. मग त्याने चंदूकडे पाहून पसंतीदर्शक मान हलवली.

“हं! हे बरोबर होईल.”

मग त्या दोघांना तिथेच सोडून ती परत चालू मशीन्सकडे गेली.

“चंद्या, कुठे सापडलं हे खणखणीत नाणं?”

“अरे, आजींबरोबर आली काकूला भेटायला. मलापण शिकवा म्हणाली तुमच्यासारखं काम. तिचं फुड टेकनॉलॉजीचं कसलंसं शिक्षण झालंय म्हणाली. मग काकूने पाठवली माझ्याकडे. मी आधी वैतागलोच. आता हिला कुठे शिकवत बसू? म्हणून. पण महिन्या दोन महिन्यात मस्तं पिक अप केलंन रे. मला आता फारसं इथे लक्षं घालावं लागत नाही. आणि कामगारांमधेही दबदबा आहे ताईंचा! आवाज ऐकलास ना?”

दोघंही हसले!

मग बाहेर येऊन कागदपत्र, आलेली पत्रं, सरकारी पत्रव्यवहार असं काय काय बोलत होते तेवढ्यात जेवणाची सुटी झाली. सुकन्या वरून चढवलेला युनिफॉर्म उतरवून आली.

एवढीशी पोर दिसत होती. चेहरा नाजूक, डोळे पाणीदार, नाक धारदार. कणीदार आवाज. तिने डबा काढला, कोथिंबीर वडी यांच्यापुढे केली. आनंदा पाहत होता, ती खोलीत आल्यापासून चंदूचा चेहरा उजळला होता. आईशी आणि काकूशी बोलायला हवं. त्याने मनातल्या मनात नोंद केली.

---

शमा पांचगणीच्या त्या पंचतारांकित बोर्डींग स्कुलमधे पोहोचली. तिच्या वकिलाने आधीच अपॉइन्टमेन्ट व परमिशन घेऊन ठेवली होती.

तलाकनुसार तिला महिन्यातून एकदा, आणि इदच्या दिवशी, तसेच समशेरच्या बर्थडेला त्याला भेटण्याची तरतूद होती. दर महिन्यात तिला नव्हतंच जमत यायला. पण एका आड एक महिन्यात ती जमवायचीच.

मागच्या भेटीत १३ वर्षांचा समशेर अगदी अलूफ, तुटक वाटला तिला. पहिल्यासारखं अम्मी म्हणत गळ्यात पडणं अलीकडे कमीच झालं होतं. पण मागच्यावेळी बदल प्रकर्षाने जाणवण्यासारखा होता. तेव्हापासून शमा अस्वस्थ होती आतून. सतत बॅकग्राऊंडला तो विचार सतावायचा. आताही त्यामुळेच ती नर्व्हस होती मनातून. भेटण्याच्या निरनिराळया रुम्स होत्या, शमा तिथे बसली. समशेरला बोलावणे गेले. बराच वेळ झाला तरी तो आला नाही. मग तिने परत निरोप पाठवायला लावला. शेवटी १५ मिनिटांनंतर समशेर आला. तो आत आल्यावर शमा उठून उभी राहिली. तो अलिप्तपणे तिच्याकडे पाहत राहिला. फार अवघडलेपण होतं दोघांत. इतक्या मोठमोठ्या क्लायंटसना लिलया हाताळणारी शमा इथे मात्र तोकडी पडत होती. मग उसनं अवसान आणून ती म्हणाली "बैठो सॅम!"

तिने त्याच्यासाठी आणलेली इंम्पोर्टेड चॉकलेटस, इतर खाऊ, कपडे, शूज, सगळं त्याला दिलं. त्याने न बघताच ते सोफ्यावर बाजूला ठेवलं.

"आय डोन्ट नीड दीज थिंग्ज!" तो रुक्षपणे म्हणाला.

ओह, अच्छा! डू यू वॉन्ट मी टू गेट समथींग एल्स? लेटस गो टूगेदर अँड गेट इट फॉर यू.

नो! नथींग!

ओके! शाल वी गो ग्रॅब समथींग टू इट?

नो!

ओके! काही क्षण शांततेत गेले.

“कैसे हो सॅम?” तो नुसता पाहत राहिला.

“अब्बूने दुसरा निकाह केला. तू कधी करणार?”

शमा खाडकन उभी राहिली.

“समशेर, मी निकाह वगैरे काही करत नाहीय. कोण सांगतं तुला या असल्या गोष्टी?”

“सांगायचं काय त्यात? यशच्या डॅडनी दुसरं मॅरेज केलं, आता त्याची मॉम करतेय. बेलाच्या ममाने पण केलं.”शमा सावकाश खाली बसली. “हे बघ सॅम, तुझ्या डॅडचा आणि माझा तलाक झाला तेव्हा मी नोकरीधंदा काही करत नव्हते. कोर्टाने विचारलं मुलाला तुमच्या ताब्यात दिलं तर त्याची जबाबदारी कशी घेणार? माझ्याकडे उत्तर नव्हतं. मग त्यांच्या नियमाप्रमाणे तुला भेटत राहिले. पण आता मी तुला माझ्याकडे घेऊन जाऊ शकते. मागचा संपूर्ण महिना मी वकिलांबरोबर बसून सगळा अभ्यास केलाय. पण मला तुझी इच्छा कळायला हवी. तुला आवडेल माझ्याबरोबर लंडनला यायला? तू हो म्हणालास की मी लगेच अप्लाय करेन कस्टडीसाठी.”

“अब्बू तर म्हणतात, तू मला आणि त्यांना सोडून गेलीस. खरंय हे?”

“हो बाळा! खरंय हे. माझी घुसमट मला जगू देत नव्हती. मी तुला घेऊन बाहेर पडले होते. पण तुझ्या अब्बूनी कोर्टाकडून तुला मिळवला. आणि माझ्या हातात तुला देण्याशिवाय काही नव्हतं.”

“पण आता चित्र बदललंय. मी बदलवलंय. मी तुझ्या डॅडपेक्षा भरपूर जास्त कमावते. मी ‘ही’ सगळी वर्ष यात घातली तेव्हा हा दिवस दिसतोय सॅम.”

“अँड माय चाईल्डहूड!” थंडपणे सॅम बोलला.

शमा असहाय्यपणे पाहत राहिली. मग शांतपणे म्हणाली, “हां बेटे, और तेरा बचपन. मेरी और तेरी जिंदगी सुधारने के लिये मेरी शादीशुदा जिंदगी और तेरा बचपन दाव पे लग गया!”

सॅम पहिल्यांदा तिच्याकडे वळून पाहू लागला. कुठेतरी तिचा प्रामाणिकपणा त्याला स्पर्शून गेला.

“सॅम, सोचकर बताना. मी तुझ्या बर्थडेला येईन. तेव्हा बोलूया. चला, तू कंपनी देशील असं वाटलं म्हणून जेवले नाही. आता जेवते एकटीच.”

“थांब मीही येतो.”

सॅम शमाने आणलेले कपडे, शूज घालून पाच मिनिटात बाहेर आला.

शमाच्या चेहऱ्यावर बऱ्याच दिवसांनी खुशीचा नूर आला.

---

२.१८

शमा आणि सॅम मग बाहेर पडले. “कुठे जाऊया?” शमाने विचारले. तो पाहत राहिला. आज पहिल्यांदाच त्याला कोणी विचारत होतं त्याचं मत. “तुम्ही जाता का रे बाहेर जेवायला? आय मीन विथ होस्टेल ऑथॉरिटी ऑर टीचर्स?”

“हां! वन्स अ मंथ! और दोस्तोंके बर्थडे पर अगर पेरेंटस यहां आये तो लेकर जाते है!”

“अच्छा? मग तुझ्या बर्थडेला देऊया का आपण पार्टी? आपण आजच पाहू चांगली एखादी जागा. तुला कोणतं ठिकाण आवडतं?”

त्याने नाव सांगितलं. शमा म्हणाली “रस्ता माहित आहे तुला?”

त्याने परफेक्ट रस्ता सांगितला. शमाला खूप कौतुक वाटलं. हे गुण माझे घेतलेत मुलाने याचा तिला अभिमान वाटला. मग हळूहळू सॅम खुलत गेला. पहिल्यासारखा हसून बोलू लागला. गप्पा मारत छान जेवण झालं. ममाने सगळं त्याला कन्सल्ट करून मागवलं. अब्बूसारखं, डायरेक्ट ऑर्डर नाही केलं. त्यांनी तिथेच पार्टीची चौकशी केली. “तुला कशी पार्टी आवडेल सॅम?”त्या हॉटेलच्या बॅंक्वेटची मुलगी वेगवेगळ्या थीम्स दाखवत होती. हॅरी पॉटर थीमवर त्याचं मन क्षणभर रेंगाळलं. पण मग तेही बालीश वाटलं त्याला. बाकी तर सगळंच फार बालीश वाटलं. वर्ष दोन वर्षांपूर्वी हे सगळं फार आवडलं असतं त्याला.

“सॅम, व्हाय डोन्ट वी ऑल गो टू सम ॲडव्हेंचर पार्क, गेम्स? आहे का असं काही इथे?”

सॅमचे डोळे चमकले. “विल यू अलाव मी?”

“येस, व्हाय नॉट? अर्थात इथे सेफ्टीची काळजी घेतली जाते याची खात्री झाली तरच.”

“लेटस् चेक आऊट.”तिने त्या मुलीलाच विचारले. ती खुशच झाली. तिने भराभर माहिती पुरवली. हॉटेल सर्व व्यवस्था करेल. सेफ्टीची काळजी घेतली जाईल. तिने सेफ्टी मॅन्युअल्स, एजन्सी सर्वांची माहिती दिली.

“सॅम, हे दिसतय छान. पण तरी, लेट मी चेक. सगळं ठीक असेल तर हे फायनल करू.” सॅम प्रचंड खुश झाला. “ममा, माझे फ्रेंडस इतके खुश होणारेत ना.”शमा हसली. “सॅम, दोन तीन दिवस थांब. सुरक्षिततेची सगळी काळजी, यंत्रणा तपासून झाली की मग सांग.”“ओह! तू सेफ्टीचं कारण देणार आहेस का आता मला?” “सॅम, मीच सुचवलं ना हे, मग मी कारण का देईन? पण खरंच जर काही धोके नीट हाताळले गेले नसतील तर तुझ्याबरोबरच त्या सगळ्या मित्रांचा जीव धोक्यात येईल ना?”

“मला स्वत:ला ॲडव्हेंचर्सने भरपूर जीवन आवडतं जगायला. पण, योग्य ती काळजी घ्यायलाच हवी. आणि तुझं लाईफ खूप किमती आहे माझ्यासाठी, तुझ्या अब्बूंसाठीही. आता तू मोठा झाला आहेस. रिस्क आणि मजा बॅलन्स करायला शिक बेटा. हा बॅलन्स जिंदगीभर करावा लागतोच.

एक लक्षात ठेव रिस्क आणि मजा हे हातात हात घालूनच येतात. रिस्कच्या भीतीने आयुष्यातल्या मौजेचा हात सोडायचा नाही. त्या रिस्कला कव्हर करतील असे मार्ग शोधायचे. मौज संपली तर आयुष्य कसलं ते?"

सॅम ऐकत राहिला. दिवसभरात पहिल्यांदा ममा काहीतरी शिकवत होती त्याला. आणि ते ही मोठ्यांशी बोलावं तसं. अब्बू आले की दिवसभर होणारा लेक्चरचा मारा त्याला आठवला. 'पढाई पर ध्यान दो. होस्टेलसे बाहर ना जाओ. दोस्तोंके साथ तो बिलकुल नही. नव्वदच का मिळाले? दहा कुठे गेले? कामाशिवाय बोलायचीही गरज नाही कोणाशीच. यहां पढाई करने आये हो, बस वही करो.'

"अम्मी, तुला माझ्या अभ्यासाची काळजी नाही वाटत?"

शमा क्षणभर थांबली. अनपेक्षीत होता प्रश्न.

"बरं झालं तू विचारलंस. मॅथ, सायन्स लॅंग्वेजेसबरबर इतकी दोस्ती, मग इतिहास भुगोलावर एवढा का राग?"

सॅमला मनातल्या मनात हसू आलं. 'रागच तर आहे आपला.'

"दे आर सो बोअरिंग!"

"बोअरींग?"

"ऑल अबाऊट डेड!"

ओह! मला ते सर्वात जास्त जीवंत विषय वाटतात."

“जीवंत? हिस्टरी इज सबजेक्ट ऑफ डेड पिपल, राईट? भुगोल तर काय दगड, मातीधोंडे, नकाशे,. तू ही तर कॉमर्स विषय निवडलास ना?”

“हं!”

“बरं मला सांग आता तुला आईसक्रीम खायला आवडेल?”

“अं? हो!”

“चल तर मग.”

आईस्क्रीमच्या कपाबरोबर मग तिने लंडनचा विषय छेडला. “तुला तिकडे येण्या न येण्याचा निर्णय घ्यायचाय, “असं म्हणत तिथलं वर्णन, हवामान, लोकं, राहणीमान यावर गप्पा मारू लागली. मग तिने वर्ल्ड मॅपवर लंडन, इंग्लंड कुठे आहे बघुया म्हणून फोनवर जगाचा नकाशा ओपन केला. सॅम नकळत तो निरखून पाहू लागला. मग एक एक करत सापडला. मग त्याची दिशा,आसपासचा प्रदेश, नद्या असं करत करत त्यांनी कसं अनेक वर्ष आपल्यावर, जगावर राज्य केलं, काय बरोबर केलं काय चुकीचं, यावर विषय आला. बरेच फ्लेवर्सही खाऊन झाले.

मग ती म्हणाली, “सॅम जर भुगोलाचा, इतिहासाचा अभ्यासच कोणी केला नसता तर ही माहिती आपल्याला नसतीच मिळाली.”

“भुगोलाचा अभ्यास करताना आपल्याला त्या ठिकाणी जायचंच आहे असा विचार करून केलास तर इंटरेस्टींग आहे सगळंच.”

“इतिहासातील व्यक्ती जरी आता मृत असतील, तरी त्यांनी जे काही चूक बरोबर काम केलं, त्याचे परिणाम आपण आजही पाहतो. त्यामुळे व्यक्ती मृत असल्या तरी परिणाम अजून जीवंतच आहेत बेटा. विचार कर आज आपण जिथे बसलोय ही जागा, किती वर्ष जूनी असेल? म्हणजे हे हॉटेल नव्हे, ही जमीन, हा इलाका. कोणकोणते राज्यकर्ते इथून आले गेले असतील? पोटापाण्यासाठी आपण एखाद्या विषयाची निवड करतो. तो आवडीचा मिळाला तर उत्तमच. पण आपण हे शिक्षण आयुष्य उत्तम रितीने जगता यावं म्हणून घेतो.” सॅम विचारात पडला.

“बाय द वे, तुझ्या नेक्स्ट वीकच्या टेस्टचा निम्मा अभ्यास झाला. आता होस्टेलवर जाऊन परत इंग्लंडचा इतिहास भुगोल नीट वाच. काय? आणि हे दोन विषय हातात हात घालूनच असतात. वेगवेगळे वाचण्यापेक्षा एकत्रित वाचावेत.”

सॅमला ही ममा नवी होती. याआधी तिने कधीच अभ्यासाचा विषय काढला नव्हता. आजही मार्कांविषयी ती एकही शब्द बोलली नव्हती. आणि तरीही नावडते विषय काही प्रमाणात का होईना अभ्यासावे असं सॅमला वाटू लागलं होतं.

---

“काकू, वा! वा! मजा आ गया. तू मुंबईला चल. तुझे गुडघे नीट करून देतो बुवा. नायतर ही अशी गरमागरम भाकरी नि ठेचा कोण खायला घालेल आम्हाला.”

"बायको आण, ती घालील करून."

"आता बघ हं काकू. मी लाख करेन गं. पण मोठ्यांचं झाल्याशिवाय लहानांचा चान्स कुठून लागायला. चंद्याचं करू की आधी. मग शिकव त्याच्या बायकोला. आम्हाला काय काकू नाहीतर वहिनी. भाकरी मिळाल्याशी मतलब!"

"हात मेल्या! हेच का प्रेम काकूवरचं!" हसू लागली दोघंही.

मग म्हणाला, "तू बघतियेस मुलगी, की मी बघू?"

"का रे आहे का कोणी नजरेत? माझा चंद्या मनाने फार चांगलाय रें. पण शिक्षण नाही ना."

"तुला सुकन्या कशी वाटते काकू?" आनंदाने सरळ विचारूनच टाकलं मग.

"ती हो म्हणेल? इंग्रजी फाडफाड बोलते. बरचसं काही शिकलीय म्हणे."

"ते माझ्याकडे लागलं. तुला पसंत आहे का? आणि काकांना?"

"अरे, तुझे काका कशालाच नाही म्हणत नाहीत हो मला. मी सांगेन त्यांना. पण आनंदा, आधी तिचा अंदाज घे. मला चंद्याचं मन दुखावलं जाऊ नये असं वाटतं. आणि पुष्पीचं व्हायला हवं आधी."

"हं! तिच्याशी बोलायचंच आहे मला जरा. का नाकारतेय ती सगळी आलेली स्थळं?"

"काही कळत नाही तिच्या मनात काय आहे. घडाघडा बोलावं तर कळेल ना? आणि ही काय लागून गेलीय हेमा मालिनी म्हणून हिला राजेश खन्ना मिळेल?"

"काकू,धर्मेंद्र तरी म्हण."

"तेच ते."

"तेच ते काय अगं!"

"जळ्ळी मेली लक्षणं!"

"बरं बाई. बोलतो तिच्याशीही. ती का नाही आली?"

"बघ आता तूच!"

———-

"ए...... अरे! आंद्या.......आई गं! सोड वेणी माझी. अरे दुखतायत ना केस." पुष्पा ओरडली.

"बरं झालं. आली का नाहीस मला भेटायला?"

"हं! तू कोण मोठा टिकोजीराव लागून गेलास रे?"

"बरं! ऱ्हायलं! मी मस्त साड्या आणल्या होत्या."

"कुठायत? दाखव!"

"आता काय? तू आली नाहीस. मग घेऊन टाकल्या सगळ्यांनी."

"काय रे तू? आईने घेतल्या असतील काकूबाईस्टाईलवाल्या."

“वासंती काकूने ढापल्या ना सगळ्या छान छान?”

“राधाकाकूने घेतल्या असत्या तर मिळाल्या असत्या मला. तू एक तरी ठेवायचीस ना मला.”

“तुला कशाला हव्यात? घरकोंबडीसारखी बसून राहतेस घरीच. लग्नालाही तयार नाहीस. करायच्यात काय तुला साड्या.”

“झाली वाटतं कागाळी करून आईची?”

“पुष्पे, तुला काय वाटतंय ते सांग.”

“आंद्या, मला काय वाटायचय? मला कोण विचारतंय?”

“मी विचारतोय. सांग मला.”

“आंद्या, रडत खडत का होईना, ग्रॅज्युएट झालेय मी. मला नोकरी करायचीय. आपल्या पायांवर उभं राहायचंय. मग लग्न करेन. पैशासाठी हात पसरायचा नाहीय मला नवऱ्यासमोर.”

“मग हे सांगितलं का नाहीस?”

“मी चंद्याला म्हटलं, मला फॅक्टरीत काम दे. तर म्हणाला, तुझी तू मिळव बाहेर नोकरी. मी कोणतंही काम करायला तयार आहे. आधी चुकले मी, काकूला मदत केली असती तर आपसूकच शिकले असते. पण आता तयार आहे मी.”

“हं! बोलतो मी चंदूशी. पण एक महत्वाची गोष्ट अशी की कंपनीचे सगळे निर्णय चंदू घेतो. आईबाबाही कंपनीचा कोणताही निर्णय चंदूला

विचारल्याशिवाय घेत नाहीत. मीही नाही. तुलाही चंदूचं सगळं ऐकावं लागेल. घरी भाऊ, कंपनीत तो वरीष्ठ असेल. सुकन्याही. कमीपणा वाटून न घेता काम केलंस, शिकलीस तर आपला सर्वांचाच फायदा होईल. बघ हे मान्य असेल तर बोलतो चंदूशी.''

''हो, सगळं मान्य आहे मला. मी बदललेय रे. पण मग निदान सहा महिने लग्नाचा विषय नको. एकदा इथे स्थीर झाले की मग तुम्ही शोधा स्थळ.''

''चल मग.''

''कुठे?''

''त्या घरी. साडी नकोय का?''

ती हसली मग खुदकन. ''चल!''

''काका, तूही ये की एक रात्र. शेकोटी करू.''

''बर, येतो, व्हा तुम्ही पुढे.''

---

अरमान चक्कर मारायला बाहेर पडला. गाव तसं लहानसंच टुमदार. आता शहरी हवा लागली होती. एक छोटासा बगीचा दिसला त्याला. आत शिरला. बाकावर बसला. मुलं खेळत होती. किलबिलाट होता त्यांचा सगळीकडे. लहान मुलं म्हणजे चैतन्यपुतळेच. ते चैतन्य अरमानच्या मनचित्तात उतरलं नसतं तरच नवल. तोही रमून गेला मग त्यांच्या

गमतीजमतींमधे. हलकं हलकं वाटलं त्याला. त्या स्वप्नानंतर डोक्याला आलेला जडपणा हळूहळू विरत गेला. बराच वेळ बसून तो परत निघाला. इकडे आनंद चंदूने दारात शेकोटी पेटवली होती. एकेकजण येऊ लागलं. हास्यविनोदाला ऊत आला. अरमान परत आला तेव्हा त्याला बाहेरूनच हे हसतं खेळतं घर पाहून तो तिथेच थांबला. माणसंही बरीच दिसत होती. ‘जावं की नको? हा त्यांच्या कुटुंबाचा एकत्र वेळ. पण मग जाणार कुठे? ‘ विचार करतच होता, तेवढ्यात चंदूचं लक्ष गेलं. तो पुढे येऊन त्याला हाताला धरून आत घेऊन आला. आनंद, वरूणही पुढे आले. त्यांनी अरमानला खूर्चीवर बसवलं आण्णांच्या, आजोबांच्या शेजारी. मग बाकी सगळे खाली बसले. वासंती वर ओट्यावर बसली आजी, काकूंजवळ.

“अनंता बासरी काढ आज तुझी.” आण्णा म्हणाले. सगळे क्षणभर गप्पं झाले.

आण्णा म्हणाले, “पाहुण्यांना ऐकू दे माझ्या कलावान मुलाचं संगीत. मी फार विरोध केला त्याला. पण यानंच म्हातारपणी सुख दिलं मला. मग त्यांनी आजोबांचा हात हातात घेतला, तुमचे आभार मानावे तेवढे थोडे आहेत. ही तुमची लाखगुणाची लेक आमच्या घरात देऊन मोठेच उपकार केलेत आमच्यावर.” स्वर कातर झाला त्यांचा. आजोबांनी पाठीवर थोपटलं त्यांना. आजींनी पदराने डोळे टिपले. आनंदाने आतून बासरी आणली. अनंताच्या बासरीचे मखमली मधाळ स्वर आसमंतात बरसू लागले. सगळ्यांना मोहवू लागले. सगळे गुंगून गेले. सगळ्यांना शांतवून गेले.

बासरीवादन संपल्यावर सगळेच दोन क्षण शांत झाले. मग अरमान उठला. अनंताजवळ येऊन त्याने अनंताचे हात हातात घेतला. बराच वेळ तसाच थांबला.

सगळयांची मनं जुळलेली होती. घरात समाधान होतं. नकळत अनुराधेची नजर आनंदावर खिळली. ‘हे सगळं तुझ्यामुळे बाळा! औक्षवंत हो!’ तिची नजर जाणवल्यासारखं त्याने पटकन तिच्या दिशेने पाहिलं. क्षणभर नजरानजर झाली. तिची आर्त नजर त्याला अस्वस्थ करून गेली.

तिने पटकन नजर वळवली. ‘हिच्याशी खूप चुकीचं वागलोय मी.’ तो मनात म्हणाला.

२.१९

आनंदा दुसरे दिवशी परत फॅक्टरीत गेला. अरमानलाही घेऊन गेला बरोबर.

चंदू अरमानला फॅक्टरी पाहायला घेऊन गेला आत. आनंदाने सुकन्याला बोलावले. तिच्याशी बोलता बोलता पुढचे प्लॅन्स विचारले. ती म्हणाली “पैसे साठले की डिग्री घेणार.”

“किती आहे फी?”

“बरीच आहे.”

“तरी किती?”

तिने आकडा सांगितला.

“राहायची काय सोय?”

“मावशीकडे राहणार.”

“फी कंपनीने भरली तर?”

तिने झट्कन पाहिले त्याच्याकडे.

त्याला हसू आले. “शंका नको आणूस मनात. बॉण्ड लिहून घेऊनच देऊ पैसे. चंदूने शब्द टाकलाय तुझ्यासाठी.”

तिचा चेहरा सौम्य झाला मग. ‘हं! म्हणजे इथेही पाणी मुरतय.’ आनंद मनात म्हणाला. मग म्हणाला, “लग्नाचा काय विचार?”

तिने जरा रागानेच पाहिलं त्याच्याकडे.

“रागावू नकोस. हे बघ, सरळ व्यवहार आहे. कंपनी तुझ्यावर खर्च करणार. मग तू लग्न करून जाणार. काय फायदा?”

“कोणी सांगितलं? मी लग्न करून जाणार?”

“सांगायचं काय त्यात? सगळ्याच मुली करतात.”

“नका देऊ मग पैसे. मी मागितले का?”

“पण आम्हाला द्यायचेत.”

सुकन्या वैतागलीच मग. स्पष्ट दिसत होता राग तिच्या नाकावर. “किती वर्षाचा बॉण्ड द्यायचा?”

“जन्मभराचा!”

“आनंदसर!” ओरडलीच ती.

“अगं बये, चंदूसाठी मुलगी पाहणं चाललंय. तुझ्यासारखी मुलगी मिळाली त्याला, तर त्याचं आणि कंपनीचं सोनं होईल. म्हणून गूळ लावतोय तुला. सरळ आजीनांच विचारलं असतं जाऊन, पण तुझ्या मनात काय आहे ते कळल्याशिवाय विचारणं चुकीचं ठरलं असतं ना? काय म्हणतेस?”

तेवढ्यात चंदू आणि अरमान परत आले. सुकन्याचा चेहरा गोरामोरा झाला. पटकन निघून जाऊ लागली. मग आनंद जोरात म्हणाला, “बोला एकमेकांशी आणि कळवा. रात्री आईबाबांना घेऊन येतो आजींना भेटायला.”

मग तो आणि अरमान बाहेर पडले. सुकन्या आणि चंदू तो गेलेल्या दिशेने पाहत राहिले. मग एकमेकांकडे वळले.

“काय म्हणत होता आनंदा?”

“अं?क काही नाही!” सुकन्या पटकन निघून गेली.

“आईबाबांना घेऊन आजींकडे कशाला चाललाय हा?”

———

शमाची कार रामनगरमधे शिरली तेव्हा संध्याकाळ होत आली होती. तिने दोनतीन हॉटेल्स इंटरनेटवर शोधली होती. गाडी तिकडेच घ्यायला सांगितली. सगळीच हॉटेल्स अशीतशीच होती. एकटी बाई हॉटेलमधे येऊन राहणं, हे त्यांच्यासाठी नवंच होतं. दोन हॉटेल्स रिजेक्ट करून ती तिसऱ्या ठिकाणी पोहोचली. घरगुती लॉज होतं. पण स्वच्छ होत्या खोल्या. तिने दोन दिवसांचे पैसे भरून टाकले. त्याहून अधिक काळ इथे राहण्याची गरज नव्हती.

तिला अरमानच्या इथे येण्याविषयी, त्या मुलाविषयी, अरमानला हेच आपले वडील होते असं वाटण्याविषयीही अनेक शंका मनात होत्या.

अरमानने तिला जेव्हा हे सर्व फोनवर सांगितले तेव्हा त्याच्या मनात उठलेल्या तुफानामुळे ती काळजीतच पडली होती. त्याची मन:स्थिती ती समजू शकत होती. पण या सगळ्याच्या सत्यतेविषयीही ती साशंक होती. मग तिने निघण्यापूर्वी अम्मीला फोन केला. अम्मीने “अरमानचा हा भ्रम

आहे. कोणीतरी त्याला फसवतय. मी म्हातारी बाई, काहीच करू शकत नाही. तूच कर काहीतरी.” असं सांगितलं.

मोठ्या कलाकारांना असे गोत्यात आणणारे तोतया आई बाप मुलं भाऊ बहिणी अचानक उपटलेले, तिने अनेक वेळा पाहिले होते. अरमानचा इमोशनल स्वभाव तिला माहित होता. या सर्व शंकांमुळेच ती अरमानला काहीही न कळवता इथे येऊन पोहोचली होती.

फ्रेश झाल्याबरोबर तिने भराभर फोन फिरवले. तिला एक कॉन्टॅक्ट मिळाला होता. त्याला दुसरे दिवशी तिने दफनभूमीजवळ बोलावले. एका गोव्यातल्या आर्ट डीलरकडून तिला त्या दुकानदाराचा नंबरही मिळाला होता. पण त्याच्याकडे सरळ जाऊन धडकावे असे तिने ठरवले. मग तिने अरमानला फोन लावला. तिने त्याला लोकेशन पाठवलं.

“तुम रामनगरमें हो?” तो आश्चर्यचकित झाला. त्याला काय बोलावं तेच कळेना.

“बस आ जाओ अरमान!”

तिच्या आवाजात काहीतरी निराळंच वाटलं त्याला. तो पुढे काही बोलला नाही.

आनंदला त्याने लोकेशन दाखवलं. “हे तर इथेच आहे जवळ. इस्माईल भाईचं लॉज. तिथे काय काम? लॉजबीजवर जायचं नाही हां तुम्ही.” आनंद काहीसा रागावून म्हणाला.

“आनंद, अब तुम निकाल भी दोगे घरसे तो भी मै घरही आऊंगा!” आनंदच्या चेहऱ्यावर मग हसू परतलं.

“मैत्रीण आलीय माझी.”

“अरे, मग घरी बोलवायचंत ना त्यांनाही.”

“हं! जरा वेगळी आहे ती.”मग आनंद घेऊन गेला त्याला.

डायनींग हॉलमधे बसले. शमा बाहेरूनच त्यांना न्याहाळत होती. अरमानबरोबरचा मुलगा अगदीच पोरसवदा होता. अत्यंत रिलॅक्स्ड दिसत होता. ‘हा एकटा सोडतच नाही का अरमानला?’ अरमानचा चेहराही निराळाच वाटला तिला. एवढ्या रिलॅक्स्ड मूडमधे याआधी कधीच पाहिलं नव्हतं तिने त्याला. ‘काय गारूड केलय याने?’तो मुलगा टेबलवरूनच काऊंटरवरच्या माणसाशी काही बोलत होता. ओळख असावी जूनी.

सावकाश त्यांच्या मागून ती आली. तिला पाहताच अरमान उभा राहिला. त्याने तिला बेअर हग दिला. रामनगरमधे हे जरा पचवणं कठीणच होतं सर्वांना. आनंद गमतीने आसपासच्या मंडळींचे चेहरे न्याहाळत होता. मग अरमानने ओळख करून दिली. आनंदने हात जोडले. शमाने शेकहॅंडसाठी हात पुढे केला. त्याने हात जोडले होते तरीही. मग त्याने शेक हॅंड केला. तिच्या मनातल्या प्रतिमेला त्याचा शेकहॅंड तडा देणारा होता. ‘बट शेकहॅंड स्किल्स कूड बी मास्टर्ड!’

तिने कॉफी मागवली. “अरमान... मला परत एकदा सगळं सविस्तर ऐकायचय. अगदी डे वनपासून.”

अरमान क्षणभर न कळून पाहत राहिला.

“तुझ्या अब्बूंबद्दल. या मुलाला तू कसा भेटलास?”

अरमान चमकून पाहू लागला जेव्हा तिने आनंदचा उल्लेख ‘या मुलाला’असा केला.

“तुम्हाला एकमेकांशी बोलायचं असेल तर..... “आनंद म्हणाला.

“नो! थांब तू! “ काहीशा जरबेच्या स्वरात शमा म्हणाली.

आनंदने अत्यंत स्थिर नजरेने तिच्याकडे पाहिले. मग तो शांतपणे बसून राहिला.

“शमा, काय चाललंय तुझ्या मनात? आलीस आणि लगेच उलटतपासणी सुरू केलीस?”

“अरमान, तू एक प्रचंड प्रसिद्ध कलाकार आहेस. मी तुझी आर्थिक सल्लागार, वकिल, आणि प्रसिद्धी व्यवस्थापक आहे.”

“तू माझी या सर्व रोल्सच्या आधी सख्खी मैत्रीण आहेस.”

“एक्झॅक्टली अरमान! आणि म्हणूनच मला तुझी सतत चिंता वाटते.”

“चिंता? पण इथे चिंता करण्यासारखं काय आहे? या माझ्या मित्राने, माझ्या वडलांची अंतसमयापर्यंत काळजी घेतली. त्यांना कंधा दिला. त्यांच्या आठवणी जतन केल्या. त्यांना शेवटच्या काही दिवसांत प्रेम

मिळालं, आनंद मिळाला तो या आनंद मुळे. मी कोलमडून पडलो तेव्हा यानेच मला सावरलं. आपल्या मनात आणि घरात त्याने मला स्थान दिलं. घरच्या व्यक्तीप्रमाणे सगळे माझ्याबरोबर वागतात.”

“राईट! आणि त्या बदल्यात याला काय हवंय?” तीक्ष्ण नजरेनं आनंदकडे पाहत ती म्हणाली!

“शमा.... तुम ये क्या कह रही हो? होश में तो हो?”

“अरमान, क्या प्रूफ है,की तुम्हारे अब्बू जिंदा थे? तुम्हारे जैसे कलाकारोंके कई रिश्तेदार निकल आते है. यह नया नुस्का निकाला इन्होने, तुम्हारे अब्बूकोही जिंदा बताकर। मेरी, तुम्हारी अम्मीसे, बात हुई! ये नामुमकीन है!”

“वो झूट बोल रही है शमा!”

“ती तुझ्या अब्बूंची पत्नी आहे, होती. जागा हो! अरमान, मेरी बात को समझो. ही लोकं फसवताहेत तुला. तुझ्यासारख्या कलाकाराला फार जपून राहायला हवं. तुझी कला फार मोठी आहे. पण त्याहूनही मोठं आहे तुझं नाव.”

“शमा, बस करो! मला याविषयी काहीच बोलायचं नाही. चलो आनंद!”

“अरमान, रुक जाओ!”

"तुला मी माझ्या आयुष्यात सर्वात जवळचं स्थान दिलं, असं समजून की तुझ्याइतकं मला कोणीच समजू शकत नाही. पण तो भ्रम होता माझा."

शमा अवाक होऊन पाहत राहिली. "या मुलासाठी तू आपल्या नात्याला खोटं ठरवतो आहेस अरमान!"

"मी नाही, तू खरं समजून घेत नाहीयेस."

"काय घेऊ खरं समजून? तुम,"आनंदकडे वळून ती म्हणाली, "तुम बताओ, जेव्हा की यांचे अब्बू यांच्या लहानपणीच गेले, तर ते परत इथे कुठून येतील? तुम्ही सपशेल खोटं बोलता आहात. काय पुरावा आहे तुमच्याकडे?

आनंद विचारात पडला. 'तसं तर काहीच प्रूफ नाही आपल्याकडे. किंबहूना, पीरबाबा हे यांचे अब्बू असं हे म्हणाले, मला यांचे अब्बू माहीतही नाहीत. बस, ते चित्र, आणि मी काढलेलं पीरबाबांचं चित्र' यावरूनच अरमानजींची खात्री पटली. पण या बाईंची खात्री कशी पटवणार?'

"नाही ना काही आयडेंटिटी? मग का सांगितलंस खोटंच!" शमाचा स्वर तीव्र झाला.

"मी काहीही खोटं सांगितलेलं नाही." आंनदचा स्वर तिखट झाला.

मग आनंद तिला काय घडलं हे सांगू लागला. पण तिने हात उंचावून त्याला थांबवला. मग म्हणाली, "डोन्ट मेक स्टोरीज किड! अरमान, तुझी सर्वच चित्र साईटवर आहेत. एखादा बरा चित्रकार कॉपी बनवूच शकतो.

आणि तुला पाहून अब्बूंचं चित्र तर कोणीही काढू शकतो. काय डोकं चालवलंस पोरा! वा!''संताप तिच्या डोळ्यातून बरसत होता.

''शमा!''अरमान ताडकन उभा राहिला. ''बस! एक शब्द और नही! बस!''

अरमानचा चेहरा संतापाने लालबूंद झाला होता. शमाही दचकली त्याच्या आवाजातील बदलाने.

''कूल डाऊन अरमान! अच्छा, कोई बात नही. मान लेते है! तू जे समजतो आहेस ते सगळं खरं आहे. तू आलास, यांना भेटलास. आता तू माझ्याबरोबर परत चल. यांना योग्य तो मोबदला आपण देऊ.'' तिने एक ब्लॅंक चेक काढला, सही केली आणि आनंदाच्या समोर धरला.

''तुला हवी ती किम्मत टाक.''

आनंद आणि अरमान दोघंही अवाक होऊन काय बोलावं यावर ते न कळून काही क्षण तसेच उभे राहिले! मग मात्र आनंद झटक्यात जायला निघाला. अरमानने हाताला धरून त्याला थांबवले. त्याने तो चेक हिसकावून घेतला तिच्या हातून आणि टराटरा फाडून टाकला.

''शमा! तुम चली जाओ यहांसे! तुम बस पैसोंकी भाषा समझती हो ना? तो सुनो! मी आजपर्यंत कमावलेला पैसा, माझी पेंटींग्ज सर्व तुला दिली. बस! आता तुझ्यामाझ्यात बाकी काही नाही उरलं! चलो आनंद!''

तत्क्षणी शमाचा चेहरा दु:खाने, विदीर्ण झाला होता. पण अरमानला ते दिसणं शक्यच नव्हतं.

आनंद हबकून, स्वतःला आलेला राग विसरूनच गेला. ‘हे नक्की काय चाललंय?’ पण अरमानच्या संतापाचा उद्रेक असा होता की त्याला विचारही करायला वेळ मिळाला नाही. अरमान तरातरा निघाला होता आनंदाच्या हाताला धरून!

“अरमानजी, अहो... ऐका तरी!

“काय करू? बोली लगाऊँ तेरी दोस्ती की?तुला जर मला घरात नसेल ठेवून घ्यायचं तर तसं सांग.”

“अरमानजी!”

“तो फिर चलो यहांसे!” दोघं एकही शब्द न बोलता घरी आले. आनंद आतून खूप अस्वस्थ झाला होता. अरमानचं तर तडतडत होतं मन! रात्रभर तो तळमळत राहिला. ‘कशी समजूत पटवू शमाची?’ पहाटे त्याने फोन लावला. तो आऊट ऑफ रीच आला. कशीबशी सकाळ होण्याची वाट पाहिली त्याने.

सकाळीच बाहेर पडून लॉजवर पोहोचला. काऊंटरवरच्या माणसाने सांगितलं, “त्या पहाटेसच गेल्या.”

“कुठे?”

“ते नाही माहीत. पण दोन दिवसांचे पैसे भरले होते. मध्यरात्री म्हणाल्या मला अर्जंट गाडी हवीय पांचगणीला जायला. खूप घाबरल्या होत्या. फोन आला होता बहुतेक. ॲक्सीडेंट वगैरे काहीतरी बोलत होत्या.मग इथलाच एक गाडीवाला झाला तयार जायला. पहाटे निघाल्या.”

“पंचगनी? ॲक्सीडेंट? सॅम? या अल्लाह!”

२.२०

अरमान धावतच परत आला. त्याने कारचं कव्हर काढलं. आनंद त्याची वाटच पाहत होता. चहाही न घेता अरमान गेला होता. आनंदला वाटले शमाशी बोलायला गेला असणार. आता अरमान गाडी काढू लागल्यावर तो लगेच बाहेर आला. “अरमानजी! गाडी घेऊन कुठे निघालात?” अरमानने थोडक्यात त्याला मिळालेली माहिती सांगितली. “मला जायला हवं!”

“हो! एकटे नका जाऊ. मीही येतो. तुम्ही नाश्ता करा. मी आलोच.”

तो अनंताकडे गेला. सगळा प्रकार सांगितला. अनंताने त्याच्या पाचगणीच्या मित्राचा नंबर दिला. “मी फोन करून ठेवेन, काही लागलं तर सांग त्यांना. सावकाश जा. आईला सांगून जा.”

“हो बाबा.” त्याने वाकून नमस्कार केला.

मग आईकडे गेला. “अचानक जायला लागतय, बाबा सांगतील सगळं तुला” असं म्हणून नमस्कारासाठी वाकला. तिचे डोळे भरून आले. पण स्वतः:ला सावरत तिने डोक्यावर हात ठेवला. त्याने तिच्याकडे पाहिले. तिला एक घट्ट मिठी मारावी लहानपणीसारखी अशी अतोनात इच्छा झाली त्याला. कालपासूनचा सगळा भावनिक कोलाहल दाटून आला मनात.

काल शमाने सरळ सरळ खोटेपणाचा आरोप केल्यावर आनंदाला काळाची चक्रे मागे फिरल्यासारखी वाटली. परत एकदा तसाच खोटा आळ.

पण करणाऱ्याला पक्की खात्री वाटत असणारा. दगडासारख्या घट्ट काळजाच्या आनंदालाही ते पचवणं अवघडच होतं. कालपासून भिडू न दिलेल्या भावनेने एकदम घेरलं त्याला.

'आई तूच एक होतीस नेहमी, जिने कधीच चुकीची समजूत नाही करून घेतली माझ्याविषयी. कधीच कोणतीच शंका नाही घेतलीस. पण मी स्वावलंबी होण्याच्या बालिश आवेशात तुझ्यापासून स्वतः:ला तोडलं.'

आत्ता हे सगळं बोलायचं होतं त्याला तिच्याशी. पण वेळ नव्हता. तो मग पटकन बाहेर पडला. अनुराधेला वाटलं आपलं जवळ घेणं आवडत नाही. म्हणून टाळतो आनंदा.

तिच्या मनात कालवाकालव झाली. 'बहुतेक आईने शंका घेतली, तेव्हा माझंही त्याच्याबद्दल असंच मत आहे असा वाटलं असावं त्याला. आपणही कधी स्पष्ट बोललो नाही त्याच्याशी. लहान वयात इतकं काय काय घडलं या पोराच्या आयुष्यात. चुकतंच गेलं का सगळं? बोलावं का त्याच्याशी? पण घाईत निघालाय कुठेतरी. ही वेळ नव्हे हे सगळं बोलण्याची. परत कधी येईल कोण जाणे.' तिचे डोळे भरून यायला लागले परत. 'अलीकडे असंच होतं. एकदा का डोळे पाझरायला लागले की थांबायचं नावंच नाहीत घेत.'

---

अरमान आणि आनंद पोहोचले तेव्हा शमा हॉस्पिटलमधे आय. सी. यू.च्या बाहेर बसली होती. अरमानला पाहताच ती धावत त्याच्याजवळ आली. “क्या हुआ? हाऊ इज सॅम?”

“डॉक्टर्स सेड, ‘ही इज डूईंग ओके’, बट, नेक्स्ट ४८ अवर्स आर क्रुशियल.”

“ही विल बी फाईन! मला माफ कर. काल मी फार हार्शली बोललो तुझ्याशी. पण मी आलोय आता. मी आहे.”

मग तिला आनंद दिसला फोनवर बोलताना. त्याही परिस्थितीत पारा चढला तिचा. ती काही बोलणार तेवढ्यात डॉक्टर्स आले आणि ती त्यांच्याशी बोलू लागली. तिच्या मते हा माणूस संपूर्ण फ्रॉड होता.

“पण ॲक्सीडेंट झाला कसा?” अरमानने विचारलं. तिला कळलं ते असं होतं. शमाला भेटून सॅम होस्टेलवर परतला. जवळच्या सर्व मित्रांना त्याने बर्थ डे पार्टीबद्दल सांगितलं. मग प्लॅन ठरला. “आपणच सेफ्टी चेक करून घेऊ. ममा विल बी प्राऊड ऑफ मी. आय ॲम अ बिग बॉय नाऊ!” एका मैत्रीणीने फोन लावला. ‘शमा’ म्हणून बोलू लागली. परवाच्या मिटींगचे सगळे रेफरन्स दिले. “मी सेफ्टी एजन्सी चेक केली. सगळं व्यवस्थित वाटतंय. माझा मुलगा आणि दोन मित्र येतील. कोणते ॲडव्हेन्चर्स प्लॅन करायचे ते ठरवायला. हेल्प देम पिक गूड वन्स. मग पुढचं ठरवू. बर्थडेची तारीख वगैरेही लिहून घ्या” म्हणाली. “ॲडव्हान्स दोन तीन हजार

मुलगा भरेल. बाकी मी ट्रान्सफर करेन.” मग संडेला मुलं गेली तिघं.तिघांनी काही गेम्स ट्राय करायची इच्छा व्यक्त केली.

एका गेमचा इनस्ट्रक्टर नव्हता आला. पण मुलांनी सांगितलं, हेच ट्राय करायचंय. बाकीच्यांनी आयत्या वेळी घाबरून नाही म्हटलं ट्राय करायला. सॅम एकटाच गेला वर. त्याचा हात निसटला. नवखा असिस्टंट हॅंडल करू शकला नाही. डोक्याला मार लागला.

“क्यूँ मैने सजेस्ट किया? मेरी गलती है सब!”

“सगळं ठीक होईल. तू स्वत:ला दोष देऊ नकोस.” अरमानने समजावले. आनंद कॉफी, सॅंडविचेस घेऊन आला. शमाने पाहिलंही नाही त्याकडे. तिच्या नजरेतील संताप त्याला दिसत होता. अरमानच्याही तो लक्षात आला होता. अरमानने आग्रहाने खायला लावले तिला. तू थोडी विश्रांती घे, आम्ही आहोत सॅम जवळ. अरमान काळजीने म्हणाला.

“मी इथेच बसणार.” ती हट्टाने म्हणाली. अरमान यावर काही म्हणाला नाही. बसल्या जागी मात्र तिचा कधी डोळा लागला तिला कळलंच नाही. दचकून जागी झाली तर कोणीच नव्हतं आसपास. ती पटकन उठून आयसीयू मध्ये डोकावली. अरमानला आत पाहून थोडी शांतावली.

“सॅमला मधेच जाग आली होती. पण परत त्याला ग्लानी आली आहे. डॉक्टर म्हणाले, जागा होतोय ही चांगली खूण आहे. तुला उठवणार होतो, पण डॉक्टर म्हणाले ‘आधी तुम्ही आत जा.’ आता चांगला जागा होईल

लवकर म्हणाले. तू इथेच थांब. ओळखेल तो तुला.” शमाचा एवढा वेळ धरून ठेवलेला बांध फुटला. ती अरमानला बिलगून ओक्सबोक्शी रडू लागली. त्याने तिला थोपटले. “ही विल बी फाईन. तो म्हणाला. रडू नकोस. सॅम जागा झाला आणि तुला असं रडताना पाहिलं तर?” मग मात्र तिने स्वतःला सावरलं. त्याने सॅमचा हात सावकाश तिच्या हाती दिला. तेवढ्यात परत आलेला आंनद दारातून हे पाहत होता. शमाची तळमळ, काळजी सगळं त्याला कळत होतं.

‘आई! तिची काय अवस्था झाली असेल? जेव्हा आपण नाहीसे झालो असं कळलं असेल तिला. कसे काढले असतील तिने दिवस? जीव गोळा झाला असेल डोळयात. हिच्यासारखाच! मी परत आलो, पण तिच्यासाठी परतलो नाहीच पूर्णपणे. ती इतके दिवस अशीच तळमळली असेल.’

मग त्याने अनंताला फोन लावला. तिथली परिस्थिती सांगितली. मग म्हणाला “आई कुठय?”

“आहे घरीच.”

“मी निघेन आज रात्री किंवा उद्या सकाळी.”

“हो चालेल. कळव तसं.”

“आईलाही सांगा सगळं.”

“बरं. सांगतो.”

फोन बंद केला, तर परत वाजला.

“हाय अमित्रा!”

“कृपा, मराठीत असा शब्द नाही. बरं बोल!”

तुझ्याशी कट्टी केलीय हे सांगायला फोन केला.”

“बरं!”

“अरे, बरं काय? मला अजिबात आवडत नाहीस तू!”

“बरं!”

“परत ‘बरं’ म्हणालास तर फोन फेकून मारेन.”

आनंदनं नकळत आजूबाजूला पाहिलं.

खो खो हसत सुटली ती. “शोधलस ना मला.”

“हं!” हसला मग तो ही. “भुतांचा काय भरोसा! कुठेही पोहोचतील.”

“भूत म्हणतोयस मला सरळ सरळ. आता बघ. आले तरी भेटणार नाही तुला.”

“बरं, पण आज आता का फोन केलास ते तरी सांग! परत म्हणशील तुझ्यामुळे महत्वाचं बोलायचं विसरले.”

“ओह! येस! बघ, विसरणारच होते. अरे, तू मुंबईत आहेस का?”

“नाही. का गं?”

“माझ्या काही सर्टीफिकेटसच्या कॉपीज हव्या होत्या.”

“मी पुढच्या आठवड्यात जाईन.”

"बरं, बघते. नाहीच कोणी सापडलं तर सांगते तुला. इथे एक छान कोर्स सापडलाय. तो करायचा विचार आहे. दोन वर्षांचा आहे."

"ओह! ग्रेट! चला बरं झालं."

"काय?"

"दोन वर्ष माझी सुटका! "

"मी बंद करतेय फोन. आता नाहीच भेटणार तुला कधी. फोनही नाही करणार."

"छे! असं कसं!"

"असंच! बघच तू. दुष्ट कुठला"

तिने खरंच फोन बंद केला.

आनंद हसला एकटाच मग.

परत दोन मिनिटात फोनवर मेसेज.

"तूच आहेस दुष्ट भूत" असा.

---

कृपाबरोबरच त्याला प्रज्ञा आठवली. मुंबईत असताना नकळत खूप विचारात असायची आपल्या. पण रामनगरला आल्यापासून आत्ताच आठवली. ते आकर्षणही नाहीच वाटत आहे आत्ता. उर्मीही आठवली पाठोपाठ. तिचाही विचार नाहीच आला मनात एवढ्या दिवसांत. कमाल

आहे. हसू आलं त्याला स्वत:चच. कृपा म्हणते तेच खरं. तुला आवडेल असं कोणी अवतरलय की नाही देव जाणे.

---

त्या संध्याकाळीच सॅम पूर्ण शुद्धीवर आला. डॉक्टर म्हणाले आता काळजीचं कारण नाही. बाकी तब्येतही ठीक आहे त्याची. मग आनंद निघाला परत. अरमानला म्हणाला “काहीही लागलं तर फोन करा.” बाबांचे मित्र भेटलेच नव्हते अजून. मग तो त्यांना भेटायला घरीच गेला. बाबानी ‘आवर्जून भेटून ये’ अस सांगितलं होतं. गडबडीत जमेल तसा काही कोकण मेवाही दिला होता. जाम खुश झाले ते आनंदाला पाहून. “कलाकार रे बाप तुझा. शहरात असता तर नाव काढलं असतं त्याने. मला नेहमी हळहळ वाटते. काय सुरेल वाजवायचा बासरी. पण मग मी बाहेर पडलो आणि नाहीच जमलं कधी परत भेटायलाही. अलीकडे बरेच दिवसात फोनही नव्हता झाला आमचा. काल फोन आला आणि प्रचंड आनंद झाला. त्याला बोलावलंय म्हणून सांग.”

“हो काका. तुम्ही पण या ना सगळे. शेतावर मजा येईल तुम्हाला खूप.”

“येऊ रे नक्की. तू काय करतोस?”

“मी कलामहाविद्यालयात शिकतोय. आणि घरगुती व्यवसाय आहेच तो ही आम्ही सगळे मिळून पहातो.”

“अरे वा. अनंताचा मुलगा तू, कला असायचीच तुझ्या रक्तात. हे बघ, माझा एक मित्र आहे सावजी म्हणून मुंबईत. आर्ट गॅलरी आहे त्याची. त्याचा पत्ता देतो, भेट त्याला. दर्जेदार काही करत असशील तर

नक्की मदत करेल तो.

“सावजींना ओळखतो मी. त्यांनी मध्यंतरी माझ्या चित्रांचं प्रदर्शन भरवलं. खूप मोठी व्यक्ती, पण नवोदितांना संधी देतात.

“काय सांगतोस काय? सावजीने तुझ्या चित्रांचं प्रदर्शन भरवलं याचा अर्थ तू खूप चांगला चित्रकार आहेस. सावजी आर्थिक मदत करेल एक वेळ, काम चांगलं असल्याशिवाय केवळ प्रोत्साहन म्हणून प्रदर्शनात नाही संधी देणार.

---

"आय ॲम सॉरी अम्मी!" सॅमचा आवाज खूप खोलातून येत होता.

"बस,आता काही बोलू नकोस." शमाच्या डोळयातून अश्रू वाहत होते. "माझंच चुकलं. पण जाऊ दे ते सगळं. तू ठीक आहेस तर बाकीचं काही महत्वाचं नाही आता."

तेवढ्यात अरमान आत आला. शमाने त्याच्याकडे पाहिलं. त्याने डोळयानेच खूण केली. "शांत राहा."

सॅमने त्याच्याकडे पाहिलं. त्याला परत झोप येऊ लागली होती. हळू हळू तो झोपेच्या अधीन झाला.

नर्सने येऊन त्याचे सलाईन अड्जस्ट केले. त्यात इंजेक्शन्स सोडली.

शमा व अरमान बाहेर आले.

“चल खाऊन घे काहीतरी.”

“हं! तो मुलगा कुठाय?”

“गेला तो परत रामनगरला.”

“तुला एकटा सोडून माझ्यासोबत?”

तिच्या आवाजातला उपरोध आरामानाला चांगलाच झोम्बला.

“शमा, तू फार मोठ्या दिव्यातून पार पडली आहेस आत्ताच. पण त्या मुलाला विनाकारण दोष द्यायची गरज नाही.

तो, तुझी करत असलेली फसवणूक मी नजरेआड करावी, अशी तुझी अपेक्षा असेल तर ते शक्य नाही. तू क्लायंट आहेस माझा. मित्रही, आणि त्याहून बराच काही आहेस. आणि तो तुझी फसवणूक करतोय हे शंभर टक्के सत्य आहे.”

“हे कशावरून ठरवलस तू शमा? त्याला पुरावा मागत होतीस परवा? तुझ्याकडे काय पुरावा आहे?”

“अरमान तुझ्या अम्मीशी बोलले मी.”

“अम्मी खोटं बोलतेय शमा!”

“तुझ्यावर काय जादू केलीय त्या मुलाने? तुला तुझी अम्मीच खोटी वाटतेय तर, माझी काय गत?”

अरमान फार विषादाने हसला मग. "हेच तर दुर्दैव आहे शमा, की माझी सगी अम्मीच माझ्याबरोबर खोटं बोलली, आणि साधं खोटं नाही, मला जन्मातून उठवू शकेल असं खोटं."

“तू काय बोलतो आहेस हे?”

“हं! विश्वास न बसण्यासारखंच आहे हे. पण हेच खरं आहे. मग त्याने सुरवातीपासून, अगदी लहानपणापासून सर्व घटना, त्यानंतर अब्बूची झालेली मानसिक होरपळ, हॉस्पिटलमध्ये भरती होणं, त्याचं होस्टेलवर जाणं, अम्मीने अब्बू गेल्याचं सांगणं, परदेशी स्थलांतर, आणि आनंदाला भेटल्यावर एक एक गोष्टी समोर येणं, अम्मीने फोनवर तशी कबुली देणं, सगळंच.

शमा अवाक होऊन ऐकत राहिली. अरमान पुढे म्हणाला, “आनंदने एकदाही मला पीरबाबा हेच तुमचे अब्बू वगैरे अस काही सांगितलं नाही. कसा सांगेल? त्याला तर काही माहीतही नव्हतं त्याच्या पीरबाबाच्या भूतकाळाबद्दल. मीच गेलो त्याचा शोध घेत त्याच्या घरी. एकदा तर कुलूप तोडून त्याची सर्व चित्र तपासली. तपासायची म्हणून नाही. वेडाच झालो होतो मी अब्बूचं चित्र त्याच्याकडे पाहून. आणि जेव्हा पीरबाबाचं म्हणजेच अब्बूचे त्याने काढलेले चित्र पाहिले तेव्हा शंकेला जागाच उरली नाही. जेव्हा मला कशानेच शांतता मिळत नाही असे दिसले तेव्हा त्याने पीरबाबांच्या कबरीचा विषय काढला. रामनगरमधे मी त्या दुकानदारालाही भेटलो. मशिदीतही पीरबाबाना ओळखणारे काहीजण भेटले. मी त्यांचे

राहण्याचे मचाण पाहिले. मलाही क्षणभर तेव्हा या दोन निरनिराळया व्यक्ती असाव्यात असेच वाटले इतकी तफावत होती अब्बू आणि पीरबाबांच्या राहणीमानात. पण मग ते आनंदाच्या हाताला धरून चित्र काढणं, आनंदाच्या हातात दिसलेली तीच कला, माझे अब्बूचं होते ग ते. माझे अब्बूच होते.”

कितीतरी वेळ मग शमा सुन्न होऊन बसून राहिली. ‘एक आई स्वतः:च्या मुलाशी एवढं खोटं बोलू शकते?’ मागच्या वेळेस जेव्हा अरमानने फोनवर रडत रडत नशेत असताना हे सगळं सांगितलं तेव्हा तिला फार वाईट वाटलं होतं. पण यात काहीतरी गडबड आहे असाच विचार तिच्या मनी आला. अम्मीशी बोलल्यावर तर तिची खात्रीच पटली. शिवाय अरमान सतत ‘या मुलासाठी तुला काहीतरी करायचंय’ असं म्हणायचा तेव्हा हा मुलगाच त्याचा पिच्छा पुरवतोय आणि त्याला इमोशनल ब्लॅकमेल करतोय असाच समज तिने करून घेतला होता.

रामनगरमध्ये मिळालेल्या त्या दोन कॉंटॅक्ट्सना भेटण्याआधीच आनंद भेटला आणि कधी नव्हे तो शमाचा तोल सुटला. अरमान केवळ एक क्लायंट असता तर कदाचित असं झालं नसतं. आनंद अरमानला एकटा सोडत नसून असं तो मुद्दामच करत असला पाहिजे असाही समज तिने करून घेतला. त्या संतापाच्या भरात तिने त्याच्यावर सरळ सरळ आरोप केले. शमाला काहीच सुचेना. फार अस्वस्थ झाली ती.मॅडम डॉक्टर बोलावत आहेत, नर्स सांगत आली आणि शमाची तंद्री भंग पावली.

## २.२१

आनंदा बसमधे बसला. अचानक त्याला घरी पोहोचण्याची घाई झाली. कधी एकदा आईला भेटतो असे होऊन गेले त्याला. कधी नव्हे ते डोळे भरून यायला लागले. त्याने वाहणाऱ्या डोळ्यांना पाझरू दिले मनभर. सगळ्याचाच निचरा होणं आवश्यक होतं. एका जखमेचा व्रण दुसऱ्या जखमेने फोडला होता. साचून राहिलेल्या, बंद कवाडांमागे घुसमटत पडलेल्या भावना उसळून वर येऊ लागल्या. आईचे मूक प्रयत्न, याचा नेहमीच उदासीन प्रतिसाद, तिच्यापासून मनाने जाणीवपूर्वक दूर जाणं.. सगळंच त्याला आठवून छळू लागलं. तो आठ दहा तासांचा प्रवास संपता संपे ना.

---

शमा आणि अरमान सॅमच्या खोलीत गेले तेव्हा सॅमचा डॅड शफिक, त्याच्याजवळ उभा होता. शमाला पाहिल्यावर त्याच्या डोळयात प्रचंड संताप तरळून गेला. पाठोपाठ अरमानकडे नजर गेल्यावर त्या संतापाची जागा तिरस्काराने घेतली. पण सॅम जागा होत होता. आणलेली फळे वगैरे त्यांनी टेबलवर ठेवली. ”समशेर, जैसेही डिस्चार्ज मिलता है, हम घर जायेंगे. बाकी पढाई घरसेही होगी.” सॅमला काही कळण्याच्या स्थितीत तो नव्हता. औषधांचा अंमल जबरदस्त होता. शमा त्याच्याजवळ गेली. सॅमचा हात तिने हातात घेतला व शफिकला म्हणाली “अभी सॅमको रेस्ट करने दो. बाकी बातें बादमें करेंगे.”

नर्सने मग डॉक्टर येत असल्याचं सांगून सर्वांना बाहेर जायला सांगितले. शफिक आणि शमा बाहेर आले, अरमान आधीच बाहेर आला होता. “हे घडलंच कसं?” संतापाने उसळत शफिक म्हणाला. शमाने थोडक्यात सांगितलं. वाक्यावाक्यागणिक शफिकचा संताप वाढत गेला. “अपने बच्चेको तो बक्ष दो! कैसी मा हो?” तिरस्काराने शफिक बोलत होता. शमाने पंजा वर केला. “अभी नही.”

तेवढ्यात डॉक्टरांची टीम बाहेर आली. मुख्य डॉक्टरांनी यांना सॅमची प्रगती सांगून, सगळं ठीक आहे वगैरे सांगितलं. “घरी कधी नेता येईल?”शफिकने विचारलं. डॉक्टर म्हणाले, “किमान पुढचे चार दिवस ऑबझर्वेशनखाली ठेवावं लागेल. डोक्याला बराच मार लागलाय.” “मला थांबता नाही येणार. मी घेऊन जाऊ शकणार नाही का? हेलीकॉप्टर वगैरे मागवून?” शमा आश्चर्याने पाहतच राहिली. “नाही!” डॉक्टर ठामपणे म्हणाले. “कंडिशन पाहता तशी परवानगी नाही देता येणार.” मग ती सगळी टीम निघाली तिथून, शमा, शफिक आणि जरा दूर उभा अरमान, तिघेच उरले. विचित्र शांतता पसरली.

“दूर रहा माझ्या पोरापासून! शेवटची वॉर्नींग देतो. नाहीतर महिन्यातून एकदा भेटता येतं ते ही रद्द करवून घेईन कोर्टाकडून. आता हे कारणही आहे.”

शफिकने मग एक जळजळीत कटाक्ष अरमानकडे टाकला आणि तो तिथून बाहेर पडला.

अरमान शमाच्या जवळ आला, त्याने तिच्या खांद्यावर थोपटले. “इस बार सॅम मेरे साथही जायेगा!” ती हट्टाने म्हणाली.

अरमान स्थीरपणे शमाकडे पाहत होता. त्याला त्याचं बालपण आठवलं. दोन प्रौढांच्या वादात हरवून गेलेलं. “सॅमला बरं वाटू दे. मग त्याला निर्णय घेऊ दे.”तो शांतपणे म्हणाला.

---

“आई गं!”

“अनुराधा, काय झालं?”

“अहो, माझं पोट दुखतय! भयंकर दुखतय.”

“काही खाण्यात...”

“नाही हो, हे वेगळंच दुखणं आहे. मला, आई गं, मला इस्पितळात न्या.”

अनंता एव्हाना टक्क जागा झाला होता.

तो तटकन उठला. त्याने चंदूला फोन लावला. अर्ध्या तासाच्या आत अनुराधा हॉस्पिटल बेडवर होती, आणि डॉक्टरही पोहोचले होते.

तपासण्या सुरू झाल्या. चंदूने आनंदला फोन लावला पण तो आऊट ऑफ रीच आला.

अनंता अस्वस्थ फेऱ्या घालत होता. मधेच खुर्चीवर बसत होता. चंदूने त्याच्याकडे पाहिले. काकाचं वय त्याला आज अचानक वाढल्यासारखं वाटलं.

———

आनंदा रामनगरी पोहोचला तेव्हा पहाट होत होती. घरी पोहचू तेव्हा फक्त आईच उठलेली असेल. आपल्याला पाहून आनंद आणि आश्चर्य दोन्ही सरळ उमटेल चेहऱ्यावर. तिच्या हातचा गरमागरम चहा पीत मनमोकळ्या गप्पा मारू. सगळं सगळं मन मोकळं करू. लहानपणी करायचो तसं. आनंदा आपल्याच विचारात मग्न घरी पोहोचला. घरात सगळे दिवे जळत होते. आश्चर्यच वाटलं त्याला. हा आत आला. आजी पटकन पुढे आली. आण्णा आणि आजोबा चिंताग्रस्त बसलेले दिसले.

"काय झालं? तुम्ही सगळे असे इथे एवढ्या पहाटे? आई कुठय?"त्याने जरा धास्तावून विचारलं. आजीने पटकन डोळ्याला पदर लावला. "राधेला हास्पिटलात नेलय रे. काल रात्री अचानक भयंकर पोटात दुखायला लागलं तिच्या.

"काय? मला का नाही कळवलं? मी जातो लगेच."

"अरे प्रवासातून आलास, अगं चहा तरी दे त्याला,"आजोबा म्हणाले.

“नाही नको नको.” आल्या पावली तो परत फिरला. जवळ जवळ धावतच हॉस्पिटलमधे पोहोचला. मन थाऱ्यावर नव्हतं. केवळ सवयीने पायांनी रस्ता बरोबर धरला एवढंच!

कसाबसा रिसेप्शनमधे विचारून रिकव्हरी रूमजवळ आला. बाहेरून काचेतूनच ती बेडवर निपचीत पडलेली दिसत होती. सगळीकडे नळया. त्याला भडभडून आलं. असं आईला असहाय्य झोपलेलं तो पहिल्यांदाच पाहत होता. त्याला तत्क्षणी तिच्याजवळ जायचं होतं. तिच्याशी बोलायचं होतं. तिच्या कुशीत शिरायचं होतं. गमावलेली सगळी वर्ष भरून काढायची होती. आणि आज ती मात्र अशी रुसून दार बंद करून विकलांग पडली होती. तो त्याच्याही नकळत हमसून हमसून रडू लागला. पाठीवर कोणी हात ठेवलेलाही कळला नाही त्याला. अनंता जो या नात्याचा सुरवातीपासूनचा साक्षीदार होता, आज ते नातं परत जुळताना पाहत होता.

“काळजी करू नकोस. बरी आहे आता ती. अपेंडीक्सचं ऑपरेशन करावं लागलं काल रात्री. वेळेत केलं म्हणून जीव वाचला म्हणाले डॉक्टर. आधी त्रास होत असावा. बोलली नाही कधीच.”अनंताचा स्वरही कातर झाला.

चंदू चहा घेऊन आला तेवढ्यात. आनंदला न बोलता समजून घेता यायचं त्याला. आताही तसंच झालं. नुसती नजरानजर. त्याने त्याचा चहाचा कप आनंदला दिला. मी आणतो नंतर माझ्यासाठी. त्याने खांद्यावर हात ठेवला आनंदच्या. “होणार बरी काकू लवकरच. काळजी करू नकोस.”

“काळजी करू नकोस” सगळे सांगताहेत. ‘आपण करतोय का काळजी? पश्चात्ताप जास्त आहे मनात कदाचित, सोबत काळजीही, कशाची? आईला काही होईल याची? की मला आई उरणार नाही या भीतीची काळजी वाटतेय मला? ती कायम असणारच असंच धरून चाललो मी. मग म्हणून इतकं दुर्लक्ष केलं का तिच्याकडे? तिच्यासमोर खरा ‘आनंद’ उघडा पडेल या भीतीने बंद करून ठेवली सगळी मनाची कवाडं तिच्यापासून! स्वार्थ झाला ना हा? सगळा माझा विचार. तिचा काहीच विचार नाही. तिने कधीच त्रागा केला नाही या गोष्टीचा. फार जवळ यायलाही घाबरली बहुतेक. परत नाहीसा होईन ही भीती कायम राहिली तिच्या मनात. तिच्यासारखं निर्व्याज प्रेम करण्याची आपली कुवत आहे? पीरबाबावर आपलं प्रेम होतं? ते गेले तेव्हा खूप रडलो आपण! पण ते रडणं दु:खाचं होतं की त्या सगळया ताणाचं? आपल्या मांडीवर प्राण सोडला त्यांनी. एकतर कोणाचा तरी जीव जाताना पाहण्याची ती पहिलीच वेळ. त्याकाळात बाबांना बरोबर समजली आपली मन:स्थिती! न बोलता सतत बरोबर राहिले. आईला यातलं किती माहीत आहे कोण जाणे. बाबांनी सांगितलं असेल का? आईबाबांच्या नात्याचं सुंदर चित्र आपल्यासमोर आहे, अगदी समजायला लागल्यापासून. आदर्श नातं आहे त्यांचं. म्हणूनच कोणतीच मुलगी फार काळ मनात राहत नाही बहुतेक आपल्या. आपण सगळयानाच या नात्याच्या मापात मोजू पाहतो का? विचार,.. कुठून कसे

कुठे पोहोचतील सांगता नाही यायचं. पण सगळ्या विचारांच्या मुळाशी ‘मी’ आहे.’

आनंद एकदम दचकला. आपल्याच विचारांनी घाबरवलं क्षणभर त्याला. ‘इतका स्वकेंद्रित आहे मी? सगळेच असतात का?’ पंचविशीतला तो तरूण अचानक नव्याने विचार करू लागला.

________

२.२२

मग आनंद पुढचे सगळे दिवस सतत हॉस्पिटलमधेच असायचा. फक्त आंघोळीपुरता जायचा घरी. अनुराधा शुद्धीवर आल्यावर जेव्हा बेडजवळ गेला तेव्हा परत परत डोळे भरून येऊ लागले त्याचे. पण त्यांने अश्रू लपवले नाहीत. तिचा हात हातात घेऊन तिच्या कपाळावर हात ठेवून उभा राहिला.

अनुराधेला हा सूक्ष्म बदल त्याही अवस्थेत जाणवला. ती क्षीण हसली. त्याच्याकडे पाहत हळू नजर अनंताकडे वळली तिची. त्याला समजलं तिला काय म्हणायचय ते. त्याने हलकेच होय अशी मान हलवली. मग तिने समाधानाने डोळे मिटून घेतले. हे स्वप्न असेल तर मला असंच राहू दे, असंच वाटलं असावं तिला. चार दिवसांनी डिश्चार्ज मिळाला. सगळे घरी परतले.

---

सॅमची तब्येत सुधारत होती. शमाने भराभर सूत्र हलवून सॅमचा ताबा मिळवण्यासाठी हालचाल सुरू केली. अरमान तिला काही काळ वाट पाहण्यासाठी सुचवत होता, पण एकदा का सॅमला शफिक घरी घेऊन गेला की तिकडे परत त्याचा ब्रेनवॉश होणार असं सतत तिला वाटत होतं. त्यात कदाचित काही तथ्यही होतं, कारण यापूर्वी तसं झालं होतं. पण तरीही अरमानला वाटत होतं की सॅमला निर्णय घेऊ द्यावा. कारण पुढे जाऊन जेव्हा तो या सर्व गोष्टींचा विचार करेल तेव्हा त्याला दोन इगोंच्यामधे आपलं खेळणं झालं असं वाटेल. शमाविषयी कायमची अढी बसेल. पण शमा

सध्या ऐकण्याच्या मन:स्थितीत नाही हे त्याला स्पष्ट दिसत होतं. मग त्याने काही दिवस तरी गप्पच राहायचं ठरवलं.

“अरमान, प्लीज सॅमजवळ बसशील? मी लॉयर्सबरोबरची ऑनलाईन मीटींग अटेंड करून लगेच येते.”त्याने काहीच न बोलता नुसती मान हलवली. “गूड! थॅंक्स!”ती भराभर लिफ्टकडे वळली. तो रूममधे आला तेव्हा सॅमला जरा उठून बसवलं होतं. स्पंजींग झालं होतं. तोंडावाटे अन्नंही देऊ लागल्याने सॅम बराचसा नॉर्मल दिसत होता.

अरमान आत आल्यावर त्याने नजर उचलून त्याच्याकडे पाहिले. त्याची नजर त्याला पार करून दरवाजावर स्थिरावली. तिथे शमा न दिसल्याने तीच नजर प्रश्नचिन्हासह अरमानवर स्थिरावली.

अरमानने किंचित घसा खाकरला. “मॉम डॉक्टर्स ना भेटून येतेय.”

सॅमचे काहीसे समाधान झाल्यासारखे वाटले. “आर यू गोईंग टू मॅरी माय मॉम?”अरमानला हा प्रश्न इतका अनपेक्षीत होता की तो काही क्षण अवाक होऊन पाहतच राहिला. मग जे पहिलं मनात आलं ते बोलून गेला. “आय डोन्ट नो!” सॅम त्याच्याकडे पाहतोय याची जाणीव होऊन आणि आपण हे फार वाईट पद्धतीने हाताळतोय याचीही जाणीव होऊन तो काहीसा भांबावला. पण मग मात्र त्याने शांतपणे बोलायला सुरवात केली.

“सॅम, मी आणि तुझी मॉम एका बिझीनेस मॅटरमधे भेटलो. तुझी मॉम ही एक उत्तम आर्थिक सल्लागार आणि एक्स्पर्ट आहे हे तुला माहित आहेच.

तिची काम करण्याची पद्धत, आवाका, ऑनेस्टी हे सर्व अनुभवल्यावर मी माझे सगळे व्यवहार तिला सांभाळायला दिले आणि मी माझी पेंटींग्ज निश्चिंतपणे करायला मोकळा झालो. मग कामानिमित्त भेटत असतानाच आम्ही एकमेकांचे उत्तम मित्र बनलो. सच्ची मैत्री झाली आमच्यात. आणि आम्हा दोघांसाठीही ही मैत्री सर्वात महत्वाची आहे. आम्ही एकमेकांवर प्रेम करतोच. पण दोन्हीमधे चूज करायची वेळ आली तर वी वूड चूज फ्रेंडशिप! वी बोथ आर वेरी क्लियर अबाऊट दॅट. तुझ्या मॉमला मी गेली अनेक वर्ष ओळखतो. तिने खूप कष्टाने हे यश, पोझीशन मिळवली आहे. ती स्वत:ची मालकिण आहे. माझ्यासारखे अनेक लोक तिच्यावर आर्थिक सल्ल्यासाठी अवलंबून आहेत, पण नो वन इज हर बॉस, अँड नो वन कूड बी. तिच्या प्रायॉरिटीज मधे सगळ्यात पहिली प्रायॉरिटी तू आहेस सॅम, हे मला खात्रीने माहित आहे. आणि म्हणूनच तिने ना लग्नाबद्दल कधी विचार केलाय ना आम्ही त्या विषयावर कधी बोललोय." सॅम अरमानकडे पाहत होता.

मॉम त्याच्याशी मैत्रीपूर्ण संवाद साधायची. त्याला ते आवडायचं. पण तरीही कुठेतरी ती हे ठरवून करतेय, असं त्याला वाटायचं.

आत्ता अरमान त्याच्याशी जे बोलत होता, ते मात्र तो अगदी बरोबरीच्या माणसाशी बोलावं तसं बोलत होता. किंबहुना तो स्वत:च्या मनाशीच याविषयी बोलत असावा आणि सॅमबरोबर शेअर करत असावा असं त्याला वाटलं. सॅमला ते कुठेतरी आवडून गेलं.

“अब्बू मला घरी घेऊन जाणार आहेत इथून. मॉम म्हणते ती मला तिच्याबरोबर नेणार आहे. तुला काय वाटतं मी कुठे जावं?”

अरमानने चकित होऊन सॅमकडे पाहिलं. तो हे असं आपल्याला विचारेल असं त्याला स्वप्नातही वाटलं नव्हतं. सॅम काहीसा आपला तिरस्कारच करत असणार असं त्याने गृहितच धरलं होतं.

त्याला अचानक आनंद आठवला. ‘आपण सैरभैर झालो तेव्हा तो तरूण मुलगा किती भांबावला असेल. पण त्याने उत्तम प्रकारे आपल्याला त्या अंधारातून अलगद बाहेर आणलं. आणि तरीही एकदाही त्याने आपल्याला हे कर किंवा करू नकोस असं सांगितलं नाही. ही जस्ट क्रिएटेड ऑप्शन्स फॉर मी टू चूज!’

मग तो सॅमकडे वळला. त्याला म्हणाला, “सॅम, प्रत्येक जण आपापल्या पद्धतीने निर्णय घेतो. कोणी केवळ बुद्धीला पटेल तेच बरोबर मानतो, तर कोणी हृदयाला. तुझी मॉम जनरली सर्व बाजू पेपरवर मांडून सही गलतचा हिशोब मांडून मग उत्तर काढते. मग ती त्या उत्तराला गटफीलिंगवर तोलते. आणि मग निर्णय घेते. मला वाटतं तू जेव्हा मला विचारलंस तेव्हाच तुझी पद्धत नक्की झाली. तुझी, तुझ्या मॉमची पद्धत! नाहीतर तू एका कोणत्यातरी निर्णयाप्रत पोहोचला असतास एव्हाना. सो, दोन्ही बाजूंनी विचार कर, दोन्हीमधे प्लस मायनस असणारच आहेत, त्यांचा विचार कर, आणि मग तुझ्या आतून त्यावर काय मत मिळतं ते पाहा. आपल्याला आतून मत मिळतंच नेहमी!”

"आय नो! आय नो! तुला माहिताय? मी त्या गेमच्या नवशिक्या इंस्ट्रक्टरबरोबर चालत निघालो, तेव्हा एक क्षण मी अचानक थांबलो. मला अगदी आतून परत फिरावसं वाटलं. पण मित्रांसमोर भित्रा ठरेन या भीतीने मी परत त्याच्याबरोबर चालू लागलो."

"हं! सो यू नो!"मग दोघेही एकमेकांकडे पाहून थोडं हसले.

"सॅम, डोक्याला फार ताण देऊ नकोस. रेस्ट वेल. काही खातोस का? की ज्यूस देऊ?"

"ज्यूस चालेल."

"अरमान!"

"येस?"

"हे आपलं बोलणं प्लीज ममाला सांगू नकोस."

"ओके! मी आपणहून काहीच नाही सांगणार."

अरमानने नर्सकडून ज्यूस मागवला. मग मनात म्हणाला,

'सॅम हा निर्णय घेणं सोपं नाहीय. तू तुझ्या डॅडचाही लाडका आहेस आणि मॉमचा तर श्वास आहेस. पण तू योग्य दिशेने विचार करतो आहेस.'

---

घरी आल्यावर सगळेच अनुराधेला फुलासारखी जपू लागले. काकू, पुष्पा, इथेच येऊन राहिल्या. आनंदाही सतत तिच्या उशापायथ्याशी असायचा. या काळात रोज तो तिच्या खोलीत झोपायचा. मग एके रात्री,

तिच्या जवळ बसून, तिच्या हातात हात देऊन, आपण होऊन विषय काढून, लहानपणी घडलेल्या गोष्टी, त्याचा आनंदाच्या मनावर झालेला परिणाम, शंकऱ्या रखमाबरोबर घालवलेले ते दिवस, नंतर बदलत गेलेली मानसिकता, पीरबाबा, त्याने दिलेली चित्रकला, अरमान, शमा, तिने घेतलेला आळ, सॅम, त्याचा ॲक्सीडेंट, शमाची तगमग पाहून झालेली अनुराधेची आठवण, सगळं धबधब्यासारखं कोसळून गेलं. किती वेळा अनुराधेच्या डोळयांना धारा लागल्या त्याला काही अंतच नव्हता. यातल्या काही घटना, प्रामुख्याने पीरबाबाबद्दल अनंताकडून तिला कळली होती. अनंताने या सर्व वर्षात दोघांनाही सांभाळण्यात किती महत्वाची भुमिका बजावली होती हे लक्षात येऊन अनुराधा गहिवरली. पण सगळं आकाश मोकळं झालं. स्वच्छ झालं. दोघांच्याही मनात उरला तो फक्त प्रेमाचा निर्झर!

पहाटे शांत मनाने दोघांनाही झोप लागली. सकाळी जेव्हा अनुराधाला जाग आली तेव्हा आनंदा खाली जमिनीवर गादी टाकून झोपलेला तिला दिसला. ती बराच वेळ आपल्या तरूण मुलाच्या चेहऱ्यावरचा झोपेत अजूनही दिसणारा लहान मुलाचा निरागस भाव न्याहाळत राहिली. तिचं बाळ तिला परत मिळाल्यासारखं काहीसं तिला वाटलं.

हळूहळू अनुराधा हिंडू फिरू लागली. सुकन्या आजीबरोबर येऊन तिला भेटून गेली. आनंदाने सुकन्याला विचारले, “मग काय झालं कोर्सचं? करायचा ठरला की नाही?”त्याच्या प्रश्नातला खरा प्रश्न उमजून ती जरा लाजली. मग “हो करणार” म्हणाली. “थांब जरा सुकन्या, पुष्पा, इकडे ये.

सुकन्या, तू कोर्सला जाशील तेव्हा कंपनीचा काय विचार केलाय? तुझी रिप्लेसमेंट तयार केल्याशिवाय जाता नाही यायचं तुला. पुष्पाला ओळखतेस ना? ती येईल रोज कंपनीत. अगदी ए टू झेड, सगळं शिकव तिला. आई येईलच अधून मधून. पण सतत लक्ष ठेवायला तुझ्यासारखं कोणी हवं. पुष्पा उत्तम करेल ते काम. तू मात्र बारीक सारीक गोष्टींपासून सगळं शिकव तिला."

"हो आनंदसर! कधीपासून येणार?"

"उद्यापासून!" पुष्पा उत्साहाने म्हणाली. दोघी एकमेकींकडे पाहून हसल्या.

सुकन्या गेल्यावर पुष्पाने आनंदाचा हात हातात घेतला आणि म्हणाली "थॅंक यू!!"नंतर रात्री जेवताना त्याने सर्वांना ही गोष्ट सांगितली. काकू जरा साशंक होती. म्हणाली, "आनंदा, अरे परक्याचं धन, लवकरात लवकर देऊन टाकावं रे!"

"काकू, करू गं पुष्पाचं लग्नं! असं काय वय उलटून चाललंय? पैसे मिळवण्याची क्षमता प्रत्येकात हवी काकू. गरज पडली तर संसाराला हातभार लावता आला पाहिजे. इथे जे शिकेल, त्याचा पुढे कुठेही फायदाच होईल पुष्पाला. सहा महिने द्या तिला."

"परवा आलेलं स्थळ फार चांगलं होतं रे!"

"होय का? काय गं पुष्पा? तुला पसंत होतं का?"

"स्थळ म्हणून चांगलं होतं. पण मला आत्ता लग्न नाही करायचं."

"ठीक आहे ना," चंदू म्हणाला. "आपण सांगू त्यांना तसं, की लग्न सहा महिन्यांनंतर करू. तसंही मी फोन करून राधाकाकूची तब्येत बरी नाही, तेव्हा जरा सवड द्या, मुलीशी बोलून कळवतो असं सांगितलंय. माणसं बरी दिसतात. त्यांनी अजिबात नाराजी दाखवली नाही. सगळं स्थीरस्थावर झाल्यावर कळवा म्हणाले. त्यांना पुष्पी फार आवडलीय."

"हं! लग्नानंतर कळेल म्हणावं!"

"आंद्या" पुष्पा ओरडली. आनंदा आणि चंदू हसू लागले जोरजोरात. मग सगळेच सामील झाले त्यात. मग आनंदाने चंदूच्याही लग्नाचा विषय काढून सुकन्याचं नाव सुचवलं. काकूशी आधी बोलला होताच. सगळ्यांनाच ती आवडणार यात काही शंका नव्हती.

---

सॅम जवळपास पूर्ण बरा झाला होता. आज डिश्चार्ज मिळाला होता. शफिकला कोर्टाची नोटीस पाठवली होती शमाने, कस्टडीसंबंधी. तो प्रचंड संतापूनच आला होता. पण शमा ठाम होती तिच्या निर्णयावर.

"तुम हार जाओगी!"

अगर तुम्हे लडनाही है, तो वही सही! मैं कस्टडी लेकर रहूँगी!"

"बेटे की कस्टडी बापकोही मिलती है!"

"देखते है!"

सॅम कधी खोलीत आला दोघांनाही कळलं नाही.

“आप दोनों क्युँ लड रहे हो?”

दोघेही चपापले. “कुछ नही बेटे!”

“मला तुम्हाला काही सांगायचंय. मला टेन्थपर्यंत सध्याच्याच स्कूलमधे राहायचंय. आय हॅव लर्न्ट माय लेसन. आता मी असलं काही करणार नाही. आय प्रॉमिस! पण आता माझी स्कूल बदलू नका.”

“समशेर, तुम घर चलोगे मेरे साथ!”

“नही अब्बू!”

त्याच्या स्वरातल्या ठामपणाने शफिक चमकला. “अपनी माँ की बातोंमें मत आना समशेर!”

“नाही अब्बू, आता जर तुम्ही कोणीही मला आपल्याबरोबर घेऊन गेलात तर मी कायम निर्णय घ्यायला घाबरेन. या ॲक्सीडेंटने मी चुकीचा निर्णय घेतला हे मला कळलंय. पण मी बरोबर निर्णय घेऊ शकतो हा माझा विश्वासच नाहीसा होईल जर मी आता तुमच्याबरोबर आलो तर. मग प्रत्येक वेळी हा ॲक्सीडेंट मला आठवून मी निर्णय घेऊच शकणार नाही. आता स्कूल बदलली तर सगळंच बदलेल. मला स्कोर नाही करता येणार. मला याच स्कूलमधून टेन्थ कंप्लीट करायचंय.”

शमा, सॅमकडे पाहत होती. मुलगा मोठा झाला ही जाणीव तिला झाली आणि त्याला एकटं सोडायची भीतीही वाटली.

“समशेर, जिद नही!” शफिक ओरडला.

“अब्बू, तुम्हाला जर मी दहावित चांगला स्कोअर करू नये असं वाटत असेल तर चला घेऊन मला घरी.” सॅम शांतपणे म्हणाला.

“कर दिया बरबाद मेरे बेटे का दीमाग?” तो शमावर ओरडला आणि तीरासारखा बाहेर पडला तिथून.

वकिलांनी त्या दोघांनाही सांगितलं होतं, कोर्टात गेलात तर कोर्ट मुलाला विचारेल.

"मॉम, मैं यहीं ठीक हूं. डोन्ट वरी!”

शमाचं अवसान गळालं. तिने त्याच्याबरोबरच्या आयुष्याची खूप स्वप्ने पाहिली होती. पण आता तोच येत नाही म्हटल्यावर लडणार कोणाशी अशी तिची अवस्था झाली. तिच्या डोळ्यात पाणी होतं, पण तिने ते बाहेर पडू दिलं नाही."ठीक है सॅम! संभालकर रहना होगा तुम्हे..”

तिने काही दिवस त्याच शहरात राहायचं ठरवलं हॉटेलमधे. सॅमला घेऊन ते निघाले. दोन दिवस हॉटेलवर राहून मग सॅम होस्टेलवर जाणार होता. अरमानचं आणि सॅमचं त्यानंतर बऱ्याचदा याविषयी बोलणं झालं होतं. पण निर्णय सर्वस्वी सॅमने घेतला होता. अरमान दुसरे दिवशी मुंबईला जायला निघाला.

---

"आई, मला मुंबईला जायला लागेल आता. परीक्षेचे फॉर्म भरायची शेवटची तारीख जवळ येतेय आणि कान्हासरीचीही कामं आहेत.”

"हो का? बरं. कधी निघायचा आहेस?”

"उद्याच निघतो. महिन्याने मारतो परत चक्कर. आता जरा फॅक्टरीत जाऊन येतो."

"चल मी ही येते. आजारपणापासून गेलेच नाही."

दोघे फॅक्टरीत पोहोचले तेव्हा लंच ब्रेक होता. अनुराधेला बायकांनी गराडाच घातला. कोणी म्हातारीशी बाई तिच्या गालांवरून बोटं मोडून म्हणाली, "दृष्ट लागली गं या माज्या बाईला. किती वाळलीस."सगळ्या तिची विचारपूस करू लागल्या. तुम्ही नव्हता तर करमत नव्हतं म्हणाल्या. आनंदा वर जाऊन पुष्पा, सुकन्या, चंदूशी बोलत बसला. मुंबईला न्यायची सॅम्पल्स, बिलांची यादी अशी तयारी सुरू झाली.

दोन अडीच तासांनी परत निघाले. वाटेत एका घराजवळ अनुराधा म्हणाली, "जरा चल माझ्यासोबत."

"कुठे गं?"

"अरे त्या भूमकर आजींना भेटून येऊ. बऱ्याच दिवसात हालहवाल कळला नाही त्यांचा."

"बर, चल."

दरवाजा उघडाच होता. दोघे तरी कडी वाजवून आत गेले. आजी आवाजाने बाहेर आल्या.

"अगोबाई, अनुराधा का? ये ये गं! मीच तुला भेटायला यावं म्हणत होते पण चालवत नाही आताशी. बरी आहेस का? बरं नव्हतं म्हणे तुला. हा आनंदा ना? केवढा मोठा झाला. मुंबईला असतो ना हा?"

सगळं आजीच बोलत होत्या. अनुराधेला भेटून त्यांना खूप आनंद झालेला दिसला. अनुराधा हसून हो हो करत राहिली. आजी म्हणाल्या "आनंदा, जरा मागच्या परड्यात जाऊन सईला बोलावून आण, सई, विजयची मुलगी. सुटीला आलीय. मला तिकडेच चल म्हणतात. पण मला नाही हो करमत तिकडे."

आनंदा मागील दाराने बाहेर आला. अख्खं अंगण फिरून आला पण कोणीच नव्हतं तिथे,

"आजी मागे कोणीच नाही."

"काय करावं बाई या मुलीला! कुठेतरी तंद्री लावून बसली असेल. एवढी शहरात वाढली पण रामनगरचं भलतंच वेड. मला म्हणते मी इथेच येऊन राहते तुझ्याकडे.बस गं, मी टाकते चहा."

"आजी, राहू दे आता. मलाही घाई आहे. येईन परत कधी चहा घ्यायला. सांभाळून राहा. सईला पाठवा कधी आमच्याकडे" अनुराधेने फॅक्टरीतून फराळाची काही पाकिटं घेतली होती, त्यातली दोन ठेवली.

"अगं, हे कशाला आणि?"

"अहो सईला खाऊ! " मग दोघे निघाले.

# आनंद

# भाग ३

३.१

विमानाने शेवटची गिरकी हवेत घेतली आणि धावपट्टीवर वैमानिकाने ते स्मूथली लँड केले. एअर होस्टेसने नेहमीच्या सूचना द्यायला सुरवात केली.

त्याने शेजारी बसलेल्या स्त्रीकडे पाहिलं. एवढा प्रवास करूनही ती ताजीतवानी दिसत होती. तो पाहतोय म्हटल्यावर ती त्याच्याकडे पाहून हसली. तो मात्र गूढ नजरेने पाहत राहिला. "काय?" तिने एक भुवई वर करत डोळयांनीच विचारले. "काही नाही" त्याने मानेनेच उत्तर दिले.

रुबाबदार, मानेपर्यंत रुळणाऱ्या, लांब, दाट, केसांचा पन्नाशीतला पुरुष आणि त्याच्याबरोबरची ती देखणी स्टॅयलिश स्त्री, विमानातील सर्वांचेच लक्ष वेधून घेत होते.

बाहेर गाडी थांबलेलीच होती. हे दोघे बसताच ती रामनगरकडे धावू लागली. हे त्याचं नेहमीचंच होतं. कुठूनही परत आलं की सरळ रामनगर गाठायचं, मग कितीही तासांचा प्रवास झालेला असो. काही तासांच्या

प्रवासानंतर गाडी थेट गेट मधून आत येऊन मुख्य दरवाजासमोर येऊन थांबली. दरवानाने आत इंटरकॉम वरून सांगितल्याबरोबर मुख्य दरवाजा उघडून चंद्रशेखर, सुकन्या, त्यांचा मुलगा इंद्र, आणि त्याची पत्नी सांची, बाहेर आले. सर्वांनीच आनंदाचे मन:पूर्वक अभिनंदन केले.

"आज तू भारताचे, रामनगराचे, आणि आपल्या घराण्याचे नाव उज्ज्वल केलेस आनंदा!" चंद्रशेखरचा गळा भरून आला. दोघांनी गळाभेट घेतली. ते दृश्य पाहून सर्वांच्याच नजरा पाणावल्या.

आनंदाचा हात धरून हा त्याचा मोठा भाऊ, लंगोटीयार, त्याचा सर्व सुखदुःखातील साथी आणि साक्षीदार, त्याला आत घेऊन गेला. हातपाय धुऊन आनंदा देवघरात गेला. ही देखील नेहमीचीच सवय. नेहमीप्रमाणे, सुकन्याने देवघरात मोठी समई लावून ठेवली होती. पूजेच्या वेळी लावलेल्या अगरबत्तीचा सुवास अजूनही दरवळत होता. देव्हाऱ्याचा आसमंत त्या मंद प्रकाशात न्हाऊन निघाला होता.

देवापुढे डोके टेकून तो उठला व त्याने आईबाबा, अण्णा, आजी आजोबा, काका काकू, सर्वांच्या तसबिरीना नमस्कार केला. आई तसबिरीतून आपल्याकडे पाहून हसते आहे असा भास झाला त्याला. नंतर तो कितीतरी वेळ अजून एका तसबिरीपुढे उभा राहिला.

"काका, या, जेवायला," सांची ने हाक दिली. तसा तो सावकाश वळला आणि बाहेर आला. काही अंतरावरून त्याला न्याहाळणारी 'तिची' नजर त्याला जाणवली. ती फक्त हसली. सौम्य, पण स्वच्छ, निर्मळ. मग

सावकाश त्याच्याजवळ आली. त्याच्या दंडाला हलका स्पर्श करून म्हणाली "चल, जेवून मग जरा विश्रांती घेऊ. दमलोय आपण आणि या सर्वांनाही ताटकळत ठेवलय."

"किती बदललीय ही" त्याने मान हलवली आणि सगळे डायनिंग टेबलाकडे जमले.

---

बेडवर पडल्या पडल्या त्याला फ्रान्समधील कार्यक्रमाची आठवण झाली आणि सावजींच्या आर्ट गॅलरीमधील त्याचं पहिलं चित्रप्रदर्शन आठवलं. काल त्याचे सगळे सुहृद कार्यक्रमाला हजर होते. जसं तेव्हा, त्याच्या चित्रप्रदर्शनाचा त्याच्यापेक्षा त्याच्या मित्रमंडळींनाच आनंद आणि उत्साह जास्त वाटत होता तसंच कालही होतं.

काल जगातील एक सर्वोत्कृष्ट चित्रकार म्हणून त्याला सन्मानित करण्यात आले. स्टेजवर जाताना त्याला अचानक पीरबाबाची ती हसरी नजर आठवली जेव्हा तो त्याचा हात धरून चित्र काढायचा. क्षणभर तो थबकला. मग सावकाश एक एक पायरी चढू लागला. एकीकडे मनात तो मचाणाची शिडी चढतोय अशी भावना त्याच्या मनात निर्माण झाली.

"आपल्या नशिबात काही गोष्टी ठामपणे लिहिलेल्या असतात आणि त्या तशाच घडतात. आपण म्हणूनच नशीबाचा विचार करू नये. आपण

मनाचा कौल घेत आपले काम करत राहावे." आजोबांनी तळ्याकाठी बसून सांगितलेलं वाक्य अचानक त्याला आठवलं आणि तो आश्चर्यचकित झाला. अनुभवाच्या दगडावर घासून कस पाहून बनवलेले सिद्धांत ते, खोटे कसे ठरतील. कालच्या सर्व घटना आठवतच तो निद्रेच्या अधीन झाला.

---

लॅपटॉप स्क्रीनवर कालच्या कार्यक्रमाच्या सर्व बातम्या कृपाने वाचून काढल्या. यातले काही महत्वाचे फोटो तिने डाउनलोड केले. आनंदच्या ज्या चित्राने त्याला हा आंतरराष्ट्रीय सन्मान मिळवून दिला ते चित्र स्क्रीनवर झळकलं. कृपाच्या हृदयात एक बारीकशी काळ उमटली. नकळत डोळ्यांच्या कडा पाणावल्या. तिने डोळे हलकेच मिटून घेतले. सगळा भूतकाळ अचानक फेर धरून नाचू लागला.

---

"हाय!"

"ओ माय माय!"

"काय झालं?"

"सूर्य चंद्र तारे सगळे भेदरले रे!"

"काय?"

"अरे तुझा आपणहून मला फोन?"

"ए, ऐक ना, जरा शहाण्यासारखी गप्प बसून ऐकशील का?"

"ओके बॉस! शूट!"

"अं! हं! अगं म्हणजे,,.. अं, तुला काहीतरी सांगायचंय महत्वाचं! "

"ऐकतेय मी! बोलो!"

"म्हणजे मी, म्हणजे मला,... "

"हम्म! पुढे! "

"अगं म्हणजे तुला, म्हणजे मला"

कृपा एकदम उठून उभी राहिली. नकळत तिचं हृदय धडधडलायला लागलं.

"बोल आनंद! पटकन बोल."

"सई! आह! सई!"

"काय? क कोण? कोण सई?"

"तू म्हणायचीस ना तुला आवडेल अशी कोणी बनलेलीच नाही. ती आहे आणि मला भेटलीय. सई!"

एका क्षणात तिचं हृदय धाडकन जमिनीवर आदळलं!

"हॅलो! हॅलो! कृपा? हॅलो!"

तिने पटकन फोन बंद केला. स्वीच ऑफ केला. पाच मिनिटे ती तशीच बसून राहिली. एखाद्या मूर्तीसारखी. मग तिने फोन ऑन केला. आनंदला

मेसेज केला. "बॅटरी डेड झाली रे, जरा चार्ज करून फोन करते. आय ॲम सो सो हॅपी फॉर यू!"मग दहा मिनिटांनी तिने परत फोन लावला.

तो बराच वेळ सईबद्दल बोलत राहिला. ती ऐकत राहिली. एकाच वेळी आपल्या या जीवश्च कंठश्च मित्रासाठी आनंदी आणि स्वतःसाठी दुःखी होत राहिली. मधेच तिने विचारलं "प्रपोज कसं केलंस?"

"अगं नाही ना अजून केलं. हिम्मतच होत नाही माझी. म्हणून तर तुला फोन केलाय."

"धन्य आहेस! आधी तरी सांगायचंस. आत्ताचं तुझं सईपुराण तिला रेकॉर्ड करून पाठवलं असतं तरी भागलं असतं."

"काहीतरीच तुझं एकेक!आता गुरुमा मदत करा आणि सांगा कसं विचारू तिला."

"हम्म! मला काय देणार त्याच्या बदल्यात? "

"म्हणशील ते!"

"बघ हं! "

"येस!"

"थोडा वेळ दे! चरू दे काहीतरी जंक, त्याशिवाय तरतरी नाही यायची!! करते मी फोन!"

'सांगावा का काही तिरपागडा मार्ग, ज्याने सई नाहीच म्हणेल?'

'कृपा!!!!' तिचं मन डाफरलच एकदम!

'मग मी काय करू?' अचानक ओक्साबोक्शी रडू लागली ती, आपल्याच अंगाभोवती दोन्ही हात गुंडाळून तिने आपले आपल्यालाच कवेत घेतले व रडत राहिली. काही वेळाने पहिला रडण्याचा आवेग कमी झाला पण आसवे गळतच राहिली,

मग तिने त्याला फुलं, एखादं सईला आवडेल असं गिफ्ट, घेऊन सईला भेट वगैरे सगळे राजमार्ग सांगितले मेसेज करून. फोनवर आपल्याला रडूच येईल असं वाटलं तिला. ती रिस्क तिला अजिबात घ्यायची नव्हती.

मग ती त्याच्या फोन किंवा मेसेजची वाट पाहत राहिली.

३.२

आनंदाचा फोन आलाच, पण हे सांगायला की ना फुलांची गरज पडली ना गिफ्टची. नकळतच तिचं मन बोलून दाखवलं सईने!

कृपाला आपले दुःख विसरायला लावणारा आनंद आनंदाच्या आवाजातून ओसंडत होता. तिने मन:पूर्वक अभिनंदन केले त्याचे. दुसऱ्याच दिवशी तिने त्या कोर्सची फी भरून टाकली. तिला आता स्वतः:ला इतकं बुडवून घ्यायचं होतं की श्वास घ्यायलाही वेळ द्यायचा नव्हता.

---

त्याला पहाटेच जाग आली. कालच्या प्रवासाचा शीण बराच कमी झाला होता. तो नेहमीप्रमाणे त्याची काठी घेऊन बाहेर पडला. नकळत पाय शिवमंदिराकडे वळले. मंदिर जसजसं जवळ येऊ लागलं तसतसं अंगात एक निराळीच ऊर्जा भरून राहिली. तो मंडपात बसला. नकळत डोळे मिटले. गतस्मृती लगेच संधी साधून समोर रास रचू लागल्या.

---

घंटा किणकिणल्यासारखा कोणाच्यातरी हसण्याचा आवाज मंदिराच्या मागील बाजूने येत होता. आनंदाला आश्चर्य वाटलं. या मंदिरात फारसं कोणी येत नाही. परत तसाच आवाज आल्यावर मात्र तो उठला आणि मंदिराच्या मागे गेला. तिथे तर कोणीच दिसेना. वळून परत निघाला तर परत तोच आवाज. 'अरे?' आवाजाच्या दिशेने नजर वर गेली तर एक तरुण मुलगी

बेलाच्या मोठ्या फांदीवर बसून, हातातल्या खारीला काहीतरी भरवत होती आणि हसत होती.

"अगं थांब की जरा, किती घाई करतेस? तुलाच आणलाय सगळा खाऊ. गुदगुल्या होतायत माझ्या हाताला." परत ती तशीच किणकिणली.

खालून आनंद पाहत राहिला भान हरपून. त्या सुमधुर किणकिणीने त्याला वेडावून टाकलं. आकाशी रंगाचा सलवार कुडता, त्याची ओढणी खांद्यावरून कमरेला बांधून टाकलेली, पायात एकच घुंगरुवाल्या साखळ्या. केस लांब सडक पण पोनीटेल मध्ये बांधलेले.आनंदाला चेहरा दिसेना. तो पाहिल्याशिवाय पाय निघेना. तेवढ्यात खारीने उडी मारली आणि ही दचकली. तोलच जायचा, पण सावरली.

"वेडी कुठली!" ती खार गेलेल्या दिशेने पाहत म्हणाली. मग अगदी सराईतासारखी खाली उतरली. हात, कपडे झटकून वळली तर समोर कोणी अनोळखी मुलगा! दचकलीच एकदम. तिचं दचकणं पाहून तो एकदम भानावर आला. बदामाकृती चेहरा! गोरा गुलाबी तजेलदार वर्ण! डोळे अत्यंत सुंदर आणि पाणीदार. नाक चाफेकळी. नाजूक जीवणी! नजर हटेचना त्याची. अशा वेळी एक डॅमेज कंट्रोल सिस्टीम कार्यरत होते आपसूकच! आपला इगो असा शरण जायला तयार नसतो. आनंदाचही तसच झालं!

"बेलाच्या झाडावर चढू नये. नाजूक असतात फांद्या, तुटली असती तर सरळ खाली पडली असतीस."

"मला सवय आहे." ती जरा घुश्श्यातच म्हणाली.

"नवीन दिसतेस गावात!"

"छे! मी भू.. काही नाही"

आनंदाची ट्यूब पेटलीच एकदम! "भूमकर आज्जीन्ची सई, तू होय?मला वाटलं लहान शाळकरी मुलगी असेल."

"तुला काय वाटायचंय त्यात? आणि तुला काय माहित?

"अगं, काल गेलो होतो ना आम्ही तुझ्या आज्जीकडे! तेव्हा त्या म्हणाल्या सई आलीय!"

"तू अनुकाकूंचा आनंद का? चित्र काढणारा? अरे, बरं झालं भेटलास. ती एकदमच मोकळेपणाने हसली मग. मला ना माझं एक चित्र काढून हवय. तुला येईल काढता? आजी म्हणते तू चित्रकलेचं शिक्षण घ्यायला मुंबईला असतोस म्हणून. शिक्षण पूर्ण झालंय का तुझं? नाही म्हणजे, मला उगाच कुठल्यातरी नवशिक्याकडून नाही हं काढून घ्यायचय चित्रं!" आनंदला मनातून खूप हसू आलं. पण चेहरा गंभीर ठेवत तो म्हणाला, "होत आलय माझं शिक्षण पूर्ण! पण!"

"पण काय?"

"पण मी आजच निघालोय मुंबईला."

"अरेरे!"

"परत कधी येणारेस?"

"माहित नाही"

"म्हणजे काय?"

"कामं संपली की येईन!"

"हम्म!"

"तू कधीपर्यंत आहेस?"

"मी? मला आवडतं इथेच राहायला. पण आई बाबा आजीलाच तिकडे नेणारेत, मग काय, माझं येणं बंदच."

"आज आत्ता वेळ आहे का तुला?"

"आत्ता? आजी वाट पाहत असेल, गेलं पाहिजे मला. पण आत्ता का? तू मुंबईला चालला आहेस ना? "

"हं! हो! पण मी जरा उशीरा गेलो असतो."

"नाही, नको घाईघाईत! मला माझं खूप भारी चित्र हवय काढून."

"बरं! बघू परत येईन तेव्हा."

"हं!" तिने एक सुस्कारा टाकला.

———

सई घरी आली तर आई बाबा आलेले. "ओह्ह नो! आता हे आम्हाला इथून घेऊन जाणार!!"

तिचा होरा अगदी बरोबर होता. आजी पण नाराज होती.

'आता काय करावं?' तिला काहीच सुचेना!

बाबा म्हणाले "मी चार दिवसांनी ट्रक बोलावलाय. तेव्हा आता बांधाबांध करायला घ्या."

"अरे, असा काय करतोस? मी काय रे बाबा करणार तिकडे येऊन? मला आपलं रामनगरच बरं वाटतं रे. परड्यात चार चकरा मारल्या तरी बरं वाटतं. तिथे ते जिने चढउतार, मला काही जमायचे नाहीत हो!"

"आई, आपल्या बिल्डिंगला लिफ्ट आहे."

"मला नको सांगूस ती लिफ्ट न बिफ्ट. माझा जीव घाबरा होतो त्या पाळण्यात"

सईची आई हसू लागली मग. "पाळणा काय हो आई!!"

"मग काय तर."

"अहो तुम्ही इथे एकट्या असता, आम्हाला काळजी वाटत राहते तुमची."

"मग सईला पाठवा इकडे माझ्याबरोबर. शिक्षण संपतंय ना तिचं, नोकरी वगैरे सुरू होण्यापूर्वी माझ्याकडे राहिल आणि स्वैपाक शिकेल जरा. मलाही सोबत होईल. तसा शेजार चांगलाय. लक्ष ठेवून असतात म्हातारीकडे. दुखलं खुपलं तर पाहतात."

"हो हो, मला राहायचंय आजीकडे. मला काही स्वैपाक येत नाही. सासरी नाव खराब करशील माझं, असं तूच तर म्हणत असतेस सारखी." सईने आजीची री ओढली.

आई बाबानी एकमेकांकडे पाहिले आणि ते उठले जेवायला. काही न बोलताच. इकडे आजी नातीच्या खाणाखुणा सुरू झाल्या. आजीने तिला शांत राहण्याची खूण केली.

---

मुंबईत आनंद गेला खरा, पण सतत तो सुंदर चेहरा त्याच्या डोळ्यांसमोर येत होता. मन तिच्या विचारातून बाहेरच पडेना. तिची गोड किणकिण तर सतत कानात वाजायला लागली. कशीबशी कामं आटोपून तो मशीनची काही कागदपत्र घेण्यासाठी पंडितांच्या ऑफिसमध्ये गेला. ते काम उरकून तो तिथून बाहेर पडत होता तेवढ्यात प्यून बोलावत आला. "मोठे साहेब बोलावत आहेत."

"आहेत का ते?" असं म्हणून तो मागे वळला. प्यूनने त्याला पंडितांच्या प्रशस्त केबिन मध्ये नेलं. केबिन नव्हतीच ती, कॉन्फरन्स रूम होती.

"ये आनंद! बस!"

आनंदाला आश्चर्य वाटलं. पंडितांनी मागच्या वेळेस त्याला पटकन ओळखलंही नव्हतं.

"कसा चाललाय व्यवसाय? आमची मशीन्स उपयोगी पडतात की नाही?"

"चांगलं चाललंय सगळं., मशिन्स मुळे ऑर्डर्स पूर्ण व्हायला लागल्यात." तो जरा चकित होऊन म्हणाला.

"तुम्ही मुंबईत ऑफिस का नाही उघडत तुमच्या कंपनीचं?"

"मुंबईत? एवढा मोठा व्यवसाय नाही आमचा." तो हसून म्हणाला.

"व्यवसाय आपण वाढवू तसा वाढतो., व्यवसाय करताना नेहमी मोठी भरारी मनात ठेवूनच सुरवात करावी."

"हो बरोबर आहे तुमचं!"

"नुसतं बरोबर आहे म्हणू नकोस. हे पहा तुझ्या आईवडिलांनी लहान स्वरूपात सुरवात केली, पण आज मुंबईत विकताहेत ना प्रॉडक्ट्स? आता परदेशात पाठवायचा विचार कर."

"हो, सांगतो मी भावाला. तो पाहतो आता फॅक्टरी."

"तुला भाऊ आहे मोठा? "

"चुलत भाऊ. माझे दोन चुलत भाऊ, माझी चुलत बहीण, माझे बाबा आई आणि काका एवढे सगळे तिकडे गावी व्यवसाय पाहतात. मी फक्त माझं कॉलेज सांभाळून इथली काही कामं असतील तर करतो.

"ओह्ह! अच्छा!"

"मग तू इकडेच एखादा व्यवसाय का नाही सुरू करत? आमच्या कंपनीत जॉईन हो, हुशार आहेस, पाहता पाहता नाव काढशील."

"अं! मी नाही समजलो. मी काय करणार तुमच्या कंपनीत?"

"अरे तू फक्त हो म्हण! जागा आपण बनवू तुझ्यासाठी. हुशारी आणि मेहनत असेल तर काहीच अवघड नाही."

"माफ करा सर, तुम्ही माझ्या भल्याचंच सांगताय. पण मला रामनगर कायमचं सोडायचं नाहीय आणि माझी चित्रकर्म्याची जात, बाकी कशात रमणार नाही मी कलेशिवाय!"

"कलेने पोट नाही भरत यंग मॅन!"

"हो दुर्दैवाने सध्या भारतात अशी स्थिती आहे खरी. रिकाम्या पोटी राहू शकेन मी पण रंगांशिवाय जगणं अशक्य आहे मला."

"तुझ्या आईवडिलांना हे चालणार आहे?"

"सर माझ्या वडलांनी जवळपास आठ दहा वर्षांची साठवणूक माझ्या फीसाठी वापरली. मी कलेकडे पाठ फिरवली तर मात्र त्यांना अतोनात दुःख होईल."

"हं!"

त्यांनी इंटरकॉमवर कॉफी सांगितली.

थोड्या वेळाने तो निघाला.

रूमवर येताच त्याने इझल वर कॅनवास चढवला. 'फार उपास घडला,'त्याच्या मनात आलं.

आज त्याने सगळे रंग घेतले. पाहता पाहता इझल वर सई जिवंत उमटली. 'बस यात तिच्या हसण्याची सुमधुर किणकिण मिसळता आली असती तर', त्याच्या मनात आले. तो एकदम दचकला. तिला पाहिल्यापासून आपल्या मनात दुसरा काही विचारच नाहीय.

---

उर्मी, मला वाटतं तू आता त्याचा विचार सोडून द्यावास. तो तुझ्या योग्य नाही बेटा. उर्मीने फक्त मान खाली घातली. दांचा कोणताच निर्णय तिने आजवर नाकारला नव्हता. आजही ती त्यांचच ऐकणार होती. शिवाय एवढा वेळ दांच्या बरोबर बोलत असताना त्याने एकदाही उर्मीबद्दल विचारले नव्हते, हे ती विसरली नव्हती.

---

सईचे आई बाबा शेवटी चार दिवसांनी परत जायला निघाले. "आई, सई, काही महिने राहा इथे. पुढच्या वेळेस मी ट्रक बरोबर घेऊनच येईन, आणि तेव्हा कोणाचही काहीही ऐकणार नाही,"

"ओके बाबा, डन!" सई जाम खुश होत म्हणाली. "आणि उंडारू नकोस, आजीची काळजी घ्यायला ठेवलय तुला हे विसरू नकोस."

दोन्ही बाजूना जोरजोरात मान हलवत सईने हो म्हटले.

"कधी मोठी व्हायची ही पोर!" आईने तिला जवळ घेतले.

---

३.३

मुंबईच्या वास्तव्यात एक क्षणही तो सईला मनातून दूर करू शकला नाही, याविषयी त्याला स्वतःचे फार वैषम्य वाटत होते आणि त्याचा काहीही इलाज चालत नव्हता. कामात कसातरी वेळ जाई, पण संध्याकाळी परत आला की काही सुचत नसे. चित्र काढायला जावे तर तिचीच छबी उमटावी कॅनव्हासवर. रात्री झोपण्याचा प्रयत्न करावा तर तिने आधी विचारात आणि मग स्वप्नात येऊन छळावे. जाग येण्याआधीच तिच्या विचाराने मनात आधीच बैठक मारलेली दिसे. 'प्रेम प्रेम म्हणतात ते हेच असावं आणि ते आंधळं असतं म्हणतात पण मला ते बिनडोक असावं असं वाटतंय. नाहीतर जिच्याविषयी काहीच माहित नाही तिला केवळ एकदा पाहिलं काय आणि ती अशी मनात ठाण मांडून बसली हे काय?'पण हे विचार काही क्षण टिकत आणि परत सई मनाचा कब्जा घेई. आनंदा मनावरच वैतागला पण त्याचा काही जोर चालेना. मन सतत 'सई सई ' करत राहिलं. मग मनाने ना ना तऱ्हेने त्याला छळायला सुरवात केली. 'आता सई निघून गेली असेल. आता आपल्याला ती कशी भेटणार? अगदी काही करून आपण भेटलो तरी तिला आपल्याबद्दल असं काही वाटेल का? नसेलच वाटत. नाहीतर त्यादिवशी मी थांबतो आणि चित्र काढून देतो असं म्हटल्यावर ती तयार झाली असती. तिला आपल्याबद्दल काहीच भावना नसतील 'अशा'तर? तिचा आधीच कोणी जिवलग असेल तर?' याविचारसरशी त्याच्या हृदयात एक अनाम वेदना उमटली.

आजपर्यंत आनंदला आयुष्यात 'अमुक एक गोष्ट मला मिळालीच पाहिजे नाहीतर मी जगूच शकणार नाही' अशा भावनेचा अनुभवच नव्हता. जे हवे असेल ते झगडून कष्टाने, जिद्दीने, मिळवता येते हे त्याला माहित होते. पण यश, विद्या, वस्तू, मिळविणे आणि एखाद्या व्यक्तीच्या मनात स्थान मिळविणे यात जमीन अस्मानाचा फरक होता. आणि हे त्याला कळत होते. तो या विचाराने कमालीचा अस्वस्थ झाला.

आनंद काम संपवून लगेच रामनगरीत परतला. आल्या आल्या त्याला भूमकर आजींकडे जायचे होते पण ते विचित्र दिसेल म्हणून तो एक दिवस थांबला.

अनुराधेला त्याची चलबिचल दिसत होती परंतु ती कशामुळे हे लक्षात येत नव्हते कारण इतर वेळचा गंभीर आनंद तिला दिसत नव्हता. उलट तिच्याशी तो निरनिराळे विषय काढून काढून बोलत होता. त्याची अस्वस्थता ही अधीर अस्वस्थता होती. रामनगरातील बऱ्याच लोकांची चौकशी तो करत होता, मधेच त्याने पंडित यांच्याबरोबर झालेले बोलणे तिला सांगितले.

तिला मोठे आश्चर्य वाटले. ती म्हणाली "अरे वा! तुझी फारच चांगली छाप पडलेली दिसते त्यांच्यावर! "

तेवढ्यात तिथे आलेला चंदू यांचे बोलणे ऐकत होता तो म्हणाला, "पोरगी आहे का रे त्या पंडितांना? घरजावई शोधतात की काय?" अनुराधेनें

एकदम आश्चर्याने आनंदाकडे पाहिले. त्याचा चेहरा एकदम बदलला. 'अरे, असं असेल का? छे छे! काहीही काय?' त्याने त्या विचाराला रद्दबाद केले.

"हेच तर कारण नसेल पोराच्या अस्वस्थतेचे?" अनुराधेला प्रश्न पडला. पण ती काही बोलायच्या आधीच आनंद म्हणाला "आहे एक देखणी मुलगी त्यांना पण तिची जागा किर्लोस्कर, वगैरेंच्या बड्या घरात. आपल्या घरात नाही." हे बोलताना त्याच्या आवाजात अजिबात वैषम्य, दुःख, निराशा असे काहीच तिला जाणवले नाही. तरीही चंदूला एकदा त्याच्याशी बोलून घ्यायला सांगावे असे तिने ठरवले. सून घरी आणण्याच्या विचाराने ती हरखून गेली.

"चंदू, अरे ते भूमकर येऊन गेले का फॅक्टरीमध्ये?"

"हो काकू, ते दोघे पतीपत्नी आणि सई, त्यांची मुलगी पाहून गेले फॅक्टरी. रामनगरसारख्या ठिकाणी तुम्ही हायजिन उत्तम राखताय म्हणाले."

भूमकर आणि सई ही नावे बोलण्यात आल्याबरोबर आनंदाचे कान टवकारले.

"ते का आले होते फॅक्टरी पाहायला?"

"अरे ते एका मोठ्या फूड कंपनीत मोठ्या हुद्द्यावर आहेत. काकांचे वर्गमित्र ना? काका म्हणाले येऊन जा एकदा पाहायला. आता आजींना तिकडेच घेऊन जायला आले, मग आले होते पाहायला."

"अच्छा! गेले का घेऊन आजींना?"

"नाही अजून."

आनंदच्या जीवात जीव आला.

"आनंद त्यांनी आज मला बोलावलंय काकांबरोबर त्यांच्या घरी."

"का?"

"त्यांच्या कंपनीचं काही लोन लायसन्सवर काम आपल्या कंपनीकडून करून घ्यायचय त्यांना. त्याविषयी बोलायला बोलावलंय. तू ही चल."

"बरं! " मनातून उकळ्या फुटत होत्या पण त्याने त्या अगदी दिसू दिल्या नाहीत.

"आनंदा दमला असशील तर राहू दे, बाबा आणि चंदू देतील तुला माहिती नंतर."

"छे छे, दमतोय कशाने? जाईन की मी!" तो एकदम म्हणाला.

अनुराधेला फारच आश्चर्य वाटलं.

---

कधी एकदा संध्याकाळ होते असं आनंदाला होऊन गेलं. शेवटी अस्वस्थता इतकी वाढली की तो घराबाहेर पडला. नकळत पावले मंदिराकडे वळली. तो थेट गाभाऱ्यासमोर गेला. शिवपिंडीपुढे नतमस्तक होऊन उभा राहिला.

"जय शिवशंभो" त्याने गाभाऱ्याच्या दगडी लहानशा दरवाजापाशी तोंड नेऊन जयजयकार केला. आतून "शम्भोचा" प्रतिध्वनी उमटला.

लहानपणापासून या प्रतिध्वनीचे त्याला फार आकर्षण! एकटाच येऊन त्याने जोरजोरात हा असा जयजयकार करावा आणि आतून येणारा प्रतिध्वनी ऐकावा. लहान असताना देवच आतून परत "शंभो" असं म्हणतो अशी त्याची दृढ समजूत होती,

आजोळाहून परत आल्यावर मात्र तो कधीच मंदिरात गेला नाही. क्वचित कधी बाहेरच्या ओट्यावर बसे. कधी बाबा बासरी वाजवत तेव्हा हा समोरच्या खडकावर बसे. पण आत जात नसे. कधी कधी चंदूला याचे रात्री अपरात्री जंगलात फिरणे, मुलात न मिसळणे, याची फार काळजी वाटे, मग तो मंदिरातून अंगारा आणून याला लावे. पण आनंदा कधीच आत येत नसे. आईच्या आजारपणात जेव्हा तो अत्यंत विमनस्क स्थितीत इथे आला तेव्हा त्याच्याही नकळत आत गेला आणि गाभाऱ्यासमोर बसून त्याने परमेश्वराची आळवणी केली. त्यानंतर मात्र तो अधून मधून इथे यायचा. आजही तो गाभाऱ्यासमोर उभा राहिला. "माझी होईल का ती?" मनात फक्त एकच आस होती आज! सायंपूजा करण्यास आलेल्या भटजीने तीर्थप्रसाद आणि एक फुल त्याच्या हातावर ठेवले. त्याला मोठे आश्चर्य वाटले. भटजी नेहमी तीर्थप्रसाद देत. फुल कधीच नव्हते दिले याआधी. तो भलताच खुश झाला.

मनाची ही एक मोठी गम्मत असते. जेव्हा एखाद्या गोष्टीत मन अडकते पण ती गोष्ट मिळेलच अशी खात्री नसते तेव्हा कोणतीही लहानशीही घटना त्याला फार महत्वाची वाटून तो त्याच्याशी त्याच्या मनातील इच्छेशी संबंध

जोडू लागतो. आनंदाचेही काहीसे असेच होत होते का? पण त्याला आत्ता हा शुभशकुन वाटत होता आणि मन काहीसे उल्हसित झाले हे मात्र खरेच.

मग तो घाईघाईने घराकडे निघाला. भूमकरांकडे जाण्याची वेळ त्याला चुकवायची नव्हती.

---

३.४

आनंद, अनंत आणि चंदूच्या बरोबर गेला खरा पण आयुष्यात कधीही न अनुभवलेली एक अनामिक अस्थिरतेची भावना त्याला घेरून आली. मधूनच परत फिरावं असाही विचार आला मनात. भूमकरांनी अंगणातच खुर्च्या मांडल्या होत्या. अनंताने आनंदची ओळख करून दिली. मग कंपनीबद्दल चर्चा सुरू झाली. आनंदाची नजर सतत घराकडे वळत होती आणि कोणी आपल्याला घराकडे पाहताना पाहिला तर नाही ना या विचाराने तो अस्वस्थ होत होता. काही वेळाने भूमकर आजी आणि काकू चहा खाण्याचे ट्रे घेऊन आल्या.

"अरे आनंदा, तू कधी आलास मुंबईहून?"

"आजच आलो आजी."

"घ्या घ्या, चहा घ्या. फॅक्टरी उत्तम आहे हो भाऊजी तुमची. आज पाहून आलो आम्ही."

"चंद्रशेखर अतिशय मेहनती आणि उत्तम व्यवस्थापक आहे,"श्री भूमकर म्हणाले.

"हो, आता तोच सांभाळतो सर्व काम.” अनंता म्हणाला.

"आनंद तू काय करतोस? "

"अं! मी, मी काही नाही, म्हणजे मी कलाविद्यालयात शिकतोय."

"ओह! अच्छा!"

मग चर्चा परत सुरू झाल्या. अनंताला आनंदच्या उत्तराचं आश्चर्यही वाटलं आणि कौतुकही. चंदूला मिळत असलेलं श्रेय त्याला हिरावून घ्यायचं नव्हतं, म्हणून तो असं बोलला असं त्याला वाटलं.

"तुला काय वाटतं आनंद?"

"अं, काय?"

आता मात्र अनंताला फारच आश्चर्य वाटलं.

"काकांच्या कंपनीच्या प्रोडक्टसाठी एक सेपरेट मॅन्युफॅक्चरींग आणि पॅकिंग लाईन लागेल कारण बाष्पग्राही पदार्थ आहे. शक्य होईल?" चंदूने हलक्या आवाजात विचारलं आनंदाला.

"अं!” मग त्याने चंदूच्या हातातील पॅड समोर घेतलं, काही वेळ नुसताच विचार करत बसला आणि मग भराभरा ड्रॉईंग काढत फॅक्टरीच्या रचनेचे रेखाचित्र काढले. मग चंदूला म्हणाला "इथे जे स्टोअर आहे ते हलवलं तर तिसरी लाईन इथे परफेक्ट फिट होईल. एएचयू वगैरेही सेपरेट करता येईल, एंट्री एक्झीट सुद्धा. मग त्याच वेळी या दोन लाईनचं कामही करून घेऊ. त्या एकमेकींपासून आयसोलेट करा असं किती दिवस सुकन्या सांगतेय आपल्याला. स्टोअर साठी पलीकडे थोडं बांधकाम करून ते शेवटच्या लाईनच्या पलीकडे जोडू. एक कन्वेयर बसवायचाच होता ते ही होऊन जाईल. तू उद्या आपल्या दिलीपला घे ना बोलून, आर्किटेक्ट ठीक आहे म्हणाला तर मग काहीच प्रश्न नाही."

भूमकर पाहतच राहिले. "इतका वेळ अनंताचा मुलगा आहे पण पोरात काही दम नाही असाच त्यांचा ग्रह झाला होता तो एकदम बदलला."

"आनंद, तुला बरीच माहिती दिसते या व्यवसायातील?"

"काका, आनंद लहान असल्यापासून करतोय सगळं. मुंबईत आमचे प्रॉडक्टही यानेच नेले प्रथम. आमची हॅन्डीक्राफ्ट प्रॉडक्ट लाईन तर यानेच पूर्ण डेव्हलप केलीय. मी अलीकडे लक्ष घालू लागलोय."

"अच्छा."

"पण काका, हे सगळे बदल करायला बराच खर्च येणार, बदल केल्याशिवाय उत्पादन सुरू होणार नाही, आमच्या सध्याच्या आवाक्याबाहेरचा खर्च आहे हा, तर तुमच्या कंपनीने थोडा ऍडव्हान्स द्यावा, रचनात्मक बदलांसाठी, तसंच तांत्रिक मदतही मिळाली तर उत्तम, आणि मग एकदा उत्पादन सुरू झालं की तुमच्या कंपनीचे पैसे आम्ही हप्त्या हप्त्याने परत करू. तसं कॉंट्रॅक्ट अर्थातच आम्ही साईन करू." आनंद आता पूर्ण नेहमीच्या व्यावसायिक मनोभूमिकेत आला.

भूमकर काही वेळ विचारात पडले. "तुम्ही बाहेरून लोन घेऊ शकालच की, नाही का?" ते म्हणाले.

"हो काका, आम्ही बाहेरून पैसा उभा करू, पण उद्या तुमच्या कंपनीचा विचार बदलला तर हा बोजा सहन करण्याची ताकद आमच्या कंपनीत नाही. पण तुमच्याच कंपनीने पैसा दिला असेल तर एक प्रकारे बांधिलकीही राहील."

"आनंदा, अरे,,..." अनंता त्याला हळू आवाजात म्हणाला. भूमकर हसले मग.

"अनंता,पोरगा व्यवहारी आहे तुझा. बरोबर आहे त्याचं म्हणणं. आमच्यासारख्या कंपन्यांचे विचार एका रात्रीत बदलतात. मी आमच्या लोकांशी बोलतो. तुम्ही प्राथमिक तयारी सुरू करा."

"सई, बाबा रागावतील बरं का तू अजिबात बाहेरच आली नाहीस तर!"

"आई, अगं, काय पण? लग्न बिग्न काय? मला विचार सुद्धा नाही करायचाय आत्ता!"

"हे बघ, तुझे बाबा कधीच तुझ्या मनाविरुद्ध काही करत नाहीत. लग्नाच्या बाबतीत तर मुळीच नाही करणार. पण त्यांची इच्छा म्हणून तुला काही वेळ बाहेर येऊन बसायला काय हरकत आहे?"

"आजी, तू पण काय यांच्याच बाजूने बोलतेस?"

"अगं, माणसं खूप चांगली आहेत इगतपुरेंची! चंदू तर सालस आहे फारच"

"असतील की, मी कुठे नाही म्हटलंय?पण मला आत्ता लग्नाचा विषयच नकोय."

"हरकत नाही. पण आपल्या घरी कोणी आलं तर आपण जाऊन भेटायला नको? जा आता आणि विचार बाबाना, की मी विचारलंय पानं घेऊ का?"

"जेवणार आहेत ते दोघं इथे?"

"दोघे नव्हे तिघे." सईच्या कपाळावर तिसरी आठी चढली.

ती जरा घुश्श्यातच बाहेर आली. कोणाचकडे न बघता म्हणाली, "बाबा आईने विचारलंय पानं घेऊ का?"

"अगं सई, ये ये! तुझी ओळख करून देतो, अनंता, ही सई, माझी एकुलती एक मुलगी, सई, हा माझा शाळेतला जिवलग मित्र अनंता."

सईने सवयीने पटकन वाकून अनंताला नमस्कार केला. आणि आत जायला वळू लागली. "चंद्रशेखरला तू भेटली आहेसच. आणि हा आनंद, अनंताचा मुलगा." ती गर्रकन वळली. सगळं विसरून एकदम म्हणाली "अरे तू आलास पण मुंबईहून? मस्त! आता काढून दे हं माझं चित्रं."

सगळे आश्चर्याने पाहू लागले. आनंदाला तर काय बोलावे कळेचना. मग सईच्या लक्षात आलं की काहीतरी चुकलं! "बाबा, मंदिरात भेट झाली आमची. आणि आजी म्हणाली हा फार छान चित्र काढतो. मला माझ्या रूममध्ये लावायला हवंय ना पोर्ट्रेट माझं! पण हा म्हणाला मी मुंबईला चाललोय." मग ती पटकन आत गेली.

जाणाऱ्या सईचा आणि परत आत येणाऱ्या सईचा संपूर्ण बदललेला मूड तिच्या आईला गोंधळात टाकून गेला. ती हळूच आपल्या सासूबाईंना म्हणाली, "आई, कसं हो व्हायचं या पोरीचं? क्षणात तोळा, क्षणात मासा!!"

"काही काळजी करू नकोस. सगळं ठीक होईल. पोरगी सोन्यासारख्या शुद्ध मनाची आहे."

"म्हणूनच काळजी वाटते आई! या जगात इतकं मनस्वी असून नाही भागत ना? या सोन्याला तितकंच कसदार कोंदण मिळेल?"

"नक्की मिळेल! "

---

आनंदाला नंतर रात्रभर तीचं ते गर्रकन वळून त्याच्याकडे चमकदार नजरेने पाहणं आठवत राहिलं. जेवताना त्याचं जेवणात अजिबात लक्ष नव्हतं. त्याला फक्त तिचा आसपासचा वावर जाणवत होता. बाहेर पडताना अनंता म्हणाला "मग सई कधी येतेस घरी? ये, काकूला भेट, आणि चित्राबद्दल सांग, मग तुला चित्र काढून द्यायला कोणी नाही म्हणणार नाही." सगळेच हसले मग.

---

आनंद सईच्या डोळयात पाहत होता. त्याची नजर तिच्या चेहऱ्यावरून हटत नव्हती. कपाळावरून डोळयावरून गालांवर ढळलेली बट त्याला अलगद बाजूला करावीशी वाटली. पण चित्रातील बट बाजूला कशी करणार? मग चित्रावरून उचलून त्याने समोरच्या खुर्चीत बसलेल्या सईकडे नजर टाकली तर खुर्ची रिकामी.'अरे, ही कुठे गेली आता?' त्याने आसपास पहिले तर कुठेच नाही. तेवढ्यात त्याला मानेवर उष्ण श्वास जाणवला आणि तो झटकन मागे वळला. सई तिचेच चित्र अत्यंत निरखून पाहत होती. ते पाहण्याच्या नादात आपण आनंदाच्या जरा जास्तच जवळ उभे आहोत याची तिला जराही जाणीव नव्हती. आनंद मात्र जरा संकोचाने बाजूला झाला तेव्हा तिला अचानक आपण नियम मोडला याची जाणीव होऊन ती

खोडी पकडली गेल्यासारखा चेहरा करून रुसक्या नजरेने त्याच्याकडे पाहत परत खुर्चीकडे वळली. तिचं ते लहान मुलीसारखं वागणं पाहून आनंदालाही हसू आलं.

"किती बोअर प्रोसेस आहे ही चित्र काढण्याची! मला आधी माहित असतं तर मी मुळीच नसतं सांगितलं तुला चित्र काढायला. आणि वर तुझे ते रूल्स. मला नाही आवडत आहेत ते. माझच चित्र आणि मीच नाही पाहायचं, असं कसं?" गाल फुगवत सई म्हणाली आणि आनंदला हसू आवरेना.

पण त्याने काही न बोलता फक्त हाताने तिला स्थिर बसण्याची आणि गप्प राहण्याची खूण केली. मग ती तशीच रुसलेला चेहरा करून बसून राहिली.

"चित्र हसरं हवय की रुसकं?"

"मला नकोच आहे जा चित्र! जाते मी!"

"ए अगं,थांब! बरं, दर एक तासाने पाच मिनिटाचा ब्रेक, तेव्हा येऊन बघ, चालेल?"

"पण आत्ताच ते चित्र दिसतंय ना माझ्यासारखं अगदी, मग अजून कशाला? त्यापेक्षा चल ना मला ते मंदिराच्या टेकडीवरचं जंगल दाखव."

"शू! चल बस पटकन! आणि हसा जरा प्लीज!"

असं रुसत, हसत एकदाचं चित्र पूर्ण झालं. जेव्हा तिने ते पाहिलं तेव्हा मात्र ती त्या चित्राच्या प्रेमात पडली.

"आनंद, जादू केलीस रे! माझ्या मीच प्रेमात पडले. आरशात मी स्वतःला कधीच इतकी सुंदर दिसत नाही. मी काय देऊ तुला या चित्रासाठी?"

तो नुसताच हसला. "उद्या देतो तुला हे चित्र, जरा बॅकग्राऊंड वर काम करतो रात्री आणि वाळलं की उद्या तुझ्या हातात."

"हो पण सांग ना काय देऊ तुला मी?"

"अं? मागेन वेळ आली की!"

"बरं, तू मागशील ते देईन."तिची ती स्वच्छ नितळ नजर थेट आरपार गेली त्याच्या. त्याचा नकळत श्वास कोंडला.

"हम्म! चला, जा आता घरी. मला काम करू दे." आंतरिक डिफेन्स कार्यरत झाला लगेच. ‘असा काय हा? आत्ता तर किती प्रेमाने बोलत होता आणि घटकेत हाकलायला लागला.’

पण ती काही न बोलता बाहेर पडली. "तिची काहीशी दुखावलेली नजर त्याला विद्ध करत राहिली."

असेच दिवस जात राहिले. आनंद आणि सई काही ना काही कारणाने भेटतच राहिले. जेव्हा एकत्र नसत तेव्हाची आनंदची अस्वस्थता पराकोटीला जाई. त्याला काही सुचत नसे. असाच वेडावलेला असताना त्याने कृपाला फोन करून सई बद्दल सांगितलं. तो इतका सई मध्ये गुंतला होता की कृपाचा बदललेला आवाज, तिने फोन बंद करणे, मग परत फोनवर घोगरा झालेला आवाज वगैरे गोष्टी त्याच्या लक्षातच आल्या नाहीत, कृपाने मेसेजवर जेव्हा

आपल्या मनातील भावना सईपर्यंत पोहोचवण्याचे अनेक फॉर्मुले आनंदाला कळवले, तेव्हा तो मचाणावर चढत होता. अलीकडे सई बरोबर नसली की त्यातल्या त्यात मचाणावर त्याला शांत वाटे. तिथे सईची जवळ जवळ दहा चित्रे काढून ठेवलेली होती त्याने. आज मात्र अजून कोणीतरी त्याचा पाठलाग करत तिथे आले होते. सईमय झालेल्या आनंदाला त्याचा पत्ताच नव्हता. तो सरळ शिडीने वर गेला. परत शिडी वर ओढून घेण्याची तसदीही त्याने घेतली नाही. तो आत गेला. मग त्याने सईची सर्व चित्रे मचाणाच्या भिंतीला टेकवून गोलाकार मांडली. इझल वर काल काढलेलं सईचं झाडावर बसून खारीला भरवतानाचं चित्र होतं. बाकी सगळी चित्रही अशीच त्याच्या मनात घर केलेल्या सईची होती. त्याच्यामागोमाग चढलेली व्यक्ती हे सर्व पाहून अवाक झाली होती. अचानक त्याला चाहूल लागली.

"सई, तू,... तू,..... इथे?" आनंद कमालीचा दचकला.

"हूं! हे काय?" चित्रांकडे हात करून ती म्हणाली.

आनंदाला काय बोलावं कळेना. "ही चित्र मी अशीच,.... आय एम सॉरी! मी, मी, तुला न विचारता ही चित्र काढायला नको होती, पण,. "

"पण?" मग ती हळू हळू चित्रांकडे गेली. एक एक चित्र निरखून पाहू लागली. आनंद अपराध्यासारखा दारातच थांबला.

ती वळली तेव्हा तिच्या डोळयातून अश्रू वाहत होते, ती त्याच्याजवळ आली आणि तिने आपले दोन्ही हात त्याच्या गळयाभोवती गुंफत त्याला मिठी मारली.

"सई!!!!" आनंदाने तिला घट्ट मिठीत घेतले. जणू त्याचा श्वास इतके दिवस कोणी बंद केला होता तो मोकळा झाला.

कितीतरी वेळ ते असेच एकमेकांच्या मिठीत विसावले. मग आनंदाने तिला आपल्यापासून जरा दूर करत तिच्या डोळ्यात पाहिले. तिची नजर किंचित खाली झुकली.

"मला रामनगरमध्येच राहायचंय कायमचं, ठेवून घेशील?"ती म्हणाली. काही वेळेस बोलायचं असतं तिसरंच, शब्द काही वेगळेच बोलतात आणि तरी बरोबर अर्थ समोरच्याच्या मनात उतरतो. किंबहुना दोन्ही मनात तो घोळतच असतो आणि तरी उच्चारण करताना वेगळंच काही बोललं जातं. आनंदाने फक्त होकारार्थी मान हलवली. त्याचा, त्याच्या आवाजावर अजिबात विश्वास उरला नव्हता.

---

त्याने नंतर कृपाच्या मेसेजला उत्तर द्यायला फोनच केला तिला. भरभरून तो बोलत राहिला. कृपा ऐकत राहिली. तिचा एक डोळा हसत होता एक रडत होता. त्यानंतर कृपा जास्तीत जास्त वेळ कॉलेज मध्ये घालवू लागली. कधी नव्हे ते एकदम सिन्सियर स्टुडन्ट बनली. तिच्या ममाला जरा आश्चर्य वाटले पण बरेही वाटले. एकतर ती इथे डोळ्यांसमोर राहील. शिवाय हळू हळू तिला आपल्या बिझिनेस मध्ये इन्व्हॉल्व्ह करून घेऊ म्हणजे परत त्या भिक्कारड्या देशात जायचे नाव काढायची नाही.

आपलं मन आपल्यालाच नीट कळलं नाही, तर आनंदला कळावं ही अपेक्षा फार चुकीची आहे हे कृपाला कळत होतं. अमेरिकेत आल्यावर जेव्हा प्रत्येक गोष्टीत तिला आनंद आठवू लागला तेव्हा तिचं मन तपासताना तिला तिच्या खऱ्या भावनांचा सुगावा लागला होता. ही गोष्ट फोनवर बोलण्यासारखी नव्हती आणि आनंद मुळात कोण्या मुलीच्या प्रेमात पडेल ही शक्यताच तिच्या मनात आली नव्हती. आता फार उशीर झाला होता. शिवाय ज्या पद्धतीने आनंद सईच्या प्रेमात आकंठ बुडाला होता तसा तो इतर कोणाच्याही अगदी तिच्या स्वतःच्याही प्रेमात पडणार नाही याची तिला खात्री होती.

तिचा उतरलेला चेहरा, मेलेली भूक, हे काहीच तिच्या ममाच्या लक्षात आलं नाही कारण तिचं तितकंसं लक्ष नव्हतंच कृपाकडे. कृपा रोज हजारदा फोन हातात घेई आनंदाशी बोलण्यासाठी, मेसेज करण्यासाठी आणि परत ठेवून देई. पण कुठेतरी तिच्या मनाने सईचे अस्तित्व मान्य केले आनंदाच्या जीवनात, आणि ती दोन पावले मागे गेली.

३.५

स्टडीमध्ये बसून, आनंदच्या बहुमानाच्या कार्यक्रमाच्या क्लिप्स, फोटो, पाहताना कृपा पुन्हा ते दिवस जगून आली. आठवमोहोळाला धक्का लागून आठवांनी तिच्या मनाला घेरून टाकले. बहुमान मिळालेल्या त्या सईच्या चित्राच्या स्क्रीनवरून तिने अलगद बोट फिरवलं. नकळत डोळयांच्या कडा पाणवल्याच. तिने लॅपटॉप स्क्रीन बंद करून तीच खुर्ची रिक्लाईन करून डोळे मिटून पडली ती. चित्रपटासारख्या घटना डोळयांसमोरून सरकू लागल्या.

---

साधारण महिनाभर असाच गेला. ना कृपाने मेसेज किंवा फोन केला ना आनंदने. कृपाला, ते अपेक्षितच होतं. तिला काहीसं बरंही वाटलं. ती जरा सावरली असं म्हणेपर्यंत आनंदचा फोन आला.

"कसली ग मैत्रीण तू? दुष्ट कुठली. मित्राचं लग्न ठरलंय आणि ही बसलीय लांब तिकडे परदेशात जाऊन. चल निघ लगेच आणि ये इकडे. पंचवीसला लग्न आहे, माझं आणि चन्दूचं एकाच मांडवात!"

"ओह्ह! आय सी! आय मीन, काँग्रॅच्युलेशन्स!"

"एवढा थंड प्रतिसाद? काय हे? तुझ्या त्या ‘‘पी’’ बरोबर मी सूत जुळवलं नाही म्हणून एवढा राग?" कृपाला मग ते सगळं आठवलं. 'आपलं मन आपल्याला आधी कळलंच नाही.'

"हॅलो!! आहेस का? की गेलीस फोन बंद करून.?आपल्या भूमिका एकदम उलट झाल्यात की गं!" तिला हसू आलं मग.

"मग कधी येतेस? निदान एक तारखेला तरी ये. काय?"

"आनंद, अरे, आत्ता कुठे कोर्स सुरू झालाय. एवढी बुट्टी मारायला ते काय आपलं कॉलेज आहे का?"

"काय गं! पावला पावलावर तुझ्यावाचून अडतंय माझं. फोनही करत नाहीस हल्ली. काय झालय काय तुला?"

"हं! जरा गडबडीत होते रे. सेटल व्हायला वेळ लागला मला."

"बर, मग किती तारखेपर्यंत येशील?"

"अं? बघते, प्रयत्न करते. शक्यतो येते."

"कृपा? काय आहे हे? प्रयत्न करते? शक्यतो येते? नाही यायचंय म्हणून सांग ना स्पष्ट! तुझ्याकडून ही अपेक्षा नव्हती." आनंदने फोन बंदच केला.

कृपा परत एकदा ढसा ढसा रडली. "कधी जाणार ही भावना माझ्या मनातून? कधीच पूर्वीसारखी भेटू शकणार नाही का मी आनंदला?"

मग तिने काही दिवस परत स्वतःला कामात बुडवून घेतलं. कोर्स, मग ममाला तिच्या कामात मदत, पाहता पाहता पंधरा तारीख उजाडली. आनंदने त्या दिवशी जो फोन बंद केला त्यावर दोघांचा काहीच संवाद झाला नव्हता. तिने तिकीट बूक केलं दुसऱ्या दिवशीचं, ती मुंबईत उतरली तेव्हा सगळं परत

तिला धुंडाळत आलं. तिने निग्रहाने त्या आठवणी बाजूला केल्या. कॉलेजमध्ये गेल्यावर लक्षात आलं तिच्या, आनंदने कोणालाच कळवलेलं नाही. कृपाने सगळ्या पंटरना तयार केलं.

"आंद्याच्या लग्नाला जायला आमंत्रण कशाला? जाऊ की असेच!"झालं, पलटण निघाली. दोघांनी आपल्या कार घेतल्या आणि साताठ जण निघाले.

रामनगरमध्ये शिरून घर शोधेपर्यंत बरीच रात्र झाली. आता त्याला फोन करण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. कृपाचा फोन पाहून आनंदने लगेच उचलला.

"येतेस ना?प्लीज ये. मला काही सुचत नाहीय! "

"असं म्हणतोस? बर, मग दार उघड!"

"काय?" आनंद ताडकन उठला. "ओह्ह! मला आधीच कळायला हवं होतं. हे भूत असच हजर होणार!"

बोलत बोलतच त्याच्या आवाजात हास्य आलं. तो बाहेर आला. पूर्ण गॅंगला पाहून उडालाच! दारात एकच कल्ला झाला मग. अनुराधा, अनंत, चंदू सगळेच बाहेर आले. लग्नघर दुमदुमायला लागलं.

मग सगळ्यांच्या सोयी लावण्यात, जेवण खाणात अर्धी रात्र उलटून गेली. सगळे झोपल्यावर कृपाशी नीट बोलता येईल हा आनंदाचा कयास चुकला.

"काकू मी तुमच्याबरोबर येते झोपायला" असं म्हणत कृपा अनुराधेबरोबर गेली. 'आपलं लग्न ठरल्यावर एवढं सगळं बदललं' असा प्रश्नही त्याला पडला.

---

सकाळपासूनच कृपा फार अस्वस्थ होती. आजतागायत कधीही ओळख नसलेली एक भावना आतून तिला जाळत होती. आजपर्यंत 'सई' हे केवळ एक नाव होतं, पण आज प्रत्यक्ष हाडामासाची व्यक्ती तिच्या समोर येणार होती, आनंदसारख्या व्यक्तीला जिने संपूर्ण बदलवून टाकले होते. आता तिला आनंदने तिचे केलेले वर्णन एक एक करून आठवू लागले आणि तो तिच्या प्रेमात किती आकंठ बुडाला आहे हे जाणवून ती आग कित्येक पटींनी भडकली. 'यालाच हेवा म्हणतात का? की असूया? नाही, असूया नाही. असूया वाटते तेव्हा कुठेतरी त्या व्यक्तीचे अहित चिंतन होते. मी तिचे वाईट नाही चिंतत आहे पण मला तिला भेटणं जड जातंय हे नक्की.'अलीकडेच कृपाला आपल्या भावना अशा तपासून पाहण्याची सवय लागली होती. शुद्ध मनाच्या त्या मुलीला आज या तिच्या भावनांचा त्रास होत होता. सकाळी खास इकडच्या पद्धतीचा नाश्ता करून सगळे फिरायला बाहेर पडले. मुलं म्हणाली आम्ही जरा गावात चक्कर मरून येतो. आनंद कृपाला घेऊन निघाला मग. 'किती चेहरा उतरलाय हीचा. बारीकही झालीय खूप.'

"कृपा, तुझी तब्येत बरी आहे ना? पूर्वीसारखी बकाबका खात नाहीस का? डाएट वगैरेचं भूत नाही ना मानगुटीवर बसलेलं? तू परत ये बरं भारतात."

"घांव देके पूछते है, जख्म कैसा?"

"काय?"

"तू असा शहीद झालास, मग आम्ही मित्र मातम तर करणारच ना! नोशादी.कॉमचा खंदा सरदार असा धारातीर्थी पडल्यावर आम्ही शिपायांनी कोणाकडे पाहायचं?"

"ए नौटंकी! भेटली बुवा परत ती वेडी मुलगी. मी गेले काही दिवस घाबरूनच गेलो होतो की कुठे हरवली?"

कृपा फिकट हसली मग. बोलता बोलता ते दोघे मंदिराकडे येऊन पोहोचले. बोलत बोलत मागे गेले. आनंदला, कृपाला ती जागा दाखवायची होती जिथे तो सईला प्रथम भेटला.ते त्या झाडाखाली पोहोचल्याबरोबर वरून कृपाच्या गळयात एक नाजूक सुगंधी सुरंगीची माळ पडली. ती दचकून वर पाहीपर्यंत सई टपकन उडी मारून समोर उभी राहिली आणि तिने दोन्ही हात पसरून कृपाला मिठीत घेतले. हे सगळं कृपाला आणि आनंदालाही इतकं अनपेक्षित होतं की दोघे चकित झाले. कृपाला सईच्या त्या स्पर्शात काहीतरी विलक्षण गवसलं आणि तिच्या हृदयातील आग हळू हळू शांत होत गेल्याचं तिला जाणवत गेलं. आनंद तिच्यापासून दूर होतोय ही भावना

जाऊन, सई तिच्या आयुष्यात ऍड झाल्याचा स्पष्ट अर्थ तिच्या मनी उतरला. मग सईने तिला आपल्यासमोर धरत तिच्या डोळ्यात पाहिले आणि म्हणाली, "मला दोन व्यक्तींच्या होकाराची खूप गरज होती या नात्यात, एक अनुकाकू आणि दुसरी तू. अनुकाकूचा होकार मिळाला तिच्या प्रेमातून, आता तू सांग, कारण आनंदाच्या तोंडून गेल्या या सर्व दिवसात तुझा उल्लेख इतक्या वेळा ऐकलाय की तू त्याच्या मनाच्या खूप जवळही आहेस आणि त्याला उत्तम ओळखणारीही आहेस. तो म्हणतो कृपाला भेटलीस की खरा मी कसा आहे ते तुला कळेल. ती अगदी माझ्या आतल्या खऱ्या आनंदसारखी आहे." कृपाने चमकून प्रथम आनंदाकडे आणि मग सईकडे पाहिलं! हळूहळू डोळ्यातून आसवांच्या लडी उलगडत गालांवर पसरल्या. तिने अलगद सईला परत मिठीत घेतले आणि मनातल्या मनात म्हणाली "थँक यू!! थँक यू!! थँक यू!!"

सई बरोबरची भेट कृपाच्या आयुष्याला एक निराळाच आयाम देणारी ठरली. 'प्रेम! प्रेम होतं आपलं आनंदावर, एक प्रकारचा हक्क होता, आतून शांत वाटायचं तो आपल्या आसपास असला की. वयामुळे आकर्षणही होतं, आहे, पण ती फार नंतरची भावना!!' तिला तिच्या नसा एक एक करत सैलावत असलेल्या जाणवल्या सईच्या मिठीत. इतक्या दिवसांचा त्यांना पडलेला पीळ सुटत चालला. मग तिने हात लांब करून आनंदालाही जवळ बोलावले. त्याने दोघीनाही मिठीत घेतले.

पुढचे दिवस भराभर गेले. काही ना काही धार्मिक विधी, सायंकाळी अंगणात बसून गप्पा, गाणी, गोष्टी, आचाऱ्याने बनवलेल्या निरनिराळ्या पदार्थांवर ताव मारणे, आदी गोष्टीत मजेत दिवस जात होते. तिची, सुकन्या, पुष्पा, चंदू, वरूण बरोबर गट्टी जमली. अनुराधेमधे तर तिला तिच्या मनातील आई सापडली. एकदा अनुराधा सर्वांच्याच केसांना तेल लावून देत होती, कृपाला तेल लावत असताना बोलता बोलता कृपा पटकन म्हणाली, "काश, माझी ममा तुझ्यासारखी असती!" अनुराधेचा हात एकदम थांबला. तिने कृपाला आपल्याकडे वळवले. ती म्हणाली, "कृपा, तुला एक सांगू? कोणतीही आई आपल्या अपत्यावर जे प्रेम करते त्याची तुलना इतर कशाशीच होऊ शकत नाही, याचं कारण आईसाठी तिचं मूल हे तिचाच एक भाग असतं, तिचंच एक अंग असतं. ईश्वरी रचनाच तशी आहे. पण एक विसरू नये की तीही, सर्वांसारखी गुणदोषयुक्त माणूस असते, त्यामुळे तिची प्रेम दाखवण्याची पद्धत वेगळी असू शकते. जेव्हा ती आपल्या अपत्याला चुका दाखवते तेव्हा तिचा स्वर इतरांपेक्षा कित्येक पटीने तिखट होतो, कारण तिला ती तिचीच चूक वाटते. दुसऱ्याची नाही. ठेवशील ही गोष्ट लक्षात?" कृपा पाहतच राहिली. मग तिने अगदी हलकी मान हलवली. अनुराधेनें मग हसून तिला वळवले आणि ती तेल लावायला लागली तिच्या केसांना.

---

लग्नाचे दोन दिवस तर नुसती धमाल सुरू होती. लहान गावातील लग्न. दारात मांडव. गावातील मंडळी घरचं लग्न असल्यासारखं राबत होते.

कंपनीतील कामगार बायका, पुरुष ज्यांनी चंदू आणि आनंदाला लहानपणापासून पाहिले होते, त्यांच्यासाठी हे फार प्रेमाने पार पाडण्याचे कार्य होते. अनुराधा, अनंत, काका, काकू, आजी आजोबा, आण्णा, वसंत काका आणि अगदी वासंती काकूही या सर्व घरच्या दारच्या मंडळींना आग्रहाने खाऊ पिऊ घालण्याचे काम करीत होते. वहिनींना गुडघ्याचा त्रास नको म्हणून अनुराधा त्यांना जपत होती.

आनंदा एकदा काकूला म्हणाला, "काकू, आता करच बाई ऑपरेशन, या दोन्ही सुना काही भाकऱ्या थापायला शिकतील असं वाटत नाही, काय म्हणतोस चंद्या?"

"माझ्या सुनांना नाव ठेवायचं नाही बरं का, सांगून ठेवते. थापेन मी भाकऱ्या होइल तेवढं, आणि मग तुम्ही शिका! त्या तुमच्या खांद्याला खांदा लावून काम करणार ना? मग?" काकूंनी ठणकावलच दोघांना!

"आता आपलं म्हणावं असं इथे कोणी उरलं नाही रे चंद्या," आनंद हसत हसत म्हणाला. लग्न एका मांडवातच पण वेगवेगळ्या मुहूर्तांना झालं.

दोन्ही वधू नक्षत्रासारख्या सुंदर दिसत आहेत यावर सगळ्यांचच एकमत झालं. कन्यादानासाठी खाली बसलेले उठायची वेळ आली तशी काकांनी काकूला हात दिला, तो धरताना काकू चक्कं लाजली आणि सर्वांना फार हसू आलं.

लग्न लागली. झाल धरताना सर्वांचेच डोळे भरून आले. अनुराधेनें दोन्ही सुनांना जवळ घेऊन आता मला तीन मुली आहेत असं सांगितलं. इतका वेळ हास्य विनोदाचं वातावरण काहीसं हळवं झालं. ती उडाणटप्पू कंपूतील मुलंही हे पाहून जरा निवळली. न शिकवता बरच काही त्या क्षणात शिकली. कृपाला त्या शेवटच्या क्षणी आता आपलं नातं केवळ मित्रत्वाचं उरलं ही जाणीव प्रकर्षाने झाली, पण त्यातील डंख आता उरला नव्हता. कृपाच्या डोळयांसमोर आजही ते सर्व चित्र जसंच्या तसं उभं राहिलं.

३.६

आनंद आणि सईचे पुढचे काही दिवस,. महिनेच खरंतर, पंख लावल्याप्रमाणे भुर्रकन उडून गेले. दोघांना एकमेकांशिवाय काही दिसत नव्हतं. प्रणयरंग खुलून आले.

अनुराधेला वाटणारी आनंदाची काळजी आता बरीच निवळली. चंदू आणि सुकन्याला मात्र सुरुवातीचे काही दिवस सोडल्यास बराच विरह सोसावा लागला कारण सुकन्याचा कोर्स सुरू झाला. इकडे चंदू कंपनीच्या आणि नव्याने आलेल्या भूमकरांच्या कामात पूर्ण अडकलेला.

आनंदाच्या ही गोष्ट लक्षात आल्यावर त्याने बराच भार स्वतःवर घेतला. आठवड्याचे चार दिवस चंदूने इकडे राहावे. आणि तीन दिवस सुकन्याकडे जावे असा हुकुमच काढला त्याने. आनंद कंपनीत लक्ष घालू लागल्यावर सई देखील अधून मधून तिकडे जाऊ लागली. पुष्पा आता चांगलीच तयार झाली होती. जरा फटकळ होती पण हळू हळू कामगार बायकांची नस तिला सापडू लागली होती. तिलाही आता लग्नाचे वेध लागले. काकू तशाही सारख्या मागे लागल्याच होत्या की मुलीला घरी बसवून आपण मुलांची लग्ने लावतोय हे काही ठीक नाही.

त्याच स्थळाशी लग्न ठरवून ठेवले होतेच. सुकन्या सहा महिन्यांनी परत आली की बार उडवून द्यायचा असे ठरले मग. अनुराधा आणि सईमध्ये एक निराळाच बंध निर्माण झाला. सई मनाने अगदी लहान मूलच होती.

त्यामुळे ती अगदी मोकळया मनाने सर्वांशी वागे. तिचा आवडीचा टाईमपास होता सगळ्यांकडून आनंदाच्या लहानपणीच्या गोष्टी ऐकणे.

काकू आणि आजी आवडीने तिला हे सांगत. चंदू तिला आनंदाचा खोडकरपणा रंगवून सांगे. आपल्या माणसाच्या जडण घडणीतले हे बारकावे त्याच्या अंतरंगात डोकावून त्याला अधिक समजावून घेण्याची, पाहण्याची संधी तिला देत.

एकदा बोलता बोलता आजीच्या तोंडून "तो नाहीसा झाला तेव्हा" असा संदर्भ गेला आणि आजी एकदम गप्प झाल्या. काकूंनीही पटकन विषय बदलला. सई तिच्या स्वभावाप्रमाणे एकदम जोरात म्हणाली "काय आनंद नाहीसा झाला होता?" आजींना काय बोलावे कळेना. त्या एकदम गप्प होऊन तिथेच बसलेल्या आजोबांकडे पाहू लागल्या. आजोबा म्हणाले "सई, जरा चहा टाकतेस? घसा काहीसा खवखवतोय माझा."

"हो लगेच आणते करून. सगळ्यांनाच करते मस्त आल्याचा चहा."

सई आत गेली खरी पण आत्ता जे ऐकलं ते तिच्या डोक्यातून जाईना. सगळ्यांनी विषय बदलला हे ही तिच्या लक्षात आलं. 'कोणाला विचारावं?'

मग संध्याकाळी आनंद आला की त्यालाच विचारायचं ठरवलं तिने. आजी मात्र फार अस्वस्थ झाल्या.

---

"ए नवऱ्या! मी रुसलेय आज?"

"का बुवा?"

"मग काय तर! मी माझ्या सगळ्या बारीक सारीक गोष्टी तुला सांगत बसते. माझा शाळेचा पहिला दिवस, पहिली छडी, इतकंच काय माझ्या मित्रमैत्रिणीविषयीही तुला सगळं माहित आहे. आणि तुझ्याविषयी, लग्नाला सहा महिने होत आले तरी मला काही फारसं माहित नाही."

"अरेच्च्या! आता काय माहित नाही म्हणे? मनातली प्रत्येक गोष्ट तर तुला सांगतो. असं कधीच कोणाशी बोललो नाही मी."

"मग तू एकदा नाहीसा झाला होतास हे कुठे नाही सांगितलंस ते?"

आनंद एकदम चमकला. मग सईचे दोन्ही हात हातात घेऊन म्हणाला, "लपवायचं होतं असं नाही, खरं सांगायचं तर मी ही तो मनाचा दरवाजा फारसा उघडत नाही. पण तुला सांगायलाच हवं. आणि नुसतं सांगणार नाही. दाखवायला घेऊन जातो तुला. मलाही कित्येक वर्षांपासून जायचंय एकदा."

सई मग आपल्या या कॉम्प्लेक्स मनाच्या नवऱ्याकडे पाहत राहिली. 'किती निरनिराळी रूपं आहेत याची. नेहमी अगदी गंभीर प्रवृत्तीचा वाटतो, वागतोही तसाच, आणि कधीतरी अगदी एक लहान मूल लपून बसलंय आत असा भास होतो.

---

त्या रात्री आनंदने सईला अगदी लहान असल्यापासूनची एक एक बारीक सारीक घटना सांगायला सुरवात केली. पाहता पाहता लडी उलगडू

लागल्या. त्याच्या मनात इतके काय काय बारकावे दडून बसलेत हे आनंदालाही नवीन होतं.

मध्यंतरी अनुराधेला त्याने सर्वसाधारण सर्व घटना सांगितल्या होत्या पण तिच्या तेव्हाच्या स्थितीत त्रास होऊ नये हे भान ठेवून तो बोलला होता. त्यात आपलं मन मोकळं करणं यापेक्षा आईच्या मनाला शांतता देणं हा उद्देश अधिक होता.

आजपर्यंत कधीही कोणाशी न बोललेल्या गोष्टी, त्याच्या त्यावेळच्या भावना, त्याच्या मनाची झालेली घालमेल, रुतलेले शब्द, झालेल्या जखमा, सगळं सगळं धरणातून पाणी सुटावं तसं, धो धो प्रवाह वाहू लागला. एखादी व्यक्ती अशी असते की तिच्यासमोर मनाला पूर्ण उलगडून ठेवावंसं वाटतं किंवा नकळत तसं ठेवलं जातं. आनंदाच्या आयुष्यात ती व्यक्ती सहचरी होऊन आली होती. ऐकता ऐकता सईला आनंदाच्या स्वभावाचे मूळ कंगोरे, त्यावर त्याने बसवलेले पहारे, बदलत गेलेला स्वभाव, अनेक गोष्टी उमजत गेल्या. त्याच्या प्रवाहाला जराही न थोपवता सई समजून घेत ऐकत राहिली. असं जराही निवाडा न करता ऐकणं ही देखील एक कला आहे. इतर वेळी अखंड बडबडणाऱ्या सईला ही कला उत्तम अवगत होती आणि ती कधी वापरायची यांचं योग्य भानही होतं.

मध्यरात्र उलटून गेली तरी आनंद बोलतच होता. त्या डोंबारी कुटुंबाविषयी ऐकताना, तेव्हा आनंदाच्या विचारांमध्ये झालेले बदल ऐकताना सईला विस्मय वाटला. तो निकराचा क्षण त्याच्या आयुष्यात किती

महत्वाचा होता याची जाणीव होऊन ती शहारली. घडलेली घटना अयोग्यच, पण आज जो विचारी, कशानेही डगमगून न जाणारा आनंद आपण पाहत आहोत, तो तसाच घडला असता का? तिच्या मनात अनेक विचार आले. आनंदाने आईशी न केलेल्या संवादाची तिला हळहळ वाटली. पाहता पाहता पहाट होत आली. दोघांनाही झोपेने घेरले मग. झोपतानाच्या शेवटच्या विचारात सईने आजींचे मनोमन आभार मानले. त्यांनी विषय काढला नसता तर तिला आनंद असा नव्याने कळला नसता.

———

कृपा परत आल्यावर तिला एक पोकळी जाणवत होती, पण त्यात आता सल नव्हता. ती परत आपल्या व्यापात गढून गेली. सई आणि आनंदाशी तिचे वरचेवर फोन, मेसेजद्वारा संभाषण सुरू राहिले. सई बरोबर जरा जास्तच. अनेक विषय, पार फॅशन पासून वैचारिक चर्चांपर्यंत, त्यांच्या गप्पात असत. दोघीही बडबड्या, त्यामुळे चंदू आणि आनंद म्हणत, फोन कंपन्या या दोघींच्या जीवावर चालतात.

सुकन्याबरोबर मात्र अजून म्हणावा तसा संवाद साधणे सईला जमले नव्हते. एकतर लगेचच ती कोर्सला गेली, आणि मुळातच सुकन्या अबोल होती.

पुष्पाचा स्वभाव सईला साधारण लक्षात आला होता. एकीकडे थोडासा हेवा, थोडीशी चुरस, पण आनंदाविषयी प्रेम, काहीसा आदर, असं सगळं रसायन होतं पुष्पा. सई तिच्याशी तिच्या आवडीच्या विषयांवर

बोलण्याचा प्रयत्न करी, पण त्यात चर्चा कमी व मतप्रदर्शन जास्त असं होत असल्याचं तिच्या लवकरच लक्षात आलं. पण पुष्पाची मात्र सई लाडकी भावजय झाली. सुकन्याचा स्वभाव जरा रोखठोक, शिवाय कंपनीत ती तिची वरिष्ठ, याचा नाही म्हटलं तरी दबाव होताच. त्यामानाने सईशी बोलणं तिला सोपं वाटायचं.

मग ठरल्याप्रमाणे सई आणि आनंद आजोबांच्या गावचा प्रवास करायला निघाले. सुकन्यालाही तीनचार दिवस सुटी मिळणार होती, मग चौघांनी मिळून जायचं ठरलं. चंदूला ड्रायविंग मनापासून आवडायचं. मध्यंतरी त्याने गाडीही घेतली होती. लहान गावात क्वचितच ती बाहेर निघायची. त्यामुळे चंदू जाम खुशीत होता. तिघे घरून निघाले, वाटेत सुकन्याला घेऊन पुढे जायचं होतं. सईची काही ना काही विषयावर बडबड सुरू होती. चंदू आणि आनंदही तिला सामील होत होते. अधून मधून तिची फिरकी घेत होते. तिला ते कळत होतं आणि तरी ती त्याचीही गम्मत घेत होती. मग सुकन्या आली. आनंद पुढे बसला होता, तो उठून मागे येऊ लागला तसं सुकन्या म्हणाली "तुम्ही पुढेच बसा, मला भीती वाटते पुढे बसलं की."

"तू आनंदला अहो का म्हणतेस? चंदू मोठा असून मी अरेजारे म्हणते."

"पहिल्यापासून तसं म्हणते ना, आता नाही बदलता येत."

"चंदूला बरी ग अरेजारे करायला लागलीस!"आनंद तिला चिडवत म्हणाला.

"अरे बाबा गप्प बस आता, मला किती कष्ट पडलेत त्यासाठी तुला काय माहित!!" चंदू म्हणाला. हसत खेळत, खात पीत प्रवास सुरू झाला. चौघेच असल्याने आणि मोठं कोणी नसल्याने एक प्रकारचा मोकळेपणा गप्पांमध्ये होता. सई अनेक विषय काढून सुकन्याशी गप्पा मारत होती पण म्हणावी तशी सुकन्या मोकळी होत नाहीय हे तिला जाणवत होते. 'काय कारण असावं?'

सुकन्या या प्रवासाचं ठरल्यापासूनच विचार करत होती. नाही म्हटलं तरी सई, शहरात राहिलेली, श्रीमंत माहेर असलेली. लग्नात आहेर वगैरे बाबतीत दोन्ही बाजूंमध्ये बरीच तफावत होती. बाकी कोणी चुकूनही काही बोलले नाही, उलट आजी म्हणाल्या "सई, तुझ्या आईने खूप भारीतील लुगडे दिलेय खरे पण मला जड होतात जरीची लुगडी. मी नेसेन एकदा, पण नंतर तुम्ही पोरीच वापरा ते." सुकन्याच्या आजीने दिलेला पोथी ठेवण्याचा लाकडी स्टॅन्ड मात्र आजींनी रोज वापरायला सुरवात केली होती.

पुष्पा आणि वासंती काकूंनी मात्र, जवळ इतर कोणी नाही असे पाहून सुकन्याला ऐकू जाईल अशा बेताने आहेरातील ही तुलना बोलून दाखवली होती. तिला त्या दिवशी खूप वाईट वाटले होते. आज आल्याबरोबरच सईच्या गळयात सुकन्याच्या आजीने स्वतः तयार करून नववधूना भेट दिलेला आर्टीफिशियल मोत्यांचा सर पाहून तिला आश्चर्य आणि आनंद वाटला. सईचे लग्नातील दागिने पाहून ही मुलगी आपल्या आजीने दिलेल्या सराला हातही लावणार नाही असं वाटलं होतं तिला. पण आत्ता सईचे

मोकळे वागणे, तिच्या कोर्सबद्दल जाणून घेण्यासाठी प्रश्न विचारणे,घरून आणलेले खाद्यपदार्थ आग्रहाने तिला खाऊ घालणे, चंदू आणि तिच्या प्रेमकहाणीबद्दल त्या दोघांना चिडवणे वगैरे गोष्टींमुळे तिला आपण या मुलीबद्दल उगाचच ग्रह करून घेतला होता असे वाटले.

मग सई म्हणाली, "सुकन्या तू लवकर परत ये, मला कधी कधी मी करते, बोलते ते बरोबर की चूक कळत नाही. तू असतीस तर असं भांबावल्यासारखं झालं नसतं मला." या वाक्याचं सुकन्याला फार आश्चर्य वाटलं. या मुलीला काय सगळं सोप्पंच असणार असा तिचा समज झाला होता. या वाक्याचा किती चांगला परिणाम या दोघींच्या नात्यावर होणार आहे असा विचार चंदूच्याही मनात आला. सुकन्याला सईच्या सौंदर्याचे, श्रीमंतीचे, एक प्रकारचे दडपण आहे आणि त्यामुळे ती जरा दूरच असते तिच्यापासून हे चंदूच्या पहिल्या काही दिवसात लक्षात आले होते. हा प्रवास त्यादृष्टीने त्यालाही महत्वाचा आणि परीक्षेचा वाटत होता.

"अगं, अनुकाकू असल्यावर कसलीच काळजी करू नकोस. त्या सगळं सांभाळून घेतात." सुकन्या म्हणाली.

"हो आई आहेत म्हणून निभाव लागलाय माझा. परवा मी आण्णांना वाढताना माझा डावा हात पुढे आला. डावखुरी आहे ना मी, तर आई पटकन पुढे झाल्या आणि त्यांनी पळी उजव्या हातात दिली माझ्या. नंतर म्हणाल्या, "अगं तुझी चूक नाही, नैसर्गिक आहे ते, पण जुन्या लोकांना नाही ना पटत

तर तेवढ्यापुरतं ठेव लक्षात." बोलता बोलता प्रवास कधी पार पडला कळलाही नाही.

---

गेल्यावर सगळ्यांनी मिळून बाहेरची खोली साफ केली. मग सगळे फिरायला बाहेर पडले खाऊन पिऊन.

आनंद त्यांना तळ्याकाठी घेऊन गेला. सईला आता ते केवळ निसर्गरम्य ठिकाण नव्हते. लहान आनंदाच्या मनातील कित्येक भावभावनांचे रंग त्या चित्रावर तिला दिसत होते. आजोबांचे तिला खूप कौतुक वाटत होते. तेवढ्यात तिला एक झाड दिसले आणि ती पटकन त्यावर चढली.

"सई", सुकन्या आश्चर्याने ओरडली. सगळे ते पाहून हसू लागले आणि तेवढ्यात सईला झाडावरच्या मुंग्या एकदम चावल्या. तिचा हात सटकला आणि ती पडली. पाय जबरदस्त मुरगळला. सगळे एकदम धावले. आनंद तर घाबरलाच. सुकन्याने प्रथम तिला पाणी दिले. मग पाय हलवून पाहायला सांगितला. मग गाडीतून स्प्रे आणून तो पायावर मारला. "आनंद भावजी तुम्ही तिला आधार द्या, मागची सीट मी रिकामी करते म्हणजे पाय लांब करून बसता येईल तिला."पाहता पाहता सुकन्याने सूत्र हाती घेतली. "गावात आहे का हाडाचा डॉक्टर पाहूया किंवा एखाद्या हॉस्पिटल मध्ये जाऊ."सई, वेदनेने तळमळत होती. सुकन्या तिच्या डोक्याशी बसली. सईने

तिचा हात घट्ट पकडून ठेवला. एक्सरे काढल्यावर फ्रॅक्चर नाही हे कळलं. क्रेप बँडेज आणि गोळयांवर काम भागलं. मग सई जरा शांत झाली.

चंदू आणि आनंदने तिला मग तिच्या लहान मुलासारखं रडण्यावरून खूप चिडवलं. ती ही त्यांच्याबरोबर हसू लागली. सुकन्याला वाटलं होतं ती चिडेल, पण तिचा हा खेळकर स्वभाव पाहून तिला खूप मजा वाटली. सई म्हणाली, "सुकन्या तू नसतीस तर या दोघांना मला आवरणं फार कठीण झालं असतं. नशीब त्या डॉक्टरने इंजेक्शनचं नाव नाही काढलं, मी अक्ख हॉस्पिटल डोक्यावर घेतलं असतं." एकमेकांच्या आजपर्यंत न कळलेल्या स्वभावाच्या बाजू समोर येत होत्या. दुसरे दिवशी आनंद त्यांना शंकऱ्या रखमाच्या गावी नेणार होता. चंदूला घटना माहित होती पण बाकी संदर्भ विशेष माहित नव्हते. मग सईने मागच्या सीटवर एक पाय सुकन्याच्या मांडीवर ठेऊन, प्रवासात सर्व हकीगत थोडक्यात सांगितली. वाक्यावाक्याला सुकन्याचा चेहरा बदलत होता. आनंद तिला नव्याने समजत होता. चंदूचे मन परत एकदा आपल्या या लाडक्या भावासाठी भरून आले. आनंदने मॅप लावल्यामुळे गावात पोहोचणे फारसे अवघड नव्हते. पण तिथे पोहोचल्यावर त्या सगळया जागा शोधणे तितकेसे सोपे नव्हते. शिवाय त्याचे मनही थाऱ्यावर नव्हते. 'शंकऱ्या, रखमा वगैरे कोणी असतील का? भेटतील का? भेटले तर ओळखतील का?'हजार प्रश्न त्याच्या मनात येऊन गेले. गाव बराच बदलला होता. नव्या इमारती उभ्या राहिल्या होत्या. पूर्वीची सलून, चहाची टपरी यांचा मागमूसही नव्हता. मग त्याला अचानक त्या गोधड्या शिवून

दिलेल्या घराची आठवण झाली. ती घरे मात्र तशीच होती. मग त्यावरून आठवणीत येईल तसा त्या त्या दिशेने शोधत तो एका पडक्या भिंतीजवळ पोहोचला. 'हीच का ती जागा?' मग गाडीतून उतरून तो भिंतीजवळ गेला. अत्यंत काळवंडलेली ती भिंत, त्याने अधिक जवळ जाऊन पाहिले. घराला आग लागली असावी कधीतरी. काजळी होती सगळी. तो वळसा घालून पुढे जाणार एवढ्यत भिंतीवर माकडाचे चित्र दिसले. तो एकदम थबकला.

'हेच ते घर. हेच ते अंगण जिथे माझा मला शोध लागला. हेच ते अंगण जिथे मी माझं बालपण कायमचं मागे सोडलं. हीच ती जागा जिथे माणुसकी आणि अमानुषपणा या दोन्हीची ओळख झाली.'

एव्हाना चंदू मागोमाग आला होता. सईही सुकन्याचा आधार घेऊन आली होती. आसपास कोणाचा मागमूस नव्हता. घर म्हणण्यासारखं काही उरलच नव्हतं. त्याने पुढे जाऊन तो ओढा पाहायचा ठरवलं. पाणी फार नव्हतं ओढ्याला. एक गुराखी गुरं पाण्याला सोडून बसला होता.

आनंद त्याच्याजवळ गेला. गुराख्याने नुसतं मान वर करून पाहिलं. आनंदने त्याला इथे असणाऱ्या घराबद्दल विचारलं.

"तीन वर्साखाली आगीत जळळ ना ह्ये खोपट."

"आणि इथे राहणारी माणसं?"

"न्हाय,तवा बी ऱ्हायला नव्हतं कोनी! राम्या नौकरीला चिकाटला तवाच गावात ग्येला न्हवं काय ऱ्हायला."

"गावात? कुठे?"

"त्ये तिकडं पल्याड टोकीजपाशी."

"मला दाखवाल घर?"

"आवं राम्या टोकीजातच हाय कामाला. राम्या डोरकिप्पर इचारा, कोण बी सांगल."

"तुमी कोन पावने म्हनाइचे?"

"मी आनंद!"

"जावा इचरा, गावंल त्यो."

आनंद अतिशय उत्तेजीत दिसत होता. तो म्हणाला "मिळाला पत्ता." सगळे मग टॉकीजच्या शोधात निघाले. राम कामावरच भेटला. त्याला लगेच ओळख पटली. "तुमाला कसा इसरनार! आयचा दिस जात न्हाय तुमची सय काढल्याबिगर." पूर्वीचं त्याचं ‘आणंद’ म्हणणं आठवलं आनंदला. पण आता मोठा झाल्यावर मात्र तो अहोजाहो करत होता. आता ते निरागस बालपण नव्हतं ज्यात केवळ मैत्री असू शकते. त्याच्या मध्ये कोणताच अडसर नसतो.

तो त्यांना घरी घेऊन गेला. पुढे व्हरांडा असलेलं बैठं घर होतं. एक म्हातारीशी बाई तिथे लहान बाळाला खेळवत बसली होती. रामने लांबूनच साद घातली. "आये, कोन आलंय बग!"

त्या बाईने कपाळावर हात धरत नजर बारीक करून पाहिलं. 'दोन शरातल्या बाया न बापे,. कोन म्हनाव तरी?' ती जमिनीवर हात टेकत उठली.

आनंदा पटकन पुढे झाला. "आई, ओळखलस?"

"आगं बाय माजे, पोरा क्येवडा मोटा जालास रं? माला आय म्हननारा या दोगांबिगर दुसरा कोन आस्नार आणन्दा सिवाय?" तिने त्याच्या तोंडाकडे एकवार नीट पाहिलं, मग हात फिरवून कडकडा बोटं मोडली. रखमाचं कपाळ पांढरं होतं. आनंदाने सर्वांची ओळख करून दिली.

तिने रामाच्या बायकोला बोलावून "चा टाक सम्द्यास्नी" म्हणाली. "चंदीचं लगीन जालं. तिलाबी पोरगा हाय एक."

"तू गेल्यावर दोनच वर्सात धनी ग्येले. तुज्या आयबापानी या पोरांना शाळत घातलं, त्येचा समदा खर्च उचिलला. मानसात आनलं माज्या पोरांना. द्येव हमीशा भलं करल बग त्येचं."रखमाला गहिवर आला.

सगळेच जण आश्चर्यचकित झाले. 'आईबाबांनी कधी शब्दही उच्चारला नाही याबद्दल. आपल्या आईच्याच वयाची पण किती वयस्कर झाली ही. आयुष्याच्या अनेक खस्ता खाऊन शरीर म्हातारं झालं लवकर. ' राम कामावर परत जायला निघाला. चहा घेऊन हेही निघाले.

दोघीनी बाळाच्या हातावर पैसे ठेवले खाऊला. रखमाने सुनेकडून ओटी भरली दोघींची धान्य हळकुंडाने. "पुडच्या डाव, कूस उजवू दे ग बाय दोगीची." रखमाने तोंडभरून आशीर्वाद दिला.

३.७

पुष्पाचं लग्न झालं आणि लगेच काकूंच्या गुडघ्याचं ऑपरेशन झालं. पुष्पाच्या लग्नात अनुराधा आणि अनंतानेच सर्व विधी केले. वहिनींना एवढा वेळ खाली बसणं जमलंही नसतं आणि त्या म्हणाल्या "अनुराधे, तू पोटच्या पोरीपेक्षा जास्त केलं आहेस तिचं, तुलाच खरा अधिकार कन्यादानाचा." पण कन्यादानाच्या वेळेस अनुराधेने, काका काकूंना, वसंत वासंतीलाही त्या विधीपुरते वर बोलावले.

पुष्पाला सईने मस्त सजवले होते. 'रडलीस तर सगळं काजल गालांवर उतरेल' असं सांगितल्याने ती कितीही रडू येत असून बिलकुल रडली नाही. सुकन्या आणि सई एकमेकींकडे पाहून हळूच हसत होत्या.

ती निघाल्यावर मात्र सर्वांनाच अश्रू आवरणे कठीण झाले. घरातील एकुलती एक लेक कायमची निघाली सासरी म्हणून सगळेच हळवे झाले.

काकूंचे ऑपरेशनही व्यवस्थित पार पडले. अनुराधा होतीच सर्व जातीने पाहायला, पण दोन्ही सुनाही होत्या हाताखाली. अनुराधेला फार आधार वाटला या दोघींचा.

फॅक्टरीतील काम जबरदस्त वाढलं होतं. पहिल्या काही ऑर्डर्स व्यवस्थित गेल्यावर भूमकरांच्या कंपनीने ऑर्डर्स डबल केल्या होत्या. सुकन्या जो कोर्स करून आली त्याप्रकारच्या प्रॉडक्ट संदर्भात तिने प्राथमिक चाचण्या सुरू केल्या होत्या. वसंतकाकांच्या मदतीला सई जाऊ लागली.

चंदू, आनंद आणि अनंता मार्केटींगसाठी सतत बाहेर असत. पसारा वाढू लागला तसं आनंदाला त्याच्या कलेसाठी वेळच मिळेना. त्याला कधी कधी पंडितांच्या ऑफिसमधील संभाषण आठवे.

मध्यंतरी अरमानने बऱ्याच चित्रांचे फोटो मागवून घेतले होते. शमा आणि अरमान बरोबर दोन तीन कॉल्सही झाले. त्याच्या चित्रांचं एक प्रदर्शन आधी मुंबईत आणि मग सिंगापुर, लंडन वगैरे ठिकाणी भरवण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू होते. पण अजून काही चित्र असायला हवीत असं त्यांचं म्हणणं होतं. शमा म्हणाली, “मायथॉलॉजिकल स्टोरीज कर निरनिराळ्या फॉरमॅट मध्ये.” आनंदाला असं विषय वगैरे ठरवून, चित्र काढणं कधीच जमलं नाही. निसर्ग हा सर्वात आवडीचा विषय! चित्रकला त्याच्या अंत:स्फुरणाने जी उमटेल कॅनवास वर तीच आणि तेवढीच, असं असे. मग कधी एकामागोमाग एक चित्र काढली जात तर कधी महिनोनमहिने काहीच नाही. नुसती तगमग असे मनात.

लग्न झाल्यावर काहीकाळ ती तगमगही नव्हतीच बरेच दिवस. चित्र उमटे ते सईचेच. तो फोनवर "प्रयत्न करतो पण तुम्हाला हवी तेवढी चित्र झाल्याशिवाय प्रदर्शन अनाऊन्स करू नका"म्हणाला. शमा अरमानला म्हणाली, "अरमान ये 'गॅलरीवाला आर्टिस्ट' नही है! तुम उसे आसमानपर देखना चाहते हो, पर वह उसकी चाहत नही, या यूं कहे की उसका आसमान हमारे आसमानसे बिलकुल अलग है!" अरमानलाही ते पटलं. त्या दोघांनी त्याला तो वेळ द्यायचं ठरवलं.

---

एक दिवस ठरवून दोन्ही जोडया, भेळ पाणीपुरी आणि आईस्क्रीमचा प्लॅन करून गेले. जेवणाऐवजी तेच खाणार म्हणाले. दुसऱ्या दिवशी सईला उलट्या, मळमळ सुरू झाली. स्वाभाविकच घरची मोठी माणसं रागावली. त्यावर बाकीचे तिघे म्हणाले आम्हाला काही नाही झालं ते. ही सई तसलीच नाजूक नार, म्हणेपर्यंत तिसऱ्या दिवशी सुकन्यालाही तसच व्हायला लागलं.

मग मात्र लगेच दवाखाना गाठला. डॉक्टरांनी दोघीना तपासलं, काही औषधही दिली, आणि दुसरे दिवशी बोलावलं परत. औषधाचा काही परिणाम नाही. मग काही टेस्ट्स सांगितल्या. दुसरा दिवस त्या घरात आनंदी आनंद घेऊन आला. दोघीनांही डॉक्टरांनी 'गुड न्युज आहे, पाणीपुरीला काय उगाच दोष देता' असं हसत हसत सांगितलं, मग काय काळज्या घ्यायच्या, व्हिटॅमिन्स वगैरे सर्व समजावून सांगितलं.

आनंद आणि चंदूला आभाळ ठेंगणं झालं. म्हातारी मनं परत टवटवीत झाली. आण्णांनी दोघीना काही स्तोत्र दिली वाचायला. आजी म्हणाली "पोरीनो, काय काय खावंसं वाटतंय सांगा, मी घालीन करून." अनुराधा आणि काकूला तर, काय करू नि काय नको असं झालं.

अनुराधेनें दोघींच्या आज्यांना चार दिवस राहायलाच बोलावलं. घर गजबजून गेलं. काका एक दोन दिवसाआड शेतावरून काही ना काही रानमेवा घेऊन येऊ लागले.

आनंद आणि चंदू जरा वैतागलेच. "काय यार? आमचं काही कौतुकच उरलं नाही कोणाला."

स्वभावाप्रमाणे सईने मनात येईल ते सांगावे, आणि त्या दिवशी लगेच तो पदार्थ हजर व्हावा. सुकन्या काही सांगेना. अनुराधाने तिला अनेक पदार्थांची नावे घेऊन विचारावे, तरी ती काहीच बोलेना. मग एक दिवस सई म्हणाली "आई तिला मिसळ खावीशी वाटतेय"

"अरे, मग करूया की. बोलली का नाहीस?"

"तिला वाटलं, असला जळजळीत पदार्थ मागितला तर तुम्ही सगळे रागवाल."

"छे गं, आता कोणी कशासाठीही रागावणार नाही. तुम्हाला एक गम्मत सांगते. वासंतीवहिनींना एकदा अंड्याचं आम्लेट खावंसं वाटलं, ऐन श्रावण संपून गणपती यायला दोन दिवस उरलेले, मग मोठ्या वहिनींनी शेतात काम करणाऱ्या शोभीकडून वेगळया चुलीवर करवून घेतलं आणि दिलं त्यांना खायला."

दोघीही हे ऐकून आश्चर्यचकित झाल्या. इतर वेळी इतकं सोवळं ओवळं पाळणारी काकू, पण मन जपताना ते आड येऊ दिलं नाही.

सुकन्या कधी नव्हे ती हळवी बनत चालली होती. टचकन पाणी यायचं उगाचच डोळ्यात. कधी कधी एकदम भडकायाची. वैतागलीच ती. "असं काय हे?"

मग अनुराधा तिला म्हणाली, "अगं नवा जीव तयार होताना फक्त शरीरातच उलथापालथ होते असं नाही, मनातही होते. काही लाजायचं कारण नाही अश्रू आले तर, आणि रागवावंसं वाटलं तर रागाव. जरा घरात मतभेद असावेतच. पण परत दिलजमाई झाली पाहिजे ही अट घालून घ्यावी."

याकाळात सई तिला खूप जवळची झाली. एखाद्या वेळी सुकन्याचा पारा चढला की सई वाद तर घालायची नाहीच पण तिचं तोंड अगदी रडवेलं होई, लहान मुलासारखे गाल फुगत, नाक लाल होई, ते बघून सुकन्या एकदम शांत होई. तिच्या खांद्याभोवती हात टाकून 'सॉरी' म्हणे.

चंदू सुरवातीला गडबडला. सुकन्याने त्याच्यावर आवाज चढवणे त्याला अगदीच नवीन होते. इतके दिवस तो बॉस होता. लग्नानंतरचे दिवस गोड गुलाबी होते. हा अनुभव नवीन होता. हळू हळू सवय झाली त्याला. मग सुकन्याचा मूड बरा असला की त्याच्या चेष्टेला ऊत येई. दोन्ही आज्ज्या परत जाताना निश्चिन्त होऊन गेल्या. सगळे खूप आग्रह करू लागले राहण्याचा तेव्हा "परत येऊ अशाच, आणि कुठे लांब आहोत, मनात आलं की येऊ भेटायला, आता पोरींचे एवढे लाड चाललेले पाहून अगदी मन निमाले हो, आता काळजीच नाही" सईची आजी म्हणाली.

पुष्पाने नवऱ्याचे मन वळवून परत फॅक्टरी जॉईन केली, त्याची फिरतीची नोकरी, इथे राहूनही करता येणार होतीच. तिच्या येण्याने सुकन्याला जरा श्वास घ्यायला वेळ मिळू लागला.

सईचे डोहाळे कडक होते. खाण्याची इच्छा तर व्हायची, पण खायच्या वेळी घासभर खाल्लं की लगेच उलट्या सुरु. पोटात म्हणून काही टिकेना. सुकन्याचे मूड स्वीन्ज सोडले तर विशेष त्रास नव्हता.

तीन महिन्यांनी सईचा त्रास काहीसा कमी झाला. जरा तब्येत सुधारू लागली आणि सर्वांनीच हुश्श्य केलं. दोघीनाही माहेरी काही दिवस बोलावणं आलं. सुकन्या गावातच आजीकडे चार दिवस राहून आली.सई मात्र शहरात आईवडिलांकडे गेली.

लग्नानंतर प्रथमच आनंद सईशिवाय राहत होता. क्षणोक्षणी त्याला सई किती व्यापून उरलीय आपल्या मनाला याची जाणीव होत होती. आपल्यासारखा अलिप्त मनुष्य, या पोरीने आमूलाग्र बदलवून टाकला कसा याचं राहून राहून आश्चर्य वाटत होतं त्याला. आज जी जरा दूर गेलीय तर हरवल्यासारखं वाटतंय आपल्याला, ती काहीच महिन्यांपूर्वी आपल्या आयुष्यातच नव्हती, यावर त्याचा त्यालाही विश्वास वाटेना. त्याच्या या तिच्यावर संपूर्ण अवलंबून असण्याची क्षणभर भीतीच वाटली त्याला. पटकन फोन केला त्याने तिला,

"बायको! कशी आहेस?"

"मी मज्जेत! माहेरी आलेय म्हटलं!"

"बस का? इथे काय सासुरवास आहे का तुला? "

"अरे पण तरी, माहेर ते माहेरच!" ती त्याला चिडवण्याच्या उद्देशाने म्हणाली.

"बरं बरं! आता काय मजेतच आहेस म्हटल्यावर, नसशीलच येणार लवकर परत?"

"अर्रे! चोवीस तास तरी होऊ देत पूर्ण!"

"राहा राहा! मजा करा! आम्हीच इथे वेड्यासारखे कासावीस होतोय."

खुद्कन हसली मग!

"ए नवऱ्या! हे काय असं? तुही ये की मग इकडे!"

"छे छे! नको नको!!"

"का? का? आता का? तुला काय सासुरवास होणारेय का?"

"तसं नाही गं!" आपलेच शब्द आपल्यावरच उलटवले गेले हे पाहून तो खजील झाला जरा. "तू राहा छान, मस्त एन्जॉय कर, यायचं असेल तेव्हा सांग. न्यायला येतो मी."

"आता कसा शहाणा झाला माझा नवरा!!"

असं म्हणून ती हसली जोरात.

"हसू नकोस एवढी, त्रास होईल बाळाला!"

"ए, गप रे, काहीही कसं रे वाटतं तुला? असं नसतं काही होत."

"बरं बुवा! वाटलं ते सांगितलं!"

"हम्म! काळजी नको रे करूस, सगळं ठीक होईल."

"हम्म!"

"येईन आठवडाभरात."

---

सईचा फोन बंद करतोय तोच कृपाचा फोन, "काय हे, लाज वाटते का लाज?"

"ऑं! काय झालं?"

"काय झालं? बाप होणारेस एवढा आणि सांगावंसंही नाही वाटलं?"

"बघ! सईने सांगितलं ना?"

"मग काय! तीच बरीय तुझ्यापेक्षा!"

"बरं! आता मी काय बोलणार!"

"काय बोलणार काय? सांग आता कसं वाटतंय?"

"भयंकर फाटलीय माझी! पुरता बॅण्ड वाजलाय! सोपं नाही गं! केवढी जबाबदारी ही. मी पडलो सडाफटींग माणूस, सईच्या अपेक्षा काय आहेत? तिला मी कसं जपायचं काही कळत नाही!"

"बॉस! चिल्ल! ओके? सगळं बेस्ट चाललंय तुझं! सई जाम खुश आहे तुझ्यावर! आनंद शिवाय विषय नाही दुसरा तिला."

"खरं सांगतेस? का मला बरं बिरं वाटावं म्हणून?"

"बस काय भिडू? इतनाच पेचाने क्या अपुनको?"

"कृपा!!!!!"

मग खळखळून हसली ती! डोळे मात्र भरून आले. या दोघांचं एकमेकांवरील प्रेम पाहून हळवी व्हायची ती अलीकडे. आनंदवरील आपलं प्रेम बोलून दाखवता येत नाही याचं दु:ख होई तिला. पण त्याला मिळवण्याची ईर्षा नव्हती. किंबहुना विचारांती सईशिवाय आनंदला योग्य व्यक्ती कोणी नाहीच हे पटलं होतं तिला.

---

सहावा महिना लागला आणि डॉक्टरांनी 'आता दर पंधरा दिवसांनी दाखवायला यायचं, असं सांगितलं. सगळं नॉर्मल आहे, काळजीचं काही कारण नाही' असंही सांगितलं.

पण सातव्या महिन्यात मात्र सईला खूप त्रास होऊ लागला आणि डॉक्टरांनी तिला बेड रेस्ट सांगितली घ्यायला.

डॉक्टरनी त्याला सर्वसाधारण कल्पना दिली. त्या मेडिकल टर्म्स वगैरे फारशा काही कळल्या नाहीत पण सईची काळजी घ्यायला हवी एवढच समजलं. तो तिला फुलासारखी जपू लागला. सईला प्रचंड थकवा आला होता. मग तिला डायनींग टेबलपर्यंत येणंही जमेना. घरातले सगळे जण तिची काळजी घेऊ लागले. डॉक्टरांकडे कशीबशी जाऊन आली. 'बाळाची वाढ मात्र ठीक आहे,' असं सांगितलं डॉक्टरांनी तेव्हा तिच्या चेहऱ्यावर जरा

तजेला आला. पुढचे दोन महिने असच जपून जपून गेले. सईची ताकद काही म्हणावी तशी भरून निघाली नाही. तिची पचनशक्तीही नाजूक झाली होती. अगदी हलकं अन्न आणि ते ही थोडं ती एकावेळी खाऊ शकत असे. सईच्या आजारपणामुळे दोघींची डोहाळेजेवणंही झाली नव्हती. मग सई एक दिवस अनुराधेला म्हणाली "आई, माझ्या नाजूक प्रकृतीमुळे सुकन्याचीही सगळी हौस राहिली ना करायची?"

"असू दे ग, तू बरी हो आधी."

"नाही, आता बरीय मी, आता करूया डोहाळेजेवण."

"बरं, करूया."

मग अनुराधेनें छोटासा कार्यक्रम ठरवला. सईच्या घरच्यांना फोन करून सांगितलं. आईवडील तर सतत येऊन जाऊन होतेच. सुकन्याची आजी, सईची आजी गावातच होत्या. अगदी जवळच्या काही बायकांना बोलावलं. सई जराशा श्रमांनीही दमत होती.कार्यक्रम अगदी छान झाला. सई जरा दमलीच,पण ती खुशीत होती. अनुराधेनें दोघींची दृष्ट काढली मग. दोघी कपडे बदलायला खोलीत आल्यावर सई तशीच आडवी झाली. मग तिने सुकन्याला जवळ बोलावले आणि म्हणाली, "मला काही झालं तर माझ्या बाळाला तू सांभाळशील ना?" सुकन्याने तिला एकदम जवळ घेतले आणि म्हणाली, "काहीतरी बोलू नकोस अभद्र!"

"नाही, आधी वचन दे! हो म्हण!"

"हो!"मग तिने सुकन्याला घट्ट मिठी मारली.

---

आठवड्याभरातच एके रात्री सुकन्याच्या पोटात दुखू लागलं. तिला चंदू आणि अनुराधा हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले. सकाळी मुलगा झाला. सगळे जण आनंदून गेले. सई, सुकन्या व बाळाला भेटायचं म्हणून हट्ट करू लागली. आनंद मग तिला घेऊन गेला हॉस्पिटलात. सुकन्या आणि बाळाला पाहून फार आनंद झाला तिला. तिने सुकन्याचं अभिनंदन केलं. मग मात्र आनंदने जबरदस्तीने तिला घरी आणलं. एवढ्याश्या श्रमानेही ती फार दमली होती. पण बाळाला पाहिल्यापासून तिचे डोळे चमकत होते. डॉक्टर रागावलेच आनंदाला, इतका विकनेस असताना का आणलस म्हणून. दोनच दिवसात सईच्या पोटात दुखू लागलं. सुकन्या अजून हॉस्पिटलमध्येच होती. सईला घेऊन आनंद हॉस्पिटलमध्ये आला. अनुराधा तिथे होतीच. काकूही आल्या. सईच्या आईबाबांना फोन गेले. डॉक्टर ताबडतोब आले. दोन तासात सईला असह्य कळा येऊ लागल्या. एका गोंडस मुलीला तिने जन्म दिला. डॉक्टरांनी बाळाला पाहायला थोड्या वेळाने सगळ्यांना आत सोडलं आणि पाच मिनिटात बाहेर या म्हणाले.

मग त्यांनी आनंद, अनुराधा, अनंता, सईचे आईबाबा सर्वांना केबिनमध्ये बोलावून "सईची प्रकृती खूपच नाजूक आहे, रक्तस्त्राव थांबत नाहीय, आम्ही सर्व प्रयत्न करत आहोत" अशी कल्पना दिली.

आनंदला प्रथम डॉक्टर काय म्हणताहेत कळलंच नाही. काहीसा मेंदूच बधीर झाला त्याचा. मग क्षणभरात सत्य परिस्थितीची जाणीव होऊन तो तीरासारखा सईच्या खोलीकडे धावला. सगळेच मग त्याच्यामागे गेले. त्याच्या चेहेऱ्याकडे पाहिल्यावर सईला जाणीव झालीच. तिला आधीपासूनच काहीतरी वेगळं जाणवत होतंच.

"मी बाळाची जबाबदारी आधीच सुकन्याला दिलीय. तुला कोणावर सोपवू? कळत नाही."

"तुला काही होणार नाही. होऊच शकत नाही. तू बरी होणारेस!"

मग सई फिकुटसं हसली. त्याच्या हातात हात देऊन शांत राहिली. तिने बाळाला जरा जवळ ठेवून घेतले दोघांच्या मध्ये. काही वेळातच तिचा श्वास जड होऊ लागला. डॉक्टरांनी बाळाला बाहेर नेण्यास सांगितले. सई सावकाश म्हणाली "सुकन्याकडे न्या तिला" तिने बाळाच्या डोक्यावरून हात फिरवला. ऑक्सीजन लावला. ब्लड तर होतच लावलेलं. पण काहीच मिनिटात सईचा आनंदाच्या हातातील हात निर्जीव झालेला त्याला जाणवला. तिच्याबरोबर तोही जणू निर्जीव झाल्यासारखा दगडी चेहऱ्याने तसाच बसून राहिला.

---

सगळ्या घरादारावर शोककळा पसरली. म्हातारी मने परमेश्वराला जाब विचारू लागली. "तिला का? आम्ही होतो ना? "अनुराधा, अनंताला सईचे

दुःख तर होतेच, पण पोटच्या पोराची अवस्था त्यांना पाहवत नव्हती. यंत्रवत त्याने सर्व विधी, दिवस पार पाडले. डोळ्यात ना पाण्याचा टिपूस होता ना चेहऱ्यावर काही भाव! ‘काय वाढून ठेवलंय याच्या आयुष्यात नशीबाने अजून?' काळजीने त्या दोघांची झोप उडाली. 'सईच्या येण्याने माणसात आलेलं माझं पोर, आता कशी सावरू याला,' अनुराधेला चिंतेने ग्रासले. चंदूला आनंदाची अवस्था दिसत होती, समजत होती, पण त्याला यातून बाहेर काढण्याचा मार्ग सापडत नव्हता. सईचे आईबाबा जावयाची ही अवस्था पाहून अनुराधेकडे म्हणाले, "बाळ लहान आहे तोवर आम्ही नेऊ का आमच्याकडे? आनंद जरा सावरला की घेऊन या परत."

अनुराधेला काय बोलावे कळेना. "आपण सुकन्याशी बोलूया का?" ती म्हणाली. "सईने तिच्यावर टाकलीय जबाबदारी." "होय, पण तीही बाळंतीण, दोन दोन मुलांचं जमेल का? तिच्या बाळाची यात आबाळ व्हायची."

सुकन्या म्हणाली, "आता मी दोन मुलांची आई आहे. देवाच्या कृपेने दोघांनाही दूध पुरतंय. आईचं दूध फार महत्वाचं काही महिने. तुमची नातं आहे, हवे तेवढे दिवस राहा तिच्या सहवासात, पण तिला इथून न्यायची गोष्ट नको."

मग तिने डोहाळेजेवणाच्या रात्री सईने घेतलेल्या वचनाबद्दल सांगितले. "तेव्हा मी तिचा हळवेपणा समजले, पण तिला जाणवले असावे

आधीच काही." असे म्हणून दोन्ही बाळांना कुशीत घेऊन तिने अश्रुना वाट करून दिली.

---

दिवस वगैरे करून झाल्यावर घरच्या घरी बाळांची नावे ठेवली. इंद्र आणि सोनिका. सईला मुलगीच हवी होती, तिने नावही ठरवून ठेवले होते. तिच्या स्वभावानुसार तिचे हे गुपित सर्वांना माहित होते. सुकन्याने मुलगा झाला तर इंद्र नाव ठरवले होते. सुकन्याला अनुराधा म्हणाली, "हे असं सगळं घडल्याने तुझी हौस राहिली बघ. डोहाळेजेवणही सईने मागे लागून करून घेतले."सुकन्या म्हणाली, "सई मला कधीही यापूर्वी नसलेली अनेक नाती बनून गेली. मैत्रीण, बहीण, जाऊ, कधी कधी माझी आई व्हायची आणि कधी कधी मुलगी. आणि जातानाही मला केवढी मोठी गिफ्ट देऊन गेली बघा."

सोनिका नेमकी तेव्हा खुद्कन हसली आणि मनात येणारे कढ विसरून या दोघीही हसल्या तिच्याकडे पाहत. लहान मूल म्हणजे चैतन्याचा अखंड झरा. ही दोन बाळं आपल्या बाललीलांनी घराला परत हसरं बोलकं बनवू लागली. दिवस झाल्यावर आनंदा तडक मचाणावर गेला. कित्येक दिवस तो तिथेच राहिला. अनंता, चंदू डबा देत. कधी खायचा, कधी तसाच राहायचा. दोघंही घरी आणताना मात्र रिकामा करून आणत. अनुराधेच्या मनाला अधिक यातनांची काही गरज नव्हती.

---

कृपाला साधारण डिलिव्हरी डेट माहित होती. ती तेव्हा ममाबरोबर बिजिनेस टूरवर होती. ती सारखा सई व आनंदाचा फोन ट्राय करत होती. दोन्ही फोन स्विच्ड ऑफ. शेवटी तिने न राहवून सुकन्याचा फोन लावला. बराच वेळ वाजला पण उचलला नाही. बरोबर अर्ध्या तासाने सुकन्याचा फोन आला तिला. तिने क्षणात उचलला.

"हाय सुकन्या"

"हॅलो!"

"अगं ही दोघे फोन का उचलत नाहीत? डिलिव्हरी डेट आहे ना आत्ताची?"

"कृपा, डिलिव्हरी झाल्या, मला मुलगा आणि सईला मुलगी झाली. जरा डेटच्या आधीच झाल्या डिलिव्हरी!"

"हे! काँग्रॅच्युलेशन्स न्यू मॉम!!

आणि हे दोघे फोन का नाही उचलत आहेत? फ़ोनफ्री मॉम डॅड व्हायला निघालेत की काय?"

"कृपा, तू कुठे आहेस?"

"मी? मॉम बरोबर बिजिनेस टूरवर आहे.आत्ता हॉटेलरूमवर आहे, का गं?"

"हम्म! बातमी चांगली नाही गं"

"का? काय झालं? सांग पटकन"

"सई गेली गं कृपा!" सुकन्याचा गळा भरून. आला.

"काय? गेली? कुठे गेली? ओव्ह्ह यू मीन? काहीही काय अगं? असं कसं पण,..गेली?"

कृपा थरथरायला लागली एकदम. दोन मिनिटं दोघीही गप्पच बसल्या. सुकन्याचा गळा भरून आला, आणि कृपाला भानावर यायलाच वेळ लागला. "सई गेली!" ती परत म्हणाली. "आनंद? तो कुठाय?" सुकन्याने मग थोडक्यात सांगितलं सगळं. आनंदबद्दलही सांगितलं. "मी निघते लगेच!"

"हो ये. तुझ्या मित्राला फार गरज आहे सध्या तुझी."

"हं!"

---

आज बरेच दिवस आनंद इथे बसून होता. टक्क जागा! त्याला पीरबाबाचं अस्तित्व जाणवत होतं. सई मात्र बिलकुल भेटत नव्हती. ती भेटेल इथे तरी, एकदा तरी, शेवटची का होईना, अशी आशा त्याला वाटत असावी.

'अशी रक्तात भिनत जाईल ती आणि मग अशी माणसातून उठवून जाईल हे माहित असतं तर,..... तर काय? नातं जोडलं नसतंस? वा आनंद वा!! किती स्वार्थ, किती फक्त स्वतःचा विचार? ती तुला किती समृद्ध करून गेली? विसरलास? तुझ्या अंतरंगाचा माग घेण्याची ताकद होती तिच्यात.

जिथे तुही पोहोचण्याचा प्रयत्न केला नाहीस तिथे बोटाला धरून घेऊन गेली ती.

सगळ्या गाडून टाकलेल्या भावभावनाना खणून समूळ उपटून समोर मांडल्यास तिच्या आणि मग किती मोकळा झालास? विसरलास? केवळ तिच्या आधारावर भरोसा ठेवून केलस ते धारिष्ठ्य!! संगत किती मोठी हे पाहावं की त्या साथसंगतीची खोली पाहावी?

सई,...........!! सई,...........!!' जशी आग लागावी तनामनात. हे आणि असेच उलट सुलट विचार!! कधी भास तर कधी सत्य,.. पण परत माणसात जायची मनाची तयारी होईना!! 'पीरबाबा? कुठे आहात? तुमची चरस करेल का हो यातून सुटका? तुम्हालाही अशीच जाळणारी दुःख होती ना? मग?' मग परत मन खडसावायचं!!

'पीरबाबांची पत्नी त्यांच्या आयुष्यात अमावास्येचा काळा रंग ओतून गेली आणि तुझी सई तुझ्या आयुष्यात लखलखीत चांदणं!! असले विचार करून तिचा अवमान करू नकोस.'

बाबा येत, चंदू येई, काही बोलत, आर्जवे करत, सगळा भास वाटे. त्याच्यापर्यंत काही पोहोचत नसे. डबा उघडून चार घास भरवण्याचा प्रयत्न करत. तोंड उघडलं तर दोन घास जायचे नाहीतर तसाच डबा परत. अनंताला काळजी वाटू लागली. याला घरी परत कसा न्यावा? चंदू आणि तो निरनिराळे उपाय करत. पण बोलणे पोहोचतच नव्हते त्याच्यापर्यंत. अनुराधा सतत "मला घेऊन चल त्याच्याकडे" म्हणून मागे लागलेली. पण चंदूचा धीर

होईना. त्याची अवस्था पाहून काकुलाच काहीतरी होइल ही भीती वाटत होती त्याला. त्याने अनंतालाही सांगितले, "मी जाईन काका. तू या वयात नको चढू वर." काका अचानक किती म्हातारा दिसायला लागला.' त्याच्या मनात आलं. 'सई काय काय बरोबर नेलंस बाई?'

---

मग एक दिवस चंदू वर गेला तेव्हा आनंद झोपलेला दिसला. बाजूला रंग, ब्रश, इझलवर एक निराळच अमूर्त चित्र, त्याच्या समजण्याच्या बाहेरचं.

पण आनंदा झोपी गेलेला पाहूनच त्याला कोण आनंद झाला. 'तो रंगवायला लागला,.. आता येईल माणसात!!! परमेश्वरा!!' चंदू तिथेच बसून ओक्सबोक्शी रडला मग. त्यालाही बिचाऱ्याला सर्वांदेखत रडायची चोरीच होती. सगळा भार त्याच्याच खांद्यावर होता. डबा ठेवून परत आला मग.

दुसऱ्या दिवशी गेला तेव्हा आनंद मंदिराच्या तळयात स्नान करून परत मचाणाकडे निघालेला वाटेत भेटला. वजन घटलेला, दाढी वाढलेली, डोळे खोल गेलेले, पण आज नजरेत ओळख होती. चंदूला पाहून थांबला. चंदू म्हणाला घरी चल. आणि चक्क आनंद वळून घराच्या दिशेने चालू लागला. चंदूला काही सेकंद गेले समजायला. मग त्याने पळत जाऊन गाठले आनंदाला. दोघे मुकेपणीच निघाले घराकडे.

---

३.८

आनंद आणि चंदू घरी आले तेव्हा वासंती काकू काका आले होते. याला पाहताच काकूंचा पारा चढला.

"काय रे आनंदा, काय हे तुझं वागणं?"

"वहिनी अहो,,...."

"बोलू दे मला अनुराधे. आत्ता याक्षणी माझ्या कडू बोलाचीच गरज आहे, ज्यांनी रागावणं योग्य आहे त्या दोघी गप्प आहेत," सुकन्या आणि अनुराधेकडे पाहत वासंती म्हणाली.

"ही रे कसली थेरं तुझी? दिवस होईपर्यंत राहिलास घरी आणि मग एकदम गायब? त्या आईने डोळयात प्राण आणून वाट पाहायची, त्या सुकन्याने तुझं पोर सांभाळायचं, बापाने या वयात खेटे घालायचे, आणि चंदू तर काय आहेच हक्काचा नोकर!! धन्य आहेस रे बाबा. गेलेल्यांच्या आठवणीत टिपं गाळा आणि असलेल्यांच्या डोळयात सतत अश्रू धारा, उत्तम आहे हो हे सगळं!! "

आनंदा ऐकत होता. काकू बोलली ते चूक नव्हतं.

"मी माझ्याच दुःखात इतका गुरफटलो की बाकी कशाचंच भान राहिलं नाही." त्याने असं म्हटल्यावर मात्र वासंतीचा पारा उतरला.

"स्वतःला आणि घरादाराला सांभाळ रे बाबा. आता मुलीची जबाबदारी आहे तुझ्यावर."

आनंद अनुराधेकडे गेला. तिच्या पायाशी बसला. तिने डोक्यावर हात ठेवला. "काकू कडू बोलते पण आज जे म्हणाली ते खरंय आनंदा. आता तुझ्या प्रत्येक कृतीत पहिला विचार तुझ्या मुलीचा हवा." त्याने हलकेच मान हलवली.

सुकन्या बसली होती. दोन्ही बाळं झोपली होती तिच्या पुढ्यात. तो गेला तिच्याजवळ. "मी सगळं तुझ्यावर आणि चन्दूवर टाकून मोकळा झालो असं प्लीज समजू नकोस. माझं मला खरंच काही कळत नव्हतं. अजूनही कळत नाही की नक्की का आणि कसं घडलं!! पण तुला आणि चंदूला मी माझी आणि सईची मुलगी दिली. कायमची. आजपासून मी जसा इंद्रचा काका, तसाच सोनिकाचाही. तिच्याविषयीचे सर्व निर्णय घेण्याचा हक्क तुम्हा दोघांचा. मी जबाबदारी नाही झटकत आहे, किंवा मी कुठे निघूनही नाही जाणार आहे, पण हे सर्व अधिकार म्हणून मी तुम्हाला देतोय. जे काही प्रत्यक्षात करावं लागेल ते मी दोन्ही मुलांसाठी करेन. अगदी सारखच करेन. पण ती नाव तुमचंच लावेल."

"भाऊजी, अहो,,... "

"नाही सुकन्या, काही बोलू नकोस. हे असच होऊ दे, तिलाही हेच अपेक्षित होतं. माझ्या वागण्याचं समर्थन नाही होऊ शकत, पण मी असाच आहे गं, ठरवून करत नाही पण चुका खूप करतो. तिचं जाणं मी कसा पचवणार मला अजून माहित नाही. तिच्या नसण्याची जाणीव प्रत्येक श्वासाबरोबर होते आणि श्वास अडतो माझा. पण आता निदान हे सत्य मी

स्वीकारलंय. आईनंतर मी तुला अधिकार देतो माझा कान धरायचा. सई तुझ्याविषयी पूर्ण निःशंक होती म्हणूनच तिने पोटची पोर तुझ्याकडे सोपवली. आजपासून रात्री बाळांना मी बघेन. चंदू मला शिकवेल सगळं. फक्त त्यांना भूक लागली की तुला उठवू आम्ही." सगळेच हळवे झाले मग. आजी म्हणाली "पोरा, काय दशा करून घेतलीस ही. सांभाळ स्वतःला." सगळं कुटुंब एकत्र होतं आणि जी नव्हती तिच्या आठवणीत हळवं झालं होतं.

———

कृपा आली तेव्हा आनंदा घरी नव्हता. सुकन्याने तिला सावकाश सगळं सांगितलं. दोघींचे डोळे वाहत होते. दोन्ही मुलांना कृपाने मांडीवर घेतलं, पण तिने सुकन्याला मानेखाली हात ठेवायला लावला. तिला अजिबात खात्री नव्हती की ती व्यवस्थित घेऊ शकेल बाळांना मांडीवर.

मग तिने आनंदविषयीही सांगितलं. "आता जरा माणसात येताहेत भाऊजी. पण पहिले काही दिवस फार कठीण होते. आता मुलांबरोबर तर छान जमलं आहे एकदम. ते रात्री बाळांना सांभाळू लागल्यापासून माझी आणि चंद्रशेखरची झोप व्हायला लागलीय जरा."

"कसं मॅनेज करतेस अगं? दोन बाळं?"

"मलाही काळजी वाटत होती. मी दोघांत भेदभाव करेन का हा विचार मला सतत छळत होता. सगळे माझ्याकडे संशयाने पाहतील असही

वाटायचं. खूप टेन्शन आलेलं मला. पण मग दोन्ही बाळांना पाजलं, त्यांनी एकाच विश्वासाने माझ्या कुशीत हुंकार दिला आणि माझा स्वतःबद्दलचा संशय संपला. मग इतरांना काय वाटतंय हा प्रश्नही निकालात निघाला. आनंद भाऊजी काय म्हणाले माहित आहे? मी सोनिकाचे सगळे हक्क तुम्हाला देतो. मी आता दोन्ही मुलांचा काका. सोनिका नावही तुमचंच लावेल. फार अवघड आहे हे. मी ही आई आहे आता, त्यामुळे अधिकच समजू शकते किती अवघड आहे, आणि आनंद भाऊजी करतात, म्हणतात ते सगळं मनापासून. उगाच कधीच काहीच नसतं त्यांचं. मी सोनिकाला मोठी झाल्यावर तिच्या आईविषयी सगळं सांगायचं ठरवलंय. तिला कळायला हवं असं वाटतं मला." कृपा या विलक्षण कुटुंबाकडे विस्मयाने, आदराने पाहत राहिली.

चंदू आला तेव्हा तो म्हणाला "अगं, आनंद भेटला का?"

"नाही तो नाहीच आहे घरी."

"आलाय ना मगाशीच."

"अरे कुठाय मग?"

"वर बघ बरं."

कृपा वर गेली तेव्हा आनंद खिडकीशी काही करत होता. चाहूल लागल्यावर त्याने वळून पाहीले, हिला पाहून वळला सावकाश.

"तू,.तू कशी,. कधी आलीस?"

"सकाळीच आले."

"तुला,.. "

तिने मान हलवली.

"कसा आहेस?"

त्यानेही मान हलवली.

'काय बोलायचं पुढे? सांत्वन कसं करायचं?'

"सोनिका गोड़ आहे फार."

"हं! "

"सई,..."

"नाहीय आता!!"तो पटकन म्हणाला.

"हं!"

"मला कळवावसंही वाटलं नाही?"

त्याने स्थिर नजरेने पाहिलं एकदा तिच्याकडे.

"मला कसलीच शुद्ध नव्हती, कोणाचीच आठवण नव्हती."

"हं!"

"मी राहीन दोन चार दिवस. मग जाईन."

"हो, राहा ना."

"तुला बोलावसं वाटलं तर हाक मार."

"हं!"

कृपाला हे आधीही माहित होतं की सईने त्याचं मन पूर्ण व्यापलं आहे, पण 'आपण त्याची सख्खी मैत्रीण आहोत असा फक्त आपला आभासच होता का?' ती ठरवू शकली नाही.

ती जायला वळली. "उद्या माझ्याबरोबर चल, तुला दाखवायचं आहे काही." तो अचानक म्हणाला.

"ओके"

मग ती खाली आली. बाकीच्यांना भेटली. नव्याने सई भेटत राहिली सगळ्यांच्या आठवणीतून. आणि तरीही सईची कमी प्रकर्षाने जाणवत राहिली तिला.तिची पहिली भेट आठवली. तिचा उत्साह आणि मिश्कीलपणा. समोरच्याला किती रिलॅक्स्ड आणि वॉन्टेड फील करावयाची ती.

मुळात प्रत्येक क्षणाला ती, 'संपूर्ण सई' अर्पण करायची. पूर्ण तनमनाने त्या क्षणात हजर असायची. आणि हीच तिची खासियत तिला खास बनवायची.

'आम्ही एकाच वेळी हजार विचारांमध्ये वाटलेले असतो सई, मग तो क्षण आमच्या बरोबर समरस तरी कसा होणार?' कृपाचा स्वतःशीच आणि मनातल्या सईशी संवाद सुरू होता. सईचा रसरसलेला प्रेझेन्स तिला आत्ता हवा होता आणि तो नव्हता.

'हं! आता आनंदाची खरी वेदना काही सहस्रांशात समजेल आपल्याला.'

'सई, माझं तुझ्या नवऱ्यावर प्रेम आहे, मला हे कळायलाही खूप वेळ गेला, त्याचं माझ्यावर नाही, पण त्याला यातून निदान थोडा तरी बाहेर काढण्यात यश आलं तर मी माझ्या प्रेमाची लाज राखेन माझ्याच मनात. तुला त्याने विसरावं, माझ्याशी नातं जोडावं अशी माझी अजिबात इच्छा नाही. पण तुझ्या नसण्याची भळभळती जखम काळानुसार कमी होऊन सुगंधी आठवणी उराव्यात मनात एवढीच माफक अपेक्षा आहे. सर्वसामान्यपणे असं होतच, पण तुम्हा दोघांचं नातं पाहता हे आत्ता तरी कठीण वाटतं मला.' प्रत्येकजण काहींना काही स्वीकारत निघाला होता.

कृपा, आपलं एकतर्फा प्रेम, आनंद, सईचं नसणं, सुकन्या, दोन मुलांचं मातृत्व,....

---

त्या रात्री कृपा आनंदबरोबर मुलांसोबत बसली. अनुराधा येऊन बघून गेली मुलांना. घरातल्या सर्वांचेच पाय मुलांच्या दिशेने वळत सतत. सर्व दुःखावर एकमात्र जालीम मलम होती ही दोन बाळं. आनंद तर इतका हळुवारपणे हाताळायचा मुलांना. आठवड्याभरातच त्याने डायपर चेंज करणे, त्यांना मानेखाली हात घालून उचलणे, खांद्यावर घेऊन ढेकर काढणे, झोपवणे, सगळं छान आत्मसात केलं. लहान बाळ आणि तरुण माणूस एकत्र

पाहणे हे कोणत्याही तरुणीला आकर्षक वाटतं म्हणतात. कृपाला तर हे प्रचंड आकर्षक वाटत होतं.

'सई,..... अगं हे दृश्य पाहायला का होईना एकदा येऊन जा. की पाहतेच आहेस माझ्याबरोबरीने?' आनंद मग एकाला खांद्यावर आणि एका बाळाला झोळीत घालून झोपवू लागला.तो अतिशय हळू आवाजात काही गुणगुणत होता. कृपाने हळूच फोन काढून त्यावर हा व्हिडिओ रेकॉर्ड केला. परत गेल्यावर तिला याची खूप गरज पडणार होती.

---

दुसऱ्या दिवशी आनंद तिला मचाणावर घेऊन गेला. अनेक निसर्गरंगांनी नटलेली, पटकन पाहताना अमूर्त वाटणारी आणि नीट काहीकाळ पाहिल्यावर त्यातून सईची छबी दिसणारी ती अत्युत्तम चित्र होती. कितीतरी वेळ कृपा ती चित्र पाहत होती. त्यात हरवून जात होती. चित्र पाहून ती अवाक झाली. "अरे, ही अशी उघड्यावर टाकली आहेस चित्र?तुला ही किती प्रीशियस आहेत कळत नाहीय का?"

आनंदचं तिच्या बोलण्याकडे लक्षच नव्हतं. कृपाला मात्र आता काय करायला हवं हे बरोबर कळलं. "मी जरा वेळ झोपू? तू वाटल्यास खाली मंदिरात जाऊन ये. तुला सापडेल ना रस्ता? इथून बाहेर पडून उजवीकडे गेलीस की मळलेली पायवाट लागेल तुला."

"आनंद, त्यापेक्षा घरी चल ना. तिथे चांगलं बेडवर नीट झोपशील."

"मला फक्त इथे झोप लागते. अगदी शांत. माझ्या सईच्या सान्निध्यात. घरी एकही मिनिट डोळ्याला डोळा लागत नाही."

"आनंद.....! ठीक आहे. झोप. मी येते जाऊन खाली मंदिरात."

मग कृपा सरळ खाली उतरली आणि मार्केट मध्ये गेली. तिला हवा तसा कॅमेरा काही मिळेना. मग तिने ऑनलाईन ऑर्डर केला आनंदाच्या घराच्या पत्त्यावर. तशीच मग घरी परतली.

"अगं, एकटीच परत आलीस?"

"हो. आनंदला काम होतं काही, मग मी मार्केटमध्ये चक्कर मारून आले."

"ये, चहा घेतेस का घोटभर? आजी आजोबांसाठी करणारच आहे मी." अनुराधा म्हणाली.

"हो चालेल." मग ती अनुराधेबरोबर स्वैपाकघरात गेली. चहा झाल्यावर अनुने अजून एक ट्रे घेतला, अळिवाचे दोन लाडू, दूध, एक फळ असं घेऊन निघाली. "द्या काकू, मी देते, सुकन्याला. बाळही जागी असतील तर भेटते." तिने तिचाही कप घेतला बरोबर. पिल्लं झोपली होती आंघोळ करून. बेबी ऑइल, बेबी सोप, बेबी पावडरचा मिश्र मंद सुगंध सगळीकडे पसरला होता. सुकन्या कसलीशी फाईल पाहात बसली होती. कृपाला हे पूर्ण अनपेक्षित होतं. तिने ट्रे सुकन्यासमोर ठेवला.

"अगं तू कशाला घेऊन आलीस? मी काकूंनाही सांगते मी घेईन आता हाताने, पण ऐकत नाहीत."

"असू दे गं! मला मुलांना बघायला यायचच होतं. काय करतेस?"

"फॅक्टरीत जात नाही ना सध्या, मग घरूनच काही मदत होते का पाहते."

"मला आवडली असती फॅक्टरी पाहायला. "जा ना मग. शेखरला सांगते घेऊन जायला तुला. जमलं तर अनुकाकूंनाही ने. माझी नवी प्रॉडक्ट्स कशी चालली आहेत हे त्याच पाहून सांगू शकतील."

कृपा विचार करू लागली. 'किती साध्यासुध्या राहतात या दोघी, पण उद्योजकता कूटकूटके भरलीय यांच्यात. ममाला आणून दाखवायला हवं एकदा.'

दुसरे दिवशी ती आणि अनुराधा फॅक्टरीमध्ये गेल्या. अनुराधाने तिला सर्व लाईन्स फिरून दाखवल्या. सुकन्याच्या प्रॉडक्टची ट्रायल सुरू होती. चंदू आणि पुष्पा तिथेच होते.

बऱ्यापैकी जमलं होतं प्रॉडक्ट. 'थोडा नमुना दे, सुकन्याला दाखवूया. 'अनुराधा म्हणाली.

"काकू, बाळं कशी आहेत गं? या आठवड्यात अजिबात जमलं नाही गं यायला."

"अगं हा व्याप काय कमी आहे का तुझ्यामागे? मोठा आधार आहेस बघ या फॅक्टरीसाठी तू."

"आनंदामुळे गं काकू. हा चंदू काही मला घेत नव्हता बरोबर."

"आंद्याचं म्हणून ऐकलस सगळं. माझ्याशी बसली असतीस भांडत."

"बरं! असू दे, आता करताय ना छान एकत्र काम, मग झालं तर." अनुराधा म्हणाली.

अनुराधेला पाहिल्यावर सगळ्या बायका भेटून गेल्या. मग अनु तिला शेजारच्या हॅन्डीक्राफ्टच्या शेडमध्ये घेऊन गेली. कृपा हरखूनच गेली ते पाहून.

"मी फोटो काढू थोडे? आत्ता नाही, माझा कॅमेरा आल्यावर."

"हो काढ की."

त्या रात्री तिने ममाला फोन लावला. तिला या सर्व पदार्थ आणि कलाकुसरीच्या वस्तूंबद्दल सांगितलं. तू मध्यंतरी अशी एक वेबकंपनी फ्लोट करूया म्हणत होतीस, तेव्हा तू डीलर्स शोधत होतीस ना, हे तर स्वतः मॅन्युफॅक्चरर्स आहेत. कॉलीटीची गॅरंटी आणि डीलर पेक्षा नक्कीच किंमत कमी. बघ, विचार करून ठेव. मी अजून आठवडाभर तरी आहे इथे. तू हो म्हणालीस तर बोलते या मंडळींशी. दोन तीन दिवसात फोटो पाठवते. ममा एकदम खुश झाली. आता ही परत येईल की नाही ही शंका दर वेळेस कृपा

भारतात निघाली की ममाला यायची. पण ही तर एकदम बीजीनेसच्या गोष्टी करतेय.

'फोटो तर पाठव, विथ कॉस्ट, मग बघू' म्हणाली. फार उत्साह दाखवला तरी बिनसेल कदाचित अशी भीती वाटली तिला.

---

दोन दिवसांनी कॅमेरा आला. ती रोज थोडा वेळ रात्री आनंद आणि मुलांबरोबर बसायची. मग कॉलेज, ते सगळे पंटर मित्र, टीचर्स, सावजींची गॅलरी, खाण्याचे अड्डे, अनेक विषय काढून आनंदाला जरा वेगळ्या विश्वात नेण्याचा प्रयत्न करायची. आनंदही काही वेळ त्या आठवणींमध्ये जरा रमायचा. मुलांचं मात्र ती लांबूनच कौतुक करायची. एवढ्या लहान बाळांना सांभाळणं ही अपने बस की बात नाही हे तिच्या पहिल्याच दिवशी लक्षात आलं होतं. रोज ती आनंद, मुलं, सुकन्या, सगळे आजी आजोबा यांचे कॅन्डीड फोटो काढायची. बऱ्याचदा त्यांच्या नकळत.

एक दिवस ती आनंदाला म्हणाली, "तू मागच्या वेळेस त्या फिरंग आर्टिस्ट अरमान बद्दल काही सांगत होतास, तुमचं एक्झिबिशन बद्दल काही बोलणं सुरू होतं! आता कुठाय तो आर्टिस्ट?"

मग आनंदने तिला अरमान, पीरबाबा, शाम, सॅम बद्दल सर्व हकीगत सांगितली.

"ओह माय गॉड! सिनेमा होईल रे या स्टोरीवर. म्हणजे इमॅजिनेशनच्या पलीकडचं आहे हे."

"होय, म्हणून शमाला वाटत होतं की मी काहीतरी सांगून अरमानला फसवतोय!"

"बस का? हे म्हणजे अतीच झालं."

"अगं, आता तुलाही विश्वास ठेवणं जरा जड गेलच ना? ती तर मला ओळखतही नव्हती तेव्हा. आता तीच पुढाकार घेतेय सगळा. जगभर फिरत असते. तू भेट तिला एकदा."

"हो? दे मला नंबर."

"बरं, मग ठरलं का एक्झिबिशन?"

"नाही. त्यांना बरीच चित्र हवी होती. विषय वगैरे ठरवून मला नाही काढता येत चित्र. मग मीच म्हटलं की तुम्हाला हवा तेवढा आकडा झाल्याशिवाय नकोच काही. तुला माहीतच आहे मला नाही फारसं ते सगळं प्रकरण आवडत. लोकांबरोबर बोला, त्यांना चित्राबद्दल सांगा, त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घ्या. माझं चित्र हीच माझ्या भावनांवरून उमटलेली प्रतिक्रिया असते. पाहणाऱ्याच्या मनात ते चित्र पाहून उमटते, ती त्याच्या मनातील त्यावेळची भावना आणि चित्राने निर्माण झालेल्या भावना यांचं मिश्रण असतं, मला त्या जाणून घ्यायला आवडतात, पण मला त्यांचं विश्लेषण ना करायला आवडत ना केलेलं आवडत."

"हं!"

आनंद निदान त्याच्या दुसऱ्या प्रेमाबद्दल बोलू तरी लागला होता. कृपाच्या दृष्टीने ही फार महत्वाची गोष्ट होती. तिने तेव्हा तो विषय वाढवला नाही,

"उद्या परत जाऊ रे मचाणावर. कसली अफलातून जागा आहे ती. आता आज ही स्टोरी ऐकल्यावर मला ती अलिबाबाची गुहाच वाटू लागलीय."

आनंद सौम्य हसला. "मी रोजच जातो. चल तू ही उद्या."

कृपाने त्या सर्व चित्रांचे फोटो काढून घेतले. आनंद कडून नंबर घेऊन ती शमाशी बोलली. त्यांना आनंदाच्या लग्नाबद्दलच काही माहित नव्हतं. मग अरमानला कळल्यावर त्याने कृपालाच फोन केला आधी. कृपाने सर्व सविस्तर सांगितले. "काफी दर्द पहेलेसे था, बंदेकी आखोंमे दिखता था, अब तो जल रहा होगा दर्द में." तो नंतर शमाला म्हणाला. कृपाने शमा आणि अरमानला ते सगळे फोटो पाठवले.

"क्या कमालका आर्टिस्ट है! अब्बू आप नाज कर रहे होंगे ना आपके इस काबील शागीर्द पर?"

कृपाबरोबर मग त्यांचं दोन तीनदा बोलणं झालं. आनंदाला सहजच फोन करावा आणि केली का पेंटींग काही नवी असं विचारावं असं ठरलं.

कृपाने ममालाही सगळ्या उत्पादनांचे फोटो पाठवले. चंदू, सुकन्या, अनंता, अनुराधा यांच्याबरोबर तिने त्या प्रोजेक्ट बद्दल एक दिवस बोलूनही घेतले. पाहता पाहता तिचा जाण्याचा दिवस उजाडला.

आदल्या रात्री ती आनंदाला म्हणाली, "जेवढी सई प्रत्यक्षात कळली नव्हती ती यावेळी सर्वांच्या बोलण्यातून कळली. तुझ्या चित्रातून कळली. तू पूर्ण सईमय झाला आहेस आणि तसाच राहणार आहेस. पण आज मी तुला एक गोष्ट सांगते जी मी कधीच कोणालाच नाही सांगितली. माझं तुझ्यावर खूप प्रेम आहे. वन साईडेड आहे, मला माहित आहे. माझी या प्रेमाकडून काहीही अपेक्षा नाही. बस व्यक्त केलच नाही ही रुख रुख नको. या प्रेमाला आपल्या मैत्रीत न येऊ देण्याची जबाबदारी माझी. सईला कदाचित दिसलंही असेल ते माझ्या डोळ्यात, मनकवडी होती ती, पण तरी तिने मला तुम्हा दोघांच्या आयुष्यातून दूर नव्हतं केलं, त्यामुळे तुला हे सांगताना मला जराही अपराधी वाटत नाही. उद्या जातेय, पण मी येत राहणार अशीच."

आनंदाला काय बोलावं कळेना. आश्चर्य, अगतिकता, सगळेच अवघड भाव उमटले मनात. काही वेळ तो काहीच बोलला नाही. मग म्हणाला, "कृपा, नको पाळूस या भावनेला. सगळं दग्ध करून टाकेल ती. तुझं अक्ख्ख आयुष्य पडलय तुझ्यासमोर."

"मी काय पाळणार? तिनेच पाळलंय मला. आणि तुझ्या स्वतःवरून तुला माझ्या प्रेमाची परिस्थिती लक्षात यायला हरकत नाही."

"कृपा! नको ग हा वेडेपणा."

"होऊन गेला रे, दोर तुटले आता. पण खरं सांगू, जे माझ्या मनात आहे ते माझ्यापुरतं पुरेसं आहे. बाकी मला नकोय काहीच. धिस इज जस्ट अ पार्ट ऑफ लाईफ अँड नॉट व्होल लाईफ. आयुष्याची व्याप्ती खूप मोठी आहे आनंद!!

दुसरे दिवशी पहाटेच ती निघाली.

३.९

आयुष्याची सर्वात जास्त गती अनुभवायची असेल तर तान्ह्या मुलांची पहिल्या दोन वर्षातील वाढ पाहावी.रोज काहीतरी बदल दिसतो, प्रगती दिसते. इंद्र आणि सोनिका पाहता पाहता पालथे पडू लागले. ओळखीचं हसू लागले. जन्मले होते निरनिराळ्या आईबापांपोटी पण वाढत होते जुळ्यांसारखे. काही दिवस जातात न जातात तोच पुढे सरकायला लागले. मग अक्खख घर कमी पडू लागलं. सर्वांना पळवायची ही दोघं. आजी आजोबा, आण्णा, सगळे वय विसरून या दोघांच्या मागे.

रात्री आनंदकाकाबरोबर दंगा असे. कोणालाच झोप नसे आलेली त्यामुळे भरपूर मस्ती, पोरांचं खिदळण सुरू असे. त्यांचं टाकलेलं पहिलं पाऊल, पहिला बोललेला शब्द, सगळ्याचा साक्षीदार आनंद होता. सुकन्याला फार वाईट वाटायचं मग. "तुमच्याबरोबर असतानाच कसं सगळं नवं नवं करून दाखवतात. मी रोज बोलण्यासाठी प्रयत्न करते आणि दोघंही बोलली तुमच्यासमोर."आनंदाला तिची फार मजा वाटायची मग. "अगं, पण आता बोलत चालत आहेत ते बघ की."

"तसं नाही, मला सगळ्यात आधी पाहायचं होतं ना!!" ती तोंड बारीक करून म्हणे. चंदू आणि आनंदच्या समजण्याच्या बाहेरची गोष्ट होती ती.

आता वरचं खाणंही सुरू झालं होतं, त्यामुळे रात्री गाढ झोपून जात बाळं. एकदम सकाळीच दोघे तिच्याकडे येत. तेव्हा मात्र दोघांना कधी एकदा तिच्या मांडीत आपण जातोय असं होऊन जाई. सोनिकाने पहिल्यांदा तिला

'आई' अशी हाक मारली आणि इतकी धीराची सुकन्या पण तिला घट्ट मिठीत घेऊन ओक्सबोक्शी रडली. "सई,.. कुठे गेलीस गं? हे दोन शब्द ऐकायला तरी परत ये!!"

अनुराधा आणि चंदूने तिला कसेबसे शांत केले. आनंद तिथे नव्हता तेव्हा हे बरच झालं. मग दोन दिवसांनी इंद्रही शिकला 'आई' म्हणायला. आनंद दोघांचा काका झाला. इंद्र, काकाकडे एकदम खुश असायचा. सोनिकाला मात्र आई लागायची सारखी. त्यांचा पहिला वाढदिवस जरा मोठा केला. दोन दिवस सोनिकाचे आजी आजोबा, पणजी, सुकन्याची आजी, राहायलाच आले. दोघांच्या जन्मतारखेचा पुढचा दिवस ठरवला आणि वाढता वाढदिवस केला. सईची तिथी एक दोन दिवस आधीची होती. तो ही विधी केला. आनंद शरीराने तिथे होता. वरवर पाहता सगळ्यात सामील होता पण जवळच्यांना त्याची अस्वस्थता जाणवत होती.

सुकन्या म्हणाली, "भाऊजी दर वर्षी हे असं होणार, पण सोनिकाला तिचा बर्थडे एन्जॉय करायला मिळायला हवाच." आनंदला ही ते मान्यच होतं. "सुकन्या, सई प्रत्यक्ष नसली तरी सतत माझ्या मनात असते. तू माझी काळजी नको करूस. सोनिकाचा बर्थडे कधी, कुठे करायचा हे तुझ्या मनाने ठरव."

कृपा जवळपास दर दोन महिन्यांनी यायचीच. ती ही मग बर्थडेचा दिवस गाठून आली. वेबसाईटद्वारा हॅन्डीक्राफ्टला जबरदस्त मागणी होती. अन्नपदार्थांच्या विक्रीतही लक्षणीय वाढ होती.

अरमान आणि शमाचे अनेकदा फोन येऊन गेले, पण दर वेळी त्याने अजून नाही जमलं काहीच पेंट करायला असच सांगितलं. यावेळी कृपाला त्याही विषयावर बोलायचं होतं आनंदाशी.

तिने प्रयत्न केला तेव्हा आणि त्यानंतर अनेकदा, पण हा प्रसिद्धीपराङ्मुख माणूस दाद देत नव्हता. वर्षामागून वर्ष चालली होती. मुलांना बालवाडीतून पहिलीत घालायची वेळ झाली होती.

अजूनही झोपताना आनंदकाकाकडेच असत मुलं. पण मुलांबरोबर काकालाही तंबी मिळे, "लवकर झोपा, उद्या सकाळी लवकर उठून नाही आवरलं शाळेच्या वेळेत तर काकांबरोबर गोष्ट ऐकत झोपणं बंद."

इंद्र आणि आनंद ऐकून न ऐकल्यासारखं करत पण सोनिका अगदी सुकन्याच्या तालमीत तयार झालेली. "काका लवकर सांग ना गोष्ट! झोपायचंय ना लवकर." मग दोघे कपाळावर हात मारून घेत. शनिवारची रात्र मग दंगामस्तीसाठी राखून ठेवली जाई. सोनिकाचा तोंडावळा तसा आनंद किंवा सईसारखा असा नव्हता. दोघांचं थोडथोडंसं होतं तिच्या चेहऱ्यात.

---

आनंदची चित्रसंख्या इतकी वाढली की मचाण तर भरलंच पण घराची वरची खोलीही भरली.

"कशाला काढत बसतोस? वेळ वाया घालवतोस नुसता. वर अडगळ साठते ती वेगळीच."

"कृपा,..!!!"

"रागवायला काय झालं उगाच? तुला कोणाला दाखवायचीही नाहीयेत चित्र. सईचा श्वास घुसमटत असेल त्या माळ्यावर." आनंद बसलेला ताडकन उठला आणि बाहेर निघून गेला. बाण बरोबर ठिकाणी बसला होता. त्या रात्री अंगणात सगळे बसलेले असताना आनंद म्हणाला, "बाबा तुम्हाला अरमान आठवतात ना? त्यांना माझ्या पेंटींग्जचं प्रदर्शन भरवायचं आहे."

"अरे वावा! हे तर फारच छान."

"हो पण मला जावं लागेल बरेच दिवस. थोडा खर्चही येईल. प्रथम मुंबईत आणि मग परदेशात. सुकन्या, मुलांचं कसं करायचं? "

"भाऊजी अहो मुलांना आम्ही आहोत की बघायला. तुम्ही नि:शंक पणे जा. आणि या अशा उत्तम कारणासाठी जाताना ह्या कसल्या शंका मनात ठेवताय?"मग त्याने कृपाकडे पाहिले. हसू होते तिच्या चेहऱ्यावर.

---

एक प्रदर्शन झाल्यावर एकामागून एक आर्ट फेस्टिवल्स मध्ये बोलावणी येऊ लागली.

'अमूर्त आणि मूर्त चित्रकलेची कलात्मक सांगड घालणारा,' 'शक्यतो नैसर्गिक आणि कमीतकमी रंग वापरून कलाकृतीची निर्मिती करणारा,'

पांढऱ्या रंगाचे उत्तम भान असणारा आणि त्याचा उत्तम वापर करणारा,.. ' अशा अनेक मथळ्याखाली त्याची माहिती छापून येऊ लागली.

अनंता, ती सर्व कात्रणे जमवून आण्णांना दाखवी. आजोबा आणि आण्णा अथपासून इतिपर्यंत सगळं वाचून काढत. आजीला सांगत. अनुराधेचा उर भरून येई. कृपा त्याची सर्व व्यवस्था सांभाळे. त्याने कपडे कोणते घालायचे, तिकीट बुकिंग, हॉटेल बुकिंग वगैरे सर्वच. तिला हे कर असं आनंदने सांगितलं नाही कधीच, पण ती करते यासाठी खूप कृतज्ञ होता तो. आनंद या अशा कार्यक्रमात किती अस्वस्थ असतो हे सावजींकडच्या प्रदर्शनापासून तिला चांगलंच माहित होतं. त्याने अनेकदा तिला ‘असं माझ्यासाठी आयुष्य वाया घालवू नको’ असं सांगितलं. पण ती एकदा म्हणाली, "आनंद माझ्या आसपास असण्याचाही त्रास होतो का तुला? तसं असेल तर नक्की सांग."

"अगं काहीही काय बोलतेस?"

"मग परत हा विषय आपल्यात नको."

कधी कधी अनुला काही बायका आडून आडून विचारीत, "सुनबाई आण आता अनुराधे, बरीच वर्षं झाली सईला जाऊन. ती आनंदाबरोबर असते ती कोण? काही ठरलाय का दोघात?"

अनुराधेला आनंदाला काही विचारावं असं वाटत नव्हतं. आता कुठे तो जरा बाहेर पडत होता त्या अतोनात एकटेपणातून. मुलांमध्ये रमला

होताच. या प्रदर्शनींमध्येही रस घेऊ लागला होता. कृपा घरचीच झाल्यासारखी झाली होती. तिच्याशी मात्र अनुराधेनें बोलायचं ठरवलं होतं.

त्याचं परदेशातील पहिलं प्रदर्शन वेगळ्याच कारणासाठी गाजलं. चित्रं तर आवडलीच सर्वांना, पण सर्वच्या सर्व चित्रांची विक्री झाली. एक चित्रं जे फक्त सईचं होतं ते ही प्रदर्शनात मांडलेलं पण खाली स्पष्ट अक्षरात विक्रीसाठी नाही असं लिहीलेलं होतं. एका श्रीमंत उद्योगपतीला ते फारच आवडलं आणि तो वाट्टेल ती किंमत घ्या पण चित्र द्या म्हणून आयोजकांच्या मागे लागला. ते शमाच्या मागे लकडा लावू लागले. तिने घाबरतच कृपाला विचारले. असामी बडी होती, आयोजकांना नाही म्हणणं अवघड वाटत होतं. कृपाने ठाम नकार कळवायला सांगितलं. सगळ्या लोकल कलाविषयक बातम्यांमध्ये ही बातमी पसरली. आणि मग लोकांची रीघ लागली ते चित्र पाहायला.

आता त्या बड्या माणसासाठी तो प्रतिष्ठेचा मुद्दा झाला.तो थेट आनंदाची भेट मागू लागला. आयोजकांना वाटलं कदाचित स्वतः त्या बड्या माणसाने आनंदलाच गळ घातली तर तो नाही म्हणायचा नाही. मग मीटिंगसाठी विचारणा झाली. शमा म्हणाली एवढा मोठा माणूस चहापानाला बोलावतो तेव्हा जायलाच हवं. तू देऊ नकोस चित्रं जरी त्याने परत मागितले तरी. कृपा आणि आनंद, आयोजकांपैकी एक माणूस आणि तो स्वतः उद्योगपती अशी मीटिंग झाली. परत चित्राचा विषय निघाला. तो उद्योगपती म्हणाला, "हे बघ मित्रा, तू अशी शेकडो चित्र काढशील, पण मला या

चित्राने खूप मोहात पाडलय, हे चित्र माझ्या घराच्या भिंतीवर लावण्यासाठी मी काहीही करू शकतो. तू फक्त तोंडातून शब्द काढायचा अवकाश, ती किंमत, वस्तू, किंवा जे काही असेल ते मी हजर करेन, फक्त ते चित्र मला दे."

"ठीक आहे." आनंद म्हणाला. कृपा आश्चर्याने त्याच्याकडे पाहू लागली. आयोजकांचा माणूस भलताच खुश झाला, उद्योगपती तर जेत्याच्या आवेशात म्हणाला, "बोल मित्रा, याबदल्यात काय हवाय तुला?"

"तुमचं हृदय काढून द्या."

क्षणभर त्याला कळलेच नाही. मग तो पिसाटला. "तुला काय गमजा वाटते काय? कोणासमोर बसला आहेस माहित आहे का? मनात आणलं तर होत्याच नव्हता करेन. पुन्हा या देशात पाऊल टाकू देणार नाही. "

आनंद शांत बसून होता. आयोजक घाबरला. आनंदला म्हणाला "चला सर निघूया आपण."आनंद मग त्या उद्योगपतीला म्हणाला "तुम्ही माझं हृदय मागितलंत, मी त्याच्या बदल्यात तुमचं हृदय मागितलं, काय चुकलं माझं?"

त्या माणसाचा चेहरा एकदम थिजला!!

"हू इज शी इन द पेंटींग?"

"माय लॉस्ट लव्ह, माझी, आता या जगात नसलेली पत्नी.

"ओह ओह!! आय ऍम सो सो सॉरी यंग मॅन!!"

आणि मग मिटींग संपली,

आनंदला त्या मोठ्या उद्योगपतीने चहापानासाठी बोलावले याची मात्र बरीच चर्चा झाली.

---

प्रसिद्धी ही एक अशी गोष्ट आहे की तिने एखाद्याला वरले की त्याच्या गळयात प्रसिद्धीची बहीण समृद्धीची वरमालाही आपसूकच पडते बऱ्याचदा. आनंदाचेही तसेच झाले. चित्रं भरमसाठ किमतीने विकली जाऊ लागली. आनंदाने नेहमीप्रमाणे "पैसे आहेत फॅक्टरीमध्ये वापरायचे तर वापर" असे चंदूला सांगितले. चंदू म्हणाला, आपण एक बंगला बांधू. सर्वांनाच ती कल्पना आवडली. जवळच एक छानशी जागा बघून बांधकाम सुरूही झालं.

वर्षभरात सगळे शिफ्ट झाले. पुढची काही वर्ष आण्णा, आजी आजोबानी नव्या घराचा आनंद लुटला. पतवंडांबरोबर त्यांची शेवटची काही वर्षे आनंदात गेली. मग एक एक करत दोन वर्षात तिघांनीही या जगाचा निरोप घेतला. आनंद जेव्हा गावात असे, हट्टाने तो सुश्रुषा आपणच करी. आण्णा, आजोबा दोघांचीही त्याने खूप सेवा केली. आजीसाठी बाई ठेवली होती तरी तिच्याजवळ जाऊन बसे, पाय चेपून देई, काका बसलाय म्हटल्यावर मुलंही येऊन बसत,' म्हाताऱ्या चेहेऱ्यांवर मग हसू असे.

आण्णा झोपेतच गेले. "सुखाचं मरण आलं. जन्मभराचं पुण्य कामी आलं" असं आजोबा म्हणाले.

काही महिन्यांनी दुपारी जेवण वगैरे करून पडली ती आजी उठलीच नाही. अहेवपणी मरण आलं म्हणून सगळ्या बायका नमस्कारासाठी मुद्दाम आल्या. आजोबा मात्र जरा त्रास होऊन गेले. दोन महिने अंथरुणावर खिळले होते.

आजोबा गेल्यावर घर एकदम सुनं सुनं झालं, तोपर्यंत त्यांची आजारपणं, औषधोपचार यात गुंतायला व्हायचं. अनंता आणि अनुराधेला तर फारच जाणवायचं हे. इतके दिवस मोठे घरात आहेत ही भावना आधार द्यायची. मुलं आता मोठी झाली, शाळेत मित्रमैत्रिणींमध्ये रमली. सुकन्या फॅक्टरीमध्ये गुंतलेली. घरी दिवसभर हे दोघेच.

आण्णांच्या इच्छेप्रमाणे ते जरा बरे असताना काशीयात्रा करवली होती तिघांना, त्याचं कोण कौतुक होतं त्यांना. "जन्मात वाटलं नव्हतं की काशीविश्वेश्वराचं दर्शन घडेल म्हणून, अनंता, तुझ्यामुळे आणि सुनबाईमुळे हे पुण्य पदरी पडलं रे," असं नेहमी म्हणत.

---

कृपा अलीकडे जवळ जवळ दर महिन्याला रामनगरी यायची. तिची कामंही असायची, शिवाय आनंदच्या टूर्सचं प्लानिंग असायचं. आणि हे रुटीन काहीसं संवयीचही झालं होतं. यावेळेस ती आली तेव्हा अनुराधा आणि अनंता दोघेच घरी होते. हिला पाहून त्यांना बरं वाटलं. चहा वगैरे घेऊन झाल्यावर अनुराधा सरळच म्हणाली, "तुझं आणि आनंदाचं काही लग्नासंदर्भात बोलणं झालय का गं?"

"अं? नाही, म्हणजे आनंदा आता परत लग्नासाठी तयार होईल असं नाही मला वाटत. पण तुमची इच्छा असेल तर विचारेन मी त्याला."

"मी तुम्हा दोघांविषयी विचारतेय."

"अं?आ,. आम्ही फक्त चांगले मित्र आहोत पहिल्यापासून."तिची नजर अनुकडून अनंताकडे आणि आणि परत अनुकडे भिरभिरली.

"तसं असेल तर चांगलंच की. मैत्री असेल तर संसारातील छोट्या मोठ्या अडचणी सोडवणं सोपं असतं." अनंता म्हणाला.

"अं, काका, काकू, कसं सांगू तुम्हाला? तसं काही नाहीय आमच्यात. आम्ही फक्त चांगले मित्र आहोत एकमेकांचे. बस!"

"हं! हं! पण मग तसं असेल तर एव्हाना तू लग्नाचा विचार करायला हवास ना? आहे का कोणी तुझा तसा मित्र वगैरे?"

"अं, नाही काकू, लग्न वगैरे गोष्टींची सध्या तरी माझ्या आयुष्यात जागा नाही."

"लग्न संस्था तुम्ही अलीकडची मंडळी मानत नाही, पण त्याला पर्यायी चांगली दुसरी कोणतीच व्यवस्था अस्तित्वात नाही, आणि साथीदाराची गरज पडतेच. तुझ्या आणि आनंदाविषयी बरच छापून येतं, तुला त्रास नाही होत त्याचा? आनंदाने समाजाला कधीच फारसे जुमानले नाही. अजूनही, समाज कितीही सुधारला तरी दोष स्त्रीकडे दिला जातो. तुला याचा त्रास होत असणार असं वाटतं मला तरी."

"नाही होत. समाज काही नियम बनवतो, जसे, स्त्री आणि पुरुष यांच्यात कोणतं तरी 'नातं' असायलाच हवं, त्यांच्यात केवळ मैत्र असूच शकत नाही. एक तर ते प्रियकर प्रेयसी असतील, किंवा ते एकमेकांना भाऊबहीण मानतील, आणि हे काहीच नसेल तर तो गे असेल किंवा ती लेस्बियन. आमच्याविषयी हे सर्व बोललं जातं. पण जेव्हा आम्ही आमच्या मनाशी प्रामाणिक आहोत तर आम्ही का या गोष्टी विचारात घ्याव्या? लोकांना जे ठरवायचं ते, ते ठरवतातच. आम्हाला ते नाकारण्याची किंवा स्वीकारण्याची काहीच गरज नाही ना? आम्ही फक्त आनंदाच्या चित्रांविषयी जे छापून येतं त्याचा विचार करतो."

अनुराधा आणि अनंताला या पोरीची अधिकच काळजी वाटू लागली.

"तुझे आई वडील?"

"माझे बाबा नाहीत काकू. ममा नाही यात मत देत. बाकी कोणी नातेवाईक नाहीत. पण तुम्हाला त्रास होत असेल या गोष्टींचा तर,.... तर बंद करेन मी येणं इकडे."

अनुराधा तिच्याकडे पाहत राहिली. 'नकळत दुखावली गेली पोर.'

"आम्ही जुनी माणसं कृपा. इथली, या गावातील मानसिकता जुनीच तशी. पण नातं तोडण्याइतकी जुनाट नाही. पण मला प्रामाणिकपणे वाटतं की आयुष्यात मित्राची एक जागा असते, पण तो पतीची जागा नाही घेऊ शकत. पती या शब्दाच्या पारंपारिकतेवर जाऊ नकोस. साथीदाराची अशा अर्थाने

वापरला मी. त्या सुंदर नात्यापासून तू वंचित राहू नयेस. आनंदाने अगदी अल्प काळासाठी का होईना पण अत्यंत रसरशीत नातं भरभरून अनुभवलं आहे, आता तो नको म्हणाला तर आम्ही आग्रह नाहीच केला पाहिजे त्याला. पण तुझं तसं नाही. हो ना?"

कृपा एकदम गप्प झाली.

"हं! पण कोणाशीही नाही ना असं नातं जोडता येत! मला ज्याच्याशी जोडायचं होतं, त्याला नाही जोडायचंय माझ्याशी! आणि मला यात तडजोड करून इतर कोणाचं आयुष्य खराब नाही करायचंय.

तसं पाहाल तर मी आणि आनंद या एका समान धाग्याने बांधले गेलोय. आम्हाला हवा असलेला साथीदार आम्हाला मिळू शकत नाही, आणि इतर कोणाबरोबर आम्ही नातं जोडू शकत नाही."मग ती उठली आणि वर गेली. अनंता आणि अनुराधा विचारात पडले.

---

३.१०

"ए सोना, खाली उतर ना ग पटकन. उशीर होतोय ना. आई मला रागावेल."

"थांब ना रे इंदा, असं काय करतोस आत्ताच तर आलोय ना आपण? तू पण ये ना वर. कसलं भारी वाटतंय माहितीये?"

"नको! मला भीती वाटते. पाय सटकला तर?"

"मी धरते तुझा हात, काही नाही पडत बिडत. तू शाळा सुटल्यावर किती वेळ टाईमपास करतोस मित्रांबरोबर. मी सांगते का आईला?"

"मग मी पण नाहीच ना सांगत की तू झाडावर इतक्या उंच चढतेस ते."

"हं! मग झाली ना फिट्टंफाट!!"

"हं! चल मग आता. लवकर चल. आज कृपामावशी यायचीय."

कृपामावशी यायचीय हे आठवल्यावर सोना पटकन खाली उतरली. मग दोघे निघाले टणटण उड्या मारत घराकडे.

---

इंद्र आणि सोनिकाशी कृपाचं एक वेगळंच नातं होतं.

त्यांना हवे असलेले आणि आईबाबा लगेच देत नसलेले खेळ, यांसाठी कृपा मावशी हक्काची होती. परत तिने आणलंय म्हटल्यावर आई पण काही म्हणत नाही, तेच काकाने किंवा बाबाने आणले तर आई त्यानाही रागावते असं त्यांच्या लक्षात आलं होतं.

कृपा मावशीचं सगळंच निराळं होतं. ती भातुकली पण खेळायची यांच्याबरोबर. आणि खाऊवरून भांडायची पण. काकापण खेळायचा क्रिकेट, लगोरी, पण तो एकदा इंद्राला आणि एकदा सोनाला जिंकू द्यायचा. कृपा मावशीचं तसं नव्हतं. ती चुरशीने भांडून खेळायची. जिंकली की खूप चिडवायची आणि हरली की जाम चिडायची, त्यामुळे मज्जा यायची. जसजशी दोघं मोठी होत होती हे नातं अधिकच घट्ट होत चाललं होतं. सोना झाडावर चढते हे सीक्रेट या दोघांशिवाय मावशीला माहित होतं, पण तिने आईला सांगितलं नव्हतं. घरी पोहोचले तर आई आज लवकर आलेली घरी. कृपामावशी नव्हतीच आली अजून.

"मेलो ठार"

"अरे कुठे होता इतका वेळ? आणि तुझ्या शर्टला काय लागलय सोनिका?"

सोना ने पाहिलं, बुंध्यावरच शेवाळं लागून युनिफॉर्मचा शर्ट खराब झालेला पूर्ण."काही नाही, काही नाही," करत ती पटकन आत गेली.

"काय रे कुठे होतात?" इंद्र बरोबर सापडायचा अशा वेळी.

"अं? कुठे नाही, इथेच मागे होतो." म्हणत तो ही सटकला कसा बसा.

"काकू, रोज असाच उशीर करतात का ही दोघं? अर्ध्या पाऊण तासापूर्वीच पोहोचायला हवी होती घरी."

"नाही गं, येतात लवकर. आणि खेळत बसली असतील कुठेतरी, दुसरं काय? हे वयच असं, अखंड खेळ असतो डोक्यात. तू फार कडक नको बाई राहूस."

"हं! या एका विषयात तुमचं माझं एकमत नाही व्हायचं कधीच." अनुराधेनें हसून मान हलवली मग.

"चला मुलांनो, या दूध प्यायला. आणि अभ्यासाला बसा. कृपा आली की झालंच मग अभ्यासाचं कल्याण. काय? होमवर्क झाल्याशिवाय बिलकुल कृपामावशीला भेटू नाही देणार मी. सांगून ठेवते आधीच."

दोघांनी एकमेकांकडे पाहून तोंड वाकडं केलं. पण न ऐकून सांगतात कोणाला? एकदा आई म्हणाली की आजोबाही काही बाजू घेत नसत. "आईनं सांगितलंय ना? मग?" असच म्हणायचे सगळे.

होमवर्क करून मुलं जेवायला उठणार तेवढ्यात कृपामावशीची गाडी वाजली आणि पोरांनी धूम ठोकली बाहेर. आणि मग तिघांनी मिळून हैदोस घातला अंगणातच. आनंद आणि चंदू आले तेव्हा यांचा धिंगाणा सुरूच होता. मग सगळे आत आले.

कृपाने आधी सुकन्यासाठी काही सॅम्पल प्रॉडक्ट्स आणली होती ती तिला दिली. मग आनंदाने काही ब्रश मागवले होते ते दिले. थोडा खाऊ आणला होता तो अनुराधेकडे सोपवला आणि बॅग बंद करू लागली. मोठ्या मोठ्या डोळ्यांनी आशेने पाहत बसलेली मुलं रडवेली होऊन तिच्याकडे

पाहू लागली, तरी तिकडे दुर्लक्ष करून तिने बॅग बंद केली आणि "भूक खूप लागली बुवा जेऊया" म्हणत उठली. दोघंही रागरागाने तिच्याकडे पाहत आत जाऊन डायनींग टेबलसमोर बसली. जेवताना कृपा बऱ्याच गोष्टींचे अपडेट्स देत राहिली. बिझिनेसच्या गप्पा, आनंदाच्या पुढच्या टूर्स विषयी गप्पा,सुरूच राहिल्या. मुलं जेवण उरकून रुसून निघून गेली झोपायला.

"वाईट्ट आहे कृपामावशी. मला नाही बिलकुल आवडत." "मलापण नाही आवडत."दोघांचं एकदम एकमत झालं. मग झोप लागते न लागते तोच, हळूच कृपामावशी खोलीत आली आणि तिने दिवा लावला.

"हे काय मला गुड नाईट न करताच झोपली वाटतं मुलं. हं! जाऊ दे. आता त्यांच्यासाठी आणलेले खेळ ठेऊ इथेच की घेऊन जाऊ परत माझ्या खोलीत?"दोघंही टुणकन उडी मारून उठून बसली. मग बराच वेळ तिघं खेळत बसली.

"हं! झोपा आता! शाळेला उशीर नकोय. मी शिव्या खाईन फुकट."

"कृपामावशी, उद्या देवळात जायचंय, विसरू नकोस. तू मला तिथल्या झाडावर चढायला शिकवणार आहेस ना?"

"येस्स बॉस!!"

"पाचवीत पास व्हाल ना रे?"

"कृपामावशी!!!!! सातवीत!!"

"हो का? अरे परवा तर पाचवीत होता ना?"

"आम्ही फर्स्ट थ्री मध्ये असतो!!! पास काय?"

"भारीच रे!"

---

दुसरे दिवशी इंद्र आणि सोनिका घरी आले ते प्रचंड मातीत मळलेले कपडे आणि टीचरचं लेटर घेऊन. सुकन्याला बोलावले होते भेटायला.

"अरे पण झालं काय?"

"तो ऋषी आणि ती रिंकू मंद आहेत. काहीही बडबडत होते. मी आधी शांतपणे सांगितलं असली फालतू बकवास करू नका, सांगतेय ते ऐका. तरी ऐकेचनात."

"मग काढलं बुकलून दोघांना आम्ही." इंद्र म्हणाला.

"अरे पण असं काय चिडवलं त्यांनी?"

"म्हणे की सोनिकाची ही आई नाही आणि बाबापण नाहीत. तिचे आईबाबा दुसरेच आहेत. त्यांची आई आणि आजी बोलत होती ते ऐकलं म्हणे. मूर्ख कुठचे."सगळे एकदम दचकले. सुकन्या तर एकदमच भेदरली. कृपा अवधान राखून म्हणाली, “बरं बरं, चला आधी आंघोळ करून घ्या. मग बघू काय करायचं ते.”

मुलं गेल्यावर म्हणाली, "ही योग्य वेळ आहे. सोनाही मोठी होतेय, नीट जवळ बसवून समजावून सांग सुकन्या."

सुकन्या एकदम धीर खचल्यासारखी खालीच बसली. आनंद म्हणाला "मी सांगतो" सगळे आश्चर्याने पाहू लागले. अनुराधाही किंचित घाबरलीच. सोना अगदी आनंदाचा स्वभाव घेऊन आलेली. 'डोक्यात राख घालून घेतली म्हणजे?'

मुलं अंघोळ करून आली. दूध वगैरे पिऊन झालं. आनंद म्हणाला "सोनिका, इंद्र, चला माझ्याबरोबर, तुम्हाला एक गम्मत जागा दाखवायची आहे. सीक्रेट प्लेस."

मुलं बावचळली. 'आपलं कितीही बरोबर असलं तरी आपल्याला ओरडा खावा लागणारच, मारामारी केली म्हणून, आणि आई पनिशमेंट पण देणार हा त्यांचा कयास कसा चुकला?आई काहीच कशी ओरडली नाही?' पण काका सीक्रेट प्लेस दाखवायला नेणार या एक्साइटमेंट मध्ये बाकीचं सगळं मागे पडलं. "कृपामावशी येऊ दे आपल्याबरोबर? प्लीज?"

"हो येऊ दे."

---

मंदिराच्या पुढे जंगलाच्या पायवाटेवर पोहोचल्यावर मुलं हरखून उड्या मारत धावत होती. सोनिका हळूच कृपाला चढता येण्यासारखी झाडं दाखवत होती. कृपा आणि आनंद मात्र एकदम गप्प होते. मुलांच्या चिवचिवाटाला फक्त उत्तरं देत होते.

जसजशी झाडी दाट व्हायला लागली तसतशी मुलं काकाच्या अगदी जवळ येऊन हात धरून चालू लागली.

मचाणाजवळ आल्यावर आनंदाने वर जाऊन शिडी सोडली. कृपा म्हणाली "चढा वर." सोनिका एकदम थांबली.

"ही पनिशमेंट आहे? आम्हाला रात्री इथे एकटं ठेवून जाणार का तुम्ही? मला आईकडे जायचंय."रडवेली होत ती म्हणाली. कृपा अवाक झाली.

"नाही गं, वेडी आहेस का? असं कसं सोडून जाऊ?"

"मग मारामारी करूनही काहीच पनिशमेंट कशी नाही दिली?"

"हं! वर जाऊन बघूया तरी काय सीक्रेट आहे? चालेल?"

मग सोनिका, तिच्यामागे इंद्र आणि सगळ्यात शेवटी कृपा, सगळे वर चढले. आनंद एका पेंटींगसमोर उभा होता. सोनिका त्याच्याजवळ जाऊन उभी राहिली. ते एका अतिशय सुंदर स्त्रीचं चित्रं होतं. ती पाहत राहिली. इंद्रही.

"सोनिका, इंद्र, तुम्हाला माहित आहे हे कोणाचं चित्र आहे?"

"नाही." दोघही एकदम म्हणाली.

"इंद्र ही तुझी काकू आहे, माझी बायको 'सई' "

दोघंही ते ऐकून इतकी आश्चर्यचकित झाली की त्याने फक्त इंद्रालाच उद्देशून बोललेलं लक्षातच आलं नाही त्यांच्या. "मग आहे कुठे ती? आपल्याबरोबर का नाही राहत?"

आनंदने एक आवंढा गिळला. "कारण ती आता नाही. एका गोडश्या मुलीला जन्म देऊन ती देवाघरी गेली." सोनिकाकडे पाहत तो म्हणाला.

अचानक सोनिका झोपेतून जागी झाल्याप्रमाणे तिच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. ती आता एकदा त्या चित्राकडे आणि एकदा आनंदाकडे पाहत राहिली आणि पाहता पाहता तिचे डोळे पाण्याने भरून आले. "खोटारडा आहेस तू. माझ्या आईचं नाव सुकन्या आणि बाबाचं चंद्रशेखर, बाकी कोणी नाही."

इंद्र पुरता बावचळून गेला. "सोना, अगं तुला नाही म्हणत काका काहीच!!"

"तू ठार वेडा आहेस इंदा. मलाच सांगतोय तो. तो काय म्हणाला? इंद्र, ही तुझी काकू. तुमची नाही म्हणाला. म्हणजे ही माझी आई, चित्रातली जी आता नाहीच आहे आणि,.... पुढचा धक्का तिच्यासाठी प्रचंड होता. आणि म्हणजे तू माझा बाबा? हॅट! खोटारडा कुठचा. त्या ऋषी आणि रिंकूसारखा. मला घरी जायचंय, आत्ताच्या आत्ता. मला आई हवीय फक्त. मला आईकडे जायचंय." ती अचानक जोरजोरात किंचाळू लागली. आनंद तिला शांत करण्याचा प्रयत्न करू लागला तशी सोनिका जास्तच ओरडू लागली. आनंदाने तिला जवळ घेण्याचा प्रयत्न केल्यावर तिने त्याला झिडकारून बाजूला केले. मग कृपाने तिचा हात धरला. "चल जाऊया आपण आईकडे." ती कृपाला बिलगली, "काका खोटं बोलतोय ना?"कृपाने काहीच न बोलता तिचा हात धरला, तिच्याबरोबर शिडी उतरून भराभरा चालू लागली.

आनंदाला हा धक्का भयंकर होता, पण इंद्राची अवस्था पाहून त्याला सावरणे आवश्यक होते. तो इंद्राला म्हणाला "चल, जाऊया आपणही."

"काका, ही खरंच तुझी बायको आहे? आणि सोनिका हिची,. तुमची मुलगी?"

"हो बाळा."

"तुझ्या काकूला सोनिका झाल्यावर लगेच कळलं की ती जगणार नाही, मग तिने तिला तुझ्या आईला दिले. तुझ्या आई बाबानी तिला स्वतःच्या मुलीसारखं वाढवलं. तुझी आई सोनिकाला मोठी झाल्यावर हे सगळं सांगणार होती, पण आज अचानक ती मुलं बोलल्यावर सांगावं लागलं आत्ताच." इंद्रने पटकन आनंदाचा हात धरला. जणू तो सांगू पाहत होता की मी आहे तुझ्याबरोबर. थकल्या मनाने आनंद इंद्राला घेऊन घरी आला.

---

कृपा आणि सोनिका घरी पोहोचल्या तेव्हा सुकन्या स्वैपाकघरात, अनंता आणि अनुराधेला वाढत होती जेवायला. या दोघी आत आल्या तेव्हा तिचा हात वाढता वाढता थांबला. डोळे सोनिकाच्या चेहऱ्यावरून कृपाकडे वळले आणि काहीतरी भयंकर बिनसल्याची जाणीव तिला झाली. सोनिका आली ती सरळ सुकन्याच्या गळ्यात पडली आणि जोरजोरात श्वास कोंडेपर्यंत रडू लागली. अनंता, अनुराधा पटकन ताटावरून उठले आणि

तसेच सोनिकाकडे आले. सुकन्यालाही भावनावेग आवरेना. तिने सोनिकाला घट्ट मिठीत घेतले आणि तिने अश्रूंना वाट करून दिली. एकीकडे सोनिकाचे भावविश्व उद्ध्वस्त झाल्याचं तिला जाणवलं तर दुसरीकडे आपण तिला कायमचे गमावू ही भीती अनाठायी असण्याची सुखद जाणीव तिला झाली. अनंता आणि अनुराधेनें सोनिकाला बसवले. पाणी प्यायला दिले. मायेने तिला जवळ घेतले.

"काय झालं बाळा?" अनंता म्हणाला.

"आजोबा, काका काहीही खोटं बोलतोय. की म्हणे, तो माझा बाबा आहे आणि त्या चित्रातील बाई माझी आई आहे.तो त्या रिंकू ऋषीच्या बाजूने बोलतोय."

सईचा 'चित्रातील बाई' हा उल्लेख ऐकून सुकन्या हादरली. पहिल्यापासूनच हे सत्य सोनिकाला सांगायला हवं होतं असं तिला प्रकर्षाने वाटलं. अनुराधा, आणि अनंता तिला काही समजावणार तेवढ्यात इंद्र आणि आनंद पण आले. अनुराधेनें अनंताला खूण केली.

"मी काय म्हणतो, आपण सगळे जेवून घेऊ आणि मग या विषयावर बोलू, चालेल?" सोनिका स्फुंदत स्फुंदतच म्हणाली, "तुम्ही काकाला रागवा. तो कधीच खोटं बोलत नाही. आम्ही खोटं बोलायचं नाही, असं नेहमी सांगतो मग आता का खोटं बोलतोय?"

"बरं! आधी जेवण! सुकन्या, चला, सगळे एकदमच बसू."

नेहमी दोघे काकाच्या दोन्ही बाजूला बसत. ताटात न आवडणारा पदार्थ आला की हळूच काकाच्या पानात आणि आवडीचा तिकडून इकडे.

पण आज सोनिका सुकन्याजवळ बसली. जेवणात तसं कोणाचंच लक्ष नव्हतं. कशीबशी चार घास खाऊन सगळीच उठली. मग अनंता काही बोलणार तेवढ्यात आनंदा म्हणाला, "सोना, बस इथे. माझं बोलणं फक्त ऐकून घे. मग तुला जे वाटेल ते बोल. मी ऐकेन सगळं. तुला आज हे सगळं अचानक ऐकून धक्का बसणं स्वाभाविक आहे. पण तूच मगाशी म्हणालीस ना की काका कधीच खोटं बोलत नाही, ते इतर सगळ्या बाबतीत खरंय. पण एका बाबतीत मी सतत खोटं बोललोय तुझ्याशी. मी तुला कधीच सांगितलं नाही की मी तुझा बाबा आहे. चंदू तुझा काका आणि सुकन्या तुझी काकू."

"नाही!!!!! ही माझी आई आहे." सोनिका परत जोरात ओरडली.

"हो बाळा, ती तुझी आई आहेच आणि राहणारही आहे कायमच, फक्त तिने तुला जन्म दिला नाही. तुला जन्म दिला सईने, जिचं चित्र तू पाहिलंस. तुझ्या जन्माआधीच तिला बरं नव्हतं. जेव्हा तिच्या लक्षात आलं की आपल्या बाळाची काळजी घ्यायला आपण जिवंत असणार नाही तेव्हा तिने सुकन्याकडे तुला सोपवण्याचा निर्णय घेतला. तुझी काळजी घेण्याबद्दल सांगितलं आणि तिच्या सांगण्यानुसार सुकन्या तुझी आई झाली,अगदी खरीखुरी, तिचं दूध पिऊनच तू मोठी झालीस. आता प्रश्न हा पडेल तुला की मग मी का नाही तुझा बाबाच राहिलो? काका का झालो? जेव्हा तुझी आई गेली तेव्हा मीही कोलमडलो. मला तिच्याशिवाय जगायचं कसं हे कळतच

नव्हतं, खरंतर अजूनही अनेकदा कळत नाही. शिवाय, तुम्ही शाळेत गेलात की निरनिराळी नावं लावणार, मग प्रश्न विचारले जाणार आणि अगदी लहान वयात आई नसण्याचं दुःख तुला सोसावं लागणार, हे सगळं कशाला असं तेव्हा तरी वाटलं. मूल म्हणून अनेक निर्णय पालकांना घ्यावे लागतात. तेव्हा काका काकूंना ते घेता यावेत असही वाटलं. सुकन्याने तू मोठी झाल्यावर तुझ्या आईविषयी तुला सांगायचं ठरवलं होतं, ते ती तुला सांगेलच. हे बघ बाळा, तसं बदलणार काहीच नाहीय. सुकन्याच तुझी आई आहे आणि राहणार आहे. कायमच. चंदू तुझा बाबा आहे आणि राहणारच आहे. आणि मी तुम्हा दोघांचा काकाच राहणार आहे. यांत काहीही बदलणार नाही."

सोनिकाने खात्रीसाठी सुकन्याकडे पाहिले. तिच्याकडे पाहिल्यावर काका खरं बोलतोय यावर शिक्कामोर्तब झालं. सोनिका यावर काही बोलली नाही. तिचा आनंदाच्या प्रत्येक वाक्याबरोबर बदलत जाणारा चेहरा मात्र कृपा आणि सुकन्याने पाहिला होता.

"चल इंदा झोपायला, उद्या लवकर उठायचंय,"असं म्हणत त्याच्या हाताला धरून उठवत सोनिका त्याला घेऊन गेली. तो बिचारा बावचळून एकदा काकाकडे, आईकडे आणि सोनिकाकडे बघत तिच्याबरोबर गेला.

---

सुकन्याला काहीतरी प्रचंड बदलल्यासारखं वाटलं पण काय ते तिला समजेना. कृपाला मुलांबरोबर जावंसं वाटलं,पण एका दिवसापुरतं खूप झालं असा विचार करून ती गप्प राहिली. चंदू परगावी होता नेमका आणि

सुकन्याला त्याची खूप उणीव भासली आज. आनंदाला आज फार फार एकटं वाटलं. 'सई, तू माझ्या जागी असतीस तर सोनिकाची आई आणि बाबा दोन्ही झाली असतीस ना? मी फार कमी पडलो गं!'

त्या रात्री कोणालाच धड झोप लागली नाही. प्रत्येकजण निरनिराळ्या विचारात जागत राहिला.

---

दुसरे दिवशी सोनिका उठली ती एकदम शहाणी होऊन. रोज सकाळी आधी आंघोळीला कोणी जायचं यावरून भांडण व्हायचं. मग सुकन्याने एक दिवसाआड एकाने आधी आंघोळ करायची असा नियम घालून दिला होता. पण सोनिका कधी दादागिरी करून, कधी काही आमिष दाखवून, नेहमी इंद्राला आधी जायला लावायची. आज मात्र काही न बोलता ती आंघोळीला गेली. बाकीही गोष्टी तिने जराही न कडकड करता भराभर उरकल्या. इंद्राला बॅग भरायला मदत केली. मग कालचा होमवर्क दोघांचाही झाला नव्हता, त्याबद्दल सुकन्याकडे खालमानेने दोघांनीही डायरीत सही मागितली.

काल टीचर "सॉरी म्हणा किंवा पॅरेण्टना घेऊन या"म्हणाल्या होत्या. "आज आम्ही सॉरी म्हणतो" असं दोघांनीही सांगितलं. तसं सुकन्या ऋषी रिंकूच्या आईशी बोलली होतीच कालच. जाताना सुकन्याने डबे दिले दोघांना, नेहमीच्या सूचना मात्र आज द्याव्याशा वाटल्या नाहीत तिला. ‘जपून

जा’ एवढच म्हणाली. अनुराधेलाही हे सूक्ष्म बदल जाणवले. इतिहासाची पुनरावृत्ती नको रे देवा आता, तिने मनातल्या मनात प्रार्थना केली.

----------

शाळेतही सोनिका शांत शांतच होती. टीचरनी भर वर्गात सर्वांसमोर सोनिका आणि इंद्राला ऋषी आणि रिंकूची माफी मागायला सांगितली. इंद्र तिच्याबरोबर येऊ लागला तसं सोनिका म्हणाली "माझ्यामुळे इंद्र त्यांच्याशी भांडला. त्याच काही भांडण नव्हतं, मी सॉरी म्हणते." ऋषी व रिंकूही म्हणाले "तो आधी नव्हताच भांडणात." मग सगळ्यांसमोर सोनिकाने सॉरी म्हटलं. मधल्या सुट्टीपर्यंत सगळ्यांना कळलं सोनिकाचे आईबाबा वेगळे आहेत. सगळे तिच्याकडे बघून कुजबुजू लागले. ती खालमानेने आतल्या आत उकळत वरून शांत राहिली.

घरी परत येताना इंद्र म्हणाला "सोना चल झाडावर चढू. तू हात धर मग मी चढतो."ती नको म्हणाली. "ए काय यार सोना? जाऊ दे ना. तू पहिल्यासारखी हो यार. मी आईला नाही सांगणार तू झाडावर कितीही वर चढलीस तरी. प्रॉमिस." "मी आई नको म्हणेल ते काहीच आजपासून करणार नाही इंदा. काही म्हणजे काहीच नाही. मी ती म्हणेल तसच करणार सगळं. तिला मला डॉक्टर करायचंय ना, मग मी डॉक्टरच होणार. तिला अभ्यास केलेला आवडतो ना मग मी खूप अभ्यास करणार. तिला आवडत नाही ते काहीच करणार नाही. मी तिची बेस्ट मुलगी होणार."

"पण तू रडतेय कशाला?"

"येतंय मला रडू, म्हणून."

"का पण? का रडू येतंय?"

"कारण माझी खरी आई नाहीय आणि मी तिला कधीच भेटू शकणार नाही आणि माझा खरा बाबा आहे आणि त्याने मला देऊन टाकलीय. आणि आई माझी काकू असून तिने मला देऊन टाकले नाही. पण तिनं मला नको म्हटलं तर मी काय करू इंदा?"

"ती का नको म्हणेल पण?"

"बाबाने नको म्हटलं तसं?"

"बाबाने कुठे तुला नको म्हटलं?"

इंद्र जाम गोंधळून गेला होता.

"म्हणजे जो माझा खरा बाबा आहे आणि आपण त्याला काका म्हणतो त्याने!"

"नको कुठे म्हटलं पण?"

"तू ना वेडा आहेस इंदा!!"

"बरं बरं, मी वेडा तर वेडा, पण तू रडू नकोस ना प्लीज.मला कसं तरी वाटतं मग."

"तू नाही ना मला नको म्हणणार इंदा?"

"नाही नाही!! कधीच नाही. आईशप्पथ नाही."

त्या मुलीच्या मनात चाललेली चलबिचल त्याला नीटशी कळत नव्हती आणि त्याच वेळी काहीही करून तिला बरं वाटावं असं मात्र त्याला वाटत होतं. त्यासाठी काहीही करण्याची त्याची तयारी होती. आधीच घट्ट असलेला त्यांच्यातला बंध त्यादिवशी अधिक घट्ट आणि चिवट झाला.

———

त्या रात्री सुकन्या सोनिकाला म्हणाली "आज तू माझ्याबरोबर झोपतेस?" सोनिका हो म्हणाली.

"ए, मी एकटा नाही झोपणाराय,"

"नाहीच. मी येणार तुझ्याबरोबर गप्पा मारायला आणि झोपायला." कृपा हळूच इंद्राच्या कानात म्हणाली.

"सोनिकालाही बोलावुया ना मग. ती सारखी रडत असते."

"नको तिला आईबरोबर झोपू दे. ती सारखी आई आई करते ना म्हणून. आपण आपलेच खेळू."

इंद्राला फार काही ते पटलं नाही. पण कृपामावशी सोबत असणार म्हटल्यावर तो खुश झाला.

———

"सोनिका, ये तुझ्या केसांना तेल लावू, उद्या शनिवार आहे ना, न्हाऊन टाक." मग तिने केसांना तेल लावून घट्ट वेणी घातली तिची. "तुला आठवतंय सोनिका, तुम्ही दोघे लहान असताना, काकाबरोबर झोपायचात.

तुम्ही अगदी तान्हे असल्यापासून आनंदभाऊजींच सांभाळायचे तुम्हा दोघांना रात्रीचे. इतकं मायेने करायचे सगळं. तुझ्या पोटात दुखायचं, तू खाली ठेवलं की रडायचीस. तर रात्र रात्र तुला खांद्यावर घेऊन फिरायचे. दिवसभर फॅक्टरीत काम करून यायचे, पण तुला कधी रडवत ठेवून झोपले नाहीत. इंद्रलाही नाही."

मग तिने सई बद्दल सांगायला सुरवात केली. सईच्या पहिल्या भेटीपासून तिने सुरवात केली. आणि सुरवातीला झालेला आपला ग्रह, मग, एकत्र केलेल्या प्रवासात तिचे दूर झालेले गैरसमज, मग जुळत गेलेली घनिष्ट मैत्री, गरोदरपणातील सुकन्याचे सतत बदलणारे मूड, सईचा समजूतदारपणा, तिला वाटणारा सईचा आधार. मग बिघडत गेलेली प्रकृती.सगळं सगळं धबधब्यासारखं बाहेर पडत राहिलं, सोनिका त्यात चिंब भिजत आपल्या खऱ्या आईला भेटत राहिली.

मग तिने सुकन्याला घट्ट मिठी मारली. "तुला आवडणार नाही अशी कोणतीच गोष्ट मी करणार नाही कधीच. पण काकाने जसे मला तुम्हाला देऊन टाकले तसे तू आणि बाबा मला देऊन नाही ना टाकणार?"

सुकन्याने तिला कुशीत घेतले. मग म्हणाली, "बाळा, मी जन्म दिला नसला म्हणून काय झालं? जन्मल्यापासून काही तासात तू माझ्या कुशीत होतीस. मी कशी देईन तुला कोणालाही?आणि भाऊजींनी जे दिलं असं म्हटलं ते आम्हाला सोपं जावं म्हणून. ते तुझ्यावर तितकच प्रेम करतात

जितकं आम्ही, किंवा कदाचित त्याहूनही जास्त." सोनिका यावर काहीच बोलली नाही.

---

कृपाने इंद्रकडून त्यादिवशीचा सगळा अहवाल घेतला. सोनिकाच्या मनातील वादळाचा तिला अंदाज येत नव्हता तो थोडाफार या संभाषणातून आला. तिला सोनिकाची तिच्या खऱ्या बाबाविषयीची चीड समजून घेता घेता कुठेतरी आपल्या आईविषयीची आपल्या मनातील अढीही समजली. पण आनंद सोनिकमधील हा तिढा सोडवायचा कसा? याचं उत्तर मात्र तिला मिळत नव्हतं.

---

काही दिवस असेच गेले. आनंदा गप्पच होता. सोनिका त्याला टाळते,त्याच्याशी बोलत तर नाहीच, पण जेवतानाही त्याच्या बरोबर बसत नाही हे सर्व त्याला दिसत होतं, आणि तरी तो गप्प होता. योग्य वेळेची वाट पाहत होता. कृपा परत निघाली तेव्हा नेहमीप्रमाणे मुलांना झोपण्यापूर्वी भेटली. पहाटे निघणार होती ती.

"सोना, झाडावर चढणं राहिलं बरं का आपलं या वेळेस. आता पुढच्या वेळेस आले की करू तो प्लॅन. आणि गेम्स कोणते हवेत ते जरा आधी सांगत जा रे, अगदी लास्ट मिनिट शोधताना दमछाक होते माझी."

इंद्रने लगेच सांगून टाकलं काय हवय ते. सोनिका काहीच बोलली नाही.

---

आनंदला भेटली मग ती जाऊन. मुलं जशी त्यांच्या खोलीत झोपू लागली कृपा रात्रीची जायची नाही आनंदाच्या खोलीत. पण आज गेली.

"मला सगळं दिसतंय गं! पण मला घाई नाही करायचीय. मी सोनिकाला समजावून सांगू शकेन, मला खात्री आहे. याच विषयावर बोलायला आलीस ना?"

हं!

"का अशी वागतेस? का वाया घालवते आहेस ही महत्वाची वर्षं? तुला तुझं म्हणून काही आयुष्य नाहीय का?"

"तुला आहे?"

"म्हणजे काय?"

"म्हणजे काय फरक आहे रे तुझ्या माझ्या आयुष्यात?"

"अगं, माझं प्रेम करून झालय. आयुष्याचा तो अनुभव घेऊन झालाय. एक मुलगी आहे मला."

"प्रेम तर माझंही करून झालय ना आनंद? अजूनही करतेच आहे मी. तिथे एक पॉईंट मला जास्त आहे.माझी स्वतःची नसतील पण ही मुलं काही प्रमाणात माझ्याही आयुष्याचा हिस्सा आहेतच की. आणखी काय आहे रे वेगळं तुझ्या माझ्या आयुष्यात? तुला तुझी कला आहे, मला तू आहेस."

त्याने अस्वस्थतेने केसातून हात फिरवला.

"कृपा प्लीज, मला फार अपराधी वाटत राहतं मग."

"विषय मी नव्हताच ना काढला! बरं सध्या ते महत्वाचं नाहीच आहे. तुला माहित नसणार हे, पण ही टिप तुला उपयोगी पडेल. सोनिका माकडासारखी लीलया झाडांवर चढते. इंद्र सोडून ही गोष्ट फक्त मला माहित होती. पण आता बंद केलय तिने झाडांजवळ जाणंही. तिने मनात घेतलय की ती सुकन्याला आवडणार नाही अशी एकही गोष्ट ती करणार नाही. आता या माहितीचं तू काय करतोस हे मला बघायचंय आनंद. एकच सांगते, पुढच्या वेळी मी परत येईन तेव्हा मला पहिल्यासारखी, सईसारखी स्वच्छंद सोनिका परत हवीय. नाहीतर मी इथे येणं बंद करेन. त्या मुलीला असं तळमळताना पाहणं मला शक्य नाही."

आनंद आश्चर्याने तिच्याकडे पाहत होता. कृपाला अचानक हुंदका फुटला. आनंदने तिला जवळ घेतले. ती त्याच्या खांद्यावर डोकं ठेवून रडत राहिली. मग बाजूला होत म्हणाली "मी तुला माझ्या प्रेमाबद्दल सांगून चूक केली. आता ती आधीची मैत्रीही हरवली का रे आपल्यातून? तू विसरून जा ना सगळं. तो मनमोकळा मित्र मिळू दे मला परत. लेट्स नॉट कॉम्प्लिकेट थिंग्स फॉर अस. होईल हे शक्य?"

मग ती चटकन त्याच्या खोलीतून बाहेर पडली.

---

३.११

पहाटे कृपा बॅग घेऊन खाली उतरली. चहा घेऊन मग निघायचा विचार होता तिचा. सुकन्या जनरली उठायचीच ती जाताना. पण काल चंदू यायचा होता उशीरा रात्री. "तू परत उगाच पहाटे उठू नकोस" असं कालच सांगून ठेवलं होतं तिने सुकन्याला. पण कोणीतरी किचन मध्ये होतं.

'काकू उठल्या की काय?'

ती आत येत होती तेवढ्यात आनंद चहाचे दोन कप घेऊन आला.

"अरे!! व्हॉट अ प्लेजन्ट सरप्राईज!! आज तू कसा काय उठलास?"

"काल कोणीतरी मला काय काय बोलून गेलं मग काय करणार?"

"हम्म! गूड!"

चहा झाल्यावर ती निघाली. "चल, मी ही येतोय मुंबईला. माझं काम आहे थोडं."

"अरे काल नाही काही बोललास ते?"

"का आज नाही का आठवू शकत मला?"

कृपा ओठ दुमडून हसली मग.

"बरं, मग चाचाला सांगते नको येऊ टॅक्सी घेऊन. त्याला थोडे पैसे दे रे पण."

"ओके."

"याहू!! चल मस्त गप्पा मारत जाऊ. किती दिवस मुक्काम?"

"नाही लगेच आज परत."

"काहीही काय?"

"का? त्याला काय झालं?"तिने खांदे उडवले मग. त्याने खरंच बॅग पण नव्हती घेतली बरोबर. गाडीत बसल्यावर तो म्हणाला मागच्या सीट वर बघ जरा, हात लांब करून. तिने पटकन मागे वळून उचलली तर एक छोटीशी फ्रेम, तिने लगेच गाडीतला लाईट लावला. सई, आणि आनंदाच्या मध्ये कृपा उभी असलेलं आणि तिचे दोन्ही हात त्या दोघांच्या हातात गुंफलेले असं चित्र होतं ते, एका फोटोवरून काढलेलं.

"हॅपी बर्थडे कृपा!"

"ओह माय गॉड!!! काय तारीख आहे आज. नो वे!! माझा बर्थडे मीच विसरले आणि तुझ्या लक्षात होता?"

"म्हणून तू आलीस त्याच दिवशी म्हणालो एक दिवस पुढची घे फ्लाईट. पण मॅडम कुठे ऐकतात कोणाचं"

"काय यार!! अक्खा बर्थडे मी प्रवासात घालवणार, शी!"

"म्हणून येतोय मुंबईपर्यंत"

"मला सोडायला फक्त?"

"हम्म!"

थँक यू सो सो मच!!

'हे चित्र किती आनंदी क्षणांची साक्ष आहे. सईने मला तिच्या आयुष्यात स्थान दिलच होतं. तुझ्या वैयक्तिक जीवनात मी होतेच सामील, तू अलाव केलं होतस मला, हे तू न सांगताही मला माहित होतं, पण आज तू तुमच्या दोघांच्या कोशात मला थोडीशी जागा करून दिलीस ही भावना मला कशी भरून टाकतेय हे मी तुला शब्दात नाही सांगू शकणार आनंद!'

कृपा या विचारात हरवून गेली, मग परत म्हणाली "थँक यू!!"

आनंद ने फक्त होकारार्थी मान हलवली.

'कृपा, तू माझी आशा आहेस. तू आनंदी असलीस की 'ऑल इज वेल' असं नेहमी मला वाटत आलय. तू नेहमी खऱ्या आनंदाला जागं करायचीस तुझ्या निर्व्याज वागण्याने. पण आता तू खरीच दिसते आहेस तेवढी आनंदी आहेस की हा तुझा एक बेमालूम मुखवटा आहे? हे तपासून पाहायला खरंतर मी येतोय तुझ्याबरोबर. तू तुझं माझ्यावर प्रेम आहे म्हणालीस. मला शंका नव्हतीच कधी त्याविषयी. म्हणजे स्त्री पुरुष प्रेमासारखं असेल हे नव्हतं माहिती. पण प्रेम निरनिराळे वेष परिधान करून येतं ना? मुळात ती भावना एकच, रूपं निरनिराळी. पण सई आणि माझ्यामध्ये जे काही होतं ते कधीच न संपणारं आहे. अशात मी तुला माझ्या आयुष्यात सामील करून घेतो म्हटलं तरी तू तयार नाही व्हायचीस, मला माहित आहे. आणि मलाही तुझी फसवणूक केल्यासारखं वाटेल. हा तिढा कसा सुटणार कृपा?' तो आपल्याच विचारात हरवला.

"हॅलो! ओ विचारवंत! कुठे लागली तंद्री? गाडी चालवतो आहेस की टांगा? दहा चा स्पीड? झोप आली काय? चल चाक दे माझ्या हातात."

आनंद एकदम विचारातून जागा झाला.

"कृपा, अगं आपल्याला मुंबईला जायचंय फक्त. पुढे तू फ्लाईटने जाणार आहेस, विसरली नाहीस ना? पोहोचू वेळेत."

"तुला माहित आहे? मी नेहमी चाचाला का बोलावते? हायवेला लागल्याबरोबर मी चाकावर बसते आणि चाचा मागे स्वस्थ झोपून जातो."

"हम्म! म्हणून एवढे भरमसाठ पैसे देतेस होय त्याला? जीव धोक्यात घालून येतो बिचारा."

"आनंद! फटके देईन हां!"आनंद मग खदखदा हसला. तिलाही मग तिच्या भडकण्याचं जाम हसू आलं.

---

गप्पा मारत, हसत हसवत, कधी सिरीयस होत, मुंबई कधी आली कळलंच नाही. आनंदने गाडी सरळ त्यांच्या कॉलेजजवळच्या टपऱ्यांकडे वळवली. पण तिथे नुकतच एका बिल्डिंगचं काम सुरू झालेलं होतं. टपऱ्या उठल्या होत्या. दोघांचाही विरस झाला.

'आपण कितीही आयुष्याला 'जैसे थे मोड ' वर पकडून ठेवायचं म्हटलं तरी ते निसटतच चिमटीतून. जसा सईचा प्राण अलगद निसटून गेला तिच्या कुडीतून!' आपला हात हातात असूनही.'

एक जबरदस्त कळ उमटली आनंदच्या मनात. तिचा आवेग इतका जास्त होता की जणू खरीच उरात कळ यावी इतका त्याचा चेहरा वाकडा झाला.

"ए, काय रे? बरं नाही का वाटत आहे?"

"नाही नाही, काही नाही. भूक लागलीय आणि हे सगळं बंद. आता?"

"अरे? ये बेम्बई है मेरी जान! डोक्यावर छप्पर नाही मिळणार, लेकिन पेट भरेगा साब!! "

आनंदा असहाय चेहरा करून म्हणाला "किती फिल्मी आहेस ग!"

"चल, तुझा सीन एकदम चेंज करते."

"हे भगवान! अगं इतकं नको गं शब्दशः घेऊस."

"चल रे! राईट घुमाओ! "आणि मग ती त्याला एका पंचतारांकित हॉटेल मध्ये घेऊन गेली.

"कृपा, माझं भागेल पण तुझं पोट भरेल ना इथे? फारच कमी कमी देताहेत बघ ना."

तिने वैतागून काटा फेकला त्याच्यावर. तो बाजूला झाला आणि काटा टणकन जमिनीवर आदळला. दोन वेटर्स पळत आले. "एनी प्रॉब्लेम सर? मॅम?"

"अं? नथिंग! "दोघेही संशयाने पाहत गेले. या दोघांनाही प्रचंड हसू येत होतं ते त्यांनी कसंबसं दाबलं.

"आनंद, सोनाला सिरिअसली घे. शी इज गोइंग थ्रू अ व्हेरी बॅड फेज राईट नाव! लहान आहे, विसरेल सगळं, असा विचार करू नकोस. "जेवण संपत आलं तसं कृपा म्हणाली.

"जसा तुझ्याबाबतीत केला असं म्हणायचंय का तुला?" कृपा एकदम दचकली. पण काही बोलली नाही.

"हे बघ कृपा, सोनिका माझी मुलगी आहे, आणि माझ्यासारखीच आहे बरीचशी. मी चांगलं ओळखतो तिला. पुढच्या वेळेस तू येशील तेव्हा तुला परत हसरी नाचरी सोनिका दिसेल. आय प्रॉमिस."

"थँक यू!!"

"डोन्ट! हे मी करू शकलो नाही तर सईला कसं तोंड दाखवू शकणार मी?"

कृपा धाडकन जमिनीवर आली. तिचा चेहरा साफ पडला. आनंदला त्याचा तपास पूर्ण झाला असं वाटलं. 'पण उपाय काय?' यांचं उत्तर त्याच्याकडे नव्हतं. ‘निदान आज तिच्या बर्थडेच्या दिवशी हे शेवटचं वाक्य नको होतं मी बोलायला.’ त्याच्या त्या क्षणी लक्षात आलं पण तीर कमानीतून सुटला होता.

आनंद कृपाला एरपोर्टवर सोडून निघाला. दोघांच्यात एक प्रकारचा अवघडलेला सायलेन्स होता. सकाळपासूनचा गमतीचा माहौल कुठल्या कुठे नाहीसा झालेला.

"पोहोचलीस की फोन कर."

"हं! बाय!"

ती बॅग्स घेऊन निघाली. तिला मागे वळून पाहायचच नव्हतं. आनंद मात्र ती दिसेनाशी होईपर्यंत तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत राहिला. आपल्या शेवटच्या वाक्याने कृपा ज्या पद्धतीने दुखावली गेली ते पाहून तो फार अस्वस्थ झाला. पण निदान जे शोधायला निघालो त्याची अगदी परिपूर्ण कल्पना आली, असं वाटलं त्याला. मग मात्र तो निघाला. आता त्याला त्याहूनही मोठी समस्या हाताळायची होती. कृपाशी निदान समोरासमोर बसून बोलणं शक्य होतं. सोनिकाच्या बाबतीत ते शक्य नाही हे परवाच लक्षात आलं होतं. आपल्याच विचारांच्या तंद्रीत तो रामनगरकडे परत निघाला.

———

"आनंद कृपाला सोडायला गेलाय मुंबईला. रात्र होईल परत यायला असा मेसेज आहे."

चंदूने सकाळी डायनिंग टेबलवर सर्वांना सांगितलं. सोनिकाने एक मोठा निश्वास सोडला. काकाबरोबर असताना तिला प्रचंड अस्वस्थ व्हायचं.

तिनेच धरलेला अबोला तिला खूप त्रास द्यायचा. मुलं शाळेला गेली तसं सुकन्याने झाला सर्व प्रकार चंदूच्या कानावर घातला.

"बिचारी पोर!! आपलं चुकलं का गं तिला आपलं नाव लावलं ते?"

"माहित नाही. पण लहानपणापासून आईविना पोर म्हणून लोकांची सहानुभूती सहन करावी लागली असती तिला. शिवाय मुलगी मोठी होत असताना तिच्या आईने प्रसंगी कडक धोरण स्वीकारून, प्रसंगी मैत्रीण होऊन तिला वाढवायचं असतं, अशा वेळेस तिच्या मनात 'ही माझी आई नाही' हा विचार येणं, आणि त्यातून अढी निर्माण होणं हे फार घातक ठरू शकतं. हे सगळं टाळण्यासाठी आपण सर्वांनी मिळून तिला आपलंच नाव देण्याचं ठरवलं. योग्य वेळी आपण तिला हे सर्व सांगणारही होतो. पण मधेच ती मुलं बोलली. आनंद भाऊजीही फार अस्वस्थ आहेत. बोलत नाहीत काही पण त्यांनाही सोनाची तडफड पाहवत नाहीय आणि तिने तर बोलणंच बंद केलाय त्यांच्याशी."

"हम्म!"

---

"अहो, आपण बोलूया का सोनाशी?"

"काळजी करू नकोस. आनंदा करेल सगळं सुरळीत. बाप आहे तिचा तो."

"तुम्हाला वाटते खात्री?"

"अगदी निश्चित!"

अनंताने असं म्हटल्यावर मात्र अनुराधेच्या जिवात जीव आला.

---

रात्री जेवणाच्या वेळेआधीच आनंद पोहोचला. सगळे जेवायला आले. सोनिका सुकन्याजवळ बसली. आनंद आणि इंद्र समोरच्या बाजूला बसले होते. आनंद म्हणाला इंदा चल उठ, आणि येऊन सोनिकाच्या शेजारी बसला, इंद्राला आपल्या शेजारी बसवला.

आपल्याला बुवा सोना आणि इंद्राच्या मध्ये बसल्याशिवाय जेवण जातच नाही. सोनिका उठून जाऊ लागल्यावर त्याने नुसता खांद्यावर हात टाकून तिला बसवून ठेवली. त्या दणकट हाताच्या विळख्यातून तिला सुटता येईना आणि त्या स्पर्शाने मात्र तिला खूप रडायला यायला लागले.

त्याने तिला आपल्याकडे वळवले, तिचे डोळे पुसले, तिच्या डोळयात बघून नजर स्थिर ठेवत तिला म्हणाला, "सोना, तू माझ्यावर खूप रागावली आहेस आणि तुझ्या दृष्टीने ते बरोबरही असेल हे मी नाकारत नाही. पण त्यावेळी, जेव्हा तुझ्या आईने हे सांगितलं सुकन्याला की आता तू सांभाळ माझ्या मुलीला तेव्हा चंदूने तुझा बाबा होणं आम्हाला योग्य वाटलं. पण म्हणून माझं तुझ्यावरचं प्रेम कमी नाही झालं. उलट तुला मुलगी म्हणून आणि आईवेगळी मुलगी म्हणून सर्वांनीच काकणभर जास्तच प्रेम केलं. माझा हेतू तुझी जबाबदारी टाळण्याचा मुळीच नव्हता. तू मला नको होतीस

असंही नव्हतं. हे तू कायम लक्षात ठेव." असं म्हणून त्याने तिला एकदा मिठीत घेतलं आणि थोपटलं. तिचं ताठर शरीर त्याला तिच्या मनातला राग सांगत होतं. मग तिला थोडी लांब करत दोन्ही मुलांच्या खांद्यांवर त्याने हात टाकला आणि म्हणाला, "सोना, सुकन्याने तुला तुझ्या आईबद्दल काही गोष्टी सांगितल्या असतील पण तिला एक गम्मत माहीतच नाही."

आपण याच्याशी बोलत नाही हे विसरून सोनिका एकदम म्हणाली "कोणती?" मग तिच्या एकदम लक्षात आलं आणि ती म्हणाली "माझ्या आईला माहित नाही असं नसेलच काही. तिने सगळं सांगितलंय मला."

"सुकन्या, तुला माहित आहे? सईला झाडावर चढून बसायला आणि तिथे बसून खारूताईला शेंगदाणे भरवायला आवडायचं?" त्याने सुकन्याला हळूच खूण केली.

सगळेच आश्चर्याने ऐकू लागले. सोनाने अत्यंत आश्चर्याने आनंदाकडे पाहिले. मग तिच्या डोळयात अविश्वास दाटला.

"काय सांगताय काय भाऊजी?" सुकन्या सुकन्याने क्लू घेऊन पुढे संभाषण चालू ठेवलं.

"अरे काका, सोनाही कसली भारी चढते झाडावर!" मग इंद्राने एकदम जीभ चावली. सोनिकाने चमकून आधी इंद्राकडे आणि मग सुकन्याकडे अपराधी नजरेने पाहिले. सुकन्याच्या लक्षात आली ही गोष्ट. तिने एकदा सोनिकाकडे पाहिलं. ती खाली मान घालून जेऊ लागली.

"भाऊजी तुम्ही सोनिकाला सुरक्षित पद्धतीने झाडावर चढायला शिकवाल? आणि इंद्रालाही शिकवा, नाहीतर तो माझ्यासारखा भित्रीभागूबाई होईल. त्या दोघांनीही सई सारखं निर्भय व्हायला हवाय मला."

"मला चालेल, पण तुझ्या लेकीची तयारी आहे का माझ्याबरोबर यायची?"

"येईल ती. मी सांगितलं की येईल."तिने मग सोनाच्या डोक्यावरून हात फिरवला.

---

सोनिका आणि इंद्राला घेऊन आनंद मंदिरात आला. सोनिका अजूनही त्याच्याशी बोलत नव्हती आपणहून, पण आता पाहिल्यासारखे ते जेवायला बसू लागले होते. चंदूनेही आपल्यापरीने तिला समजावले.

"सोनिका, आनंदाने जे केलं ते तुझ्या भल्याचाच विचार करून केलं. आणि आपल्या मुलीला असं दुसऱ्याचं नाव लावू देणं ही सोपी गोष्ट नाही बेटा. तुझ्या आईला दुसरा पर्यायच नव्हता. तिला इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा तुझ्या लालनपालनाची काळजी होती. पण आनंदाचं तसं नव्हतं. तो त्याचं नाव तुला लावू शकत होता. लालन पालन तर त्याने केलंच. रात्र रात्र तुला खांद्यावर घेऊन फिरायचा."

सोनिका जरा विचारात पडली. 'परवा आईनेही हे सांगितलं, पण तेव्हा ते आपल्याला बरं वाटावं आपला राग कमी व्हावा म्हणून ती सांगतेय असं

वाटलं तिला. आज बाबाही तेच सांगतोय. आईनेच सांगितलं असेल का सांगायला?'

मंदिरात जाऊन आधी गाभाऱ्यात शिव शिव शंभो असा प्रतिध्वनी काढून मग तिघे मागे गेले. काकानेच पहिल्यांदा दाखवलं होतं कुठे उभे राहिलं म्हणजे सर्वात मोठा प्रतिध्वनी ऐकू येतो ते. त्यामागचं शास्त्रही सांगितलं होतं. मग स्कूलमध्ये साऊंड शिकताना "एको" हा भाग टीचर शिकवू लागल्या तेव्हा सोनिका आणि इंद्राने या मंदिराच्या गाभाऱ्याबद्दल सांगून जाम भाव खाल्ला होता. तेव्हा काका कसला भारी वाटलेला तिला. आत्ता अचानक सगळं आठवलं तिला.

आनंद झाडाखाली गेल्यावर एकदम म्हणाला, "सोना, इथे सगळ्यात पहिल्यांदा मला तुझी आई भेटली. अशी मस्त त्या एकदम वरच्या फांदीवर बसली होती. हातात एक खारुताई होती आणि ती तिला शेंगदाणा भरवत होती. तिने आकाशी रंगाचा ड्रेस घातला होता. तेव्हा इथे फारसं कोणी यायचं नाही आणि मला अचानक पैंजणांचा आवाज यायला लागला. मी आपला बघतोय सगळीकडे तर कोणीच नाही. आवाज तर येतोय. एकदम घाबरलो होतो मी. मग बाईसाहेब तिथे वर दिसल्या."

दोन्ही मुलांना जाम मज्जा वाटली. तेवढ्यात सोनिकाला काहीतरी आठवलं.

"तुला कृपामावशीने सांगितलं ना?"

"काय?"

"की मी झाडावर चढते?"

"मला शाळेजवळचं आंब्याचं झाड, पानसरेंच्या बागेतलं पेरूचं झाड, जुन्या घराच्या बागेतलं जांभळाचं झाड,सगळी माहित आहेत सोना."

सोना आणि इंद्र आश्चर्याने पाहू लागले. ही सर्व सोनाच्या नेहमीच्या चढण्याची झाडं होती.तिने एकदा संशयाने इंद्रकडे पाहिले पण तो तिच्याइतकाच आश्चर्यचकित दिसत होता शिवाय इंदा मुळीच कोणाला सांगणार नाही अशी तिला पूर्ण खात्री होती.

"तुला कसं माहित?"

"ती माझी सीक्रेट आहे."

सोनाने थेट सईसारखे गाल फुगवले. आनंद पाहतच राहिला.

"सांग ना रे काका." इंदा साधेपणाने म्हणाला.

आनंद फक्त हसला.

"हम्म! तर सई या झाडावर मला पहिल्यांदा भेटली.मी म्हटलं पडशील तर माझ्यावर असेच गाल फुगवून रुसली." त्याने सोनाच्या नाकावर टिचकी मारत म्हटलं.

"थेट तुझ्यासारखेच गाल फुगवयाची ती रुसली की."

"मी तिच्यासारखी दिसते?"

"सध्या फार नाही दिसत आहेस पण कदाचित मोठेपणी दिसशील. पण गाल तस्सेच फुगवतेस."

मग त्याने आपलं पाकीट काढलं. त्यात एक इंद्राचा आणि सोनिकाचा एकत्र फोटो होता आणि एक लहान मुलीचा फोटो होता. त्याने ते फोटो मुलांना दाखवले.

"हा सईचा तिच्या लहानपणीचा फोटो. आणि हा तुम्हा दोघांचा. बघ तशीच दिसतेस ना तू?" सोनिका आणि इंद्र कुतूहलाने ते फोटो पाहू लागले.

"इंद्रा कसला गब्दुल होतास रे. आणि माझं नाक बघ, लालेलाल." मग त्या दोघांनी सईचा फोटो पाहिला. "सोना तुझाच वाटतोय हा ही फोटो." इंद्र म्हणाला. सोना पाहू लागली. एक निराळीच भावना तिला स्पर्शून गेली. ती कितीतरी वेळ त्या फोटोकडे पाहत राहिली. आणि आनंद तिच्याकडे.

"मग काय चढायचं का या झाडावर?" सोनिकाने नकारार्थी मान हलवली.

"का ग?"

"आत्ता नको."

"सोनिका, तुला एकटं इथे येऊन आईला भेटावसं वाटणं अगदी स्वाभाविक आहे. पण हे बेलाचं झाड, तसं नाजूक असतं. फांदीवर पाय ठेवून जोर देण्यापूर्वी आधी हाताने फांदीच्या स्ट्रेंग्थचा अंदाज घेणं आवश्यक असतं. हे लक्षात ठेव."

सोनिका आणि इंद्र झाडाकडे पाहू लागले. आनंदने मग खालच्या एका फांदीवर हाताने भार देऊन दाखवलं. मग त्यांना भार देऊन अंदाज घ्यायला शिकवलं. दोघंही आजमाऊन पाहू लागली. "फार उंच चढताना मात्र शक्यतो मुख्य बुंधा सोडायचा नाही. कारण तुम्ही फांदीवरून जसजसे पुढे जाऊ लागता तसतसे फांदीवरचा भार तर वाढतोच शिवाय ग्रॅव्हिटी पण काम करत असतेच. जांभूळ, शेवगा, बेल या झाडांवर चढताना काळजीपूर्वक चढायचं."

"तुला हे सगळं आईने शिकवलं?" सोनिकाने अचानक विचारलं. "नाही, हे नाही शिकवलं पण बाकी बरच काही शिकवलं बेटा तिने मला. बरंच काही शिकवलं."

"म्हणजे?"

"आयुष्य भरपूर आनंदाने कसं जगावं!! प्रत्येक घटनेत काहीतरी चांगलं कसं असतंच लपलेलं. आणि ते कसं शोधायचं. ती जिथे जाईल तिथे लाडकीच व्हायची सर्वांची. अगदी जीव तोडून प्रेम करायची. अगदी लहान मुलासारखा निर्व्याज स्वभाव होता तिचा. आपलं, परकं असं काही नसायचच मनात. प्रत्येकाला ती आपली वाटायची."

"हो, आई पण हेच म्हणाली. आईला आधी तिच्याबरोबर आपलं कसं जमणार असं वाटायचं. पण त्या प्रवासाला गेल्या आणि आईला तिने एकदम फ्री फील केलं. मग त्या बेस्टेस्ट फ्रेंड झाल्या. आणि आईला खूप चीड चीड व्हायची जेव्हा इंदा पोटात होता आणि आईला उलट्या व्हायच्या. पण आई

चिडली तरी ती बिलकुल आईवर चिडायची नाही आणि आईला शांत करायची."

"काय काय काय? कोण चिडायचं? कोणाला उलट्या व्हायच्च्या? का व्हायच्च्या आणि? आय एम सो कॉन्फयुज्ड नॉव!!" इंदा पार गोंधळून गेला.

"आणि आई तुला का सगळं एकटीला सांगते गं!" तो पार फुरंगटून म्हणाला. "थांब आता विचारतोच तिला जाऊन. तुझं बराय राव. दोन आया दोन बाबा." तो एकदम हाताची घडी घालून तरातरा घराच्या दिशेने चालू लागला. सोनिकाने आनंदाकडे पाहिलं. त्याने आपल्याला काय माहित अशा अर्थाने खांदे उडवले. मग सोनिका इंदाच्या मागे पळत गेली. तिने मागून त्याला हाताला धरून थांबवलं.

"ए असा काय करतोस? परवा तू कृपा मावशीबरोबर झोपलास ना तेव्हा सांगितलं आईने हे सगळं. आणि मला कुठे दोन आया आहेत? एकच तर आहे, दुसरी नाहीच आहे, हो ना?" इंदा एकदम थांबला मग. मग त्याने तिचा हात हातात घेतला."त्या जशा बेस्टीज होत्या, आपण पण बेस्टेस्ट फ्रेंड आहोत ना?" सोनिकाने जोरजोरात मान हलवली.

"माझे पण दोन बेस्टीज आहेत, एक चंदू आणि दुसरी कृपा." आनंद मागून येत म्हणाला. मग तिघे मिळून घरी आले. "आपण परत येऊया झाडावर चढायला." सोनिका आपणहून म्हणाली. “आईबाबांना पण घेऊन येऊया." आनंदने मन हलवली. त्याने एक निश्वास सोडला. चला तिढा सुटायला सुरवात तर झाली.

३. १२

"कृपा, व्हॉट हॅव यू डिसायडेड?"

"अबाऊट व्हॉट ममा?

"अबाऊट युवर लाईफ?"

"काय ठरवायचं आता?

"लिसन! मी तुला लग्न कर वगैरे म्हणतच नाही. बट यू डेफिनेटली संन्यासी जीवन जगणार नाहीस, ओके? यू नीड अ पार्टनर. मी आज एका पार्टीला चाललेय अँड द होस्ट हॅज एक्सटेंडेड द इन्व्हिटेशन टू यू. कदाचित तुला आवडेल असं भेटेल कोणीतरी तुला तिथे."

"ओह नो मॉम. प्लीज. मी घेईन डिसिजन लवकरच. पण आज पार्टीला नको बोलावू."

"असच करतेस नेहमी. आणि यावेळी काय झालं तिकडे इंडियात? आल्यापासून खूप बदलली आहेस. स्टाफवर पण डाफरत असतेस सारखी. कामातही नेहमीप्रमाणे लक्ष नाहीय तुझं. आज आठवडा झाला, जिमला गेली नाहीस."

"दमले होते गं, बाकी काही नाही. आता बरीय मी,"

सकाळी ब्रेकफास्ट टेबलवर केवळ हिला गाठण्यासाठी ममा लवकर उठली होती. 'मला कधीच हिच्या मनातलं सांगणार नाही ही मुलगी. एनीवे आय डिड माय बिट. पुढे तिची मर्जी. ' 'काय सांगू मॉम तुला? आणि तुला

कळेल माझ्या मनातलं? तू वेड्यात काढशील मला. पण आय ॲम मेड दॅट वे. मी करते एक तरफी प्रेम. कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद मिळणार नाही हे पक्कं माहित असूनही करते. पण तरीही परावाचं आनंदाचं वाक्य जिव्हारी लागलं. इट वॉज नॉट अबाऊट यू आनंद, इट वॉज अबाऊट सोना. आणि तिच्या बाबतीत मी तितकीच इन्व्हॉल्व्हड आहे जितका तू. आणि हा माझा अधिकार तू नाही काढून घेऊ शकत. आय हॅव अर्न्ड इट. सोना माझ्या आयुष्यातही खूप महत्वाची व्यक्ती आहे आनंद आणि तू असा खड्यासारखा मला नाही बाजूला करू शकत तिच्या बाबतीत. जागी हो कृपा! तसं पाहिलं तर काय अधिकार तुझा?' उलट सुलट विचारांनी डोकं भणभणून गेलं तिचं. शूज चढवून ती जॉगिंगसाठी बाहेर पडली. तिला काही दिवस नक्की लागणार होते यातून बाहेर पडायला.

---

लहान मुलांचं मन खूप लवचिक असतं. सोना बऱ्याच प्रमाणात परत नेहमीसारखी वागू लागली होती. एकतर शाळा, अभ्यास, परीक्षा यांत नाही म्हटलं तरी व्यस्त होतीच मुलं, शिवाय आनंदही रोज काही ना काही कारण काढून तिच्याशी संवाद साधत होता. सईविषयी तिला सर्व गोष्टी जाणून घेण्यात रस असतो हे ही त्याच्या लक्षात आलं होतं. सुकन्याला तिच्या वागण्यात सूक्ष्म बदल जाणवत होते. एकतर तिचा हट्टीपणा जवळपास नाहीसा झाला होता. सुकन्याने एखादी गोष्ट करायला सांगितली की तिने ती लग्गेच आवर्जून करावी. ती बरीचशी स्वावलंबीही बनत चालली होती. वेणी

आपली आपण घालू लागली होती. स्वतःसाठी आणि इंद्रसाठी दूध गरम करून घेणे, डबे भरून घेणे, ही छोटी छोटी कामं आपणहून करू लागली होती. पूर्वी इंद्र आणि सोनिकाला एकच गोष्ट हवी असेल तर बहुतेक वेळी ती सोनिकाला मिळायची आणि इंदाची समजूत घालून त्याला दुसरी वस्तू मिळायची कारण इंद्र तसा समजूतदार होता आणि नकळत सुकन्या चंदूकडून सोनाला झुकतं माप मिळायचं. पण आता सोना आधीच विचारायची इंदाचा चॉईस आणि मग दुसरं जे असेल ते घ्यायची. इतर वेळी सुकन्या खुश झाली असती या बदलांनी, कदाचित तिने पाठही थोपटून घेतली असती स्वतःची, उत्तम वळण लावलं पोरांना म्हणून. पण नुकत्याच येऊन गेलेल्या वादळाच्या पार्श्वभूमीवर हे बदल तिला अस्वस्थ करत होते. सोनिकाशी या विषयावर बोलावं तर परत विषय उकरून काढल्यासारखा झाला असता. पोर मोठी होत आहे. लवकरच वयात येईल. ती स्थित्यंतरं पार करताना तिच्या मनावर आणखी कोणताही ताण नको. पण हे होत असलेले बदल कधी कधी सुकन्याला फार घाबरवून टाकत एवढं मात्र खरं. सोनिका अकाली मोठी व्हायला नको होती तिला.

---

"हाय कृपा!!

"हाय!" आनंदाचा आवाज ऐकल्यावर नकळत एक श्वास अडकला कृपाचा.

"बोलायचंय तुझ्याशी."

"हं! बोल!"

"सॉरी म्हणायचंय तुला! त्या क्षणानंतर लाखो वेळा मनातल्या मनात म्हटलंय. प्रत्यक्ष भेटीत बोलावं असा विचार केलेला, पण तू तुझी इथली भेट पुढे ढकललीस. तुझी सोनिकाबद्दलची काळजी, तिच्यावरचं प्रेम, किती जेनुइन आहे हे मला नीट माहित आहे कृपा. त्यामध्ये मी काही बोलावं हा मला काडीमात्र अधिकार नाही. मी माझ्याबद्दल बोललो. पण माझ्या बोलण्याचा अर्थ वेगळा निघतो हे लक्षात येईपर्यंत शब्द बाहेर पडून हानी करून गेले होते. इतर वेळी भांडली असतीस माझ्याशी यावरून पण त्या दिवशी गप्प झालीस एकदम. भांडली का नाहीस? हॅलो?"

"हं! ऐकतेय मी.!"

"बोल ना मग! भांड माझ्याशी. शिव्या घाल. काहीही कर पण अशी गप्प राहू नकोस."

"कोणत्या अधिकाराने रागावू आनंद?"ओल्या आवाजाने तिने विचारलं.

"ए! कृपा!प्लीज रडू नकोस.प्लीज! आणि असं तोडून बोलूही नकोस. तुला सर्व अधिकार आहे. माहित आहे तुला. उद्या लग्न कर म्हणशील तर मी करणार हे माहित आहे तुला. पण त्या नात्याला संपूर्ण न्याय देऊ शकलो नाही तर फार अपराधी वाटेल. आत्ता वाटतं त्यापेक्षा कित्येक पट जास्त. आणि ती गिल्ट त्या नात्याला आतून पोखरून काढेल."

"मी असं काही मागतच नाहीय पण. काहीच नाही. तुला खरं सांगू आनंद, सईने तुला खूप काही शिकवलं पण स्त्रीमन नाहीच कळलं कधी तुला. सई तुला पूर्ण समजू शकली पण तू तिला किती समजू शकलास?"

"असं का म्हणतेस?"

"कारण तिला मृत्यूची चाहूल लागली, पण तिला लागलेली चाहूल तुला समजली नाही." आनंदाला कोणीतरी प्रचंड आवेशाने ठोसा लगावल्यासारखा तो सुन्न झाला.

"तिलाही, तुला सांगावंसं वाटलं नाही पण सुकन्याला तिने सांगितलं. तुला सहन होणार नाही, तू ते दुःख हॅन्डल करू शकणार नाहीस हे तिला कळलं. तिने तुला समजूनही घेतलं, अगदी शेवटच्या श्वासापर्यंत." आनंदाच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहत होत्या. डोळे पुसण्याचं भानही त्याला नव्हतं.

"नंतर बाकीचे सगळे तुला समजून घेत राहिले. सुकन्या, चंदू, आई, बाबा,,.. मी!! आणि आता सोनिकानेही तुला समजून घ्यावं ही तुझी अपेक्षा आहे." कृपा ताड ताड बोलत होती. एकीकडे रडत होती. दोघंही रडत होते. "प्रेम हे कधी कधी असं ओरखडे काढतं आनंद! आहे तुला याचा अनुभव? तू प्रेम केलंस, तुझ्या नशीबाने त्याला भरभरून प्रतिसाद मिळाला, जिच्यावर प्रेम केलंस तिच्याबरोबर लग्न केलंस. शरीरसुखाचा आनंदानुभवही तिच्यासोबत घेतलास. त्या प्रेमाचा कायमचा विरह अनुभवलास. मान्यच! पण प्रेमातील ओरखडे नाही अनुभवलेस. माझं प्रेम तुला मान्य नाही, हे ही

मी शांतपणे मान्य केलं. परत मित्र होण्याचा मी कसोशीने प्रयत्न केला. तू मात्र सतत त्या प्रेमाला मध्ये आणून माझी कीव केलीस. का? का नाही स्वच्छ मैत्री राखू शकलास माझ्याशी? मी पहिल्या वेळेनंतर ना कधी त्याचा उच्चार केला, ना कधी माझं वागणं, मैत्रीची सीमा उल्लंघून पुढे आलं. तू मात्र प्रत्येक वेळी त्याचा उल्लेख करून, आणि ते नाकारून, ओरखडत राहिलास माझ्या मनाला.ते ही मी सोडून दिलं. पण त्यादिवशी तू हद्द ओलांडलीस. तू कोणत्याही अर्थाने बोलला असशील, पण बोललास हे सत्य आहे, आणि मी नाही विसरणार ते कधीही."

"कृपा, प्लीज असं नको म्हणूस गं. तू सांगशील ती शिक्षा मला मान्य आहे. पण असं टोकाचं काही बोलू नकोस. मी येऊन भेटतो तुला. किंवा इकडे ये. मी सर्वांसमक्ष माफी मागतो तुझी."

"नाही आनंद. आता आपली भेट नाही होणार. आता आपली भेट तेव्हाच होईल ज्या दिवशी एकतर तू संपूर्णपणे माझ्या प्रेमाचा स्वीकार करू शकशील, किंवा संपूर्णपणे माझ्या फक्त मैत्रीचा स्वीकार करू शकशील. जेव्हा यातलं एक काहीतरी शक्य होईल तेव्हा मला फोन कर. जिथे असेन तिथून हजर होईन. पण तोपर्यंत आपण नाही भेटणार आहोत. तुझ्या प्रामाणिकपणावर माझा पूर्ण विश्वास आहे. तू यातलं एक घडल्याशिवाय नाही फोन करणार मला. मी फोनवर मुलांशी बोलत राहीन. माझी जबाबदारी आहे ती. त्यांची कृपामावशी त्यांना कधीच अशी सोडून देणार नाही. मी एक

मॅनेजर अँपॉईंट करतेय तिथलं काम पाहायला. शमा तुझ्याशी कोऑर्डीनेट करेल तुझ्या प्रोग्रॅम्स विषयी. गुडबाय आनंद!!"

"ए, ए, कृपा, माझं ऐकून घे. अगं!" आणि मग तो एकदम थांबला. 'कोणत्या अधिकाराने थांबवणार तू तिला? तिचं प्रेम स्वीकारण्याची हिम्मत आहे? की तिच्याशी निखळ मैत्री करू शकतोस? तिने सांगायलाच नको होतं. हम्म! परत तिलाच दोष देणार? तिचं प्रेम तुला दिसत नव्हतं?' आनंदने मग सावकाश फोन बंद केला. अर्थात पलीकडून तो आधीच कट झाला होता.

---

आज त्याला मचाणावरून घरी जावसंच वाटेना. फोन बंद करून सून्न मनाने आनंद कितीतरी वेळ बसून राहिला. सईच्या जिवंत चित्राकडे पाहता पाहता त्याला कृपाचे शब्द आठवू लागले. 'तिला मृत्यूची चाहूल लागली होती पण तुला ती चाहूल कळली नाही. तिलाही तुला सांगावसं वाटलं नाही.' "मी कमीच पडलो का ग सई आपल्या नात्यात?" सोनाबरोबरही कमीच पडलो ना? आईबरोबरही अन्यायच केला आणि आता कृपाबरोबरही? का झालं असं?" आजोबा म्हणाले होते एकदा, "आनंदा, माणूस आपल्या आतून जेवढा पूर्ण असतो, तेवढं प्रत्येक नातं तो पूर्णपणे निभावतो. त्याच्यातील अपूर्णता त्याच्या नात्यातही उतरते.कधी सकारात्मकतेने कधी नकारात्मकतेने. एकदा वासंती काकूच्या एका बोलण्यावर आई बाबा गप्प बसले होते, आनंदाला ते अजिबात आवडलं

नव्हतं. "तुम्ही का गप्प बसून ऐकून घेता?" असं चिडून त्याने विचारलं होतं दोघांना. आण्णा म्हणाले होते "आनंदा तुझे आई बाबा शांत राहिले म्हणून नाती टिकली रे."त्याला हे अजिबात पटलं नव्हतं. नंतर रात्री आजोबांचे पाय चेपून देताना त्याने परत आजोबांजवळ विषय काढला तेव्हा त्यावर बरीच चर्चा झाली होती दोघांची.

"पण आजोबा का असते ती अपूर्णता? कोणात असते? कोणात नसते?"

"तसं पाहिलस तर प्रत्येकात काही ना काही अपूर्णता असतेच. प्रत्यक्षात नसते रे, पण पूर्णत्वाचं भान नसतं म्हणून तर अपूर्णत्वाचा भास निर्माण होतो. जेव्हा समोरचा ती अपूर्णता पूर्ण करतो, तेव्हा आपल्याला त्या व्यक्तीविषयी अपार आत्मीयता वाटते. जर त्याचीही एखादी अपूर्णता आपल्याकडून पूर्ण होत असेल तर ते नातं घनिष्ट नातं बनतं. आणि हे सगळं जाणिवांतून घडतं. निद्रिस्त मनातून. यांत विचारांना स्थान नसतं फारसं. मग ते नातं नवरा बायकोचं असो की आणखी कोणतही नातं असो, अगदी दोन मित्रातील मैत्रीच्या नात्यातही हे दिसून येईल. काही वेळेस एखाद्यामध्ये अपूर्णता इतकी जास्त असते, आणि ती अपूर्णता त्याला सतत त्रास देते, समोरच्यात ती अपूर्णता नाही असं दिसलं की हा त्रास अधिकच वाढतो. तुझ्या वासंती काकूंचं असच होत असावं. तुझ्या आई बाबाना तो त्रास समजतो आणि मग ते गप्प राहतात. ज्याला आधीच एवढा त्रास होतोय

त्याला आपण अजून का बोलून त्रास द्या,अशा विचाराने." अचानक आनंदाला हे सर्व बोलणं आठवलं.

"किती खरं होतं आजोबांचं! सईने नेहमी मला पूर्णत्वाची जाणीव दिली. सगळे मनाचे कोपरे उजळून टाकले तिने. मी काय दिलं तिला? दिलं असेल काहीतरी.त्याशिवाय का ती इतकी आनंदी होती? पण तिच्या शेवटच्या दिवसात तिला माझ्यातील ती अपूर्णता प्रकर्षाने जाणवली का? तिच्याशिवाय मी किती अपुरा पडेन हे कळलं असावं तिला. म्हणून तिने सोनाला सुकन्याकडे सोपवलं. सोनाला नक्की काय हवंय? ती शांत झाल्यासारखी दिसतेय पण आधीची सोना नव्हे ही. बदलली आहे ती. आणि मला हे कळतंय. सईला जाणवलेली मृत्यूची चाहूल मला कळली नाही पण सोनाच्या मनातील खळबळ मला स्पष्ट दिसतेय. तू घाबरू नको बेटा, हा बाप सतत तुझ्या पाठीशी असेल, कायम. आणि योग्य वेळी तो सर्व अपूर्णता भरून काढेल तुझ्या मनातील. आईच्यावेळी केलेला उशीर नाही करणार मी आता.

कृपा,.. तू तर माझंच दुसरं रूप वाटत आलीस मला. तुझ्याबरोबर असताना काही लपवावंसं वाटायचं नाही. तू नेहमी माझ्या आतल्या खऱ्या आनंदची आठवण करून द्यायचीस मला. तुझ्या मनातली कोणती अपूर्णता तुला माझ्याबरोबर पूर्ण होताना दिसते? मी का घाबरतो तुझ्याबरोबर कोणतही नातं जोडताना? कारण मला आता माझी अपूर्णता कळलीय म्हणून?"

'नाही आनंद! तुला भीती वाटते. भीती वाटते की कृपाशी नातं जोडल्यास मला तू विसरलास असं वाटेल तुला. माझ्या आठवणींच्या झुल्याला तू कधीचा घट्ट पकडून लटकतो आहेस. पण आयुष्य असं हवेत लटकत राहण्यासाठी नाहीय रे. जमिनीवर पाय रोवून पुढे जाण्यासाठी आहे. येणाऱ्या खड्ड्यात पाय जाईल, धडपडायला होईल आणि तरी आयुष्य जगायचं तर पाय जमिनीवरच हवेत. आठवून बघ, दर वेळी जेव्हा जेव्हा आणीबाणीची स्थिती आली तू मनाची कवाडं अधिकाधिक बंद करत गेलास.' आनंद एकदम दचकला. त्याला झोप लागली नव्हती. की लागली होती मानसिक श्रमांनी?

'स्वप्नात सई बोलली की माझच अंतर्मन?' याने पाहिलं, बाहेर अंधारून आलं होतं. 'हा अंधार उद्या सकाळी सूर्योदयाबरोबर नाहीसा होईल. पण माझ्या मनात जो अंधार भरून राहिलाय तो नष्ट करणारा सूर्योदय कधी उगवेल? सई गेली तेव्हा आता आपण जिवंत राहणं शक्य नाही असं वाटलं. पण मग सोना, इंद्राने भूल घातली. परत त्यांच्यासमवेत हसू लागलो. रंग उभे राहिले बाहू पसरून आणि आपण शरण गेलो त्यांना. त्यांनीही मायेनी मिठीत घेतलं मला. त्यांच्याबरोबर असलो की माझी मलाही शुद्ध राहत नाही. त्यांच्याबरोबर असताना रंगच असतात, मी नसतोच, मग माझं दुःख, ते तरी कुठून असणार?' एक ना हजार,. असंख्य विचार,.. मंथन सुरू झालं होतं.

कृपा आनंदला ताड ताड बोलली खरी, पण फोन ठेवताच तिचं अवसान गळालं. ती ऑफिसला गेलीच नाही मग. 'आनंदला भेटायचं नाही? पाहायचाही नाही? ही तर मी मलाच शिक्षा करून घेतली. आनंद, किती गोड होतं रे आपलं नातं. प्रेमभावनेच्या केवळ उच्चाराने ते इतकं बदललं? का पण? असा काय दोष आहे माझ्या प्रेमभावनेत की तू इतकं दूर लोटावस तिला? आणि त्याबरोबर मलाही?पण आता बाण सुटला. आता तू बोलावल्याशिवाय मी आले तर माझी मीच निर्भत्सना करेन. आता हाच इगो माझा पाठीराखा होईल. मला ती आग पेटती ठेवावीच लागेल. माझा इगोच त्याच्यासाठी हवा देईल.'

तिने डोळे पुसले. फोन काढला. "माझ्यातर्फे आजच्या पार्टीचं इन्व्हिटीशन अक्सेप्ट कर आणि होस्टला थँक्स दे माझ्यातर्फे. आय विल बी देर इन टाईम!!" तिने ममाला मेसेज केला.

---

"आजी, भूमकर आजी आजोबा माझ्या खऱ्या आईचे आई वडील का गं?"

"हो बाळा."

"तुला आवडायची सई आई?"

"ती सर्वांनाच आवडायची बेटा. जशी तू सर्वांना आवडतेस. तू मोठी झालीस की अगदी तिच्यासारखी दिसशील बघ."

"हो?" सोनाने हरखून विचारले.

"मी काकाला म्हणजे माझ्या खऱ्या बाबाला आवडत नव्हते ना? खरं सांग आजी. म्हणून त्याने मला देऊन टाकली बाबाना."

"नाही गं बाळा! असं का म्हणतेस?"

"मग नाहीतर असं कोण देऊन टाकेल आपल्या बाळाला?"

"देऊन नाही ग टाकली. तुम्ही दोघे लहान असताना बराच वेळ तोच सांभाळायचा तुम्हा दोघांना."

"मला अजिबात आठवत नाही असं काही. नेहमी तर काका एका गावाहून येतो आणि दुसऱ्या गावाला जातो."

"ते आत्ता. त्याची प्रदर्शनं सुरू झाली चित्रांची तेव्हापासून. तुम्ही दोघे लहान होता तेव्हा नव्हता जात तो. कायम इथेच असायचा. आणि मग या नवीन घरात आल्यावर तुम्हाला तुमची वेगळी रूम हवी होती ना? तूच तर रुसली होतीस की, सगळ्यांना सेपरेट रूम आहे तर मला आणि इंदालाही हवी म्हणून. इंदा किती घाबरून नको म्हणत होता आठवतंय ना? त्याआधी काकाबरोबरच झोपायचात तुम्ही दोघे."

"हं! काका मस्त गोष्टी सांगायचा."

"हो ना? आठवतंय ना? मग काय?"

"हो पण,.."

"सोना, तुला सगळ्यांनी सांगितलं आहेच. परत सांगते. तुझ्या भविष्याबद्दल, शाळेत घ्याव्या लागणाऱ्या निर्णयात, काही अडचणी येऊ नयेत म्हणून चंदूचं नाव तुला लावलं.पहिली काही वर्ष तरी तुझी मानसिक फरफट टळली त्यामुळे. बाकी प्रेम तर सगळे करतातच तुझ्यावर. आनंदही आणि चंदूही.सुकन्या तर जीवापाड प्रेम करते तुझ्यावर. तू मोठी झाल्यावर सुकन्या तुला सगळं समजावून सांगणार होती. पण ती मुलं बोलली आणि मग आत्ताच सांगितलं तुला."

"आजी, इंदा मला हेट नाही ना गं करणार? त्याला त्याचे आईबाबा माझ्याबरोबर शेअर करावे लागले ना?"

"नाही करणार बाळा. चंदू, इंदा, हे दोघे फार स्वच्छ स्वभावाचे आहेत गं. असलं काही त्यांच्या मनातही येणं शक्य नाही."

"कोणाच्या मनात काय येणं शक्य नाही? काय गप्पा चालल्यात बुवा आजी नातीत?"

चंदू बाहेरून आत येत म्हणाला. सोना एकदम कावरीबावरी झाली.

"अरे सोना मोठी झालीय बाबा. मोठं मोठे विचार करतेय आता."

"हो का? अरे वा! काय बुवा? आम्हाला पण सांगा की सोनाताई!!"

"काही नाही बाबा."

"तिला वाटतंय इंदा रागावेल का तिच्यावर की त्याला त्याचे आईबाबा हिच्याबरोबर वाटून घ्यावे लागले?"

"हम्म!!"

"सॉरी बाबा!" सोनाच्या डोळयात एकदम पाणी आलं.

"हे बघ ताई, हा प्रश्न मग आनंदाला आधी विचारायला हवा. कारण त्याचे आईबाबा जन्मभर त्याने माझ्या आणि पुष्पसोबत शेअर केले."चंदूच्या या बोलण्यावर सोनाने चमकून चंदुकडे पाहिले.

"हो. त्यांनी त्यांचं नाव नाही लावलं आम्हाला, पण आनंदाच्या प्रत्येक गोष्टीत आम्ही वाटेकरी होतो बेटा. खाऊ, खेळणी, काकूची मांडी, काकाचा खांदा. सगळयात."

सोनिका नव्याने नात्यांकडे पाहायला शिकली त्या क्षणी. नकळत तिच्या मनावरचं ओझं एकदम हलकं झाल्यासारखं वाटलं तिला.

"तुला माहिताय सोना? तुझा बाबा मनस्वी पहिल्यापासून. शाळेत टीचर्स रागावले, घरी कोणी रागावले तरी हा ना घाबरायचा ना रडायचा. पण मला जर कोणी रागवायला लागलं की पटकन येऊन मला सोडवायचा, ती खोडी आपणच केली असं सांगून. मग त्याला डबल ओरडा बसायचा, कधी कधी मारही मिळायचा. पण हा गप्प सहन करायचा सगळं. माझ्यावर जीवापाड प्रेम करायचा. पण बोलून दाखवणं जमलं नाही कधी. आणि मी इतका घाबरट होतो की त्याला मार खाताना पाहून रडत बसायचो, पण पुढे होऊन 'मी केलं हे' असं म्हणायची हिम्मत व्हायची नाही. तुझा बाबा लहानपणीही बऱ्याच दिव्यातून गेलाय बेटा.सहज सोपं आयुष्य नव्हतंच

त्याच्या वाटेला कधीच. आणि अजूनही नाहीच म्हणा." मग तो एकदम गप्प झाला. या पोरीसमोर जरा जास्तच बोललो असं वाटलं त्याला. सोनिका चंदूचं बोलणं लक्ष देऊन ऐकत होती. आज नवीनच काही ऐकायला मिळत होतं तिला तिच्या बाबाबद्दल. तिच्या किशोरमनात सर्व नोंदी होत होत्या. त्या नोंदींमधून आपल्या बाबाचं एक नवं चित्र तिच्या मनात निर्माण होत होतं. आधी मनात पक्के रुजलेले विचार आपलं स्थान सोडायला तयार नव्हते पण हे नवे विचार त्यांना भीडले होते हे नक्की. आता या उलट सुलट विचार प्रवाहात सरशी कधी यांची तर कधी त्यांची असं होत होतं. हे काहूर त्या किशोरमनाला पेलवत नव्हतं. मग कधी त्राग्याने तर कधी रडून तिचं मन हा उद्रेक व्यक्त करत होतं.

---

३.१३

कृपा त्यादिवशी पार्टीला गेली. मनात नसतानाही गेली. पण वाटली होती तेवढी पार्टी वाईट नव्हती. एक लाईव्ह बँड होता. कलाकार बरे होते. अन्न रुचकर होतं. वाईन उत्तम होती. कोणाला कोणाच्या आयुष्यात डोकावण्याची इच्छा नव्हती. जो तो त्या क्षणाचा आनंद उपभोगण्यात मश्गुल होता. वाईन नको त्या गोष्टी मनाआड करायला हातभार लावत होती.ममा तिच्या नव्या बॉयफ्रेंड बरोबर आली होती. तो तिच्याहून दहा वर्षांनी लहान होता. अर्थात प्रत्यक्षात ती दोघे एकाच वयाचे दिसत होते. ममाने, कृपाची होस्ट बरोबर ओळख करून देताना माझी लहान बहीण अशी ओळख करून दिली. कृपाला खूप गम्मत वाटली, पण तिला ममाला दोष द्यावासा वाटला नाही. वय लपवणं ही तिची गरज कृपाला समजली. तिचा बॉयफ्रेंडही बरा वाटला कृपाला. बिझिनेसमॅन होता. त्यालाही फार गुंतायचं नसावं. मजेत होती दोघे.

कृपा वाईन ग्लास घेऊन एका कोपऱ्यातून न्याहाळत होती सर्वांना. एक जवळपास साठीचा बिग शॉट आपल्या तिसऱ्या, निम्म्याहूनही कमी वयाच्या बायकोला घेऊन आला होता. त्याच्याविषयी मात्र काही कुजबुज कृपाला ऐकू आली. त्याला तरुण बायको मिरवायचीय आणि तिला ऐषोआराम हवाय वगैरे.तिने त्या जोडीकडे पाहिलं. दोघे एकमेकात अगदी गुंतलेले तिला दिसले. 'हे नाटक असेल?'मग तिला हसू आलं. 'आपण का एवढा विचार करतोय?'

मग तिने आसपास नजर वळवली. एक अगदी तरुण मुलामुलींचा घोळका दंगा मस्ती करत उभे होते. हसण्या खिदळण्याला ऊत आला होता. तिला जरा आश्चर्यच वाटलं, एवढी तरुण मुलं अशा पार्टीला इन्व्हाईट कोणी केली आणि यायला तयार कशी झाली? मग कोणीतरी म्हणालं, होस्टचा मुलगा आणि त्याची गॅंग आहे, फ्री लिकर, आणि मस्त हादडायला मिळणार म्हणून आले असणार. मस्त मजा करत होते. त्यांना कसलीही फिकीर नव्हती. कृपाला छान वाटलं त्यांना पाहून. कुठेतरी जुने दिवस आठवले तिला तिचे.

"हे कृपा!" तिची होस्ट कोणाला तरी बरोबर घेऊन येत होती.

"हाय! नाईस पार्टी"

"थँक यू सो मच डियर! मीट रजनीश! अ व्हेरी ऍकमपलीश्ड बिझिनेसमॅन. अगदी थोड्याशा अवधीत खूप यश मिळवलय याने.

रजनीश, मीट कृपा, अ व्हेरी क्लोज फ्रेंड ऑफ माईन. आर्टिस्ट्स हार्ट विथ बिझिनेस ब्रेन. अ डेडली कॉम्बो यू नो?"

"सो ग्लाड टू मीट यू कृपा."

"मी टू"

मग रजनीश दोघांसाठी ग्लास भरून घेऊन आला. तो अगदी सहजतेने तिच्याशी गप्पा मारू लागला. विषय बिझिनेसवरून, आर्ट,. भारत,. करता करता एकमेकांच्या करिअर पर्यंत लिलया बदलत गेले. एक सहजता होती

रजनीशच्या वागण्या बोलण्यात. उगाच लोचटपणा नव्हता आणि बेदरकारीही नव्हती. बराच वेळ दोघे बोलत होते. व्यवसायात येणारे नानाविध मजेशीर अनुभव सांगून त्याने कृपाला भरपूर हसवले. एकंदरीत पार्टीला येऊन कृपाला अजिबात पश्चात्ताप झाला नाही. उलट वेळ छान गेला. थोडी सगळ्या ताणतणावामधून बाहेर पडली ती. ममा अधून मधून तिच्याकडे पाहत होती. तिला हसताना पाहून आणि मुख्य म्हणजे रजनिशबरोबर पाहून ती खुश झाली.

---

आनंद त्या रात्री घरी गेलाच नाही. त्याने पूर्वीसारखं कोळसा घेऊन कॅनव्हासवर चितारायला सुरवात केली. अमूर्त रेषांमधून पाहता पाहता एक एक सजीव चेहरे उमटू लागले. सई, सोना, तो स्वतः, कृपा. कधी कसं चितारत गेला त्याचं त्यालाही कळलं नाही. नंतर जेव्हा त्याने चित्र पाहिलं तेव्हा सर्वांचे चेहरे पाहताना तो परत त्या चित्रात हरवून गेला. मगाचचा चित्रकार संपून आता एक विरही पती, भांबावलेला बाप, ते चित्र पाहत होता. त्याला दिसत होती एक हसरी पत्नी, एक भावनातिरेकाने अस्वस्थ लहानगी मुलगी आणि एक विद्ध प्रेमिका.

पहाटे केव्हातरी त्याने आपली पथारी पसरली. कोळशाचं काळं पसरलं होतं जमिनीवर, पण ते पुसून घेण्याचं भानही नव्हतं. केवळ अतिश्रमांनी शरीर आणि मन थकलं होतं, म्हणून ग्लानी आली एवढंच. सकाळी जाग आली. उठून घरी आला. सोना नुकतीच उठून किचन मध्ये चालली होती. तिने दार

उघडले आणि ती जोरात किंचाळली. मळलेले कपडे, काहिसे अस्तव्यस्त केस आणि चेहऱ्याला लागलेलं काळं,तिने आधी ओळखलंच नाही आनंदला. तिच्या किंचाळण्याने सगळेच बाहेर आले.

"आनंदा!! काय झालं रे?" धास्तावून अनुराधेनें विचारलं.

आनंदचं आत्ता लक्ष गेलं स्वतःकडे.

तो पटकन वर गेला, शॉवर घेऊन स्वच्छ कपडे घालून आला खाली. मग सोनाकडे गेला.

"मचाणावर एक मस्त कोल स्केच केलं. त्यामुळे कपडे तोंड काळं झालं, आरसा नाही त्यामुळे मला कळलंच नाही. तू घाबरलीस का मला?"

तिने मान हलवली. इंद्र जोरजोरात हसायला लागला. "कसली किंचाळलीस अगं!!" त्याने तिची नक्कल केली. “इंदा,..” सोना ओरडली पण मग तिलाही आठवून जाम हसू आलं. वातावरण हलकं झालं.

"आनंदा, आज तो कृपाने पाठवलेला नवा माणूस कॉल करेल, तू ही थांब तेव्हा."

"ओह बरं!!"

'कृपा आता खरंच नाही भेटणार म्हणजे!, तू बोलावलस तर येईल ती.'

तो मनातून गप्प झाला एकदम.

———

"तुझा एक प्रोग्रॅम कृपाने प्लॅन केला होता, बोलली असेलच तुला. जरा वेगळा आहे. आर्ट स्टुडंट्स साठी एक इंटरनॅशन कॉँफरन्स आहे, आर्ट मध्ये सुपर स्पेशलायजेशन करणाऱ्यासाठी. तुझा कोल आर्ट हा टॉपिक आहे. टॉक विथ डेमॉन्स्ट्रेशन असं आहे. सध्या कृपा कशात तरी बिझी आहे तर तू अरेंज कर सगळं म्हणाली मला. मला तुझ्याकडून ऍक्सेप्टन्स लेटर लागेल. पुढचं मी करते सगळं."

शमा नेहमीप्रमाणे अगदी नेमकं बोलत होती.

"अं, हो, पाठवतो मी. आणि तू कोऑर्डिनेशनचं बघ फक्त. मी फ्लाईट वगैरेचं घेईन पाहून. 'स्टे'चं ते करतील ना? मग मोठी कॉटेज बूक करायला सांग. आय विल पे फॉर द एक्सट्रा चार्ज,

"ओके, दॅट वूड बी ग्रेट. आय विल सेंड यू द प्रोग डिटेल्स सून!"

"हो! थँक्स. अरमान कसा आहे?"

"मजेत. भेटेल तुला, त्याचाही सेशन आहे. "

"ग्रेट, आणि सॅम?"

"सॅम आलाय इथेच. मास्टर्स आणि डॉक्टरेट यु एस मधून केलं. आता मला जॉईन झालाय." शमाच्या आवाजातला फरक त्याला लगेच जाणवला.

"अरे वा! 'हॅपी अँड प्राऊड मॉम' व्हॉइस इज सो डिफरेन्ट अँड स्वीट शमा!!"

हसायला लागली मग ती.

"आय नो! आय नो! अरमान काफी चिढाता है मुझे की सारी दुनिया एक तरफ आणि सॅम एक तरफ ऐसा है!"ती हसत हसत म्हणाली.

———

आनंदने त्या संध्याकाळी मुलांना मचाणावर नेले. दोन्ही पोरं हरखून पाहत राहिली. हजार प्रश्न विचारत राहिली. मग अचानक इंद्र गाल फुगवून म्हणाला, "काका कट्टी!!"

"अरे का रे बाबा?"

"तू सगळ्यांचं स्केच काढलस, माझं नाही काढलस."

"ओह्ह्ह! असं आहे का?

डोळे मीटा बरं दोघे. नो चीटिंग ओके?"

आणि त्याने कोळसा घेऊन कॅनव्हासवर फटकारे ओढत रंगवायला सुरवात केली. सोनाने आधी डोळे उघडले. आ वासून ती पाहतच राहिली. एका हाताने तिने इंद्राला हलवले. त्याने एक डोळा उघडून पाहिले. काका कोणी वेगळाच माणूस भासला त्या दोघांना. त्याने आपल्या बाह्या वर सरकवल्या होत्या. त्याचे हात एका लयीत काम करत होते. मुलांना कॅनव्हास अर्धाच दिसत होता. त्यावर ह्या माणसाचे हात सळसळत जणू नृत्य करत होते आणि मुलं त्या हालचालींकडे आणि अर्धवट दिसणाऱ्या रंगाकृतीकडे आ वासून पाहत होती. साधारण तासाभराने आनंद

कॅनव्हाससमोरून बाजूला झाला आणि आ वासलेल्या जीवण्यांवर मोठ्ठ हसू पसरलं.

दोन बाळं रांगत दोन गोंडस मुलांकडे पाहताहेत आणि ती दोन मुलं या आत्ताच्या किशोरवयीन सोना आणि इंद्राकडे पाहताहेत असं ते चित्र होतं. आत्ताचे इंद्र आणि सोना हुबेहूब होतेच पण लहाणपणीचेही अगदी तस्सेच होते. आनंदा त्यांच्याजवळ येऊन उभा राहिला त्यांच्या खांद्यावर हात ठेवून आणि दोन्ही पोरं चित्राकडे पाहताना नकळत बिलगली त्याला. त्याने अधिकच जवळ घेतले मग त्यांना.

"काका, काय सॉलिड काढलस रे हे चित्र!" इंदा अगदी सहजतेने म्हणाला. सोनाने आनंदाकडे पाहिले मग. बऱ्याच दिवसांनी हसू डोळ्यांपर्यंत पोहोचलं होतं तिच्या. आणि आनंदाकडे पाहूनही ते विझलं नाही. आनंदाचे डोळे मात्र भरून येत होते ते त्याने कसेबसे थोपवले.

———

३. १४

"हॅलो!"

"हे हाय!" आवाज ऐकूनच कृपाच्या चेहऱ्यावर मोठ्ठ हसू आलं.

"कृपामावशी, तू कधी येणारेस?"

"का बुवा? काय हवय?"

"हुहूहूहू!"दोन्ही पोरं बदमाशीने हसली. दोघांच्याही मागण्या सांगितल्या मग. "पण आमच्याकडे पण खूप मस्त गम्मत आहे तुला सांगायला."

"ओह्ह! बर! काय गम्मत बुवा?"

सोना परत हसू बोलू लागलेली पाहून तिला बरं वाटलं. मग दोघांनी त्या चित्राबद्दल बराच वेळ रंगवून सांगितलं.

"अगं काकाने आपलं चित्रं काढलं ना तर इंदा रुसून बसला की सगळ्यांची चित्रं काढतोस, माझं कधीच नाही काढत म्हणाला."

"आपलं चित्रं म्हणजे?"

"अगं खूप मस्त. सईआई, मी काका आणि तू असं चौघांचं चित्र काढलं काकाने. कोळशाने काढलं. आणि सगळा काळा काळा होऊन घरी आला."

"कृपामावशी, त्याला पाहून सोना कशी ओरडली ऐकायचंय?"मग इंदाने तिच्या किंचाळण्याची नक्कल केली.

"अगं मी इतकी घाबरले त्याला पाहून."असं म्हणून सोनाही हसू लागली.

कृपा एकीकडे मुलांशी बोलत होती आणि एकीकडे मुलांच्या बोलण्यातले संदर्भ घेऊन तिचा मेंदू विश्लेषण करत होता. 'आनंदने आपलं चित्रं काढलं. यात विशेष नाहीच काही. पण त्याने त्यातिघांबरोबर आपलं चित्रं काढलं,.. सो? मग काय नाचशील आता? पण इंदाचीही आठवण त्या चित्राच्या वेळी न येता आपली आली हे विशेष नाही? कृपा, प्लीज, आता अजिबात आशा लावून राहू नकोस.' तिचच मन तिला समजावत होतं.

"कृपामावशी,......"

"ओह, हो हो!"

"हो हो काय?"मग तू पण येणार ना सिंगापूरला?"

"सिंगापूरला? तुम्ही चाललाय?"

"हे भगवान!"दोन्ही मुलं नाटकीपणाने डोक्यावर हात मारत म्हणाली.

"सॉरी! मी ऐकलं नाही."

"अगं काकाची कॉन्फरन्स आहे ना? "

"ओह अच्छा! तिथे तुम्ही जाणार आहात? कोण कोण जातंय?

"आम्ही, आई बाबा आणि काका. आजी आजोबा म्हणाले आम्हाला नाही झेपायचं."

"अरे वा वा! मजाय न काय."

"तू पण ये ना. मज्जा येईल ना."

"प्लीज प्लीज!!"इंदाने री ओढली.

"तेव्हा मी बिझी आहे."

"ओह्ह! काय गं मावशी!! ये ना प्लीज!!"

"मग इथे तरी ये. कित्ती दिवस झाले आलीच नाहीस तू. काल आजी, आई पण काकाला विचारत होत्या की कधी येणारे कृपा, का नाही आली?"

"मग काय म्हणाला काका?"

तो म्हणाला "तिने मॅनेजर दिलाय ना? तो बघतो काम सगळं इथलं."

"हम्म!"

'आनंदला काही फरक नसेलच पडला ना?' तिचं मन परत कार्यरत झालं.

---

निघण्याची जय्यत तयारी झाली. "आई बाबा, तुम्ही आला असता तर अजून मजा आली असती."

"हो ना काकू, चला ना. अजूनही भाऊजी काढतील तिकिटं."

"नाही, नको. तुम्ही या जाऊन. वहिनींची तब्येतही तोळा मासा असते अलीकडे. तुम्ही जाऊन या, मग आम्ही चौघे जाऊ जवळच कुठेतरी. लांबचा प्रवास नको वाटतो रे. आणि विमान प्रवास केला की एकदा. घेतला अनुभव."

"आजी, कसं वाटतं गं विमान उडालं की? उडाल्यासारखं?"

"अरे माझ्या तर पोटात असा मोठा गोळा आला होता बघ." काकू म्हणाल्या. अनुराधा आणि सुकन्या हसू लागल्या,

"अहो, तुमच्या पोटात गोळा यायला विमानात कशाला बसायला हवय? बर का पोरांनो, मी पूर्वी नारळीवर चढलो तरी तुमच्या आजीच्या पोटात गोळा यायचा!"भाऊकाकाही चेष्टेत सामील झाले.

"इश्श्य! काहीतरीच तुमचं."

पोरांना मोठी गम्मत वाटली.

---

कृपा, रजनीश, त्यानंतर बऱ्याचदा पार्टीमध्ये आणि क्वचित दोघेच असे भेटले. फार छान वेळ जायचा दोघांचा एकमेकांबरोबर. एक निराळीच सहजता होती त्यांच्यात. एकदा असेच एका पार्टीमध्ये भेटले असता रजनीश म्हणाला "उद्या आम्ही काही जण एका ट्रेकला चाललोय. ट्रेक तसा सोपा आहे. मजा येईल. येतेस का तू ही?" कृपाही पटकन हो म्हणाली. ट्रेक सोपा होता अगदीच. पटकन चढून गेले सगळे. वर मस्त रेस्टॉरंट होतं.

खाण्यापिण्याची रेलचेल. मग फ्रेश होऊन भटकंतीला निघाले. रजनीश कृपा जरा पुढे होते सगळयांच्या. चालत चालत बरेच पुढे आले. बाकीचे बरेच मागे दिसले तेव्हा थांबली दोघे.

"हम्म! सो? हूज ही?"

"अं? काय?"

"कृपा, कोणीतरी आहे तुझ्या मनात, किंवा काहीतरी आहे, जे तुझ्या ओठांवरचं स्माईल डोळ्यांपर्यंत पोहोचू देत नाही." कृपाने चमकून पाहिलं. पटकन नजर वळवली.

"हे! मला इंट्रुड नाही करायचंय. पण हे ठीक नाही. वर्क ऑन इट. जो कोणी असेल, सॉर्ट इट आऊट. एवढंच सांगेन. यू आर मॅच्युअर इनफ टू नो धिस, पण काही वेळेस कळत असूनही आपण त्या भावना, विचार सॉर्ट करू शकत नाही. अशा वेळेस मदत घ्यावी. मित्र मैत्रिणी त्यासाठीच असतात. त्यांच्याजवळ बोलणं शक्य वाटत नसेल तर फाईन्ड अ गूड काउन्सेलर. पण सर्वप्रथम जर ती व्यक्ती असेल, आणि अप्रोचेबल असेल तर त्या व्यक्तीशी बोलावंस. ऍट लीस्ट युअर थॉटस विल बी मोर क्रिस्टलाईझ्ड."

"ऍम आय सो ओबव्हीयस?"

"येस, इफ वन ऑबझर्वस इन्टेन्टली."

"हम्म!"

मग कसं काय कोण जाणे ती भडाभडा बोलत गेली. जसं मनात येईल तसं. अगदी सुरवातीपासून. आनंदबरोबरची मैत्री, मग तिला वाटलेलं प्रेम, सई, तिचं जाणं, मग हिने प्रेम व्यक्त करणं, आनंदच्या मनातील अनिश्चितता, शंभर टक्के नात्याला देऊ शकेल की नाही, ही शंका आणि त्यातून निर्माण झालेली अपराधी भावना त्याने वरचे वर बोलून दाखवणं, सोनाचा उद्रेक, आनंदबरोबरची शेवटची भेट,... अगदी सगळं.

रजनीशने सगळं शांतपणे ऐकून घेतलं. समजावून घेतलं.

मग म्हणाला,

"तू जेव्हा त्याच्याबरोबर असतेस, आत्ताही, तेव्हाही हे मळभ असतं मनावर? की हसू पोहोचतं डोळ्यात?"

तिने चमकून पाहिलं त्याच्याकडे. 'आपल्या का लक्षात नाही आलं हे? आपण किती आनंदात असतो त्याच्या सहवासात! तो ही असतो. अधून मधून वाटतं त्याला की मी आयुष्य वाया घालवतेय! पण हे माझं आयुष्य, वाया जातंय की कारणी लागतंय हे मी ठरवणार, तो नाही.' तिच्या चेहऱ्यावरचे बदलते भाव रजनीशला आकाश मोकळं होतंय हे सांगून गेले.

"थँक यू रजनीश!!"

"माय प्लेजर!!"

तेवढ्यात मंडळी पोहोचली आणि पुढचा दिवस मस्त गेला मजेत.

---

आनंदाची ही पहिलीच वेळ, कॉन्फरन्सची, जेव्हा कृपा बरोबर नव्हती. आदल्या रात्री त्याने तिला मेसेज केला.

"तू नाहीयेस यावेळेस बरोबर, फार चुकल्यासारखं वाटतंय. तू अट घातली आहेस, नाहीतर, ये आम्हाला भेटायला अशी गळ तुला घातली असती नक्की. तुझ्याविषयी मला काय वाटतं हे मी तुला सांगायची गरज नाही. तुला माहित आहे ते. आपल्या शेवटच्या प्रत्यक्ष संभाषणात माझे शब्द आणि वेळ चुकली हे मान्यच आहे मला, पण त्यामागे तुला बाजूला करणे हा हेतू किंवा तशी भावना किंचितही नव्हती हे तुला मनातून माहीत आहे. चंदू सोडल्यास मैत्रीत तुझ्याइतकं जवळचं कोणी नाही. सई गेल्यावर जेव्हा तू आलीस भेटायला तेव्हा जे वाटलं ते शब्दात सांगता नाही यायचं. पण तू येच असा स्वार्थी हट्ट नाही करणार. तुझ्या मनाला दर भेटीत यातना होतात हे कळतं मला. प्रेम ही भावना, प्रेम ही कृती, आणि त्यांची वाटणी या गोष्टींचा ताळमेळ घालण्यात मी गल्लत करतोय का असही वाटतं. माझ्या अगदी अंतर्मनातील विचार हे असे तुझ्यासमोर बिनदिक्कत बाहेर पडतात. पण त्यासाठी तुला किती त्रास सहन करावा लागलाय गेली बारा तेरा वर्ष आणि त्याही आधी कदाचित हे आठवून मन दुःखी होतं. आता तुझ्याबरोबर किंवा तुझ्याशिवाय, ही अपराधी भावना सतत बरोबर राहणार मात्र. राहू दे, कदाचित या माझ्यातल्या कमतरतेवर तीच मात्रा ठरेल." कृपा ट्रेकहून घरी पोहोचली आणि आनंदाचा मेसेज तिला मिळाला.

कृपाला आनंदाचा मेसेज पाहून आश्चर्य वाटले. काही लास्ट मिनिट गडबड तर नाही झाली कॉन्फरन्सच्या विषयी? तिने मेसेज उघडला. वाचता वाचता तिचे डोळे पाणावले. आनंद, मला काय हवय ते तुला कळलं नाही कधीच. जाऊ दे. मग तिने बॅग भरायला घेतली.

---

मुलं एकदम एक्सायटेड होती विमानात बसायचं म्हणून. नुसता चिवचिवाट सुरू होता. शेवटी सुकन्याने जबरदस्तीने झोपायला पाठवलं त्यांना. पहाटेच निघायला लागणार होतं.

"आनंदभाऊजी आले नाहीत अजून."

"येईल. तयारी करत असेल. पेंटींग्ज निवडत असेल तिकडे न्यायला. कृपा करते ही व्यवस्था नेहमी."

"काही बिनसलंय का रे दोघांत?"

"आंद्या ठार वेडा आहे. कृपासारखी मुलगी शोधून सापडायची नाही. पण हा सईला जराही मनावेगळं करायला तयार नाही. सईलाही हे त्याचं वागणं आवडलं नसतं कधीच. पण याला सांगणार कोण? स्वतः मनावर घेईल तेव्हा खरं."

"सोनाला मात्र छान हॅन्डल केली भाऊजींनी. मला पोर आता काय करेल अशी काळजी लागून राहिलेली."

"हो गं! पण ती तुझ्या जास्तच जवळ आली त्यानंतर."

‘‘सोन्यासारखं बाळ आहे रे माझं. तुझ्या बोलण्याचाही परिणाम झाला बरं का. पण माझ्या खऱ्या बाबाने मला देऊन टाकली हे काही अजून पूर्णपणे डोक्यातून गेलेलं नाही तिच्या."

"काय सांगतेस?"

"हो. परवा झोपेत बडबडत होती. बाबाने देऊन टाकली देऊन टाकली असं. भाऊजींबरोबर आता हसून खेळून असते, पण पूर्वीसारखी भाऊजी आल्यावर काका करत गळयात पडत नाही."

"अस्सं! हे नव्हतं आलं माझ्या लक्षात. बरं, तू झोप गं आता. मी उघडेन दार आनंद आला की."

---

सिंगापूर पर्यंतचा प्रवास मजेत पार पडला. एअर होस्टेसने मुलांना भरपूर चॉकलेट्स दिली. शिवाय दोघांनाही एक छोटी कलरफुल सॅक दिली. दोघंही भलतीच खुश होती. विमान उडाल्यावर आलेल्या पोटातल्या गोळयालाही फुल्ल एन्जॉय केलं दोघांनी आरडाओरडा करून. विमान खाली उतरतानाही खूप मज्जा आली त्यांना. दोघांनाही विंडो सीटही हवी होती आणि एकमेकांबरोबरही बसायचं होतं. मग थोडा थोडा वेळ प्रत्येकाने खिडकीतून बाहेर ढग पाहायचे असं सुरू राहीलं. हॉटेलवर पोहोचल्यावर आनंदाने दोघांना आपल्या खोलीत नेलं. "चंदू आणि सुकन्या, तुम्ही आता तुम्हाला ही दोन मुलं आहेत हे विसरून जा. फक्त उद्या दुपारी माझ्या

सेशनच्या वेळी येतील तुमच्याजवळ बसायला. बाकी आम्ही तिघे मज्जा करणार आहोत, हो ना सोना इंदा,"

"हो हो!"दोघांनीही एकसुराने सांगितलं.

मग आनंद त्यांना घेऊन हॉटेलच्या कारने फेरफटका मारायला निघाला. तिथल्या एका स्टोरमधून काही खेळण्यांची खरेदीही झाली. त्या उंचच उंच इमारती, तो सगळा चकचकाट पाहून पोरं जाम हरखली. आयुष्यात पहिल्यांदाच सिनेमासारखी दृश्य ती दोघे पाहत होती.

"काका, तू नेहमी इथे येतोस?"

"नेहमी इथेच येतो असं नाही. तिसऱ्यांदा येतोय इथे."

सगळी परतली मग. आल्यावर जेवण करून पोरं डाराडूर झोपून गेली.

आनंदा आपलं प्रेझेंटेशन प्लॅन करत बसला. हा आदल्या रात्रीचा एक तास नेहमीच अत्यंत महत्वाचा वाटायचा त्याला. आधी कितीही तयारी केली तरी या तासात फायनल ब्लू प्रिंट तयार व्हायची मनात. आणि मग शांत झोप लागायची त्याला. विद्यार्थ्यांना काहीतरी नवं द्यायची धडपड असायची त्याची. पीरबाबाने शिकवलेले धडे यावेळी तो मुलांना देणार होता. एकदम हटके असणार होतं त्याचं सेशन. सगळं सवयीप्रमाणे व्यवस्थित आवरून ठेवून तो बेडवर पडला. आपण पाठवलेल्या मेसेजला कृपाचा कोणताही रीप्लाय आला नाही ही गोष्ट त्याला दुपारपासून त्रास देत

होती. नकळत तिचा विचार तो करू लागला. पाहता पाहता झोपेने त्याला घेरले.

दुसऱ्या दिवशी मात्र ब्रेकफास्ट नंतर सुकन्या मुलांना घेऊन गेली. "भाऊजी आजचं तुमचं लेक्चर होऊ देत. मग घ्या ठेवून मुलांना रूममध्ये. आत्ता नेते मी. प्रश्न विचारून डोकं भंडावून सोडतील तुमचं. महत्वाच्या कामाच्या आधी शांतता हवी तुम्हाला जरा."

मुलांच्या भुवया पार आक्रसून गेल्या. रुसकटट्या चेहेऱ्यानेच गेली दोघे. आनंदाला हसू आले. हिला चैन पडत नाही पोरांशिवाय.

———

हॉल मध्ये भरपूर गर्दी होती. स्टुडंट्स या लेक्चरची कधीची वाट पाहत होते. 'हिज स्टाईल इज युनिक'असं त्यांनी त्यांच्या टीचर्स कडून ऐकलं होतं. त्याची चित्र पाहणं हीच एक त्यांच्या लेखी मोठी शाळा होती. आणि त्या तरुण कलाकाराला प्रत्यक्ष पाहायला, ऐकायला आणि मुख्य म्हणजे पेंट करताना पाहायला मिळणार या कल्पनेनेच एक उत्साह त्यांच्या मनात भरून राहिला होता. लेक्चरची अनाऊन्समेंट झाली आणि हॉलमध्ये शांतता पसरली. आनंद स्टेजवर आला. त्याने डायस बाजूला सारला. कॅनवास पुढे ओढला.

मग तो बोलू लागला. "चित्रं म्हणजे निर्जीव कागदावरच्या नुसत्या रेषा नव्हेत. कलाकार जेव्हा आपली भावना बोटांवर घेऊन त्या रंगानी चित्रं

रंगवतो तेव्हा ते सजीव होतं. मग ते प्रथम त्या चित्रकाराशी बोलतं, आणि मग जो ते पाहिल त्या प्रत्येकाशी ते बोलतं. अगदी सुस्पष्टपणे बोलतं.

चित्रकाराने मूळ भावना लक्षात घेतली आणि मग सर्वस्वी त्या भावनेच्या हाती स्वतःला सोपवले तर ती एक उत्तम कलाकृती बनते. जसं हस्ताक्षर प्रत्येकाचं निराळं असतं, त्याची छाप असते त्यावर, तसंच चित्रांचही आहे. त्यामुळे आपलं चित्रं आपलं असतं. युनिक. महान चित्रकर्ते आपल्याला प्रेरणादायी व्हावेत. पण त्यांच्या चित्राची कॉपी करायला गेलं तर भ्रष्ट आवृत्ती होईल. जे चित्रं पाहणाऱ्याच्या मनाचा वेध घेतं ते उत्तम चित्रं असं समजायला हरकत नाही.

आर्ट स्कूलमध्ये तुम्हाला तंत्र शिकवले जाईल. चित्रकलेचे तंत्र हे एकप्रकारे शास्त्रच आहे. ते शिकवणे आणि शिकणे शक्य आहे. ते तंत्र पूर्णपणे आत्मसात करायला हवंच. पण त्या तंत्रात अडकून पडू नये. त्या तंत्रांचा वापर करत कलेमार्फत भावनेला मुक्तपणे व्यक्त होऊ द्यावे.

चित्रकला ही प्रेयसी सारखी असू नये ती मैत्रीणीसारखी असावी. प्रेयसी संपूर्णपणे स्वतःमध्ये गुंतवून टाकते तर मैत्रीण सगळा गुंता सोडवते. माणसाचं मन हे एक क्लिष्ट यंत्र आहे. धागा चढवताना चूक झाली की गुंता वाढत जातो. आपली कला आपल्या मनातला गुंता तर सोडवतेच पण ती पाहणाऱ्याच्या मनातील गुंताही सोडवते.

फक्त तिला संपूर्ण आपलंसं करायला हवं. कलाकाराची काही वेळेस इथेच गल्लत होते. तो कलेपेक्षा मोठा होऊ पाहतो. तिला हुकुमी आदेश देऊ

पाहतो आणि स्वतःच्याच जाळ्यात फसतो. मग ही सख्खी मैत्रीण रुसते, रागावते, कारण तिला कलाकाराचा ऱ्हास दिसत असतो."

मंत्रमुग्ध होऊन सगळे ऐकत होते. हे असं काही ऐकायला मिळेल असं वाटलं नव्हतं विद्यार्थ्यांना.

मग आनंद म्हणाला "मी वापरत असलेलं मिडीयम मला माझ्या गुरूंनी हाताला, हो शब्दशः हाताला धरून शिकवलंय. मी अगदी लहान मुलगा होतो तेव्हा माझे गुरु पीरबाबा उर्फ अल्लारखा यांनी माझा हात हातात घेऊन मला ही कला शिकवली. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करून आज त्यातल्या काही खास गोष्टी मी तुम्हाला सांगेन. पण त्याआधी माझ्या गुरूंविषयी थोडेसे बोलेन.

कला माणसाला काय देते असं जर कोणी मला विचारलं तर मी म्हणेन गुरु देते. आणि माझ्या गुरूंना जर हा प्रश्न कोणी विचारला असता तर ते कदाचित म्हणाले असते, कला तुम्हाला जगवते, ती तुम्हाला जागवते. कला तुम्हाला मरणप्राय दुःखातून बाहेर काढू शकते.

माझे गुरु फारसे कोणाला माहित नाहीत कारण मी त्यांना जसं पाहिलं तसं मला ते केवळ कला जगतानाच दिसले. कलेला त्यांनी पुजलं. एकदा का चित्रं पूर्ण झालं की ते पूर्णपणे त्यातून बाहेर येत. ती प्रक्रिया, चित्रं काढतानाची, तेव्हा ते एकदम ऋषितुल्य भासत. अर्थातच जगाच्या दृष्टीने ते कधीच पुढे आले नाहीत. त्या हिऱ्याने पत्थरात दडून राहणेच पसंत केले. पण

आपला सुपुत्र, महान चित्रकार अरमान हा हिरा मात्र कलाजगताला ते देऊन गेले."

सर्वत्र कुजबुज झाली. अरमान पुढच्या सीटवर बसला होता. त्याच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहत होत्या.

"आता मी तुम्हाला,... " अचानक आनंदला सोना धावत स्टेजकडे येताना दिसली. ती हुंदके देऊन देऊन रडत होती. स्टेजच्या पायथ्याशी येऊन ती एकदम भानावर येऊन थांबली. हुंदक्यांनी तिचं शरीर गदगदत होतं. आनंदने तिला हाताने साईडच्या पायऱ्यांवरून वर बोलावले.

"आता मी तुम्हाला एक स्लाईडशो दाखवणार आहे ज्यात रंग बनवण्यापासून चित्र रंगवण्यापर्यंतची सर्व प्रक्रिया माझ्या गुरूंनी मला कशी शिकवली त्याची चित्रे आणि मी दाखवलेली प्रात्यक्षिके आहेत. स्लाईड्स ना मागून आवाज दिला आहे." शो सुरू झाला आणि सोना वर येऊन आनंदाला बिलगली. डायसच्या मागे दोघे असल्याने आणि स्लाईड शो साठी लाईट्स मंद केल्याने प्रेक्षकांना काही हे दिसले नाही. आनंदने तिला पोटभर रडू दिले. तो तिला थोपटत राहिला. जरा शांत झाल्यावर तिने ओल्या डोळ्यांनी त्याच्याकडे पाहिले. "काय झालं बेटा?"

"तू खरंच मला लहानपणी देऊन नव्हतं टाकलस. तू मला खांद्यावर घेऊन झोपवायचास जेव्हा मी बाळ होते. आणि माझ्याशी खेळायचास. आणि माझ्यावर खूप प्रेम करायचास."

"हो, आत्ताही करतो."

"मी पाहिलं सगळं."

"पाहिलं?"

"कृपामावशीच्या लॅपटॉपवर व्हिडिओ आहेत."

"कृपामावशी? तिचा लॅपटॉप?"

"होय!" मग ती परत घट्ट बिलगली त्याला. त्याची नजर प्रेक्षकात फिरली. सोनाला थांबवण्यासाठी तिच्या मागे आलेली कृपा स्टेजच्या खालीच उभी होती. दोघांची नजरानजर झाली आणि संपूर्ण प्रेक्षागृह टाळयांच्या कडकडाटाने दुमदुमलं. सगळे उठून उभे राहिले. आनंद एकदम भानावर आला.

स्लाईड शो संपून पीरबाबाचे आनंदने काढलेले चित्र 'माय गुरु' या हेडिंगखाली संपूर्ण स्क्रीनभर झळकत होते. आणि तळाशी पीरबाबाने आनंदाचे काढलेले चित्रं होते.

आनंदने सोनाला हाताला धरून खाली कृपाकडे पाठवले. तसे करण्यापूर्वी त्याने सोनाच्या गालांवर ओठ टेकले. त्याने परत एकदा कृपाकडे पाहिले. “थँक यू.” तो पुटपुटला.

त्याच्या मनात अनंत विचारांचे काहूर उठले होते. भावनांनी कल्लोळ माजवला होता. पण कर्तव्य समोर उभे होते. मग त्याने डेमॉन्स्ट्रेशनला

सुरवात केली. भारावून गेलेले विद्यार्थी सरसावून बसले. आनंद जे कॅनव्हासवर चितारत होता ते ब्लो अप होऊन स्क्रीनवर दिसत होतं.

त्याचे हात अत्यंत गतीने लयबद्ध फिरत होते कॅनवास वर. आणि त्यातून जी निर्मिती होत होती ती सर्वांना अद्भुत अनुभव देत होती.

पुढचा एक तास आनंद देहभान हरपून चितारत राहिला आणि जेव्हा तो कॅनव्हाससमोरून बाजूला झाला तेव्हा सगळ्यांचा श्वास एक क्षण रोखला.

ते सोनाचं चित्र होतं, अत्यंत आनंदी प्रवृत्ती दर्शवणारं. तिचे हसरे डोळे अत्यंत जिवंतपणे त्या मोठ्या स्क्रीनवरून सर्वांकडे पाहत होते आणि ती सकारात्मक ऊर्जा सर्वांपर्यंत पोहोचवत होते.

पुन्हा एकदा टाळ्यांच्या गजरात सर्व जण उभे राहून अभिवादन करू लागले. आनंदने पुढे झुकून सर्वांना नम्रपणे अभिवादन केले. अरमान पुढे आला, त्याने आनंदाला घट्ट आलिंगन दिले.

———

३. १५

सेशन संपल्यावर सगळ्यांनी आनंदाला गराडा घातला. कोणाला त्याच्याशी शेक हॅन्ड करायचा होता तर कोणाला स्वाक्षरी घ्यायची होती. कोणी विचारत होतं की त्याचं कुठे स्कूल आहे का? हे तुम्ही आत्ता काढलेलं पेंटींग विक्रीसाठी आहे का? एक ना हजार गोष्टी. मुली त्याच्या राजबिंड्या रूपावर आणि तितक्याच बेफिकीर ड्रेसिंग सेन्सवर फिदा होत्या तर मुलं त्याच्या व्यक्तीमत्वाने प्रभावित होती. आर्ट लव्हर्स त्याच्या पेंटींग्जसाठी पागल झाले होते.

त्याची नजर मात्र आज फक्त एका व्यक्तीला शोधत होती. आणि ती मात्र कुठेच दिसत नव्हती.

चंदू, सुकन्या, इंदा आणि सोना त्याला लांब उभे दिसले. तो गर्दीतून वाट काढत त्यांच्याजवळ पोहोचला. फोटोग्राफर होतेच मागे. दोन्ही पोरं लगेच येऊन चिकटली. तो इंदाला हळूच म्हणाला, "रुसला नाहीस ना, अरे ती रडत होती ना, म्हणून काढलं रडूबाईचं चित्रं." दोघेही हसले.

त्याने आसपास पाहिले. तिचा कुठेच पत्ता नव्हता जिला तो शोधत होता. मग त्याने सोनाला विचारले "कृपामावशी कुठाय?"

"मला आईकडे सोडून गेली ती."

"कुठे गेली?"

"मला नाही माहित."

"हम्म! सुकन्या तुम्ही जेवण करून घ्या. मी जरा कृपाला बघतो कुठे गेलीय."

"ती पूलसाईड क्युबिकल्स मध्ये मीटिंगसाठी जाते म्हणाली,"चंदूने माहिती पुरवली. आनंद मग निघाला. तो पोहोचला तेव्हा कृपा पूलच्या बाजूने मांडलेल्या खुर्च्यांमध्ये एका देखण्या तरुणाबरोबर बसली होती. दोघे अगदी खळखळून हसली त्या तरुणाच्या कोणत्यातरी जोकवर. आनंद जागच्या जागी थबकला. दोन क्षण त्याची कानशिलं तापली. मग तो शांत झाला. शांतपणे चालत तो त्या दोघांपर्यंत पोहोचला.

"हाय कृपा!"

याला पाहून ती आश्चर्यचकित झाली. उभी राहिली. तिच्याबरोबरचा तरुणही उभा राहिला. आनंद त्याला म्हणाला "मे आय ह्याव अ वर्ड विथ द लेडी प्लीज?" ती दोघेही अत्यंत चकित झाली. तो तरुण किंचित बाजूला गेला. आनंद कृपाच्या अगदी समोर जाऊन उभा राहिला. त्याने दोन्ही हात तिच्या खांद्यांवर ठेवले. ती काहीशी संकोचली.

तिने काही म्हणण्याआधीच आनंद म्हणाला, "कृपा, आज, आत्तापासून, मी, विनाअट, माझ्या मनातील सईच्या आठवणीसह, माझ्या दोन मुलांसह, माझ्या कलेसह, नादानपणासह स्वतःला तुझ्या स्वाधीन करतोय. तू जे ठरवशील ते मला मान्य असेल. फक्त माझी एकच आत्यंतिक इच्छा आहे. तू आनंदी असायला हवस. त्यासाठी जसं वागायचं तसं वाग.

पूर्वी माझ्या मनात, माझ्याबरोबर तू आनंदी राहशील की नाही ही शंका होती. आता ती नाही. तू आनंदी राहू शकशील ती फक्त माझ्याचबरोबर ही खात्री पटलीय मला. सई आपल्या दोघांच्याही मनात सतत असतेच आणि ती राहणारच. राहावंच तिने. तुला जसं हवं तसं आयुष्य जगू. पूर्वी वाटायचं, त्या खेडेगावात दीडदोन महिने सलग राहिलीस की कंटाळशील. पण आता तसं झालं तर मी येईन तुझ्याबरोबर माझा आख्खा कुटुंब कबिला घेऊन."

कृपाच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहत होत्या. त्याची खांद्यांवरची पकड घट्ट झाली तशी ती हळूहळू त्याच्याकडे ओढली गेली. तिचे हात कधी मिठीत गुंफले गेले आणि कधी तिची मान त्याच्या छातीवर विसावली दोघांनाही कळले नाही. आनंदाने तिला गाढ मिठीत घेतले.

आनंदाच्या पाठोपाठ आलेल्या काही पत्रकार फोटोग्राफर्सनी फटाफट फोटो काढले. पण या दोघांना त्याची फिकीर नव्हती. अनेक अडथळे पार करून आज हे मैत्र प्रीतीला भेटत होतं.

---

अरमान आणि शमा ते फोटो पाहून म्हणाले "फायनली दोनो पागल सयाने हुए."

त्या रात्री अरमान सॅमला म्हणाला, "सॅम इट्स हाय टाईम यू शुड ह्याव अ स्टेडी गर्लफ्रेंड!"

"मैं ढूंढ भी लुं, लेकिन ये जो बडी जिम्मेदारी है मुझपर (शमाकडे हात करून ) इसे पहले सौप दू आपको तो फिर सोचुंगा!!"

मैं खुशी खुशी ये जिम्मेदारी लेनेको तैयार हूं!

"तो आकर ढंगसे मेरेसे हाथ मांगिये इनका!"

शमाने डोळे गरागरा फिरवले. "हॅलो! दोनो एहसानफरामोश मर्दो, वो दिन भूल गये जब मेरी दामन पकडे चलते थे? बडे आये हाथ लेनेदेनेवाले!!" मग तिघंही जोरजोरात हसू लागले.

"मॉम, आप शादी कर लो. अरमानने काफी वक्त तक राह देखी है आपकी."

"सॅम, नातं जेव्हा अंदरूनी असतं ना त्याला रिवाजांची गरज नसते बेटा. फिरभी अगर अरमान चाहता है तो मैं ना नही कहूँगी."

"तुझी मॉम बरोबर बोलतेय सॅम, नातं थेट दिलसे असलं की बाकी कशाचीच गरज नसते."

"ऐसा है तो फिर कल फिरोझसे मिलाता हुं आप दोनोको."

आता चकित व्हायची पाळी या दोघांची होती.

---

लग्नगाठ बांधण्याची कृपाला गरज वाटली नाही. आनंदने सगळेच निर्णय तिच्यावर सोडले होते.

काकू, अनुराधेनी एकदोन वेळा सुचवलं, पण या दोघांचं ठाम एकमत पाहून त्यांनी विषय ताणला नाही. एकदा घराने हे नातं स्वीकारल्यावर गावानेही स्वीकारलं. कुजबुज व्हायची ती झालीच पण ती व्हायचीच असं म्हणून सर्वांनी दुर्लक्ष केलं.

नावं ठेवणारी मंडळी पण मोठी गमतीशीर असतात. ज्यांना नावं ठेवायची त्यांना काहीच फरक पडत नाही असं पाहिल्यावर त्यांचा नावं ठेवण्यातला इंटरेस्ट एकदम संपतो. इथेही तसंच झालं.

दर वर्षी आनंदाच्या प्रसिद्धीची कमान चढतच गेली. कृपाने आर्ट कन्सल्टन्ट म्हणून आपले नाव कमावले. तिने आर्ट फोर्जेरी वरील कायद्यांचा अभ्यास करून मास्टरी मिळवली. सुकन्या आणि चंदूने व्यवसाय परदेशात पसरवला.

भाऊ काका आणि काकू लवकरच गेले. पण मन समाधानी होते दोघांचे जाताना. वसंतही पाठोपाठ गेला. अनुराधा आणि अनंताने मात्र इंद्राची साची पाहिली आणि प्रथम अनुराधेनें आणि तिसऱ्या दिवशी अनंताने डोळे मिटले. आनंदाने सर्वांची खूप सेवा केली शेवटपर्यंत.

वासंती मात्र पुढे दोन वर्ष होती. जिभेची धार बोथट झाली होती. शेवटची दोन वर्षे सतत अनुराधेची आठवण काढून रडायची. 'मी खूप बोलले घालून पाडून तिला' म्हणायची.

---

आनंदाला जागतिक सर्वोत्कृष्ट चित्रकाराचा बहुमान जाहीर झाला तेव्हा सर्वांनाच फार आनंद झाला.

---

स्टडीमध्ये कृपाने बहुमानाच्या सर्व बातम्या चाळल्या. फोटो डाउनलोड केले. सईच्या त्या चित्रावरून अलगद बोट फिरवत ओल्या डोळयांनी म्हणाली, "सई, आज तू हवी होतीस. खूप हवी होतीस. उद्या उठल्याबरोबर येईल बघ तो तुला भेटायला. अलीकडे एकटा सोडत नाही त्याला फारसा, पण उद्या येऊ दे त्याला एकटाच. तुला भेटल्याशिवाय त्याचा बहुमान पूर्ण नाहीच व्हायचा. आमच्या नात्याला मला नाव नाही द्यावंसं वाटलं. कदाचित मॉमचं आयुष्य फार जवळून पाहिल्याने असेल.

शिवाय आमच्या नात्यात मैत्र आधी आणि प्रीत नंतर आली. रेशमी चीवट बंध हे इतर कोणत्याही नातेसंबंधांपेक्षा चीवट असतात हे सिद्ध झालं.

पण गम्मत पाहा हं, त्यामुळे आनंदाची पत्नी तूच आहेस. नाही गं, मला अजिबात वाईट नाही वाटत. तू नाहीस याचं मात्र आज वाईट वाटतंय."

---

इंद्र आणि सांची फॅक्टरी सांभाळतात. सोना मार्केटींग आणि सेल्स पाहते. वर्षातले तीन महिने ती निरनिराळ्या ठिकाणी ट्रेकला जाते. हुबहू सईच दिसते. उंची मात्र आनंदाची घेतलीय.

वरुणच्या मुलाने परदेशात नोकरी पत्करली.

आता बडी बडी मंडळी कृपाच्या सल्ल्याशिवाय पेंटिंग खरेदी करत नाहीत.

सोनाचं लवलाईफ इंदाला आणि आनंदाला सांगितल्याशिवाय तिला चैन पडत नाही. अर्थात आनंदाला गाळीव बातमी मिळते इंदाला विदाउट फिल्टर. लग्न मात्र आताच नाही करायचं म्हणते. सुकन्या सारखी त्यासाठी आग्रही असते. पण सोना येऊन गळयात पडली की तिचा राग कुठल्या कुठे पळून जातो.

आनंदा दिवसेंदिवस अधिकच अंतर्मुख होत चाललाय. तीन देशात त्याची आर्ट स्कूल्स आहेत. पण सगळयात खुश तो मचाणावरच्या शाळेत असतो. काही वर्षांपूर्वी ते रानच त्याने खरेदी केलं वनखात्याकडून, या अटीवर की एकही झाड तोडलं जाणार नाही. मग काही कुटीर बांधली, काही

मचाण बांधले. ज्याला कला शिकायची त्याने यावं, राहावं आणि मोफत कला शिकावी. गरीब श्रीमंत हा भेद नाही. गुरुकुलच ते एक.

या शाळेत येण्यासाठी अनेक उत्सुक असतात. पण आनंदाच्या परीक्षेत पास होणारा विद्यार्थीच इथे वर्णी लावतो.

परीक्षा एक पांढरा कागद आणि विद्यार्थ्यांच्या आवडत्या माध्यमाने होते.

---

कृपा कितीही बिझी असली तरी रोज सकाळची एक चक्कर दोघांची या शाळेत होतेच.

आजही ती दोघं अशीच निघाली. शिवमंदिर पार करून रानाकडे जाणारी, आता नीट बांधून घेतलेली पायवाट पार करून पुढे निघाली आणि अचानक आनंद थांबला. कृपाही थांबली. तिने एक भुवई उचलून विचारले 'काय झालं?'

आनंदने नजरेनेच खुणावलं 'इकडे ये.'


ती जाते त्याच्याजवळ. तो नजरेनेच खूण करतो. झाडाच्या खोडाला एक भेंडोळी अडकवलेली दिसते. ती दोर सोडवते तर वरून रानफुलांच्या पाकळयांचा वर्षाव. तिच्या चेहेऱ्यावर हसू आणि उत्सुकता. हातातलं चित्रं ती उलगडून पाहते. 'तिचं आणि त्याचं चित्रं. ती त्याच्या मिठीत


सामावलेली. त्याचा खांदा तिच्या अश्रुनी भिजलेला.' सगळं जसच्या तसं आठवतं तिला.

"हॅपी बर्थडे कृपा!!" तो तिला जवळ घेतो. तिची हसरी ओली नजर ओठानी टिपून घेतो. आसमंत हे परिपूर्ण चित्र नजरेत साठवत राहतो.

**समाप्त!**

## सौ. मधू शिरगांवकर यांची ई साहित्यवरील इतर ७ पुस्तके कव्हरवर क्लिक करताच पुस्तके उघडतील



आनंद

मधू शिरगांवकर



# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष.

# सौ. मधू शिरगांवकर यांचे ईसाहित्यवर हे आठवे पुस्तक

सौ. मधू शिरगांवकर एक नामवंत लेखिका आहेत. अनेक नियतकालिकांतून त्यांच्या कथा व इतर साहित्य प्रकाशित होत असते. सहसा त्यांची लिखाणाची शैली प्रासादिक असते. चित्रपटाप्रमाणे त्यांच्या कथा उलगडत जातात. एक थेट आणि ठळक असा सामाजिक संदेश त्यांच्या कथांतून दिला जातो. महिला सक्षमीकरण हे त्यांच्या साहित्यातील एक अधोरेखित मूल्य आहे. या पुस्तकातही उच्चभ्रू कुटुंबांतून नष्ट होत चाललेल्या संस्कार मूल्यांचा उहापोह आहे.

सौ. मधू शिरगांवकर यांच्यासारख्या ज्येष्ठ साहित्यिका आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१३), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४३), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत

पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३७), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२२), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(६), श्याम कुलकर्णी(५), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(३), मंगेश चौधरी, बंकटलाल जाजू(३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजाफडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीवियें ।

विशेषीं लोकीं 'इ'यें ।

दृष्टादृष्ट विजयें ।

होआवे जी ।